म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. ७४५४

# कोलंबो ते अल्मोरा

## (भारतांत दिलेलीं व्याख्यानें)

स्वामी विवेकानंद

REFBK-0013139

श्रीरामकृष्ण आश्रम
नागपूर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रमांक ........ वि: ........
क्रमांक ........ नों दि: ३०.........

# कोलंबो ते अल्मोरा

(भारतांत दिलेलीं व्याख्यानें)

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ............ वि: ............
क्रमांक ............ नों. दि ............

स्वामी विवेकानंद

REFBK-0013139

श्रीरामकृष्ण आश्रम
नागपूर

प्रकाशक
स्वामी भास्करेश्वरानंद
अध्यक्ष, श्रीरामकृष्ण आश्रम
धंतोली, नागपूर–१.

अनुवादक
भाग १ ला—स्वामी शिवतत्त्वानंद
भाग २ रा—प्रा. श्री. वा. अत्रे,
एम्. ए., एम्. एड्.

श्रीरामकृष्ण–शिवानंद–स्मृतिग्रंथमाला
पुष्प ४५ वें
(श्रीरामकृष्ण आश्रम, नागपूर द्वारा सर्व अधिकार सुरक्षित)
किंमत ६.२५

मुद्रक
श्री. प. वि. बेलवलकर
हरिहरेश्वर मुद्रणालय,
महाल, नागपूर–२.

# प्रस्तावना

आमचें हें नवीन प्रकाशन वाचकांच्या हातीं देतांना आम्हांला आनंद होत आहे. पाश्चात्त्य देशांत वेदान्ताचा आणि हिंदु धर्माचा प्रचार केल्यानंतर १८९७ सालीं स्वामी विवेकानंद जेव्हा भारतांत परत आले तेव्हा त्यांनी कोलंबोपासून अल्मोऱ्यापर्यंत ठिकठिकाणीं जीं व्याख्यानें दिलीं त्यांचा संग्रह प्रस्तुत पुस्तकांत केला आहे. स्वामी विवेकानंदांनी भारतांत जीं व्याख्यानें दिलीं तीं अत्यंत ओजस्वी व स्फूर्तिदायक असून त्यांत त्यांनी वेदान्त, धर्म, संस्कृति, देशप्रेम, मातृभूमीसंबंधीचें आपलें कर्तव्य इत्यादि विविध विषयांचें विवेचन केलें आहे. धर्माचा व तत्त्वज्ञानाचा स्वामी विवेकानंदांनी केलेला अभ्यास किती सखोल आहे व स्वतःच्या उच्च आध्यात्मिक अनुभूतींवर आधारलेले त्यांचे मौलिक विचार किती प्रभावी आहेत हें वाचकांना ह्या सर्व व्याख्यानांवरून उत्तम रीतीने कळून येतें. आजच्या काळांत राष्ट्रनिर्मितीसाठी असल्या विचारांची अत्यंत आवश्यकता आहे. यथार्थ 'माणूस' निर्माण करण्यासाठी स्वामी विवेकानंदांचीं भारतांतील हीं व्याख्यानें निश्चित मार्गदर्शक ठरतील असा आम्हांला विश्वास वाटतो.

प्रस्तुत पुस्तकांतील पहिल्या भागाचा अनुवाद स्वामी शिवतत्त्वानंदांनी केला असून दुसऱ्या भागाचा अनुवाद प्रा. श्री. वा. अत्रे, एम्. ए., एम्. एड्., यवतमाळ, यांनी केला आहे. प्रा. अत्रे यांच्या ह्या महत्त्वपूर्ण सहकार्याबद्दल आम्ही अत्यंत आभारी आहोंत.

दि. २५-२-१९६३ —प्रकाशक

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 38615 वि:
क्रमांक 1848 नों दि:

# अनुक्रमणिका

## भाग १ ला


| | |
|---|---|
| पूर्वेकडील देशांतील पहिलें जाहीर व्याख्यान ... | ३ |
| वेदान्त ... ... | २१ |
| पांबन येथील मानपत्रास उत्तर ... | ४६ |
| रामेश्वर मंदिरांतील भाषण ... | ५१ |
| रामनद येथील मानपत्रास उत्तर ... | ५४ |


## भाग २ रा


| | |
|---|---|
| परमकुडी येथील मानपत्रास उत्तर ... | ७३ |
| मानमदुरा येथील मानपत्राला दिलेलें उत्तर ... | ८२ |
| मदुरा येथील मानपत्रास दिलेलें उत्तर ... | ८९ |
| वेदान्ताचें कार्य ... ... | ९७ |
| मद्रास येथील मानपत्रास दिलेलें उत्तर ... | १२३ |
| माझ्या मोहिमेची योजना ... | १३० |
| भारतीय जीवनाच्या उभारणींतील वेदान्ताचें स्थान ... | १५५ |
| भारतांतील महापुरुष ... ... | १७७ |
| आपल्या पुढील कार्य ... ... | २०१ |
| भारताचा भावी काळ ... ... | २२० |
| दान ... ... | २४३ |
| कलकत्ता येथील स्वागत समारंभांत दिलेलें मानपत्र व त्यास उत्तर ... | २४५ |
| वेदान्ताचे विविध पैलू ... ... | २६४ |

| | |
|---|---|
| अल्मोरा येथील मानपत्र व त्यास उत्तर ... | २९५ |
| वेदांची तात्त्विक व व्यवहार्य शिकवण ... | ३०० |
| भक्ति ... ... | ३०२ |
| हिंदु धर्माचीं सामान्य आधारभूत तत्त्वें ... | ३१२ |
| भक्ति ... ... ... | ३३४ |
| वेदान्त ... ... | ३४३ |
| वेदान्ताची शिकवण ... ... | ३९० |
| भारतीय आध्यात्मिक विचारांचा इंग्लंडवरील प्रभाव ... | ३९७ |
| संन्यास : आदर्श व साधना ... ... | ४०४ |
| मी काय शिकलों ... ... | ४०७ |
| आपण ज्यांत जन्माला आलों तो धर्म— ... | ४१२ |

# भाग १ ला



स्वामी विवेकानंद

# स्वामी विवेकानंदांचें

# पूर्वेकडील देशांतील पहिलें जाहीर व्याख्यान

## कोलंबो

पश्चिमेकडील देशांत—अमेरिका-युरोप खंडांत वेदान्ताच्या, म्हणजेच हिंदुधर्माच्या सार्वजनीन सिद्धान्ताच्या प्रसाराचें चिरस्मरणीय कार्य करून मायभूमीस परत आलेल्या स्वामी विवेकानंदांनी १५ जानेवारी १८९७ रोजीं कोलंबोनगरीच्या भूमीवर पाय ठेवला. तेथील हिंदुसमाजातर्फे त्यांचें अभूतपूर्व स्वागत करण्यांत आलें. त्या प्रसंगीं स्वामी विवेकानंदांना पुढील मानपत्र समर्पिण्यांत आलें होतें—

**श्रीमत् विवेकानंद स्वामी**

श्रद्धेय महाराज,

या कोलंबोनगरींतील हिंदुसमाजाच्या एका जाहीर सभेंत ठरल्याप्रमाणे, सागराने वेढलेल्या या भूमींत आम्ही आपलें हृदयापासून स्वागत करीत आहोंत. आपण कृपा करून त्याचा स्वीकार करावा. पाश्चात्यदेशांतील आपलें महान् उद्दिष्ट तडीस नेऊन आपण मायभूमीस परतत आहांत; अशा या प्रसंगीं सगळ्यांच्या आधी आपलें स्वागत करण्याचा विशेष अधिकार आम्हांला लाभला आहे हें आम्ही आमचें केवढेंतरी सौभाग्य समजतों.

भगवंताच्या परम मंगल आशीर्वादांनी आपलें महान् उद्दिष्ट सफल होत असलेलें बघून आम्हां लोकांना केवढा हर्ष होत होता, कृतज्ञतेने आम्ही किती भारावून जात होतों. सर्व पंथांचा आणि संप्रदायांचा समन्वय साधील, प्रत्येकाला त्याच्या गरजेनुसार आध्यात्मिक साहाय्य करून त्याला हळुवारपणें परमेश्वराकडे आकर्षित करील अशा एका सार्वजनीन धर्मासंबंधीच्या आम्हां हिंदूंच्या कल्पना आपण युरोप आणि अमेरिका खंडांतील निवासियांना उद्घोषून सांगितल्यात. ज्यांच्या चरणस्पर्शाने भारताची भूमि पवित्र झाली आहे,––ज्यांच्या स्फूर्तिदायी, महन्मंगल जीवनांनी उजळून निघालेला भारत भल्या-बुऱ्या सर्वच अवस्थांमधे सदाच जगाचा मार्गदर्शक ठरला आहे त्या महान् द्रष्टयांच्या

अविच्छिन्न परंपरेने अति प्राचीन कालापासून आम्हांला शिकविलेलें सत्य आणि त्या सत्याच्या प्राप्तीचा मार्ग या दोहोंचा आपण पाश्चात्य-देशांत अत्यंत प्रभावीपणें प्रसार केला.

श्रीरामकृष्णदेव अशाच द्रष्टयांतील एक होते. त्यांच्या स्फूर्तिप्रद जीवनाने आणि आपल्या स्वार्थत्यागमय उद्यमाने पाश्चात्यदेशांना भारताच्या आध्यात्मिक प्रतिभेचें उज्ज्वल दर्शन घडण्याचें--भारताच्या आध्यात्मिक प्रतिभेचें जिवंत स्पर्श होण्याचें अमोल वरदान लाभूं शकलें. आणि त्याचबरोबर आपल्या स्वदेशबांधवांपैकी अनेकांचें ह्या पाश्चात्य सभ्यतेच्या झगझगाटाचें आकर्षण ओसरून त्यांना स्वत:च्या वैभवशाली सांस्कृतिक वारशाची किंमत कळूं लागली आहे.

आपल्या धीरोदात्त जीवनाने आणि उदात्त उद्यमाने आपण अवघी मानवजात ऋणी करून ठेवली आहे. हें ऋण कधीहि फिटाव-याचें नाही. आपल्या मातृभूमीला आपण नव्याने उजळा दिला. त्या विश्वविधात्याच्या अपार कृपेने आपली आणि आपल्या कार्याची सतत अशीच भरभराट होत राहो एवढीच आमची प्रार्थना आहे.

सदा आपल्या विश्वासास पात्र असण्याची मनीषा बाळगणाऱ्या कोलंबोनिवासी हिंदूंच्या वतीने व या सभेचा अध्यक्ष या नात्याने, सिलोनच्या कायदेमंडळाचा एक सभासद मी, पी. कुमार स्वामी, आणि ह्या सभेचे कार्यवाह ए. कुलवीरसिंगम् आपल्या करकमलीं हें अभिनंदनपत्र समर्पीत आहोंत.

**कोलंबो. जानेवारी १८९७.**

वेळ बराच झाला होता. एव्हाना अंधार पडूं लागला होता. त्यामुळे ह्या मानपत्राला स्वामीजी सविस्तर उत्तर देऊं शकले नाहीत. संक्षेपाने ते म्हणाले :—

आपल्या ह्या अभिनंदनाने मी अतिशय आनंदित झालों आहें. आपल्या भावना मला कळूं शकतात तथापि ह्या अभिनंदनाला मी माझ्या स्वत:च्या वैयक्तिक कार्याची वाहवा मानायला मात्र मुळीच तयार नाहीं. ह्या अभिनंदनावरून हेंच सूचित होत आहे की हिंदुलोक धर्मालाच सगळ्यांत मौल्यवान वस्तु समजत असतात. तुम्ही आज ह्या ठिकाणीं एखाद्या

विख्यात राजकारणी मुत्सद्याचें किंवा कुण्या एखाद्या रणधुरंधर सेनानीचें अथवा लक्ष्मीचा वरदहस्त असलेल्या कुण्या धनवंताचें अभिनंदन करण्यासाठी जमलां नाही. एका भिक्षाजीवी संन्याशाच्या सन्मानासाठी तुम्हीं सर्वांनी हा एवढा प्रचंड खटाटोप केला. हिंदूंच्या मनाचा कल कशाकडे आहे हें या साऱ्यावरून स्पष्ट दिसून येत नाही काय ? भारताला जर जिवंत राहावयाचें असेल तर त्याने धर्मालाच आपल्या राष्ट्रीय जीवनाचा मूल आधार करावयास हवा. तसें केल्याखेरीज गत्यंतर नाही.

## कोलंबो येथील व्याख्यान

सोळा तारखेला सायंकाळीं स्वामी विवेकानंदांनी 'फ्लोरल हॉल' नामक स्थानीं जाहीर व्याख्यान दिलें. हेंच स्वामी विवेकानंदांचें पूर्वेकडील सर्वांत पहिलें सार्वजनिक व्याख्यान होय :

माझ्याकडून जें कांही अल्पस्वल्प कार्य झालें आहे तें माझ्या स्वतः-मधे वसणाऱ्या एखाद्या अंतस्थ शक्तीच्या बलाने झालेलें नाही. तर, पाश्चात्यदेशांत वावरतांना या आपल्या परम प्रिय, परम पवित्र मातृभूमीकडून लाभलेलें प्रोत्साहन, शुभेच्छा आणि आशीर्वाद यांच्या सतत पाठपुराव्यानेच तें मजकडून होऊं शकलें. पाश्चात्यदेशांत थोडेंबहुत चांगलें काम झालें आहे यांत शंकाच नाही, परंतु पाश्चात्यदेशांत गेल्याने जर खरोखर कुणाचें विशेष भलें झालें असेल तर तें माझें स्वतःचेंच होय. कारण, पूर्वी ज्यावर मी कदाचित भावनेच्या भरांत विश्वास ठेवीत असेन तें आता माझ्यापक्षीं ठाम, प्रमाणसिद्ध सत्य होऊन बसलें आहे. पूर्वी सगळ्या हिंदूंप्रमाणे मलाहि वाटत असें की भारत पुण्यभूमि आहे--भारत कर्मभूमि आहे. आजच्या या सभेच्या सन्मान्य अध्यक्षांनी आत्ताच याबाबत केलेलें ह्याच अर्थाचें विधान आपण ऐकलेंच आहे. आज आपल्यासमोर उभा राहून मी अगदी ठासून सांगूं शकतों की तें सत्य आहे--नितान्त सत्य आहे--त्रिवार सत्य आहे. ह्या पृथ्वीच्या पाठीवर जर असा कोणता एखादा देश असेल की ज्याला 'पुण्यभूमि' हें गोड आणि अन्वर्थक नांव अगदी यथार्थपणें देतां येईल--जर असें कोणतें एखादें स्थान असेल की जेथे जगामधील सर्व जीवांना आपल्या कर्मफलाचा उपभोग घेण्यास्तव यावें लागेल--असें एखादें ठिकाण असेल

की भगवत्-लाभाची आकांक्षा बाळगणाऱ्या प्रत्येकाला अंतीं जिथे येऊन दाखल व्हावेंच लागेल--जर असें एखादें स्थान असेल की जिथे माणसांत कोमलता, शुचिता, दया, दाक्षिण्य, क्षमा प्रभृति सद्गुणांचा इतर कुठल्याहिपेक्षा अधिक विकास झाला आहे--जर अशी कोणती एखादी भूमि असेल की जिला अंतर्दृष्टीचें आणि आध्यात्मिकतेचें माहेरघर म्हणतां येईल तर ती म्हणजे आपली ही मायभूमि भारतच होय. अत्यंत प्राचीन कालापासून येथे भिन्न भिन्न धर्मांच्या संस्थापकांचा उदय झाला असून त्यांनी परमपवित्र आणि सनातन अशा आध्यात्मिक सत्याच्या शांतिजलाने ह्या जगाला वारंवार शमविलें आहे--आध्यात्मिकतेच्या लोंढ्यांनी त्यांनी हें जग पुन्हापुन्हा तुडुंब भरून टाकलें आहे. येथून उद्भवलेल्या तत्त्वज्ञानाच्या प्रचंड पुराने उत्तर दक्षिण, पूर्व पश्चिम--समस्त दिशा--सारें जग व्यापून टाकलें आहे. आणि येथूनच फिरून अशी एक लाट उठणार आहे की जी आधुनिक जगाच्या इहलोकनिष्ठ सभ्यतेला आध्यात्मिक संजीवन प्रदान करणार आहे. इतर देशांतील लक्षावधि, कोटचवधि स्त्री-पुरुषांच्या जीवनाचा दाह करणारा--त्यांचीं हृदयें करपून टाकणारा जडवादाचा वन्हि विझविण्याचें सामर्थ्य असलेल्या अमृतोपम शांतिजलाचा अक्षय ठेवा एकमात्र या आपल्या भारतभूमींतच विद्यमान आहे. बंधूंनो, विश्वास ठेवा--घटना अशीच घडणार आहे--आपला भारतच जगाला अध्यात्माचें पसायदान देणार आहे.

अलम दुनिया पायाखाली घालून मला जें उमजलें आहे त्याच्याच आधारावर मी हें म्हणत आहें. आपणांपैकी ज्यांनी भिन्नभिन्न जातींच्या इतिहासाचें नीट अनुशीलन केलें आहे त्यांनाहि ह्याची जाणीव असेलच--हें सत्य त्यांनाहि नक्कीच जाणवलें असेल. आपल्या या मायभूमीचें अवघ्या जगावर अपार ऋण आहे. देशांदेशांची तुलना करून बघितली तर आढळून येईल की जग ह्या सोशिक, सहनशील, सौम्य हिंदुजातीचें जितकें ऋणी आहे तितकें आणखी दुसऱ्या कोणत्याहि जातीचें नाही. सौम्य वा "मवाळ हिंदु" हे शब्द कांही वेळां हिंदूंची हेटाळणी करण्याच्या उद्देशाने, त्यांचा तिरस्कार करण्याच्या हेतूने वापरले जात असतात. परंतु अवहेलनेच्या आणि तिरस्काराच्या शब्दांमधे पुष्कळदा विलक्षण सत्य दडलेलें असतें ह्याचें सर्वोत्कृष्ट उदाहरण म्हणजे "मवाळ हिंदु" हे शब्द

होत. हिंदु सदाचींच त्या विश्वपित्याचीं लाडकीं लेकरें होत. जगाच्या इतरहि भागांत निरनिराळ्या सभ्यता उदयास आल्यात. खरें आहे. प्राचीन काळीं आणि वर्तमान काळींहि कित्येक शक्तिशाली, सुमहान् जातींनी उच्च विचार, उच्च सिद्धान्त, उच्च मतें जगाला दिलींत. अगदी खरी गोष्ट. प्राचीन काळीं आणि वर्तमान काळीं कितीतरी अद्‌भुत अद्‌भुत तत्त्वें एका जातीने दुसऱ्या जातीला बहाल केलीं आहेत. मंजूर आहे. प्राचीन आणि वर्तमान काळीं कुण्याकुण्या जातीच्या जीवनाच्या लोंढ्याबरोबर महान् शक्तिशाली सत्यांचीं बीजें इतस्ततः विखुरलीं गेलीं आहेत. कबूल आहे. पण माझ्या मित्रांनो, लक्षांत ठेवा——त्या साऱ्यांचा प्रचार झाला आहे रणशिंगांच्या कर्कश निनादाने——रणसाज चढविलेल्या बेगुमान सैनिकांच्या धुमाळीमधून. मानवी रक्तांत भिजविल्याशिवाय, लाखो बांधवांचें रक्त सांडल्याशिवाय ह्यांतील कोणतीहि जात दुसऱ्या जातीला असला नवीन विचार वा सिद्धान्त देऊं शकलेली नाही. यांतील प्रत्येक ओजस्वी सिद्धान्ताच्या प्रचाराबरोबरच उठले आहेत लाखोगणती निरपराध लोकांचे हाहाकार, उसळले आहेत अनाथ बालकांचे चीत्कार, वाहिले आहेत दीन विधवांचे अश्रु.

मुख्यतः ह्याच उपायांनी इतर जातींनी जगाला शिकविलें आहे. परंतु भारत या उपायांची कास न धरतांहि हजारो वर्षें जिवंत आहे. जेव्हा ग्रीस अस्तित्वांतदेखील नव्हता, रोम अजून जन्मास यावयाचें होतें, ज्या वेळीं आधुनिक युरोपियनांचे पूर्वज जर्मनीच्या घनदाट जंगलांत असभ्य दशेंत खितपत निळ्या रंगाने आपलीं अंगें रंगवीत असत तेव्हाहि——त्या काळींहि भारत क्रियाशील होता ह्याचा अमोघ पुरावा आहे. याहिपेक्षा प्राचीन कालापासून——इतिहासाला ज्या काळाची कांही माहिती नाही, दंतकथाहि ज्या काळाच्या घनांधकाराचा भेद करूं शकत नाहीत, त्या अति प्राचीन कालापासून वर्तमान कालापर्यंत कल्पनांमागून कल्पना, सिद्धान्तांमागून सिद्धान्त, विचारांमागून विचार या भारतांतून बाहेर गेले आहेत. परंतु त्या सर्वांच्या——त्यांतील प्रत्येकाच्या पुढे शांति आणि मागे आशीर्वाणी होती. समोर शांति आणि पाठीशीं आशीर्वाणी घेऊनच ते आपल्या जन्मभूमींतून बाहेर पडून इतर देशांत, इतर जातींत गेले आहेत. जगांतल्या सगळ्या जातींमधे फक्त आम्हीच कधीहि इतर

कोणत्याहि जातीशीं युद्ध करून त्यांना जिंकलें नाही--आणि त्या शुभ कर्माचें, त्या पुण्याचें फळ म्हणून आम्ही अजूनहि जिवंत आहोंत. असा समय होता की जेव्हा बलाढ्य ग्रीक सेनेच्या वीर्यदर्पाने सारी पृथ्वी चळचळां कांपत असे. आज ग्रीक कुठे आहेत ? ते नामशेष झालेत--आज त्यांचें चिन्हसुद्धा उरलेलें नाही. ग्रीसदेशाचा गौरवरवि आज अस्तंगत झालेला आहे! असा समय होता की जेव्हा रोमच्या गरुडांकित विजय-पताकेची सावली जगांतील समस्त वांच्छनीय भोग्य वस्तूंवर पडलेली होती. रोमन सर्वत्र संचार करीत होते--मानवजातीवर सर्वत्र आपला अंमल बसवीत होते. रोमच्या नांवाने धरणी थरथर कांपत असे. आज कॅपिटोलाईन पहाड * केवळ एक भग्न अवशेषांचा ढीग होऊन पडला आहे ! ज्या ठिकाणीं प्रचंडप्रतापी सीझर राजे आपल्या अमित बलाने राज्य करीत असत तिथे, त्या ठिकाणीं आज कोळी इतस्ततः आपलीं जाळीं करतांना दिसतात ! जगांत अशाच इतरहि अनेक जाती उदयास आल्या आहेत आणि लयास गेल्या आहेत--मदोन्मत्त होऊन, गर्वाने उद्दाम बनून सत्ता गाजवीत, इतरांना पीडा देत क्षणभंगुर जिणें जगून पाण्यावरील बुडबुड्याप्रमाणे त्या स्मृतिशेष झाल्या आहेत.

ह्या सर्व जाती या असल्या तऱ्हेने मानवसमाजावर एकदा आपलीं चिन्हें रेखाटून आता अंतर्धान पावल्या आहेत--कायमच्या लुप्त होऊन गेल्या आहेत. पण आपण मात्र अजूनहि जिवंत आहोंत. आणि आज जर आमचे स्मृतिकार महर्षि मनु ह्या त्यांच्या भारतभूमींत परत येतील तर येथे त्यांना मुळीच गांगरल्या-गोंधळल्यासारखें वाटावयाचें नाही, येथील कशाविषयीच त्यांना कांही अचंबा वाटावयाचा नाही; आपण या कोणत्या अनोळखी जागीं येऊन पडलों आहों असें त्यांच्या मनांत-सुद्धा यावयाचें नाही. हजारों वर्षे चिंतन आणि पारख करून निर्मिले गेलेले ते सर्व पुरातन विधि-निषेध, ते सर्व प्राचीन नियम येथे अजूनहि प्रचारांत आहेत; शेकडो शतकांच्या अनुभवांनी अस्तित्वांत आणलेले,

---

* रोम नगर सात पर्वतांवर वसविलेलें होतें. त्यांपैकी ज्या पर्वतावर, रोम-नांची कुलदेवता असलेल्या ज्युपिटरचें विशाल मंदिर उभारलें गेलें होतें त्याचें नांव कॅपिटोलाईन पर्वत असें होतें. ज्युपिटर देवतेच्या मंदिराचें नांव होतें कॅपिटल, त्यावरूनच त्या पर्वताचें कॅपिटोलाईन असें नांव पडलें.

चिरंतनच वाटावेत असे ते सगळे आचार येथे अजूनहि प्रचारांत आहेत. जसजसा काळ लोटत आहे, जितके जितके संकटांचे नि दुर्दैवाचे घणाघात त्यांच्यावर होत आहेत तसतसे नि तितकेतितके ते आणखीच बळकट, अधिकाधिक चिरस्थायी, आणखीच टिकाऊ बनत आहेत. या सर्व विधि-निषेधांचें आणि आचारांचें केंद्र कोणतें, कुठून जीवनरसाचा पुरवठा होऊन ते पोसले जात आहेत, आमच्या जातीच्या जीवनाचा मूळ झरा कोणता हें जर जाणूं इच्छीत असाल तर विश्वास ठेवा--ह्या सर्व पृच्छांचें उत्तर आहे--धर्म. सारें जग पालथें घालून मला जो काय अनुभव लाभला त्याच्याच बळावर मीं हा सिद्धान्त बांधला आहे.

इतर जातींच्या लेखीं धर्म हा संसारांतील बाकीच्या कामांसारखें एक काम आहे, इतकेंच. राजकारणाची चर्चा आहे, सामाजिक जीवन आहे, धन आणि सत्ता यांच्या द्वारा जें कांहीं लाभूं शकतें, इंद्रियांना ज्याने आनंद होतो त्या साऱ्यासाठी धडपड आहे. या सगळ्या निरनिराळ्या कामांमधे, आणि भोग भोगून शिथिल झालेल्या इंद्रियांना अमळ उद्दीपित करण्याच्या खटाटोपाबरोबरच थोडाबहुत धर्महि आचरायचा--ही त्या लोकांची धर्माविषयी कल्पना. परंतु इथे, या भारतांत मात्र माणसाचे सगळे प्रयत्न आहेत धर्मासाठी--धर्मलाभच त्याच्या जीवनांतील एकमेव कार्य होय. चीन आणि जपान यांचें युद्ध होऊन गेलें --तुमच्यापैकी कितीजणांना त्याची खबर आहे ? पाश्चात्त्य समाजांत निरनिराळीं प्रचंड राजनैतिक व सामाजिक आंदोलनें घडून येऊन तीं त्या समाजाला नवीन घाट देऊं पाहत आहेत हें तुमच्यांतील कितीजणांना बरें अवगत असेल ? जरी असेलच तरी अगदी बोटांवर मोजण्याइतक्या व्यक्तींनाच. परंतु अमेरिकेंत एक जंगी सर्वधर्मपरिषद भरली होती आणि तींत एक हिंदु संन्यासी पाठविला गेला होता हें इथल्या हमाल-मजुरांना देखील ठाऊक आहे ही केवढ्या आश्चर्याची गोष्ट आहे बरें ! हवा कोणीकडे वाहत आहे, हिंदुजातीच्या जीवनाचा मूळ झरा कोणता हें यावरून अगदी स्पष्ट दिसून येतें. स्वदेशांतील, आणि विशेषतः विदेशांतील सुशिक्षित व्यक्तींना, पूर्वेकडील देशांतील आम जनतेचें घोर अज्ञान बघून कणव व्यक्त करतांना मीं पूर्वी पुष्कळदा ऐकलें आहे, आणि एका सपाट्यांत साऱ्या पृथ्वीला फेरा घालूं निघालेल्या प्रवाशांच्या पुस्तकांत मी

ह्यासंबंधी बरेंच वाचतहि असे. आता मला उमजत आहे की त्यांचें म्हणणें खरेंहि आहे आणि खोटेंहि आहे. इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स, जर्मनी वा तिकडल्या इतर कोणत्याहि देशामधील एखाद्या शेतकऱ्याला बोलावून विचारा बघूं की "तूं राजकारणांतील कोणत्या पक्षाचा आहेस ?" तो आपल्याला ताबडतोब सांगून मोकळा होईल कीं "मी रॅडिकल (उदारमतवादी, प्रागतिक) पक्षाचा आहें, अथवा कॉन्झरव्हेटिव (परंपरावादी) पक्षाचा आहें, आणि मी अमुक अमुकालाच आपलें मत देणार आहें." आपण रिपब्लिकन आहों की डेमोक्रॅट आहों हें अमेरिकेच्या शेतकऱ्याला नीट माहीत असतें. इतकेंच नव्हे तर, त्याला 'चांदीच्या प्रश्ना'-चीहि (Silver Questionचीहि) जुजबी माहिती असल्याचें तुम्हांला आढळून येईल. परंतु तेंच त्याला तुम्हीं त्याच्या धर्मासंबंधी विचारून बघा. तो तुम्हांला सांगेल की मी चर्चमधे जात असतों, बस्, यापेक्षा याबाबतींत मला आणखी जास्त कांही माहीत नाही. किंवा फार झालें तर तो तुम्हांला सांगेल की माझे वडील ख्रिस्तीधर्माच्या अमुक अमुक पंथाचे होते. चर्चमधे गेलें म्हणजे आटोपला धर्म, बस् एवढेंच त्याला धर्माविषयी माहीत असतें. आणि तेवढेंच त्याला पुरें वाटत असतें.

याउलट, भारतांतील एखाद्या शेतकऱ्याला विचारून बघा की तुला राजनीतीसंबंधी कांही माहीत आहे काय ? तो बापडा तुमच्या प्रश्नाने गांगरून जाऊन आ करून तुमच्या तोंडाकडे बघत राहील. तो तुम्हांला उलट विचारील की "तें म्हणजे काय बुवा ? कशासंबंधी विचारताहांत तुम्हीं ?" तो सोशॅलिझम (समाजसत्तावाद) प्रभृति सामाजिक चळवळींसंबंधी, मुद्दल आणि मजुरी यांच्या परस्परसंबंधाविषयी, आणि असल्याच इतर बाबतींत निखालस अजाण असतो. त्याने आपल्या उभ्या हयातींत या साऱ्या भानगडी ऐकलेल्या नसतात. तो खूप मेहनत करून पोटाला मिळवीत असतो—राजनीति वा समाजनीतीसंबंधीं तो फक्त एवढेंच जाणतो. पण त्याला जर तुम्ही विचाराल की तुझा धर्म कोणता, तर आपल्या कपाळावरील टिळा दाखवून तो तुम्हांला सांगेल की मी ह्या पंथाचा आहें. धर्माविषयी संभाषण सुरू केल्यास त्याच्या तोंडून एकदोन अशा गोष्टी निघतील की त्या ऐकून तुमच्या-आमच्याहि ज्ञानांत भर पडावी. हें मी माझ्या स्वतःच्या अनुभवाने सांगत

आहे. हा धर्मच आमच्या जातीच्या जीवनाचा पाया होय.

प्रत्येक व्यक्तीचेंच कांही ना कांही विशेषत्व असतें. प्रत्येकजण आपापल्या मार्गाने उन्नतीकडे जात असतो. आम्हां हिंदूंच्या मतें अगणित पूर्वजन्मांमधील कर्मांच्या अनुरोधाने माणसाचें चालू जीवन एका विशिष्ट, एका ठराविक मार्गाने जात असतें. कारण, अनंत गतकर्मांनीच आमच्या जीवनाला हा आजचा घाट दिलेला आहे, आणि आम्ही आता जसें वागूं त्यावरच आमच्या भावी जीवनाची घडण अवलंबून राहील. असें आहे म्हणूनच आढळून येतें की या पृथ्वीच्या पाठीवर जन्मलेल्या प्रत्येक व्यक्तीचा एका ना एका गोष्टीकडे विशेष कल असतो, त्या विशिष्ट मार्गानेच जाणें जणु तिला भाग असतें. त्या स्वतःच्या जन्मसिद्ध प्रवृत्तीचा आसरा घेतल्याखेरीज ती जगूंच शकणार नाही. हें जसें एका व्यक्तीच्या बाबतींत खरें आहे, तसेंच, व्यक्तींची समष्टि जी जात, तिच्या बाबतींतहि तें तितकेंच खरें आहे. प्रत्येक जातीचाच जणु एक विशिष्ट जीवनोद्देश असतो. प्रत्येक जातीलाच जणु समस्त मानवजातीचें जीवन सर्वांगसंपूर्ण करण्यासाठी कोणत्यातरी एखाद्या विशिष्ट व्रताचें पालन करावें लागत असतें. आपला स्वतःचा जीवनोद्देश प्रत्यक्षांत उतरवून प्रत्येक जातीला अखिल मानवजातीबाबतच्या त्या स्वतःच्या व्रताचें उद्यापन करावें लागत असतें. राजनैतिक वा सामाजिक श्रेष्ठता हा कदापि आमच्या जातीचा जीवनोद्देश नव्हे. तो आमचा जीवनोद्देश कधीहि नव्हता, आणि लक्षांत ठेवा, कधी होणारहि नाही. आमच्या जातीचा एक निराळाच जीवनोद्देश आहे. आणि तो हाच--समस्त जातीची आध्यात्मिक शक्ति एकत्रीभूत करून जणु एका विद्युत्-आधारांत संरक्षित करणें, आणि जेव्हा म्हणून सुयोग येईल तेव्हा त्या समष्टि-भूत शक्तीच्या लोंढ्याने सारें जग भरून टाकणें. जेव्हा म्हणून पारसी, ग्रीक, रोमन, अरब वा इंग्रज जातींनी आपल्या दुर्जय सेनेसहित दिग्विजयार्थ बाहेर पडून निरनिराळ्या जातींना एका सूत्रांत गोवलें आहे --वेगवेगळ्या जातींचा एकमेकांशीं संपर्क प्रस्थापित केला आहे तेव्हा तेव्हा भारताचें तत्त्वज्ञान आणि भारताची अध्यात्मविद्या त्या साऱ्या नव्या मार्गांनी जगांतील भिन्नभिन्न जातींच्या जीवनांत भिनली आहे. अखिल मानवजातीच्या उन्नतीप्रीत्यर्थ शांतिप्रिय हिंदूंनाहि कांही द्यावयाचें

आहे. आध्यात्मिक दीप्तिच जगताला भारताचें पसायदान होय.

याप्रमाणे गतकाळाचा इतिहास चाळल्यास आपल्याला आढळून येतें की जेव्हा जेव्हा कुण्या एखाद्या प्रबळ, दिग्विजयी जातीने पृथ्वीवरील निरनिराळ्या जातींना एका सूत्रांत गुंफलें आहे--भारताचें इतर देशांशीं, इतर जातींशीं मीलन घडवून आणलें आहे, चिरएकान्तप्रिय भारताचा एकान्त भंगून टाकला आहे, जेव्हा जेव्हा असला प्रकार घडून आला आहे, तेव्हा तेव्हा समस्त जग भारताच्या आध्यात्मिक लोंढ्याने तुडुंब भरून जाणें हाच त्याचा परिणाम झालेला आहे. या एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभीं विख्यात जर्मन तत्त्वज्ञ शौपेनहॉर यांनी, वेदांच्या एका जुन्या अनुवादावरून एका पारशी युवकाने केलेला जुजबी लॅटिन अनुवाद वाचून उद्गार काढले होते की, "साऱ्या जगांत उपनिषदांच्या अध्ययना-इतकें लाभदायक आणि हृदयाची उन्नति करील असें दुसऱ्या कोण-त्याहि ग्रंथाचें अध्ययन नसेल. जीवनांत त्याने मला शांति दिली आहे, मरतांनाहि तेंच मला शांति देईल." आणि त्यानंतर त्याच विख्यात जर्मन ऋषीने भविष्यवाणी केली आहे की, "ग्रीक साहित्याच्या पुनर-भ्युदयाने जगाच्या विचारप्रणालींत जी प्रचंड क्रांति घडवून आणली तिच्यापेक्षाहि प्रबळ, दूरगामी आणि व्यापक क्रांति लवकरच घडून येणार आहे." आज शौपेनहॉरांची भविष्यवाणी खरी ठरत आहे. ज्यांचे डोळे उघडे आहेत, जे पाश्चिमात्य जगांतील भिन्नभिन्न जातींचीं मनें कशा प्रकारें कार्य करीत आहेत हें जाणतात, जे विचारशील आहेत आणि विभिन्न जातींच्या जीवनाचा ज्यांनी सखोल अभ्यास केला आहे त्यांना, भारतीय विचारांचा हा संथ, अविराम प्रवाह जगाच्या मनोभावांत, वागणुकींत आणि साहित्यांत किती विलक्षण परिवर्तन घडवून आणीत आहे हें स्पष्ट दिसून येईल. तथापि भारताच्या प्रचाराचें एक वैशिष्टय आहे. त्याची थोडीशी कल्पना मीं तुम्हांला मघा दिलीच आहे. आम्हीं कधीहि बंदुकीच्या वा तरवारीच्या साहाय्याने कोणत्याहि विचाराचा वा आदर्शाचा प्रचार केलेला नाहीं. भारताने जगाला जें दान दिलेलें आहे त्याचें नेमकें वर्णन करूं शकेल असा जर इंग्रजी भाषेंत कोणता एखादा शब्द असेल, मानवजातीवर भारतीय साहित्याचा जो प्रभाव पडला आहे त्याचें नीट वर्णन करूं शकेल असा जर कोणता एखादा शब्द

इंग्रजी भाषेंत असेल तर तो शब्द म्हणजे Fascination (मोहून जाणें, भारलें जाणें, मोहिनी वा भुरळ पडणें) हा होय. माणूस एकदम थक्क होऊन प्रभावित होऊन जावा असा हा प्रकार नसतो. उलट ह्याच्या अगदी विरुद्ध घडतें––त्याचा अगदी हळूहळू, न कळतां मानवमनावर अंमल बसत असतो. अनेकांच्या दृष्टीला भारतीय विचार, भारतीय प्रथा, भारतीय आचार-व्यवहार, भारतीय तत्त्वज्ञान, भारतीय साहित्य प्रथम-दर्शनीं चमत्कारिक वाटतें. परंतु तेथेच न थबकतां ते जर नेटाने अध्ययन करतील, मन लावून चिकाटीने भारतीय ग्रंथांचें अनुशीलन करतील, भारतीय आचार-व्यवहारांच्या मुळाशीं असलेल्या महान् तत्त्वांची नीट ओळख करून घेतील तर त्यांच्यापैकी शेकडा नव्याण्णवजण भारतीय विचारांच्या सौंदर्याने, भारतीय भावांनी मुग्ध होऊन गेल्याचें तुम्हांला आढळून येईल. अतिमंदपणें पडणाऱ्या, पडतांना कुणाला न दिसणाऱ्या न ऐकूं येणाऱ्या, आणि तरीहि विलक्षण परिणाम घडवून आणणाऱ्या प्रात:कालीन दंवाप्रमाणे ह्या शांत, सहिष्णु, सोशिक, धर्मनिष्ठ जातीने विचारजगतांत आपला अंमल बसविला आहे.

फिरून एकवार जुन्या इतिहासाची पुनरावृत्ति व्हावयास सुरवात झाली आहे. कारण आज, ज्या वेळीं आधुनिक विज्ञानाच्या शोधांनी सतत केलेल्या प्रहारांमुळे दृढ व अभेद्य वाटणाऱ्या जुन्या धार्मिक विश्वासांचा पायादेखील खिळखिळा बनून छिन्नविच्छिन्न होत आहे––ज्या वेळीं मानवजातीला स्वत:कडे खेचून घेण्याच्या निरनिराळ्या धर्मपंथांच्या मोठमोठ्या वल्गना शून्यांत विरून जात आहेत––ज्या वेळीं आजकालच्या पुरातनतत्त्वसंशोधनविद्येच्या प्रचंड मुसळाघातांनी बद्धमूल जुन्यापुराण्या रूढ कल्पनांचा कांचेच्या ठिसूळ भांड्यांप्रमाणे पार चक्काचूर होत आहे––ज्या वेळीं पाश्चात्त्य जगांत धर्म केवळ अडाण्यांच्या हातीं राहिला असून जाणते लोक धर्माशीं संबंध असलेल्या सर्वच गोष्टींची किळस धरूं लागले आहेत, अशा वेळीं, जेथील रहिवाशांचें धर्मजीवन सर्वोच्च आध्यात्मिक तत्त्वांवर उभारलेलें आहे अशा भारताचें तत्त्वज्ञान, ––भारतीयांच्या सर्वोच्च धार्मिक आकांक्षांमधून उदयास आलेले उदात्त सिद्धान्त जगासमोर येण्यास सुरुवात झाली आहे. परिणामीं आज हीं सारीं महान् तत्त्वें––असीम अनंत जगाचें एकत्व, निर्गुण ब्रह्मवाद, जीवा-

त्म्याचें अनंत स्वरूप आणि त्याचें विभिन्न जीवशरीरांत अविच्छिन्नपणें संक्रमण, ब्रह्माण्डाचें अनंतत्व इत्यादि सारीं अपूर्व तत्त्वें आज पाश्चिमात्य जगाला आधुनिक विज्ञानाच्या जडवादाच्या पंजांतून सोडविण्यासाठी अगदी स्वाभाविकपणें पुढे सरसावत आहेत. प्राचीन धर्मसंप्रदाय जगाला एक लहानसें मातीचें ढेकूळ समजत, आणि कालहि (Time हि) अगदी थोड्याच दिवसांपूर्वीपासून सुरू झाला आहे असें मानीत. देश-काल-निमित्ताचें अनंतत्व, आणि सगळ्यापेक्षा म्हणजे मानवात्म्याचा अनंत महिमा केवळ आमच्याच प्राचीन शास्त्रांमधे वर्णिलेला आहे, आणि सदा ह्या महान् तत्त्वांच्या आधारानेच आमची धर्मजिज्ञासा प्रगत झालेली आहे. आज, ज्या वेळीं क्रमोन्नतिवाद, शक्तीचें अक्षयत्व (Conservation of energy) प्रभृति आधुनिक भयावह सिद्धान्त सगळ्या अपक्व धर्ममतांच्या मुळांवरच कुऱ्हाडीचे घाव घालीत आहेत, अशा वेळीं, मानवात्म्याची ती अपूर्व निर्मिति, ईश्वराची अद्भुत वाणीच असा जो वेदान्त, त्या वेदान्ताच्या उन्नतिकारक, हृदयाला स्पर्श करणाऱ्या, आणि हृदयाचा विस्तार करणाऱ्या तत्त्वांखेरीज आणखी दुसरें काय बरें सुशिक्षित मानवांच्या श्रद्धेस आणि भक्तीस पात्र होऊं शकेल ?

परंतु याबरोबरच हेंहि लक्षांत ठेवा की, भारताबाहेरील देशांमधे पडणाऱ्या भारतीय धर्माच्या प्रभावासंबंधी बोलतांना, ज्यांच्या पायावर भारतीय धर्माची इमारत उभारली गेली आहे तीं मूलतत्त्वें हाच 'भारतीय धर्म' या शब्दांचा अर्थ मला अभिप्रेत आहे. त्याच्या शाखाप्रशाखा, शेकडो शतकांच्या सामाजिक आवश्यकतेनुसार त्याच्याशीं जोडल्या-गेलेल्या साऱ्या लहानसहान गौण बाबी, त्याचप्रमाणे भिन्नभिन्न प्रथा, रूढि, सामाजिक कल्याणाबाबतचे बारीकसारीक तपशील वगैरेंचा वास्तविक दृष्ट्या 'धर्म' या शब्दांत अंतर्भाव होऊं शकत नाही. तुम्हांला माहीत असेलच की आपलीं शास्त्रें दोन प्रकारच्या सत्यांचा उल्लेख करीत असतात, आणि त्या दोन सत्यांतील फरक तीं स्पष्टपणें दाखवीत असतात. त्यांपैकी पहिलें म्हणजे सनातन सत्य. मानवाचें स्वरूप, आत्म्याचें स्वरूप, ईश्वर आणि मानवात्मा यांचा संबंध, ईश्वराचें स्वरूप, पूर्णत्व, सृष्टीचें स्वरूप, सृष्टीचें अनंतत्व, जग शून्यांतून निर्माण झालेलें नसून एका आदिकारणाचा विकास होय हें तत्त्व, कल्पासंबंधीच्या अपूर्व

कल्पना इत्यादिइत्यादींचा या 'सनानत सत्यां'त समावेश होतो. हे सनातन सिद्धान्त सर्वजनीन, सर्वकालीन आणि सर्वदेशीय सत्यांवर आधारलेले आहेत. या सनातन सत्यांखेरीज आणखी अनेक गौण विधिहि आमच्या शास्त्रांत पाहावयास सापडतात. हे विधि आमचीं दैनंदिन जीवनांतील कृत्यें नियमित करीत असतात. ह्या विधींचा अंतर्भाव 'श्रुतीं'त अथवा वेदांमधे करतां यावयाचा नाही, त्यांचा अंतर्भाव वस्तुत: 'स्मृतीं'त वा पुराणांत होतो. ह्यांच्याशीं त्या पहिल्या वर्गांतील सनातन तत्त्वांचा कांही संबंध नाही. आमच्या आर्यजातींतहि हे विधि सतत बदलत असून निरनिराळीं रूपें धारण करीत असल्याचें आढळून येईल. एका युगांतील विधि दुसऱ्या युगांत रद्द होतात. ज्या वेळीं ह्या युगानंतर आणखी वेगळें युग येईल त्या वेळीं ते फिरून नवें रूप धारण करतील. थोर थोर ऋषि आविर्भूत होऊन नव्या देश-कालांना, नव्या परिस्थितीला उपयुक्त असे नवीन नवीन आचार प्रवर्तित करतील.

जीवात्मा, परमात्मा आणि ब्रह्माण्ड यांसंबंधीच्या ह्या साऱ्या अपूर्व, अनंत, उन्नतिकारक, विकसनशील धारणांना पायाभूत असलेले सिद्धान्त भारतांतच जन्मास आलेत. केवळ भारतांतच माणूस आपल्या जमातीच्या छोटयाछोटया देवतांवरून 'तुझा देव खरा की माझा देव खरा हें आपण एकमेकांशीं लढाई करून ठरवूं' असें म्हणून शेजाऱ्याशीं झगडण्यास सरसावला नाहीं. लहानसहान देवतांवरून युद्धास प्रवृत्त होण्याची संकुचित मनोवृत्ति केवळ या भारतांतच कधी निर्माण होऊं शकली नाही. हीं सारीं महान् मूलतत्त्वें मानवाच्या अनंत स्वरूपावर अधिष्ठित असल्याकारणें त्यांच्यांत हजारो वर्षांपूर्वीइतकीच आजहि मानवजातीचें कल्याण करण्याची शक्ति वसत आहे. जोंवर ही धरणी अस्तित्वांत राहील, जोंवर कर्मफल राहील, जोंवर आपण अलग अलग जीवांच्या रूपाने जन्म घेऊं, आणि जोंवर स्वत:च्या शक्तीनेच आपल्याला आपलें दैव घडवावें लागेल, तोंवर त्यांची ही शक्ति विद्यमान राहील.

आणि या सर्वांपेक्षाहि भारत जगाला कोणतें तत्त्व, कोणता सिद्धान्त शिकविणार आहे हें मी आता तुम्हांला विशद करून सांगतों. जर आपण निरनिराळ्या जातींमधे धर्माची उत्पत्ति आणि वाढ कशी झाली ह्याचें निरीक्षण केलें तर सर्वच ठिकाणीं आपल्या निदर्शनास

येईल की प्रारंभीं सर्व जातींतील प्रत्येक जमातीची एकेक वेगवेगळी देवता होती. या सर्व जमातींत परस्परांमधे जर कांही विशेष संबंध असला तर त्या सर्वांच्या देवतांना मिळून परत एक सामान्य नांव देण्यांत येई. बाबिलोनियनांच्या देवता येथे उदाहरणादाखल घेतां येतील. जेव्हा बाबिलोनियन लोक वेगवेगळ्या जमातींमधे विभागले गेले तेव्हा त्यांच्या सर्व देवतांचें मिळून साधारण नांव होतें 'बाल' (Baal) याचप्रमाणे यहुदी जातींतील जमातींच्याहि भिन्नभिन्न देवतांचें साधारण नांव 'मोलोक' (Moloch) असें होतें. आपल्याला आणखी असेंहि दिसून येईल की, ह्या साऱ्या भिन्नभिन्न जमातींपैकी एखादी जमात इतर सगळ्या जमातींपेक्षा वरचढ होऊन जाई आणि ती जमात मग आपला राजा हाच इतर सर्व जमातींचाहि राजा होय असा दावा करी. या मनोवृत्तीमुळे स्वाभाविकपणेंच असेंहि घडे की ती जमात मग स्वतःच्या देवतेला इतर सगळ्या जमातींची देवता करण्याची इच्छा धरी, बाबिलोनियन म्हणत की 'बाल मेरोडक' हीच सर्वश्रेष्ठ देवता होय, इतर देव-देवता तिच्यापेक्षा कनिष्ठ प्रतीच्या होत. 'मोलोक याव्हे' इतर सर्व 'मोलोकां'परीस श्रेष्ठ. आणि देव-देवतांचा हा श्रेष्ठ-कनिष्ठपणा युद्धाने ठरविला जात असे. भारतामधेहि या देव-देवतांमधे असला संघर्ष, असली चुरस होतीच. प्रतिस्पर्धी देव श्रेष्ठत्वलाभासाठी एकमेकांशीं चढाओढ करीत होते. परंतु भारताच्या आणि साऱ्या जगाच्या सुदैवाने या साऱ्या गोंधळ-गलबल्याचा भेद करून "एकं सत् विप्राः बहुधा वदन्ति" ("एकच सत्ता विद्यमान आहे, जाणते तिलाच नाना नांवें देतात") ही महावाणी उद्भूत झाली. शिव हा विष्णूपेक्षा श्रेष्ठ नाही; किंवा विष्णुच सारेंकांही, शिव कांहीच नव्हे असेंहि नाही. एकाच परमेश्वराला कुणी शिव, तर कुणी विष्णु, तर कुणी आणखी निराळ्या नांवाने आळवीत असतात. नांवें निरनिराळीं आहेत, परंतु वस्तु एकच आहे. "एकं सत् विप्राः बहुधा वदन्ति" या चारपांच शब्दांमधेच भारताचा समस्त इतिहास दडलेला तुम्हांला आढळून येईल. भारताचा समस्त इतिहास म्हणजे ह्या एकाच मूल सूत्राचा ओजस्वी विस्तार होय. ह्या देशांत त्या तत्त्वाची वारंवार पुनरुक्ति झाली आहे. परिणामीं तें ह्या जातीच्या रक्तांत भिनून गेलें आहे. ह्या जातीच्या नसांनसांतून खेळत आहे, ह्या जातीच्या जीवनाचें एक अंगच बनून गेलें

आहे, ज्या उपादानाने ह्या विराट जातीचा देह निर्मिला गेला आहे त्याचा तें घटकच होऊन बसलें आहे. अशा रीतीने ही भूमि दुसऱ्यांच्या धर्माविषयी द्वेष न बाळगणारा एक अत्यद्भुत देश बनून गेली. ह्या सिद्धान्ताच्या बळानेच आम्ही आमच्या ह्या प्राचीन मातृभूमींत सर्व धर्मांना आणि सर्व संप्रदायांना सादर आलिंगन देण्यास समर्थ झालों आहोंत.

या भारतांत वरवर पाहतां परस्परविरोधी वाटतील असे अनेक संप्रदाय अस्तित्वांत आहेत, आणि तरीहि ते सगळेच्या सगळेच एक-मेकांशीं न झगडतां खेळीमेळीने येथे नांदत आहेत. या अपूर्व घटनेचें एकमेव स्पष्टीकरण आहे--आमच्यांतील हा परधर्माविषयी द्वेषभावनेचा अभाव. तुम्ही कदाचित् द्वैतवादी असाल, मी कदाचित् अद्वैतवादी असेन. तुमचा कदाचित् असा विश्वास असेल की तुम्ही भगवंतांचे नित्य दास आहांत, तर दुसरा एखादा कदाचित् म्हणत असेल की मी भगवंताशीं अभिन्न आहें; तरीपण तुम्ही दोघेहि अस्सल हिंदुच आहांत. हें कशा-मुळे शक्य आहे? "एकं सत् विप्राः बहुधा वदन्ति" (सत्ता एकच आहे, जाणते तिलाच नाना नांवें देतात) हें महावाक्य वाचा, म्हणजे हें कसें नि कशामुळे शक्य आहे हें तुम्हांला कळून येईल. माझ्या देश-बंधूंनो, सगळ्यापेक्षा हेंच महान् सत्य आपल्याला जगास शिकवावें लागेल. इतर देशांतील चांगले शिकलेसवरलेले लोकहि नाक मुरडून आमच्या धर्माला 'मूर्तिपूजा' (Idolatry) म्हणत असतात. मीं त्यांना तसें करतांना बघितलें आहे. पण त्यांच्या स्वतःच्या डोक्यांत किती भयंकर खुळचट समजुती ठासून भरलेल्या आहेत ह्याचा ते बापडे कधी शांतपणें विचारच करून बघत नाहीत. तिथे अजूनहि सर्वत्र हाच मनो-भाव, हीच घोर कट्टरता, हीच स्वमतान्धता, हीच सांप्रदायिकता, मनाचा हाच भीषण संकुचितपणा आढळून येतो. त्यांच्या स्वतःजवळ जें आहे तीच काय तीं साऱ्या जगांतील एकमेव मौल्यवान गोष्ट होय! अर्थो-पासना--पैशाची पूजा हाच त्यांच्या मतें आयुष्याचा एकमेव सदुपयोग! त्यांच्याजवळ जें आहे, केवळ तेंच मिळविण्यासारखी एकमेव वस्तु होय, बाकी सारें कुचकामाचें! जर ते मातीची एखादी असार वस्तु निर्माण करूं शकत असतील किंवा एखादें यंत्र बनवूं शकत असतील तर इतर

सारेंकांही धुत्कारून आम्ही केवळ त्याचाच उदो उदो करावयास हवा! अरेरे, शिक्षणाचा इतका प्रसार होऊनहि जगाची ही अशी अवस्था असावी ना? याचा अर्थच असा की, खरोखर पाहतां जगांत अजूनहि शिक्षणाचा आणखी प्रसार होण्याची आवश्यकता आहे--जगांत अजूनहि अधिक सभ्यतेची आवश्यकता आहे. नव्हे, असेंहि म्हणतां येईल की अद्यापि कुठेहि सभ्येतेची सुरुवातदेखील झालेली नाहीं, अजूनहि मनुष्य-जातीपैकी शेकडा ९९·९ लोक कमीअधिक असभ्य अवस्थेंतच आहेत. पुष्कळ पुस्तकांत आपल्याला ह्या साऱ्या गोष्टी लिहिलेल्या आढळतील, परधर्माविषयी द्वेष बाळगूं नये वगैरे तत्त्वें ग्रंथान्तरीं बरींच वाचावयास सापडतील, परंतु मी माझ्या अनुभवाने सांगतों की जगांत हा मनोभाव खरोखर पाहतां फारच कमी आहे. शेकडा नव्याण्णव लोकांच्या तर हे विचारहि मनांत येत नाहीत. जगांत ज्या कुण्या देशांत मी गेलों आहें तिथे तिथे बघितलें की अजून परधर्मियांचा भयंकर छळ तिथे होत असतो; नवीन गोष्टी शिकण्याविरुद्ध पूर्वी जे मुद्दे उपस्थित केले जात असत तेच जुने मुद्दे आजहि उपस्थित केले जात असतात. जगांत जो काय परधर्माविषयी द्वेषाचा अभाव आणि धर्माविषयी जिव्हाळा आहे तो खरें पाहतां इथे, या आर्यभूमींतच विद्यमान आहे, आणखी कुठेहि नाही. केवळ इथेच, केवळ भारतवासीच मुसलमानांना मशीद आणि ख्रिस्त्यांना चर्च बांधून देतील; आणखी असें अन्यत्र कुठेसुद्धा घडणार नाही. इतर देशांत जाऊन मुसलमानांना किंवा अन्य एखाद्या धर्माच्या लोकांना जर तुम्ही आपलें एखादें मंदिर बांधून मागाल तर दिसेल, ते तुम्हांला कितपत साहाय्य करतात तें. तसें साहाय्य करणें तर राहोच, पण त्याऐवजी ते उलट तुमचें तें मंदिर आणि जमल्यास त्याच बरोबर तुमचें जितें देहमंदिरहि तोडूनफोडून जमीनदोस्त करण्याचा प्रयत्न करतील. आणि एवढ्याचसाठी जगाला हा पाठ घेण्याची, हा धडा शिकण्याची अतोनात आवश्यकता आहे--भारताजवळून जगाने अजूनहि हा परधर्माविषयी द्वेषाचा अभाव--नव्हे, परधर्माविषयी उत्कट सहानुभूति शिकावयास हवी. शिवमहिम्नस्तोत्रांत म्हटलें आहे--" भिन्नभिन्न पर्वतांतून उगम पावणाऱ्या भिन्नभिन्न नद्या सरळ वा वाकड्यातिकड्या गतीने वाहत जाऊन अखेर समुद्राला जाऊन मिळतात, त्याचप्रमाणे, हे

प्रभो, आपापल्या भिन्न भिन्न प्रवृत्तींच्या अनुरोधाने माणसें जे भिन्न-भिन्न धर्ममार्ग चोखळतात ते कितीहि वेगवेगळे दिसले, ते सरळ वा नागमोडी असले तरी अंतीं तुझ्याप्रतच येऊन पोहोचतात.''

वेगवेगळ्या रस्त्याने जात आहेत खरे, परंतु सगळेजण जात आहेत एकाच ठिकाणीं. कुणी नागमोडी रस्त्याने अमळ वळसे घेत, तर कुणी सरळ मार्गाने थेट चालला असेल, परंतु अखेरीस, हे भगवन्, सगळेच तुझ्यानिकट येणार आहेत. तुम्ही त्या शिवाला केवळ शिवलिंगांतच न बघतां जेव्हा सर्वत्र पाहाल तेव्हाच तुमची शिवभक्ति आणि तुमचें शिवदर्शन हीं पूर्ण झालीं असें म्हणतां येईल. जो त्या हरीला सर्व जीवांत आणि सर्व भूतांत बघतो तोच खरा साधु, तोच खराखरा हरीचा भक्त होय. जर तुम्ही खरे शिवभक्त असाल तर तुम्ही त्या शिवाला सर्व जीवांत आणि सर्व भूतांत बघाल. कोणत्याहि नांवाने आणि कोणत्याहि रूपाने उपासना केली जावो. ती त्या एकाच परमेश्वराची उपासना होय हें विसरतां कामा नये. काब्याकडे तोंड करून कुणी गुढगे टेकवो किंवा चर्चमधे वा बौद्धविहारांत उपासना करो, जाणतां वा अजाणतां तो त्या एकमेवाद्वितीय प्रभूचीच उपासना करीत असतो. कोणतेंहि नाम उच्चारून किंवा कोणत्याहि मूर्तीला उद्देशून कोणत्याहि भावाने पुष्पांजली समर्पिली जावो, ती त्याच्याच श्रीचरणीं जाऊन पोहोचेल, कारण तोच सर्वांचा एकमेव नाथ, सर्व आत्म्यांचा अंतरात्मा होय. जगाला कशाची गरज आहे हें तुम्हांआम्हांपेक्षा तो नीट जाणतो——अनंतपट चांगल्या रीतीने जाणतो. सर्व भेद नाहीसे होतील हें असंभाव्य आहे. भेद राहतीलच. वैचित्र्याखेरीज, विविधतेखेरीज जीवनच शक्य नाही. विचारांमधील हा संघर्ष, हें वैचित्र्य, ही विविधताच ज्ञान, उन्नति वगैरेंचें मूळ होय. जगामधे अनंत प्रकारचे विरोधी भाव अस्तित्वांत राहतीलच. परंतु म्हणून आपण एकमेकांचा द्वेष करायला हवा, एकमेकांशीं कलह करायला हवा असें मात्र नाही. त्यासाठी, जें केवळ इथूनच——या आपल्या मातृभूमींतूनच प्रसृत झालें आहे, प्रचारित झालें आहे तें मूल सत्य आपल्याला सर्वांना फिरून नव्याने शिकावें लागेल. फिरून एकदा भारताला त्या सत्याचा साऱ्या जगभर प्रसार करावा लागेल. मी हें असें कां म्हणत असेन? कारण एवढेंच की, हें सत्य आमच्या केवळ शास्त्र-

ग्रंथांतच विद्यमान आहे असें नव्हे, आमच्या जातीच्या साहित्याच्या प्रत्येक क्षेत्रांत, आमच्या जातीच्या जीवनांत तें शिरलेलें आहे, भिनलेलें आहे. इथे, फक्त इथेच तदनुसार रोजच्या जीवनांत आचरण केलें जात असतें; आणि ज्याला डोळे आहेत असा प्रत्येकजण कबूल करील की इथल्याखेरीज आणखी कुठेच तें कृतींत आणलें गेलेलें नाही. अशा रीतीने आपल्याला जगास धर्म शिकवावा लागेल. भारत याखेरीजहि अनेक उच्च धडे जगाला शिकविण्यास समर्थ आहे, परंतु ते केवळ पंडितांसाठी आहेत. हा शांतभाव, ही तितिक्षा, ही सोशिकता, हा परधर्माविषयी द्वेषाचा अभाव, ही सहानुभूति, हा बंधुभाव--हे महान् धडे आबालवृद्ध स्त्रीपुरुष, शिक्षित अशिक्षित, सर्व जातींचे आणि सर्व वर्णांचे लोक गिरवूं शकतील. "तूं एकच आहेस; लोक तुला निरनिराळ्या नांवांनी आळवीत असतात. एकं सत् विप्राः बहुधा वदन्ति."

## जाफना येथील व्याख्यान

सिलोनमधील जाफना येथील हिंदु रहिवाशांनी स्वामी विवेकानंदांना पुढील मानपत्र अर्पण केलें होतें :—

### श्रीमत् विवेकानंद स्वामी

श्रद्धेय महाराज,

जाफनानगरवासी आम्ही हिंदुबांधव, सिलोनमधील हिंदुधर्माचें प्रमुख केंद्र अशा या स्थानीं आपलें हार्दिक स्वागत करीत आहोंत. आमच्या लंकाद्वीपांतील ह्या स्थानीं पायधूळ झाडण्याची आम्हीं लोकांनी आपल्याला जी विनंती केली होती ती आपण आमच्यावर अनुग्रह करून स्वीकारली यामुळे आम्ही धन्य झालों आहोंत.

सुमारें दोन हजार वर्षांपूर्वी आमच्या पूर्वजांनी दक्षिणभारतांतून येऊन येथे वसती केली. त्या समयीं जाफनावर तामीळ राजे राज्य करीत होते. हे तामीळ राज्यकर्ते आमच्या पूर्वजांच्या धर्माचे पाठीराखे निघाले. परंतु पुढे त्यांचें राज्य जाऊन पोर्तुगीज आणि डच यांचें आधिपत्य आलें. या नवीन राजवटींत धर्माचरणाला अडथळे होऊं लागले, उघड पूजा-अर्चना करण्यास बंदी झाली, देवळांमागून देवळें जमीनदोस्त केलीं गेलीं —खूप दूरवर ज्यांची कीर्ति पसरली होती अशा येथील दोन महत्त्वाच्या, पवित्र मंदिरांचीहि तीच शोचनीय गत झाली. हे लोक जबरदस्तीने बाटवून आमच्या पूर्वजांना ख्रिस्ती करण्याचा सारखा आटापिटा करीत होते, परंतु आमच्या पूर्वजांनी स्वतःचा प्राचीन धर्म सोडला नाही, दृढ विश्वासाने ते त्यालाच धरून राहिले. तोच धर्म आम्हांला त्यांच्याकडून बहुमोल वारशाच्या रूपाने लाभला आहे. सांप्रत इंग्रजी सरकारच्या सुव्यवस्थेने आमच्या धर्माला फिरून बरे दिवस येत आहेत. इतकेंच नव्हे, तर जीं सारीं मंदिरें भग्न झालीं होतीं त्यांतील कित्येक पुन्हा बांधलीं गेलीं आहेत आणि आणखी कांही अशीं बांधलीं जात आहेत.

आपण वेदांमधील सत्याच्या दीप्तीने अमेरिकेंतील शिकागोशहरीं

भरलेली सर्वधर्मपरिषद उजळून टाकली, भारताच्या ब्रह्मविद्येचा इंग्लडांत आणि अमेरिकेंत प्रचार केला, सर्व पाश्चात्त्यदेशवासीयांना हिंदुधर्माचीं सत्यें विशद करून सांगितलीं, आणि तद्द्वारा पूर्वेकडील आणि पश्चिमेकडील देशांत दुवा निर्माण केला, त्यांच्यांत एक नाजुक जवळीक उत्पन्न केली. अशा रीतीने आमच्या धर्मासाठी आपण जे निःस्वार्थ कष्ट केलेंत त्यांबद्दल आम्ही या शुभ प्रसंगीं आमच्या हृदयांतील सखोल कृतज्ञता आपल्या चरणीं समर्पीत आहोंत. याशिवाय, जडवादाने पुरतें ग्रासून टाकलेल्या या युगांत ज्या वेळीं सर्वत्रच श्रद्धेचा ऱ्हास होऊन आध्यात्मिक सत्याच्या शोधाविषयी लोकांत नावड बळावत आहे, अशा वेळीं, या अवकळेच्या दिवसांत आपण आमच्या प्राचीन धर्माच्या पुनरुत्थानासाठी आंदोलनास प्रारंभ केला आहे याबद्दलहि आम्ही आपणांस अगणित धन्यवाद देतों.

आपण पाश्चात्त्यदेशवासियांना आमच्या धर्माच्या उदारतेचा परिचय करून दिला आहे, आणि त्या देशांमधील विद्वानांच्या अंतःकरणावर हें सत्य दृढपणें बिंबविलें आहे की, पाश्चात्त्य तत्त्वज्ञांच्या कधी स्वप्नांतहि आल्या नसतील अशा कितीतरी गोष्टी आम्हां हिंदूंच्या तत्त्वज्ञानांत आहेत. ह्या सर्व कारणांनी आम्ही आपले किती ऋणी आहोंत हें शब्दांनी व्यक्त करणें अशक्य होय.

आपण ज्या वेळीं पाश्चात्त्यदेशांत आमच्या धर्माचा प्रचार करीत होतां त्या वेळीं अत्यंत उत्सुकतेने आमचें आपल्या कार्याकडे लक्ष होतें हें अर्थात् सांगावयास नकोच. आपण सर्वान्तःकरणपूर्वक करीत असलेला धर्मप्रचार आणि त्यांत आपल्याला लाभत गेलेलें यश बघून आम्हांला परमावधीचा आनंद वाटत होता. पाश्चात्त्यदेशांतील जीं सारीं स्थानें ज्ञानार्जनांत आणि धर्मचर्चेत अग्रगण्य आहेत अशा ठिकाणांहून निघणाऱ्या वर्तमानपत्रांत आपली आणि आपल्या अमूल्य ग्रंथांची जी प्रशंसा वाचावयास सापडत असे तिच्यावरून आपण आपलें महान् कार्य किती सुंदर रीतीने पार पाडीत होतां हें स्पष्ट होत होतें.

आपण अनुग्रह करून आमच्या या भागांत आलांत त्याने आम्ही कृतार्थ झालों आहोंत. वेद हे समस्त आध्यात्मिक ज्ञानाचा पाया होत असा आपल्याप्रमाणेच आमचाहि विश्वास आहे. आपण आमच्या ह्या

भूमीला पुन:पुन: भेट द्याल अशी आम्हांला आशा आहे.

परमेश्वराने आपल्या महत्कार्याचा पाठपुरावा करून आपल्याला यशस्वी केलें आहे. आपल्याला स्वास्थ्य आणि बल प्रदान करून आपल्या महान् व्रताच्या उद्यापनासाठी तो आपल्याला सुदीर्घ आयुष्य देवो हीच त्याच्या चरणीं प्रार्थना आहे.

श्रद्धेय महाराज, आपल्या विश्वासास पात्र होण्याची इच्छा बाळगणारे आम्ही, जाफना येथील सर्व हिंदूंच्या वतीने हें अभिनंदनपत्र आपल्याला अर्पण करीत आहोंत.

स्वामी विवेकानंदांनी ह्या मानपत्राला अतिशय हृदयस्पर्शी असें उत्तर दिलें. दुसऱ्या दिवशीं सायंकाळीं त्याच स्थानीं स्वामीजींनी 'वेदान्ता'संबंधी पुढीलप्रमाणे भाषण दिलें :—

## वेदान्त

(जाफना येथे दिलेलें भाषण)

विषय फार मोठा आहे आणि वेळ थोडा आहे. एका व्याख्यानांत हिंदूंच्या धर्माचें संपूर्ण विश्लेषण करणें असंभाव्य आहे. म्हणून मी तुम्हांला आपल्या धर्माचीं मूलतत्त्वें शक्य तितक्या सोप्या भाषेंत सांगण्याचा प्रयत्न करीन. ज्या 'हिंदु' नांवाने स्वत:ची ओळख देण्याची आमची प्रथा आहे त्या नांवांत आतातरी कांही अर्थ उरलेला नाही. कारण त्या शब्दाचा अर्थ आहे—सिंधुनदीच्या पलीकडे राहणारे लोक. जुन्या पारसी लोकांच्या उच्चारदोषामुळे 'सिंधू'तील 'स'चा 'ह' होऊन 'सिंधू'चें 'हिंदु' हें रूपान्तर झालें. ते जुने पारसी लोक सिंधुनदीच्या पलीकडे राहणाऱ्या सर्वांनाच 'हिंदु' म्हणत असत. अशा रीतीने 'हिंदु' हें नांव आम्हांला चिकटलें, आणि मुसलमान रियासतीपासून आम्हीं हा शब्द स्वत:ला लावायला सुरुवात केली. अर्थातच या शब्दाचा असा उपयोग करण्यांत कांही हानि नाही, परंतु मीं आत्ताच म्हटल्याप्रमाणे आता त्या नांवांत कांहींच अर्थ उरलेला नाही. कारण आपण हें नीट लक्षांत ठेवायास हवें की सांप्रत सिंधुनदीच्या ह्या बाजूस राहणारे सर्व लोक पूर्वीप्रमाणे एकाच धर्माचे नाहीत. म्हणून या शब्दांत आता निव्वळ हिंदूंचाच अंतर्भाव होत नाही, तर त्यांत मुसलमान, ख्रिश्चन, जैन आणि भारतांतील इतर रहिवाशांचाहि समावेश होतो. म्हणून मी हिंदु शब्दाचा उप-

योग करूं इच्छीत नाहीं. पण मग त्याऐवजी आपण कोणता शब्द वापरावयाचा ? हिंदु या शब्दाऐवजी आपण 'वैदिक' (म्हणजे वेदाचे अनुयायी) हा शब्द वापरूं शकूं, किंवा माझ्या मतें 'वैदान्तिक' हा शब्द वापरल्यास आणखी चांगलें होईल. जगांतील बहुतांश प्रमुख धर्म कांही विशिष्ट ग्रंथांना प्रमाण मानीत असतात. त्या लोकांचा असा विश्वास असतो की हे ग्रंथ म्हणजे ईश्वराची वा अन्य कुण्या दिव्य, अमानवी पुरुषाची वाणी होत. म्हणूनच ते त्या ग्रंथांना आपल्या धर्माचा पाया मानीत असतात. पाश्चात्त्यदेशांतील आधुनिक विद्वानांच्या मतें ह्या असल्या समस्त ग्रंथांमधे हिंदूंचे वेदच सर्वांत प्राचीन होत. म्हणून या वेदांसंबंधी थोडें ज्ञान असणें आवश्यक आहे.

वेदनामक शब्दराशि कुण्या पुरुषांचीं वचनें नव्हत. वेदांचा काल ––त्यांच्या निर्मितीची तारीख, सन अजूनहि निश्चित झालेलीं नाहीत, आणि कधीं निश्चित होऊंहि शकणार नाहीत. आमच्या ( आम्हां हिंदूंच्या ) मतें वेद हे अनादि व अनंत आहेत. ह्या ठिकाणीं एक विशेष गोष्ट आपण ध्यानांत ठेवावयास हवी की, जगांतील इतर धर्म हे, त्यांचीं शास्त्रें ईश्वर नामक व्यक्तीच्या वा भगवंताच्या दूताची अथवा प्रेषिताची वाणी असल्यामुळे प्रमाणभूत होत असें म्हणत असतात. परंतु हिंदु म्हणत असतात की वेदांच्या सत्यत्वाचें दुसरें कांही प्रमाण नाही, वेद स्वतःप्रमाण आहेत; कारण वेद अनादि अनंत आहेत, ते स्वयं ईश्वराच्या ज्ञानाचा आविष्कार होत. वेद कधीहि लिहिले गेले नाहीत, ते कधीहि उत्पन्न केले गेले नाहीत, ते अनंत काल––चिरकाल अस्तित्वांत आहेत. ज्याप्रमाणे सृष्टि अनादि अनंत आहे त्याचप्रमाणे ईश्वराचें ज्ञानहि अनादि अनंत आहे. वेद म्हणजे हींच ईश्वराच्या ज्ञानाची समष्टि. (विद् धातूचा अर्थ आहे––जाणणें.) वेद नामक ज्ञान ऋषि नांवाच्या व्यक्तींनी शोधून काढलें आहे. ऋषि शब्दाचा अर्थ आहे मंत्रद्रष्टा; ह्या ऋषींनी पूर्वीपासूनच अस्तित्वांत असलेल्या ज्ञानाचा साक्षात्कार करून घेतला, इतकेंच; परंतु तें ज्ञान त्या ऋषींचें स्वतःचे विचार मात्र नव्हत. वेदांच्या अमुक भागाचा अमुक ऋषि आहे असें जेव्हा तुम्हीं ऐकाल तेव्हा असें मात्र समजूं नका की त्या ऋषीने तो भाग लिहिला आहे किंवा स्वतःच्या मनाने रचला आहे; पूर्वीपासूनच

अस्तित्वांत असलेल्या ज्ञानाचा तो केवळ द्रष्टा होय, एवढाच त्याचा अर्थ. तें ज्ञान अनंत काळापासून ह्या जगांत विद्यमान होतें, ऋषींनी त्याचा फक्त शोध लावला, इतकेंच. ऋषि हे आध्यात्मिक संशोधक होत.

वेद मुख्यत: दोन भागांमधे विभागलेले आहेत. पहिला भाग म्हणजे कर्मकांड, आणि दुसरा म्हणजे ज्ञानकांड. कर्मकांडामधे नानाप्रकारच्या यज्ञयागांचें वर्णन आहे ; त्यांच्यांतील अधिकांश यज्ञयाग सांप्रतच्या काळाला अनुपयोगी म्हणून व्यवहारांतून नाहीसे झाले आहेत, आणि कांही थोडे आजहि या ना त्या स्वरूपांत प्रचारांत आहेत. कर्मकांडांतील मुख्य मुख्य गोष्टी, उदाहाणार्थ---सर्वसाधारण मानवांचीं कर्तव्यें, ब्रह्मचर्य-गृहस्थ-वानप्रस्थ-संन्यास या वेगवेगळ्या आश्रमांचीं वेगवेगळीं कर्तव्यें इत्यादि अजूनहि थोड्याफार प्रमाणांत आचरलीं जात असतात. वेदांचा दुसरा विभाग म्हणजे ज्ञानकांड---हा आमच्या धर्माचा आध्यात्मिक भाग होय. ह्या भागाला वेदान्त असें म्हणतात, कारण तो वेदांचा अंतिम, सारभूत भाग आहे, वेदांचें अंतिम लक्ष्य आहे. वेदज्ञानाच्या ह्या सारभूत अंशाचें नांव आहे वेदान्त वा उपनिषदें. आणि भारतांतील सर्व संप्रदा-यांनी--मग ते द्वैतवादी, विशिष्टाद्वैतवादी, अद्वैतवादी अथवा शैव, वैष्णव, शाक्त, सौर, गाणपत्य कुणीहि असोत--त्यांतील ज्या कुणाला हिंदुधर्मांत नांदावयाचें असेल त्या प्रत्येकाने वेदांचा हा उपनिषद् भाग मानलाच पाहिजे. त्यांनी उपनिषदांचा स्वत:च्या आवडीनुसार अर्थ लावला तरी चालेल, परंतु त्यांना उपनिषदांचें प्रामाण्य मात्र मानावें लागेलच लागेल. आणि म्हणूनच आम्ही 'हिंदु' शब्दाऐवजी 'वैदान्तिक' या शब्दाचा उपयोग करूं इच्छितों. भारतांतील सर्वच आस्तिक दार्शनिकांना (तत्त्वज्ञांना) वेदान्ताचें प्रामाण्य स्वीकारावें लागलें आहे. आणि सध्या भारतांत हिंदुधर्माच्या जितक्या म्हणून शाखा-उपशाखा आहेत त्यांतील कित्येक अगदी विचित्र वाटत असल्या तरीं, आणि त्यांचीं उद्दिष्टें अत्यंत गूढ, चमत्कारिक वाटत असलीं तरीहि, ज्यांनी त्यांचें नीट निरीक्षण केलें आहे त्यांना कळून येईल की त्या साऱ्यांनी उपनिषदांतूनच आपा-पल्या कल्पना घेतल्या आहेत. हीं उपनिषदें आमच्या जातीच्या जीवनांत इतकीं कांही खोल रुजलीं आहेत की, हिंदुधर्माच्या एखाद्या अगदी मागासलेल्या पंथाच्या प्रतीक-प्रतिमांचा कुणी अभ्यास केला तर पुष्क-

ळदा असें आढळून येऊन त्याला महदाश्चर्य वाटेल की, उपनिषदांमधे आलंकारिक पद्धतीने वर्णिलेलीं तत्त्वेंच त्या स्थूल प्रतीक-प्रतिमांमधून व्यक्त केलीं गेलीं आहेत--उपनिषदांतील तत्त्वांनाच त्या प्रतीकांचा वा त्या प्रतिमांचा वेश चढविण्यांत आलेला आहे. उपनिषदांमधील उच्च उच्च आध्यात्मिक आणि तात्त्विक सत्येंच प्रतीक-प्रतिमांच्या मूर्त, स्थूल रूपांत आज आमच्या घरोघरीं पूजिलीं जात आहेत. सारांश, आमच्या पूजेंतील सर्वच प्रतीकें, प्रतिमा आणि यंत्रें वेदान्तांतून आलीं आहेत, कारण वेदान्तांत तीं लाक्षणिक अर्थाने वा रूपकात्मक पद्धतीने वापरलीं गेलीं आहेत. हळूहळू तीं तत्त्वें आमच्या जातीच्या जीवनांत भिनून अखेर प्रतिमा-प्रतीक-यंत्रादिकांच्या रूपांनी आमच्या दैनंदिन जीवनांचीं अंगेंच बनून गेलीं आहेत.

वेदान्तानंतर स्मृतींचें प्रामाण्य. ह्या स्मृतिदेखील ऋषींनीच लिहिलेल्या आहेत, परंतु त्यांचें प्रामाण्य वेदान्तावर अवलंबून आहे. कारण इतर धर्मांचे अनुयायी स्वतःच्या शास्त्रांकडे ज्या दृष्टीने बघतात त्याच दृष्टीने आम्ही आमच्या ह्या स्मृतींकडे बघत असतों. आम्ही असें मानीत असतों की विशिष्ट विशिष्ट ऋषींनी ह्या स्मृतींची रचना केली आहे. इतर धर्मांच्या लोकांची त्यांच्या त्यांच्या धर्मग्रंथासंबंधी ही अशीच धारणा असते. म्हणूनच इतर धर्मांच्या शास्त्रांचें आणि आमच्या या स्मृतींचें प्रामाण्य एकाच प्रकारचें होय असें म्हणतां येईल. परंतु ह्या स्मृति म्हणजेच कांही आमचें अखेरचें प्रमाण नव्हत. स्मृतीचा एखादा भाग जर वेदान्ताला विरोधी असेल तर तो स्मृतिभाग अग्राह्य समजावयाचा असतो, मग त्याचें कांहीच प्रामाण्य उरत नाही. परत या सर्व स्मृति युगपरत्वें वेगवेगळ्या असतात--प्रत्येक युगासाठी वेगळी स्मृति असते. आपल्या शास्त्रांत आपल्याला असलीं विधानें आढळून येतात की, सत्य युगांत अमुकअमुक स्मृति प्रमाण होत; त्रेता, द्वापर आणि कलि युगांपैकी प्रत्येक युगांत परत वेगवेगळ्या स्मृति प्रमाणभूत होत. देश, काल आणि पात्र यांच्यांत घडून येणाऱ्या बदलांनुसार आचार वगैरेहि बदलत असतात; आणि स्मृति मुख्यतः या आचारांचेंच नियमन करीत असल्यामुळे वेळोवेळीं त्या स्मृतींमधेहि बदल करावे लागले आहेत. हा मुद्दा तुम्हीं विशेषेंकरून लक्षांत ठेवावा असें माझें तुम्हांला आग्रहाचें

सांगणें आहे. वेदान्त धर्माचे जे मूलसिद्धान्त आहेत ते अपरिवर्तनीय आहेत--ते कदापि बदलावयाचे नाहीत. असें कां बरें ? कारण हेंच कीं, मानवाठायीं आणि प्रकृतीच्या ठायीं जीं सारीं अपरिवर्तनीय तत्त्वें आहेत त्यांच्यावरच हे वेदान्ताचे सिद्धान्त आधारलेले आहेत. त्यांच्यांत कधीच बदल घडून येणें शक्य नाही. आत्मा, स्वर्ग प्रभृतींविषयीचीं सत्यें बदलणें कदापि शक्य नाही. हजरों वर्षांपूर्वी ह्या सत्यांसंबंधी ज्या धारणा होत्या त्या आजहि तशाच आहेत, आणि लाखो वर्षांनंतरहि तशाच राहणार आहेत. परंतु जीं सारीं धर्मकृत्यें आमच्या सामाजिक अवस्थांवर आणि समाजांतील एकमेकांच्या संबंधांवर अवलंबून आहेत तीं धर्मकृत्यें समाजांत पडत जाणाऱ्या बदलांबरोबरच बदलत जाणार यांत विशेष तें काय ? म्हणून एखाद्या विशिष्ट काळीं एखादा विशिष्ट विधिच खरा आणि फलदायक ठरेल, इतर काळीं तो तसा ठरणार नाही. म्हणूनच असें आढळून येतें की, एका विशिष्ट काळांत एखादा विशिष्ट खाद्यपदार्थ खाण्यासंबंधी विधान आहे तर परत दुसऱ्या काळांत तोच पदार्थ निषिद्ध म्हटला आहे. याचा अर्थ एवढाच की, तो खाद्यपदार्थ त्या विशिष्ट काळांत उपयुक्त होता, परंतु ऋतूच्या आणि इतरहि कांही बदलांमुळे तो नंतर निरुपयोगी ठरल्यामुळे स्मृतीने तो खाण्यास निषेध केला यावरून अगदी स्वाभाविकपणें हें सिद्ध होतें की, जर वर्तमानकाळांत आमच्या समाजांत कांही बदल करणें आवश्यक असेल तर तो बदल केलाच पाहिजे; ऋषिलोक जन्मास येऊन हा बदल कसा करावयाचा हें आम्हांस दाखवून देतील. परंतु आमच्या धर्माचीं मूलभूत सत्यें मात्र लेशभरहि बदलणार नाहीत, तीं आहेत तशींच नेहमी राहतील.

त्यानंतर म्हणजे पुराणें. पुराणांच्या स्वरूपांविषयी असें म्हटलें आहे की "पुराणं पंच लक्षणम्." म्हणजे, पुराणांची पांच लक्षणें आहेत. ह्या पुराणांमधे इतिहास, सृष्टितत्त्व, उच्च दार्शनिक तत्त्वांचें रूपकात्मक वर्णन इत्यादि नाना विषय येत असतात. वैदिक धर्माचा आमजनतेंत प्रसार करण्यासाठी हीं पुराणें लिहिलीं गेलीं आहेत. वेद ज्या भाषेंत लिहिले गेले आहेत तीं भाषा अत्यंत प्राचीन आहे. विद्वानांपैकीहि फारच थोडेजण ह्या ग्रंथांचा काल ठरविण्यास समर्थ होत. पुराणें मात्र तत्कालीन लोकांच्या भाषेंत लिहिलेलीं आहेत. पुराणांच्या संस्कृत भाषेला

आधुनिक संस्कृत म्हणतां येईल. हीं पुराणें विद्वानांकरता नाहीत, तीं सर्व-साधारण लोकांकरता आहेत, कारण साधारण लोक तत्त्वज्ञान समजूं शकत नाहीत. त्यांना हीं सारीं सूक्ष्म तत्त्वें समजून सांगण्यासाठी साधु-संत, राजे आणि थोर पुरुष यांच्या चरित्रांद्वारा आणि या जातींत ज्या साऱ्या ऐतिहासिक घटना घडल्या होत्या त्यांच्या द्वारा पुराणें स्थूल-स्वरूपांत शिकवण देतात. धर्माचीं चिरंतन तत्त्वें सोदाहरण प्रतिपादण्या-साठी ऋषींनी ह्या साऱ्या सामुग्रीचा उपयोग केला आहे.

त्यानंतर म्हणजे तंत्रग्रंथ. हीं तत्रें कांही कांही बाबतींत थेट पुराणासारखीं आहेत, तर त्यांच्यांतील कांहींत कर्मकांडामधील प्राचीन यज्ञयागांना पुनरुज्जीवित करण्याचा प्रयत्न केला गेला आहे.

हे सारे ग्रंथ हिंदूंचीं शास्त्रें होत. आणि ज्या जातींत ह्या इतक्या प्रमाणांत शास्त्रग्रंथ विद्यमान आहेत आणि ज्या जातीने अगणित वर्षें तत्त्वज्ञानाच्या आणि धर्माच्या चिंतनांत आपली शक्ति वेचली आहे त्या जातींत इतके संप्रदाय अस्तित्वांत यावेत ह्यांत नवल तें काय ? तींत आणखीहि हजारो संप्रदाय कसे उदयास आले नाहीत हेंच आश्चर्य म्हणावयाचें ! कांहीकांही बाबतींत या सर्व संप्रदायांमधे एकमेकांत कमालीचा भेद आहे. ह्या संप्रदायांसंप्रदायांतील हे सारे बारीकसारीक भेद समजून घेत बसण्याला सध्या आपल्याला वेळ नाही. म्हणून ह्या समग्र संप्रदायांतील ज्या मतांवर आणि तत्त्वांवर प्रत्येक हिंदूचा विश्वास असणें आवश्यक आहे, त्या सर्व संप्रदायांना साधारण अशा तत्त्वांचीच मी आता येथे आलोचना करीन.

प्रथमत: म्हणजे सृष्टितत्त्व--ही सृष्टि कशी निर्माण झाली ? हिंदूंच्या समस्त संप्रदायांचें असें मत आहे की ही सृष्टि, ही प्रकृति, ही माया अनादि अनंत आहे. हें जगत् कोण्या एका विशिष्ट दिवशीं सृष्ट झालेलें नाही. ईश्वर नांवाच्या कुणा एकाने येऊन हें जगत् सृष्ट केलें आणि त्यानंतर तो जो झोपी गेला तो अजूनहि झोपलेलाच आहे अशांतला भाग नाही. असें असणें शक्यच नाही. सृजनकारी शक्ति अजूनहि कार्य करीतच आहे. ईश्वर अनंत कालापासून सृष्टिकार्य करीत आहे, तो कधीच विश्रांति घेत नाही. गीतेंत श्रीकृष्णांनी म्हटलें आहे-- "मी जर क्षणभरहि कर्म करण्याचें थांबवीन तर साऱ्या जगाचा ध्वंस

होऊन जाईल."

जगतांत ही जी सृजनशक्ति अहोरात्र कार्य करीत आहे, ती जर क्षणभरदेखील कार्य बंद करील तर ह्या जगताचा ध्वंस होऊन जाईल. असा समय कधीच नव्हता की जेव्हा समस्त जगतांत ही शक्ति क्रियाशील नव्हती; तथापि, अर्थातच युगाच्या शेवटीं प्रलय होत असतो. आपली सृष्टि म्हणजे इंग्रजींतील Creation (क्रिएशन) नव्हे. 'क्रिएशन' म्हटल्याने इंग्रजींत "'कांही-नाहीं'तून कांहीतरी उपजणें,'असत्'पासून 'सत्'ची उत्पत्ति" असा अर्थ होतो. ही कल्पना अगदीच गावंढळ, अगदीच अपक्व आहे. या विसंगत, विद्रूप कल्पनेवर विश्वास ठेवायला सांगून मी तुमच्या बुद्धीचा आणि तर्कशक्तीचा अपमान करूं इच्छीत नाहीं? ही समस्त प्रकृति विद्यमानच असते, फक्त प्रलयाच्या काळीं ती क्रमशः सूक्ष्म सूक्ष्मतर होत जाते आणि शेवटीं अव्यक्त रूप धारण करते. नंतर कांही काल जणु विश्रांति घेतल्यावर फिरून कुणीतरी जणु तिला बाहेर लोटून देतो; तेव्हा मग पूर्वीसारखेच संयोग, पूर्वीसारखाच क्रमविकास आणि पूर्वीसारखेच आविष्कार होऊं लागतात. कांही काल असला खेळ चालून परत ती सारी मांडणी मोडली जाते--क्रमशः अधिकाधिक सूक्ष्म सूक्ष्म होत जाते, आणि शेवटीं सारेंकांही फिरून विलीन होऊन जातें. फिरून प्रकट होतें. अनंतकाल अशा रीतीने लाटेसारखें उसळत-कोसळत एकवार सारें पुढे जात आहे तर पुन्हा मागे येत आहे. देश, काल आणि इतरहि सारेंच ह्या प्रकृतींतच अंतर्भूत आहे. आणि म्हणूनच सृष्टीला आरंभ आहे, ती एका विशिष्ट तारखेस निर्माण झाली आहे असें म्हणणें शुद्ध वेडेपणाचें होय. सृष्टीच्या आरंभासंबंधी वा अंतासंबंधी मुळी प्रश्नच उद्‌भवूं शकत नाही. म्हणून आमच्या शास्त्रांत जिथे सृष्टीच्या आरंभाचा वा अंताचा उल्लेख आढळेल तिथे त्याचा अर्थ एका विशिष्ट युगाचा आरंभ नि अंत असा समजला पाहिजे, त्याखेरीज त्याला आणखी कांहीहि अर्थ नाही.

ही सृष्टि कुणीं केली आहे? ईश्वराने. इंग्रजींत साधारणपणें God (गॉड) शब्दाचा जो अर्थ आहे तो मला येथे अभिप्रेत नाही. संस्कृतभाषेंतील 'ब्रह्म' शब्दाचा उपयोग करणेंच सगळ्यांत चांगलें आणि तर्कसंगत होईल. तें ब्रह्म वा तो ईश्वर या जगत्प्रपंचाचें साधारण कारण होय. त्या ब्रह्माचें स्वरूप कसें आहे? ब्रह्म हें नित्य, नित्यशुद्ध, नित्य-

जागृत, सर्वशक्तिमान, सर्वज्ञ, दयामय, सर्वव्यापी, निराकार आणि अखंड आहे. तें ह्या जगाची सृष्टि करतें. आता प्रश्न असा की, जर हें ब्रह्म, हा ईश्वर जगताचा स्रष्टा आणि स्थितिकर्ता असेल तर दोन अडचणी उपस्थित होतात. जगामधे तर कमालीची विषमता आहे--इथे कुणी सुखी तर कुणी दुःखी, कुणी धनी तर कुणी दरिद्री असतात. अशी विषमता कां असावी? त्याचप्रमाणे, येथे परत निष्ठुरतादेखील विद्यमान आहे. कारण इथे एकाचें जीवन दुसऱ्याच्या मृत्यूवर अवलंबून असतें. एक प्राणी दुसऱ्या प्राण्याचे तुकडे तुकडे करीत आहे, प्रत्येक माणूसहि आपल्या भावाचा गळा दाबायचा प्रयत्न करीत आहे. ही स्पर्धा, ही निष्ठुरता, ही बीभत्सता, हे रात्रंदिवस हृदय पिळवटून निघणारे हताश सुस्कारे-- ह्याचेंच तर नांव जग ! आणि 'हें' जग जर ईश्वराची सृष्टि असेल, त्याची निर्मिति असेल तर मग तो ईश्वर पराकाष्ठेचा निष्ठुरच म्हणावयाचा ! माणूस कल्पना करूं शकेल असल्या केवढ्याहि निष्ठुर दानवापेक्षा हा ईश्वर अधिक निष्ठुर, अधिक नृशंस, अधिक निर्दय ठरेल ! वेदान्त घोषणा करतो की, नाही, ईश्वर ह्या विषमतेचें व या जीवघेण्या स्पर्धेचें कारण नाही. तर मग हें सारें कुणीं केलें ? आपणच-- तुम्हींआम्हींच हें सारें केलें आहे. मेघाने सर्व शेतांवर सारखाच पाऊस पाडला. परंतु जें शेत चांगल्या रीतीने नांगरलेलें होतें त्यांतच त्या पावसाने धान्य पिकलें; जें शेत नीट नांगरेलेलें नव्हतें, ज्याची नीट मशागत झालेली नव्हती त्याला ह्या पावसाचा फायदा झाला नाही. हा कांही त्या मेघाचा अपराध नव्हे. भगवंताची दया अनंत आहे--अपरिवर्तनीय आहे. तिला खळ नाही, खंड नाही, ती कधी बदलत नाही. ह्या विषमतेची निर्मिति केली आहे आम्हीं--त्या ईश्वराने नव्हे. आम्हीं या विषमतेची निर्मिति कशी केली ? जगांत कुणी सुखीच जन्माला येतो तर कुणी दुःखी. ही विषमता निर्माण व्हावी असें त्यांनी तर कांहीहि केलेलें नाही. कोण म्हणतो त्यांनी कांहीहि केलें नाही ! त्यांनी 'ह्या' जन्मांत कांहीहि केलें नसेल, परंतु पूर्वजन्मांत पुष्कळच केलेलें आहे की ! त्यांच्या पूर्वजन्मांतील कर्मांमुळे या जन्मांत एकजण जन्मतःच सुखी तर दुसरा जन्मतःच दुःखी असा भेद झालेला आहे--ही विषमता निर्माण झाली आहे.

आता आपण हिंदुधर्मातील त्या द्वितीय तत्त्वाकडे वळूं. या तत्त्वाबाबत केवळ आम्हां हिंदूंचेंच नव्हे, तर बौद्धांचें आणि जैनांचेंहि एकमत आहे. आपण सर्वजण हें मानत असतों की, सृष्टीप्रमाणेच जीवनहि अनंत आहे. शून्यांतून जीवनाची उत्पत्ति झाली असें नव्हे--असें होणें शक्यच नाही. तसलें जीवन हें जगण्याच्या लायकीचें असणार नाही. ज्याचा कधी प्रारंभ झाला आहे त्याचा कधी ना कधी अंत होणारच. काल जर जीवनाचा आरंभ झाला असेल तर उद्या त्याचा शेवट होणारच--म्हणजे अखेर त्याचा संपूर्ण ध्वंस होणारच. जीवन अलबतच आधीहि विद्यमान होतेंच. आजकाल हें पटवून देण्याची फारशी गरज नाही, कारण आजकालची समस्त विज्ञानें या बाबतींत आपल्या साहाय्यार्थ धांवून येत आहेत, आमच्या शास्त्रांमधील तत्त्वें तीं जड जगतांतील घटनांच्या मदतीने स्पष्ट करीत आहेत, सिद्ध करीत आहेत. तुम्हां सर्वांना हें माहीतच आहे की आपल्यांतील प्रत्येकजणच अनंत गतकालांतील कर्मसमूहाचें फळ होय. कविलोक मिटक्या मारून वर्णन करतात त्याप्रमाणे मूल कांही प्रकृतीकडून चकचकीत नवेंकोरें जगांत येत नसतें, त्याच्या खांद्यावर अनंत गतकालाची कर्मसमष्टि लादलेली असते. भल्या म्हणा की बुऱ्या म्हणा, तें स्वतःच्या कर्मांचें फळ भोगण्याकरता जगांत येत असतें. ह्यासाठीच माणूस जन्मत असतो. आणि ह्यामुळेच जगांत दिसणारी ही विषमता निर्माण होत असते. हा कर्माचा नियम आहे आपल्यापैकी प्रत्येकजणच आपल्या भविष्याचा, आपल्या भाग्याचा निर्माता आहे. ह्या कर्मफलाच्या सिद्धान्ताने दैववादाचें सपशेल खंडन होतें, आणि ह्यानेच ईश्वरावर लादल्या जाणाऱ्या विषमता व निष्ठुरता या दोषांचें निरसन होऊन जातें. आपल्याला जें कांही भोगावें लागतें त्यासाठी आपणच जबाबदार आहोंत, दुसरा कुणीहि नाही. आपण आपल्या कर्मांचें कार्य आहोंत आणि आपणच आपल्या कर्मांचें कारण आहोंत. म्हणजेच आपण स्वाधीन आहोंत--स्वतंत्र आहोंत. मी जर दुःखी असेन तर मीं हें समजून असावयास हवें की मींच मला स्वतःला दुःखी केलें आहे. यावरून हेंहि स्पष्ट होतें की माझी इच्छा असेल तर मी स्वतःला सुखी करूं शकेन. मी जर अपवित्र असेन तर त्यालाहि कारण माझा मीच आहें; यावरूनच हेंहि दिसून येतें की इच्छा अस-

त्यास मी पवित्र होऊं शकतों. आणि हें सर्वच बाबतींत खरें आहे. मानवी इच्छाशक्ति ही कोणत्याहि परिस्थितीच्या अधीन नाही. मानवाच्या अनंत, प्रबल, महान् इच्छाशक्तीपुढे आणि स्वाधीनतेपुढे सर्व शक्ति, फार काय नैसर्गिक शक्तिदेखील मान तुकवितील--दास बनून जातील.

यावर स्वभावतःच असा प्रश्न उद्भवेल की आत्मा काय आहे? ह्या आत्म्याला जाणल्याखेरीज आपण आपल्या शास्त्रांनी वर्णिलेल्या ईश्वरालाहि जाणूं शकणार नाहीं. भारतांत आणि भारताबाहेरील देशांमधेहि बाह्यप्रकृतीच्या अनुशीलनाद्वारें त्या सर्वातीत सत्तेचा आभास प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न झालेला आहे. त्या साऱ्या प्रयत्नांना शोचनीय अपयश आलें आहे हेंहि आपल्याला माहीत आहेच. त्या अतीत सत्तेचा आभास लाभणें तर दूरच राहो, उलट या जडजगताचें आपण जितकें अधिक अनुशीलन करतों तितकें आपण जास्त जडवादी होऊन जात असतों. आधी जी काय थोडीबहुत आध्यात्मिक प्रवृत्ति होती तीहि हें जडजगत् अधिकाधिक हाताळतां हाताळतां, त्याचें अधिकाधिक अनुशीलन करतांकरतां नाहीशी होऊन जाते. म्हणून, आध्यात्मिकता आणि त्या परमपुरुषाचें ज्ञान बाह्यजगतांतून लाभणें शक्य नाही, आंत, अंतरंगामधे, आत्म्यामधेच त्याचें अन्वेषण करावें लागेल. बाह्यजगत् आपल्याला त्या अतीतासंबंधी, त्या अनंतासंबंधी कांहीच सांगूं शकत नाही. अंतर्जगतांत अन्वेषण केल्यानेच आपला कार्यभाग साधूं शकेल. म्हणून केवळ आत्मतत्त्वाच्या अन्वेषणाने, आत्मतत्त्वाच्या विश्लेषणानेच परमात्मतत्त्वाचें--ईश्वराचें ज्ञान प्राप्त होणें शक्य आहे. जीवात्म्याच्या स्वरूपासंबंधी भारतांतील विभिन्न संप्रदायांत मतभेद आहे खरा, परंतु कांहीकांही बाबतींत त्या सर्वांचें एकमतहि आहे. त्या सर्वांचेंच ह्या मुद्यावर मतैक्य आहे की जीवात्मे हे अनादि आणि अनंत आहेत, ते स्वरूपतः अविनाशी आहेत. आणि त्याचप्रमाणे त्या सगळ्यांचाच असा सिद्धान्त आहे की प्रत्येक आत्म्यांत सर्वप्रकारची शक्ति, आनंद, पवित्रता, सर्वव्यापिता आणि सर्वज्ञत्व अंतःस्थित आहे. हें महान् तत्त्व आपण नेहमीच लक्षांत ठेवावयास हवें. प्रत्येक मानवांत, प्रत्येक प्राण्यांत, मग तो कितीहि दुबळा वा वाईट असेना का, तो मोठा असो की लहान

असो--प्रत्येकांत तोच सर्वव्यापी, सर्वज्ञ आत्मा विराजमान आहे. आत्म्याच्या दृष्टीने कांहीच भेद नाही--भेद आहे केवळ आविष्कारा-च्या श्रेष्ठकनिष्ठपणामुळे. माझ्यांत आणि एखाद्या अगदी क्षुद्र प्राण्यांत भेद आहे केवळ अभिव्यक्तीच्या श्रेष्ठकनिष्ठपणामुळे, स्वरूपत: त्याच्यांत आणि माझ्यांत कांहीच भेद नाही; तो माझा भाऊ आहे; त्याचा जो आत्मा आहे तोच माझाहि आत्मा आहे. भारताने ह्या महान् तत्त्वाची जगासमोर घोषणा केली आहे. इतर देशांत 'सर्व मानवांच्या भ्रातृ-भावा'ची घोषणा केली जाते--भारतांत ती 'सर्व प्राण्यांच्या भ्रातृ-भावा'चें रूप धारण करते. अगदी क्षुद्रांतील क्षुद्र प्राणी, फार काय पण य:कश्चित् मुंगीदेखील माझ्या भाऊ-बहिणी आहेत--ते सगळेहि माझेच देह होत. आपल्या शास्त्रांत सांगितल्याप्रमाणे "सर्व प्राण्यांच्या अंतर्यामीं तो प्रभु वसत आहे असें जाणून सर्व प्राण्यांची भगवत्-बोधाने आराधना करावी." ह्याच कारणास्तव आपल्या भारतांत पशूंविषयी आणि गरिबांविषयी इतका दयेचा भाव वसत आहे--झाडून सर्वांविषयी आणि सर्वच बाबतींत इतका दयाळूपणा वसत आहे. असो तर, आत्म्यांतच समस्त शक्ति विद्यमान आहे ह्या सिद्धान्ताविषयी भारतांतील सग-ळयाच संप्रदायांचें एकमत आहे.

आता, ईश्वराचें स्वरूप कसें आहे ह्याच्या चर्चेकडे वळणें आपल्या-पक्षीं स्वाभाविक होईल. तथापि त्यापूर्वी आत्म्यासंबंधी एक गोष्ट मी तुम्हांला सांगून ठेवूं इच्छितों. जे लोक इंग्रजीभाषेचें अनुशीलन करतात त्यांची पुष्कळदा त्या भाषेंतील Soul (सोल) आणि Mind (माइंड) या दोन शब्दांनी मोठी फसगत होत असते. संस्कृतभाषेंतील 'आत्मा' हा शब्द, आणि इंग्रजीभाषेंतील Soul (सोल) हा शब्द, या दोघांचे अर्थ अगदीच वेगळे आहेत. आपण ज्याला 'मन' म्हणत असतों त्यालाच पाश्चात्त्यलोक Soul (सोल) म्हणत असतात. पाश्चात्त्यदेशांत आत्म्या-संबंधी खरें, यथार्थ ज्ञान कधीच नव्हतें. सुमारें वीस वर्षे झालीं, संस्कृत तत्त्वज्ञानामधून तें पाश्चात्त्यदेशांत फैलावलें आहे. आपलें हें स्थूल शरीर आहे, त्याच्या पलीकडे मन आहे. परंतु मन म्हणजे आत्मा नव्हे. मन हें सूक्ष्म शरीर आहे--सूक्ष्म पंचमहाभूतांचें वा तन्मात्रांचें बनलें आहे. हेंच जन्मामागून जन्म निरनिराळया स्थूल शरीरांचा अवलंब करीत असतें.

ह्याच्या पाठीशीं आहे Soul (सोल) वा माणसाचा आत्मा. ह्या आत्मा शब्दाचा Soul (सोल) किंवा Mind (माइंड) या शब्दांनी अनुवाद होऊं शकत नाही. म्हणून, आपल्याला आपल्या संस्कृतांतील 'आत्मा' किंवा आजकालच्या पाश्चात्त्य तत्त्वज्ञांच्या म्हणण्यानुसार Self (सेल्फ) हा शब्द वापरावा लागेल. असो तर, आपण कोणताहि शब्द वापरला तरी हें आपण अगदी नीट ध्यानांत बाळगावयास हवें की आत्मा हा मन आणि स्थूलशरीर ह्या दोघांहूनहि वेगळा आहे, या दोहोंहूनहि पृथक् आहे. आणि हा आत्माच मनाला, म्हणजेच सूक्ष्मशरीराला बरोबर घेऊन एका देहांतून दुसऱ्या देहांत गमन करीत असतो. जेव्हा त्याला सर्वज्ञत्व आणि पूर्णत्व यांचा लाभ होतो तेव्हाच मग त्याचें जन्मणें आणि मरणें थांबतें--तेव्हा मग तो स्वाधीन, स्वतंत्र होऊन जातो. तेव्हा मग, इच्छा असल्यास तो हें मन वा सूक्ष्मशरीर राखूंहि शकतो किंवा तें टाकून देऊन कायमचा स्वाधीन आणि मुक्त होऊन जाऊं शकतो. स्वाधीनताच आत्म्याचें लक्ष्य होय. हेंच आपल्या धर्माचें वैशिष्टय आहे. आमच्या धर्मांतहि स्वर्ग-नरक आहेत. पण ते चिरस्थायी नाहीत. स्वर्ग-नरकांचें स्वरूप विचारांत घेतल्यास सहजच निदर्शनास येतें की ते चिरस्थायी असूंच शकत नाहीत. जर स्वर्ग म्हणून कांही असेलच तर तो म्हणजे ह्या मर्त्यलोकाचीच केवळ पुनरावृत्ति असणार--इथल्यापरीस थोडेसें जास्त सुख, थोडासा जास्त भोग, इतकेंच. परंतु अशाने उलट आणखीच अनिष्ट ओढवावयाचें. असो. असले स्वर्ग अनेक आहेत. जे फलाची आकांक्षा धरून इहलोकीं एखादें सत्कर्म करतात ते मृत्यूनंतर असल्या एखाद्या स्वर्गांत इंद्र वगैरे देवतांच्या रूपाने जन्मतात. हें देवत्व म्हणजे कांही विशिष्ट पदें होत. स्वर्गांतील हे देवहि एके वेळीं मनुष्य होते; सत्कर्मांमुळे त्यांना देवत्व लाभलें आहे. इंद्र, वरुण वगैरे कांही विशिष्ट देवांचीं नांवें नव्हत. हजारो इंद्र होतील. राजा नहुष मृत्यूनंतर इंद्र झाला होता. इंद्र हें केवळ एक पद आहे. एखादी व्यक्ति सत्कर्म केल्यामुळे परिणामीं उन्नत होऊन इंद्रत्व पावते, कांही काळ त्या पदावर राहते, आणि अखेर तें देवशरीर सोडून पुन्हा मनुष्याच्या जन्मास येते. परंतु मनुष्यजन्मच सर्वांत श्रेष्ठ जन्म होय. आता असें शक्य आहे की कुणी एखादा देव स्वर्गांत असूनहि तेथील स्वर्गसुखाच्या वासनेचा त्याग करून मुक्तिलाभासाठी प्रयत्न करील.

परंतु असें फारच क्वचित् घडतें. ज्याप्रमाणे आपल्या ह्या जगांतले अधिकांश लोक धन, मान, ऐश्वर्य लाभतांच उच्च तत्त्वें पार विसरून जातात त्याचप्रमाणे अधिकांश देवहि स्वर्गीच्या ऐश्वर्यमदाने मत्त होऊन मुक्तीचा प्रयत्न कधीच करीत नाहीत. आपल्या शुभ कर्मांच्या फलाचा उपभोग घेऊन होतांच ते फिरून या पृथ्वीवर परत येतात आणि मनुष्य होतात. म्हणून हीं पृथ्वीच कर्मभूमि आहे, ह्या पृथ्वीवरच आपण मुक्ति प्राप्त करून घेऊं शकतों. आणि म्हणून या साऱ्या स्वर्गांशीं आपल्याला कांही कर्तव्य नाही. त्यांचीदेखील आपल्याला कांही गरज नाही.

तर मग कशाच्या लाभासाठी आपण प्रयत्न करावयाचा ? मुक्तीच्या लाभासाठी. आमचीं शास्त्रें आम्हांला सांगतात की अगदी सगळ्यांत श्रेष्ठ अशा स्वर्गांतदेखील तुम्ही प्रकृतीचे गुलामच असतां. समजा की तुम्ही वीस हजार वर्षें राज्य केलें. पण म्हणून काय झालें ? जोंपर्यंत तुम्हांला शरीर आहे तोंपर्यंत तुम्ही सुखाचे गुलामच असणार. जोंपर्यंत देश आणि काल तुमच्यावर अंमल चालवितील तोंपर्यंत तुम्ही बंदे गुलामच. एवढ्याचसाठी आपण बहि:प्रकृति आणि अंत:प्रकृति या उभयतांवर जय मिळवायला हवा. प्रकृतीने तुमच्या पायाशीं लोळण घ्यायला हवी, —— प्रकृतीला पायदळीं तुडवीत तिच्या पलीकडे जाऊन तुम्हीं स्वाधीनभावाने, मुक्तपणें निज महिम्यांत प्रतिष्ठित झालें पाहिजे. तेव्हा तुम्ही जन्माच्या पलीकडे गेलां असतां, आणि म्हणूनच मग तुम्ही मृत्यूच्याहि पलीकडे गेलेले असतां. तेव्हा तुम्ही सुख ओलांडलेलें असतें आणि म्हणूनच दु:खहि तुमचा पाठलाग करूं शकत नाही——तुम्ही दु:खाच्याहि पोहोचेबाहेर निघून गेलेलां असतां. तेव्हाच तुम्ही सर्वातीत, अनिर्वचनीय, अव्यक्त, अविनाशी आनंदाचे अधिकारी बनतां. आपण इथे ज्याला सुख आणि मंगल म्हणत असतों तें त्या अनंत आनंदाचा केवळ एक कण होय. तो अनंत आनंदच आमचें लक्ष्य आहे.

आत्मा जसा अनंत आनंदस्वरूप आहे तसाच तो लिंगभेदरहित आहे. आत्म्यांत नर-नारी वा स्त्री आणि पुरुष हा भेद नाही. नर-नारी भेद देहाच्या बाबतींतच संभवतो. म्हणून आत्म्यावर स्त्री वा पुरुष अशा भेदाचा आरोप करणें निव्वळ भ्रांति होय——तो भेद शरीराच्या संबंधांतच शक्य आहे. वयाची कल्पनाहि आत्म्याला लागू नाही——आत्म्याला

वय नाही. त्याचें वय ठरवितां यावयाचें नाही--तो पुराणपुरुष सर्वदा एकरूपच आहे.

हा आत्मा बद्ध कसा झाला ? आमच्या शास्त्रांत या प्रश्नाला एकच उत्तर दिलेलें आढळेल. तें म्हणजे--अज्ञानच ह्या बंधनाचें कारण होय. आपण अज्ञानानेच बद्ध झालों आहोंत, आणि ज्ञानाच्या उदयाने या बंधनाचा नाश होईल--ज्ञानच आपल्याला ह्या अज्ञानाच्या घनांधकारापलीकडे घेऊन जाईल. या ज्ञानाच्या लाभाचा उपाय कोणता ? भक्तिपूर्वक ईश्वराची उपासना केल्याने आणि सर्व भूतांना भगवंताचीं मंदिरें जाणून सर्वभूतांवर प्रेम केल्याने ह्या ज्ञानाचा लाभ होतो. ईश्वरावरील प्रबल अनुरागांतून ज्ञान जन्मेल, त्या ज्ञानाने अज्ञान नाहीसें होईल--सर्व बंधनें गळून पडतील आणि आत्मा मुक्त होऊन जाईल.

ईश्वराचें स्वरूप द्विविध आहे--दोन प्रकारचें आहे असें आमच्या शास्त्रांत सांगितलेलें आढळतें. ईश्वराचीं तीं द्विविध स्वरूपें म्हणजे सगुण आणि निर्गुण हीं होत. सगुण ईश्वर म्हणजे सर्वव्यापी, जगताची सृष्टि, स्थिति आणि लय करणारा--जगताचा अनादि जनक आणि जननी होय त्यांच्यांत आणि आपल्यांत नित्य भेद विद्यमान आहे. आणि मुक्ति म्हणजे त्याच्या समीप जाणें व त्याच्याबरोबर वास करणें. यालाच म्हणतात सामीप्य आणि सालोक्य. याउलट, निर्गुण ब्रह्माचें वर्णन करतांना हीं सारीं विशेषणें अनावश्यक आणि तर्कविसंगत म्हणून टाकून देण्यांत आलीं आहेत. अजीबात रद्द केलीं गेलीं आहेत. त्या निर्गुण, सर्वव्यापक पुरुषाला ज्ञानवान वा जाणणारा म्हणतां यावयाचें नाही, कारण ज्ञान वा जाणणें हा मनाचा धर्म आहे. त्याला 'विचार करणारा' म्हणतां यावयाचें नाही, कारण विचार हें समर्यादतेचें, दुर्बलतेचें चिन्ह होय. त्याला सृष्टिकर्ता म्हणतां यावयाचें नाही, कारण सृजनाची प्रवृत्ति फक्त बद्धांतच शक्य आहे, मुक्तांत कदापि नाही. पण परमेश्वर कशाने बद्ध असणार? त्याला बंधन कसलें ? प्रयोजनाखेरीज वा एखाद्या हेतूखेरीज कोणीहि कोणतेंहि काम करीत नसतो. पण सृष्टि करण्यांत परमेश्वराचें प्रयोजन वा त्याचा हेतु काय बरें असणें शक्य आहे ? कशाचा तरी अभाव, कशाची तरी कमतरता वा उणीव असल्याखेरीज कुणीहि कोणतेंच काम करीत नसतो. पण परमेश्वराला अभाव कशाचा--त्याला कमतरता वा उणीव कशाची

असणार ? वेदांमधे त्याला 'सः' (तो) हा शब्द लावलेला नाहीं. 'सः' शब्दानें त्याचा उल्लेख न करतां, त्याचा निर्गुण स्वभाव व्यक्त करण्यासाठी 'तत्' (तें) या शब्दानें त्याचा निर्देश केला गेला आहे. 'सः' शब्द वापरल्यानें तो एखादी विशिष्ट व्यक्ति आहे असा अर्थ झाला असता, आणि त्यांतून तो जीव-जगताहून अगदी वेगळा, अलग आहे असा ध्वनि निघाला असता. असें न होवो म्हणूनच निर्गुणवाचक 'तत्' शब्दाचा उपयोग करण्यांत आला आहे--'तत्'शब्दवाच्य निर्गुण ब्रह्माचा प्रचार करण्यांत आला आहे. ह्यालाच अद्वैतवाद म्हणतात.

त्या निर्गुण पुरुषाशीं आपला काय संबंध आहे ? आपण त्याच्याशीं अभिन्न आहोंत, एक आहोंत. आपण प्रत्येकजणच त्या सर्व प्राण्यांचे मूल कारण असलेल्या निर्गुण पुरुषाचें भिन्नभिन्न आविष्कार आहोंत, इतकेंच. ज्या वेळीं आपण त्या अनंत निर्गुण पुरुषाहून स्वतःला पृथक् वा वेगळें समजतों त्याच वेळीं आपल्या दुःखांना सुरुवात होते. आणि त्या अनिर्वचनीय, निर्गुण सत्तेशीं आपण एक आहोंत, अभिन्न आहोंत असा बोध आपल्यांत उपजतांच आपण मुक्त होऊन जातों. भेद-बोधांतून दुःखाची निष्पत्ति, आणि अभेद-बोध म्हणजेच मुक्ति. सारांश, आपल्या शास्त्रांत ईश्वराच्या ह्या द्विविध स्वरूपाचा उल्लेख आढळतो.

येथे हें सांगणें आवश्यक आहे की, हा निर्गुण ब्रह्मवादच सर्वप्रकारच्या नीतिप्रणालींचा पाया होय. अति प्राचीन कालापासून प्रत्येक देशांत ह्या तत्त्वाचा प्रचार केला गेला आहे की मनुष्यजातीवर आत्मवत् प्रेम करावें. भारतवर्षांत परत मनुष्य आणि इतर प्राणी यांच्यांत ह्याबाबत कांही फरक केला गेला नाही; कुणालाहि न वगळतां सर्वच प्राण्यांवर आत्मवत् प्रेम करावें असा येथे उपदेश दिला गेला आहे. परंतु इतरांवर--प्राणिमात्रावर आत्मवत् प्रेम केल्यानें माणसाचें कल्याण कां होतें ह्याचें कारण मात्र कुणी सांगतांना आढळत नाहीं. फक्त निर्गुण ब्रह्मवादच ह्याचें कारण सांगण्यास समर्थ आहे. ज्या वेळीं हें समस्त ब्रह्माण्ड अखंड, एकसंध आहे हें तुम्ही जाणूं शकाल, दुसऱ्यावर प्रेम केल्यानें वस्तुतः स्वतःवरच प्रेम केल्यासारखें होतें आणि दुसऱ्याचें अनिष्ट केल्यानें स्वतःचेंच अनिष्ट केल्यासारखें आहे हें ज्या वेळीं तुम्हांला उमजेल त्याच वेळीं तुम्हांला तें कारण कळेल. दुसऱ्याचें अनिष्ट करणें

उचित कां नाही हें तेव्हाच आपल्याला कळेल. सारांश, ह्या निर्गुण ब्रह्मवादांतच आपल्याला नीतिशास्त्राचा तर्कसंगत पाया आढळूं शकतो --आपण नीतिमान कां असावें ह्याचें तर्कसंगत कारण सापडूं शकतें.

अद्वैतवादाविषयी बोलतांना तदनुषंगाने आणखीहि कित्येक मुद्दे उपस्थित होतात. अद्वैतवादाची कास धरल्यावर सगुण ईश्वराचें काय होणार? त्याचें स्थान कोणतें? सगुण ईश्वरावर विश्वास असल्याने हृदयांत किती अपूर्व प्रेम उचंबळत असतें ह्याची मला जाणीव आहे. विभिन्न काळाच्या गरजा पुरवून भक्ति लोकांवर कसा प्रभाव पाडीत असते, लोकांवर कसा परिणाम करीत असते हेंहि मला नीट अवगत आहे. परंतु आपल्या देशांत आपल्याला आता (भक्तीच्या आवेशांत येऊन) रडणें तितकेसें नको आहे--सध्या आपल्याला आवश्यकता आहे अमळ बलाची--वीर्याची. या निर्गुण ब्रह्मावर विश्वास बसल्याने--झाडून साऱ्या खुळचट समजुतींना व लोकभ्रमांना धुत्कारून 'मीच तें निर्गुण ब्रह्म आहें' या ज्ञानाच्या साहाय्याने स्वतःच्या पायांवर उभें राहिल्याने हृदयांत किती अपूर्व शक्तीचा विकास होतो हें कसें सांगावें? मग मला भय? मग मला भय कोणाचें? मग मला प्रकृतीच्या नियमांचीहि तमा नाही. मृत्यु मग माझ्या लेखीं एक थट्टेची गोष्ट होय. माणूस मग स्वतःच्या आत्म्याच्या महिम्यांत स्थित होऊन जातो--तो आत्मा अनादि, अनंत आणि अविनाशी आहे; त्याला शस्त्र छेदूं शकत नाही, अग्नि दग्ध करूं शकत नाही, पाणी विरवूं शकत नाही, वायु शुष्क करूं शकत नाही; तो अनंत आहे, जन्मरहित आहे, मृत्युरहित आहे; त्याच्या महिम्यापुढे सूर्य-चंद्र-तारे, फार काय पण हा सारा विश्वब्रह्माण्डाचा पसारा समुद्रापुढे बिंदूसारखा ठरतो; त्याच्या वैभवापुढे देश-कालांचें अस्तित्वच लोपून जातें. आपल्याठायीं ह्या महामहिमामय आत्म्याविषयी विश्वास उत्पन्न झाला पाहिजे---तरच बल उपजेल, वीर्य लाभेल. जसा तुम्ही विचार कराल, जसें तुम्ही चिंतन कराल तसेच तुम्ही व्हाल. जर तुम्ही स्वतःला दुबळे समजाल तर तुम्ही दुबळेच व्हाल; तेजस्वी मानाल तर तेजस्वी व्हाल. जर तुम्ही स्वतःला अपवित्र लेखाल तर तुम्ही अपवित्रच व्हाल; स्वतःला विशुद्ध गणाल तर विशुद्धच व्हाल. अद्वैतवाद आपल्याला स्वतःस दुबळे समजण्यास सांगत नाही, स्वतःला

तेजस्वी, सर्वशक्तिमान आणि सर्वज्ञ मानावयासच तो आपल्याला शिकवितो. ही भावना, हा आत्मभाव कदाचित् माझ्यांत अजून व्यक्त झालेला नसेल. परंतु म्हणून काय झालें ?--तो माझ्या आंत विद्यमान आहे यांत तर कांही संशय नाही ना ? समस्त ज्ञान, सर्व शक्ति, पूर्ण पवित्रता आणि सारी स्वाधीनता माझ्या ठायीं--माझ्या आंतच वसत आहे तर मग मी हें सारें माझ्या जीवनांत प्रकट कां करूं शकत नाहीं--व्यक्त कां करूं शकत नाहीं ? त्याचें कारण फक्त एवढेंच--ह्या साऱ्यावर माझा विश्वास नाही ! जर माझा ह्या साऱ्यावर विश्वास बसेल तर तात्काळ हें सारें प्रकट होईल--अगदी निश्चित प्रकट होईल--झालेंच पाहिजे. अद्वैतवाद आपल्याला हेंच सांगतो--अद्वैतवाद आपल्याला हेंच शिकवितो. आपल्या मुलाबाळांना अगदी लहानपणापासूनच तेजस्वी बनण्याचें, बलसंपन्न होण्याचें वळण लावा. त्यांना कोणत्याहि प्रकारचा दुबळेपणा वा बाह्य अनुष्ठानें शिकवूं नका. ते तेजस्वी होवोत, स्वतःच्या पायांवर उभे राहोत--साहसी, धाडसी, जयिष्णु, सहिष्णु होवोत--आपण सर्वकांही जिंकूं, त्यासाठी काय वाटेल तें सहन करूं अशी ईर्ष्या त्यांच्याठायीं पेटूं द्या. आणि असें होण्यासाठी, हे सारे गुण अंगीं येण्यासाठी त्यांना अगोदर--सगळ्यांत आधी आत्म्याचा महिमा शिकवावा लागेल. आणि तो तुम्हांला वेदान्तांत--फक्त वेदान्तांतच गवसेल त्यांत इतर धर्मांतल्याप्रमाणे भक्ति, उपासना वगैरेसंबंधीहि पुष्कळच उपदेश आहे--अगदी मुबलक आहे, परंतु मी ज्या आत्मतत्त्वाविषयी सांगत आहें तेंच जीवनदायी आहे, तेंच शक्तिदायक आहे--अगदी अपूर्व आहे साऱ्या जगाच्या विचारांत क्रांति घडवून आणील आणि भौतिक ज्ञानाचा धर्माशी मेळ घालील असें महान् तत्त्वज्ञान वेदान्तांत आणि फक्त वेदान्तांतच विद्यमान आहे.

मीं तुम्हांला आपल्या धर्माचीं मुख्य मुख्य तत्त्वें सांगितलीं आहेत. हीं सारीं कृतींत कशीं आणावयाचीं यासंबंधी कांही गोष्टी मी आता तुम्हांला सांगूं इच्छितों. मीं तुम्हांला पूर्वीच सांगितलें आहे की भारतांत नाना कारणांस्तव अनेक संप्रदाय अस्तित्वांत असणें अगदी स्वाभाविक आहे येथील परिस्थितींत अनेक संप्रदाय असणारच आणि ते आहेत हें आपण बघतोंच. या बाबतींत आणखीहि एक आश्चर्याची गोष्ट आप-

त्याला येथे आढळून येते, ती ही की भारतांत एक संप्रदाय दुसऱ्या संप्रदायाला विरोध करीत नाही--ते आपसांत भांडत नाहीत. शैव असें म्हणत नाहीत की सगळे वैष्णव अधोगतीस जाणार आहेत, आणि वैष्णवहि शैवांना असें कांही म्हणत नाहीत. शैव म्हणतात की आम्ही आमच्या मार्गाने जात आहोंत, तुम्ही तुमच्या मार्गाने जा, अंतीं आपण दोघेहि एकाच जागीं पोहोचूं. भारतांतील सर्वच संप्रदाय हें मानीत असतात. यालाच 'इष्टनिष्ठा' म्हणतात. अति प्राचीन कालापासूनच ही गोष्ट मानली गेली आहे की ईश्वरोपासनेच्या भिन्न भिन्न पद्धति आहेत. हेंहि मानलें गेलें आहे की भिन्नभिन्न स्वभावांच्या व्यक्तींसाठी भिन्नभिन्न साधनापद्धतींची आवश्यकता आहे. तुम्हांला ज्या पद्धतीने ईश्वराचा लाभ होईल ती पद्धत कदाचित् मला लागू पडणार नाहीं. कदाचित् तिने माझी हानिहि होणें शक्य आहे. सगळ्यांना एकाच मार्गाने जावें लागेल या म्हणण्यांत कांहीच अर्थ नाही, तशाने उलट अनिष्टच होत असतें; म्हणून सर्वांना एकाच मार्गाने घेऊन जाण्याचा प्रयत्न आपण अजीबात सोडून दिला पाहिजे. जर खरोखरच कधी पृथ्वीच्या पाठीवरील सर्व लोक एकाच धर्माचे अनुयायी होऊन एकाच मार्गाने चालूं लागतील तर ती मोठी खेदाचीच गोष्ट होय असें म्हणावें लागेल. तसें झाल्यास लोकांची स्वतंत्र विचाराची शक्ति आणि खराखुरा धर्मभाव सपशेल नष्ट होऊन जाईल. विविधताच जीवनाचा आत्मा आहे. परस्पर भेद---एकमेकांतील वेगळेपणाच आमच्या जीवनाचा मूलमंत्र आहे. हा भेद संपूर्णपणें नाहीसा झाल्यास सृष्टीचाच लोप होऊन जाईल. जोंपर्यंत विचारपद्धतींतील ही विभिन्नता राहील तोंपर्यंतच आपण अस्तित्वांत राहूं. मात्र विभिन्नता आहे म्हणून विरोध असायला हवा असें मुळीच नाही. विविधता आहे म्हणून परस्पर कलह, एकमेकांत भांडणें असलीं पाहिजेत असें मात्र मुळीच नाही. तुमचा मार्ग तुमच्यापक्षीं चांगला असेल, परंतु माझ्यापक्षीं नाही. माझा मार्ग माझ्यापक्षीं ठीक आहे, परंतु तुमच्यापक्षीं नाही. यालाच म्हणतात 'इष्ट'. प्रत्येकाचें 'इष्ट' वेगवेगळें असतें. याचा अर्थ असा की प्रत्येकाचा मार्ग निरनिराळा असतो. हें लक्षांत असूं द्या कीं जगांतील कोणत्याहि धर्माशीं आमचें भांडण नाही, कोणत्याहि धर्माला आमचा विरोध नाही. आपल्या प्रत्येकाची इष्टदेवता

वेगवेगळी असते. परंतु लोक जेव्हा येऊन आम्हांला म्हणूं लागतात की 'हाच एकमेव मार्ग आहे,' आणि जेव्हा ते सांप्रदायिक अभिनिवेश नसलेल्या आम्हां भारतीयांवर जबरदस्तीने तें मत लादूं पाहतात तेव्हा मात्र त्यांचा तो उपद्‌व्याप पाहून आम्हांला हसूं आल्याखेरीज राहत नाही. ईश्वरलाभाचा आपल्याहून वेगळा मार्ग चोखाळणाऱ्या बांधवांचा जे नाश करूं इच्छितात त्यांच्या तोंडीं प्रेमाची भाषा मुळीच शोभत नाही. त्यांनी प्रेमासंबंधी कांही न बोलणेंच चांगलें. त्यांच्या प्रेमाला कांहीच मूल्य नाही. दुसरा कुणी आपल्याहून वेगळ्या मार्गाने जात आहे हें ज्याला सहन होत नाहीं त्याने प्रेमाच्या गोष्टी कशाला बोलाव्यात ! ह्याला जर प्रेम म्हटलें तर मग द्वेष कशाला म्हणावें ? कुणी येशूंची, बुद्धदेवांची वा महंमदांची––जगांतील कोणत्याहि प्रेषिताची उपासना करेनात, कोणत्याहि धर्माच्या अनुयायांशीं आमचें भांडण नाही. हिंदु त्यांना म्हणतो, "ये, बंधो, तुला जें साहाय्य आवश्यक आहे तें मी करतों, परंतु मी माझ्या मार्गाने जाईन, त्यांत तूं कांही अडथळा आणूं नकोस. मी माझ्या 'इष्टा'ची उपासना करीन. तुझा मार्ग खूप चांगला आहे यांत शंकाच नाही, परंतु माझ्यापक्षीं तो भयंकर अनिष्टकारक ठरणें शक्य आहे. खाण्याची कोणती जिन्नस मला हितावह आहे हें माझ्या स्वतःच्या अनुभवान्तीं माझें मला नीट समजूं शकतें, खंडीभर डॉक्टर मला तें सांगूं शकणार नाहीत. तद्वतच, कोणता मार्ग माझ्यापक्षीं चांगला हें स्वतःच्या अनुभवाने माझें मलाच छान समजूं शकतें." ह्यालाच म्हणतात 'इष्टनिष्ठा'. ह्याच कारणास्तव आम्ही म्हणत असतों की जर एखाद्या मंदिरांत जाऊन किंवा एखाद्या प्रतिमेच्या वा प्रतीकाच्या मदतीने तुम्ही स्वतःच्या अंतरंगीं वसणाऱ्या भगवंताची उपलब्धि करून घेऊं शकत असाल तर मग एकच का, चांगल्या शे दोनशे मूर्ति तयार करवून घ्या कसे ! जर एखाद्या विशिष्ट अनुष्ठानाने तुमच्या ईश्वरप्राप्तीस साहाय्य होत असेल तर तावडतोब तें अनुष्ठान करा. जी म्हणून क्रिया अथवा अनुष्ठान तुम्हांला भगवंताच्या निकट घेऊन जाईल त्याचा त्याचा आसरा घ्या; ज्या कोण्या मंदिरांत जाण्याने तुमच्या ईश्वरलाभास मदत होईल त्याच मंदिरांत जाऊन उपासना करा. परंतु मार्ग वेगळे आहेत म्हणून रणें माजवूं नका. ज्या क्षणीं तुम्ही असल्या कलागतीस सुरुवात कराल त्याच क्षणीं ईश्वराच्या मार्गा-

पासून ढळलांत असें समजा. समजा कीं मग तुमची प्रगति खुंटली आणि अधोगति सुरू झाली--हळूहळू तुम्ही पशूच्या पायरीस पोहोचत आहांत.

आमचा धर्म कुणालाहि वगळूं इच्छीत नाही, तो सर्वांनाच हृदयाशीं लावूं इच्छितो. आमचा जातिभेद आणि आमच्या इतरहि कित्येक सामाजिक संस्था वरवर पाहतां आमच्या धर्माशीं निगडित वाटत असल्या तरी वस्तुस्थिति मात्र तशी नाही. अवघ्या हिंदुजातीच्या संरक्षणाच्या दृष्टीने ह्या साऱ्या सामाजिक संस्थांचें प्रयोजन होतें. ज्या वेळीं ही आत्मसंरक्षणाची गरज उरणार नाही त्या वेळीं त्या सगळ्यांचा आपोआपच लोप होऊन जाईल. जसजसें माझें वय वाढत आहे तसतशा ह्या प्राचीन सामाजिक संस्था आणि प्रथा मला अधिकाधिक आवडूं लागल्या आहेत. अशी एक वेळ होती की जेव्हा मी ह्यांतील बहुतेकच निरुपयोगी आणि व्यर्थ समजत असे. परंतु जसजसें माझें वय वाढत आहे तसतसा ह्यांतील कशाच्याहि विरुद्ध कांही बोलण्यास मला संकोच वाटत आहे. कारण शेकडो शतकांच्या अनुभवाने त्या संस्था आणि प्रथा घडविल्या गेल्या आहेत. कालचें पोर--काल जन्मलें नि कदाचित् उद्या मरणार आहे--तें जर येऊन मला माझ्या दिवसानुदिवसांच्या विचारान्तीं बनविलेल्या योजना टाकून देण्यास सांगेल आणि मीहि जर त्या पोराचें ऐकून त्याच्या म्हणण्याप्रमाणे माझ्या कार्यपद्धतींत बदल करून टाकीन तर मीच गाढव ठरेन, आणखी कुणी नाही. भारताबाहेरील निरनिराळ्या देशांकडून आम्हांला समाजसुधारणेसंबंधी जो सारा उपदेश लाभत आहे त्याचीहि तऱ्हा पुष्कळांशीं अशीच आहे. त्या दीडशहाण्यांना सांगा की, जेव्हा तुम्ही एक स्थायी समाज घडवूं शकाल तेव्हाच आम्ही तुमचें ऐकूं. तुम्ही दोन दिवस एक कल्पना, एक आदर्श धरून ठेवूं शकत नाही, भांडभांडून तो सोडून देतां; क्षुद्र पतंगासारखें तुमचें क्षणस्थायी जीवन! बुडबुड्यांसारखी तुमची उत्पत्ति आणि बुडबुड्यांसारखा तुमचा लय! आधी आमच्यासारखा एक स्थायी समाज निर्माण करा--प्रथम अशा कांही सामाजिक संस्था-प्रथा आणि नियम तयार करा की ज्यांचा जोम शतकानुशतकें टिकूं शकेल--मगच या बाबतींत आम्ही तुमच्याशीं बोलूं. तोंपर्यंत आम्ही तुम्हांला अवखळ पोरेंच लेखणार.

आपल्या धर्मासंबंधी मला जें काय सांगावयाचें तें सांगून झालें

आहे. आता मी, ह्या युगांत, आजच्या काळांत जिची अत्यंत आवश्यकता आहे अशा एका गोष्टीविषयी तुम्हांला थोडें सांगूं इच्छितों. महाभारत-कार वेदव्यासांचा जयजयकार असो !--ते सांगून गेले आहेत की, 'कलियुगांत दानच एकमेव धर्म होय.' इतर युगांत जी सारी उग्र तपश्चर्या आणि योग वगैरे प्रचलित होते ते आज आता कामीं पडावयाचे नाहीत. ह्या युगांत विशेष आवश्यक आहे--दान, दुसऱ्याला मदत करणें. दान म्हणजे काय ? सगळ्या दानांमधे श्रेष्ठ आहे धर्मदान, त्यानंतर विद्यादान, त्यानंतर प्राणदान. अन्नवस्त्राचें दान हें सगळ्यांत निकृष्ट दान होय. जो धर्मज्ञान प्रदान करीत असतो तो आत्म्याची जन्म-मृत्यूंच्या अनंत प्रवाहांतून सुटका करीत असतो. जो विद्यादान देतो तोहि अप्रत्यक्षपणें आध्यात्मिक ज्ञानप्राप्तीस मदत करीत असतो. इतर सगळीं दानें, फार काय पण प्राणदानदेखील ह्यांच्या तुलनेने कःपदार्थच होत. म्हणून तुम्ही हें एवढें नीट जाणून घ्यावयास हवें की ह्या आध्यात्मिक ज्ञानाच्या दानापेक्षा इतर सर्व कर्में निकृष्ट होत, कमी प्रतीचीं होत. आध्यात्मिक ज्ञानाचा विस्तार करणेंच मनुष्यजातीला सर्वश्रेष्ठ साहाय्य करणें होय. आमचीं शास्त्रें आध्यात्मिक ज्ञानाचे अखंड, चिरंतन झरेच होत. आणि ह्या भारताखेरीज--ह्या त्यागाच्या भूमीखेरीज पृथ्वीच्या पाठीवर आणखी कुठे बरें इथल्यासारखीं धर्माच्या प्रत्यक्ष अनुभूतीचीं जिवंत उदाहरणें सापडूं शकतील ? जगाचा मला थोडा अनुभव आहे. मी अनुभवाने सांगतों त्यावर विश्वास ठेवा--इतर देशांत खूप लंब्या-चवड्या बाता ऐकायला मिळतात खऱ्या, परंतु इथेच, केवळ इथेच, फक्त या आपल्या त्यागभूमि भारतांतच अशा व्यक्ति आढळतात की ज्यांच्या जीवनांत धर्म प्रत्यक्ष उतरला आहे--साकारला आहे--मूर्तस्वरूपास आला आहे. धर्माविषयी नुसत्या लांबलचक बाता मारूनच धर्म आचरणें होत नसतें; पोपट देखील लंब्या लंब्या गोष्टी बोलतो, आजकाल यंत्रें-देखील बोलतात; परंतु असें 'जीवन' दाखवा बघूं की ज्यांत त्याग, आध्यात्मिकता, तितिक्षा आणि अनंत प्रेम मूर्त झालें आहे. हे सारे गुण असतील तरच तुम्ही धार्मिक व्यक्ति झालांत. आमच्या शास्त्रांमधे हे असले सुंदर सुंदर विचार आहेत आणि आमच्या देशांत हीं असलीं थोर, महन्मंगल जीवनें प्रत्यक्ष उदाहरणें म्हणून आहेत--असें असूनहि आमच्या

योगीश्रेष्ठांच्या हृदय-मस्तिष्कांतून निघालेलीं विचाररत्नें आमजनतेंत विखुरलीं जाऊन तीं गरीब-श्रीमंत, उच्च-नीच सर्वांचींच मालमत्ता झालीं नाहीत तर फार फार खेदाची गोष्ट म्हणावी लागेल. आणि ह्या साऱ्या तत्त्वांचा फैलाव केवळ भारतांतच करावयाचा आहे असें नाही, साऱ्या जगांत तीं पसरून द्यावयाला हवींत. हें आमचें एक सर्वश्रेष्ठ कर्तव्य आहे. आणि जितकें तुम्ही इतरांना साहाय्य करायला पुढे याल तितकें तुमचें स्वत:चें कल्याण साधत असल्याचें तुम्हांला दिसून येईल. जर खरोखरच तुमचें स्वत:च्या धर्मावर प्रेम असेल, जर खरोखरच तुमचें स्वत:च्या देशावर प्रेम असेल तर, सर्वसाधारण लोकांच्या पक्षीं दुर्बोध असलेल्या आपल्या शास्त्रांतील हीं रत्नें त्यांच्या खऱ्या वारसदारांना प्रदान करण्याचें महाव्रत अंगीकारून तें तुम्ही अगदी प्राण पणास लावून पार पाडावयास झटलें पाहिजे.

आणि सगळ्यापेक्षा आणखी एका विशेष महत्त्वाच्या व अत्यावश्यक गोष्टीकडे आपण लक्ष द्यावयास हवें. हाय, हाय ! शतकानुशतकें मत्सराचें भयंकर विष आपल्यांत भिनत गेलें आहे--आपण सर्वदा एकमेकांचा मत्सर करीत असतों ! अमुक माझ्यापेक्षा मोठा कां झाला, मी कां बरें त्याच्यापेक्षा मोठा झालों नाहीं--अमुक अमळ पुढे कां गेला, मी कां नाहीं-- अहर्निश आमचें हेंच चिंतन ! फार काय पण देवाची पूजा करतांनादेखील आपल्याला आपणच पुढे असायला पाहिजे--धर्मकृत्यांतहि आपल्याला मोठेंपण पाहिजे असतें--इतके आपण ईर्षेचे, मत्सराचे गुलाम बनलों आहोंत ! हें टाकून द्यायला हवें. जर भारतांत कोणतें बीभत्स, अघोर पाप पिंगा घालीत असेल तर तें म्हणजे हा मत्सरीपणा--हेवा. जो तो हुकूम फर्मावूं इच्छितो, हुकूम पाळायला कुणीच राजी नाही ! आधी आज्ञा पाळायला शिका, आज्ञा देण्याची शक्ति मग आपोआपच उत्पन्न होईल. नेहमी आधी चाकर होण्याला शिका, तरच तुम्ही मालक होण्यास लायक होऊं शकाल. प्राचीनकाळच्या त्या अद्भुत ब्रह्मचर्य-आश्रमाच्या लोपानेच हा अनर्थ ओढवला आहे. हेवावृत्ति टाका, मत्सरीपणा सोडून द्या, तरच अजून जीं सारीं मोठमोठालीं कामें व्हावयाचीं आहेत तीं तुम्ही करूं शकाल. आमच्या पूर्वजांनी अद्भुत अद्भुत कामें केलीं आहेत--आम्ही भक्तीने आणि अभिमानाने त्या कामांविषयी

बोलत असतों. परंतु आता आम्हीं कार्य करण्याची वेळ आली आहे--आतां आपण असलीं मोठमोठीं कार्यें करूं की जेणेंकरून त्याबद्दल आपल्या वंशजांना आपल्याविषयी गौरव वाटेल आणि ते आपल्याला धन्यवाद देतील. आमचे पूर्वज कितीहि थोर व महिमाशाली असेनात का, भगवंताच्या आशीर्वादाने आपण प्रत्येकजणच असलीं कार्यें करूं की ज्यांच्यापुढे आपल्या पूर्वजांचा गौरवहि फिकाच ठरेल.

---

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ३८६२५ वि:
क्रमांक ........ नों. दि.

# पांबन येथील मानपत्रास उत्तर

सिलोनमधून निघून स्वामी विवेकानंदांनी भारतांतील पांबन येथे प्रथम पदार्पण केलें. तेथे रामनदच्या राजेसाहेबांनी स्वामीजींचें हार्दिक स्वागत केलें. स्वामी विवेकानंद उतरले त्या जहाजाच्या धक्क्याजवळच एक अतिशय सुंदर, सुशोभित मंडप उभारून त्यांच्या सार्वजनिक स्वागताची तयारी करण्यांत आली होती. स्वागतप्रसंगीं पांबनच्या रहिवाशांच्या वतीने स्वामीजींना पुढील मानपत्र अर्पिण्यांत आलें होतें :—

महाराज,

आमच्या या स्वागताचा आपण सानंद स्वीकार करावा.

आपलें स्वागत करतांना आम्हांला अतिशय हर्ष होत आहे. आमचीं हृदयें पराकाष्ठेच्या कृतज्ञतेने आणि असीम आदराने भारावून गेलीं आहेत. आपल्याला ठिकठिकाणचीं इतकीं निमंत्रणें असून देखील कृपा करून इतक्या तत्परतेने आपण आमच्या निमंत्रणास मान दिलांत आणि वेळांत वेळ काढून थोड्या वेळाकरता का होईना पण आमच्या या स्थानीं शुभ पदार्पण केलेंत याबद्दल आम्ही आपले किती कृतज्ञ आहोंत म्हणून सांगावें ? आपल्या उदात्त, अतुलनीय गुणांनी आम्ही मोहून गेलों आहोंत; जें महान् व्रत आपण अंगीकारलें आहे आणि ज्या क्षमतेने, उत्साहाने व कळकळीने आपण तें पार पाडीत आहांत तें बघून आम्हीं आपल्याविषयीच्या आदराने भारावून गेलों आहोंत.

हें बघून आम्हांला खरोखर अतिशय आनंद होत आहे की, पश्चिमेकडील थोर थोर देशांतील सुसंस्कृत मनांमधे हिंदु तत्त्वज्ञानाचीं बीजें पेरण्याच्या आपल्या प्रयत्नांना स्पृहणीय यश लाभलें आहे. त्या बीजांना उत्कृष्ट फळें विपुल प्रमाणांत येत असल्याचा उज्ज्वल आणि उत्साहदायक देखावा आमच्या दृष्टीला एव्हानाच सर्वत्र दिसूं लागला आहे. आता आमची आपल्याला फक्त एवढीच विनम्र प्रार्थना आहे की पाश्चात्त्यदेशांत केला त्याहिपेक्षा काकणभर जास्तच प्रयत्न आपण कृपा करून आता भारतांत करावा आणि आमच्या ह्या मातृभूमींतील आपल्या बांधवांना घोर निद्रेंतून जागें करावें व ज्या सत्याचा त्यांना दीर्घकाल विसर पडला आहे त्याचें त्यांना नीट स्मरण करून द्यावें.

महाराज, आपण आमचे श्रेष्ठ धार्मिक नेते आहांत, आमचे थोर धर्माचार्य आहांत. आपल्याविषयी आम्हां लोकांना इतकें प्रेम, इतका आदर आणि इतकें कांही कौतुक वाटत आहे की आमच्या ह्या भावना कशा व्यक्त कराव्यात हें आम्हांला कळेनासें झालें आहे. म्हणून तसला प्रयत्नच करण्याचें सोडून देऊन आम्ही सर्व मिळून त्या परमकरुणामय विधात्याजवळ अगदी मनापासून अशी प्रार्थना करतों की तो आपल्याला परहितार्थ सुदीर्घ आयुष्य देवो आणि ज्या विश्वबंधुत्वाच्या भावनेचा दीर्घकालापासून लोप झाला आहे ती फिरून सर्वांच्या हृदयांत जागविण्याच्या आपल्या प्रयत्नांत तो आपला सर्वथा पाठपुरावा करो.

यानंतर रामनदच्या राजेसाहेबांनी स्वतःच्या वतीने थोडक्यांत परंतु अत्यंत भावनोत्कट शब्दांत स्वामीजींचें स्वागत केलें. त्या सर्वाला स्वामी विवेकानंदांनी पुढीलप्रमाणे उत्तर दिलें—

## पांबन येथील अभिनंदनास उत्तर

ह्या पुण्यभूमींत—आमच्या ह्या मातृभूमींतच धर्माची व तत्त्वज्ञानाची उत्पत्ति आणि परिपोष झाला आहे. येथेच थोर थोर धर्मवीरांचा जन्म झाला आहे. येथे, आणि केवळ येथेच त्यागधर्माचा प्रचार झाला आहे; येथे, केवळ येथेच अति प्राचीन काळापासून अगदी वर्तमान कालापर्यंत माणसांसमोर सर्वोच्च आदर्श ठेवले गेले आहेत.

मी पाश्चात्त्य देशांत नाना ठिकाणीं फिरलों आहें, अनेक देश पायाखाली घातले आहेत, अनेक जाती बघितल्या आहेत. मला असें वाटतें की, प्रत्येक जातीचा एकेक मुख्य आदर्श असतो. तो आदर्शच जणु त्या उभ्या जातीच्या जीवनाचा मेरुदंड—कणा—असतो. राजनीति, लष्करी सत्ता, वाणिज्य वा यंत्रविज्ञान भारताचा कणा नव्हे ; धर्म, केवळ धर्मच भारताचा खराखरा कणा होय. भारतांत सदैवच धर्माचें प्राधान्य असत आलें आहे.

शारीरिक शक्तीच्या जोरावर अनेक अद्भुत कार्यें होऊं शकतात हें खरें आहे. बुद्धीच्या बळाने विज्ञानाला राबवून यंत्रें निर्माण करून त्यांच्या द्वारा अनेक अद्भुत कामें करून दाखवितां येतात हेंहि खरें आहे. परंतु आध्यात्मिक शक्तीचा जो प्रभाव असतो त्याच्या तुलनेने ह्या साऱ्यांचे प्रभाव म्हणजे कांहीच नव्हत.

भारताचा इतिहास वाचल्यास कळून येतें की भारत नेहमीच कार्यकुशल होता. आजकाल आम्हांला शिकविण्यांत येतें की हिंदुलोक वीर्यहीन, नेभळट आणि निष्क्रिय आहेत. जे लोक आम्हांला हें शिकवितात त्यांना ह्या बाबतींत अमळ अधिक ज्ञान असतें तर बरें झालें असतें. ह्या लोकांच्या या असल्या शिकवणुकीचा असा परिणाम झाला आहे की, इतर देशांत हिंदूंना वीर्यहीन, नेभळट आणि निष्क्रिय लेखण्याचा पायंडाच पडून गेला आहे--सर्वत्र तो आपला एक लोकप्रवादच होऊन बसला आहे. भारत कधीहि निष्क्रिय होता हें मानायला मी मुळीच तयार नाहीं. आमची ही पवित्र मातृभूमि जितकी कर्मपरायण आहे तितका आणखी दुसरा कोणताच देश नसेल. ह्या विधानाचा धडधडीत पुरावा हाच की ही अत्यंत प्राचीन, अति थोर जात अजूनहि जिवंत आहे. आणि आपल्या महिमाशाली जीवनाच्या प्रत्येक संधिकाळांत ती जणु अविनाशी, अक्षय नवयौवन प्राप्त करीत असते. भारतांत कर्मपरायणता--कार्यशीलता यथेच्छ आहे. तथापि ती परक्यांच्या नजरेस न येण्याचें एक कारण आहे. मनुष्यस्वभावच असा आहे की जो जें कार्य करतो किंवा ज्याला जें कार्य चांगलें वाटतें तेंच त्याच्या मतें अवघ्या जगांतील एकमेव कार्य होय ! तसा त्याचा अगदी ठाम सिद्धान्त असतो ! चांभाराला फक्त जोडे शिवणेंच माहीत, त्याखेरीज जगांत आणखी कांही काम असूं शकतें हें तो मानायला राजी नसतो ! गवंड्याला विटा रचणेंच माहीत, जगांत म्हणजे त्याखेरीज आणखीहि कांही करण्याजोगें किंवा जाणण्याजोगें आहे हें त्या बिचाऱ्याच्या गांवीं नसतें ! हें समजून घ्यायला त्यांना फुरसत कुठे असते ! आणि ह्याचें आणखीहि एक कारण आहे. प्रकाशाचें स्पंदन जेंव्हा अति जलद होतें तेंव्हा तो प्रकाश आपल्याला दिसूं शकत नाही ; कारण आपल्या दृष्टिशक्तीची एक मर्यादा आहे, तिच्या पलीकडे आपण पाहूं शकत नाही. परंतु योगी मात्र आपल्या आध्यात्मिक अंतर्दृष्टींच्या बलानें साधारण अज्ञलोकांच्या जडदृष्टीपलीकडे जाऊन आंतील गोष्ट पाहूं शकतात.

सांप्रत समस्त जगत् आध्यात्मिक खाद्यासाठी भारतभूमीकडे मोठ्या आशेनें बघत आहे. आणि भारताला जगांतील सर्व जातींना तें खाद्य पुरवावें लागणार आहे. येथे, या भारतांतच मानवजातीचे सर्वश्रेष्ठ

आदर्श विद्यमान आहेत. पाश्चात्त्यदेशांतील विद्वान् आजकाल, आमच्या संस्कृत साहित्यांत आणि तत्त्वज्ञानांत गवसणारे, भारतीयांचें सनातन वैशिष्टय दर्शविणारे ते आदर्श समजून घेण्याचा प्रयत्न करीत आहेत.

इतिहासाच्या प्रारंभापासून बघितल्यास आढळून येतें की, कुणीहि धर्मप्रचारक भारताच्या बाहेर हिंदुमताचा प्रचार करावयास गेलेला नाही. परंतु आता मात्र आमच्यांत एक विलक्षण बदल घडून येत आहे. भगवान श्रीकृष्णांनी म्हटलें आहे, "जेव्हा म्हणून धर्माची ग्लानि आणि अधर्माचें अभ्युत्थान होत असतें, तेव्हा तेव्हा मी जगताच्या कल्याणासाठी अवतीर्ण होत असतों." निरनिराळया धर्मांच्या इतिहासांच्या संशोधनाने हेंच सिद्ध झालें आहे की, ज्या ज्या जातींमधे श्रेष्ठ कोटीचें नीतिशास्त्र विद्यमान आहे त्या त्या जातीने त्याचा कांही अंश आमच्या जवळून घेतला आहे, आणि ज्या साऱ्या धर्मांत आत्म्याच्या अमरत्वाचें ज्ञान प्रचलित आहे त्या साऱ्यांनीहि प्रत्यक्षपणें किंवा अप्रत्यक्षपणें तें आमच्याच जवळून ग्रहण केलें आहे.

ह्या एकोणिसाव्या शतकाच्या उत्तर कालांत दुबळयांवर बलदंडांचे जसे अत्याचार होत आहेत, जितकी चोरी, जुलूम वगैरे होत आहेत तितके जगाच्या इतिहासांत आणखी कधीहि झाले नसतील. सर्वांनाच माहीत आहे--सर्वांनाच माहीत असावयास हवें की वासनांना जिंकल्याखेरीज मुक्ति नाही. जो प्रकृतीचा गुलाम आहे तो कधीहि मुक्त होऊं शकणार नाही. जगामधील समस्त जाती आता हें महासत्य समजून त्याची कदर करावयास शिकत आहेत. ज्या वेळीं शिष्य ह्या सत्याचें आकलन करण्यास समर्थ होतो त्या वेळींच त्याच्यावर गुरूची कृपा होते. भगवान अनंतकाळापासून सर्वच धर्मांच्या अनुयायांवर अपार दया करून त्यांना साहाय्य करीत आहेत. आमचा प्रभु सर्वच धर्मांचा ईश्वर आहे--हा उदार भाव फक्त भारतांतच विद्यमान आहे. जगांतील इतर धर्मांच्या शास्त्रांत असला उदार भाव दाखवून द्या बघूं!

विधीच्या संकेतानेच आपण हिंदु एका मोठया आणीबाणीच्या आणि जबाबदारीच्या अवस्थेत सापडलों आहोंत. समस्त पाश्चिमात्य जाती आमच्याकडे आध्यात्मिक साहाय्यासाठी येत आहेत. भारतमातेच्या सर्व पुत्रांचें आता कर्तव्य आहे--समस्त जगाला मानवजीवनाच्या

कोडयाचें सर्वोत्कृष्ट, समाधानकारक उत्तर देण्यासाठी स्वत:ला सर्वतोपरी पात्र करणें. सर्व जगाला धर्म शिकवणें हें त्यांचें नैतिक कर्तव्य आहे. एका गोष्टीचा आपण मोठ्या गौरवाने उल्लेख करूं शकतों. पहाडी किल्ल्यांत राहणाऱ्या, वाटसरूंचे सर्वस्व लुबाडणाऱ्या दरवडेखोर बॅरन-पासून (सरदारांपासून) आपल्या वंशाची उत्पत्ति आहे असें सिद्ध होऊं शकल्यास इतर देशांतील चांगल्या चांगल्या आणि मोठ्या मोठ्या लोकांनाहि मोठा हर्ष आणि भूषण वाटत असतें. उलट आम्हां हिंदूंना, पर्वतांच्या गुहांत वास करणाऱ्या, कंदमूलफलांवर जगणाऱ्या, ब्रह्मध्यान-परायण ऋषिमुनींचे वंशज म्हणवून घेण्यांत धन्यता वाटत असते, गौरव वाटत असतो. आम्ही सध्या अवनत आणि हीन झालों असूं, परंतु जर आम्ही आपल्या धर्मासाठी फिरून प्राण पणास लावूं तर आम्ही परत उच्च पदास पोहोचूं शकूं यांत शंकाच नाही.

आपण जें माझें हृदयापासून स्वागत केलें आहे त्याबद्दल मी आपले अगदी मन:पूर्वक आभार मानतों. रामनदच्या राजेसाहेबांनी माझ्यावर जो प्रेमाचा वर्षाव केला आहे त्याबद्दल मी त्यांचा किती कृतज्ञ आहें हें शब्दांनी वर्णून सांगणें अशक्य होय. जर माझ्याकडून कांही चांगलीं कामें झालीं असतील तर त्यांतील प्रत्येकासाठी भारत ह्या महामानवाचाच ऋणी आहे ; कारण मला शिकागो येथे पाठविण्याची कल्पना प्रथम यांच्याच मनांत उदय पावली, त्यांनीच ती माझ्या डोक्यांत शिरवून दिली आणि ती प्रत्यक्षांत आणण्यासाठी मला सतत प्रोत्साहन दिलें. आणि ते आता माझ्या पाठीशीं उभे राहून, स्वत:च्या जन्मसिद्ध उत्साही स्वभावानुसार माझ्याकडून आणखी अधिक कार्याची अपेक्षा करीत आहेत. जर त्यांच्यासारखे आणखीहि कांही राजे आपल्या ह्या प्रिय मातृभूमीच्या कल्याणासाठी कटिबद्ध होऊन तिच्या आध्यात्मिक उन्नतीसाठी प्रयत्न करतील, तर फार छान होईल.

# रामेश्वर मंदिरांतील भाषण

## खरी पूजा

रामनद येथील मुक्कामांत स्वामी विवेकानंद एक दिवस रामेश्वर-मंदिरांत देवदर्शनार्थ गेले होते. तेथे जमलेल्या लोकांना त्यांनी कांही सांगावें अशी आग्रहाची विनंती केली गेली. त्या प्रसंगीं स्वामीजींनी पुढीलप्रमाणे भाषण दिलें :—

धर्म हा अनुरागांत असतो, अनुष्ठानांत नव्हे. हृदयांतील पवित्र आणि निष्कपट प्रेमांतच धर्माचें अधिष्ठान असतें. जर देह आणि मन शुद्ध नसतील तर मंदिरांत जाऊन शिवपूजा करणें व्यर्थ होय. ज्याचीं देह-मनें पवित्र असतात, शिव त्यांचीच प्रार्थना ऐकतात. आणि जे अशुद्ध स्वभावाचे असूनहि दुसऱ्याला धर्म शिकवूं जातात त्यांना असद्गति लाभते. बाह्य पूजा ही मानस पूजेचें केवळ बहिरंग आहे--मानस पूजा आणि चित्तशुद्धि ह्याच महत्त्वाच्या गोष्टी होत. त्या नसल्यास बाह्य पूजा करून कांही लाभ नाही. या कलियुगांत लोक इतके अवनत होऊन गेले आहेत की त्यांना वाटतें की आपण एरवी हवें तसें वागूं, तीर्थस्थानीं जातांच आपलीं सगळीं पापें धुऊन निघतील. परंतु वस्तुतः कुणी जर अपवित्र भावाने एखाद्या तीर्थाला जाईल तर तिथे जमा झालेलें इतर सगळ्या लोकांचें पाप त्याच्या मानगुटीला येऊन बसतें--पापाचा आधीपेक्षा आणखी मोठा बोजा खांद्यावर घेऊन त्याला घरीं परतावें लागतें. तीर्थस्थानीं साधुसंत वास करतात, पवित्र भाव जागवितील अशा आणखीहि कितीतरी गोष्टी तिथे असतात. परंतु असें जर एखादें स्थान असेल की जिथे कित्येक साधुसत्पुरुष राहतात परंतु तिथे मंदिर मात्र एकहि नाही तर त्या स्थानाला तीर्थच म्हणावें लागेल. आणि एखाद्या ठिकाणीं शेकडो मंदिरें असतील, परंतु त्यांतून कित्येक वाईट, अपवित्र लोक राहत असतील तर त्या स्थानाचा तीर्थपणा नाहीसा झालेला आहे असेंच समजावें. परत, तीर्थस्थानीं वास करणें फार अवघड आहे. कारण, इतर ठिकाणीं केलेलें पाप तीर्थस्थानीं खंडतें, परंतु तीर्थस्थानीं केलेलें पाप मात्र कुठेहि आणि कशानेहि खंडत नाही. सगळ्याच्या सगळ्या

उपासनांचा सारांश आहे--शुद्धचित्ताचे बनणें आणि इतरांचें कल्याण करणें. गरीब, दुबळे, रोगी वगैरेंमधे ज्यांना शिव दिसतो तेच खरेखुरे शिवाचे उपासक होत--तेच खरोखर शिवाची उपासना करीत असतात. आणि जो माणूस केवळ प्रतिमेमधेच शिवाची उपासना करीत असतो त्याने धर्मजीवनाला नुकतीच सुरुवात केली आहे असें म्हणतां येईल. फक्त मंदिरांमधेच शिव आहे असें मानणाऱ्या व्यक्तीपेक्षा, जी व्यक्ति जात किंवा धर्म विचारांत न घेतां एकादेखील गरीब माणसाची शिव-बोधाने सेवा करते तिच्यावर शिव अधिक प्रसन्न होतात.

कुण्या एका श्रीमंताचा एक बगीचा होता. त्या बगिच्यांत दोन माळी काम करीत. त्यांतील एकजण पराकाष्ठेचा आळशी होता, तो मुळींच काम करीत नसे. परंतु मालक बगिच्यांत आला रे आला की तो हात जोडून 'धनी, काय तुमचें रूप, किती तुमचे गुण' असें म्हणत त्याच्या समोर अक्षरशः नाचूं लागे. त्या दुसऱ्या माळ्याला जास्त बोलणें माहींत नव्हतें. तो खूप खूप खपून आपल्या मालकाच्या त्या बगिच्यांत नाना प्रकारचीं फळें आणि तऱ्हेतऱ्हेच्या भाज्या वगैरेंची निपज करी, आणि तो माल डोक्यावरून वाहून बऱ्याच दूर असलेल्या आपल्या मालकाच्या घरीं पोहोचता करी. आता सांगा बघूं, ह्या दोघां माळ्यांपैकी मालकाचें जास्त प्रेम कुणावर राहील? याचप्रमाणे शिव आपला सगळ्यांचा मालक आहे, हें जग त्याचा बगीचा आहे, आणि ह्या बगिच्यांत दोन प्रकारचे माळी आहेत. एका प्रकारचे माळी आळशी आणि कपटी आहेत, ते कांहीहि न करतां केवळ शिवाच्या रूपाचें स्तोत्र गातात--शिवाचें नाक किती सुंदर आहे, डोळे किती सुरेख आहेत ह्याचें वर्णन करीत असतात. आणखी एका प्रकारचे लोक आहेत, ते शिवाच्या दीन, दरिद्री, दुबळ्या मुलांच्या--शिवाने उत्पन्न केलेल्या सर्व प्राण्यांच्या --कल्याणाचा प्रयत्न करीत असतात. ह्या दोन प्रकारच्या स्वभावांच्या लोकांपैकी शिवाला जास्त कोण आवडतील? कोणावर शिवाचें अधिक प्रेम राहील? अलबत, जे शिवाच्या संतानांची सेवा करतात त्यांच्या-वरच. जे पित्याची सेवा करूं इच्छितात त्यांनी आधी त्याच्या लेकरांची सेवा करायला हवी. जे शिवाची सेवा करूं इच्छितात त्यांनी आधी शिवाच्या लेकरांची सेवा करायला हवी--आधी जगांतील जीवांची

सेवा करायला हवी. शास्त्रांत म्हटलें आहे की जे भगवंताच्या दासांची सेवा करतात तेच भगवंताचे सर्वश्रेष्ठ दास होत. म्हणून हें आपण सर्वदा लक्षांत ठेवावयास हवें.

मी तुम्हांला फिरून सांगतों की तुम्हीं शुद्धचित्ताचे व्हावयास हवें आणि जो कुणी तुमच्याकडे येईल त्याची यथाशक्ति सेवा करावयास हवी. अशा भावाने दुसऱ्यांची सेवा करणें हें शुभ कर्म होय. अशा सत्कर्मांच्या शक्तीने चित्त शुद्ध होतें आणि सगळ्यांच्या अंतर्यामीं जो शिव वसत आहे तो त्या शुद्ध चित्तांत प्रकट होतो. तो शिव सगळ्यांच्याच हृदयांत विराजमान आहे जर आरशावर धूळ, माती बसलेली असेल तर त्यांत आपल्याला आपलें रूप दिसत नाही. आमच्या हृदयरूपी आरशावर देखील असला अज्ञानाचा आणि पापाचा मळ साचलेला आहे. सगळ्यापेक्षा मोठें पाप म्हणजे स्वार्थीपणा हें होय. स्वार्थीपणा म्हणजे आधी स्वत:चीच फिकीर करणें––आधी आपलाच विचार करणें मी आधी खाईन, मी सगळ्यांपेक्षा जास्त श्रीमंत होईन, मीच सगळ्या धनाचा मालक होईन असें ज्याला वाटतें; मी इतरांच्या आधी स्वर्गाला जाईन, मी इतरांच्या आधी मुक्ति मिळवीन असें ज्याला वाटतें तो स्वार्थी होय. नि:स्वार्थ माणूस म्हणत असतो की मी सर्वांच्या आधी जाऊं इच्छीत नाहीं, मी सगळ्यांच्या शेवटीं जाईन––मी स्वर्गांत जाऊं इच्छीत नाहीं ––जर माझ्या बांधवांना हात देण्यासाठी नरकांत जावें लागेल तर त्यालाहि माझी तयारी आहे. कुणी धार्मिक आहे की अधार्मिक आहे याची पारख करावयाची असल्यास बघावें की ती व्यक्ति कितपत नि:स्वार्थ आहे. जो अधिक नि:स्वार्थ तोच अधिक धार्मिक होय, तोच शिवाच्या अधिक जवळ असतो. तो विद्वान् असो की अडाणी असो तो शिवासंबंधी कांही जाणत असो की नसो, तोच इतरांपेक्षा शिवाच्या जास्त जवळ असतो. आणि जर कुणी स्वार्थी असेल तर तो जरी जगांतील सारीं मंदिरें पुजून आला, सगळ्या तीर्थांमधे बुचकळून आला रोज साऱ्या अंगभर वाघासारखे भस्माचे पट्टे ओढीत असला अन् चित्त्यासारखे टिळे-ठिपके काढीत असला तरी तो शिवापासून खूप खूप दूर आहे असें समजावें.

---

# रामनद येथील मानपत्रास उत्तर

रामनद येथे स्वामी विवेकानंदांना तेथील राजेसाहेबांनी पुढील मानपत्र सर्मपित केलें होतें :—

## रामनद येथील मानपत्र

श्रीपरमहंस, यतिराज, दिग्विजयकोलाहल, सर्वमतसंप्रतिपन्न, परम-योगेश्वर, श्रीमत् भगवान श्रीरामकृष्णकरकमलसंजात, राजाधिराज-सेवित श्रीविवेकानंदस्वामिन्,

परमपावन महाराज,

सेतुबंध रामेश्वर अथवा रामनाथपुरम् अथवा रामनद नामक या प्राचीन, इतिहासप्रसिद्ध संस्थानाचे आम्ही रहिवासी आमच्या ह्या माय-भूमींत आपलें सादर स्वागत करीत आहोंत. आपण विदेशांत दिग्विजय करून स्वदेशीं परतलां आहांत. अशा वेळीं, वीराग्रणी प्रभु रामचंद्रांच्या पदस्पर्शाने पुनीत झालेल्या ह्या भूमींत सर्वांच्या आधी आपलें अभि-नंदन करून आमच्या हृदयांतील श्रद्धा-भक्ति आपल्या चरणीं समर्पि-ण्याची संधि आम्हांला लाभली आहे हें खरोखर आमचें परम सौभाग्य होय.

आमच्या महान् सनातन धर्माचें खरें महत्त्व पाश्चात्त्य देशांतील विचारवंतांच्या अंत:करणांवर दृढपणें ठसविण्यासाठी आपण जो प्रयत्न केला तो अत्यंत प्रशंसास्पद असून त्याला अपूर्व फळ आलें आहे हें बघून आम्हांला मनापासून आनंद आणि गौरव वाटत आहे. आपण आपल्या अपूर्व वक्तृत्वाने आणि स्पष्ट, असंदिग्ध भाषेंत युरोपांतील व अमेरिकें-तील सुशिक्षित लोकांसमोर घोषणा करून त्यांच्या अंत:करणांत असा दृढ विश्वास निर्माण केला आहे की, हिंदुधर्मच आदर्श सार्वजनीन धर्म आहे आणि तो सर्व जातींतील आणि सर्व पंथांतील स्त्री-पुरुषांच्या स्वभा-वांना उपयोगी पडेल असा आहे. आपण परम नि:स्वार्थतेने प्रेरित होऊन महान् उद्देश हृदयांत बाळगून आणि प्रचंड स्वार्थत्याग करून सात समुद्र

ओलांडून अपार ऐश्वर्यशाली युरोपांत व अमेरिकेंत सत्याचा आणि शांतीचा संदेश पोहचविला आणि भारताची आध्यात्मिक विजयपताका फडकविली. आपण आपल्या शिकवणुकीने आणि जीवनाने विश्वबंधुत्वाची आवश्यकता आणि तें आचरणांत आणण्याची शक्यता सुंदर रीतीने दाखवून दिली आहे. आणि ह्या सगळ्यापेक्षा म्हणजे, पाश्चात्त्यदेशांतील आपल्या प्रचारामुळे अप्रत्यक्षपणें भारताच्या स्वधर्माविषयी उदासीन अशा पुत्र-कन्यांच्या अंत:करणांत बऱ्याच प्रमाणांत त्यांच्या स्वत:च्या पूर्वजांच्या आध्यात्मिक महिम्याचीं जाणीव उत्पन्न झाली आहे आणि त्या परमप्रिय, अमूल्य धर्माचें अनुशीलन व अनुष्ठान करण्याची प्रामाणिक इच्छा त्यांच्याठायीं उद्‌भवली आहे.

याप्रमाणे प्राच्य आणि पाश्चात्त्य दोन्ही देशांमधे आध्यात्मिक पुनरुत्थानासाठी आपण नि:स्वार्थपणाने जो उद्यम केला आहे त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आमच्याजवळ शब्द नाहीत आमचे राजेसाहेब हे आपले एक परम अनुरक्त शिष्य आहेत आणि आपलाहि त्यांच्यावर सदैव अनुग्रह आहे ह्या गोष्टीचा उल्लेख न केल्यास हें मानपत्र अपुरेंच राहील. विदेशांतून भारतांत परत येतांना आपण अनुग्रहपूर्वक त्यांच्याच राज्यांत प्रथम पदार्पण केलेंत याबद्दल त्यांना जो सन्मान आणि गौरव वाटत आहे तो शब्दांनी प्रकट करणें शक्य नाही.

शेवटीं आम्ही त्या सर्वशक्तिमानापाशी प्रार्थना करतों की जें कल्याणकर कार्य आपण इतक्या सुंदर रीतीने सुरू केलें आहे तें तसेंच चालविण्यासाठी तो दयाघन आपल्याला दीर्घ आयुष्य, स्वास्थ्य आणि बल प्रदान करो.

आम्ही, आपले परम भक्त आणि आज्ञाधारक शिष्य श्रद्धेने आणि प्रेमाने हें मानपत्र आपल्याला समर्पीत आहोंत.

**रामनद, २५ जानेवारी १८९७**

स्वामी विवेकानंदांनी ह्या मानपत्राला पुढीलप्रमाणे उत्तर दिलें :—

## रामनदच्या मानपत्रास उत्तर —

लांबच लांब रात्र सरत आली आहे. महादु:ख संपत आल्यासारखें आहे. शव वाटत असलेला देह घोर निद्रेतून जागा होत आहे. इतिहास

तर दूरच राहो, पण दंतकथा देखील ज्या कालखंडाचा अंधार भेदूं शकत नाहीत त्या अतिप्राचीन भूतकालांतून निघालेली एक अपूर्व वाणी ऐकूं येत आहे. ज्ञान, भक्ति आणि कर्म यांचें अक्षय्य आगर अशा भारताच्या --आपल्या या मातृभूमीच्या कान्याकोपऱ्यांतून प्रतिध्वनित होऊन ती वाणी मृदु आणि तरीहि दृढ, अचूक शब्दांत कुण्या एका अपूर्व राज्याची वार्ता वाहून आणीत आहे. जसेजसे दिवस लोटत आहेत तशीतशी ती जणु अधिकाधिक स्पष्ट, अधिकाधिक घनगंभीर होत आहे. हिमालयांतून वाहत येणाऱ्या संजीवक वायूप्रमाणे ती मृतप्राय अस्थि-मज्जांमधे प्राणाचा संचार करीत आहे. निद्रिस्त देह जागा होत आहे. त्याची जडता हळूहळू नाहीशी होत आहे. जे आंधळे आहेत त्यांना दिसत नाही, जे विकृत मनाचे आहेत त्यांना कळत नाही की आमची ही मातृभूमि घोर निद्रा टाकून जागी होत आहे. आता यापुढे कुणीहि तिची गति रोधण्यास समर्थ होणार नाही, ती आता फिरून झोपावयाची नाही, कोणतीहि बाहेरील शक्ति अत:पर तिला दाबून ठेवूं शकणार नाही. कुंभकर्णाची दीर्घ निद्रा भंगत आहे.

राजेसाहेब आणि रामनदनिवासी सद्गृहस्थ हो, तुम्हां सर्वांनी माझें हें जें सदय आणि हृदयापासून अभिनंदन केलेंत त्याबद्दल मी तुमचे मनापासून आभार मानतों. आपण माझ्याविषयी जें हृदयापासून प्रेम प्रकट करीत आहांत तें मला अगदी प्राणोप्राण जाणवत आहे. कारण तोंडाच्या भाषेपेक्षा हृदयाची भाषा अधिक चांगली असते. आत्मा नि:शब्द परंतु अचूक भाषेंत दुसऱ्या आत्म्याशीं बोलत असतो --आणि म्हणूनच मला आपलें प्रेम प्राणोप्राण जाणवत आहे. रामनदचे राजेसाहेब, आपला धर्म आणि आपली मातृभूमि यांसाठी जर माझ्यासारख्या य:कश्चित् माणसाकडून कांही कार्य झालें असेल, स्वत:च्याच घरीं अज्ञात आणि गुप्त असलेल्या अमूल्य रत्नांच्या ठेव्याकडे आपल्या स्वदेशबांधवांचें चित्त आकृष्ट करण्यासाठी जर कांही कार्य केलें गेलें असेल, केवळ अज्ञानामुळे तहानेने तडफडून प्राण न सोडतां किंवा इतर कुठलेंतरी गढूळ पाणी न पितां स्वत:च्या घराजवळून झुळझुळत सतत वाहणाऱ्या झऱ्याचें निर्मळ पाणी पिण्यासाठी जर आपल्या देशबांधवांना हाकारून बोलावण्यांत आलें असेल, जर आपल्या देश-

बांधवांना अमळ कार्यप्रवण करण्यासाठी कांही धडपड करण्यांत आली असेल, धर्मच भारताचा प्राण असून तो धर्म लोपल्यास मग राजनैतिक उन्नति, समाजसुधारणा वा कुबेराचें ऐश्वर्य लाभूनहि भारत मेल्या-खेरीज राहणार नाही हें स्वदेशबांधवांना पटविण्यासाठी जर कांही प्रयत्न केला गेला असेल,--ह्या साऱ्यासाठी भारतांत आणि भारता-बाहेर जर माझ्याकडून कांही काम झालें असेल तर, हे रामनदचे राजे-साहेब, त्याबद्दल आपणच प्रशंसेचे वांटेकरी आहांत. कारण आपणच प्रथम ही कल्पना माझ्या डोक्यांत शिरवून दिली आणि आपणच मला कार्यासाठी पुन:पुन: प्रोत्साहन दिलें. आपण जणुकाय अंतर्दृष्टीने भविष्यकाळ जाणूं शकून मला सतत साहाय्य करीत आलां आहांत, मला प्रोत्साहन देण्याचा आपल्याला कधीहि कंटाळा आला नाही. आणि म्हणून माझ्या सफलतेबद्दल प्रथम आपण आनंद व्यक्त करावा आणि मी भारतास परततांना प्रथम आपल्या राज्यांत उतरावें हें योग्यच झालें. सद्गृहस्थहो, आपल्या राजेसाहेबांनी मघाच म्हटल्याप्रमाणे आप-ल्याला मोठमोठीं कामें करावयाचीं आहेत, अद्भुत शक्ति प्रकट करा-वयाची आहे, इतर जातींना कितीतरी गोष्टी शिकवावयाच्या आहेत. दर्शन, धर्म वा नीतिशास्त्र म्हणा की मधुरता, कोमलता वा मानव-जातीविषयी निष्कपट प्रेम वगैरे सद्गुण म्हणा, आमची ही मातृभूमिच त्या साऱ्यांचें जन्मस्थान होय. अजूनहि भारतांत ह्या साऱ्या गोष्टी विद्यमान आहेत, आणि जगाचा मला जो काय अनुभव आला आहे त्यावरून मीं हें अगदी न कचरतां, ठासून म्हणूं शकतों की अजूनहि भारत ह्या सर्व बाबतींत जगांतील कोणत्याहि जातीपेक्षा वरचढ आहे. ही एक लहानशी घटनाच लक्षांत घ्या ना. गेलीं चार-पांच वर्षे जगांत अनेक मोठमोठे राजनैतिक बदल घडून येत आहेत. पाश्चात्त्य देशांमधे प्रबल संप्रदाय उदयास येऊन ते तिकडील निरनिराळ्या देशांत प्रचलित असलेल्या नियम-पद्धति सपशेल उलटून टाकण्याच्या प्रयत्नांत थोडेफार यशस्वीहि झाले आहेत. ह्या साऱ्या घडामोडींसंबंधी तुम्हीं कांही ऐकलें आहे काय असें तुम्ही आपल्या ह्या देशांतील जनतेला विचारून बघा. त्यांनी कांहीहि ऐकलेलें नाही असें तुम्हांला आढळून येईल. परंतु तेंच, अमेरिकेंतील शिकागो येथे एक सर्वधर्मपरिषद भरली होती, भारतांतून

त्या परिषदेसाठी एक संन्यासी पाठविला जाऊन त्याचें तेथे सादर स्वागत झालें आणि तेव्हापासून तो पाश्चात्त्यदेशांत कार्य करीत आहे हें मात्र इथल्या अगदी एखाद्या भिकाऱ्यालासुद्धा माहीत आहे लोक म्हणत असतात की, आमच्या देशांतील साधारण जनता फार मठ्ठ असून येथील लोक जगाची कांही खबर जाणत नाहीत, जाणूंहि इच्छीत नाहीत. पूर्वी मलाहि थोडेंबहुत असेंच वाटत असे, परंतु आता मला कळून चुकलें आहे की, नीट अनुभव नसल्यामुळेच मला तसें वाटत होतें. न बघतां कल्पना करण्यापेक्षा, किंवा, एका दमांत पृथ्वीप्रदक्षिणा करून झटपट सगळे देश पाहून टाकणाऱ्यांनी खरडलेलीं चोपडीं वाचण्यापेक्षा, स्वतःच्या डोळ्यांनी बघितल्याने कितीतरी जास्त ज्ञान लाभत असतें. माझ्या स्वतःच्या अनुभवाने मी हें शिकलों आहें की, आमच्या देशांतील सर्वसाधारण लोक मठ्ठहि नाहीत अथवा ते जगाची खबर जाणण्यास कमी उत्सुक आहेत असेंहि नाही. जगांतील इतर कोणत्याहि ठिकाणच्या लोकांइतकेच तेहि जगाची खबर जाणून घेण्याविषयी उत्सुक असतात. तथापि प्रत्येक जातीचा एकेक जीवनोद्देश असतो. प्रत्येक जातच प्रकृतीच्या नियमानुसार कित्येक वैशिष्ट्यें घेऊन जन्माला येत असते. समस्त जाती मिळून जणुकाय एक महान्, सुरेल संगीत निर्माण करीत असतात, आणि प्रत्येक जात जणु त्यांत स्वतःचा असा एक वेगळा सूर मिसळीत असते. त्या सुरांतच तिची जीवनशक्ति असते. तोच त्या जातीच्या जीवनाचा कणा असतो, पाया असतो आमच्या ह्या पवित्र मातृभूमीच्या जीवनाचा पाया, कणा वा केंद्र एकमेव धर्मच होय. दुसरे लोक राजनीतीविषयी बोलोत, व्यापाराच्या जोरावर लाभणाऱ्या अपरंपार ऐश्वर्याविषयी बोलोत, व्यापाराची शक्ति व त्याचा विस्तार याविषयी बोलोत की बाह्य स्वातंत्र्याच्या अपूर्व सुखासंबंधी बोलोत. हिंदूंना हें सारें कळावयाचें नाही, कळून घ्यावयाची त्यांना इच्छाहि नाही. त्यांच्याशीं धर्म, ईश्वर, आत्मा, अनंत, मुक्ति ह्या साऱ्यासंबंधी बोलून बघा. मी तुम्हांला अगदी ठासून सांगतों की, इतर देशांतील अनेक नामधारी तत्त्वज्ञांपेक्षा आमच्या देशांतील अगदी यःकश्चित् नागऱ्या शेतकरी देखील ह्या साऱ्या तत्त्वांसंबंधी अधिक जाणकार असतो. सद्गृहस्थहो, मी आपल्याला सांगतों की अजूनहि जगाला शिकविण्यासारखें आमच्या जवळ कांहीतरी आहे. आणि

एवढ्याचसाठी शेकडो वर्षांच्या अत्याचारांतून आणि जवळजवळ हजार वर्षांच्या विदेशी राज्यकर्त्यांच्या जुलुमांतून निभावून ही आमची जात अजूनहि जिवंत आहे. ही जात अजूनहि जिवंत आहे, कारण अजूनहि ह्या जातीने ईश्वर आणि धर्म हीं महारत्नें टाकून दिलेलीं नाहीत.

आमच्या ह्या मातृभूमींत अजूनहि धर्माचा आणि आध्यात्मिकतेचा जो प्रवाह वाहत आहे त्याला आजहि पूर येऊन तो समस्त जगाला भरून टाकून, राजनैतिक महत्त्वाकांक्षा आणि रोज नव्या घाटाचा समाज बनविण्याचा उपद्व्याप यांनी अर्धमेल्या व हीन झालेल्या पाश्चात्त्य आणि इतरहि जातींना नवीन जीवन देऊं शकेल. तऱ्हतऱ्हेंच्या मतांच्या सुरेल वा बेसूर आवाजांनी भारताचें वातावरण दुमदुमतें आहे खरें, परंतु त्यांच्यामधे एक आवाज प्रामुख्याने निनादत असून तो इतर सर्व आवाजांवर मात करीत आहे तो आवाज म्हणजे त्यागाची गर्जना होय. त्यागाच्या भैरव रागासमोर इतर सर्व रागरागिण्या निष्प्रभ ठरत आहेत. त्याग करा--भारतांतील सर्व शास्त्रांचें हेंच सांगणें आहे, त्यागच त्यांचें मूलतत्त्व आहे. दुनिया केवळ दों दिवसांची भ्रान्ति आहे. जीवन क्षणभंगुर आहे. ह्यांच्या पलीकडे दूर, अतिदूर तें अनंत, अपार राज्य आहे--जा, तिथे निघून जा. तें राज्य थोर आणि साहसी प्रज्ञावंतांच्या हृदय-बुद्धीच्या ज्योतींनी उजळलेलें आहे; ते ह्या नामधारी अनंत जगालाहि मातीचा एक तुच्छ ढिगारा समजून तो ओलांडून पलीकडे, आणखी पलीकडे निघून जातात. तिथे कालाचा--अनंत कालाचाहि ठावठिकाणा नाही, ते कालाचें शिवार मागे टाकून दूर, अतिदूर निघून जातात. कालाप्रमाणेच त्यांच्यापक्षीं स्थलाचेंहि अस्तित्व नाही, ते स्थलाच्याहि पलीकडे जाऊं इच्छितात. हेंच धर्माचें गूढ रहस्य आहे. ह्या भौतिक प्रकृतीचें असें उल्लंघन करून तिच्या पलीकडे जाण्याचा प्रयत्न, काय वाटेल तें करून, वाटेल ती हानि पत्करून कसा तरी हा प्रकृतीचा पडदा बाजूस सारून, निदान एकदा तरी त्या देशकालातीत सत्तेचें ओझरतें का होईना, दर्शन घेण्याची धडपड करणें हाच आमच्या जातीचा स्वभाव आहे. तुम्ही ह्या जातीला उत्साहित, उद्दीपित करूं इच्छीत असाल तर तिला त्या राज्याचा कांही संदेश सांगा म्हणजे ती उत्साहित होईल, उद्दीपित होईल. एरवी तुम्ही त्या लोकांना राजनीति, समाजसुधारणा, धन-

लाभाचा उपाय, वाणिज्यनीति वगैरे कांहीहि सांगा, ते एका कानाने ऐकतील आणि दुसऱ्या कानाने सोडून देतील. सारांश, जगाला तुम्हीं हा धर्म शिकवावयास हवा. आता प्रश्न असा आहे की जगापासून आपल्याला कांही शिकावयाचें आहे किंवा नाही? इतर जातीं-जवळून आपल्याला बहुधा थोडें भौतिक ज्ञान शिकावें लागेल; संघटित होऊन काम करण्याची शैली, निरनिराळ्या शक्तींना संघटितपणें कामास लावून थोड्या प्रयत्नांनी अधिक फळ पदरीं पाडून घेण्याचें कौशल्य आम्हांला त्यांच्याकडून शिकावें लागेल. त्याग हें आम्हां सर्वांचेंच लक्ष्य असलें तरी, आमच्या देशांतील सर्व लोक जोंपर्यंत संपूर्ण त्याग करण्यास समर्थ होत नाहीत तोंपर्यंत आपल्याला पाश्चात्त्यांकडून बहुधा हें सारें थोडेंफार शिकावें लागेल. परंतु हें लक्षांत ठेवावयास हवें की त्यागच आम्हां सर्वांचा आदर्श आहे. जर कुणी भारतांत भोगसुखच परमपुरुषार्थ म्हणून प्रचार करील, जर कुणी जड जगतच भारतवासी-यांचा ईश्वर म्हणून प्रचार करील तर तो खोटें बोलत आहे, लबाड आहे असें समजा. ह्या पवित्र भारतभूमींत त्याला स्थान नाही, भारतां-तील लोकांना त्याचें म्हणणें ऐकण्याची इच्छा नाही. पाश्चात्त्य सभ्यता कितीहि झगझगाटीची असली, कितीहि दिपविणारी भासली, कितीहि सामर्थ्यवान वाटली, तिने कितीहि चमत्कार करून दाखविले असले तरी ह्या सभेंत खडे होऊन मी त्यांना ठामपणें सांगतों की तें सगळें लटकें आहे, खोटें आहे, निव्वळ भ्रान्ति आहे. ईश्वरच एकमेव सत्य होय, आत्माच एकमेव सत्य होय, धर्मच एकमेव सत्य होय. ह्या सत्याला धरून असां.

तथापि, जे सर्वोच्च सत्याच्या ग्रहणास अद्यापि पात्र झालेले नाहीत, अद्यापि तो अधिकार ज्यांचे ठायीं आलेला नाही अशा आपल्या अनेक बांधवांच्या पक्षीं ह्या असल्या प्रकारचा जडवाद बहुधा हित-कारक ठरूं शकेल——अर्थातच तो आपल्या कामी पडूं शकेल असें, आपल्या प्रयोजनानुसार योग्य तें स्वरूप त्याला देऊनच आपल्याला त्याचें ग्रहण करावें लागेल. सर्वच देशांत आणि सर्वच समाजांत एक फार मोठी चूक होत आली आहे. आणि ती चूक——ती घोडचूक म्हणजे, अधिकार लक्षांत न घेतां, सर्वोच्च सत्यास पात्र नसलेल्या लोकांवर तीं सत्यें जबर-दस्तीने लादणें——अधिकार लक्षांत न घेतां झाडून सर्वांसाठी एकच

व्यवस्था करणें. हा अधिकारवाद भारतांत पूर्वी कधीहि डावलला गेला नव्हता, ही चूक येथे कधीच केली गेली नव्हती; परंतु अतोनात खेदाची गोष्ट ही की अलीकडे हीच चूक आपल्या ह्या भारतांतहि केली जात आहे. सर्वांचे मार्ग एकच असणें खरोखर शक्य आहे काय ? जी साधना-पद्धति मी अनुसरीत आहें तीच तुम्हींसुद्धा अनुसरली पाहिजे असें मुळींच नाही. तुम्ही सर्वजण जाणतांच की, संन्यासी हाच हिंदूंच्या जीवनाचा आदर्श आहे--संन्यासाश्रमच हिंदुजीवनाचें लक्ष्य आहे. प्रत्येकाने सर्व-स्वाचा त्याग करून संन्यास घ्यावयासच हवा असा आपल्या शास्त्रांचा आदेश आहे, दंडक आहे. आपल्या शास्त्रांनुसार सर्वांनीच अखेर संन्यासी झालें पाहिजे. संसारांतील सुखांचा उपभोग घेऊन झाल्यानंतर, ह्या संसारवृक्षाचीं फळें चाखून झाल्यानंतर प्रत्येक हिंदूने आपल्या आयुष्या-च्या सायंकाळांत संसाराचा त्याग केलाच पाहिजे. जो असें करणार नाही तो हिंदुच नव्हे, त्याला मग स्वतःला हिंदु म्हणविण्याचा कांही-सुद्धा अधिकार उरावयाचा नाही. तो शास्त्रांची अमर्यादा करणारा होय, शास्त्रद्रोही होय. ज्या वेळीं भोगाच्या द्वारा प्राणोप्राण उमजेल की हा संसार असार आहे, त्या वेळीं तुम्हांला ह्या संसाराचा त्याग करावा लागेल. हिंदूंचा आदर्श हा असा आहे हें आपण जाणतोंच. जेव्हा नीट परीक्षा करून उमगेल कीं ह्या संसारांतल्या भोग्य वस्तु अगदी पोकळ आहेत, त्यांच्या आंत नुसता भुसा, नुसती राख भरलेली आहे -- जेव्हा अनुभवान्तीं दिसून येईल की ह्या संसारवृक्षाच्या फळांमधे गिराचें नांव नाही, केवळ साल नि कोयच आहेत, तेव्हा ह्या संसाराचा त्याग करा आणि जिथून आलां आहांत तिथे परत जाण्याचा प्रयत्न करा. मन जणु गिरक्या मारीत समोर इंद्रियांकडे धावत आहे, तें चक्कर घेत आंत परतलें पाहिजे--'प्रवृत्ति' थांबली पाहिजे आणि 'निवृत्ति' सुरू झाली पाहिजे. प्रवृत्तिमार्ग सोडून देऊन निवृत्ति-मार्ग धरला पाहिजे. हाच आहे आदर्श. परंतु, कांही एका प्रमाणांत भोग घेतल्याखेरीज हा आदर्श गाठतां यावयाचा नाही. लहान पोराला त्यागाचें तत्त्व कसें शिकवितां येईल ? तो जन्मल्यापासून सोनेरी स्वप्नेंच बघत असतो, जन्मापासूनच त्याच्यांत आशावाद रसरसत असतो. त्याचें जीवन केवळ इंद्रियांनाच खिळलेलें असतें--कित्येक इंद्रियसुखांचा समुच्चय

हेंच त्याच्या जीवनाचें स्वरूप असतें. प्रत्येक समाजामधे असेच लहान पोरांसारखे, बालिश लोक असतात; संसाराची असारता उमजण्यासाठी त्यांना आधी थोडा अनुभव घ्यावा लागेल, थोडा भोग घ्यावा लागेल, तरच त्यांच्या ठायीं वैराग्य उपजूं शकेल. आमच्या शास्त्रांनी ह्या अशा लोकांसाठी अगदी यथेच्छ तरतूद करून ठेवली आहे. परंतु दुर्दैवाने नंतरच्या काळांत, जे नियम फक्त संन्याशासाठीच आहेत त्या नियमांनी समाजांतील सगळ्यांनाच बांधून टाकण्याची प्रवृत्ति बोकाळली. ही फार मोठी चूक आहे. भारतांत जें दुःख आणि दारिद्र्य आढळून येतें त्यांतील बरेचसें ह्याच कारणाने उद्भवलें आहे--त्यांतील बराच भाग ह्याच घोडचुकीचा परिणाम होय. गरीब लोकांना इतक्या भाराभर धार्मिक बंधनांची कांहीसुद्धा आवश्यकता नाही--आणि तरीहि त्यांना तऱ्हतऱ्हेच्या कडक आध्यात्मिक व नैतिक नियमांनी करकचून बांधण्याचा उपद्व्याप करण्यांत आला ! त्याला इनकें जखडण्याची उठाठेव करीत न बसतां, त्याच्या व्यवहारांत उगाच ढवळाढवळ न करतां तुम्ही अमळ हात आवरून अगदी बाजूला उभें राहा बघूं ! बिचाऱ्याला थोडें जगाचें सुख उपभोगून घेऊं द्या. आणि मग तुम्हांला दिसेल की तो हळूहळू उन्नत होत आहे--हळूहळू त्याग त्याच्या ठायीं आपोआपच येईल.

सद्गृहस्थहो आपण पाश्चिमात्य लोकांकडून भोगसुखांच्या प्रयत्नांत साफल्य कसें मिळवावें हें थोडेंफार शिकूं शकूं परंतु अतोनात सावधगिरीने आपण ह्या साऱ्या गोष्टी शिकल्या पाहिजेत. मला अत्यंत खेदाने म्हणावें लागत आहे की, ज्यांनी पाश्चात्त्य कल्पना आत्मसात् केल्या आहेत अशा आजकाल आढळून येणाऱ्या व्यक्तींचीं अधिकांश उदाहरणें कमीअधिक प्रमाणांत अपेशीच ठरलीं आहेत--त्यांतील प्रायः कुणाचेंहि जीवन मोठेसें आशादायक नाही. भारतांत आपल्या मार्गांत दोन मोठे अडथळे आहेत; या बाबतींत इकडे आड आणि तिकडे विहीर अशी आपली स्थिति आहे--एकीकडे आहे जुना सनातनीपणा आणि दुसरीकडे आहे आधुनिक युरोपीय सभ्यता. ह्या दोहोंतून मी पाश्चात्त्य पद्धति वा साहेबीपणा टाकून जुना सनातनीपणाच निवडीन, ह्या दोहोंत तोच मला पसंत आहे; कारण जुन्या वळणाचा सनातनी हिंदु कदाचित् अडाणी असेल, अंधविश्वासी असेल, ओबडधोबड असेल, पण तो 'माणूस'

असतो, त्याच्या ठायीं एक विश्वास असतो, आणि त्याच्या बळावर तो स्वतःच्या पायांवर उभा राहूं शकतो; उलट ह्या साहेब बनलेल्या राजेश्रींना मुळी कांही कणाच नसतो, कुठूनतरी कशातरी उचललेल्या तऱ्हतऱ्हेच्या कल्पनांचें तो एक गाबाळ असतो--त्याच्या त्या कल्पना सगळ्या विस्कळीत असतात, त्याच्या ठायीं त्यांचा मिलाफ झालेला नसतो, त्या त्याने चांगल्या आत्मसात् करून घेतलेल्या नसतात, त्या त्याला नीट पचलेल्या नसतात--सारी नुसती खिचडी झालेली असते. तो स्वतःच्या पायांवर उभा राहूं शकत नाही--त्याचें डोकें सारखें गरगरत असतें. तो जीं कार्यें करीत असतो त्या साऱ्यांमागची प्रेरकशक्ति कोणती असते सांगूं?--आमचें दैवतच होऊन बसलेल्या इंग्रजांनी पाठ थोपटून अमळ शाबासकी द्यावी अन् वाहवा म्हणावें हीच महत्त्वाकांक्षा त्याला तीं सारीं कार्यें करण्यास उद्युक्त करीत असते!--तीच त्याच्या सगळ्या कार्यांमागील प्रेरक शक्ति होय! निरनिराळ्या योजना आखून तो जो ह्या साऱ्या समाजसुधारणा करावयास सरसावत असतो, आमच्या कित्येक सामाजिक रूढींवर तो जे इतके भयंकर हल्ले चढवीत असतो, त्या साऱ्याचें कारण फक्त हेंच की--आमच्या त्या चालीरीती, आमचे ते आचार, आमच्या त्या रूढि साहेबांच्या मताविरुद्ध असतात!--त्याच्या त्या करणीला कुणातरी साहेबाच्या मताचा पाठिंबा असतो, आसरा असतो, आशीर्वाद असतो, इतकेंच! आमच्या कित्येक रूढि वाईट कां? तर साहेब तसें म्हणतात म्हणून! त्याविषयी तो जीं कारणें देतो त्या साऱ्यांचा माथितार्थ सुमारें हाच असतो! आमच्या रूढि वाईट असण्याचें केवढें भरभक्कम कारण हें! मी ह्या असल्या प्रकाराला कधीच मान तुकविणार नाहीं. मला हा सारा प्रकार अजीबात मान्य नाही. उलट, स्वत.चें जें आहे तें धरून स्वतःच्या बळावर उभें राहा--तसें करून मरण आलें तरी परवडलें. जगांत जर कोणतें पाप असेल तर तें म्हणजे दुबळेपणा हेंच होय. सर्वप्रकारचा दुबळेपणा सोडून द्या--दुबळेपणाच पाप होय, दुबळेपणाच मृत्यु होय. आमची ती जुनी सनातनी मंडळी कशी 'माणसें' होती, मर्द होती--ते लोक कसे करारी अन् खंबीर होते. परंतु पाश्चात्त्यांच्या मोहिनीची भुरळ पडून डोकें फिरलेल्या, तोल सुटलेल्या ह्या जीवांची बिचाऱ्यांची अजून नीट घडणच व्हावयाची आहे,

त्यांना अजून कोणताहि घाढच आलेला नाहीं--ह्या घुकाळ व्यक्तित्वाच्या जीवांना पुरुष म्हणायचें, की स्त्री म्हणायचें, की एखादा विशिष्ट पशु म्हणावयाचें कांही कळत नाही ! तथापि, ह्या पाश्चात्त्य पद्धतीने शिकलेल्या लोकांमधेहि कित्येक आदर्श पुरुषहि आहेत. अशा आदर्श पुरुषांचें एक अगदी उत्कृष्ट उदाहरण म्हणून मी तुमच्या ह्या रामनदच्या राजेसाहेबांकडे बोट दाखवूं इच्छितों. समस्त भारतांत ह्यांच्याइतका निष्ठावान हिंदुहि आढळावयाचा नाही, आणि त्याचप्रमाणे परत पौर्वात्य आणि पाश्चिमात्य सर्वच बाबतींत ह्यांच्याइतकी सविस्तर माहिती बाळगणारा दुसरा राजाहि ह्या भारतांत सापडावयाचा नाही. ह्यांनी पूर्व आणि पश्चिम या दोहोंत मेळ घातला आहे--त्या दोन्ही जातींमधे जेवढें म्हणून चांगलें आहे आणि त्यांना घेतां येणें शक्य आहे तेवढें सारें ह्यांनी घेतलें आहे

आपले थोर आणि अजोड स्मृतिकार महर्षि मनु यांनी आपल्या 'मनुस्मृतीं'त असा दंडक घालून दिला आहे की–

"श्रद्धधानः शुभां विद्याम् आददीतावरादपि ।
अन्त्यादपि परं धर्मं स्त्रीरत्नं दुष्कुलादपि ॥"

--"कल्याणकारी, शुभ आणि चांगली विद्या अगदी हीन, अगदी खालच्या जातीच्या व्यक्तीकडूनहि श्रद्धापूर्वक ग्रहण करावी. अंत्यजाकडूनदेखील श्रेष्ठ धर्म, म्हणजेच मुक्तीचा मार्ग शिकावा. एखादी स्त्री जर खरोखर उत्तम असेल तर ती अत्यंत अधम वा नीच कुळांतली असली तरी तिचें पाणिग्रहण करावें."

दिव्यदृष्टीच्या मनूंनी जें म्हटलें आहे तें अगदी बरोबर आहे. आधी स्वतःच्या पायांवर उभें राहा, त्यानंतर मग इतर सर्व देशांकडून व जातींकडून शिका, जेवढें शक्य आहे तेवढें आत्मसात् करा, जें कांही तुमच्या कामीं पडूं शकण्यासारखें आहे त्याचें ग्रहण करा. पण एक गोष्ट मात्र लक्षांत असूं द्या, आणि ती हीच की तुम्ही हिंदु आहांत, तुमच्या जातीच्या जीवनाचा आदर्श, तुमच्या जातीच्या जीवनाचा मूलमंत्र आहे धर्म; आणि म्हणून तुम्ही दुसऱ्याकडून जें कांही शिकाल, जें काय घ्याल त्या साऱ्याचें स्थान धर्माच्या खालचेंच राहिलें पाहिजे, धर्म प्रधान व तें सारें गौण वा दुय्यम असेंच झालें पाहिजे. प्रत्येक व्यक्तीचाच एकेक

जीवितहेतु असतो, प्रत्येक व्यक्तिच जणु एकेक विशिष्ट कार्य करण्यासाठी जन्मास येत असते. तिच्या अनंत पूर्वजन्मींच्या कर्मांनीच तिच्या ह्या जीवनाला हें विशिष्ट वळण लागलेलें असतें, त्याला ही विशिष्ट गति आलेली असते; हें तिच्या त्या अनंत पूर्वकर्मांचेंच फल असतें. माझ्या स्वदेशबंधूंनो, तुमच्यांतील प्रत्येकजण एक गौरवशाली वारसा घेऊन जन्माला आला आहे. आणि म्हणून तुमच्यांतील प्रत्येकालाच स्वतःच्या जीवनांत एक विशिष्ट कार्य करावयाचें आहे, एक विशिष्ट व्रत घ्यावयाचें आहे. महामहिमाशाली हिंदुजातीच्या अनंत गतजीवनाच्या कर्मसमष्टीने तुमचें हें जीवनव्रत ठरविलें गेलें आहे. बंधूंनो, सावध राहा, तुमचे लक्षावधि पूर्वज तुमचें प्रत्येक कर्म अगदी डोळयांत तेल घालून बघत आहेत, तुमच्या प्रत्येक कार्यावर जणु त्यांची निगराणी आहे, म्हणून खूप सावध राहा. आणि, जें व्रत पूर्ण करण्यासाठी प्रत्येक हिंदुबालकाचा जन्म असतो तें व्रत कोणतें? महर्षि मनूंनी ब्राह्मणाच्या जीवितहेतूविषयी जी साभिमान घोषणा केली आहे ती तुम्हीं वाचलेली नाही काय? मनु म्हणतात की ब्राह्मणाचा जन्म असतो—"धर्मकोषस्य गुप्तये"—"धर्मरूपी खजिन्याच्या संरक्षणासाठी". माझ्या मतें, केवळ ब्राह्मणाचाच नव्हे तर आपल्या ह्या पवित्र भारतभूमींत जन्मास येणाऱ्या प्रत्येक पुरुषाचा आणि प्रत्येक स्त्रीचा जन्म असतो "धर्मकोषस्य गुप्तये"—"धर्मरूपी खजिन्याच्या संरक्षणासाठी"च—तेंच भारतांत जन्म घेणाऱ्या प्रत्येक बालकाचें आणि प्रत्येक बालिकेचें जीवितकार्य होय. आपल्या जीवनांतील इतर सर्व बाबी आपल्या जीवनाच्या ह्या मूल उद्देश्याच्या अधीनच असावयास हव्यात. संगीतांत एक प्रधान सूर असतो, आणि इतर सर्व सूर त्याच्याच अधीन असतात, त्याचेंच अनुवर्तन करीत असतात, आणि त्यामुळेच त्या संगीतांत नीट लय साधत असते; असेंच याहि बाबतींत व्हावयास हवें. असेंहि एखादें राष्ट्र असणें शक्य आहे की ज्याच्या जीवनाचा मूल मंत्र, मूल उद्देश्य राजनैतिक श्रेष्ठत्व आहे; त्या राष्ट्राच्या जीवनांत धर्माला व इतर सर्व बाबींना अर्थातच त्याच्या त्या मूलजीवनोद्देश्याच्या खाली, दुय्यम असेंच स्थान लाभणार. परंतु हा एक असा देश आहे की ज्याच्या जीवनाचा प्रधान उद्देश आहे धर्म आणि वैराग्य; ज्याचें ब्रीदवाक्य आहे की हें जग असार आहे, मिथ्या आहे, दों दिवसांचा भ्रम आहे,

आणि धर्माखेरीज जें कांही आहे तें सारें--ज्ञान-विज्ञान, भोग-ऐश्वर्य, धनदौलत, नाम-यश-कीर्ति वगैरे सारेंकांही त्या धर्माच्या तुलनेने दुय्यम वा गौण होय धर्म, आध्यात्मिकता, पावित्र्य हीं हिंदूंचा, प्रत्येक हिंदु बालकाचा जन्मसिद्ध वा स्वभावसिद्ध संस्कार होत; आणि आपलें पाश्चात्त्यविज्ञानांचें ज्ञान, आपली विद्वत्ता, आपली संपत्ति, आपली प्रतिष्ठा, आपली कीर्ति, सारांश आपलें सारेंचकांही आपल्या त्या ब्रीदाच्या, आपल्या धर्माच्या अधीन ठेवणें त्यांना धर्माचें साहाय्यक बनविणें हेंच खऱ्या हिंदूच्या चारित्र्याचें वैशिष्टय होय. म्हणून, ज्याच्या ठायीं हिंदुजातीच्या जीवनाचा झराच अशी आध्यात्मिकता पुरेपूर विद्यमान आहे असा सनातनी माणूस, आणि जो केवळ पाश्चात्त्य सभ्यतेचे कित्येक नकली हिरेच कवटाळून बसला आहे, परंतु ज्याच्या ठायीं ती जीवनदायी आध्यात्मिकता नाही असा पाश्चात्त्याळलेला माणूस, या दोहोंची तुलना केल्यास माझी खात्री आहे की येथे उपस्थित असलेली प्रत्येक व्यक्ति प्रथमोक्त सनातन्याचीच निवड करावयास तयार होईल. कारण, त्या सनातन्याच्या बाबतींत आशा करायला थोडी जागा असते --आसरा घ्यायला त्याच्याजवळ कांहीतरी असतें, स्वजातीचें ब्रीद, स्वजातीचा मूलमंत्र त्याच्या ठायीं स्फुरत असतो, म्हणून तो वांचण्याची आशा आहे, परंतु त्या दुसऱ्या राजेश्रींचा मृत्यु अगदी अटळ आहे ज्याप्रमाणे, कुण्या एखाद्या व्यक्तीच्या बाबतींत, तिच्या मर्मावर जर घाव बसला नसेल, तिचें मर्मस्थान जर सुरक्षित असेल, तर मग तिच्या इतर कोणत्याहि अवयवावर कितीहि घाव बसले तरी त्यांना घातक म्हणतां यावयाचें नाही, कारण इतर अवयव व त्यांच्या क्रिया ह्या ती व्यक्ति जिवंत राहण्याच्या दृष्टीने तितक्याशा आवश्यक नसतात, त्याचप्रमाणे आमच्या जातीच्या मर्मस्थानीं वार न झाल्यास तिच्या विनाशाची मुळीच भीति नाही. म्हणून, हें नीट लक्षांत ठेवा की, तुम्ही जर धर्म सोडून देऊन, जडालाच सर्वस्व मानणाऱ्या पाश्चात्त्य सभ्यतेच्या मागे धावाल तर तीन पिढ्यांतच तुम्ही नष्ट होऊन जाल. हिंदूंनी धर्म सोडला की हिंदुजातीच्या जीवनाचा कणाच मोडला म्हणून समजा--ज्या पायावर ह्या जातीचा सुविशाल प्रासाद उभारला गेला आहे तो पायाच भग्न झाला असें समजा; आणि ह्याचा परिणाम ठेवलेलाच आहे, तो म्हणजे

--संपूर्ण, सर्वांगीण ध्वंस.

म्हणून, मित्र हो, आपल्या जातीच्या उन्नतीचा हाच मार्ग आहे, --जें अमूल्य धर्मधन आपल्याला आपल्या प्राचीन पूर्वजांकडून वारसा म्हणून लाभलें आहे तें प्राणपणास लावून पक्कें धरून ठेवणें हेंच आपलें पहिलें आणि मुख्य कर्तव्य होय. तुम्हीं अशा देशाविषयी कधी ऐकलें आहे काय की ज्या देशांतील चक्रवर्ती सम्राट् स्वतःला प्राचीन राजे-रजवाड्यांचे, वा जुनाट किल्ल्यांत राहून वाटसरूंचें सर्वस्व लुबाडणाऱ्या डाकू 'बॅरनां'चे (सरदारांचे) वंशज म्हणविण्यांत भूषण न मानतां अरण्य-वासी, अर्धनग्न ऋषिमुनींचे वंशज म्हणवून घेण्यांत भूषण मानीत अस-तात ? अशा देशाविषयी तुम्हीं कधी ऐकलें आहे काय ? जर ऐकलें नसेल तर ऐका--आपली ही मातृभूमिच तो देश होय इतर देशांत मोठमोठे धर्माचार्य हे आपण कुण्या प्राचीन राजाचे वंशज आहोंत असें सिद्ध करण्याचा आटापिटा करीत असतात, तर येथे या भारतांत मोठ-मोठे राजे हे आपण कुण्या प्राचीन ऋषीचे वंशज आहोंत हें अटीतटीने सिद्ध करण्याचा प्रयत्न करीत असतात. आणि म्हणून माझें तुम्हांला सांगणें आहे की, तुमचा धर्मावर विश्वास असो की नसो पण आपल्या जातीचें जीवन जर तुम्ही टिकवूं इच्छीत असाल तर तुम्ही ह्या धर्माला चिकटून राहिलें पाहिजे, ह्या धर्माच्या रक्षणाचें व्रत घेतलें पाहिजे. एका हाताने दृढपणें धर्माला धरून ठेवून दुसऱ्या हाताने इतर जातींकडून जें काय घ्यावयाचें तें घ्या; परंतु लक्षांत ठेवा की त्या साऱ्याला हिंदुजीव-नाच्या ह्या मूळ आदर्शाच्या खालचें स्थान दिलें गेलें पाहिजे, हिंदु-जीवनाच्या ह्या मूल आदर्शाच्या तुलनेने तें गौण वा दुय्यमच ठरलें पाहिजे. तरच अपूर्व महिमाशाली स्वरूपाचा भावी भारत उदयास येईल. माझी खात्री आहे की लवकरच तो शुभ दिवस उगवावयाचा आहे; माझी पक्की खात्री आहे की भारत यापूर्वी कधी नव्हता इतका श्रेष्ठ तो लव-करच होणार आहे. प्राचीन ऋषींपेक्षा श्रेष्ठ अशा ऋषींचा उदय होईल, आणि तुमचे पूर्वज हे आपल्या वंशजांच्या ह्या अभूतपूर्व उत्थानाने केवळ संतुष्टच होतील असें नव्हे तर, मी अगदी ठासून सांगतों की परलोकां-तील आपापल्या स्थानांवरून स्वतःच्या वंशजांचा हा एवढा महिमा, ही एवढी थोरवी बघून त्यांना अतोनात गर्व वाटूं लागेल, धन्य धन्य

वाटूं लागेल.

बंधूंनो, आपल्याला सगळ्यांनाच आता कठोर परिश्रम करावे लागतील, खूप खूप झटावें लागेल; आता झोपायला वेळ नाही. आपल्या कार्यांवरच भारताचा भविष्यकाळ अवलंबून आहे. आपली ही भारत-माता हळूहळू नेत्र उघडीत आहे. ती कांही काल अमळ निद्रित झाली होती इतकेंच. उठा, तिला जागें करा--आणि ह्या नवजागृतीच्या संजीवनाने तिला पूर्वीपेक्षाहि अधिक गौरवान्वित करून भक्तिभावाने तिची तिच्या चिरंतन सिंहासनावर स्थापना करा. बंधूंनो. ईश्वरविषयक खरें-खरें ज्ञान ह्या आपल्या भारतालाच प्राप्त झालें होतें, आणखी कोणत्याहि जातीला खरेखरें ईश्वरज्ञान होऊं शकलें नाही. माझ्या ह्या विधानाचें तुम्हांला कदाचित् आश्चर्य वाटेल, परंतु इतर कोणत्याहि शास्त्रांत खरेखरें ईश्वरस्वरूप दाखवून द्या बघूं. इतर जातींचा 'यहुद्यांचा ईश्वर' 'अरबांचा ईश्वर' वगैरेंप्रमाणे एकेक जातीय ईश्वर होता, आणि तो ईश्वर परत इतर जातींच्या ईश्वरांशीं युद्ध करण्यांत गढलेला असे. परंतु ईश्वराचें दयामयत्व,--तो परम दयाळू आहे, तो म्हणजे आपला पिता, आपली माता, आपला सखा, आपल्या प्राणांचा प्राण, आपल्या आत्म्याचा अंतरात्मा आहे हें तत्त्व फक्त भारतालाच अवगत होतें. आणि बंधूंनो, याप्रमाणे ज्याचा पूर्ण महिमा केवळ भारतानेच जाणला होता, जो शैवांचा शिव आहे, वैष्णवांचा विष्णु आहे, कर्मीगणांचें कर्म आहे, बौद्धांचा बुद्ध आहे, जैनांचा जिन आहे, ख्रिस्त्यांचा व यहुद्यांचा जिहोवा आहे, मुसलमानांचा अल्ला आहे, वेदान्त्यांचें ब्रह्म आहे, सर्व धर्मांतील सर्व पंथांचा व संप्रदायांचा ईश्वर आहे, तो सर्वव्यापी पुरुष आपल्याला आशीर्वाद देवो, आपला पाठीराखा बनून आपल्याला साहाय्य करो, आपल्याला शक्ति देवो की जेणेंकरून आपण आपलें उद्दिष्ट कार्यांत उतरवूं शकूं.

"ॐ सह नाववतु । सह नौ भुनक्तु । सह वीर्यं करवावहै ।
तेजस्वि नावधीतमस्तु । मा विद्विषावहै ।
ॐ शांतिः शांतिः शांतिः । हरिः ॐ ।"

--"जें आपण श्रवण केलें तें जणु खाल्लेल्या अन्नाप्रमाणे आपल्याला पुष्टि देवो, तें आपलें बल होवो, त्याच्यामुळे आमच्या ठायीं असें वीर्य

उत्पन्न होवो की तद्द्वारा आपण एकमेकांना साहाय्य करूं शकूं. आपल्यांत --गुरु आणि शिष्य यांत--कदापि एकमेकांविषयी ईर्ष्याअसूयेचा शिरकाव न होवो. हरीच्या, त्या प्रभूच्या नांवाने सर्वत्र, सर्वप्रकारें शांतिच शांति विराजो.

---

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ........ वि: ........
क्रमांक ........ नों. दि. ........

# भाग २ रा

क्रमांक ........................

# परमकुडी येथील मानपत्रास उत्तर

रामनद सोडल्यावर परमकुडी हें पहिलें मुक्कामाचें ठिकाण होतें, आणि तेथे मोठ्या प्रमाणावर स्वागत समारंभ झाला, त्या वेळीं पुढील मानपत्र अर्पण केलें गेलें—

## श्रीमत् विवेकानंद स्वामी,

प्राश्चात्त्य जगतांत चार वर्षेंपर्यंत यशस्वी रीतीने अध्यात्माचा प्रचार केल्यानंतर आपण आज या ठिकाणीं आलां आहांत; आम्ही परमकुडीचे नागरिक आज आपलें अंत:करणपूर्वक स्वागत करीत आहोंत.

परहितबुद्धीने प्रेरित होऊन आपण शिकागो येथील सर्वधर्म-परिषदेस उपस्थित राहिलांत व तेथे जमलेल्या जगांतील धर्मप्रतिनिधीं-समोर आपल्या या प्राचीन भूमींतील पवित्र पण अज्ञात असे मूल्यवान् सिद्धान्त मांडलेत याबद्दल सर्व देशबांधवांबरोबर आम्हांलाहि आनंद होत आहे व गर्व वाटत आहे. वैदिक वाङमयांत अंतर्भूत असलेल्या पवित्र सत्यांचें विशाल दृष्टिकोनांतून विवेचन करून आपण पाश्चिमात्य देशां-तील विचारवंतांच्या मनांत आपल्या प्राचीन धर्मासंबंधी वसत असलेले गैरसमज दूर केलेत, आणि आपला हा धर्म सार्वजनीन स्वरूपाचा असून सर्व काळांतील सर्व प्रकारच्या बौद्धिक स्तरांवरील लोकांना उपयुक्त होण्याची त्यांत क्षमता आहे याची पाश्चात्त्य विद्वानांना खात्री पटवून दिलीत.

आपल्या पाश्चात्त्य शिष्यांची येथील उपस्थिति आम्हांला प्रत्यक्ष-पणें दाखवीत आहे की आपली धार्मिक शिकवण त्यांना केवळ तात्त्विक-दृष्टीने समजली असें नसून ती प्रत्यक्षांतहि फलद्रूप झालेली आहे. आपल्या भव्य व आकर्षक व्यक्तिमत्त्वाचा जो प्रभाव दिसून येत आहे तो आम्हांला आमच्या प्राचीन व पवित्र ऋषिवर्यांची आठवण करून देतो—ज्यांनी तपस्येने व आत्मसंयमाने आत्मसाक्षात्कार करून घेतला व म्हणून जे मानवजातीचे खरे मार्गदर्शक व गुरु बनले त्या ऋषिवर्यांचें तो आम्हांला स्मरण करून देतो. शेवटीं, आम्ही त्या दयाघन प्रभूची

अत्यंत मनोभावें प्रार्थना करतों की आपणांस उदंड आयुष्य लाभो व अखिल मानवजातीला अध्यात्मपरायण बनवून जगाचें कल्याण करण्याचें आपलें हें कार्य निरंतर चालू राहो.

आपले अत्यंत विनीत,

आपले अत्यंत आज्ञाधारक आणि एकनिष्ठ शिष्य व सेवक.

मानपत्राला दिलेल्या उत्तराच्या ओघांत स्वामीजी म्हणाले :—

आपण एवढ्या अगत्याने व प्रेमाने माझें स्वागत केलेंत की कोणत्या शब्दांनी मी आपले आभार मानावेत हें मला कळत नाही. परंतु मी हें सांगूं इच्छितों की माझें देशप्रेम व विशेषत: देशबांधवांबद्दलचें माझें प्रेम नेहमी समानच राहील, मग ते माझें अगत्यपूर्वक स्वागत करोत किंवा माझा धिक्कार करून मला देशांतून बाहेर काढून लावोत; कारण गीतेंत श्रीकृष्णांनी म्हटलेंच आहे की आपण कर्मासाठीच कर्म व प्रेमासाठीच प्रेम केलें पाहिजे. पाश्चात्त्य जगतांत माझ्याकडून जें कार्य झालें तें अल्पसेंच होतें; माझ्याकडून तिकडे जें कार्य झालें त्याहिपेक्षा शतपटीने अधिक कार्य आज येथे उपस्थित असलेला कोणीहि करूं शकला असता. मी तर त्या दिवसाची मोठ्या आतुरतेने वाट पाहत आहें की जेव्हा महान् आध्यात्मिक बलसंपन्न व्यक्ति जागृत होऊन भारतांतून जगाच्या कानाकोपऱ्यांत जावयास सिद्ध होतील आणि भारताच्या अरण्यांतून विकास पावलेली व भारतभूमीचीच संपत्ति असलेली आध्यात्मिकता व त्याग यांचा सर्वत्र प्रचार करतील.

इतिहासांत असे कांही कालखंड येतात की जेव्हा सबंध देशाला जगाविषयी एकप्रकारचा उबग वाटतो. त्या वेळीं त्यांना असें दिसतें की आपल्या सर्व योजना निष्फळ होत आहेत, जुन्या पद्धति व संस्था कोलमडून पडत आहेत, आशा धुळीला मिळत आहेत आणि प्रत्येक गोष्ट बिस्कळित होत आहे. या जगांत समाजाच्या उभारणीचे दोन प्रकारचे प्रयत्न करण्यांत आले, त्यांपैकी एक धर्मावर आधारलेला होता, तर दुसरा सामाजिक गरजांवर आधारलेला होता. आध्यात्मिकता हा एकाचा आधार होता, तर दुसरा जडवादावर आधारलेला होता; अतींद्रियवाद हा एकाचा आधार होता, तर वास्तववाद हा दुसऱ्याचा आधार होता. एकाची दृष्टि जड जगताच्या क्षितिजापलीकडे गेलेली असून

ऐहिकाहून भिन्न व स्वतंत्र असें आध्यात्मिक जीवन जगण्याचें धैर्य त्याच्यांत आहे. दुसरा ऐहिक गोष्टींवरच जीवन आधारण्यांत संतुष्ट असतो व या गोष्टींवरच जीवन दृढपणें उभारतां येईल अशी आशा तो बाळगीत असतो. आश्चर्याची गोष्ट हीं की कधी अध्यात्मवाद प्रबळ असतो, तर कधी जडवाद प्रबळ असतो. लाटांच्या गतीप्रमाणे हे दोन्ही एकामागून एक येत असतात. एका देशांतच एकदा अध्यात्मवादाची लाट येते तर एकदा जडवादाची लाट येते. एखाद्या काळांत जडवादी विचारांचा पूर्ण प्रकर्ष आढळतो व ऐहिक अभ्युदय घडवून आणणारी प्रत्येक गोष्ट आणि अधिक सुख व अधिक समृद्धि देणारें शिक्षण हींच आदरणीय समजलीं जातात. आणि नंतर ऱ्हासाला व अवनतीला सुरुवात होते. समृद्धीबरोबरच मानवाच्या ठायीं स्वभावतःच असलेली सर्व प्रकारची मत्सरबुद्धि आणि द्वेषबुद्धि अत्यंत प्रबळ होते. स्पर्धा व निर्दय क्रौर्य हेंच त्या काळाचें ब्रीद होऊन बसतें. या संबंधांत एक नित्याची अशीं इंग्रजी म्हण देणें योग्य होईल--"प्रत्येक माणूस स्वतःपुरताच विचार करतो आणि जो बिचारा मागे राहतो तो सैतानाच्या हातांत पडतो." हीच म्हण ह्या काळांत खरी ठरत असते. असा कांही काळ लोटल्यानंतर लोकांना वाटूं लागतें की जीवनाची सर्व घडीच कुचकामाची झाली आहे, आणि आध्यात्मिकता मदतीस न आली व या बुडणाऱ्या जगाला तिने मदतीचा हात दिला नाही तर या जगाचा नाश अटळ आहे. नंतर जगाला नवी आशा वाटूं लागते व नवनिर्मितीसाठीं नवा आधार दिसूं लागतो; त्या वेळीं पुनः आध्यात्मिकतेची लाट उसळते व कालान्तराने ती पुन्हा ओसरते. आध्यात्मिकतेच्या आविर्भावाबरोबरच असा एक वर्ग अपरिहार्यपणें निर्माण होतो की जो जगांतील विशेष विशेष शक्तींवर आपल्या एकट्याचाच अधिकार सांगतो. याची तात्कालिक प्रतिक्रिया म्हणजे जडवाद पुनः सुरू होतो. त्यामुळे कितीतरी विशेष अधिकारांचे दावे पुढे मांडले जाऊं लागतात. कालान्तराने सर्वप्रकारच्या आध्यात्मिक शक्तिच नव्हत, तर सर्वप्रकारच्या भौतिक शक्ति व अधिकार कांही मूठभर लोकांच्या हातींच केंद्रित होतात, आणि हे मूठभर लोक बहुजनसमाजाच्या मानेवर बसून त्यांच्यावर सत्ता चालविण्याचा प्रयत्न करतात. अशा वेळीं समाजाला स्वतःच्या रक्षणा-

साठी स्वतःच उपाय शोधावा लागतो आणि त्यावेळीं जडवाद त्याच्या मदतीला धावतो.

आपल्या भारताकडे, या मातृभूमीकडे तुम्ही पाहाल तर सध्या येथे हीच गोष्ट चालू आहे असें तुम्हांला दिसेल. वेदान्ताचा प्रचार करण्यासाठी युरोपला गेलेल्या एका व्यक्तीचें स्वागत करण्याकरिता तुम्ही येथे जमलां आहांत ही गोष्टच, युरोपांतील जडवादाने माझें कार्य सोपें केलें नसतें तर अशक्य झाली असती. जडवादाने भारताचें एक-प्रकारें हित केलें आहे, कारण त्यामुळे जीवनाचा मार्ग प्रत्येकास मोकळा झाला, जातिविशिष्ट अधिकारांचा लोप झाला, मूठभर लोकांच्या हातांत जीं गुप्त व अमूल्य अशीं आध्यात्मिक तत्त्वरूपी रत्नें पडून राहिलीं होतीं व ज्यांचा उपयोग ते विसरून गेले होते त्या तत्त्वांसंबंधी सर्वसामान्य लोक विचार करूं लागले व त्यांची चर्चा करूं लागले. या रत्नांपैकी अर्धीं रत्नें चोरीला गेलीं अगर नष्ट झालीं व उरलेलीं अर्धीं रत्नें अशा लोकांच्या हातीं आहेत की जे गव्हाणींतील कुत्र्याप्रमाणे तीं स्वतःहि उपयोगांत आणीत नाहीत व इतरांनाहि त्यांचा उपयोग करूं देत नाहीत. दुसरें असें की, भारतांत ज्या राजकीय पद्धतींकरिता आपण झगडत आहोंत त्या युरोपांत कित्येक शतकांपासून आहेत; अनेक वर्षें त्यांचा प्रयोग झालेला असून त्यांत कांहींतरी उणीव आहे असें आढळून आलें आहे. शासनसंस्थेशीं संबंधित असलेल्या संस्था, पद्धती आणि इतर सर्व गोष्टी एकापाठोपाठ एक निरुपयोगी म्हणून धिक्कारल्या जात आहेत, आणि त्यामुळे युरोप अस्वस्थ झालेला आहे, काय करावें हें त्याला कळेनासें झालें आहे, भौतिक ऐश्वर्याचा व संपत्तीचा जुलूम त्याला असह्य झाला आहे. देशांतील सत्ता व संपत्ति मूठभर लोकांच्या हातीं आहे आणि स्वतः काम न करतां ते लाखो माणसांकडून श्रम करवून घेत आहेत. या सत्तेच्या जोरावर साऱ्या जगांत ते रक्ताचे पाट वाहायला लावूं शकतात. धर्म व अन्य सर्वकांही त्यांच्या टांचेखाली आहे, ते सर्वसत्ताधारी शासनकर्ते होऊन बसले आहेत. शायलॉकच्या वृत्तीचे मूठभर लोक पाश्चात्त्य जगतावर शासन करीत आहेत. घटनात्मक शासनस्वातंत्र्य, स्वायत्तता आणि लोकसभा, या ज्या साऱ्या गोष्टींबद्दल तुम्ही ऐकत असतां त्या म्हणजे पोकळ गप्पा होत.

पाश्चात्त्य जगत् या निर्दय सावकारशाहीच्या जोखडाखाली पिचत आहे, तर पौर्वात्य जग पुरोहितगिरीच्या तापाने त्रस्त झालें आहे. या दोहोंनी परस्परांना नियंत्रित केलें पाहिजे. त्यांच्यापैकी केवळ एकाच्याच-द्वारें जगाचें हित होईल असें समजूं नका. निःपक्षपाती ईश्वराच्या या सृष्टींत त्या ईश्वराने प्रत्येक अणुरेणु समान केला आहे. अत्यंत वाईट व आसुरी वृत्तीच्या मनुष्यांत असे कांही सद्गुण असतात की ते महान् संतांतहि आढळत नाहीत; आणि अगदी क्षुद्र किड्यांतहि कांही अशा गोष्टी आढळतील की ज्या श्रेष्ठ मनुष्यांतहि नसतील. बिचारा मजूर! त्याच्या जीवनांत कमी सुखें असतील, तुमच्याइतकी बुद्धि त्याला नसेल, त्याला वेदान्त, तत्त्वज्ञान इत्यादि कळत नसेल, पण त्याच्या शरीराशीं तुमच्या शरीराचीं तुलना करा, तुम्हांला आढळेल की त्याच्या शरीराला तुमच्याइतकें दुःख जाणवत नाही. त्याच्या शरीरावर भयंकर जखमा झाल्या तर त्या तुमच्या जखमांपेक्षा अधिक लवकर भरून येतात त्याचें जीवन इंद्रियाधीन असतें व इंद्रियांतूनच तो सुखाचा उपभोग घेतो. त्याचें जीवनहि समतोल असतें. इंद्रियांच्या, बुद्धीच्या किंवा अध्यात्माच्या पातळीवर ईश्वराने निःपक्षपातीपणाने सर्वांना एकूण समान सुख दिलें आहे. म्हणून या जगाचे उद्धारकर्ते आपणच आहोंत असें समजूं नये. आपण जगाला पुष्कळ चांगल्या गोष्टी शिकवूं शकतों, त्याचप्रमाणे जगापासून आपण पुष्कळ गोष्टी शिकूं शकतों. ज्या गोष्टींची जगाला आस लागलेली आहे त्याच गोष्टी आपण त्याला शिकवूं शकतों. जर पाश्चात्त्य सभ्यतेला आध्यात्मिकतेचा आधार मिळाला नाही तर ती आगामी पन्नास वर्षांत संपूर्णपणें कोलमडून पडेल. तरवारीच्या बळावर मानवजातीवर राज्य करण्याचा प्रयत्न हा व्यर्थ व अगदी निरुपयोगी ठरेल. तुम्हांला हें आढळेल की केवळ शक्तीच्या जोरावर राज्य करण्याच्या कल्पना ज्या स्थानांतून उद्भवतात तीं स्थानेंच प्रथम पतनाला बळी पडतात, पूर्ण अधःपतित होतात व नष्ट होऊन जातात. जडवादी शक्तींचें केंद्रस्थान बनलेला युरोप आपली आजची भूमिका बदलून अध्यात्माला स्वतःच्या जीवनाचा आधार बनविणार नाही, तर पन्नास वर्षांच्या आंत तो धुळीला मिळेल. आणि उपनिषदांत सांगितलेला धर्मच युरोपला वांचवूं शकेल.

आपल्या देशांतील निरनिराळे पंथ, दर्शनें व शास्त्रें यांच्यांत मत-

भेद असूनहि त्या सर्वांना मान्य असलेलें एक तत्त्व आहे--तें म्हणजे मानवी आत्म्यावर विश्वास; आणि हेंच तत्त्व जगांतील सर्व विचार-प्रवाहांची गति बदलूं शकेल. हिंदु, जैन व बौद्ध यांच्यांत, नव्हे भारतांत सर्वच ठिकाणीं, 'आत्मा हा सर्व शक्तीचें अधिष्ठान आहे' अशी श्रद्धा आहे. आणि तुम्हांला हें चांगलें ठाऊक आहे कीं, येथील कोणताहि दार्शनिक संप्रदाय असें सांगत नाही की सामर्थ्य, शुचिता व पूर्णता हीं बाहेरून कोठून तरी प्राप्त होतात; तर ते सर्व असेंच सांगतात की, हा तुमचा जन्मसिद्ध अधिकार आहे, हा तुमचा स्वभावधर्म आहे. अशुचिता हें तुमच्या खऱ्या स्वरूपाला झाकून टाकणारें केवळ आवरण आहे. परंतु तुमचें खरें स्वरूप जो आत्मा तो मूळचाच पूर्ण आहे, शक्तिमान आहे. आत्मसंयमासाठी तुम्हांला कोणाच्या मदतीची गरज नाही. तुम्ही आधीचेच संयमी आहांत. याचीं तुम्हांला जाणीव आहे किंवा नाही यामुळेच फरक पडतो. म्हणून 'अविद्या' हीच सर्व अनिष्टांचें मूळ आहे. ईश्वर व मानव, संत व पापी यांच्यांत ज्या एकाच गोष्टीमुळे फरक पडतो ती म्हणजे अज्ञान ही होय. सर्वश्रेष्ठ मानव व तुमच्या पायाशीं सरपटणारा किडा यांच्यांत कशामुळे फरक आहे? अज्ञानामुळेच. सर्व भेद ह्या अज्ञानामुळेच होत असतो; कारण त्या छोटयाशा सरपटणाऱ्या किडयांतहि अनंत शक्ति, अनंत ज्ञान व अनंत पवित्रता हीं वसत आहेत, अनंत भगवान वसत आहेत. ते सध्या अव्यक्त आहेत, आपल्याला त्यांना व्यक्त करावें लागेल.

जगाला शिकविलें पाहिजे असें हें महान् सत्य भारताजवळ आहे. तें अन्यत्र कोठेहि नाही. हें सत्य म्हणजेच आध्यात्मिकता होय, आत्म्या संबंधीचें शास्त्र होय. मनुष्याला कार्य करण्याची प्रेरणा कशापासून मिळते? सामर्थ्यापासून. सामर्थ्य हें पुण्य आहे व दौर्बल्य हें पाप आहे. एखाद्या बाँबगोळ्याप्रमाणे अज्ञानराशीवर आदळणारा उपनिषदांत जर कोणता एक शब्द असेल तर तो म्हणजे 'अभीः'--निर्भयता. आणि जगाला एकच धर्म शिकविण्यासारखा आहे--तो म्हणजे ही निर्भयता, ऐहिक व आध्यात्मिक ह्या दोन्ही क्षेत्रांत भय हेंच अधःपतनाचें व पापाचें कारण आहे. भयच दुःखांना आमंत्रण देतें, भयामुळेच मृत्यु येतो व भयच पापाची वाढ करतें. आणि भय कशांतून निर्माण होतें?

आपल्या खऱ्या स्वरूपाच्या अज्ञानांतून. आपल्यापैकी प्रत्येकजण राजाधिराज ईश्वराचा वारस आहे. प्रत्यक्ष ईश्वराचे आपण अंश आहोंत. फार काय, अद्वैत वेदान्तानुसार आपण साक्षात् ईश्वरच आहोंत, फक्त स्वतःस क्षुद्र मानव मानून आपण आपलें स्वरूप विसरून गेलों आहोंत. तें स्वरूप आपण विसरल्यामुळे 'मी तुझ्याहून चांगला आहे किंवा तूं माझ्याहून चांगला आहेस' असे भेद आपण करीत असतों. हा एकत्वाचा सिद्धान्त हाच भारताजवळील जगाला देण्यासाठी महान् संदेश आहे, आणि लक्षांत ठेवा की, तो समजला म्हणजे सर्व जग तुम्हांला निराळेंच दिसूं लागेल, कारण पूर्वी पाहत होतां त्यापेक्षा वेगळ्या दृष्टीने तुम्ही मग सगळ्या गोष्टींकडे पाहूं लागाल. आणि मग, जग ही एक समरभूमि असून येथे एक जीव दुसऱ्यांशीं कलह करण्यासाठी जन्माला आला आहे, व त्यांत सबल यशस्वी होणार असून दुर्बल नष्ट होणार आहेत ही कल्पना लयास जाईल. हें जग तर एक क्रीडांगण असून येथे ईश्वर लहान मुलाप्रमाणे खेळत आहे, आपण त्याचे सवंगडी आहोंत, त्याचे सहकारी आहोंत असें मग आपल्याला वाटूं लागेल. ही तर क्रीडाच आहे, मग ती कितीहि भयानक वा बीभत्स भासो. या क्रीडेकडे पाहण्याची आपली दृष्टि चुकीची आहे. आत्म्याचें स्वरूप कळलें की अत्यंत दुर्बलाला देखील आशा वाटूं लागते, अत्यंत पतित व पापी व्यक्तीलाहि आशा वाटूं लागते. तुमचें शास्त्र एवढेंच सांगतें की निराश होऊं नका. तुम्हीं कोणतेंहि कर्म केलेंत तरी तुमचें स्वरूप तेंच राहतें, तें कांही तुम्ही बदलूं शकत नाही. प्रकृति ही कांही प्रकृतीला नष्ट करूं शकत नाही. तुमची प्रकृति, तुमचें स्वरूप शुद्ध आहे. तें लाखो युगें दडलेलें का असेना, अखेर तें विजयी होऊन प्रकट होणारच, म्हणून अद्वैत हें प्रत्येकाला आशावादी बनवितें, तें कुणाला निराश बनवीत नाही. अद्वैत हें भयाने धर्माचरण करावयास शिकवीत नाही, तुमच्या हातून चूक होतांच तुमचा घात करावयास टपलेल्या सैतानाची तें शिकवण देत नाही. असल्या सैतानाशीं त्याला कांहीहि कर्तव्य नाही. तें असें म्हणतें की, तुमचें दैव तुमच्या हातींच आहे. तुमच्याच कर्मानें तुमच्यासाठी हें शरीर घडविलें आहे, दुसऱ्या कोणीं नव्हे. सर्वव्यापी परमेश्वर तुमच्या अज्ञानामुळेच तुमच्या पक्षीं दडलेला आहे आणि याची

सर्व जबाबदारी तुमच्यावरच आहे. तुमच्या संमतीशिवाय तुम्हांला या जगांत आणण्यांत आलें आहे व या भयंकर ठिकाणीं ठेवण्यांत आलें आहे असें समजूं नका, तर तुम्ही जाणून असा की तुम्हींच हळूहळू आपलें शरीर घडविलें आहे; आणि आताहि या क्षणीं तुम्ही तें घडवीत आहांत. तुम्हीच स्वत: खातां; तुमच्याकरिता दुसरें कोणी खात नसतें. तुम्ही जें खातां तें तुम्हीच पचवितां, हें कार्य तुमच्यासाठी दुसरें कोणी करीत नाही. रक्त, मांस व शरीर हीं अन्नापासून तुम्हीच तयार करतां, दुसरें कोणीहि नाही. सर्व काळीं तुम्हीं असेंच केलें आहे. साखळींतील एक दुवा अनंत साखळीचें स्वरूप स्पष्ट करीत असतो. तुम्ही आपलें शरीर घडवितां हें एखाद्या क्षणीं जरी खरें असेल तर होऊन गेलेल्या प्रत्येक क्षणीं व भावी कालांतील प्रत्येक क्षणींहि तें खरेंच असणार. आणि सर्व बऱ्यावाइटाची जबाबदारी तुमच्यावरच आहे. हीच मोठी आशादायक गोष्ट आहे. जें मी करूं शकलों तें मी नष्टहि करूं शकेन. आणि त्याचबरोबर आपला धर्म ईश्वराची कृपाहि मान्य करतो. ती तर नेहमी असतेच. बऱ्यावाइटाच्या, पापपुण्याच्या या वेगवती नदीच्या पलीकडच्या तीरावर ईश्वर उभा आहेच. तो बंधनातीत व परम कृपाळू असून आपल्याला पैलतीरीं जाण्यास साहाय्य करण्याठी तो सदैव सिद्ध आहे, कारण त्याच्या कृपेला कांही सीमा नाही, आणि निर्मळ हृदय असलेल्या व्यक्तीला ती नेहमीच लाभत असते.

समाजाची नव्याने घडी बसविण्यासाठी एका अर्थाने भारतांतील आध्यात्मिकतेचा आधार घ्यावा लागेल. मला अधिक वेळ असता तर पाश्चात्त्य जगताला अद्वैताच्या कांही निष्कर्षांपासून अजूनहि शिकण्या-सारखें आहे हें मी तुम्हांला दाखवूं शकलों असतों, कारण भौतिक शास्त्रांच्या या युगांत सगुण ईश्वराची कल्पना फारशी पटणारी व श्रद्धेय राहिलेली नाही. पण अजूनहि एखादा मनुष्य जर प्राथमिक व अविकसित धर्म मानीत असला आणि त्याला मंदिरें व मूर्ति हव्या असल्या, तर आपल्या धर्मांत त्याला त्या हव्या तितक्या मिळतील. त्याला प्रेम करण्या-साठी जर सगुण ईश्वर हवा असेल तर येथे त्याला सगुण ईश्वरासंबंधीच्या एवढ्या उदात्त कल्पना आढळतील की जगांत तशा अन्यत्र कोठेहि त्याला आढळणार नाहीत. आणि मनुष्याला बुद्धिवादी होऊन आपल्या बुद्धीचें

समाधान करून घ्यावयाचें असेल तर या ठिकाणीं त्याला निर्गुण ब्रह्मा-विषयीच्या अत्यंत तर्कसंगत अशा कल्पनाहि आढळतील.

---

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ........ दि ........
क्रमांक ........ कॉ. नं. ........

# मानमदुरा येथील मानपत्राला दिलेलें उत्तर

मानमदुरा व शिवगंगा येथील जमीनदार व नागरिक यांनी मानमदुरा येथे स्वामीजींना पुढील मानपत्र अर्पण करून त्यांचें स्वागत केलें.

**श्री स्वामी विवेकानंद**

परम आदरणीय महाराज,

आम्हीं, शिवगंगा व मानमदुरा येथील नागरिक व जमीनदार, आपलें अंतःकरणपूर्वक स्वागत करीत आहोंत. आपण आमच्या हृदयांत सदैव वास करीत आहांत, पण आपण प्रत्यक्षपणें ह्या स्थानीं येऊन आम्हांला दर्शन द्याल अशी स्वप्नांतहि आम्हांला आशा वाटली नव्हती. शिवगंगा येथे आपलें येणें होणार नाही अशा आशयाची पहिली तार आम्हांला मिळाली, तेव्हा आमच्या अंतःकरणावर निराशेची दाट छाया पसरली होती, पण नंतर आपण येणार या बातमीमुळे आम्हां सर्वांना समाधान वाटलें. आमच्या नगरांत येऊन आम्हांला कृतार्थ करण्यास आपली अनुमति असल्याचें जेव्हा आम्हांला प्रथम कळलें तेव्हा आमची सर्वोच्च आकांक्षा पूर्ण झाली असें आम्हांला वाटलें. जणु पर्वताने महंमदाकडे येण्याचें वचन दिलें, आणि म्हणून आमचा आनंद गगनांत मावेनासा झाला. पण जेव्हा आपणांस आपली संमति परत घेणें भाग पडलेंसें दिसलें तेव्हा आमच्या मानांत घोर निराशा उत्पन्न झाली आणि वाटलें की, आम्हांला आपलें दर्शन मिळतें की नाही, पण आमच्या आग्रहाच्या विनंतीला आपण मोठ्या आनंदाने अनुमति दिलीत.

समुद्रपर्यटनांत मोठमोठ्या अलंघ्य अडचणींना तोंड देऊन पूर्वेचा भव्योदात्त संदेश पाश्चात्त्यांना आपण ज्या उदार व स्वार्थत्यागपूर्ण वृत्तीने दिलात, आपलें कार्य ज्या उत्कृष्ट पद्धतीने पार पडलें, आणि आपल्या लोककल्याणाच्या प्रयत्नांना जें उज्ज्वल व अतुलनीय यश लाभलें, त्यामुळे आपली कीर्ति अजरामर झालेली आहे. भारतीय धार्मिक श्रद्धेवर व कल्पनांवर पाश्चात्त्य, पोटार्थी जडवादाने प्रचंड आक्रमण चालविलें अशा वेळीं, व ज्या वेळीं आमच्या ऋषिवर्यांचीं वचनें व उपदेश यांचा

प्राय: लोप होऊं लागला अशा काळांत, धार्मिक प्रगतीच्या क्षेत्रांत आपल्यासारख्या थोर विभूतीच्या आगमनाने एक नवें युगच निर्माण केलें आहे. आणि आम्हांला आशा वाटते की, योग्य कालावधींतच, भारतीय तत्त्वज्ञानाच्या विशुद्ध सोन्यावर आज जो मळ साचलेला दिसत आहे तो दूर करण्यांत आपण यशस्वी व्हाल, आणि आपल्या बुद्धिमत्तेच्या प्रभावी मुशींत या सोन्याला नवें रूप देऊन या पृथ्वीच्या पाठीवर कोठेंहि मानाने चालूं शकेल अशा मूल्यवान नाण्याचें स्वरूप त्याला प्राप्त करून द्याल. सर्वधर्मपरिषदेकरिता एकत्र जमलेल्या भिन्न भिन्न मतांच्या धर्मप्रतिनिधीं-समोर व्यापक दृष्टिकोनांतून भारतीय तत्त्वज्ञान विशद करून आपण त्या तत्त्वज्ञानाची विजयपताका फडकविली; त्यामुळे आम्हांला ही साधार आशा वाटते की, निकटच्या काळांतच, राजकीय क्षेत्रांतील आपल्या समकालीनांप्रमाणे, ज्यावर सूर्य कधीहि मावळत नाही अशा साम्राज्या-वर आपणहि राज्य करूं लागाल; फरक एवढाच की त्यांचें साम्राज्य भौतिक वस्तूंवर आहे, तर आपलें अधिराज्य लोकांच्या मनावर राहील. जसें राजकीय इतिहासांतील अधिसत्तेचा परमोच्च बिंदु त्यांनी गांठला आणि दीर्घकाल टिकलेलें व लोकांचें हित करणारें साम्राज्य निर्माण केलें, त्याचप्रमाणे ईश्वराजवळ आम्ही अंत:करणपूर्वक प्रार्थना करतों की आपण एवढ्या निष्कामबुद्धीने अंगिकारलेलें लोककल्याणाचें कार्य पूर्ण व्हावें म्हणून आपणांस दीर्घायुष्य लाभो, आणि आध्यात्मिक इतिहासांत पूर्वजांहूनहि आपला प्रभाव अधिक वाढो.

परमपूज्य स्वामीजी,
आपले,
परमतत्पर भक्त आणि सेवक.

वरील मानपत्रास स्वामीजींनी पुढीलप्रमाणे उत्तर दिलें:—

आपण माझें हें जें हार्दिक स्वागत केलेंत त्याबद्दलची कृतज्ञता शब्दांनी व्यक्त करणें मला शक्य नाही. माझी इच्छा असूनहि मोठें भाषण करावें अशा परिस्थितींत मी या वेळीं नाहीं याबद्दल खेद वाटतो. माझ्या संस्कृतज्ञ मित्राने सुंदर विशेषणें मला लावलेलीं असलीं, तरी मला हें शरीर आहे. आता शरीर असणें हें विटंबनेचें कारण असलें तरी कांही

इलाज नाही. आणि शरीर म्हटलें की तें नेहमीच जडद्रव्याच्या नियमांच्या अधीन राहणारच. म्हणूनच ह्या जड शरीराला एकप्रकारचा थकवा वा शीण प्राप्त झाला आहे.

पाश्चात्त्य देशांत माझ्या हातून जें थोडेसें कार्य घडलें त्याविषयीं जो विलक्षण आनंद व आवड देशाच्या सर्व भागांत व्यक्त केली जात आहे ही मोठीच गोष्ट आहे. याकडे पाहण्याची माझी दृष्टि अशी आहे की, भावीकाळांत जे महात्मे जन्मास येतील ते या भाग्याचे धनी होतील. माझ्या हातून झालेल्या लहानशा कामगिरीचें देशाकडून एवढें कौतुक होतें, तर यानंतर येणाऱ्या आध्यात्मिक महापुरुषांचें व विश्व हलवून सोडणाऱ्या महात्म्यांचें या देशाकडून किती कौतुक होईल ? भारत ही धर्मभूमि आहे; हिंदूंना धर्माचें--केवळ धर्माचेंच आकलन होतें. हिंदूंना शतकानुशतकें असेंच शिक्षण मिळालें आहे. याचा परिणाम असा की धर्म हीच जीवनांतील प्रमुख बाब होऊन बसली आहे, आणि ही वस्तुस्थिति तुम्हांला ठाऊक आहे. प्रत्येकाने व्यापारी होणें हें जरुरीचें नाही, तसेंच प्रत्येकाने शिक्षकच झालें पाहिजे असेंहि नाही, किंवा प्रत्येकाने योद्धा बनलें पाहिजे असेंहि नाही; पण या जगांत विभिन्न देश विभिन्न प्रवृत्तींचें अनुसरण करतील आणि परिणामीं सगळेच देश मिळून या जगांत ते एक सुसंवाद निर्माण करतील.

विभिन्न देशांनी निर्माण केलेल्या या सुसंवादांत भारताने आध्यात्मिकतेचा सूर मिसळावा अशीच विधात्याची योजना दिसते. आणि मला याचा आनंद वाटतो की आपण ती उज्ज्वल परंपरा अजून गमावलेली नाही, की जी आपल्या महिमाशाली पूर्वजांनी--ज्यांच्याविषयी कोणत्याहि देशाला गर्व वाटेल अशा आपल्या पूर्वजांनी--आपल्या हातीं दिलेली आहे. यामुळे मला आशा वाटूं लागते, व आपल्या देशाच्या उज्ज्वल भवितव्याबद्दल दृढ विश्वास वाटतो. केवळ माझा व्यक्तिगत सन्मान करण्यांत आला म्हणून मला आनंद वाटतो असें नव्हे, तर आपल्या देशाचें हृदय अजून शाबूत आहे हें पाहून मला आनंद होत आहे. भारत अजूनहि जिवंत आहे; कोण म्हणतो की तो मृत आहे ? पण आपण कार्यशील आहोंत हें पाश्चात्त्यांना पाहावयाचें आहे. रणभूमीवर आपलें कर्तृत्व त्यांना पाहण्याची इच्छा असेल तर त्यांना निराशा पत्करावी लागेल,

कारण तें आपलें क्षेत्र नव्हे; त्याचप्रमाणे एखादें लढाऊ राष्ट्र आध्यात्मिकतेच्या क्षेत्रांत कर्तृत्व दाखवील अशी आशा केल्यास आपल्याहि पदरीं निराशाच येईल. पण पाश्चात्त्यांनी येथे यावें व आम्हीहि त्यांच्याइतकेंच कसें कार्यशील आहोंत व आमचा देश पूर्वीप्रमाणेच अजूनहि कसा जिवंत आहे तें त्यांनी पाहावें. आपली अधोगति झालेली आहे ही कल्पनाच आपण सोडून दिली पाहिजे; ती आपण जितकी दूर करूं तितकें चांगलें.

पण आता मला थोडे कठोर शब्द बोलले पाहिजेत. मला आशा आहे की आपण ते चांगल्या अर्थाने घ्याल. आताच अशी तक्रार करण्यांत आली की पाश्चात्त्य जडवादाने आपल्याला धुळीस मिळवून टाकलें आहे. हा कांही सगळा युरोपियन लोकांचा दोष नाही, तर बव्हंशीं तो आपलाच दोष आहे. वेदान्ती म्हणून कोणत्याहि गोष्टीकडे आपण आत्मनिरीक्षणाच्या दृष्टीने नेहमी पाहिलें पाहिजे, व आपला त्या गोष्टीशीं काय संबंध आहे या दृष्टीने पाहिलें पाहिजे. वेदान्ती म्हणून आपण हें निश्चितपणें जाणतों की जोंवर आपण स्वतःचें अनिष्ट करून घेत नाहीं तोंवर जगांतील कोणतीहि शक्ति आपलें अनिष्ट करूं शकत नाही. भारताची एकपंचमांश प्रजा मुसलमान बनली आहे. ज्याप्रमाणे पूर्वीचा इतिहास पाहिला असतां दोनतृतीयांश प्रजा बौद्ध झालेली दिसून येते त्याप्रमाणे आता एकपंचमांश प्रजा मुसलमान झाली आहे. ख्रिस्तीलोक आताच दहा लाखाहून अधिक झाले आहेत.

हा कोणाचा दोष आहे? अत्यंत स्मरणीय असे आपल्या एका इतिहासकाराचे बोल आहेत : "जवळ जीवनाचा अखंड झरा वाहत असतांना या बिचाऱ्या दुर्दैवी लोकांनी भूक व तहान यांच्या पायीं काय म्हणून मरावें?" प्रश्न असा आहे की, ज्यांच्यावर आपला धर्म सोडण्याची पाळी आली अशा लोकांकरिता आपण काय केलें आहे? त्यांना मुसलमान कां व्हावें लागलें? इंग्लंडमधील एका सत्शील मुलीविषयी मीं ऐकलें की ती वेश्या बनण्याचा विचार करीत आहे. एका कुलीन स्त्रीने, तसें न करण्याबद्दल तिला सांगितलें, तेव्हा ती म्हणाली, "मला सहानुभूति मिळविण्याचा हा एकच मार्ग शिल्लक आहे. मला आता कोणी वाली नाही; पण मला पतित होऊं द्या, माझी अवहेलना होऊं द्या; मग

कदाचित् दयाळू स्त्रिया माझ्याकडे येतील व मला घरीं नेऊन माझ्या-साठीं शक्य तें सर्वकांही करतील.'' आज आपण या परधर्मांत गेलेल्या बांधवांबद्दल शोक करीत आहोंत, पण यापूर्वी त्यांच्याकरिता आपण काय केलें ? आपल्यापैकी प्रत्येकाने स्वतःला विचारावें की आपण काय शिकलों ? आपण सत्याची मशाल हातीं धरली होती काय ? तसें असेल तर आपण तिचा प्रकाश कोठवर नेला ? त्या वेळीं आपण त्यांच्यासाठी कांहीं केलें नाही. हा प्रश्न आपण स्वतःला विचारला पाहिजे. आपण त्यांच्यासाठी कांही केलें नाही हा आपलाच दोष आहे, आपलेंच कर्म आहे. आपण कोणालाहि दोष देऊं नये, आपण आपल्या कर्मालाच दोष देऊं या. जडवाद, इस्लाम किंवा ख्रिस्तीधर्म वा जगांतील अन्य संप्रदाय यांना तुम्ही भारतांत पाय रोवूं दिले नसते तर ते येथे कधीच यश मिळवूं शकले नसते. दुराचरण, कदन्न, दैन्य व अनियमितपणा यांच्या-मुळे मानवी शरीर दुर्बल व क्षीण झाल्याशिवाय कोणतेहि रोगजंतु त्याच्यावर हल्ला करूं शकत नाहीत. सुदृढ शरीराचा मनुष्य विषारी जंतु भरपूर असलेल्या जागींहि बिनदिक्कतपणें वावरूं शकतो. तरीपण आपल्या जुन्या पद्धति सुधारण्याची वेळ अजूनहि गेलेली नाही. सर्व प्रकारचे जुने वाद सोडून द्या, निरर्थक गोष्टींबद्दलचे जुने झगडे विसरून जा, कारण या गोष्टी मूलतःच मूर्खपणाच्या आहेत. आपल्या अधोगतीच्या गेल्या पांचसहाशे वर्षांचा इतिहास पाहा, त्या वेळीं शेकडो वडीलधारी माणसें पेलाभर पाणी उजव्या हाताने प्यावें की डाव्या हाताने प्यावें, हात तीन वेळां धुवावा की चार वेळां, चुळा पांच वेळां भराव्यात की सहा वेळां असल्या विषयांवर वर्षानुवर्षें चर्चा करीत. असल्या क्षुल्लक विषयांवर चर्चा करण्यांत व त्यांच्यावर पांडित्यपूर्ण ग्रंथ लिहिण्यांत ज्यांनी आपलें आयुष्य वेचलें अशा लोकांकडून तुम्ही कसली अपेक्षा करणार ! आपला धर्म स्वयंपाकघरांत शिरण्याचा धोका दिसत आहे. आज आपल्यापैकी बहुतेकजण वेदान्तवादीहि नाहीत, पुराणवादीहि नाहीत वा तंत्रवादीहि नाहीत. आपण फक्त 'शिवूं नका'-वादी आहोंत. आपला धर्म स्वयंपाक-घरांत जाऊन बसला आहे. भाताचें भांडें झालें आहे आपला देव; आणि 'मला शिवूं नका, मी पवित्र आहें' हा झाला आहे आपला धर्म. आणखी शंभर वर्षें हें जर असेंच चाललें तर आपल्यापैकी प्रत्येकाला

वेड्यांच्या इस्पितळांत जावें लागेल. जेव्हा मन जीवनांतील उच्च तत्त्वें ग्रहण करूं शकत नाही त्या वेळीं हें असेंच घडत असतें; मेंदू दुर्बल झाल्याचेंच हें लक्षण आहे; या अवस्थेंत माणसाची सृजनशीलता लोप पावते, तो शक्तिहीन होऊन कृतिशून्य बनतो, तो विचारहि करूं शकत नाही व तो शक्य तितक्या लहान चाकोरींतच फिरत राहतो. तिच्या-बाहेर तो जाऊं इच्छीत नाही. ही अवस्था प्रथम झटकून फेकून दिली पाहिजे आणि सुदृढ व कृतिशील होऊन कार्याला सिद्ध झालें पाहिजे; मगच, आपल्याला आपल्या पूर्वजांपासून कधीहि न सरणारा अमूल्य ठेवा परंपरेने मिळाला आहे याची जाणीव होईल. जग आज या बहुमोल भांडाराची प्रतीक्षा करीत आहे. या ठेव्याचें आपण योग्य वितरण केलें नाहीं तर जगाचा नाश होईल. तो बाहेर आणा व सर्वांना वांटून द्या. व्यास म्हणतात—"या कलियुगांत दान हेंच एकमेव कर्म आहे; आणि सर्व प्रकारच्या दानांत अध्यात्मज्ञानाचें दान हें सर्वोच्च प्रतीचें आहे; त्यानंतर विद्यादान, मग प्राणदान, आणि शेवटीं अन्नदान असा हा क्रम आहे." अन्नदान आपण पुष्कळ केलेलें आहे. अन्य कोणत्याहि देशाने एवढें औदार्य दाखविलें नसेल. एखाद्या भिकाऱ्याच्याहि घरीं भाकरीचा एखादा तुकडा असल्यास त्यांतील अर्धा तो दुसऱ्याला देईल. हें दृश्य केवळ भारतांतच दिसून येतें. आपण अन्नदान पुष्कळच केलेलें आहे. आता अध्यात्मज्ञानाच्या व लौकिक विद्येच्या दानाकडे आपण लक्ष दिलें पाहिजे. आणि शूर व सुदृढ मनाचे होऊन आपण जर पूर्ण हृदय ओतून कामाला लागूं तर पंचवीस वर्षांत सर्व प्रश्न सुटतील, आणि मग आपण भांडत राहावें असें कांहीच उरणार नाही व सर्व भारत पुन्हा एकदा आर्यभूमि होऊन जाईल.

आज मला तुम्हांला एवढेंच सांगावयाचें आहे. माझ्या योजनां-बद्दल बोलत बसणें मला आवडत नाही; प्रत्यक्ष कार्य करून दाखविणें व मग बोलणें हेंच मला अधिक आवडतें. माझ्याजवळ माझ्या योजना आहेत, व ईश्वराची जर इच्छा असेल आणि मला जर तो पुरेसें आयुष्य देईल तर मी त्या कार्यान्वित करीन. मला या कार्यांत यश मिळेल किंवा नाही तें सांगतां येत नाही, परंतु एखादें महान् कार्य अंगिकारून त्याच्या-साठी जीवित कारणीं लावावें यांतच जीवनाचें सार्थक आहे. नाहीतर

मनुष्याचें हें क्षुद्र व पशुतुल्य जीवन दुसऱ्या कोणत्या मार्गानें सार्थकीं लागूं शकेल ? उच्च ध्येयाच्या पूर्तीसाठी तें वेचणें यांतच जीवनाचें खरें मूल्य आहे. हें महान् कार्य भारतांत पार पाडावयाचें आहे. सध्याच्या या धार्मिक नवजागृतीचें मी स्वागत करतों; आणि या संधीचा फायदा घेऊन जर मीं कार्य केलें नाही तर तो माझा मूर्खपणा ठरेल.

---

अनुक्रम ... दि. ...
क्रमांक ... ग्रं.

# मदुरा येथील मानपत्रास दिलेलें उत्तर

मदुरा येथील हिंदूंनी स्वामीजींना जें स्वागतपर मानपत्र अर्पण केलें तें पुढीलप्रमाणे होतें :—

परमपूजनीय स्वामीजी,

आम्हीं मदुरा येथील हिंदु नागरिक, या आमच्या प्राचीन व पवित्र शहरीं, अत्यंत अंतःकरणपूर्वक व आदराने आपलें स्वागत करीत आहोंत. स्वार्थाकडे घेऊन जाणारे सर्व ऐहिक पाश तोडून, आसक्तीचा त्याग करून केवळ दुसऱ्यांच्या कल्याणाचें व मानवजातीच्या आध्यात्मिक उन्नतीचें उदात्त कार्य अंगीकृत करणाऱ्या हिंदु संन्याशाचें आपण मूर्तिमंत उदाहरण आहांत. आपल्या स्वतःच्या जीवनाने आपण दर्शवून दिलें आहे की खरा हिंदुधर्म हा बाह्य विधि व अनुष्ठानें यांच्यांतच साठलेला नसून, हा धर्म म्हणजे दुःखितांना आणि पीडितांना मनःशांति व दिलासा देणारें एक उदात्त तत्त्वज्ञान आहे.

प्रत्येक व्यक्तीचा अधिकार व तिच्या भोवतालची परिस्थिति यांना अनुरूप अशा उपायांच्या द्वारें तिची उन्नति साधून देणारें जें तत्त्वज्ञान व जो धर्म आहे, त्यांच्याविषयी आदर बाळगण्यास आपण अमेरिका व इंग्लंड येथील लोकांना शिकविलें. गेलीं तीन वर्षें आपण आपली शिकवण जरी परदेशांतच दिली तरी याहि देशांत तिचें कांही कमी आस्थेने परिशीलन झालें नाही आणि तिने परकीय देशांतून आलेल्या वाढत्या जडवादाला थोपविण्याचें कार्यहि कांही कमी प्रमाणांत केलें नाही.

भारत आजहि जिवंत आहे, कारण जगाच्या व्यवहाराला आध्यात्मिक वळण देण्याचें कार्य त्याला पार पाडावयाचें आहे. कलियुगांतील या शतकाच्या अंतिम भागांत आपणांसारख्या एका थोर विभूतीचा आविर्भाव होणें हें निकटच्या भविष्यकाळांत या कार्याच्या पूर्तीसाठी थोर महात्मे निश्चितच अवतरणार आहेत याचें पूर्वचिन्हच आहे, असें आम्हांला वाटतें.

भारतीय तत्त्वज्ञानाचें आपण केलेलें सुयोग्य विवरण आणि मानव-

जातीची आपण केलेली अमूल्य सेवा यांच्याविषयी हार्दिक आदर व कृतज्ञता व्यक्त करण्यांत, प्राचीन शिक्षणाचें केंद्र, भगवान सुंदरेश्वरांचें आवडतें स्थान व योग्यांचें पवित्र द्वादशान्त क्षेत्र असें हें मदुरा नगर इतर भारतीय नगरांहून कोणत्याहि दृष्टीने मागे नाही.

आम्ही अशी प्रार्थना करतों की ईश्वराने जगाच्या कल्याणासाठी आपणांस उदंड आयुष्य, शक्ति व उत्साह द्यावा.

स्वामीजींनी या मानपत्राला पुढीलप्रमाणे उत्तर दिलें :—

आपणांबरोबर अनेक दिवस राहावें आणि आताच आपल्या मान्यवर अध्यक्षांनी सुचविल्याप्रमाणे, पाश्चात्त्य देशांत गेलीं सुमारें चार वर्षें मीं केलेल्या कार्याची काय फलनिष्पत्ति झाली आणि मला तेथे कोणते अनुभव आले हें सारें तुम्हांला सांगावें अशी माझी इच्छा आहे. पण दुर्दैवाने संन्याशांनाहि शरीर असतेंच, आणि मला जो सतत तीन आठवडे प्रवास करावा लागला व भाषणें द्यावीं लागलीं त्यांमुळे आज फार मोठें भाषण करणें मला अशक्य होत आहे. म्हणून, आपण प्रेमाने माझें जें स्वागत केलें त्याबद्दल आपले अत्यंत मन:पूर्वक आभार मानून तूर्त मी माझें समाधान करून घेतों आणि इतर गोष्टी पुढे केव्हातरी करण्यासाठी राखून ठेवतों. माझी प्रकृति जेव्हा अधिक चांगली असेल आणि जेव्हा मला जास्त सवड मिळेल तेव्हा आपण अनेक विषयांवर बोलूं शकूं. मदुरा येथे रामनदचे सुप्रसिद्ध व थोर राजेसाहेब यांचा पाहुणा म्हणून राहत असतांना प्रामुख्याने एक गोष्ट माझ्या मनांत येते. कदाचित् आपणांपैकी पुष्कळांना हें माहीत असेल की शिकागो येथे जाण्याची कल्पना प्रथम रामनदच्या राजेसाहेबांनीच माझ्या मनांत शिरविली आणि त्यांनीच त्यासाठी मला सतत मन:पूर्वक व शक्य तितकें साहाय्य केलें. म्हणूनच या मानपत्रांत केल्या गेलेल्या माझ्या स्तुतीचा मोठा भाग हा खरोखर दक्षिण भारताच्या या सुपुत्राकडे जाणें योग्य होईल. मला फक्त इतकेंच वाटतें की राजा होण्याऐवजी ते संन्यासी झाले असते तर अधिक चांगलें झालें असतें, कारण ते खरोखर संन्यासी होण्यासाठीच योग्य आहेत.

जगांतील कोणत्याहि भागांत जेव्हा एखाद्या गोष्टीची खरोखरच

आवश्यकता निर्माण होते तेव्हा जगाच्या दुसऱ्या भागांतून तिची पूर्ति होते आणि त्या भागाला नवजीवन लाभतें. हें जसें भौतिक क्षेत्रांत खरें आहे तसेंच तें आध्यात्मिक क्षेत्रांतहि खरें आहे. जगांत एखाद्या ठिकाणीं आध्यात्मिकतेचा अभाव असेल, आणि त्याच वेळीं अन्यत्र ती आध्यात्मिकता असेल, तर आपण जाणूनबुजून प्रयत्न केला किंवा न केला तरी ती आध्यात्मिकता त्या भागाकडे आपोआप जाईल व तेथील अभाव दूर करून जगांतील ही विषमता नष्ट करील. मानवजातीचा इतिहास पाहिला असतां आपल्याला असें आढळून येईल की एकदोनदा नव्हे, तर कित्येकदा जगाला आध्यात्मिकता पुरविण्याचें कार्य भारताच्या वांट्याला आलें आहे. आपल्याला असें आढळतें की जेव्हा म्हणून प्रचंड विजयामुळे किंवा व्यापारी प्रभुत्वामुळे जगाचे विविध भाग एकत्र जोडले गेले आणि एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत विविध गोष्टींचा विनिमय सुरू झाला तेव्हा प्रत्येक देशाने आपापला राजकीय, सामाजिक वा आध्यात्मिक ज्ञानाचा निधि इतर देशांना वांटला. भारताने मानवी ज्ञानांत अध्यात्माची व तत्त्वज्ञानाची भर घातली. पर्शियन साम्राज्याचा उदय होण्याच्या कितीतरी पूर्वी भारताने हें कार्य केलें; नंतर पर्शियन साम्राज्याच्या काळांत, त्यानंतर ग्रीकांच्या आमदानींत, आणि आता या इंग्रजी सत्तेच्या काळांत भारत पुन्हा एकदा आपलें हें कार्य पार पाडणार आहे. संघटित रीतीने केलेलें कार्य आणि बाह्य सुधारणा यांच्यासंबंधीच्या पाश्चात्त्य कल्पना, आपली इच्छा असो वा नसो, या देशांत शिरून प्रसृत होत आहेत. तसेंच भारतीय अध्यात्म व तत्त्वज्ञान पाश्चात्त्य भूमींत झपाट्याने मूळ धरीत आहेत. ही गोष्ट कोणीहि रोधूं शकत नाही व आपणहि पश्चिमेकडून येणारी भौतिक सभ्यता पूर्णपणें रोधूं शकणार नाहीं. मला वाटतें की थोडीबहुत भौतिक सभ्यता आपल्याला हितकारक ठरेल, आणि पाश्चात्त्यांनाहि थोडीबहुत आध्यात्मिकता हितकारक ठरेल. याप्रमाणे दोन्ही ठिकाणीं समतोलपणा राखला जाईल. पश्चिमेकडून आपल्याला सर्वकांही शिकलें पाहिजे असें नाही व त्यांनाहि आपल्याकडून सर्व गोष्टी शिकल्या पाहिजेत असें नाही; पण स्वत:जवळ जें कांही चांगलें असेल तें भावी पिढीच्या हातीं सुपुर्त करून सर्व देशांमधे सुसंवाद निर्माण करण्याचें, एक आदर्श जग निर्माण करण्याचें युगांचें

स्वप्न साकार करण्यास प्रत्येकाने हातभार लावला पाहिजे. असें आदर्श जग कधी निर्माण होईल किंवा नाही हें मला माहीत नाही; अशी सामाजिक परिपूर्णता कधीकाळीं येईल की नाही याविषयी मला शंका वाटते; परंतु ती येवो वा न येवो, आपल्यापैकीं प्रत्येकाने ती आणण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे; उद्याच ती अवस्था येईल अशा कल्पनेने व ती आपल्याच परिश्रमांवर अवलंबून आहे असें समजून प्रत्येकाने काम केलें पाहिजे. आपल्यापैकी प्रत्येकाने अशी श्रद्धा बाळगली पाहिजे की जगांतील इतर प्रत्येकाने आपलें कार्य पार पाडलें असून, जगाला पूर्णता प्राप्त करून देण्याचें उर्वरित कार्य आपल्यालाच करावयाचें आहे. आपण घ्यावयाची जबाबदारी ही अशा स्वरूपाची आहे.

असो, भारतांत धर्माचें प्रचंड पुनरुत्थान होत आहे. समोर जशीं वैभवाचीं चिन्हें दिसत आहेत तसेंच धोक्याचे कंदीलहि दिसत आहेत; कारण अशा पुनरुत्थानांतून कधी कधी धर्मवेडेपणा निर्माण होतो, आणि कधी कधी पुनरुत्थानाची ही प्रक्रिया अतिरेकास जाते व एकदा ती मर्यादेपलीकडे गेली की मग ज्यांनी ती सुरू केली त्यांनाहि तिचें नियंत्रण करतां येत नाही. म्हणून आधीपासून सावध असणें बरें. आपल्याला याकरिता पुढील दोन गोष्टी टाळून मधला मार्ग स्वीकारला पाहिजे. एक म्हणजे खुळचट समजुतींनी भरलेला पुराणमतवाद आणि दुसरी म्हणजे जडवाद--युरोपांतील नास्तिकता व तथाकथित सुधारणा. हा जडवाद पाश्चात्त्यांच्या प्रगतीच्या अगदी मुळापर्यंत शिरलेला आहे. या दोन्ही गोष्टींपासून आपण सावध राहिलें पाहिजे. पहिली गोष्ट अशी की, आपण कांही पाश्चात्त्य होऊं शकणार नाहीं; म्हणून पाश्चात्त्यांचें अनुकरण करणें व्यर्थ आहे. समजा तुम्हीं त्यांचें अनुकरण केलें, तर त्याच क्षणीं तुमचा मृत्यु ओढवेल आणि तुमचा प्राण निघून जाईल. दुसरें असें की, असलें अनुकरण करणें अशक्य आहे. कालाच्या आरंभीं उगम पावलेली नदी मानवी इतिहासाच्या लक्षावधि युगांतून वाहत आलेली आहे; तुमची अशी कल्पना आहे काय की तिला तुम्ही पुनः तिच्या उगमस्थानीं, हिमालयांतील त्या हिमनदींत नेऊन सोडूं शकाल? हें जरी शक्य झालें तरी तुम्ही युरोपीय वृत्तीचे कधी होऊं शकणार नाही. युरोपांतील लोकांना त्यांची कांही शतकांची संस्कृति सोडून देणें जर शक्य

नाही तर मग कित्येक युगांची तेजस्वी अशी ही तुमची संस्कृति सोडून देणें तुम्हांला शक्य होईल असें तुम्हांला वाटतें काय ? तें शक्य नाही. त्याचबरोबर आपण हेंहि ध्यानीं घेतलें पाहिजे की ज्याला आपण आज सामान्यत: आपला धर्म म्हणतों तो निरनिराळ्या ठिकाणच्या लहान लहान ग्रामदेवतांमधे आणि क्षुद्र क्षुद्र खुळचट रूढींमधे सामावलेला आहे. पण स्थानिक रूढि असंख्य आहेत व त्या परस्परविरोधीहि आहेत. त्यांतील आपण कोणत्या पाळावयाच्या व कोणत्या नाहीत ? उदाहरणार्थ दक्षिण भारतांतील ब्राह्मण दुसऱ्या ब्राह्मणाला मांस भक्षण करतांना पाहून आश्चर्यचकित होतो व त्याला ती गोष्ट भयंकर वाटते; पण यज्ञांत शेकडो बोकड बळी देऊन त्यांचें मांस प्रसाद म्हणून भक्षण करणें ही गोष्ट उत्तर भारतांतील ब्राह्मणाला गौरवाची व पुण्यप्रद वाटते. तुम्हीं आपली रूढि प्रमाण म्हणून पुढे मांडली की तेहि त्यांची रूढि प्रमाण म्हणून पुढे मांडतील. भारतांत सर्वत्र अनेक प्रकारच्या रूढि आहेत, पण रूढि म्हणजेच खरा धर्म, अशी अज्ञानी लोक जी समजूत करून घेतात त्यांतच त्यांची मोठी चूक होत असते.

पण याहिपेक्षा अधिक मोठी अशी एक अडचण आहे. आपल्या शास्त्रांमधून दोन प्रकारचीं सत्यें सांगितलेलीं आहेत. पहिल्या प्रकारचीं सत्यें मनुष्याच्या शाश्वत स्वरूपावर आधारलेलीं असतात––ह्यांत ईश्वर, आत्मा व प्रकृति यांच्यांतील नित्य संबंधाचा विचार केलेला असतो; आणि दुसऱ्या प्रकारचीं सत्यें त्या त्या काळांतील स्थानिक परिस्थिति व त्या त्या काळांतील सामाजिक संस्था इत्यादींचा विचार करीत असतात. पहिल्या प्रकारचीं सत्यें वेदादि श्रुतिग्रंथांतून सांगितलेलीं असून, दुसऱ्या प्रकारचीं सत्यें पुराणांतून व स्मृतिग्रंथांतून वर्णिलेलीं आहेत. आपण हें ध्यानीं घेतलें पाहिजे की वेद हे सर्वकालीं आपलें अंतिम लक्ष्य व अंतिम प्रमाणभूत असे ग्रंथ आहेत. पुराणांचा जो भाग वेदांना विरोधी असेल तो भाग पूर्णपणें त्याज्य मानला पाहिजे. या सर्व स्मृतिग्रंथांची शिकवण समान नाही असें आपल्याला आढळतें. एक स्मृति म्हणते, 'ही रूढि आहे व तिचें पालन करणें हा या युगांतील धर्म आहे'; दुसरी स्मृति सांगते की, 'या युगाचा धर्म हा असा आहे', इत्यादि इत्यादि. एखादा विशिष्ट आचार सत्ययुगासाठी आहे आणि दुसरा एखादा

आचार कलियुगाकरिता आहे असेंहि कांही स्मृतींत आढळतें. आता तुमच्या शास्त्रांतील पुढील सिद्धान्त अत्यंत मोलाचा आहे : सनातन स्वरूपाचीं सत्यें हीं मानवाच्या शाश्वत स्वरूपावर आधारलेलीं असल्यामुळे जोंवर मानवाचें अस्तित्व राहील तोंवर त्यांच्यांत मुळीच बदल होणार नाही; तीं सर्वकाळीं, सर्वत्र व सर्वांच्या पक्षीं आचरणीय आहेत. परंतु स्मृतीमधे बहुधा विशिष्ट स्थानीं व विशिष्ट परिस्थितींत आचरावयाचीं कर्तव्यें सांगितलेलीं असतात, आणि म्हणून कालमानानुसार तीं बदलत असतात. तुम्हीं ही गोष्ट नित्य ध्यानीं घेतली पाहिजे की, एखादी क्षुद्र सामाजिक रूढि बदलली म्हणजे कांही तुमचा धर्म बुडत नाही, मुळीच बुडत नाही. लक्षांत ठेवा की रूढि ह्या नेहमीच बदलत आल्या आहेत. याच भारतांत असा एक काळ होता की, गोमांस खाल्यावांचून ब्राह्मण हा ब्राह्मण राहूं शकत नसे; वेदांत तुम्हांला आढळेल की जेव्हा एखादा संन्यासी, राजा किंवा थोर पाहुणा घरीं येई तेव्हा उत्तम बैल मारण्यांत येत असे. नंतर पुढे लोकांच्या लक्षांत आलें की आपला कृषिप्रधान देश आहे, म्हणून उत्तम उत्तम बैलांची हत्या केल्याने आपल्या वंशांचा समूळ नाश होऊन जाईल. म्हणून ही रूढि बंद पडली व गोहत्या ही निषिद्ध मानली गेली. आज आपल्याला भयंकर वाटणाऱ्या रूढि एकेकाळीं विद्यमान होत्या हें आपल्याला जुन्या ग्रंथांवरून कळून येतें. कालाच्या ओघांत दुसरे कांही नियम केले गेले. तेहि निरुपयोगी ठरून कालौघांत विलीन होतील व दुसऱ्या स्मृति तयार होतील. आपण ही एक महत्त्वाची गोष्ट समजून घेतली पाहिजे की, वेद नित्य असल्याने ते सर्वकाळांत ग्राह्य आहेत, पण काळांत परिवर्तन होतांच स्मृतिप्रामाण्य लोप पावेल. काळ जसजसा लोटेल तसतशा स्मृति एकामागून एक लोप पावतील, नवीन नवीन ऋषि जन्म घेतील व ते परिवर्तन घडवून आणून समाजाला अधिक चांगल्या मार्गांनीं नेतील; जीं कर्तव्यें व जे मार्ग त्या त्या काळासाठी अत्यावश्यक आहेत व ज्यांचें अवलंबन केल्याविना समाज जिवंत राहूं शकणार नाही तीं कर्तव्यें व ते मार्ग हे ऋषि समाजाला दाखवून देतील. याप्रमाणे दोन्ही प्रकारचे धोके टाळून आपल्याला मार्गक्रमण केलें पाहिजे; आणि मला आशा आहे की येथे असलेल्या प्रत्येकाच्या ठायीं विशाल दृष्टिकोन व श्रद्धा हीं दोन्हीं असतील. असें असेल

तरच मी जें म्हणालों तें तुम्हांला कळेल. माझ्या म्हणण्याचें तात्पर्य हेंच की आपल्याला सगळ्यांना सामावून घ्यावयाचें आहे, कुणालाहि वगळावयाचें नाही. मला धर्मवेडया माणसाची उत्कटता व जडवाद्याची व्यापकता ह्या दोन्ही हव्या आहेत. आपलें हृदय महासागराप्रमाणे सखोल व आकाशाप्रमाणे व्यापक असलें पाहिजे. जगांतील सर्वांत प्रगतिशील राष्ट्राइतकें आपल्याला प्रगतिशील झालें पाहिजे आणि त्याचबरोबर आपल्या प्राचीन परंपरांशीं प्रामाणिक राहिलें पाहिजे व त्यांच्याविषयी अभिमान बाळगला पाहिजे. प्राचीन परंपरांसंबंधी निष्ठा व अभिमान कसा बाळगायचा हें फक्त हिंदूंनाच कळतें.

अधिक सोप्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे प्रत्येक बाबतींत सारभूत महत्त्वाचा भाग कोणता व गौण भाग कोणता हा फरक ओळखण्यास आपण शिकलें पाहिजे. जो सारभूत महत्त्वाचा भाग असतो तो नित्य असतो आणि गौण गोष्टी ह्या तात्कालिक महत्त्वाच्या असतात. आणि जर विशिष्ट काळानंतर ह्या गौण गोष्टींच्या जागीं दुसऱ्या अधिक उपयुक्त गोष्टी आणल्या नाहीत तर त्यांच्यापासून खरोखरच धोका असतो. माझ्या म्हणण्याचा असा अर्थ नाही की तुम्हीं लगेच सर्व जुन्या चालीरीतींची व पद्धतींची निंदा करण्यास सिद्ध व्हावें. निश्चितच नाही; त्यांच्यापैकी अत्यंत दुष्ट रूढींचीहि तुम्हीं निंदा करूं नये. कशाचीहि निंदा करूं नका. आज ज्या रूढि अगदी निश्चितपणें दुष्ट वाटतात त्या पूर्वी केव्हातरी अत्यंत उपयुक्त व जीवन देणाऱ्या होत्या. आणि अशा रूढि काढून टाकावयाच्या असतील तर तसें करतांना आपण त्यांना शिव्याशाप देऊं नयेत, तर त्यांनी समाजधारणेचें जें उज्ज्वल कार्य पूर्वी केलें त्याबद्दल आपण आदर व कृतज्ञता व्यक्त केली पाहिजे. आणि आपण हें लक्षांत घेतलें पाहिजे की राजे किंवा सेनापति हे कधीच आपल्या समाजाचे नेते नव्हते, तर ऋषि हेच सर्वदा आपल्या समाजाचे नेते होते. आणि ऋषि कोणाला म्हणतात ? उपनिषदांत म्हटल्याप्रमाणे ऋषि हे सामान्य मानव नव्हत, तर ते मंत्रद्रष्टे होत. त्यांनी धर्माचा प्रत्यक्ष साक्षात्कार करून घेतलेला असतो, त्यांच्या पक्षीं धर्म हा केवळ पुस्तकी ज्ञान, वितंडवाद, तर्कवितर्क वा शाब्दिक कसरत अशा स्वरूपाचा नसतो, तर त्यांचा धर्म म्हणजे प्रत्यक्षानुभूति—इंद्रियातीत सत्यांची

प्रत्यक्षानुभूति हाच असतो. यालाच 'ऋषित्व' म्हणतात, आणि या ऋषित्वाचा लाभ देश, काल, जाति व संप्रदाय यांपैकी कशावरहि अवलंबून नसतो. वात्स्यायन म्हणतात की प्रत्येकाने सत्याचा साक्षात्कार करून घेतला पाहिजे; आणि आपण हें ध्यानीं घेतलें पाहिजे की तुम्हांला, मला व आपल्यापैकी प्रत्येकाला 'ऋषि' बनावें लागेल. आपल्या ठायीं आत्मविश्वास असला पाहिजे, आपण जग हलवून सोडलें पाहिजे, कारण सर्व शक्ति आपल्या आंतच आहे. आपण धर्माचा प्रत्यक्ष साक्षात्कार करून घेतला पाहिजे. त्यानेच आपले सर्व संशय दूर होतील; आणि ऋषित्वाच्या तेजाने युक्त होऊन आपल्यापैकी प्रत्येकजण महापुरुष बनेल; मग आपल्या तोंडून बाहेर पडणारा प्रत्येक शब्द हा अमोघ व अनंत सामर्थ्यसंपन्न असेल; मग आपल्या समोरून जें कांही वाईट आहे तें आपोआप नाहीसें होईल; मग त्याकरिता आपल्याला कुणाचीहि निंदा करावी लागणार नाही, कुणाला शिव्याशाप द्यावे लागणार नाहीत व कोणाशींहि कलह करावा लागणार नाही. स्वतःची व इतरांची मुक्ति साधण्यासाठी आपल्यापैकी प्रत्येकाला ऋषित्व प्राप्त करून घेण्यास ईश्वर साहाय्य करो.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे. ग्रंथालय
अनुक्रम 37695 वि:
क्रमांक नों: दि:

# वेदान्ताचें कार्य

स्वामीजींनी कुंभकोणम्‌ला भेट दिली त्या वेळीं तेथील हिंदु जनतेने त्यांना पुढीलप्रमाणे मानपत्र दिलें :—

वंदनीय स्वामीजी,

पाश्चात्त्य जगतांतून परत येऊन या आमच्या पवित्र व विशाल मंदिरें असलेल्या व साधुसंतांच्या वास्तव्याने पुनीत झालेल्या भूमींत आज आपण आलां आहांत; आमच्या या प्राचीन व धार्मिकदृष्टया महत्त्वाच्या अशा कुंभकोणम् नगरांतील हिंदु जनतेच्या वतीने आम्ही आपलें हार्दिक स्वागत करीत आहोंत. हिंदु तत्त्वज्ञान व धर्म हीं एवढीं व्यापक व तर्कसंगत आहेत की त्यांच्या ठिकाणीं, सर्व प्रकारच्या ईश्वरविषयक व धर्मविषयक मतांसंबंधी आदर बाळगून त्यांचा समन्वय करण्याचें सामर्थ्य आहे, हें शिकागो येथे जमलेल्या प्रमुख धर्मांच्या निवडक प्रतिनिधींच्या मनावर परिणामकारकरीतींने बिंबविण्याची शक्ति देऊन, आपलें युरोप व अमेरिका येथील धार्मिक कार्य ईश्वराने अत्यंत यशस्वी केलें याबद्दल आम्ही त्याला अंत:करणपूर्वक धन्यवाद देत आहोंत.

हजारो वर्षांपासून आमची अशी जिवंत श्रद्धा आहे की विश्वाचा प्राण असलेल्या परमात्म्याच्या कृपेने सत्याचाच चिरकाल जय होत असतो. आणि ख्रिस्ती देशांतील आपल्या धार्मिक कार्याच्या सफलतेमुळे आम्हांला जो आनंद होत आहे तो यासाठी की, अत्यंत धर्मपरायण अशा या हिंदुभूमींतील अमूल्य आध्यात्मिक संपत्तीकडे आपल्या या कार्यामुळे भारतांतील व भारताबाहेरील लोकांचें लक्ष वेधलें जात आहे. आपल्या कार्यांतील यशामुळे आपल्या सुप्रसिद्ध व महान् अशा गुरुदेवांची कीर्ति द्विगुणित झाली आहे; आपल्या यशामुळे सुसंस्कृत जगांत आमचा आदरहि केला जात आहे; याहिपेक्षा म्हणजे आपल्या यशामुळे आम्हांला वाटूं लागलें आहे की, आमच्या प्राचीन पराक्रमाबद्दल व वैभवाबद्दल आम्हीं सार्थ अभिमान बाळगावा, आणि आम्हांला जाणीव झाली की, आपल्या संस्कृतींतील आक्रमक प्रवृत्तीचा अभाव हा कांही तिच्या क्षीणतेचें वा अध:पतनाचें चिन्ह नव्हे. आपल्यासारखे सर्वदर्शी, एकनिष्ठ व

पूर्णतया निःस्वार्थ कार्यकर्ते आमच्यामधे असतांना या हिंदुभूमीचें भवितव्य उज्ज्वल आणि आशादायकच राहणार यांत संशय नाही. अखिल जगाचा--सर्व राष्ट्रांचा जो ईश्वर आहे तो आपणांस दीर्घ आयुष्य व आरोग्य देवो आणि हिंदुधर्म व तत्त्वज्ञान यांची सुयोग्य शिकवण देण्याचें महान् व उदात्त कार्य करण्यासाठी आपणाला उत्तरोत्तर बलसंपन्न करो व आपल्या हृदयांत नवीन नवीन ज्ञान प्रस्फुरित करो.

नगरांतील हिंदु विद्यार्थ्यांनीहि या प्रसंगीं आणखी एक मानपत्र स्वामीजींना अर्पण केलें.

नंतर स्वामीजींनी 'वेदान्ताचें कार्य' या विषयावर पुढीलप्रमाणे भाषण केलें :--

अत्यल्प असें धर्माचें कार्य जरी केलें तरी त्याचा मोठा परिणाम घडून येतो. गीतेंतील या वचनाला एखादें उदाहरण हवें असेल, तर मी म्हणूं शकतों की या वचनाचें प्रत्यंतर माझ्या क्षुद्र जीवनांत मला प्रत्यहीं येत आहे. माझें कार्य तर अत्यल्प आहे, पण कोलंबोपासून येथवरच्या प्रवासांत ठिकठिकाणीं माझें जें स्नेहपूर्वक आणि अगत्यानें स्वागत झालें तें माझ्या अपेक्षेबाहेरील होतें. पण त्याबरोबरच तें हिंदूंच्या परंपरा व स्वभाव यांना अगदी साजेलसेंहि आहे, कारण हिंदुलोकांची जीवनशक्ति, त्यांचें सर्वस्व आणि त्यांच्या जीवनाचें सार म्हणजे धर्म हेंच होय. पौर्वात्य आणि पाश्चिमात्त्य देशांत प्रवास करून मीं थोडेंफार जग पाहिलें आहे; मला असें दिसलें की प्रत्येक जातीचा एकेक विशिष्ट आदर्श असून तोच तिचा मुख्य आधार आहे--तिचा कणा आहे. राजकारण हा कांही जातींचा जीवनाधार आहे; कांहींचा जीवनाधार सामाजिक उन्नति हा आहे, कांहींचा बौद्धिक उन्नति, तर कांहींचा आणखी कांही जीवनाधार आहे. पण या आपल्या मातृभूमीचा धर्म हाच एकमेव जीवनाधार आहे आणि धर्माच्या पायावरच येथील जीवनाची सर्व इमारत उभारलेली आहे. आपणांपैकी कांहींना हें आठवत असेल की, मद्रास येथील लोकांनी, मी अमेरिकेंत असतांना मला पाठविलेल्या अभिनंदनपत्राला दिलेल्या उत्तरांत मीं हें नमूद केलें होतें की, भारतांतील एखाद्या शेतकऱ्याला असलेलें धार्मिक ज्ञान पाश्चात्त्य देशांतील अनेक सभ्य गृहस्थांपेक्षा कितीतरी बाबतींत सरस आहे; आणि आज त्या माझ्या शब्दांची

यथार्थता मी स्वत: नि:संशय अनुभवीत आहें. एक असा काळ होता की मला भारतांतील लोकांच्या अजाणपणाबद्दल असमाधान वाटत असे, व सर्वसाधारण गोष्टींची जिज्ञासा त्यांना नाही असें वाटे, पण आता मला त्याचें रहस्य कळलें आहे. ज्या गोष्टींची त्यांना आवड आहे त्या-विषयीचें ज्ञान प्राप्त करण्यासाठी ते मला माझ्या प्रवासांत आढळलेल्या अन्य कोणत्याहि देशांतील लोकांपेक्षा, अधिक उत्सुक आहेत. युरोपांतील राजकीय परिवर्तनाविषयी किंवा तिकडील सामाजिक घडामोडीविषयी आमच्या शेतकऱ्यांना विचारा, त्यांना त्याविषयी कांहीच माहिती नसेल, आणि त्याची त्यांना गरजहि वाटत नसेल; पण तेच शेतकरी, फार काय, भारताहून कितीतरी बाबतींत दूर असलेले व भारतांतील गोष्टींशीं फारसा संबंध नसलेले असे सिलोनांतील शेतकरी पाहा,--मला असें आढळलें की तेथे शेतांत काम करणाऱ्या लोकांनाहि हें माहीत होतें की अमेरिकेंत सर्वधर्मपरिषद भरली होती आणि भारतांतील एक संन्यासी तेथे गेले होते व त्यांना तेथे कांहीं यशहि मिळालें.

म्हणूनच ज्या गोष्टींविषयी त्यांना आवड आहे त्यांबद्दल अन्य कोणत्याहि समाजाप्रमाणे ते जिज्ञासूहि आहेत; आणि भारतामधे धर्म हीच लोकांच्या आवडीची एकमेव अशी गोष्ट आहे. एखाद्या समाजाचें जीवन धार्मिक आदर्शांवर आधारलेलें असावें की राजकीय आदर्शांवर आधारलेलें असावें याचें विवेचन आज मला करावयाचें नाही, पण आपल्याला हें स्पष्ट झालें आहे की, बरें वा वाईट कसेंहि असो, आपली जीवनशक्ति धर्मांतच केंद्रित झालेली आहे. तुम्हांला ही गोष्ट बदलतां येणार नाही, ही गोष्ट नष्ट करून तिच्या जागीं दुसऱ्या एखाद्या गोष्टीची प्रतिष्ठापना करतां येणार नाही. एखादा मोठा विकासशील वृक्ष उपटून, दुसऱ्या ठिकाणीं त्यास रुजवितां येणें शक्य नाही. बरें असो वा वाईट, धार्मिक आदर्श हे भारतामधे हजारो वर्षे परंपरेनें चालत आले आहेत; बरें असो वा वाईट, भारतांतील वातावरण शतका-नुशतकें धार्मिक आदर्शांनी प्रभावित झालेलें आहे; बरें असो वा वाईट, आपण अशा या धार्मिक आदर्शांच्या वातावरणांत लहानाचे मोठे झालों आहोंत; आता हा धर्मभाव आपल्या रक्ताचा गुणधर्म झालेला असून आपल्या नसानसांतून तो वाहत आहे, आपल्या प्रकृतीशीं तो एकरूप

होऊन आपल्या जीवनाचें सारच बनलेला आहे. तेवढी विरोधी शक्ति उभी केल्याशिवाय व धर्माच्या या प्रचंड प्रवाहाने गेल्या हजारो वर्षांत तयार केलेलें नदीचें पात्र भरून काढल्याशिवाय आपण हा धर्म बाजूला सारूं शकाल काय ? तुम्हांला असें वाटतें काय की गंगेने पुन: आपल्या हिममय उगमस्थानीं परतून नवीन मार्गाने आपला प्रवाह सुरू करावा ? आणि जरी हें शक्य झालें तरी या देशाला स्वत:चें वैशिष्टच असें धार्मिक जीवन कधीहि सोडतां येणें व त्याऐवजी नवीन राजकीय व अन्य मार्ग स्वीकारणें शक्य नाही. किमान प्रतिरोधाच्या नियमानुसारच तुम्ही कार्य करूं शकाल, व धार्मिक जीवनपद्धति हाच भारतांतील किमान प्रतिरोधाचा मार्ग आहे. धर्माचा हा मार्ग अनुसरणें हाच भारताचें जीवन पुष्ट करण्याचा, भारताच्या विकासाचा आणि त्याच्या कल्याणाचा उपाय आहे.

अन्य देशांतून धर्म ही बाब जीवनांतील गरजेच्या अनेक गोष्टींपैकी एक मानली जाते. मी नेहमी उपयोगांत आणीत असलेलें एक परिचयांतील उदाहरण द्यावयाचें झाल्यास तें असें : दिवाणखान्यांत पुष्कळ वस्तु ठेवलेल्या असतात, आणि जपानी पद्धतीचें एखादें पात्र दिवाणखान्यांत ठेवणें ही आजकालची फॅशन आहे, तें नसल्यास दिवाणखान्याला शोभा येत नाही असें गृहिणीला वाटतें, म्हणून ती तें पात्र दिवाणखान्यांत ठेवतेच. त्याचप्रमाणे गृहिणीला वा गृहस्थाला जीवनांत दुसरे पुष्कळ उद्योग असतात आणि कांही उणीव राहूं नये म्हणून जीवनांत थोडासा धर्महि हवा असतो. म्हणून ती वा तो अल्पसा धर्म आचरूं लागतो. राजकारण व सामाजिक उन्नति—एका शब्दांत सांगायचें म्हणजे हें जगच पाश्चात्त्यांच्या जीवनाचें एकमेव लक्ष्य आहे, आणि ईश्वर व धर्म हे या लक्ष्याच्या पूर्तीसाठी साधनें म्हणूनच त्यांच्या जीवनांत येत असतात. त्यांचा ईश्वर म्हणजे त्यांच्यासाठी हें जग स्वच्छ करणारी व तें सुखोपभोगाच्या साधनांनी भरून ठेवणारी एक व्यक्तिच असते असें म्हणावें लागतें. त्यांच्या दृष्टीने ईश्वराचें एवढेंच मूल्य आहे. तुम्हांला हें माहीत नाही काय, की ज्या लोकांना अधिक कळावयास हवें होतें व जे स्वत:ला अधिक कळतें असें मानतात त्यांच्या तोंडून गेलीं शेदोनशे वर्षें भारतीय धर्मावर टीका करणारी कोणतीं विधानें बाहेर

73755

पडत आहेत ? तीं हींच की, 'आपला धर्म या जगांतील सुखसमृद्धीसाठी साहाय्य करीत नाही, तो आपल्याला धनसंपत्ति मिळवून देत नाही, इतर राष्ट्रांना लुबाडण्यास सांगत नाही, तो बलवानांना दुर्बलांच्या उरावर नाचण्याची प्रेरणा देत नाही, व त्यांच्या रक्ताने आपलें पोषण करण्यास सांगत नाही.' आपला धर्म निश्चितच या साऱ्या गोष्टी करीत नाही. ज्यांच्या पायांनी पृथ्वी कंप पावावी असें सैन्य तयार करून मानववंशाचें निर्मूलन व त्याचा विध्वंस करण्यासाठीं तो तें कधीच पाठविणार नाही. म्हणूनच 'या धर्मांत काय आहे ?' असें ते म्हणत असतात. ते म्हणतात, 'हा धर्म कांहीच ऐहिक लाभ करून देत नाही व शरीर बलसंपन्न करीत नाही, तेव्हा अशा धर्मांत काय अर्थ आहे ?'

त्यांच्या हें क्वचितच ध्यानीं येतें की याच युक्तिवादाने आमच्या धर्माचें श्रेष्ठत्व सिद्ध होतें. आमचा धर्म ऐहिक सुख मिळवून देत नाही, म्हणूनच तो श्रेष्ठ आहे. आपल्याच धर्माला खऱ्या अर्थाने धर्म म्हणतां येईल, कारण हें क्षणभंगुर इंद्रियगम्य जगच आपलें अंतिम उद्दिष्ट आहे असें तो शिकवीत नाही. अत्यंत मर्यादित अशा या जगापुरतीच आपल्या धर्माची दृष्टि सीमित नाही. आपल्या धर्माची दृष्टि या जगाच्या पलीकडे अगदी दूरच्या राज्यापर्यंत पोहोचते—तें राज्य इंद्रियांच्या पलीकडे आहे, स्थलकालाच्या अतीत आहे, तें या साऱ्यांच्या इतकें पलीकडे आहे की तिथे या जगांतील सुखदुःखांचा मागमूसहि उरत नाही आणि तिथे पोहोचल्यावर हें समग्र विश्व त्या महिमामय सर्वातीत आत्मसागरांतील एखाद्या क्षुद्र बिंदूप्रमाणे होऊन जातें. आपलाच धर्म हा खऱ्या अर्थाने धर्म आहे, कारण तो असें शिकवितो की ईश्वरच केवळ सत्य आहे, हें जग अनित्य व असत्य आहे, कांचन हें मातीप्रमाणे तुच्छ आहे आणि मानवाच्या सर्व शक्ति मर्यादित असून, जीवन हेंच पुष्कळदा अनिष्टकारक ठरत असतें. म्हणूनच आपला धर्म हाच खरा धर्म आहे. सर्वांत महत्त्वाची गोष्ट ही की आपला धर्म त्यागाची शिकवण देतो, म्हणून तोच खऱ्या अर्थाने 'धर्म' या संज्ञेस पात्र आहे. शेकडो युगांपासून संचित केलेल्या ज्ञानाच्या बळावर उभे राहून, आमच्या प्राचीन महाज्ञानी पूर्वजांच्या तुलनेने जे लोक लहान लहान बालकांसारखे आहेत त्यांना आपला धर्म खणखणीत शब्दांत स्पष्टपणें सांगतो कीं, "बाळांनो, तुम्ही

इंद्रियांचे गुलाम आहांत, या इंद्रियांचे भोग क्षणभंगुर आहेत आणि हीं इंद्रियें शेवटीं आपल्याला विनाशाकडेच घेऊन जातात. येथील चार दिवसांच्या विलासाने अखेरीस सर्वनाश मात्र ओढवतो. या सर्वांचा त्याग करा, इंद्रियें व जग यांविषयीची आसक्ति सोडून द्या; हाच धर्माचा मार्ग आहे." ध्येयसिद्धीचा मार्ग त्यागांतून आहे, भोगांतून नाही. म्हणूनच खऱ्या अर्थाने 'धर्म' या संज्ञेला आपलाच धर्म पात्र आहे.

ही मोठी विलक्षण गोष्ट आहे कीं या जगाच्या रंगभूमीवर राष्ट्रामागून राष्ट्रें आलीं, त्यांनी आपला अभिनय किंचित्काळ मोठ्या जोमाने करून दाखविला आणि कालाच्या या अथांग महासागरावर प्रायः कसलेंहि चिन्ह वा तरंगहि न उमटवितां तीं समूळ नष्ट झालीं, पण आपण मात्र या जगांत जणुकांही चिरजीवन जगत आहोंत. 'जे योग्यतम आहेत तेच शेवटीं जिवंत राहतात' यासंबंधींचीं नवीन नवीन मतें लोक पुढे मांडीत असतात आणि त्यांना वाटत असतें की ज्यांच्या शरीरांत अधिक जोर असेल तेच जास्त काळ जिवंत राहतील. हें खरें असतें तर जगांतील आक्रमक म्हणून समजलेल्या राष्ट्रांपैकी एखादें तरी आज वैभवांत नांदावयास हवें होतें, आणि एखादाहि देश जिंकण्याची इच्छा न बाळगणारे आपण दुर्बल हिंदु केव्हाच नष्ट व्हावयास हवे होतों; पण तरीहि आपण तीस कोटी हिंदु अजून जगतच आहोंत! (एका तरुण इंग्रज स्त्रीने मला एकदा म्हटलें—'हिंदूंनी काय केलें आहे? त्यांनी एकाहि मानववंशाला कधीहि जिंकलेलें नाही!') हिंदु जातीच्या सर्व शक्ति संपुष्टांत आल्या आहेत, ती जडवत् होऊन पडली आहे हें मुळीच खरें नाही. तिच्यांत यथेच्छ शक्ति आहे, आणि योग्य समयीं व आवश्यक तेव्हा तिचा प्रवाह महापुराप्रमाणे सर्व जगाला व्यापून टाकतो.

आपण जणुकांही सर्व जगाला अतिप्राचीन काळापासून आव्हानच दिलेलें आहे. पाश्चात्त्य देशांत, मनुष्य उपभोग्य वस्तूंचा जास्तींत जास्त किती संग्रह करूं शकतो हा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न चालू आहे, तर येथे आपल्या देशांत, मनुष्याचें कमींत कमी किती गोष्टींनी भागूं शकते हा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न चालू आहे. हा संघर्ष व हा भेद आणखी कांही शतकें कायम राहील. पण इतिहासांत कांही सत्य असेल, आणि पुढचे अंदाज खरे ठरत असतील तर, जे आपल्या गरजा कमींत कमी

ठेवतात व चांगलें संयमशील जीवन जगतात ते अखेर जीवनाची लढाई जिंकतील, आणि जे भोग व वैभव यांच्या मागे पिसाटाप्रमाणे धावतात, ते कांही काळ कितीहि शौर्य व चमक दाखवोत, त्यांना मरून नष्ट व्हावेंच लागेल. मनुष्याच्या जीवनांत, नव्हे राष्ट्रांच्या इतिहासांत कधीं कधी असा काळ येतो कीं ज्या वेळीं या जगाबद्दलचा उबग अत्यंत प्रबळ व दुःखदायक होतो. समस्त पाश्चात्त्य जगांत आज असा उबग आढळून येत आहे. तेथेहि त्यांचे विचारवंत थोर लोक आहेत, व त्यांच्याहि हें ध्यानीं आलें आहे की संपत्ति व सत्ता यांच्या मागे लागणें अगदी व्यर्थ होय. तिकडील पुष्कळ, नव्हे बहुतेक सुसंस्कृत स्त्रीपुरुष हे या राक्षसी स्पर्धेला विटलेले आहेत, तसेंच त्यांना या व्यापारी वृत्तीचाहि उबग आला आहे; आणि ते अधिक चांगल्या गोष्टींची आशा करींत आहेत. अजूनहि राजकीय व सामाजिक परिवर्तनांना चिकटून असणारा असा एक वर्ग तेथे आहे, व युरोपांतील अनिष्ट गोष्टींवर हाच एकमेव इलाज आहे असें त्यांना वाटत आहे, पण इतर थोर विचारवंत अन्य प्रकारच्या आदर्शांचा विचार करूं लागले आहेत. त्यांना हें उमजलें आहे की कितीहि मोठें राजकीय वा सामाजिक परिवर्तन झालें तरी त्याने जीवनांतील दुःख नाहीसें होणें शक्य नाही. चांगल्याप्रकारें आत्मविकास करतां आला तरच जीवनांतील दुःखें नाहीशीं होतील. केवढेंहि सामर्थ्य, शासनांतील परिवर्तन वा कायद्यांचीं कठोरता एखाद्या समाजांत सुधारणा घडवूं शकणार नाही, पण केवळ आध्यात्मिक आणि नैतिक शिक्षणच समाजांतील चुकीच्या प्रवृत्ति दूर करून त्याला चांगल्या मार्गावर आणूं शकेल. म्हणून पाश्चात्त्य देशांतील समाज नव्या विचारासाठीं, नव्या तत्त्वज्ञानासाठीं आतुर झालेला आहे. त्यांनी अंगिकारलेला ख्रिस्तीधर्म पुष्कळ बाबतींत चांगला व उदात्त असला तरी त्याचें मर्म त्यांना पूर्णपणें कळलेलें नाही, आणि ज्या स्वरूपांत त्यांना तो कळलेला आहे त्या स्वरूपांत तो त्यांना अपुरा वाटत आहे. विचारवंत पाश्चात्त्य जी नवीन विचारसरणी आणि जें आध्यात्मिक खाद्य शोधीत आहेत तें त्यांना आमच्या प्राचीन तत्त्वज्ञानांत, विशेषतः वेदान्तांत प्राप्त होत आहे. आणि हें असें आहे यांत कांहीच आश्चर्य नाही.

पृथ्वीतलावर नांदणाऱ्या प्रत्येक धर्माच्या वतीने त्या त्या धर्माचें

श्रेष्ठत्व प्रतिपादन करण्यासाठी पुढे मांडण्यांत येणारे तऱ्हेतऱ्हेचे अद्भुत युक्तिवाद ऐकणें माझ्या चांगलेंच अंगवळणीं पडलें आहे. डॉ. बॅरोज या माझ्या थोर मित्रांनी मांडलेले अगदी अलीकडील विचार आपल्याहि ऐकिवांत असतील; त्यांचें म्हणणें असें की ख्रिस्ती धर्म हाच एकमेव विश्वधर्म वा सार्वजनीन धर्म आहे. खरोखर कोणता धर्म हा सार्वजनीन धर्म असूं शकतो यासंबंधी आपण आता विचार करूं या. केवळ वेदान्त हाच सार्वजनीन धर्म असूं शकतो, अन्य कोणताच धर्म सार्वजनीन धर्म होण्यास पात्र नाही अशी माझी धारणा आहे. ती तशी कां आहे या-संबंधीचीं कारणें मी आता आपल्यासमोर मांडतों. आपल्या धर्माव्यति-रिक्त जगांतील बाकीचे सर्व मोठे धर्म हे त्यांच्या एका वा अनेक संस्थापकांच्या जीवनाशीं अच्छेद्यपणें निगडित आहेत. त्या धर्मांचे सर्व सिद्धान्त, उपदेश, मतें आणि नीतितत्त्वें हीं सर्व त्या त्या धर्माच्या संस्थापकांच्या जीवनाशीं अच्छेद्यपणें निगडित असतात, आणि त्या सर्वांचें प्रामाण्य, त्यांची सत्यता व त्यांचें सामर्थ्य हीं सारीं या संस्थाप-कांच्या शब्दांवरच अवलंबून असतात. आणि आश्चर्याची गोष्ट ही की त्या संस्थापकांच्या जीवनाच्या ऐतिहासिकतेवरच जणुकांही या सर्व धर्मांची इमारत आधारलेली असते. या ऐतिहासिकतेला जर थोडासा धक्का पोहोचला, ज्याला ते ऐतिहासिकतेचा भक्कम पाया म्हणतात तो जर हलला आणि भंगला तर त्यावर उभारलेली धर्माची सर्व इमारत कोसळून तिचे तुकडे तुकडे होतात व तिच्या पुनरुद्धाराची कांहीहि शक्यता उरत नाही. आज आपल्याला दिसून येतें की तथा-कथित बहुतेक सर्वच धर्मसंस्थापकांच्या जीवनांच्या बाबतींत असेंच झालेलें आहे; आपल्याला माहीत आहे की त्यांच्या जीवनासंबंधीच्या अर्ध्याअधिक गोष्टींवर आज लोक फारसा विश्वास ठेवीत नाहीत, आणि उरलेल्या अर्ध्यांबद्दल ते बळकट संशय व्यक्त करतात.

आपल्या धर्माव्यतिरिक्त बाकीचे सर्व मोठे धर्म अशा प्रकारच्या ऐतिहासिक व्यक्तींवर आधारलेले आहेत, पण आपला धर्म हा तत्त्वांवर आधारलेला आहे. 'मीं वेद निर्माण केले' असा दावा कोणताहि पुरुष वा कोणतीहि स्त्री करूं शकत नाही. वेदांमधे नित्य स्वरूपाचीं तत्त्वें अंतर्भूत आहेत. ऋषींनी त्यांचा शोध लावला आहे, आणि अशा ऋषींचीं

नांवें मधून मधून त्यांत आढळतात, पण केवळ नांवेंच; ते कोण होते व काय करीत होते हेंहि आपल्याला ज्ञात नाही. पुष्कळांच्या बाबतींत त्यांच्या वडिलांचींहि नांवें आपल्याला उपलब्ध नाहीत, आणि प्राय: सर्वांच्याच बाबतींत, त्यांचा जन्मकाळ व जन्मस्थान हीं देखील आपल्याला माहीत नाहीत. पण या ऋषींना आपल्या नांवाची मुळींच पर्वा नव्हती. ते केवळ तत्त्वांचे प्रचारक होते, व त्यांनी जीं तत्त्वें शिकविलीं तीं स्वत:च्या जीवनांत उतरून दाखविण्याचा त्यांनी शक्य तेवढा प्रयत्न केला. त्याबरोबरच, जसा आपला ईश्वर निर्गुण असूनहि सगुण आहे, तद्वत् आपला धर्महि निर्गुण आहे—अर्थात् तो कांही विशिष्ट व्यक्तींवर आधारलेला नसून तत्त्वांवर आधारलेला आहे, आणि तरीहि त्यांत असंख्य अवतार व महापुरुष यांनाहि स्थान आहे. आपल्या धर्मांत जेवढे अवतार, महापुरुष, ऋषि प्रभृति आहेत तेवढे दुसऱ्या कोणत्या धर्मांत आढळतात? एवढेंच नव्हे तर 'भविष्यकाळीं आणखी असंख्य अवतार व महापुरुष आविर्भूत होतील' असेंहि आपला धर्म सांगतो. श्रीमद् भागवत सांगतें की अवतार अनंत आहेत, म्हणून पुढे कितीहि अवतार झाले तरी त्यांना आपल्या धर्मांत स्थान आहे. म्हणून भारताच्या धार्मिक इतिहासांत ज्या अवतारांचें व महापुरुषांचें वर्णन आहे ते खरोखरी ऐतिहासिक नाहीत असें जरी सिद्ध झालें तरीहि त्याने आपल्या धर्माची कांहीच हानि होत नाही, तो पूर्वीसारखाच सुदृढ राहतो, कारण आपला धर्म तत्त्वांवर आधारलेला आहे, व्यक्तींवर नाही. एकाच व्यक्तीभोवती जगांतील सर्व लोकांना एकत्र आणण्याचा प्रयत्न करणें अगदी व्यर्थ आहे. नित्य व सार्वजनीन अशा तत्त्वांभोवतीहि त्यांना एकत्र आणणें अवघड आहे. तरी पण जगांतील बहुतांश लोकांना धर्माच्या बाबतींत एकाच मताचे बनविणें जर कधी शक्य झालें तर ते नित्य अशा तत्त्वांच्या आधारेंच शक्य आहे, व्यक्तींच्या आधारें नव्हे. तरीहि मीं सांगितल्याप्रमाणे आपल्या धर्मांत विशिष्ट व्यक्तींच्या शब्दांचें प्रामाण्य व प्रभाव यांना भरपूर स्थान आहे. आपल्या धर्मांत इष्टदेवतेचा जो अपूर्व सिद्धान्त आहे, तो तुम्हांला अनेक अवतारांपैकी तुमच्या आवडीनुसार कोणताहि अवतार निवडण्याचें भरपूर स्वातंत्र्य देतो. आपल्या जीवनाचा आदर्श म्हणून, आणि आपलें विशेष उपास्य

दैवत म्हणून तुम्ही कोणताहि अवतार स्वीकारूं शकतां; एवढेंच नव्हे तर तोच सर्वश्रेष्ठ अवतार आहे असेंहि तुम्हीं मानूं शकतां; याला कांहीच हरकत नाही; पण नित्य सत्य तत्त्वें हाच तुमच्या धर्मजीवनाचा आधार असला पाहिजे. आश्चर्य करण्यासारखी गोष्ट ही की अवतारांना देखील, ते वैदिक सनातन तत्त्वांचें प्रत्यक्ष उदाहरण असतात म्हणूनच आपण मानतों. भगवान श्रीकृष्णांचें माहात्म्य यांतच आहे की, ते तत्त्वांवर आधारलेल्या आपल्या शाश्वत धर्माचे उपदेशक होते व वेदान्ताचे ते सर्वश्रेष्ठ भाष्यकार होते.

जगांतील सर्व लोकांनी वेदान्ताकडे कां लक्ष द्यावें याचें दुसरें कारण असें की जगांतील सर्व शास्त्रांपैकी केवळ हेंच शास्त्र, भौतिक विज्ञानाने बाह्य प्रकृतीसंबंधी केलेल्या आधुनिक संशोधनांशीं व सिद्धान्ताशीं पूर्णपणें सुसंवादी आहे. अतिप्राचीन काळीं रूपाने समान, वंशाने समान व समान मनोभाव असलेल्या दोन निरनिराळ्या जाति भिन्न भिन्न मार्गांनी अंतिम ध्येय गाठण्यासाठी निघाल्या. मी प्राचीन हिंदु व प्राचीन ग्रीक जातींविषयी बोलत आहें. पहिल्या जातीने अंतर्जगताच्या विश्लेषणाच्या द्वारें मार्गक्रमणास सुरुवात केली, तर दुसऱ्या जातीने अंतिम ध्येयाच्या शोधार्थ बाह्य जगताच्या विश्लेषणाने प्रारंभ केला. आणि त्यांच्या या अनुसंधानांच्या इतिहासाच्या विभिन्न अवस्था पाहिल्या असतां असें दिसून येतें की, या दोन्ही जातींच्या विचारांमधून अंतिम ध्येयाचे समान पडसाद उठत आहेत. आपल्याला स्पष्टपणें आढळून येतें की फक्त वेदान्तीच--हिंदुच--आधुनिक भौतिक शास्त्रांच्या सिद्धान्तांचा आपल्या धर्माशीं समन्वय करून ते स्वीकारूं शकतात. तसेंच हें स्पष्ट आहे की आधुनिक जडवाद आपलीं तत्त्वें बाळगूनहि, वेदान्ताचे सिद्धान्त ग्रहण करून आध्यात्मिकतेकडे वाटचाल करूं शकतो. आम्हांला व ज्यांनी ह्या विषयाचें अध्ययन केलें आहे त्यांना स्पष्ट दिसून येतें की आधुनिक भौतिक शास्त्रांचे सिद्धान्त वेदान्ताने कित्येक युगांपूर्वीच सांगितलेले आहेत --फक्त आधुनिक विज्ञानाने ते 'जडा'च्या भाषेंत मांडले आहेत, इतकेंच. याप्रमाणे पाश्चात्त्यांनी वेदान्ताकडे कां लक्ष द्यावें याचें दुसरें कारण म्हणजे वेदान्ताचा तर्कशुद्धपणा व त्याची आश्चर्यकारक बुद्धिनिष्ठता हें होय. पाश्चात्त्य देशांतील नामवंत शास्त्रज्ञांपैकी अनेकांनी 'वेदान्ताचे

सिद्धान्त अत्यंत युक्तिनिष्ठ आहेत' असें मला बोलूनहि दाखविलें आहे. त्यांच्यापैकी एकजण माझ्या विशेष परिचयाचे आहेत; त्यांना प्रयोगशाळेबाहेर जाण्यास अगर प्रसंगीं भोजन करण्यासहि वेळ मिळत नाही, परंतु वेदान्तावरील माझीं व्याख्यानें ऐकण्यासाठी ते तासन् तास खर्च करीत असत; ते असें म्हणत की वेदान्ततत्त्वें अत्यंत शास्त्रशुद्ध व काळाच्या प्रचलित आकांक्षांशीं अत्यंत सुसंवादी आहेत आणि आजचीं भौतिक शास्त्रें ज्या सिद्धान्ताप्रत येत आहेत त्यांच्याशीं देखील तीं अत्यंत सुसंवादी आहेत.

धर्मांच्या तुलनात्मक अभ्यासांतून जे दोन शास्त्रशुद्ध निष्कर्ष निघतात त्यांच्याकडे मी तुमचें लक्ष वेधूं इच्छितों. यांपैकी पहिला निष्कर्ष सर्व धर्मांच्या सत्यत्वाविषयीचा आहे व दुसरा निष्कर्ष विश्वाच्या एकत्वासंबंधीचा आहे. बॅबिलोनियन व यहुदी लोकांच्या धार्मिक इतिहासांत आपल्याला एक विलक्षण गोष्ट आढळते. आपल्याला माहीत आहे की बॅबिलोनियन व यहुदी लोकांच्या अनेक जमाती असून त्या प्रत्येकीचा वेगळा असा देव होता. आणि या वेगवेगळ्या देवांना एक सामान्य नांव असे. बॅबिलोनियन लोकांच्या सर्व देवांना 'बाल' असें म्हणत आणि त्यांत 'बाल मेरोडाक' हा प्रमुख होता. कांही कालाने बॅबिलोनियन जमातींपैकी एखादी त्या जातींतील इतर जमातींना जिंकून घेत असे, व नंतर स्वाभाविकपणेंच जेत्यांचा देव अन्य जित जमातींच्या देवांचा प्रमुख मानला जाई. सेमेटिक लोक ज्या एकेश्वरवादाचा गर्व करतात तो अशा रीतीने निर्माण झाला. यहुदी लोकांच्या सर्व देवांना 'मोलोक' असें म्हणत. यांपैकी इस्रायली जमातीच्या देवाला 'मोलोक याव्हा' किंवा 'मोलोक यावा' असें म्हणत असत. कांही काळाने या इस्रायली जमातीने हळूहळू इतर यहुदी जमातींना जिंकलें, आणि आपला 'मोलोक' हा सर्वश्रेष्ठ 'मोलोक' आहे असें तिने जाहीर केलें. आणि मला खात्री आहे की या धार्मिक लढायांतून किती रक्तपात, पाशवी कृत्यें व अत्याचार घडून आले हें आपणांस माहीत असेल. नंतर पुढे बॅबिलोनियन लोकांनी 'मोलोक याव्हा'चें प्रभुत्व नष्ट करण्याचा प्रयत्न केला, पण त्यांत त्यांना यश आलें नाही.

मला वाटतें की धार्मिक बाबतींत असें प्रभुत्व मिळविण्याचा निर-

निराळ्या जमातींचा प्रयत्न भारताच्या सीमेवरील प्रदेशांतहि झाला असावा. येथेहि आर्यांच्या विविध जमातींत कलह झाले असावेत व त्यांत आपापल्या जमातीच्या देवाला सर्वांत प्रमुख स्थान देण्याचा प्रयत्न झाला असावा. पण भारताचा इतिहास यहुद्यांच्या इतिहासाहून वेगळा व्हावयाचा होता. जगांतील सर्व देशांत केवळ भारत हाच अध्यात्माची व सहिष्णुतेची भूमि व्हावयाचा होता. म्हणूनच येथे विभिन्न जमातींचें देवांसंबंधीचें युद्ध फार काळ टिकलें नाही. जेथवर इतिहासाची मजल पोहोचत नाही, व परंपरेने चालत आलेल्या दंतकथांनाहि ज्याचा कांही थांगपत्ता लागत नाही अशा त्या अत्यंत प्राचीन काळीं भारतांत एक ऋषि आविर्भूत झाले व स्वतःच्या अनुभूतीच्या आधारें त्यांनी घोषणा केली की, 'एकं सत् विप्रा बहुधा वदन्ति '—'सद्वस्तु एकच आहे आणि ऋषि तिला विविध नांवांनी संबोधितात.' अशा प्रकारचें चिर-स्मरणीय वाक्य आतापर्यंत कधीं उच्चारलें गेलें नाही; अशा प्रकारच्या महान् सत्याचा शोध आतापर्यंत लागलेला नाही. आणि हें सत्य आम्हां हिंदूंच्या राष्ट्रीय जीवनाचा जणुकांही कणाच आहे. शेकडो शतकांपासून 'एकं सत् विप्रा बहुधा वदन्ति ' हें सत्य विकसित होत होत त्याने आपलें सर्व राष्ट्रीय जीवन व्यापून टाकलें आहे आणि आता तें आपल्या नसानसांतून वाहत आहे, आपल्या रक्ताशीं अगदी एकजीव होऊन गेलें आहे. या महान् सत्यावर आपलें पुरेपूर प्रेम आहे आणि आपला देश हा धार्मिक सहिष्णुतेची महान् भूमि झाला आहे. येथे, याच ठिकाणीं लोकांनी, त्यांच्या धर्माची निंदा करावयास आलेल्या परधर्मियांसाठी मंदिरें व चर्चच्या इमारती बांधून दिल्या. परधर्मसहिष्णुतेचें हें महान तत्त्व आपल्याकडून शिकण्यासाठी जग वाट पाहत आहे. परदेशांत अजूनहि केवढी असहिष्णुता आहे, याची तुम्हांला फारशी कल्पना नसेल. परदेशांत धार्मिक असहिष्णुता एवढी प्रबळ आहे की तिच्यामुळे मला तिकडेच मृत्युमुखांत पडावें लागेल की काय असें मला अनेकदा वाटलें. धर्माकरिता मनुष्याचा प्राण घेणें या गोष्टीचें त्यांना कांहीच वाटत नाही; ज्या सभ्यतेचा पाश्चात्यांना गर्व आहे तिच्या अगदी माहेरघरांत आज जरी असें घडत नसलें तरी उद्या तसें घडूंहि शकेल. एखाद्याने देशाच्या प्रचलित धर्माविरुद्ध एक शब्दहि जर उच्चारला तर पाश्चात्य

देशांत त्या माणसावर भयंकर स्वरूपाचा बहिष्कार टाकला जातो. आपल्या देशांत येऊन हे लोक आपल्या जातिसंस्थेवर हवी तशी टीका करीत असतात. तुम्ही पाश्चात्त्य देशांत गेलांत व माझ्याप्रमाणे तेथें राहिलांत तर तुम्हांला आढळेल की तेथील अत्यंत नामवंत प्राध्यापक सुद्धा अगदी भ्याडाप्रमाणे वागत असतात आणि लोकमताच्या विरोधाच्या धास्तीने धार्मिक बाबतींत त्यांना जें सत्य वाटत असतें त्याचा एकशतांशहि बोलून दाखविण्याचीं हिंमत त्यांना होत नाही.

म्हणून धर्मसहिष्णुतेच्या या महान् तत्त्वाची जग आज अपेक्षा करीत आहे. आधुनिक सभ्यतेंत या धर्मसहिष्णुतेची भर पडल्यास ती फार मोलाची ठरेल. एवढेंच नव्हे, तर हीं धर्मसहिष्णुता आत्मसात् केल्याशिवाय कोणतीच सभ्यता दीर्घकाल टिकूं शकणार नाही. दुराग्रह, रक्तपात व पाशवी अत्याचार थांबल्याशिवाय कोणत्याहि सभ्यतेचा विकास होणें शक्य नाही. एकमेकांकडे सहानुभूतीने पाहिल्याशिवाय कोणतीहि सभ्यता डोकेंच वर काढूं शकणार नाही; अत्यंत आवश्यक अशी हीं सहानुभूति निर्माण करण्याची पहिली पायरी म्हणजे एकमेकांच्या धार्मिक मतांकडे सहानुभूतीने पाहणें ही होय. पण एवढेंच कांही पुरेसें नाही. आपल्याला हें समजून घ्यावें लागेल की आपल्या धर्मकल्पना व समजुती कितीहि भिन्न असल्या तरी आपण परस्परांना खरोखर साहाय्य केलें पाहिजे. आणि मीं आताच सांगितल्याप्रमाणे भारतांत आपण हेंच करीत असतों. येथे या भारतांत हिंदूंनी ख्रिस्ती लोकांसाठी प्रार्थनामंदिरें व मुसलमानांसाठी मशिदी बांधल्या आहेत व ते आजहि बांधीत आहेत. आपण असेंच केलें पाहिजे. त्यांनी जरी आपला द्वेष केला, त्यांनी जरी पाशवी प्रवृत्ति प्रकट केली, त्यांनी जरी क्रौर्य दाखविलें, त्यांनी जरी आपल्यावर अत्याचार केले आणि त्यांनी जरी आपल्याविषयी कुत्सित भाषा वापरली तरीहि आपण ख्रिस्ती लोकांसाठी प्रार्थनामंदिरें व मुसलमानांसाठी मशिदी बांधण्याचें कार्य करीत राहूं व अखेर त्यांना प्रेमाने जिंकूं आणि जगाला सिद्ध करून दाखवूं की, प्रेमानेच चिरजीवन जगण्याची पात्रता मिळवितां येते, द्वेषाने नव्हे; सौजन्याच्या शक्तीनेच जीवनांत यश लाभत असतें, केवळ पशुत्वाने वा भौतिक शक्तीने नव्हे.

युरोपांतील विचारवंतांना, नव्हे सर्व जगाला—कदाचित् वरच्या

वर्गापेक्षा खालच्या वर्गाला, सुसंस्कृत म्हणविणाऱ्या लोकांपेक्षा सामान्य जनतेला, सुशिक्षितांपेक्षा अजाण जनतेला व बलवानांपेक्षा बलहीन लोकांना--आपल्यापासून आज दुसरें एक महान् तत्त्व हवें आहे, आणि तें म्हणजे सर्व विश्वाच्या आध्यात्मिक एकत्वाविषयीचें चिरंतन, उदात्त तत्त्व होय. पाश्चात्त्य शास्त्रज्ञांनी भौतिक साधनांच्या साहाय्याने केलेल्या आजकालच्या संशोधनांनी अखिल विश्वाचें एकत्व कसें दाखविलेलें आहे हें मीं मद्रास विश्वविद्यालयाच्या विद्वानांना आज सांगण्याची गरज नाही. भौतिक दृष्टीनेहि तुम्ही व मी, सूर्य, चंद्र आणि तारे हे केवळ जड द्रव्याच्या एकाच अथांग महासागरावरील लहान लहान तरंग कसे आहेत हें पाश्चात्त्य शास्त्रज्ञांनी दर्शवून दिलें आहे; त्याचप्रमाणे शरीर व मन हीं केवळ भिन्न नांवें असून तीं जडद्रव्याच्या अनंत सागरावरील--'समष्टी'-वरील--केवळ तरंग कशीं आहेत हें भारतीय मानसशास्त्राने कित्येक युगांपूर्वी दाखविलें, आणि एक पाऊल पुढे जाऊन वेदान्ताने हें दाखविलें की या भासमान विश्वाच्या एकत्वापलीकडे जो खरा आत्मा आहे तोहि 'एक'च आहे. अखिल विश्वामधे एकमेव आत्माच विद्यमान आहे--ती एकच सत्ता सर्वकांही आहे. 'समग्र विश्वाच्या मुळाशीं वस्तुत: एकत्व आहे' हें महान् तत्त्व ऐकून अन्य देशांतील लोक भयभीत होतात, एवढेंच नव्हे तर आपल्या देशांतील अनेक लोकहि हा अद्वैतवाद ऐकून भयभीत होतात. आजहि या अद्वैतवादाला उचलून धरणाऱ्यांपेक्षा, कधी कधी त्याचे विरोधकच अधिक असलेले दिसून येतात. तरीहि मला आपणांस हें सांगावयाचें आहे की सर्व जगाला आज अद्वैतवादाचा हा महान् जीवनदायी सिद्धान्त आपल्यापासून हवा आहे; भारतांतहि उपेक्षित व दलित लोकांना त्यांच्या उद्धाराकरिता तो हवा आहे, कारण ह्या आपल्या मातृभूमीचा उद्धार, वरील अद्वैत सिद्धान्त परिणामकारक रीतीने प्रत्यक्षांत आणल्याविना कोणीहि करूं शकणार नाही.

बुद्धिवादी पाश्चात्त्य लोक त्यांच्या सर्व तत्त्वज्ञानाचा व नीतिशास्त्राचा तर्कसंगत आधार शोधण्याचा खटाटोप करीत आहेत. आणि आपण हें चांगलें जाणतां की कोणत्याहि व्यक्तीच्या केवळ सांगण्यावरून नीतिशास्त्र प्रमाणभूत ठरूं शकत नाही--मग ती व्यक्ति कितीहि महान् वा ईश्वरतुल्य असो. नीतिशास्त्राचें व्यक्तिप्रामाण्याच्या बळावर केलेलें

असलें स्पष्टीकरण जगांतील थोर विचारवंतांचें आता समाधान करूं शकत नाही. नीतिशास्त्राचा आधार म्हणून त्यांना केवळ मानवी प्रामाण्य नको आहे, तर त्यांना नित्य स्वरूपाच्या तत्त्वांवर नीतिशास्त्र उभारावयाचें आहे. तुमच्या, माझ्या व सर्वांच्या ठायीं असलेल्या त्या अनंत तत्त्वाशिवाय––त्या आत्मतत्त्वाशिवाय––असा नित्य आधार कोठे सापडणार ? आत्म्याचें अनंत एकत्व हाच नीतिशास्त्राचा नित्य असा मूलाधार व प्रमाण आहे. सर्व प्रकारच्या बंधनांतून मुक्त होण्यासाठी चाललेल्या मानवी प्रयत्नांचें वर्णन करणारा प्रत्येक ग्रंथ सांगतो कीं तुम्ही व मी भाऊ भाऊ आहोंत, पण आत्म्याच्या एकत्वाचा हा सिद्धान्त आपल्याला सांगतो की आपण केवळ भाऊ भाऊच नाहीं, तर तुम्ही व मी वस्तुत: एक आहोंत. भारतीय तत्त्वज्ञानाचा हा मुख्य उपदेश आहे. हें एकत्व हाच सर्व नीतिशास्त्राचा व अध्यात्माचा तर्कसंगत आधार आहे. आपल्या दलित जनतेला या एकत्वाच्या सिद्धान्ताची जेवढी आवश्यकता आहे तेवढीच आज युरोपला आहे; आणि आजहि न कळत का होईना हा महान् सिद्धान्त इंग्लंड, जर्मनी, फ्रान्स व अमेरिका या देशांतील राजकीय व सामाजिक उन्नतीच्या सर्व अर्वाचीन प्रयत्नांचा आधार बनूं लागला आहे. आणि माझ्या मित्रांनो, तुम्ही हें लक्षपूर्वक पाहा की, साहित्यांत जेथे जेथे मानवी स्वातंत्र्याच्या––सर्व प्रकारच्या स्वातंत्र्याच्या––प्रयत्नांचें वर्णन आहे तेथे तेथे भारतीय वेदान्तांतील विचार प्रामुख्याने व्यक्त झालेले तुम्हांला आढळतील. कांही लेखकांना या विचारांचें उगमस्थान माहीत नसल्याचें दिसतें, कांही लेखक ह्या कल्पना स्वत:च्या असल्याचें दाखवितात, आणि कांहीजण अशा विचारांचें उगमस्थान मोठ्या धैर्याने व कृतज्ञतापूर्वक नमूद करतात आणि आपलें वैचारिक ऋण मान्य करण्याचा मोठेपणा दाखवितात.

मी अमेरिकेंत असतांना, एकदा एक तक्रार माझ्या कानांवर आली की मी अद्वैताचाच फार प्रचार करतों आणि द्वैत मताविषयी फार थोडें सांगतों. द्वैतवादी भक्तिसिद्धान्तांत, पूजापद्धतींत व द्वैतवादी धर्मांमधे केवढी भव्यता, केवढें अपार प्रेम, केवढा परमोच्च व अमर्याद आनंद ओसंडत आहे हें मला ठाऊक आहे. तें सर्व मी जाणतों. पण आनंदाने सुद्धा रडण्याची ही वेळ नाही. आपण पुष्कळ रडलों आहोंत.

आपण अधिक मृदु व्हावें अशी ही वेळ नाही. ही मृदुता आपल्या ठायीं इतक्या दिवसांपासून आहे की तिच्यामुळे आपण कापसाच्या ढिगाऱ्यासारखे बनून अगदी मृतवत् झालों आहोंत. आज आपल्या देशाला जर कशाची गरज असेल तर ती म्हणजे लोखंडी स्नायूंची व पोलादी मज्जातंतूंची होय; आज आपल्या देशाला गरज आहे अशा दुर्दम्य इच्छाशक्तीची की जी विश्वाचीं गूढ रहस्यें उकलील आणि जरूर पडल्यास महासागराच्या देखील तळाशीं जाऊन व प्रत्यक्ष मृत्यूला तोंड देऊन आपलें उद्दिष्ट साध्य करून घेईल. आपल्याला हवी असलेली गोष्ट हीच आहे; व अद्वैताच्या ज्ञानाने व अनुभूतीनेच ती उत्पन्न होऊं शकेल, प्रस्थापित व दृढ होऊं शकेल. श्रद्धा! श्रद्धा! श्रद्धा! स्वतःवरील श्रद्धा! ईश्वरावरील श्रद्धा!--हेंच महान् बनण्याचें रहस्य आहे. तुमच्या पुराणांमधून वर्णिलेल्या तेहतीस कोटी देवांवर तुमची श्रद्धा असेल, तसेच परकीयांनी तुमच्यांत वेळोवेळीं प्रसृत केलेल्या सर्व देवतांवरहि तुमची श्रद्धा असेल, पण तुमची स्वतःवर जर श्रद्धा नसेल तर तुम्हांला मुक्ति लाभणें शक्य नाही. स्वतःवर श्रद्धा ठेवा, या श्रद्धेच्या बळाने स्वतःच्या पायावर उभे राहा आणि शक्तिशाली व्हा. हेंच आपल्याला आज हवें आहे. कोणतेहि मूठभर परकीय लोक गेलीं हजार वर्षें आम्हां तेहतीस कोटी लोकांवर राज्य करीत आहेत, व आमच्या छातीवरून हवे तसे चालत आहेत, हें कसें घडतें? याचें कारण, त्यांची स्वतःवर श्रद्धा आहे व आमची नाही. पाश्चात्त्य देशांत मीं काय पाहिलें? तिकडील ख्रिस्ती पंथ आपल्या प्रार्थनांमधून शिकवीत असतात की मनुष्य हा अत्यंत पतित व पापी असा प्राणी आहे; पण या सर्व निरर्थक शब्दांमागे मला काय दिसलें? मला असें दिसलें की, युरोपांतील व अमेरिकेंतील लोकांच्या हृदयांत स्वतःवरील श्रद्धेंतून उद्भवलेली प्रचंड शक्ति वसत आहे. एखादा इंग्रज मुलगा तुम्हांला सांगेल की, "मी इंग्रज आहें व मी कोणतीहि गोष्ट करूं शकतों." अमेरिकन मुलगा असेंच सांगेल, आणि युरोपांतील कोणताहि मुलगा देखील असेंच सांगेल. आपल्या देशांतील मुलें असेंच म्हणूं शकतील काय? छे! मुलांचे वडीलहि असें बोलूं शकणार नाहीत. आपण स्वतःवरील श्रद्धा गमावली आहे. म्हणूनच लोकांचीं हृदयें जागृत करण्या-

साठी, व त्यांना आत्म्याचा महिमा दाखवून देण्यासाठी अद्वैत वेदान्ताचा प्रचार करणें अगत्याचें आहे. याचकरिता मी अद्वैताचा प्रचार करतों; आणि मी हा प्रचार पंथविशिष्ट भूमिकेवरून करीत नाहीं, तर सर्वमान्य व व्यापक भूमिकेवरून तो करीत असतों.

द्वैतवादी व विशिष्टाद्वैतवादी यांच्या भावना न दुखावणारा असा समन्वयात्मक मार्ग शोधून काढणें सोपें आहे. भारतामधे असा एकहि संप्रदाय नाही की ज्याला 'ईश्वर हा सर्वांच्या ठायीं आहे व तो सर्व चराचर वस्तूंत विद्यमान आहे' हें तत्त्व मान्य नाही. सर्व शुद्धता, पूर्णता व सामर्थ्य हीं आत्म्याच्या ठायीं मूलतःच विद्यमान आहेत हें तत्त्व वेदान्ताच्या सर्व शाखांना मान्य आहे. कांहींच्या मतें ही पूर्णता कधी कधी संकोच पावते, तर कधीं कधी पुन्हा विकास पावते. पण तीं सर्वदा विद्यमान असतेच. अद्वैत मतानुसार ती संकोचहि पावत नाही व विकासहि पावत नाही, तर वेळोवेळीं ती अव्यक्त व व्यक्त होत असते. कार्यतः हीं दोन्हीं मतें सारखींच आहेत. एकाहून दुसरें विधान अधिक तर्कशुद्ध असेलहि, परंतु फलाच्या दृष्टीने व प्रत्यक्ष निष्कर्षाच्या दृष्टीने हीं दोन्हीं मतें जवळजवळ सारखींच आहेत. हेंच एक मूलभूत तत्त्व जगाला हवें आहे, आणि अन्य कोणत्याहि देशापेक्षा या आपल्या मातृभूमीला त्याची फार आवश्यकता आहे.

मित्रहो, मला तुम्हांला कांहीं कटु सत्यें सांगणें भाग आहे. एखाद्या इंग्रज माणसाने एखाद्या भारतीयाची हत्त्या केली किंवा त्याचा छळ केला असें वृत्तपत्रांत जेव्हा प्रसिद्ध होतें तेव्हा देशभर आरडाओरड सुरू होते. मी तें सारें वाचतों व शोकाकुल होतों, आणि नंतरच्या क्षणीं माझ्या मनांत जो प्रश्न उभा राहतो तो हा की या सर्व प्रकारास कोण जबाबदार आहे ? एक वेदान्ती म्हणून हा प्रश्न स्वतःस विचारणें मला भाग आहे. हिंदुलोक हे आत्मपरीक्षण करणारे लोक आहेत, ते सर्व गोष्टींचें कारण स्वतःमधेच शोधीत असतात. म्हणून मी स्वतःला विचारतों की याला जबाबदार कोण ? आणि प्रत्येक वेळीं उत्तर येतें की या सर्व गोष्टींना इंग्रज लोक जबाबदार नाहीत, आपलें सर्व दैन्य व अधोगति यांना आपण स्वतःच जबाबदार आहोंत--केवळ आपणच जबाबदार आहोंत. सरंजामी वृत्तीच्या आपल्या पूर्वजांनी गरीब अशा सामान्य लोकांना पायदळीं तुड-

विलें, त्यामुळे ते निराधार बनले आणि अत्याचार सहन करतां करतां शेवटीं ते बिचारे लोक आपण मनुष्य आहोंत हेंहि विसरून गेले. केवळ लाकडे तोडणें वा पाणी भरणें हींच कामें त्यांना सक्तीने करणें भाग पाडलें गेलें; हें शतकानुशतकें चालू राहिलें; याचा परिणाम हा झाला की, आपण जन्मतः गुलामच आहोंत अशी त्यांची धारणा बनली व आपण जन्मानेच लाकूडतोडे व पाणी भरणारे आहोंत असें ते समजूं लागले. आपण आपल्या नवशिक्षणाचा गर्व वाहतों, पण एखाद्याने जर या गरीब दलितांबद्दल सहानुभूतीचा शब्द उच्चारला, तर मला हें दिसतें की हे शिकलेले लोक त्यांच्या उद्धाराच्या कर्तव्यासंबंधी लगेच उदासीनता दाखवतात. एवढेंच होऊन थांबत नाही, तर मला असेंहि दिसतें की हे शिकलेले लोक, पाश्चात्त्यांच्या आनुवंशिक संक्रमणासंबंधीच्या व तसल्याच इतर निरर्थक कल्पनांच्या आधारें तऱ्हेतऱ्हेचा आसुरी व पाशवी युक्तिवाद पुढे मांडतात; हेतु हा की गरिबांवर अधिकाधिक अत्याचार करतां यावा व त्यांना पशुवत् करून सोडतां यावें. अमेरिकेंतील सर्वधर्मपरिषदेंत आफ्रिकेंतून एक अस्सल निग्रो तरुण आला होता. त्याने फार सुंदर भाषण केलें. त्या तरुणाबद्दल मला औत्सुक्य वाटलें, आणि त्याच्याशीं मी पुष्कळदा बोललोंहि, परंतु त्याच्याविषयी मी कांही माहिती मिळवूं शकलों नाहीं. पण इंग्लंडमधे एक दिवस मला कांही अमेरिकन लोक भेटले; आणि त्यांच्याकडून मला असें कळलें की तो आफ्रिकेच्या अंतर्भागांत राहणाऱ्या एका निग्रो टोळीच्या प्रमुखाचा मुलगा होता, आणि एके दिवशीं दुसऱ्या एका टोळीचा प्रमुख त्याच्या वडिलांवर रागावला, व त्याने त्याच्या आई-वडिलांना ठार केलें, व त्यांना शिजवून खाल्लेंहि! या मुलालाहि ठार करून शिजवून खावें अशी त्याने आज्ञा दिली, पण मुलगा पळून गेला आणि भयंकर हालअपेष्टा सोसून शेकडो मैलांचें अंतर कापून तो समुद्राच्या किनारीं आल्यावर एका अमेरिकन जहाजांतून त्याला अमेरिकेंत आणण्यांत आलें. आणि त्या मुलाने हें भाषण केलें! त्यानंतर तुमच्या त्या आनुवंशिक संक्रमणाच्या मतावर माझा कितपत विश्वास उरला असेल!

ब्रह्मवृंदहो, आनुवंशिकतेच्या आधारावर ब्राह्मण जर चांडाळापेक्षा अधिक लवकर शिकूं शकत असेल तर ब्राह्मणाच्या शिक्षणावर खर्च

करण्याची जरूरी नाही, चांडाळाकरिता सर्व खर्च करा. दुर्बलांना आधी साहाय्य करा, कारण त्यांनाच साहाय्याची गरज आहे. ब्राह्मण जन्मत: हुषार असेल तर मदतीवांचूनहि तो आपलें शिक्षण घेऊं शकेल; दुसरे जर जात्या हुशार नसतील तर त्यांनाच शिक्षण द्या, त्यांच्याकरिताच सर्व शिक्षक नियुक्त करा. हेंच मला न्यायाचें व बुद्धीला पटणारें असें वाटतें. आपल्या गरीब व दलित जनतेला 'आपण खरोखर कोण आहोंत' हें कळलें पाहिजे. जाति-वर्णाचा किंवा सबलते-दुर्बलतेचा विचार न करतां प्रत्येक स्त्रीपुरुषाला, बालकबालिकेला सांगा व शिकवा की सबल-दुर्बल, उच्च-नीच, सर्वांच्याच अंतर्यामीं तो अनंत आत्मा विराजमान आहे आणि म्हणून सर्वांच्याच ठायीं थोर व सत्प्रवृत्त होण्याची अनंत शक्ति वसत आहे. प्रत्येक जीवाला आपण घोषित करून सांगूं या की—'उत्तिष्ठत जाग्रत प्राप्य वरान्निबोधत'—'उठा जागे व्हा, आणि जोंपर्यंत ध्येय प्राप्त होत नाही तोंपर्यंत थांबूं नका.' उठा, जागे व्हा! ह्या दौर्बल्याच्या मोहनिद्रेंतून जागे व्हा. वस्तुत: कोणीहि दुर्बल नाही. आत्मा हा सर्वशक्तिमान, अनंत व सर्वज्ञ आहे. उठा, आपलें खरें स्वरूप प्रकट करा, तुमच्या आंत वसत असलेल्या ईश्वराची घोषणा करा. त्याला अमान्य करूं नका! आत्यंतिक निष्क्रियता, दुर्बलता व मोह हीं आपल्या समाजांत सर्वत्र पसरलेलीं दिसत आहेत. हे आधुनिक हिंदूंनो! या मोहजालांतून बाहेर पडा. हें साधण्याचा उपाय तुमच्याच पवित्र ग्रंथांमधून सांगितलेला आहे. स्वत:ला आपल्या सत्य स्वरूपाची शिकवण द्या. प्रत्येकाला त्याच्या सत्य स्वरूपाची शिकवण द्या. निद्रित जीवाला हांक द्या आणि पाहा तो कसा जागृत होतो तें. निद्रित जीवात्मा जागा होऊन क्रियाशील झाला म्हणजे त्याला सामर्थ्य, गौरव, सौजन्य, शुचिता व उत्तम असें सर्वकांही प्राप्त होईल. गीतेंत मला अधिक आवडणारें असें कांही असेल तर तें म्हणजे प्रभावी व सारभूत असलेले, श्रीकृष्णाच्या उपदेशाचें मर्मच असे पुढील दोन श्लोक होत :—

"समं सर्वेषु भूतेषु तिष्ठन्तं परमेश्वरम् ।
विनश्यत्स्वविनश्यन्तं य: पश्यति स पश्यति ।।
समं पश्यन्हि सर्वत्र समवस्थितमीश्वरम् ।
न हिनस्त्यात्मनात्मानं ततो याति परां गतिम् ।।"

--"सर्व भूतांमधे समभावें विद्यमान असलेल्या परमात्म्याला जो पाहतो, विनाशी वस्तूंत अविनाशी परमात्म्याला जो पाहतो त्यालाच खरोखर दिसत असतें. कारण ईश्वराला सर्वत्र व समभावें अवस्थित असलेला पाहून तो आत्म्याच्या द्वारें आत्म्याचा नाश करीत नाही आणि याप्रमाणे तो परमगति प्राप्त करून घेतो."

याप्रमाणे वेदान्ताच्या द्वारें आपल्या देशांत व परदेशांतहि लोककल्याणाचीं अनेक कामें करतां येतील. मानवजातीच्या दुःखनिवारणासाठी व उन्नतीसाठी 'परमात्मा सर्वव्यापी असून तो सर्वत्र समभावें विद्यमान आहे' या बहुमोल सिद्धान्ताचा आपल्या देशांत व इतरत्रहि प्रचार केला पाहिजे. जेथे जेथे म्हणून अज्ञान असतें तेथे तेथे अशुभ आणि दुःखहि असतें. मला अनुभवाने कळून आलें आहे की, आपल्या शास्त्रांत सांगितल्याप्रमाणे सर्व वाईट व अनिष्ट गोष्टी भेदावर भर दिल्यामुळे निर्माण होतात, आणि अभेदावर--विभिन्न दिसणाऱ्या वस्तूंच्या मुळाशीं एकत्व विद्यमान आहे या सत्यावर श्रद्धा ठेवल्याने सर्वप्रकारें कल्याण होतें. हाच वेदान्ताचा सर्वोच्च आदर्श आहे. एखादी गोष्ट आदर्श म्हणून मान्य करणें वेगळें व तो आदर्श दैनंदिन व्यवहारांत उतरविणें वेगळें आहे. एखादा आदर्श दाखविणें हें तर उत्तमच, पण त्या आदर्शाप्रत पोहोचण्याचा व्यवहार्य मार्ग कोणता आहे ?

येथे स्वाभाविकपणेंच, जटिल व वादग्रस्त अशी जातिसंस्थेची व समाजसुधारणेची समस्या पुढे येते. आपल्या देशांतील लोक शतकानुशतकें या समस्येचा विचार करीत आहेत. मला आपणांस प्रांजळपणें सांगितलें पाहिजे की मी जातिसंस्था नष्ट करणाराहि नाहीं व केवळ समाजसुधारकहि नाहीं. जातिसंस्था वा समाजसुधारणा यांच्याशीं प्रत्यक्षपणें मला कांहीं कर्तव्य नाही. तुम्ही कोणत्याहि जातीचे असां, पण म्हणून तुम्हीं अन्य व्यक्तीचा वा जातीचा द्वेष कां करावा ? 'सर्वांवर प्रेम करा' हीच माझी शिकवण आहे आणि ती 'परमात्मा सर्वव्यापक असून सर्वत्र समभावें विद्यमान आहे' या वेदान्तांतील सत्यावर आधारलेली आहे. गेलीं जवळजवळ शंभर वर्षें आपल्या देशांत समाजसुधारकांचा व विविध सामाजिक सुधारणांसंबंधीच्या विविध प्रस्तावांचा पूरच आलेला आहे. व्यक्तिशः मला स्वतःला या सुधारकांत कांही दोष आढ-

ळत नाहीत. त्यांच्यापैकी बहुतेकजण सज्जन व सद्हेतूने कार्य करणारे असून त्यांचीं उद्दिष्टेंहि कांही बाबतींत अतिशय प्रशंसनीय अशीं आहेत; पण ही गोष्ट देखील अगदी स्पष्ट आहे की गेल्या शंभर वर्षांच्या सामाजिक सुधारणांमुळे समग्र देशांत स्थायी स्वरूपाचा व महत्त्वाचा असा कांहीहि उल्लेखनीय परिणाम घडून आलेला दिसत नाही. व्यासपीठावरून हजारो व्याख्यानें दिलीं गेलीं आहेत, श्रद्धाशील हिंदु समाजाच्या मस्तकावर व त्यांच्या सभ्यतेवर निंदेचा अजस्र वर्षाव झालेला आहे आणि तरीहि कोणताच प्रत्यक्ष असा चांगला लाभ झालेला दिसत नाही. याचें कारण काय तें शोधून काढणें कठीण नाही. तें तर या निंदेंतच आढळेल. प्रथमतः, मीं आपणांस यापूर्वी सांगितल्याप्रमाणे आपल्याला हिंदु जातीचें परंपरेने प्राप्त झालेलें वैशिष्टय राखलें पाहिजे. आपल्याला इतर देशांपासून पुष्कळ गोष्टी घेतल्या पाहिजेत हें मला मान्य आहे. तसेंच, बाहेरून आपल्याला पुष्कळसें शिकण्यासारखें आहे हेंहि मला कबूल आहे; पण मला दुःखाने म्हणावें लागतें की सुधारणांच्या आपल्या बहुतेक सर्व आधुनिक चळवळी ह्या केवळ पाश्चात्त्य कार्यपद्धतींचें अंधानुकरण आहेत; आणि त्यांचा भारतांत कांही उपयोग होणार नाही; आणि म्हणूनच आपल्या आजच्या सुधारणांच्या चळवळींना कांहीच यश लाभलें नाहीं.

दुसरें असें की, निंदा-निषेध हा कुणाचें हित साधण्याचा मुळीं मार्गच नव्हे. आपल्या समाजांत दोष आहेत हें एखाद्या लहान मुलालाहि कळेल, आणि दोष कोणत्या समाजांत नाहीत? आणि माझ्या देशबांधवांनो, या प्रसंगीं मी तुम्हांला सांगूं इच्छितों की जगांतील जे देश व ज्या जाति मीं पाहिल्या त्या सर्वांची परस्परांशीं तुलना केल्यानंतर मी ह्या निष्कर्षाप्रत पोहोचलों आहें की, आपले लोक इतर सर्व जातींपेक्षा एकंदरीने पाहतां अधिक नीतिमान् व अधिक दैवी गुणांनी युक्त असे आहेत; त्याचप्रमाणे आपले सामाजिक नियम व प्रथा ह्या--त्यांचे उद्देश व त्यांची कार्यपद्धति विचारांत घेतां--मानवजातीला सुखी करण्याच्या दृष्टीने सर्वांहून जास्त उपयुक्त आहेत. म्हणून मला सुधारणा नको आहे, आपल्या राष्ट्राच्या परंपरांना अनुसरून विकास, विस्तार व प्रगति साधणें हें माझें ध्येय आहे. आपल्या देशाच्या इति-

हासाकडे मी पाहतों तेव्हा, मानवी मनाच्या विकासासाठी ज्याने एवढें भरीव कार्य केलेलें आहे असा दुसरा एकहि देश मला या पृथ्वीच्या पाठीवर आढळत नाही. म्हणून माझ्या या देशाची मी निंदा करीत नाहीं; मी आपल्या देशबांधवांना सांगतों, "तुम्हीं आजवर चांगलेंच केलें आहे, आता अधिक चांगलें करण्याचा प्रयत्न करा." या भूमींत पूर्वी महान् कार्यें पार पडलेलीं आहेत; अजूनहि अधिक मोठीं कार्यें करण्यास येथे भरपूर वाव आहे. आपण स्वस्थ व निष्क्रिय राहूंच शकत नाहीं, हें तुम्हांस निश्चितच ठाऊक आहे. आपण निष्क्रिय राहूं तर मरून जाऊं. आपल्याला पुढे तरी जावें लागेल, नाही तर मागे तरी जावें लागेल. आपल्याला आपली प्रगति तरी करावी लागेल, नाही तर आपली अधोगति होईल. प्राचीन काळीं आपल्या पूर्वजांनी महान् कार्यें केलीं आहेत, पण आपल्याला आपलें जीवन त्यांच्यापेक्षा अधिक विकसित करून घ्यावयाचें आहे, आणि त्यांनी केलेल्या कामगिरीपेक्षाहि पुढे मजल मारावयाची आहे. आपण आता मागे हटून आपली अधोगति करून घ्यावी हें कसें शक्य आहे? तें शक्य नाही, व तसें होतां कामा नये. आता मागे हटल्यास आपल्या राष्ट्राचें अध:पतन होऊन त्याचा मृत्युच ओढवेल. म्हणून आपण पुढे जाऊं या व अधिक चांगल्या गोष्टी करूं या; मला आपणांस हेंच सांगावयाचें आहे.

कोणत्याहि तात्पुरत्या समाजसुधारणांचा मला प्रचार करावयाचा नाही. समाजांतील अनिष्ट गोष्टी दूर करण्याकडेच लक्ष देण्यास मी तुम्हांला सांगत नाहीं, तर मी तुम्हांला सांगतों की तुम्ही पुढे व्हा व आपल्या पूर्वजांनी आपल्यापुढे मांडलेल्या मानवी प्रगतीच्या अत्यंत पायाशुद्ध अशा योजना पूर्णपणें कार्यान्वित करण्याचा प्रयत्न करा. मानवजातीचें एकत्व व मनुष्याचें मूलभूत ईश्वरत्व हा जो वेदान्ताचा आदर्श आहे त्याची अधिकाधिक उपलब्धि करून घेण्यासाठी तुम्ही यत्नशील व्हा हेंच माझें तुम्हांला सांगणें आहे. मला पुरेसा वेळ असता तर मीं तुम्हांला आनंदाने दाखवून दिलें असतें की आज आपल्याला जें कांही करावयाचें आहे तें सारें आपल्या स्मृतिकारांनी कित्येक शतकांपूर्वीच कसें सांगून ठेवलें आहे; आणि आज आपल्या समाजाच्या आचारविषयक नियमांत आणि प्रथांमधे जीं परिवर्तनें होत आहेत व पुढेहि

जीं परिवर्तनें होतील तीं सर्व त्यांना आधीच तंतोतंत कशीं कळलीं होतीं हेंहि मी तुम्हांला दाखवून दिलें असतें. त्यांनाहि जातिभेद दूर करावयाचा होता, पण ते आपल्या आधुनिक सुधारकांप्रमाणे नव्हते. शहरांतील सर्व लोकांनी एकत्र बसून मद्यमांसाचें भोजन करावें, देशांतील सर्व मूर्ख व वेड्या लोकांनी त्यांना हवींत तेव्हा, हवीं तेथे व हवीं त्यांच्याशीं लग्नें लावून सारा देशच एक मोठा पागलखाना करून टाकावा अशी कांही त्यांची जातिभेद नष्ट करण्याची कल्पना नव्हती; किंवा एखाद्या देशाच्या भरभराटीचें मोजमाप तेथील विधवांना मिळालेल्या पतींच्या संख्येवरून करावें असेंहि त्यांना कधी वाटलें नाही. या उपायांनी भरभराटलेला देश मला अजून पाहावयाचा आहे !

'ब्राह्मण' हाच आपल्या पूर्वजांचा आदर्श पुरुष होता. आपल्या सर्व शास्त्रांमधून ब्राह्मणत्वाचा हा आदर्शच मुख्यतः वर्णिलेला आढळतो. युरोपमधील प्रमुख धर्मोपदेशक हजारो पौंड खर्च करून आपल्या पूर्वजांची थोरवी सिद्ध करण्याचा प्रयत्न करीत आहेत; पहाडांत राहून संधि मिळेल तेव्हा वाटसरूंना लुबाडणाऱ्या एखाद्या भयानक जुलमी अशा अत्याचारी व्यक्तीचे आम्ही वंशज आहोंत असें सिद्ध केल्याखेरीज त्यांना समाधान लाभत नाही. याच्या उलट भारतांत थोर राजे आपली वंशपरंपरा कौपीन धारण करून वनांत राहणाऱ्या व कंदमुळांवर निर्वाह करून वेदपठन करणाऱ्या एखाद्या प्राचीन ऋषिवर्याशीं जोडण्यांत धन्यता मानतात. भारतांत एखाद्या ऋषीशीं जर तुम्ही आपली वंशपरंपरा जोडूं शकलांत तरच तुम्ही उच्च जातीचे ठरतां, अन्यथा नाही.

जन्माने श्रेष्ठ असण्याची आमची कल्पना इतरांच्या कल्पनेपेक्षा अगदी वेगळी आहे. अध्यात्मपरायण व त्यागी असा ब्राह्मण हा आमचा आदर्श आहे. ब्राह्मणाला मी कोणत्या अर्थाने आदर्श म्हणत आहें ? माझ्या मतें आदर्श ब्राह्मणत्व तेंच की ज्यांत ऐहिक आसक्तीचा पूर्ण अभाव असून यथार्थ ज्ञान विपुल प्रमाणांत असतें. हिंदुसमाजाचा आदर्श हा असा आहे. आपण हें ऐकलें असेलच की आपलीं धर्मशास्त्रें घोषित करतात की, कायदे हे ब्राह्मणाला बंधनकारक असत नाहीत, तो कायद्याच्या अतीत आहे, राजाचा त्याच्यावर अधिकार नसतो, आणि त्याला देहदंड दिला जाऊं शकत नाही. हें पूर्णपणें सत्य आहे. मतलबी, अज्ञानी व

मूर्ख लोकांनी सांगितल्याप्रमाणे वरील वचनांचा अर्थ करूं नका; परंतु वेदान्ताला अभिप्रेत असलेल्या मूळ कल्पनेप्रमाणे त्याचा अर्थ समजून घ्या. ज्यांनी आपली स्वार्थी वृत्ति पूर्णपणें नष्ट केली आहे, ज्ञान व प्रेम यांची प्राप्ति व त्यांचें दान हेंच ज्यांचें जीवितकार्य आहे अशा व्यक्तींना जर आपण 'ब्राह्मण' म्हटलें आणि एखाद्या देशांतील सर्व स्त्रीपुरुष जर अशा प्रकारचे ब्राह्मण असले--ते आध्यात्मिक व नैतिक गुणांनी युक्त असले--तर तो देश सर्व प्रकारच्या कायद्यांच्या पलीकडे आहे असें समजणें चूक होईल काय ? अशा स्त्रीपुरुषांवर नियंत्रण ठेवण्यासाठी पोलीस व फौजफाटा यांची काय आवश्यकता ? आणि त्यांच्यावर कोणीं राज्य तरी कशाला करावें ? आणि त्यांनी एखाद्या शासनाखाली कशाला राहावें ? ते सत्प्रवृत्त व थोर आहेत, आणि ते ईश्वराचे आवडते लोक आहेत; आणि असे ब्राह्मणच आमचा आदर्श आहेत. सत्ययुगांत फक्त ब्राह्मण ही एकच जाति होती असें आपल्याला आपल्या शास्त्रांत लिहिलेलें आढळतें. महाभारतावरून आपल्याला कळतें की सुरवातीस या जगांत सर्वत्र ब्राह्मणच राहत असत, आणि नंतर जेव्हा त्यांचें अध:पतन सुरूं झालें तेव्हा भिन्नभिन्न जातींत त्यांची विभागणी झाली, आणि हें चक्र उलट फिरून जेव्हा पुन: सत्ययुग येईल तेव्हा जगांतील सर्व लोक मूळच्या म्हणजे ब्राह्मण अवस्थेला पुन्हा प्राप्त होतील. हें चक्र आता उलट फिरूं लागलें आहे, आणि या गोष्टीकडे मला तुमचें लक्ष वेधावयाचें आहे. म्हणून उच्चवर्णीयांना खालीं ओढल्याने, आहारविहाराच्या बाबतींत स्वेच्छाचारी झाल्याने, थोडे अधिक सुखभोग मिळावेत म्हणून आपापल्या वर्णाश्रमांच्या मर्यादा उल्लंघिल्याने जातिविषयक समस्या सुटणार नाही, तर आपल्यापैकी प्रत्येकाने जर वेदान्तधर्माचें कांटेकोरपणें पालन केलें, प्रत्येकजण जर अध्यात्मसंपन्न झाला आणि अशा रीतीने प्रत्येकजण जर आदर्श ब्राह्मण बनला तरच जातिविषयक समस्या सुटेल. तुम्ही आर्य, अनार्य, ऋषि, ब्राह्मण किंवा अंत्यज, कोणीहि असा, तुमच्याकरिता या देशांत तुमच्या पूर्वजांनी एक नियम घालून दिलेला आहे. आपणां सर्वांना हा आदेश सारखाच लागू आहे. तो हा की आपण अविरत विकास साधला पाहिजे. आणि सर्वोच्च वर्णाच्या लोकांपासून तों चांडाळापर्यंत, या देशांतील प्रत्येकाने आदर्श ब्राह्मणत्व प्राप्त कर-

ण्याचा प्रयत्न केला पाहिजे. ही वेदान्तांतील कल्पना केवळ याच देशाकरिता सांगितलेली नसून सर्व जगाला ती लागू आहे. सर्व मानवजातीला सावकाश आध्यात्मिक ध्येयाप्रत नेणें अर्थात् तिला क्षमाशील, शांत, स्थिर, भक्तियुक्त, पवित्र व ध्यानपरायण बनविणें हें आपल्या जातिसंस्थेचें उद्दिष्ट आहे, आणि हें ध्येय गाठल्याने माणसाला ईश्वरप्राप्ति होते.

ह्या गोष्टी प्रत्यक्षांत कशा आणावयाच्या ? मी आपणांस पुन: सांगूं इच्छितों की शिव्याशाप व निंदानालस्ती यांच्यामुळे कांहीहि चांगलें निष्पन्न होणार नाही. वर्षानुवर्षें असल्या उपायांचा अवलंब करण्यांत आला आहे, पण त्यापासून कोणताहि चांगला परिणाम घडून आला नाही. प्रेम व सहानुभूति यांच्या द्वारेंच चांगले परिणाम घडवून आणतां येतील. हा एक फार मोठा विषय आहे, आणि यासंबंधी माझ्या मनांत उत्तरोत्तर येणाऱ्या सर्व कल्पना व माझ्या सर्व योजना स्पष्ट करून सांगण्यास कित्येक व्याख्यानें द्यावीं लागतील. म्हणून हिंदु बांधवहो, तुम्हांला एका गोष्टीचें स्मरण देऊन मी हें व्याख्यान संपवितों. ती गोष्ट ही की आपल्या ह्या राष्ट्ररूपी जहाजाने कित्येक शतकें हिंदु जातीला परतीराला पोहोचविलें आहे. आज कदाचित् या जहाजाला कांही छिद्रें पडलीं असतील; आज कदाचित् तें कांहीसें जीर्णहि झालें असेल; आणि असें जर असेल तर हीं छिद्रें बुजविणें हें तुमचें, माझें, सर्वांचेंच कर्तव्य आहे. चला, आपल्या देशबांधवांना या धोक्याची आपण जाणीव करून देऊं; ते जागृत होऊन आपल्या मदतीस येवोत. ही परिस्थिति व तत्संबंधीचें कर्तव्य याविषयी लोकांना जागृत करण्यासाठी मी शक्ति असेपर्यंत देशाच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत ओरडून सांगत राहीन. समजा की त्यांनी माझें म्हणणें ऐकून घेतलें नाही, तरी त्यांना मी मुळीच शिव्याशाप देणार नाही. आपल्या राष्ट्राने प्राचीन काळीं फार मोठी कामगिरी बजावली आहे; आणि भावीकालांत आपण अधिक चांगलें असें कांही जर करूं शकलों नाहीं, तर आपण शांतपणें एकत्रच डुबून मरणाला मिठी मारण्याचें समाधान मिळवूं या. देशभक्त व्हा, आणि आपल्यासाठी गतकाळांत अशीं महान् कार्यें करणाऱ्या या राष्ट्राबद्दल प्रेमभाव बाळगा. हे माझ्या देशबांधवांनो, इतरांशीं तुमची मी जितकी

अधिक तुलना करतों तितकें तुमच्याबद्दल मला अधिक प्रेम वाटूं लागतें; तुम्ही सज्जन, सुशील व शांत स्वभावाचे आहांत. तुमच्यावर सतत अत्याचारच होत आले आहेत. मायामय भौतिक जगतांतील हाच दैवदुर्विलास आहे. असो. त्याची चिंता नको, कारण अखेर आत्माच विजयी होईल. तोंवर आपण कार्य करूं या, आपण आपल्या देशाला व या परमपावन मातृभूमींतील श्रमाने शिथिल झालेल्या विविध संस्थांना शिव्याशाप देण्याचें टाळूं या. बुद्धीला न पटणाऱ्या व भोळसट समजुतींनी भरलेल्या प्रथांचीहि निंदा करूं नका, कारण त्यांनीहि पूर्वी कधीतरी चांगलें कार्य केलें असलेंच पाहिजे. हें नेहमीं ध्यानीं घ्या की या देशांतील संस्थांपेक्षा अधिक चांगले हेतु व ध्येयें बाळगणाऱ्या संस्था दुसऱ्या कोणत्याहि देशांत नाहीत. जगांतील बहुतेक देशांत जातिसंस्था असलेल्या मला आढळल्या, पण त्यामागील योजकता व हेतु इतका चांगला असल्याचें कोठेहि दिसलें नाही. मग जातिभेद जर अनिवार्य असेल तर डॉलरवर आधारलेल्या जातिभेदापेक्षा पावित्र्य, संस्कृति व स्वार्थत्याग यांवर प्रतिष्ठित असलेला जातिभेद अधिक चांगला. म्हणून निंदेचे शब्द उच्चारूं नका, ओठ बंद ठेवा व हृदयाचीं कपाटें उघडा. मातृभूमीचा व अखिल जगाचा उद्धार करण्याचा प्रयत्न करा; आणि हें करीत असतांना सर्व जबाबदारी आपल्याच शिरावर आहे अशी धारणा असूं द्या. वेदान्ताचा हा प्रकाश व जीवनादर्श घरोघर पोहोचवा व प्रत्येक जीवांतील सुप्त ईश्वरत्व जागृत करा. मग तुम्हांला कोणत्याहि प्रमाणांत यश लाभलें तरी तुम्हांला हें समाधान प्राप्त होईल की तुम्ही महान् कार्यासाठी जगलांत आणि तें कार्य करीत असतांनाच तुम्हांला मृत्यु आला. कोणत्याहि मार्गानें हें कार्य साध्य झाल्यानेच मानवजातीचें इहलौकिक व पारलौकिक कल्याण होईल.

# मद्रास येथील मानपत्रास दिलेलें उत्तर

स्वामी विवेकानंद मद्रास येथे आले, त्या वेळीं मद्रास येथील स्वागत समितीने त्यांचें स्वागत करून त्यांना पुढीलप्रमाणे मानपत्र दिलें :—

वंदनीय स्वामीजी,

पाश्चात्त्य देशांतील धर्मप्रचाराची कामगिरी आटोपून आपण परत येण्याच्या या प्रसंगीं आम्ही मद्रासमधील आपले हिंदुबांधव आपलें अत्यंत हार्दिक स्वागत करीत आहोंत. आपणांस असें मानपत्र देण्यांत, केवळ एखादा औपचारिक समारंभ घडवून आणावा असा आमचा हेतु नाही; आमच्या अंत:करणांतील स्नेहभाव अर्पण करावा, व भारताची उदात्त धर्मतत्त्वें घोषित करून ईशकृपेने सत्याच्या प्रस्थापनेस आपण जो हातभार लावला त्याविषयी कृतज्ञतेची भावना व्यक्त करावी यासाठी आम्ही येथे उपस्थित झालों आहोंत.

शिकागो येथे सर्वधर्मपरिषद भरविण्याचें ठरलें तेव्हा आपल्या कांही देशबांधवांना स्वाभाविकपणेंच असें तीव्रतेने वाटूं लागलें की आपल्या प्राचीन व उदात्त धर्माचा सुयोग्य प्रतिनिधि या परिषदेंत असावा, आणि अमेरिकन राष्ट्राला व पर्यायाने पाश्चात्त्य जगताला या धर्माचें स्वरूप योग्य रीतीने विशद केलें जावें. सुदैवाने त्याच वेळीं आपण आम्हांला भेटलांत आणि 'सत्य प्रस्थापित करण्याची जेव्हा गरज निर्माण होते तेव्हा तें कार्य करण्यास योग्य व्यक्तिहि आविर्भूत होते' हा सर्व राष्ट्रांच्या इतिहासांत अनेकदा सत्य ठरलेला सिद्धान्त पुन: एकदा अनुभवण्याची संधि आम्हांला प्राप्त झाली. हिंदुधर्माचें हें प्रतिनिधित्व करण्याची जबाबदारी आपण स्वीकारलीत तेव्हा आपल्या अलौकिक शक्ति पाहून आम्हां सर्वांना वाटलें की, या संस्मरणीय परिषदेंत हिंदुधर्माचें योग्य प्रतिनिधित्व आपणांकडून प्रभावीपणें होणारच. हिंदुधर्माच्या अंगभूत तत्त्वांचें आपलें विवेचन अत्यंत शुद्ध, सुस्पष्ट व अधिकारयुक्त वाणीने केलेलें होतें, त्यामुळे सर्वधर्मपरिषदेवर विलक्षण प्रभाव पडला, एवढेंच नव्हे, तर परदेशांतील अनेक स्त्री-पुरुषांना

खात्रीपूर्वक वाटूं लागलें की, भारतीय आध्यात्मिकतेच्या या झऱ्यांतून अमरत्व व प्रेम यांचें आकंठ पान करून, या जगांत मानवजातीचा अधिक व्यापक, अधिक पूर्ण, अधिक पावन व आजवर न अनुभवलेला असा विकास घडवून आणणें शक्य आहे. हिंदुधर्माने शिकविलेल्या, धर्मांधर्मांतील बंधुभावाच्या व सर्वधर्मसमन्वयाच्या या वैशिष्टयपूर्ण सिद्धान्तांकडे आपण जगांतील प्रमुख धर्मांच्या प्रतिनिधींचें लक्ष वेधून घेतलेंत याबद्दल आम्ही आपले विशेष आभारी आहोंत. सत्य व पावित्र्य ही एका विशिष्ट भूभागाची, जनसमूहाची, दर्शनसंप्रदायाची वा साधनापद्धतीची मक्तेदारी आहे, आणि कोणताहि संप्रदाय वा तत्त्वज्ञान इतर सर्वांना वगळून वा नष्ट करून एकटेंच नांदूं शकेल, असें आता कोणत्याहि खऱ्या ज्ञानी लोकांना व सत्याविषयी कळकळ असलेल्या व्यक्तींना आग्रहपूर्वक म्हणतां येणार नाही. गीतेंत निहित असलेला मधुर समन्वय विशद करणाऱ्या आपल्या सुंदर शब्दांत सांगावयाचें तर, "जगांतील सर्व धर्म म्हणजे भिन्न भिन्न परिस्थितींत भिन्न भिन्न स्त्री-पुरुषांनी एकाच ध्येयाच्या दिशेने केलेला प्रवासच आहे."

आपणांकडे सोपविलेलें केवळ हें उदात्त व पवित्र कार्यच आपण पार पाडलें असतें तरी आपल्या धर्मबांधवांनी आपल्या कामगिरीचें अपार महत्त्व सहर्ष व कृतज्ञतापूर्वक मान्य केलें असतें. पण, पाश्चात्त्य देशांत जाऊन, भारताच्या सनातन धर्मावर आधारलेल्या ज्ञान व शांति यांच्या संदेशाचाहि आपण तिकडे प्रचार केला. वेदान्त धर्माची विलक्षण तर्कशुद्धता विशद करण्याचें जें कार्य आपण केलेंत त्याबद्दल आम्ही आपले आभार मानतों, आणि त्याबरोबरच, आपला धर्म व तत्त्वज्ञान यांचा प्रचार करण्यासाठी स्थायी स्वरूपाचें व अनेक शाखा असलेलें 'मिशन' स्थापन करण्याच्या आपल्या योजनेचा उल्लेख करतांनाहि आम्हांला अतिशय आनंद होत आहे. ज्या कार्यासाठी आपण आपलें शक्तिसर्वस्व वेचण्याचें निश्चित केलें आहे तें कार्य आपल्या पवित्र परंपरेला साजेलसें असून आपलें जीवन व ध्येय यांना प्रेरणा देणाऱ्या आपल्या त्या थोर गुरुदेवांच्या ध्येयवादासहि तें अनुरूप असेंच आहे. आम्हांला अशी आशा व विश्वास वाटतो की या महान् कार्यांत आपणांबरोबर आम्हांसहि सहभागी होण्याची संधि मिळेल. आम्ही विनम्रभावाने त्या सर्वज्ञ व

कृपाळू ईश्वराला विनवितों की त्याने आपल्याला दीर्घायुष्य देऊन पूर्णपणें बलसंपन्न करावें आणि ज्याप्रमाणे शाश्वत सत्य सर्वदा यशस्वी होतें त्याप्रमाणे त्याने आपले प्रयत्नहि यशस्वी करावेत.

नंतर खेत्रीच्या महाराजांचें पुढील मानपत्र वाचण्यांत आलें :—

वंदनीय महाराज,

मद्रासमधील स्वागतसमारंभाची संधि घेऊन मी, भारतापर्यंतचा आपला प्रवास सुखरूपपणें पार पडल्याबद्दल आनंद व्यक्त करतों, आणि पाश्चात्त्य देशांत आपल्या निःस्वार्थ प्रयत्नांना जें मोठें यश लाभलें त्याबद्दल आपलें हार्दिक अभिनंदन करतों; कारण त्या ठिकाणीं बुद्धिमान् लोक असा गर्व वाहतात की "भौतिक शास्त्रांनी एकवार जें क्षेत्र व्यापलें त्यांतील एक तसूभरहि धर्माला कधीच परत मिळवितां आलेलें नाही." आता, भौतिक शास्त्रांनी खऱ्या धर्माला कधीच विरोध केलेला नाही ही गोष्ट वेगळी. आपल्या पवित्र भारतभूमीचें सद्भाग्य म्हणूनच तिला शिकागो येथील सर्वधर्मपरिषदेंत आपल्या ऋषींचें प्रतिनिधित्व करण्यासाठी आपणांसारखा सुयोग्य प्रतिनिधि लाभला. आणि केवळ आपलें ज्ञान, कार्यशीलता व उत्साह यांमुळेच पाश्चात्त्य जगताला, भारताजवळ आजहि असलेल्या आध्यात्मिकतेच्या अक्षय भांडाराचीं ओळख पटली. आपण घेतलेल्या परिश्रमांनी हें निःसंशय सिद्ध केलें आहे की वेदान्ताच्या सार्वजनीन शिकवणीच्या साहाय्याने या जगांतील भिन्न भिन्न संप्रदायांतील विरोधावर मात करणें शक्य आहे, आणि जगांतील लोकांना 'अनेकांतील एकत्व' हाच विश्वरचनेंतील प्रकृतीचा नियम आहे हें समजून घेण्याची व अनुभवण्याची अत्यंत आवश्यकता आहे. तसेंच आपल्या शिकवणीने हेंहि सिद्ध केलें आहे की, धर्माधर्मांतील बंधुत्व व धर्मसमन्वय, आणि परस्परांविषयी सहानुभूति व परस्पराला साहाय्य यांच्या द्वारेंच मानवजातीचें उद्दिष्ट सफल होऊं शकेल आणि तिचा भावी काळ चांगल्या रीतीने घडवितां येईल. आपल्या पावन व उदात्त मार्गदर्शनाखाली, आणि आपल्या प्रेरक व व्यापक शिकवणीमुळे, आजच्या आमच्या पिढीला जगाच्या इतिहासांतील एका नव्या पर्वाचा प्रारंभ पाहावयास मिळत आहे; या युगांत स्वमतान्धता, विद्वेष व कलह हीं संपुष्टांत

येऊन त्यांच्या जागीं शांति, सहानुभूति व प्रेम यांचें साम्राज्य नांदूं लागेल अशी आशा वाटूं लागली आहे. आणि माझ्या प्रजेसहित मी ईश्वराची प्रार्थना करतों की आपणांवर व आपल्या कार्यावर त्याचें नेहमी कृपाछत्र राहो.

मानपत्रें वाचून झाल्यावर स्वामीजी सभागृहांतून बाहेर पडले व जवळच उभ्या असलेल्या एका बग्गीवर उभे राहिले. त्यांच्या स्वागतासाठी एकत्र जमलेल्या त्या विशाल जनसमूहानें अत्यंत उत्साहाच्या भरांत केलेल्या गोंगाटामुळे स्वामीजी छोटेसेंच भाषण करूं शकले, व त्यांनी आपलें मुख्य भाषण पुढे केव्हातरी करण्याचें ठरविलें. स्वामीजी म्हणाले--

म्हणतात ना, की माणूस एखादा संकल्प करतो पण दैवाची योजना निराळीच असते. मानपत्रें व उत्तरें इंग्रजी पद्धतीने दिलीं जावींत ही आपली योजना होती. पण ईश्वराला ती मंजूर दिसत नाही. इतस्तत: पसरलेल्या श्रोत्यांपुढे, गीतेंतील प्रसंगाप्रमाणे मी रथांतून भाषण करीत आहें. हें जें घडलें त्याबद्दल मी ईश्वराला धन्यवाद देतों. यामुळे माझ्या भाषणाला जोर येईल व मी जें सांगणार आहें त्याला सामर्थ्य प्राप्त होईल. माझें भाषण तुम्हां सर्वांना ऐकूं येईल किंवा नाही हें मला सांगतां येत नाही, परंतु मी प्रयत्नाची पराकाष्ठा करीन. अशा उघडया मैदानांतील एवढया मोठया सभेपुढे बोलण्याचा प्रसंग यापूर्वी मला कधी आला नाही.

अत्यंत अगत्याने व उत्साहयुक्त आनंदाने कोलंबोपासून मद्रास-पर्यंत माझें जें स्वागत झालें तें माझ्या अगदी कल्पनेपलीकडील होतें; भारतांत इतरत्रहि माझें असेंच स्वागत होईल असें आता मला वाटूं लागलें आहे. हें सारें पाहून मला आनंद वाटतो, कारण त्यामुळे 'प्रत्येक राष्ट्राचा जीवनभूत असा एक एक आदर्श असतो' हें मी वारंवार प्रति-पादिलेलें सत्यच सिद्ध होत आहे. प्रत्येक राष्ट्र हें आपापल्या एका विशिष्ट मार्गानें जात असतें आणि धर्म हाच भारताच्या विकासाचा विशिष्ट मार्ग होय. जगाच्या अन्य भागांत धर्म हा अनेक गोष्टींपैकी एक गोष्ट सम-जला जातो व त्याला गौणस्थान दिलें जातें. उदाहरणार्थ इंग्लंडमधे धर्म हा राजकीय धोरणाचा एक भाग मानला गेला आहे. 'इंग्लिश चर्च' हा धर्मसंप्रदाय इंग्लंडमधील राज्यकर्त्या वर्गाचा आहे; म्हणून तेथील सर्व लोकांचा त्यावर विश्वास असो वा नसो, ते त्याला आपला मानून

साहाय्य करीत असतात. प्रत्येक सभ्य स्त्री-पुरुष त्या संप्रदायाशीं संबद्ध असावेत अशी अपेक्षा असते. हें सभ्यतेचें गमक मानलें जातें. त्याचप्रमाणे इतर देशांच्या बाबतींतहि त्या त्या देशाची जीवनशक्ति एकेका विशिष्ट आदर्शांत साठलेली असते. एखाद्या राष्ट्राची जीवनशक्ति राजकारणांतून प्रकट होते, तर दुसऱ्या एखाद्या राष्ट्राची शक्ति बौद्धिक उन्नतीमधून व्यक्त होते; एखाद्या राष्ट्राची शक्ति लष्करशाहीमधून प्रकट होते, तर दुसऱ्या एखाद्या राष्ट्राची शक्ति व्यापारी वृत्तींतून व्यक्त होत असते. अशा रीतीने प्रत्येक राष्ट्राचा प्राण त्या त्या राष्ट्राच्या विशिष्ट आदर्शांत वसत असतो, आणि धर्म हा, शोभेच्या अशा पुष्कळ दुय्यम दर्जाच्या गोष्टींपैकी एक या नात्याने त्या राष्ट्रांत नांदत असतो.

येथे, आपल्या भारतांत धर्म हा राष्ट्रीय जीवनाचें केंद्रस्थान आहे. भव्य अशा राष्ट्रमंदिराचा तो भक्कम आधार वा कणाच आहे. राजकारण, सत्ता व बुद्धि यांना देखील या ठिकाणीं गौण स्थान आहे. म्हणून भारतांत केवळ धर्म हीच एक विचार्य अशी बाब आहे. मला शेकडो वेळां असें सांगण्यांत येतें की भारतीय जनतेंत जागतिक घडामोडींसंबंधी अज्ञान आहे; आणि तें खरें आहे. कोलंबोला उतरल्यावर मला आढळलें की त्यांच्यापैकी एकालाहि युरोपांतील राजकीय घडामोडीची गंधवार्ताहि नव्हती, तेथील मंत्रिमंडळांतील बदल व पराभव इत्यादि त्यांना अगदी अज्ञात होतें. त्यांच्यापैकी एकानेहि 'सोशॅलिझम', 'अनार्किझम' व युरोपीय राजकारणांतील हेरफार यांबद्दल ऐकलेंहि नसेल, पण सर्वधर्मपरिषदेंत भारतांतून एक संन्यासी पाठविला गेला होता व त्याला कांही यशहि लाभलें ही गोष्ट सिलोनमधील प्रत्येक स्त्री, पुरुष व बालकहि जाणत होतें. यावरून हें सिद्ध होतें की, ज्या गोष्टी भारतीयांच्या जीवनांत आवश्यक आहेत किंवा उपयुक्त आहेत त्या गोष्टींसंबंधी ज्ञानाचा वा जिज्ञासेचा भारतांत अभाव नाही. राजकीय वा तत्सदृश अन्य गोष्टी ह्या भारतीय जीवनाचा अविभाज्य भाग कधीच नव्हत्या; पण धर्म व आध्यात्मिकता हाच भारतीयांच्या जीवनाचा व विकासाचा एकमेव आधार होता व आहे, आणि भावीकालांतहि याच आधारावर त्यांचें जीवन विकसित होणार आहे.

जगांतील राष्ट्रांपुढे आज दोन समस्या विद्यमान आहेत. यांपैकी

एक समस्या भारताने सोडविण्यासाठी घेतलेली असून दुसरी समस्या जगांतील इतर सर्व राष्ट्रांनी हातीं घेतली आहे. आता प्रश्न असा की जीवनसंग्रामांत कोणाचा टिकाव लागणार आहे ? कोणत्या कारणाने एक राष्ट्र टिकून राहतें व दुसरीं राष्ट्रें नाश पावतात ? या जीवनसंग्रामांत काय टिकून राहणार ?––प्रेम की द्वेष, भोग की त्याग, जडद्रव्य कीं चैतन्य ? इतिहासपूर्व युगांत या बाबतींत आमच्या पूर्वजांचें जसें मत होतें तसेंच आमचें आजहि आहे. ज्या प्राचीन काळापर्यंत दंतकथाहि पोहोचूं शकत नाहीत त्या अति प्राचीन काळांत आमच्या महिमाशाली पूर्वजांनी ह्या प्रश्नाची आपली बाजू निश्चित केली व सर्व जगाला आव्हान दिलें. या प्रश्नाचें आमचें उत्तर त्याग, निर्भयता व प्रेम हें आहे, व हींच चिरकाल टिकण्यास योग्य आहेत. इंद्रियसुखांच्या वासनेचा त्याग केल्यानेच राष्ट्र टिकूं शकतें. याकरिता पुरावा आहे, कुत्र्याच्या छत्रीप्रमाणे प्रत्येक शतकांत उदयास्त पावणारीं राष्ट्रें व त्यांचा बोलता इतिहास यांचा ! शून्यांतून त्यांचा उदय होतो, थोडे दिवस त्यांच्या दुष्ट लीला चालू असतात आणि नंतर तीं पुन: शून्यांत लय पावतात. परंतु या विशाल व थोर राष्ट्राला मोठमोठ्या संकटांना तोंड द्यावें लागलें, दुर्दैवाच्या आघातांशीं दोन हात करावें लागलें, जगांतील अन्य देशांना ज्या सोसाव्या लागल्या नाहीत अशा आपत्तींशीं सामना करावा लागला, तरीहि हें राष्ट्र अजून जिवंत आहे, कारण त्याने त्यागाची बाजू उचलली आहे; व त्यागावाचून धर्म कसा संभवूं शकेल ? युरोप या प्रश्नाच्या दुसऱ्या बाजूचा विचार करीत आहे. मनुष्य अधिकांत अधिक किती भोग मिळवूं शकेल, बऱ्यावाईट साधनांनी माणूस जास्तींत जास्त किती सत्ता बळकावूं शकेल याचा युरोप विचार करीत आहे. कठोर, निर्दय, सहानुभूतिशून्य स्पर्धा हाच युरोपचा मूलमंत्र आहे. याच्या उलट आमचा मूलमंत्र आहे वर्णाश्रमधर्म––वर्णाश्रमधर्माच्या द्वारें स्पर्धा मोडून काढणें, तिची शक्ति खंडित करणें, तिची निष्ठुरता बोथट करणें आणि मानवात्म्याचा या रहस्यमय जीवनांतील मार्ग निष्कंटक करणें हा आमचा मूलमंत्र आहे.

या वेळीं जनसमुदाय एवढा गलबला करूं लागला की आपलें बोलणें लोकांना नीट ऐकूं येत नाही असें स्वामीजींना वाटलें. म्हणून त्यांनी पुढील शब्दांनी आपलें भाषण संपविलें :—

मित्रहो, तुमचा उत्साह पाहून मला फार आनंद झाला आहे. तुमचा उत्साह खरोखरच विलक्षण आहे. मी तुमच्यावर नाराज झालों आहें असें मुळीच समजूं नका. मी तर तुमचा हा उत्साह पाहून अत्यंत संतुष्ट झालों आहें. विलक्षण उत्साह--हीच गोष्ट आपल्याला हवी आहे. फक्त तो कायमचा टिकवा, तुमच्या ठायीं तो सदैव असूं द्या. उत्साहाचा हा अग्नि विझूं देऊं नका. आपल्याला भारतांत महान् कार्यें पार पाडावयाचीं आहेत. त्यासाठी मला तुमचें साहाय्य हवें आहे; म्हणून असा उत्साह आवश्यकच आहे. ही सभा जास्त वेळ चालूं ठेवणें अशक्य आहे. तुमच्या या अगत्यपूर्ण व उत्साहपूर्ण स्वागताबद्दल मी तुमचा अत्यंत आभारी आहें. एखाद्या शांत वेळीं अधिक चांगल्या रीतीने आपण विचार-विनिमय करूं. तेव्हा मित्रहो, आता मी तुमची तात्पुरती रजा घेतों. सर्व बाजूंना असलेल्या तुम्हां सर्वांना माझें बोलणें पण ऐकूं येणें अशक्य झालें आहे, म्हणून आज संध्याकाळीं केवळ माझ्या भेटीनेच तुम्हांला समाधान मानून घेतलें पाहिजे. पुन्हा केव्हातरी मी आपणांसमोर भाषण देईन. आपण केलेल्या उत्साहपूर्ण स्वागताबद्दल मी आपला अत्यंत आभारी आहें.

---

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळ...
अनुक्रम ....३४६१... दि: ...
क्रमांक .................. नों. दि ...

# माझ्या मोहिमेची योजना

( मद्रास येथील व्हिक्टोरिया हॉलमधे दिलेलें व्याख्यान )

परवा लोकांची गर्दी फार वाढल्यामुळे मला माझें व्याख्यान पूर्ण करतां आलें नाही. म्हणून मी आज, मद्रासमधील लोकांनी माझ्याविषयी सतत जी सहृदयता दाखविली तिच्याबद्दल त्यांचे आभार मानतों. मानपत्रांमधे मला जीं सुंदर सुंदर विशेषणें लावण्यांत आलीं त्यांबद्दल मीं कोणत्या शब्दांत कृतज्ञता व्यक्त करावी हें मला समजत नाही. प्रभूच्या चरणीं माझी हीच प्रार्थना आहे की त्याने माझें जीवन या सर्व विशेषणांच्या अनुरूप असें करावें व माझें सर्व आयुष्य आपल्या धर्माच्या व मातृभूमीच्या सेवेंत व्यतीत व्हावें. हें कार्य करण्याची प्रभूने मला पात्रता द्यावी.

माझ्या अंगीं इतर दोष असले तरी माझ्या ठायीं थोडाफार धीटपणाहि आहे असें मला वाटतें. पाश्चिमात्यांना देण्यासाठी माझ्याजवळ भारताचा संदेश होता; तो मीं निर्भयपणें अमेरिकन व इंग्रज लोकांना दिला. आजच्या विषयास सुरवात करण्यापूर्वी मला आपणांस धीटपणें कांही गोष्टी सांगावयाच्या आहेत. माझ्या अंगीकृत कार्यांत अडथळा आणूं पाहणारी, माझ्या कार्याच्या प्रगतीला विरोध करणारी, व शक्य झाल्यास मला नामशेष करूं पाहणारी अशी विशिष्ट परिस्थिति माझ्या भोवताली कांही दिवसांपासून निर्माण झाली आहे. ईश्वरकृपेने असल्या प्रयत्नांना यश आलें नाही. अशा स्वरूपाचे प्रयत्न नेहमीच अयशस्वी होणार. पण गेल्या तीन वर्षांत माझ्याविषयी व माझ्या कार्याविषयी कांही गैरसमज निर्माण झाला आहे. जोंवर मी परदेशांत होतों तोंवर मी शांत राहिलों व एक शब्दहि उच्चारला नाही; पण आता मात्र माझ्या मातृभूमींत असतांना मला अशा कांही मुद्द्यांचें स्पष्टीकरण करावयाचें आहे. या माझ्या शब्दांचा काय परिणाम होईल, या माझ्या शब्दांनी तुमच्या मनांत कोणत्या भावना निर्माण होतील याची मला चिंता नाही. लोक काय म्हणतील याकडे मी फारसें लक्ष देत नसतों. चार वर्षां-

पूर्वी दंडकमंडलू हातीं घेऊन हा संन्यासी तुमच्या या शहरांत आला होता; आजहि मी तसाच संन्यासी आहें. सारें जग माझ्यासाठी अजूनहि मोकळें आहे. प्रास्ताविक म्हणून अधिक कांही न बोलतां आता मी विषयाकडे वळतों.

प्रथमत: थिऑसॉफिकल सोसायटीसंबंधी मला दोन शब्द सांगितले पाहिजेत. भारतामधे या सोसायटीने कांही चांगलें कार्य केलें आहे हें सर्वांना ठाऊकच आहे. म्हणून प्रत्येक हिंदु या संस्थेबद्दल, विशेषत: श्रीमती ॲनी बेझंट यांच्याबद्दल कृतज्ञ आहे. मला श्रीमती बेझंट यांच्याबद्दल फार थोडी माहिती असली तरी मला जेवढी महिती आहे तेवढ्यावरून माझी अशी धारणा झाली आहे की, त्या आपल्या मातृभूमीच्या प्रामाणिक हितचिंतक असून या देशाच्या प्रगतीसाठी त्या आपलें शक्तिसर्वस्व वेचीत आहेत. त्याबद्दल प्रत्येक खरा भारतीय त्यांचा चिरकृतज्ञ आहे; त्यांच्यावर व त्यांच्याबरोबर कार्य करणाऱ्या व्यक्तींवर ईश्वरकृपेचा वर्षाव होवो. पण त्यांच्याविषयी कृतज्ञ असणें वेगळें व थिऑसॉफिकल सोसायटीचे अनुयायी होणें वेगळें. एखाद्याविषयी आदर, श्रद्धा, प्रेम असणें वेगळें व बुद्धीच्या कसोटीवर घासून न पाहतां, कांहीच विचार न करतां किंवा विश्लेषण न करतां एखाद्याचें म्हणणें सर्वस्वी ग्रहण करणें अगदी वेगळें. इंग्लंडमधील व अमेरिकेंतील माझ्या अल्पशा कार्यास थिऑसॉफिस्ट लोकांनी साहाय्य केलें अशी बातमी सगळीकडे पसरविण्यांत येत आहे. तुम्हांला हें स्पष्टपणें सांगितलें पाहिजे की ही बातमी सर्वस्वी असत्य आहे, पूर्णपणें चुकीची आहे. उदार मतें असावींत आणि मतभिन्नता असली तरी सहानुभूति असावी अशा प्रकारच्या पुष्कळ लंब्याचवड्या गोष्टी आपण या जगांत ऐकतों. हें तर फारच चांगलें, पण वस्तुस्थिति मात्र अशी दिसते की एखादा माणूस जोंवर आपलें सर्व म्हणणें मानतो तोंवर आपल्या ठायीं त्याच्याविषयी सहानुभूति असते, पण त्याने मतभेद व्यक्त करण्याचें धैर्य दाखवितांच सर्व प्रेम व सहानुभूति नाहीशी होते.

तसेंच दुसरे कांही लोक असे आहेत कीं ज्यांना आपला मतलब साधावयाचा असतो; आणि त्यास बाधक असें देशांत कांही निर्माण झालें की त्यांच्या अंगाची आग होते, त्यांचा द्वेष उफाळतो व काय

करावें हें त्यांना सुचत नाही. हिंदूंनी आपलीं घरें स्वच्छ करण्याचें ठरविलें तर ख्रिस्ती मिशनऱ्यांना वाईट कां वाटावें? तसेंच, ब्राह्मसमाजाला व त्याच्यासारख्या इतर सुधारक संस्थांना, हिंदु लोक प्राणपणानें आपल्या सुधारणा आपणच करीत आहेत याबद्दल खेद कां वाटावा? त्यांनी विरोधास सिद्ध कां व्हावें? त्यांनी कट्टरपणें या चळवळींचें शत्रुत्व कां करावें? कां करावें?—असें मी विचारतों. मला असें वाटतें की, त्यांचा द्वेष व मत्सर एवढा भयंकर आहे की "कां व कशाकरिता" असें विचारण्याची सोय नाही.

चार वर्षांपूर्वी ज्या वेळीं मीं अनेक समुद्र-महासागर ओलांडून अमेरिकेला जाण्यासाठी निघालों होतों त्या वेळीं मी निर्धन, अज्ञात व मित्रहीन असा एक संन्यासी होतों; त्या परस्थ अमेरिका देशांत माझ्या ओळखी नव्हत्या किंवा माझ्याजवळ परिचयपत्रेंहि नव्हतीं; म्हणून मी थिऑसॉफिकल सोसायटीच्या एका पुढाऱ्यास भेटलों. सहजच मला वाटलें की एक भारतप्रेमी अमेरिकन म्हणून सदर गृहस्थ तेथील कोणाच्या तरी नांवानें ओळखपत्र देतील. त्यांनी मला विचारलें, "तुम्ही माझ्या संस्थेचे सदस्य व्हाल काय?" मीं उत्तर दिलें, "नाही; या सोसायटीचीं मतें बव्हंशीं मान्य नसतांना मी तिचा अनुयायी कसा होऊं?" "मग माफ करा, मी आपणांकरिता कांहीहि करूं शकणार नाहीं"—असें उत्तर त्यांनी दिलें. हें काय माझा मार्ग मोकळा करणें झालें? तुम्हांला ठाऊक आहे की मद्रासमधील कांहीं मित्रांच्या मदतीने मी अमेरिकेला पोहोचलों. त्यांच्यापैकी बहुतेकजण येथे उपस्थित आहेत. त्यांच्यापैकी न्यायमूर्ति सुब्रह्मण्य अय्यर हेच फक्त येथे अनुपस्थित आहेत. त्यांच्याविषयी मी अत्यंत कृतज्ञ आहें. अंतर्दृष्टीची दैवी देणगी त्यांना लाभलेली आहे. या आयुष्यांत मला लाभलेल्या अत्यंत विश्वासू मित्रांपैकी ते एक आहेत. ते एक खरे मित्र असून भारताचे खरे सुपुत्र आहेत. असो. सर्वधर्मपरिषद सुरू होण्याच्या कित्येक महिने आधी मी अमेरिकेंत जाऊन पोहोचलों होतों. माझ्याजवळ फारच थोडें द्रव्य होतें व तें लवकर खर्च होऊन गेलें. हिवाळा आला व माझ्याजवळ तर उन्हाळ्यांत उपयुक्त असेच पातळ कपडे होते. त्या कडक थंडीच्या दिवसांत काय करावें तें सुचेना, कारण रस्त्यांतून भिक्षा मागावी तर तुरुंगाचा रस्ता धरावा

लागला असता. त्या वेळीं अखेरचे थोडे डॉलर माझ्याजवळ शिल्लक होते. मीं मद्रासमधील माझ्या मित्रांना तार पाठविली. हें थिऑसॉफिस्टांना समजलें तेव्हा त्यांच्यापैकी एकाने लिहिलें, "आता हा सैतान मरणार आहे; ईश्वराने आमचें रक्षण केलें." हें काय माझा मार्ग मोकळा करणें झालें? याचा मीं उल्लेखहि केला नसता, परंतु माझ्या देशबांधवांनो, तुम्हीं ही गोष्ट मला बोलायला लावली. गेलीं तीन वर्षें या गोष्टीबद्दल मी अवाक्षर बोललों नव्हतों. त्या बाबतींत मीं मौन पाळलें; पण आज ही गोष्ट बाहेर पडली हें एवढ्यावरच थांबलें नाही. सर्वधर्मपरिषदेंत कांही थिऑसॉफिस्ट मला भेटले, त्यांच्यांत मिसळण्याचा व त्यांच्याशीं बोलण्याचा मीं प्रयत्न केला. त्यांच्या चेहऱ्यावरील तिरस्काराची भावना मला आठवते 'हा क्षुद्र प्राणी देवतांच्या या मेळाव्यांत कशाला आला आहे' असें जणु त्यांना म्हणावयाचें होतें. सर्वधर्मपरिषदेंत माझा नांवलौकिक झाल्यावर माझ्यापुढे मोठेंच कार्यक्षेत्र निर्माण झालें. पण प्रत्येक कार्याच्या वेळीं थिऑसॉफिस्ट लोकांनी माझे पाय ओढण्याचा प्रयत्न केला. माझ्या व्याख्यानांना थिऑसॉफिस्टांनी उपस्थित राहूं नये असा आदेश देण्यांत आला, कारण त्यामुळे त्यांना सोसायटीची सहानुभूति गमवावी लागली असती. त्यांच्या गुप्त (Esoteric) विभागाच्या नियमानुसार जो मनुष्य या विभागाचें अनुयायित्व पत्करतो त्याने कुथुमी व मोरिया यांच्याकडूनच उपदेश घेतला पाहिजे. अर्थात् हा उपदेश त्यांचे पृथ्वीवरील प्रतिनिधि श्री. जज् व श्रीमती बेझंट यांच्याकडूनच घेतला पाहिजे. म्हणून या गुप्त विभागाचें अनुयायित्व स्वीकारणें म्हणजे आपलें स्वातंत्र्य गमावण्यासारखेंच आहे. अर्थातच मी हें मान्य करणें शक्य नव्हतें; एवढेंच नव्हे तर जो मनुष्य हें मान्य करील त्याला मी कांही हिंदु म्हणणार नाहीं. श्री. जज् यांच्याबद्दल मला मोठा आदर वाटतो. ते एक साधे, सज्जन, मोकळ्या मनाचे असे थोर गृहस्थ होते व त्यांना थिऑसॉफिस्ट लोकांतील आदर्श व्यक्ति म्हणून मानतां येईल. त्यांच्या व श्रीमती बेझंट यांच्यामधील मतभेदांवर टीका करण्याचा मला अधिकार नाही, कारण ते दोघेहि 'माझा महात्मा जें सांगतो तेंच बरोबर आहे' असें मानतात. यांत नवल असें की दोघांचाहि महात्मा एकच आहे. सत्य काय तें ईश्वरालाच ठाऊक. निवाडा

करणारा तोच आहे; व दोन्ही बाजू समान असतांना एकाच बाजूकडे झुकून मत देण्याचा कोणालाच अधिकार नाही. याप्रमाणे त्यांनी अमेरिकेंत सर्वत्र माझ्यासाठी मार्ग मोकळा केला !

ते थिऑसॉफिस्ट माझ्या विरुद्ध असलेल्या ख्रिस्ती मिशनऱ्यांना जाऊन मिळाले. या मिशनरी लोकांनी माझ्याविरुद्ध कल्पनातीत खोट्यानाट्या कंड्या पिकविल्या. शहरांशहरांतून त्यांनी माझ्या चारित्र्यावर शिंतोडे उडविले; तेथे तर मी एकाकी व मित्रहीन होतों. त्यांनी प्रत्येक घरांतून मला हुसकून लावण्याचा, व माझा मित्र बनलेल्या प्रत्येकाला शत्रु बनविण्याचा प्रयत्न चालविला. त्यांनी माझी उपासमार करण्याचा यत्न केला, आणि मला हें सांगण्यास दु:ख होतें की, माझ्या स्वत:च्या एका देशबांधवाने माझ्याविरुद्ध वरील कृत्यांत भाग घेतला. हे गृहस्थ भारतामधील एका सुधारक पक्षाचे पुढारी आहेत. हे सद्गृहस्थ रोज प्रचार करीत असतात की 'भारतांत ख्रिस्त आले आहेत.' खरोखर ख्रिस्त हे भारतांत काय अशा मार्गाने येतील ? भारतांत सुधारणा घडविण्याचा हाच मार्ग आहे काय ? आणि ह्या सद्गृहस्थांना मी लहानपणापासून ओळखतों, ते माझे फार घनिष्ट मित्र होते. पुष्कळ दिवसांपासून कोणत्याहि भारतीयाशीं माझी भेट झाली नव्हती, म्हणून त्यांना पाहून मला फार आनंद झाला. पण त्यांच्यापासून मला ही अशा प्रकारची वागणूक मिळाली. ज्या दिवशीं सर्वधर्मपरिषदेंत माझी प्रशंसा झाली, ज्या दिवशीं शिकागो येथे मी लोकप्रिय झालों त्याच दिवसापासून त्यांची वागणूक बदलली आणि सर्वप्रकारें माझें अनिष्ट करण्याचा त्यांनी गुप्तपणें अटोकाट प्रयत्न चालविला. भारतांत ख्रिस्त काय अशाच मार्गानें येतील ? वीस वर्षें ख्रिस्तांच्या पायाशीं बसून त्यांनी हेच पाठ घेतले काय ? आमचे थोर सुधारक असें सांगतात की ख्रिस्ती राज्यामुळे व ख्रिस्ती धर्मामुळे भारतीय लोकांचा उद्धार होणार आहे. हें साधण्याचा मार्ग हाच आहे काय ? खरोखर ते गृहस्थ जर याचें उदाहरण असतील तर फारशी आशा बाळगण्याचें कारणच नाही.

मी आपणांस आणखी दोन शब्द सांगतों. समाजसुधारकांच्या एका मुखपत्रांत मीं वाचलें की त्यांनी मला शूद्र म्हटलें आहे, आणि 'शूद्राला संन्यासी होण्याचा काय अधिकार' असा प्रश्न त्यांनी विचा-

रला आहे. त्याला माझें उत्तर असें की ज्याच्या पायावर 'यमाय धर्मराजाय चित्रगुप्ताय वै नमः' असें म्हणून ब्राह्मण फुलें वाहतात आणि ज्याचे वंशज शुद्ध क्षत्रिय आहेत त्या महापुरुषाच्या कुळांत माझा जन्म झाला. तुमच्या पुराणग्रंथावर तुमचा विश्वास असेल तर या तथाकथित सुधारकांना सांगा की माझ्या पूर्वजांनी भारताच्या निम्म्या भागावर कित्येक शतकें राज्य केलें आहे व त्यांची अन्य सेवाहि महशूर आहे. माझ्या जातीचा विचार करावयाचा नसेल तर भारतांतील आधुनिक सभ्यता कितीशी शिल्लक उरेल ? एकट्या बंगाललाच माझ्या जातीने सर्वश्रेष्ठ तत्त्वज्ञ, सर्वश्रेष्ठ कवि, सर्वश्रेष्ठ इतिहासकार, सर्वश्रेष्ठ पुराणवस्तुसंशोधक व सर्वश्रेष्ठ धर्मप्रचारक दिले आहेत. माझ्या जातीनेच भारताला सर्वश्रेष्ठ आधुनिक शास्त्रज्ञ दिला आहे. या निंदकांना आपला इतिहास थोडातरी कळावयास हवा होता. त्यांनी तीन वर्णांचा अभ्यास करावयास हवा होता. म्हणजे ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य यांना संन्यास घेण्याचा अधिकार आहे व या त्रैवर्णिकांना वेदाध्ययनाचा सारखाच अधिकार आहे हें त्यांना कळलें असतें. हें मीं सहज ओघाने आलें म्हणून सांगितलें. मीं याचा केवळ उल्लेख केला, पण त्यांनी मला शूद्र म्हटलें याचें मला मुळीच दुःख वाटत नाही, माझ्या पूर्वजांनी गरिबांवर जे अत्याचार केले त्याचें हें किंचित् प्रायश्चित्त असेल. मी चांडाल असतों तर त्याचा मला अधिक आनंद वाटला असता, कारण मी त्या थोर ब्राह्मणाचा (भगवान श्रीरामकृष्णांचा) शिष्य आहे की ज्याला चांडाळाचें घर स्वच्छ करण्याची इच्छा झाली होती. अर्थातच त्या व्यक्तीने त्यांना तसें करूं दिलें नाही. ब्राह्मण संन्याशाने येऊन आपलें घर स्वच्छ करावें हें त्या व्यक्तीला योग्य कसें वाटेल ? म्हणून हे संन्यासी अपरात्रीं उठत व गुप्तपणें त्या चांडालाच्या घरांत शिरून त्याचा संडास साफ करीत व तेथील जागा आपल्या लांब केसांनी पुसत; आणि हें कार्य त्यांनी कित्येक दिवस केलें, कारण त्यांना सर्वांचे सेवक बनावयाचें होतें. त्या महापुरुषाचे पाय मीं आपल्या मस्तकावर धारण केले आहेत. तेच माझा आदर्श आहेत. याच आदर्श पुरुषाचें अनुकरण करण्याचा मी प्रयत्न करणार आहें. सर्वांचा सेवक बनून हिंदु आपला उद्धार करूं इच्छितो. हिंदूंनी अशा प्रकारें सर्वसामान्य जनतेचा उद्धार करावा, विदेशी पद्ध-

तीचें साहाय्य त्यांनी घेऊं नये. पाश्चात्त्य सभ्यतेच्या सान्निध्यांत वीस वर्षें राहून माणसाचा स्वभाव कसा बनतो याचें उदाहरण पाहा. आपला मित्र लोकप्रिय होत आहे म्हणून व तो आपल्या द्रव्यप्राप्तीच्या आड येत आहे असें वाटल्यामुळे हा माणूस आपल्या स्वतःच्या मित्रालाहि परदेशांत उपासमारीने मारून टाकूं इच्छितो. दुसऱ्या बाजूला माझ्या आदर्श महापुरुषाचें उदाहरण पाहा. शुद्ध, प्राचीन, भारतीय हिंदुधर्माचा जीवनावर काय परिणाम होतो याचें तें उदाहरण आहे. आमच्या सुधारकांपैकी एखाद्याने तरी या प्रकारचें जीवन जगून दाखवावें, त्याने चांडाळांचीहि प्रत्यक्ष सेवा करून दाखवावी. मग मीं त्याच्या पायाशीं बसून कांही शिकेन, तत्पूर्वी नाहीं. बडबडीच्या खंडोगणती पोकळ शब्दांपेक्षा अल्पशा प्रत्यक्ष आचरणाचें मोल केव्हाहि जास्तच असतें.

आता मद्रासमधील सुधारक संस्थांकडे वळतों. त्यांनी मोठ्या सहृदयतेने मला वागविलें. त्यांनी गोड शब्दांत मला दिलासा दिला. बंगालमधील सुधारक व मद्रासमधील सुधारक यांच्यांत मोठा फरक आहे असें त्यांनी मला सांगितलें व मला तें पटलेंहि. तुम्हांला मी पुष्कळ वेळां सांगितलेलें आठवत असेल की सध्या मद्रास येथील परिस्थिति अत्यंत चांगली आहे. बंगालप्रमाणे क्रिया व प्रतिक्रिया यांच्या गोंधळांत तें सापडलें नाही. येथे सावकाश पण निश्चितपणें प्रगति होत आहे; येथे विकास होत आहे, केवळ प्रतिक्रिया नव्हे. बंगालमधे पुष्कळ बाबतींत कांही अंशीं पुनरुत्थान झालें आहे खरें, पण मद्रासमधे नैसर्गिक रीतीने विकास घडून येत आहे. म्हणून दोन्ही प्रांतांतील लोकांमध्ये असलेला जो फरक येथील सुधारक दाखवीत असतात तो मला मान्य आहे. पण त्यांच्याशीं माझा जो मतभेद आहे तो त्यांनी ध्यानीं घेतलेला दिसत नाही. या सुधारकांच्या कांही संस्था, मीं त्यांच्यांत सामील व्हावें म्हणून मला धाक दाखवीत आहेत. त्यांनी असा प्रयत्न करावा हीं फार विचित्र गोष्ट आहे. ज्याने चौदा वर्षें साक्षात् उपासमारीला तोंड दिलें, उद्याचें अन्न कोठे मिळेल, उद्या निजायला जागा कोठे मिळेल अशा विवंचना ज्याने सोसल्या, त्याला भिवविणें इतकें सोपें नाही. पुढील जेवण कुठून मिळेल याची कांहीच शाश्वती नसतांना व जवळ प्रायः कांहीहि कपडे नसतांना, जिथे पारा शून्याच्या खाली तीस अंश उतरतो

अशा अत्यंत कडक थंडीच्या ठिकाणीं राहण्याची ज्याने हिंमत केली त्याला भारतांत भिवविणें इतकें सोपें नाही. मी त्यांना प्रथम हें सांगेन की माझा स्वतःचा कांही दृढ निश्चय आहे, मला थोडाफार अनुभवहि आलेला आहे आणि जगाला देण्यासाठी माझ्याजवळ कांही संदेश आहे, आणि मी तो भवितव्याची चिंता न करतां, निर्भयपणें जगाला सांगणार आहें. सुधारकांना मला हें सांगावयाचें आहे की त्या सर्वांपेक्षा मी अधिक सुधारक आहें. त्यांना लहान लहान सुधारणा घडवावयाच्या आहेत, तर मला मुळापासून सुधारणा हव्या आहेत. आमचा मतभेद सुधारणेच्या पद्धतीबद्दल आहे. त्यांची पद्धति विध्वंसक आहे, तर माझी रचनात्मक आहे. माझा सुधारणेवर विश्वास नाही, विकासावर आहे. स्वतः ईश्वराची जागा घेऊन, समाजाला 'या मार्गाने जा, त्या मार्गाने जाऊं नका' असे आदेश मला द्यावयाचे नाहीत. रामाच्या सेतूवर अल्पशी वाळू आणून टाकणाऱ्या खारीप्रमाणे मला व्हावयाचें आहे. माझी भूमिका ही अशी आहे. या अद्भुत राष्ट्रयंत्राने अनेक युगें कार्य केलें आहे. राष्ट्रजीवनाची ही अद्भुत सरिता आपणांसमोर वाहत आहे. ती चांगली आहे की वाईट आहे व तिने कोणत्या दिशेने वाहावें हें कुणास कळणार आणि कोण सांगूं शकणार? नव्या-जुन्या हजारो प्रकारच्या घटनांनी तिला विशिष्ट गति मिळत आहे; त्यामुळे कधी ती सावकाश वाहते, तर कधी ती द्रुत गतीने वाहूं लागते. या गतीचें नियंत्रण कोण करणार? कर्तव्य करीत राहणें व फलाची अपेक्षा न ठेवणें हेंच आपलें काम, असें गीता आपल्याला सांगते. राष्ट्रजीवनाच्या पुष्टीसाठी ज्या गोष्टी आवश्यक आहेत त्या तुम्ही त्याला द्या, पण त्याचा विकास मात्र त्याच्या स्वतःच्या प्रकृतीनुसार होईल, त्यावर कुणाला नियंत्रण ठेवतां येणार नाही. आपल्या समाजांत पुष्कळ दोष आहेत; तसेच ते इतर प्रत्येक समाजांतहि आहेत. येथे विधवांच्या अश्रूंनी भूमि भिजत असेल, तर पाश्चात्त्य देशांत अविवाहित स्त्रियांच्या दुःखपूर्ण सुस्काऱ्यांनी वातावरण भरलेलें आहे. येथे दारिद्र्य थैमान घालीत आहे, तर तिकडे उपभोगांच्या अतिरेकाने पाश्चात्त्यांना जीवनाचा वीट येत आहे. येथे अन्नाच्या अभावीं लोक आत्महत्त्या करतात, तर तेथे खायला अत्यधिक अन्न असल्यामुळे लोक आत्महत्त्या करतात. दुःख हें सर्वत्र आहे, तें अंगीं मुरलेल्या नित्याच्या

संधिवातासारखें आहे. आपण पायांतून त्याला घालविलें तर तो मस्तकाकड जातो, तेथून घालविण्याचा प्रयत्न केला तर तो आणखी कोठेतरी उत्पन्न होतो. आपण त्याला फक्त एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं घालवूं शकतों, इतकेंच. हे बालकांनो, दुःखावर वरवरचे उपाय योजणें हा कांही खरा मार्ग नव्हे. आपलें तत्त्वज्ञान सांगतें की चांगलें व वाईट यांची युति नित्याची असून तीं दोन्हीं एकाच नाण्याच्या दोन बाजूंप्रमाणे आहेत; एकाचा तुम्हीं स्वीकार केल्यास दुसऱ्याचाहि तुम्हांला स्वीकार करावाच लागेल. सागरांतील लाट इतरत्र होणाऱ्या पोकळीमुळेच उत्पन्न होत असते एवढेंच नव्हे, तर सर्व जीवनच दुःखमय आहे. श्वासोच्छ्वास करीत असतांहि कित्येक सूक्ष्म जंतु प्राणास मुकत असतात. अन्नाचा एखादाहि घास, कुणाच्यातरी तोंडांतून तो काढून घेतल्याशिवाय खातां येत नाही. हा सृष्टीचा नियम आहे, हा तत्त्वज्ञानाचा सिद्धान्त आहे. म्हणून आपण हें समजून घेतलें पाहिजे की वाईट गोष्टींचा प्रतिकार केवळ बाह्य प्रयत्नांनी होणार नाही, तर त्यासाठी आपण आपलें मानसिक परिवर्तन घडवून आणलें पाहिजे. आपण कितीहि मोठ्या गप्पा मारल्या तरी आपण हें ध्यानांत ठेवलें पाहिजे की समाजांतील दोष दूर करावयाचे असल्यास हें कार्य प्रत्यक्षपणें न करतां लोकांना शिक्षण देऊन तें अप्रत्यक्षपणें केलें पाहिजे. समाजांतील दोष दूर करण्यासंबंधीचें हें तत्त्व प्रथम आपण समजून घेतलें पाहिजे. आणि हें तत्त्व समजून घेऊन आपण अधिक शांत बनलें पाहिजे, आपल्या रक्तांतील अविचारीपणा घालविला पाहिजे. जगाचा इतिहास आपल्याला शिकवितो की जेथे जेथे अशा अविचारी सुधारणा करण्याचा यत्न झाला, तेथे तेथे त्यांचा हेतु पूर्णपणें निष्फळ झाला. अमेरिकेंत गुलामगिरी नष्ट करण्यासाठी जें युद्ध झालें तेवढें मोठें आंदोलन, माणसाचें स्वातंत्र्य व हक्क प्रस्थापित करण्याकरिता कुठेहि झालेलें दिसत नाही. तुम्हांला त्यासंबंधी माहिती आहेच. आणि त्याचे काय परिणाम झाले? गुलामगिरी नष्ट होण्यापूर्वी गुलामांची जी अवस्था होती तिच्या शतपट ती आज वाईट आहे. पूर्वी निदान हे बिचारे निग्रो लोक कुणाची तरी मालमत्ता होते व त्या नात्याने तरी त्यांची काळजी घेतली जात असे, व त्यामुळे ते सुरक्षित असत. आज ते कोणाचीच मालमत्ता नाहीत. त्यांच्या जिवांना कांही किंमत नाही. क्षुल्लक कारणा-

साठी त्यांना जिवंत जाळलें जात आहे. त्यांना गोळ्या घालून मारलें जात आहे आणि तरीहि त्यांना मारणाऱ्यांना कायद्याचा कांहीहि अंकुश नाहीं, कारण ते 'निगर' आहेत, त्यांना मनुष्यहि मानलें जात नाही, पशुसुद्धा नाही. आणि हा सर्व कायद्याने समाजांतील वाईट गोष्टी एकदम नष्ट केल्याचा परिणाम आहे. हें अविचाराचें फळ आहे. एखादी चांगली गोष्ट घडवून आणण्यासाठी सुद्धा अविचाराने केलेल्या चळवळीविरुद्ध इतिहासाची ही साक्ष आहे. मीं हें पाहिलें आहे. माझा अनुभव मला हेंच सांगत आहे. म्हणून लोकांची निंदा करणाऱ्या कोणत्याहि समितीच्या कार्यांत मी भाग घेऊं शकत नाहीं. निंदा कां करावयाची ? प्रत्येक समाजांत वाईट गोष्टी आहेत हें प्रत्येकास माहीत आहे. आजकालचें लहान मूलसुद्धा हें जाणतें. तें देखील व्यासपीठावर उभें राहून हिंदु समाजांतील भयानक दोषांचा पाढा वाचूं शकेल. कोणताहि अशिक्षित परस्थ जगभर भटकून येथे येतो, रेल्वेने प्रवास करतां करतां अर्धवट असें कांहीतरी घाईने वरपांगीं पाहतो व मग भारतांतील दोषांवर विद्वत्तापूर्ण व्याख्यानें झोडतो. आमच्या समाजांत दोष आहेत हें आम्हांसहि मान्य आहे. प्रत्येकाला दोष दाखवितां येतील, पण मानवजातीचा मित्र तोच की जो हे दोष दूर करण्याचा मार्ग दाखवितो. तत्त्वज्ञ व बुडणारा मुलगा यांची गोष्ट तुम्हांला ठाऊक असेलच. तो तत्त्वज्ञ त्या बुडणाऱ्या मुलाला गंभीरपणें उपदेश करीत असतां तो मुलगा ओरडून म्हणाला, "मला प्रथम पाण्यांतून वर काढा, मग मी तुमचा उपदेश ऐकेन." तद्वतच आमचे लोक म्हणत आहेत, "आम्हीं व्याख्यानें खूप ऐकलीं आहेत, संस्थाहि खूप पाहिल्या आहेत, वृत्तपत्रें हवीं तेवढीं वाचलीं आहेत, पण आम्हांला हात देऊन वर काढूं शकणारी व्यक्ति कोठे आहे ? आम्हांवर खरेंखुरें प्रेम करणारी व्यक्ति कुठे आहे ? आम्हांबद्दल सहानुभूति असणारी व्यक्ति कोठे आहे ? अहो, अशाच मनुष्याची आज गरज आहे. नेमक्या याच बाबतींत या सुधारकांशीं माझा मोठा मतभेद आहे. जवळजवळ शंभर वर्षें ते येथे सुधारणेची चळवळ चालवीत आहेत. अतिशय निंदेने व शिव्याशापांनी भरलेलें वाङमय निर्माण करण्याव्यतिरिक्त त्यांनी काय चांगलें साधलें आहे ? ईश्वरकृपेने ह्या चळवळी झाल्या नसत्या तर बरें झालें असतें ! त्यांनी सनातनी लोकांवर कठोर प्रहार केले, त्यांचा धिक्कार केला,

त्यांना शिव्या दिल्या; अखेर या सनातन्यांनीहि त्याच भाषेंत त्यांचा समाचार घेतला. याचा परिणाम असा झाला की प्रत्येक प्रांतीय भाषेंत असें वाङ्मय निर्माण झालें की जें पाहून अवघ्या समाजाने, अवघ्या देशाने शरमेने मान खाली घालावी. ही काय सुधारणा झाली ? यामुळे राष्ट्राला वैभव प्राप्त होईल काय ? हा दोष कुणाचा ?

आणखी एका महत्त्वाच्या गोष्टीचा विचार आपण करावयास हवा. भारतांत आपल्यावर नेहमी राजांनी राज्य केलें आहे आणि राजांनीच सर्व कायदे केले आहेत. आता ते राजे गेले व या बाबतींत मार्ग दाखविणारे कोणी राहिलें नाही. सरकार कांही करणार नाही, कारण त्याला लोकमताचा कल पाहून आपलें धोरण ठरवावें लागतें. प्रभावी, दृढ असें लोकमत तयार होण्यास मोठा कालावधि लागतो. असें लोकमत तयार झाल्यावर मगच लोक स्वत:चे प्रश्न सोडवूं शकतील. तोंवर आपल्याला थांबलें पाहिजे. म्हणून सामाजिक सुधारणेच्या सर्व प्रश्नांचें स्वरूप हें असें आहे : सुधारणा हवी असणारे लोक कोठे आहेत ? त्यांना प्रथम तयार करा. असले लोक कोठे आहेत ? अल्पसंख्य लोकांचा जुलूम हा जगांतील सर्वांत भयंकर असा जुलूम आहे. दोषांची जाणीव मूठभर लोकांनाच झाल्याने सर्व राष्ट्र क्रियाशाली होणार नाही. आपलें राष्ट्र क्रियाशील कां नाही ? प्रथम राष्ट्र सुशिक्षित करा, कायदे बनवूं शकतील असे लोक तयार करा, मग कायदे आपोआप बनतील. ज्या सत्तेच्या अनुमोदनाने कायदे निर्माण होतील अशी सत्ता प्रथम निर्माण करा, मग कायदे आपोआप निर्माण होतील. राजे तर इतिहासजमा झाले, आता जिच्या आधाराने नवीन कायदे होतील अशी लोकसत्ता कोठे आहे ? तिचा विकास घडवून आणा. म्हणून सामाजिक सुधारणेसाठीहि लोकांना शिक्षण देणें आवश्यक आहे. तें प्राथमिक असें कार्य आहे, आणि तें पूर्ण होईपर्यंत आपल्याला वाट पाहावी लागेल. गेल्या शतकांत सामाजिक सुधारणेच्या ज्या चळवळी झाल्या त्यांच्यापैकी अधिकांश केवळ शोभेच्या ठरल्या. या सर्व चळवळी पहिल्या दोन वर्णांशींच संबंधित राहिल्या, इतर वर्णांशीं त्यांचा संबंधहि आला नाही. विधवाविवाहासंबंधीच्या चळवळीचा भारतांतील सत्तर टक्के स्त्रियांशीं कांही संबंध नाही. असल्या सर्व चळवळी भारतांतील उच्चवर्णीयांपुरत्याच मर्यादित असतात. आणि

ही गोष्ट लक्षांत ठेवा की हे उच्चवर्णीय लोक सर्वसामान्य जनतेला शिक्षणापासून वंचित ठेवून तिच्याच पैशाच्या बळावर सुशिक्षित झालेले असतात. या उच्चवर्णीयांनी स्वत:चें घर स्वच्छ ठेवण्यासाठीच सर्व प्रयत्न केले. पण ही कांही सुधारणा नव्हे. सुधारणेच्या बाबतींत प्रत्येक गोष्टी-च्या मुळाशीं जाऊन तुम्हीं विचार केला पाहिजे. यालाच मी 'मुळा-पासून सुधारणा' असें नांव देतों. मुळाशीं अग्नि प्रज्वलित करा व अधिकाधिक वर येऊन त्याला पसरूं द्या, म्हणजे भारतीय राष्ट्र निर्माण होईल. या प्रश्नाची सोडवणूक वाटते तेवढी सोपी नाही, कारण तो फार व्यापक असा प्रश्न आहे. घाई करून उपयोग नाही. लक्षांत ठेवा की ही समस्या आपल्या देशांतील सुज्ञ लोकांना शेकडो वर्षांपासून माहीत आहे.

आजकाल बौद्धधर्माचे गोडवे गाण्याची प्रथाच सुरू झाली आहे. बौद्धधर्मांतील अज्ञेयवादाबद्दल विशेषत: दक्षिण भारतांत बरेंच ऐकूं येतें. पण या लोकांना याची कल्पनाहि नाही की आज आपली जी अवनति झालेली दिसत आहे ती बौद्धधर्माचीच देणगी आहे. बौद्धधर्माने हा वारसा आपल्यासाठी मागे ठेवला आहे. बौद्धधर्माच्या उत्कर्षापकर्षांचा ज्यांनी कधीच अभ्यास केलेला नाही अशा लोकांच्या लेखनांत तुम्हांला आढळेल की गौतम बुद्धांनी शिकविलेली अपूर्व नीति व त्यांचें लोकोत्तर व्यक्तिमत्त्व यांमुळेच बौद्धधर्माचा प्रसार झाला. मला गौतम बुद्धांबद्दल परम आदर वाटतो. पण माझे हे शब्द आपण ध्यानांत ठेवा की, बौद्ध-धर्माचा प्रसार हा गौतम बुद्धांचीं तत्त्वें व त्यांचें श्रेष्ठ व्यक्तिमत्त्व यांमुळे जितका झाला नाही तितका तो बौद्धांनी उभारलेलीं मंदिरें, त्यांनी निर्मिलेल्या मूर्ति व त्यांनी लोकांसमोर ठेवलेलीं अवडंबरयुक्त अनुष्ठानें यांच्यामुळे झाला. अशा रीतीने बौद्धधर्माचा प्रसार झाला. लोक ज्यांत आहुति देत अशीं घरांघरांतील छोटीं यज्ञकुंडें या प्रचंड मंदिरांसमोर व अवडंबरयुक्त अनुष्ठानांसमोर टिकूं शकलीं नाहीत. पण कालान्तराने हीं सर्व अनुष्ठानें अवनत होऊन त्यांनी बीभत्स रूप धारण केलें. त्यांत एवढी घृणास्पद विकृति निर्माण झाली की तिचें वर्णन मी श्रोतृवर्गापुढे करूं शकत नाहीं. परंतु ज्यांना ती पाहावयाची असेल त्यांनी नाना-प्रकारचें शिल्प असलेलीं दक्षिण भारतांतील प्रचंड मंदिरें पाहावींत, म्हणजे त्यांना या विकृतीचा कांही अंश दिसेल. बौद्धांकडून आपल्याला

मिळालेला वारसा हा असा आहे.

नंतर थोर सुधारक शंकराचार्य व त्यांचे अनुयायी यांचा उदय झाला. त्या वेळेपासून आजपावेतो शेकडो वर्षें भारतीय समाजाला मूळच्या शुद्ध वेदान्तधर्माकडे परत नेण्याचें कार्य चालूं आहे. या सुधारकांना समाजांत असलेल्या दोषांची पूर्ण जाणीव होती तरी त्यांनी त्यांचा धिक्कार केला नाही. ते कधीच असे म्हणाले नाहीत की 'तुमच्याजवळ असलेलें सर्वकांही वाईट आहे, व तुम्ही तें सर्व टाकून द्या.' ते असें कधीहि म्हणूं शकणार नाहीत. आज मीं असें वाचलें की माझे मित्र श्री. बॅरोज म्हणाले, "ख्रिस्ती धर्माने रोमन व ग्रीक धर्मांचा प्रभाव तीनशे वर्षांत नाहीसा केला." ज्याने युरोप, ग्रीस व रोम पाहिले आहेत तो असें कधीच म्हणणार नाही. रोमन व ग्रीक धर्मांचा प्रभाव प्रॉटेस्टंट देशांतहि आज पुरेपूर दिसून येतो. फक्त नांवें बदललीं आहेत—जुनीं दैवतें नव्या ख्रिस्ती पेहरावांत आलीं आहेत, त्यांनी त्यांचीं नांवें बदलून टाकलीं आहेत. ग्रीक व रोमन देवी 'मेरी' बनल्या व ग्रीक व रोमन देव 'संत' बनले. विधि-अनुष्ठानांना नवा साज देण्यांत आला. 'पॉंटिफेक्स मॅक्झिमस' हें जुनें नांव सुद्धा जसेंच्या तसें राहिलें. म्हणून बदल हे एकदम घडून येत नसतात. शंकराचार्यांना हें ठाऊक होतें; रामानुजाचार्यांनाहि हें माहीत होतें. अतएव त्यांच्यापुढे एकच उपाय होता, तो म्हणजे प्रचलित धर्माला सर्वोच्च ध्येयाकडे सावकाशपणें घेऊन जाणें. त्यांनी जर दुसरा मार्ग अवलंबिला असता, अर्थात् त्यांनी जर सर्वकांही एकदम बदलून टाकण्याचा प्रयत्न केला असता तर ते दांभिक ठरले असते, कारण त्यांच्या धर्माचें मूलभूत तत्त्व क्रमविकास हें आहे. निरनिराळ्या अवस्थांतून आत्मा सर्वोच्च ध्येयाकडे जात असतो, म्हणून या सर्व अवस्था उपयुक्त व आवश्यकच आहेत. मग त्यांचा धिक्कार कोण करूं शकणार ?

मूर्तिपूजा करणें चूक आहे असें म्हणण्याची आजकाल टूमच निघाली आहे; कांहींहि विचार न करतां प्रत्येकजण ही गोष्ट मान्य करीत असतो. एकेकाळीं मलाहि तसें वाटत होतें, पण या चुकीची भरपाई करण्यासाठी मला, ज्याने मूर्तिपूजेद्वारा सर्वकांही प्राप्त केलें अशा एका महापुरुषाच्या पायाशीं बसून ज्ञान प्राप्त करून घ्यावें लागलें. मी भगवान श्रीरामकृष्णांविषयी बोलत आहें. मूर्तिपूजेमधून श्रीरामकृष्णां-

सारखे महात्मे निर्माण होत असतील तर तुम्ही कशाची निवड कराल? ---सुधारकांच्या मार्गाची की मूर्तिपूजेची ? याचें उत्तर मला हवें आहे. भगवान श्रीरामकृष्णांसारखे महात्मे उत्पन्न होत असतील तर आणखी हजारो मूर्तींची पूजा करा, ईश्वर तुम्हांला साहाय्य करो. अशीं उदात्त जीवनें कोणत्याहि मार्गानें तुम्ही निर्माण करा. तरीहि मूर्तिपूजेचा धिक्कार होतच आहे; कां तें कोणास ठाऊक नाही. कांही शतकांपूर्वी यहुदी वंशांतील एका मनुष्याने मूर्तिपूजेचा धिक्कार केला होता म्हणून तुम्हीं तसें करतां की काय ? पण त्याने मूर्तिपूजेचा धिक्कार केला होता याचा अर्थ हाच की त्याने स्वतःच्या मूर्तींव्यतिरिक्त इतरांच्या मूर्तींचा धिक्कार केला होता. 'कोणत्याहि सुंदर रूपांत वा प्रतीकांत ईश्वराची कल्पना करणें फार वाईट आहे, तें मोठें पाप आहे' असें तो यहुदी माणूस म्हणाला. पण दोन देवदूत एका पेटीच्या दोन्ही बाजूस आहेत व वर एक मेघ आहे अशा रूपांत ईश्वराची कल्पना केल्यास ती मात्र पवित्रांतील पवित्र होय! जर ईश्वर कबूतराच्या रूपांत येत असेल, तर तें पवित्र आहे, पण तोच गाईच्या रूपांत येत असेल तर ती मात्र मूर्तिपूजकांची खुळचट समजूत आहे व तिचा धिक्कार केला पाहिजे! अशी ही जगाची रीत आहे. म्हणून कवि म्हणतात, "आपण सर्व मानव किती मूर्ख आहोंत!" एकमेकांच्या कल्पना समजून घेणें, परस्परांच्या दृष्टीने पाहणें ही किती अवघड गोष्ट आहे! मानवाच्या उन्नतीच्या मार्गांतील ही मोठीच धोंड आहे. द्वेष आणि मत्सर, युद्ध व कलह यांचें हें मूळ आहे. बालकांनो, प्रौढ शिशूंनो, तुम्ही कधी मद्रास शहराच्या बाहेर पडलां नाहीत, आणि तरी तुम्ही, ज्यांच्या पाठीशीं हजारो परंपरा आहेत त्या तीस कोटी लोकांना तुमच्या नवीन कायद्यांप्रमाणे वागण्याचा आदेश देऊं इच्छितां ? तुम्हांला याची कांहीच लाज वाटत नाही काय ? या भयंकर दोषापासून दूर राहा, प्रथम तुम्ही स्वतःच शिका. अश्रद्ध बालकांनो, तुम्ही कागदावर चार ओळी लिहिल्या व एखाद्या मूर्खाने तुमच्यासाठी त्या छापून प्रसिद्ध केल्या, म्हणून तुम्ही स्वतःला जगाचे मार्गदर्शक समजतां काय ? तुमचें मत हें भारतांतील लोकमत ठरेल काय ? मद्रासच्या समाजसुधारकांना मला हें सांगावयाचें आहे की त्यांच्याविषयी मला मोठा आदर व प्रेम आहे. त्यांचें थोर मन, त्यांचें देशप्रेम आणि गरीब व पीडित यांच्याविषयीची त्यांची आस्था

पाहून मला त्यांच्याविषयी प्रेम वाटतें. परंतु बंधुप्रीतीने त्यांना मी हें सांगूं इच्छितों की त्यांनी अनुसरलेला मार्ग बरोबर नाही. शंभर वर्षे अवलंबिली गेलेली ही त्यांची पद्धत अयशस्वी ठरली आहे. आपण एखादी नवी पद्धत योजून पाहूं या.

भारताला कधीतरी सुधारकांची उणीव पडली आहे काय ? आपण भारताचा इतिहास पाहिला आहे काय ? रामानुजाचार्य कोण होते ? शंकराचार्य कोण होते ? गुरु नानक कोण होते ? चैतन्य महाप्रभु कोण होते ? कबीर व दादू हे कोण होते ? भारताच्या आकाशांत अत्युज्ज्वल ताऱ्यांप्रमाणे एकामागून एक चमकून गेलेले हे सर्व महान् उपदेशक कोण होते ? रामानुजाचार्यांना दलितवर्गाबद्दल कळवळा वाटत नव्हता काय ? त्यांनी आयुष्यभर चांडाळांनासुद्धा आपल्या पंथांत घेण्याचा प्रयत्न केला नाही काय ? मुसलमानांना देखील आपल्या पंथांत सामावून घेण्याचा प्रयत्न त्यांनी केला नाही काय ? गुरु नानकांनी हिंदु व मुसलमान दोघांशींहि विचारविनिमय करून एक नवी घडी बसविण्याचा प्रयत्न केला नाहीं काय ? त्या सर्वांनी प्रयत्न केले आणि त्यांचें कार्य अजून सुरू आहे. फरक हाच की त्या सर्वांच्या कार्यांत हल्लीच्या सुधारकांप्रमाणे अवडंबर नव्हतें. आजच्या सुधारकांप्रमाणे त्यांच्या तोंडीं शिव्याशाप नव्हते, त्यांच्या तोंडीं केवळ आशीर्वाद होते. त्यांनी कधी धिक्कार केला नाही. समाजाचा नेहमी विकास झाला पाहिजे असें त्यांनी लोकांना सांगितलें. भूतकाळाकडे दृष्टि टाकून ते म्हणत, "हिंदूंनो, तुम्हीं जें कांही केलें तें चांगलेंच केलें, पण बंधूंनो, आता आपण अधिक चांगलें कार्य करूं या." "तुम्ही दुष्ट आहांत व तुम्हांला चांगले व्हावयाचे आहे" असें ते कधी म्हणाले नाहीत. "तुम्ही चांगले आहांतच; आता अधिक चांगले व्हा" असें ते म्हणत. या दोन विधानांमधे मोठाच फरक आहे. आपल्या प्रकृतिधर्मानुसारच आपण विकास साधला पाहिजे. विदेशी संस्थांनी आपल्यावर लादलेल्या जीवनपद्धतींनुसार जीवन घडविणें व त्यांच्या कार्यपद्धतींनुसार कार्य करणें निष्फळ आहे, अशक्य आहे. आम्हांला मारून झोडून, जबरदस्तीने वळण लावून इतर राष्ट्रांसारखें बनविणें अशक्य आहे याबद्दल मी ईश्वराला धन्यवाद देतों. इतर जातींच्या सामाजिक संस्थांचा मी धिक्कार करीत नाहीं. त्यांच्यासाठी त्या ठीक असतील, पण आपल्यासाठी त्या

ठीक नाहीत. त्यांना जें उपकारक असेल तें आम्हांला विषतुल्य ठरूं शकतें. प्रथम आपण ही गोष्ट शिकली पाहिजे. आपल्याहून भिन्न अशीं त्यांचीं शास्त्रें, त्यांच्या संस्था व त्यांच्या परंपरा यांमधूनच त्यांची सध्याची जीवनपद्धति व कार्यपद्धति परिणत झाली आहे. आपल्या पाठीशीं आपली वेगळी परंपरा आहे, आपलें हजारो वर्षांचें कर्म आहे. म्हणून आपण स्वाभाविकपणें आपल्याच पद्धतींनी कार्य करूं शकूं. आणि आपल्याला तशाच प्रकारें कार्य केलें पाहिजे.

मग कार्य करण्याची माझी योजना कोणती ? प्राचीन महापुरुषांच्या मार्गदर्शनानुसार कार्य करणें ही माझी योजना आहे. मीं त्यांच्या कार्यांचा अभ्यास केला आहे व त्यांनी कोणत्या पद्धतीने कार्य केलें हें ईश्वराच्या कृपेने मीं शोधून काढलें आहे. ते समाजाचे थोर निर्माते होते. त्यांनी समाजाला सामर्थ्य, पावित्र्य व जीवनशक्ति देण्याचें महान् कार्य केलें. त्यांनी अपूर्व असें कार्य केलें आहे. आपल्यालाहि तसेंच अपूर्व कार्य करावयाचें आहे. परिस्थितींत बदल झाला आहे, आणि म्हणून आपल्या कार्यपद्धतींत सुद्धा आपण किंचित् बदल केला पाहिजे, इतकेंच. व्यक्तीप्रमाणेच प्रत्येक राष्ट्राचें एक विशिष्ट जीवनध्येय असतें, तें त्याच्या जीवनाचें केंद्र असतें. हें ध्येय त्याच्या जीवनरूपी संगीतांतील मुख्य सुराप्रमाणे असतें व इतर सर्व गोष्टी गौण सुरांप्रमाणे या मुख्य सुराशीं सुसंवाद साधीत असतात. एखाद्या राष्ट्राची--उदाहरणार्थ इंग्लंडची--जीवनशक्ति राजकीय सत्तेंत साठलेली असते. दुसऱ्या एखाद्या राष्ट्राची जीवनशक्ति विभिन्न कलांमधे सामावलेली असते, इत्यादि इत्यादि. पण भारतांत धर्म हेंच राष्ट्रीय जीवनाचें केंद्र आहे. राष्ट्रजीवनाच्या संगीताचा तो मुख्य सूर आहे. जर एखाद्या राष्ट्राने आपलें जीवनतत्त्व बाजूस सारण्याच्या प्रयत्न केला--शतकानुशतकांच्या परंपरांमुळे त्याच्या जीवनाला जी दिशा लाभलेली आहे ती सोडून देण्याचा जर त्याने प्रयत्न केला व त्यांत जर तें यशस्वी झालें तर त्या राष्ट्राचा मृत्यु ओढवेल. म्हणून तुम्ही जर धर्माला बाजूला सारून राजकारण, समाजकारण किंवा आणखी कांहीतरी जीवनाचें केंद्र म्हणून किंवा राष्ट्राची जीवनशक्ति म्हणून स्वीकाराल तर याचा परिणाम हा होईल की तुमचा पूर्णपणें नाश होऊन जाईल. हा नाश जर टाळावयाचा असेल तर तुम्हांला प्रत्येक

गोष्ट, तुमची जीवनशक्ति जो धर्म त्याच्या आधारेंच केली पाहिजे. तुमच्या राष्ट्राचा कणा जो धर्म तोच तुमच्या सर्व संवेदनांचा व भावनांचा आधार असला पाहिजे. समाजजीवनावर होणारे प्रत्यक्ष परिणाम दाखविल्याशिवाय अमेरिकन लोकांना मला धर्माचें ज्ञान देतां आलें नाही याचा मला अनुभव आहे. वेदान्तामुळे घडूं शकणारे आश्चर्यकारक राजकीय बदल सांगितल्याविना इंग्लंडमधे मी धर्म समजावूं शकलों नाहीं. त्याचप्रमाणे भारतांतहि नवीन समाजपद्धति आध्यात्मिक जीवनाला कितपत साहाय्यभूत ठरूं शकेल हें दाखवूनच समाजसुधारणांचा प्रचार करावा लागेल; आणि राजकीय तत्त्वें शिकवितांनाहि तीं राष्ट्राच्या आध्यात्मिक गरजा कितीशा भागवूं शकतील हें दाखवावें लागेल. प्रत्येक मनुष्याला स्वत:चा मार्ग निवडून घ्यावा लागतो; हीच गोष्ट राष्ट्रालाहि लागू आहे. आपण आपली निवड कित्येक शतकांपूर्वी केली आहे, तिला आता आपण चिकटून राहिलें पाहिजे. आणि कोणत्याहि दृष्टीने पाहिलें तरी ही निवड कांही वाईट नाही. या जगांत जडाऐवजी चैतन्याचा विचार करणें, माणसाऐवजी ईश्वराचा विचार करणें ही निवड काय वाईट आहे ? परलोकावर दृढ श्रद्धा, या जगाविषयी वितृष्णा, त्यागाची तीव्र भावना, ईश्वर व अमर आत्मा यांच्यावर दृढ विश्वास हीं सारीं तुमच्या ठायीं आहेत. तीं टाकून देण्याचें तुमच्यापैकी कोणालाहि मी आव्हान देतों. तुम्हांला तें शक्य नाही. कांही काळ जडवादी होऊन व जडवादाविषयी बोलून तुम्ही मला फसविण्याचा प्रयत्न करूं शकाल, पण तुमचा स्वभाव मला माहीत आहे. मीं जर तुम्हांला चांगल्या रीतीने धर्म समजावून सांगितला तर तुम्ही तात्काळ अत्यंत आस्तिक होऊन जाल. तुम्ही आपला स्वभाव कसा पालटूं शकाल ?

म्हणून भारतामधील प्रत्येक सुधारणेसाठी धार्मिक स्वरूपाची चळवळ प्रथम हातीं घेतली पाहिजे. भारतामधे समाजवादी किंवा राजकीय कल्पनांचा पूर वाहण्यापूर्वी प्रथम या भूमींत आध्यात्मिक विचारांचा पूर वाहवून द्या. आपलें पहिलें कार्य हें आहे की, आपली उपनिषदें, आपलीं पुराणें व आपलीं अन्य शास्त्रें यांच्यामधे पडून राहिलेलीं आश्चर्यकारक सत्यें या ग्रंथांतून बाहेर काढून, मठांमधून, अरण्यांमधून विशिष्ट

संप्रदायांमधून बाहेर काढून सर्व देशभर पसरविलीं पाहिजेत, म्हणजे तीं एखाद्या वणव्याप्रमाणे देशाच्या चारी दिशांना पसरतील, हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत व सिंधूपासून ब्रह्मपुत्रेपर्यंत अखिल देश तीं भरून टाकतील. प्रत्येकाने तीं सत्यें ऐकलीं पाहिजेत, कारण आपल्या शास्त्रांत सांगितलें आहे की "प्रथम आपण सत्याचें श्रवण केलें पाहिजे, मग त्यावर मनन केलें पाहिजे आणि मग त्याचा ध्यास घेतला पाहिजे." लोकांना प्रथम हीं सत्यें ऐकूं द्या आणि जो कोणी लोकांना आपल्या शास्त्रांमधील हीं महान् सत्यें ऐकवील त्याचें तें कर्म सर्वांत श्रेष्ठ व सर्वांत चांगलें म्हणावें लागेल. आपले महर्षि व्यास म्हणतात, "कलियुगांत एकच कर्म शिल्लक आहे. यज्ञ व कठोर तपस्या आज उपयोगाच्या नाहीत. आज दान हेंच एकमात्र कर्म उरलें आहे." आणि या दानांमधे धर्माचें दान व आध्यात्मिक ज्ञानाचें दान हें सर्वोच्च दान आहे; भौतिक ज्ञानाचें दान हें दुय्यम प्रतीचें दान आहे; यानंतरचें दान आहे जीवदान व चौथें दान आहे अन्नदान. असा हा क्रम आहे. आपल्या या समाजाची आश्चर्यकारक दानशील वृत्ति पाहा ! या अत्यंत गरीब देशांत दिल्या जाणाऱ्या दानाकडे पाहा ! येथील लोक इतके आतिथ्यशील आहेत की या देशांत कोणताहि माणूस जवळ कांहीहि न बाळगतां उत्तरेपासून दक्षिणेपर्यंत प्रवास करूं शकतो. तो जेथे जेथे जाईल तेथे तेथे लोक त्याला आपला मित्र मानून, त्या त्या प्रदेशांत मिळत असलेल्या उत्तम वस्तूंनी त्याचें स्वागत करतील. आणि या देशांत जोंपर्यंत घरांत भाकरीचा एखादाहि तुकडा शिल्लक असेल तोंपर्यंत कोणताहि भिकारी उपाशी मरणार नाही.

या दानशील भूमींत पहिल्या प्रकारचें दान अर्थात् आध्यात्मिक ज्ञानाचें दान देण्यांत, त्याचा प्रसार करण्यांत आपण आपली शक्ति उपयोगांत आणूं या. आणि हा प्रसार भारतापुरताच मर्यादित न ठेवतां तो सर्व जगभर केला पाहिजे. ही तर आपली परंपरा आहे. भारतीय विचार भारताबाहेर गेले नाहीत असें जे म्हणतात, व भारताबाहेर प्रचार करणारा मी पहिलाच संन्यासी आहें असें जे सांगत आहेत, त्यांना आपला स्वतःचा इतिहास माहीतच नाही असें म्हटलें पाहिजे. ही गोष्ट तर वारंवार घडली आहे. जेव्हा जेव्हा जगाला आवश्यकता वाटली, तेव्हा

तेव्हा या आध्यात्मिकतेच्या चिरंतन प्रवाहाने अवघें जग व्यापून टाकलें. राजकीय ज्ञानाचा प्रसार तुतारीच्या नादाने व सैन्याच्या संचालनाने होत असेल, लौकिक व सामाजिक ज्ञान बंदुका व शस्त्रें यांनी प्रसृत होत असेल, परंतु ज्याप्रमाणे दंव हें न दिसतां, न ऐकूं येतां शांतपणें पडतें व गुलाबांचे ताटवे फुलवितें त्याप्रमाणे आध्यात्मिक ज्ञानाचें दान शांतपणेंच दिलें जाऊं शकतें. भारताने जगाला आध्यात्मिक ज्ञानाचें हें दान वारंवार दिलें आहे. जेव्हा जेव्हा एखादी जयिष्णु जात निर्माण होऊन तिने जगांतील राष्ट्रांना एकत्र आणलें, जेव्हा जेव्हा तिने विभिन्न देशांना जोडणारे वाहतुकीचे मार्ग निर्माण केले तेव्हा तेव्हा भारताने लगेच त्या सर्व देशांना आपल्या आध्यात्मिक ज्ञानाचा पुरवठा करून जगाच्या उन्नतीला हातभार लावला. बुद्धांच्या जन्माच्या शेकडो वर्षें आधी ही घटना घडली आणि तिच्या खुणा आजहि चीन, आशियामायनर व मलाया द्वीपकल्प या ठिकाणीं आढळतात. जेव्हा त्या ग्रीक जगज्जेत्याने तत्कालीन ज्ञात जग एकत्र आणलें तेव्हाहि हीच घटना घडली; तेव्हाहि भारतांतील आध्यात्मिक ज्ञानाचा पूर सर्वत्र पसरला आणि ज्या सभ्यतेचा पाश्चात्त्यांना आज गर्व वाटतो ती त्या पुराचीच अवशिष्ट खूण आहे. आज तीच संधि पुन्हा प्राप्त होत आहे; पूर्वी कधीहि एकत्र आणले गेले नव्हते इतके देश ब्रिटिश सत्तेने एकत्र जोडले आहेत. त्यांनी निर्माण केलेल्या वाहतुकीच्या मार्गांनी व साधनांनी जगाचीं दूरदूरचीं टोकें जोडलेलीं आहेत. इंग्रजांच्या अपूर्व बुद्धीमुळे जग पूर्वी कधीहि नव्हतें एवढें एकत्र जोडलें गेलें आहे. मानवजातीच्या इतिहासांत पूर्वी कधीहि नव्हतीं इतकीं व्यापारी केंद्रें आज निर्माण झालीं आहेत, आणि लगेच भारताने जागृत होऊन आपलें आध्यात्मिक ज्ञान, कळत वा नकळत जगाला देण्यास सुरुवात केली आहे. तयार असलेल्या मार्गांनी आता तें ज्ञान जगाच्या प्रत्येक भागांत जाऊन पोहोचेल. मी अमेरिकेला गेलों हें कांही माझें वा तुमचें कार्य नव्हे. भारताचें भवितव्य साकार करणाऱ्या ईश्वराचें तें कार्य आहे. तो माझ्यासारख्या आणखी शेकडो लोकांना जगांतील सर्व देशांत पाठवील. जगांतील कोणतीहि शक्ति या गोष्टीला प्रतिबंध करूं शकणार नाही. तुम्हांला हें कार्य केलेंच पाहिजे. आपल्या धर्माच्या प्रचारासाठी तुम्हीं बाहेर गेलेंच पाहिजे; जगांतील प्रत्येक देशांत तुम्हीं प्रचार केला

पाहिजे. जगांतील सर्व लोकांना तुम्हीं आपला धर्म शिकविला पाहिजे, प्रथम आपण हेंच कार्य केलें पाहिजे. आध्यात्मिक ज्ञानाचा प्रचार केला की त्याबरोबरच, आवश्यक असलेलें लौकिक व अन्य प्रकारचें ज्ञान आपोआपच येईल; पण धर्माला वगळून जर तुम्ही लौकिक ज्ञानाचा प्रसार करण्याचा प्रयत्न कराल तर मी तुम्हांला स्पष्ट सांगतों की भारतांत तुमचे हे प्रयत्न फुकट जातील, लोकांवर त्यांचा कांहीच प्रभाव पडणार नाही. एवढा मोठा बौद्ध धर्म भारतांत अयशस्वी झाला याचेंहि कांही अंशीं हेंच कारण होतें.

म्हणून, माझ्या मित्रांनो, आपल्या शास्त्रांतील सत्यांचा भारतांत व भारताबाहेर प्रसार करण्याकरिता तरुण प्रचारकांना शिक्षण देणाऱ्या संस्था आपल्या देशांत सुरू करण्याची माझी योजना आहे. माणसें हवीं आहेत, माणसें हवीं आहेत. इतर सर्व कांही आपोआप जुळून येईल, परंतु सशक्त, उत्साही, श्रद्धावान व निष्कपट अशीं तरुण माणसें हवीं आहेत. असे शंभर तरुण मिळाले तरी सर्व जगांत क्रांति घडवितां येईल. अन्य सर्व गोष्टींपेक्षा दृढ निश्चयाचें बळ अधिक असतें. दृढ निश्चय हा ईश्वरापासून प्राप्त होत असल्यामुळे त्याच्यापुढे सर्व कांही विनम्र झालेंच पाहिजे. विशुद्ध मनाने केलेला दृढ निश्चय हा सर्वशक्तिमान असतो. तुमचा यावर विश्वास नाही काय ? आपल्या धर्मांतील या महान् सत्यांचा सर्व जगांत प्रसार करा, जग त्यांची वाट पाहत आहे. शतकानुशतकें लोकांना मानवाच्या हीनतेचे सिद्धान्त शिकविण्यांत येत आहेत. त्यांना सांगण्यांत येत आहे की, 'तुम्ही सर्वजण कुचकामाचे आहांत.' समग्र जगांतील सर्वसामान्य लोकांना 'तुम्ही मानव नाही' असें सांगितलें जात आहे. शेकडो वर्षें त्यांना एवढें भिवविण्यांत आलें आहे की ते आता जवळजवळ पशु बनले आहेत. आत्म्याविषयीचे विचार श्रवण करण्याची त्यांना कधीच संधि मिळालेली नाही. त्यांना आत्म्याविषयीचे विचार ऐकूं द्या. क्षुद्रांत क्षुद्र असलेल्या व्यक्तींतहि आत्मा आहे हें त्यांना कळूं द्या. ज्याला जन्म नाही व मृत्यु नाही, ज्याला तलवार कापूं शकत नाही, अग्नि जाळूं शकत नाही वा वारा सुकवूं शकत नाही, जो अविनाशी, अनादि, अनंत, शुद्ध, सर्वशक्तिमान् व सर्वव्यापी आहे असा आत्मा प्रत्येकाच्या ठायीं विद्यमान आहे हें त्यांना कळूं द्या. त्यांना आत्मविश्वास वाटूं द्या. तुम्ही आणि

इंग्रज यांच्यांत कशामुळे फरक आहे? त्यांना स्वतःच्या धर्माचें श्रेष्ठत्व व कर्तव्याविषयीची जाणीव इत्यादींविषयी बोलूं द्या, पण मला हा भेद कशामुळे आहे हें कळलें आहे; भेद यामुळे आहे की इंग्रज माणसाच्या ठायीं आत्मविश्वास आहे आणि तुमच्या ठायीं तो नाही. आपण इंग्रज आहोंत, आणि म्हणून आपण सर्वकांही करूं शकतों असा त्याला आत्म-विश्वास वाटत असतो. त्यामुळे त्याच्या आंत वसत असलेला ईश्वर जागा होतो आणि तो इंग्रज माणूस हवें तें करूं शकतो. 'तुम्ही कांहीच करूं शकणार नाही' असें तुम्हांला नेहमी शिकविण्यांत आलें आहे आणि त्यामुळे तुम्ही दिवसेंदिवस कुचकामाचे बनत आहांत. आपल्याला सामर्थ्य हवें आहे, म्हणून आत्मविश्वास असूं द्या. आपण दुर्बल झालों आहोंत म्हणून आपल्यांत गूढवाद, गुप्त विद्या इत्यादि गोष्टी शिरल्या आहेत. त्या भय उत्पन्न करणाऱ्या गोष्टी आहेत. त्यांच्यांत कांही मोठीं सत्यें असतीलहि, पण त्यांच्यामुळे आपला नाश झाला. आपले मज्जातंतु शक्ति-संपन्न करा. आपल्याला लोखंडी स्नायु व पोलादी मज्जातंतु हवे आहेत. आपण पुष्कळ दिवस रडलों. आता रडणें पुरें, आता आपल्या पायावर उभे राहा व मनुष्य बना. आपल्याला मनुष्य बनविणारा धर्म हवा आहे. आपल्याला मनुष्य बनविणारे सिद्धान्त हवे आहेत. मनुष्य निर्माण कर-णारे सर्वांगीण शिक्षण आपल्याला हवें आहे. आणि सत्याची कसोटी पुढीलप्रमाणे आहे; आपल्याला जें कांही शरीराने, मनाने व आध्यात्मिक-दृष्टया दुर्बल करीत असतें त्याचा विषाप्रमाणे त्याग करा; त्यांत कांही जीवनदायी तत्त्व नाही, तें सत्य असूं शकत नाही. सत्य आपल्याला सामर्थ्यसंपन्न करतें. सत्य म्हणजे पावित्र्य, सत्य म्हणजे ज्ञान; सत्यामुळे बल प्राप्त झालेंच पाहिजे, सत्यामुळे ज्ञान व उत्साह यांचा संचार झालाच पाहिजे. गूढवादांत थोडेंबहुत सत्य असलें तरी साधारणतः त्यामुळे दुर्ब-लता उत्पन्न होते. विश्वास ठेवा, मीं याचा आयुष्यभर अनुभव घेऊन हाच निष्कर्ष काढला आहे. मीं भारतभर संचार केला, येथील प्रत्येक गुहा शोधली व हिमालयांतहि वास्तव्य केलें. ज्यांनी संपूर्ण जीवन हिमा-लयांत घालविलें असे लोक मला माहींत आहेत. हे सर्व अनुभव घेऊन मी या निष्कर्षाप्रत येऊन पोहोचलों आहें की या गूढवादामुळे दौर्बल्य येतें. माझें माझ्या राष्ट्रावर प्रेम आहे. तुमची अधिक अधोगति मला पाहव-

णार नाही. तुम्ही अधिक दुर्बल झालेले मला पाहवणार नाही. म्हणून तुमच्या कल्याणाकरिता, सत्याकरिता व माझ्या समाजाची अधिक अधोगति होऊं नये याकरिता मला तुम्हांला आवर्जून सांगितलेंच पाहिजे की 'आता थांबा, आणखी अवनति करून घेऊं नका.' दुर्बल करणारा गूढवाद टाकून देऊन बलिष्ठ व्हा. आपल्या उपनिषदांकडे परत चला, त्यांत तेजस्वी, शक्तिदायी असें तत्त्वज्ञान साठवलेलें आहे. दुर्बल करणाऱ्या या गूढ गोष्टींपासून दूर राहा. उपनिषदांचें हें तत्त्वज्ञान अंगिकारा. या जगांतील महान् सत्यें हीं अगदी सरळ, सोपीं अशीं असतात. आपलें अस्तित्व आपल्याला जसें सहज कळतें तशींच हीं सत्यें सहज कळण्यासारखीं असतात. उपनिषदांतील सत्यें तुमच्यासमोर आहेत, तीं ग्रहण करा, तीं प्रत्यक्ष कार्यांत उतरवा, आणि मग भारताचा उद्धार अवश्य होईल.

आणखी एक गोष्ट सांगून मीं आपलें भाषण संपवीन. लोक देशभक्तीविषयी बोलत असतात. देशभक्तीवर माझा विश्वास आहे. तिच्यासंबंधी माझाहि एक आदर्श आहे. महान् कार्य करावयाचें असेल तर त्यासाठी तीन गोष्टी आवश्यक असतात. प्रथमतः हृदयाची तळमळ हवी. बुद्धि वा तर्क यांत काय आहे? तर्क आपल्याला किंचित् पुढे घेऊन जातो व नंतर त्याची गति कुंठित होते. परंतु हृदयांतूनच स्फूर्ति मिळते. प्रेम हें अशक्य गोष्टींना शक्य करतें; जगांतील सर्व रहस्यें प्रेमाने उलगडतात. म्हणून माझ्या भावी सुधारक मित्रांनो, भावी देशभक्तांनो, तुमच्या हृदयांत तळमळ असूं द्या. तुमच्या हृदयांत तळमळ आहे काय? देवतांचे व ऋषींचे लाखो वंशज आज पशुतुल्य बनले आहेत हें बघून तुमच्या हृदयाला पीळ पडतो काय? कोटयवधि लोक आज भुकेने तडफडत आहेत, नव्हे, शेकडो वर्षांपासून ते तसे तडफडत आहेत हें पाहून तुमच्या हृदयाला घरें पडतात काय? आपला देश अज्ञानाच्या काळ्याकुट्ट मेघांनी झाकाळून गेला आहे हें बघून तुमचें हृदय पिळवटून निघतें काय? त्यामुळे तुम्ही अस्वस्थ झालां आहांत काय? त्यामुळे तुमची झोप उडाली आहे काय? ही तीव्र भावना तुमच्या नसानसांतून शिरली आहे काय? तुमच्या रक्तांत ती भिनून तुमच्या हृदयस्पंदनांशीं ती एकरूप झाली आहे काय? तिने तुम्हांला अक्षरशः वेड लावलें आहे काय? देशाच्या दुर्दशेच्या या चिंतेने तुम्हांला

पूर्णपणें ग्रासून टाकलें आहे काय? या चिंतेने ग्रासल्यामुळे तुमचा नांवलौकिक, तुमची पत्नी, तुमचीं मुलें, तुमची संपत्ति, इतकेंच नव्हे तर तुमचें स्वतःचें शरीर, या साऱ्यांचा तुम्हांला विसर पडला आहे काय? तुमची अशी अवस्था झाली आहे काय? देशभक्त होण्याची ही पहिली पायरी आहे--अगदी पहिलीच पायरी आहे. तुमच्यापैकी पुष्कळांना माहीत आहे की, मी सर्वधर्मपरिषदेकरिता अमेरिकेस गेलों नव्हतों, तर माझ्या देशबांधवांविषयीची ही तीव्र भावना माझ्या हृदयांत मूळ धरून होती. एखाद्या भुताप्रमाणे ती माझ्या मानगुटीस बसली होती. मीं बारा वर्षें भारतभर प्रवास केला, पण माझ्या देशबांधवांकरिता कांही कार्य करण्याचा उपाय न सापडल्यामुळे मी अमेरिकेस गेलों. त्या वेळीं जे लोक मला जाणत होते त्यांना हें ठाऊक आहे. या सर्वधर्मपरिषदेची चिंता कोणाला होती? माझ्याच रक्ताच्या माझ्या देशबांधवांची सारखी दुर्दशा होत होती. त्यांची चिंता वाहणारे कोण होते? म्हणून लक्षांत ठेवा की देशभक्त होण्याची पहिली पायरी ही अशी आहे.

समजा की देशाविषयी तुमच्या हृदयांत तळमळ आहे. पण केवळ व्यर्थ बोलण्यांत शक्ति खर्च न करतां आपल्या देशबांधवांची दुर्दशा थांबविण्याकरिता तुम्हीं कांही प्रत्यक्ष मार्ग शोधून काढला आहे काय? लोकांना शिव्याशाप देण्याऐवजी तुम्ही त्यांना खरोखर कांही मदत करूं शकतां काय? त्यांना या जीवन्मृत अवस्थेंतून बाहेर काढण्याकरिता आणि त्यांच्या या दुःखांत त्यांचें सान्त्वन करण्याकरिता तुमच्याजवळ गोड शब्द आहेत काय? देशभक्त होण्याची ही दुसरी पायरी आहे.

पण केवळ एवढेंच पुरेसें नाही. पर्वतप्राय विघ्नांना तोंड देतां येईल असा दृढनिश्चय तुमच्या ठायीं आहे काय? सर्व जग हातीं खड्ग घेऊन तुमच्याविरुद्ध उभें झालें तरीहि तुम्हांला जें सत्य वाटतें तें करण्याचें धैर्य तुमच्यांत आहे काय? तुमची पत्नी, तुमचीं मुलें यांनी विरोध केला, तुमची सर्व संपत्ति गेली, तुमचा नांवलौकिक गेला तरीहि तुम्ही दृढ राहाल काय? अशा परिस्थितींत देखील तुम्ही आपल्या ध्येयाचा पाठपुरावा करीत धीराने वाटचाल करीत राहाल काय? राजा भर्तृहरि यांनी म्हटलें आहे--"नीतिनिपुण महात्मे निंदा करोत वा स्तुति करोत, लक्ष्मी येवो वा कोठेहि जावो, मरण आज येवो वा युगा-

नंतर येवो, धैर्यवान पुरुष तोच की जो सत्याच्या मार्गापासून किंचित् देखील ढळत नाही." तुमच्या ठायीं अशी चिकाटी आहे काय? देशभक्त होण्याची ही तिसरी पायरी आहे. तुमच्या ठायीं या तीन गोष्टी असतील तर तुमच्यापैकी प्रत्येकजण अचाट कामें करील. मग तुम्हांला वृत्तपत्रांत लिहिण्याचें प्रयोजन नाहीं, व्याख्यानें देण्याचें कारण नाही; तुमच्या मुखावरच अपूर्व तेज विलसेल. तुम्ही गुहेंत राहत असलां तरी तुमचे विचार खडकाच्या भिंती भेदून बाहेर पडतील. तुमच्या या विचारांना योग्य आधार न मिळाल्यास ते कदाचित् शेकडो वर्षे स्पंदनांच्या रूपांत जगभर फिरत राहतील व शेवटीं त्यांना योग्य मेंदूचा आधार मिळतांच त्यांचें प्रत्यक्ष रूपांत कार्य सुरू होईल. विचारांचें, हृदयांतील कळकळीचें व हेतूंच्या विशुद्धतेचें सामर्थ्य हें असें आहे.

मीं तुमचा पुष्कळ वेळ घेतला असें मला वाटतें, पण फक्त आणखी एक गोष्ट मी तुम्हांला सांगतों. माझ्या देशबांधवांनो, माझ्या मित्रांनो, माझ्या संतानांनो, आपलें हें राष्ट्ररूपी जहाज लाखो जीवांना भवसागरांतून पार करण्याचें कार्य करीत आलें आहे. गेलीं हजारो वर्षें या जहाजाने लक्षावधि जीवांना या सागराच्या पलीकडे नेऊन अमृतधामीं पोहोचविलें आहे. पण आज, कदाचित् आपल्याच प्रमादामुळे हें जहाज थोडें नादुरुस्त झालें आहे, त्यांत कांही छिद्रें पडलीं आहेत. म्हणून तुम्ही त्याला शिव्याशाप देणार काय ? जगांत ज्याने आपल्यासाठी सर्वांहून अधिक कार्य केलें त्याला तुम्हीं आता शिव्याशाप देणें योग्य होईल काय ? या राष्ट्ररूपी जहाजाला, आपल्या या समाजरूपी जहाजाला कांही छिद्रें पडलीं असतील, तर आपण, त्याच्या संतानांनी तीं बुजवून टाकलीं पाहिजेत. हें कार्य आपल्या हृदयाचें रक्त देऊन आपण आनंदाने करूं या; आणि जर आपल्याला हें जमलें नाही तर मरण पत्करूं या. आपण आपल्या मेंदूंचे गोळे करून त्यांनी या जहाजाचीं छिद्रें बुजवूं या, पण आपण त्याचा कधीहि धिक्कार करतां कामा नये. आपल्या या समाजाविरुद्ध एकहि कठोर शब्द बोलूं नका. त्याच्या प्राचीन महत्तेमुळे मी त्याच्यावर प्रेम करतों. तुम्हां सर्वांबद्दल मला प्रेम वाटतें, कारण तुम्ही देवांचीं तसेंच महिमाशाली पूर्वजांचीं लेकरें आहांत. मग मी तुम्हांला शिव्याशाप कसा देईन ! कधीच नाही. तुमचें सर्वप्रकारें कल्याण होवो. माझ्या संता-

नांनो, माझ्या सर्व योजना तुम्हांला सांगण्याकरिता मी आलों आहें; तुम्हांला त्या मान्य होतील तर मी तुमच्या बरोबर कार्य करण्यास सिद्ध आहें. पण तुम्हांला जर त्या मान्य नसतील व तुम्ही माझा धिक्कार करून मला भारताबाहेर घालवून द्याल, तरी मी परत येऊन तुम्हांला सांगेन की, आपण सर्वजण बुडत आहोंत, तुमच्यापैकीच एक म्हणून मी तुमच्यामध्ये आलों आहें व आपण जर बुडून नष्ट होणार असलों तर, आपण सर्वजण मिळून बुडून जाऊं या, पण आपल्या तोंडांतून एकहि कटु शब्द कदापि बाहेर न पडो.

# भारतीय जीवनाच्या उभारणींतील वेदान्ताचें स्थान

(मद्रास येथे दिलेलें व्याख्यान)

आपला समाज व धर्म यांना लावण्यांत येणारें एक नांव अत्यंत प्रचलित झालेलें आहे. तें म्हणजे 'हिंदु' हें होय. वेदान्तधर्माविषयी माझी जी कल्पना आहे ती स्पष्ट करण्याच्या दृष्टीने 'हिंदु' या शब्दाचें थोडें अधिक स्पष्टीकरण करणें आवश्यक आहे. प्राचीन काळीं इराणमधील लोक सिंधु नदीला 'हिंदु' या नांवाने संबोधीत असत. संस्कृतांत जेथे 'स' हें अक्षर असें, त्याबद्दल प्राचीन इराणी लोकांच्या भाषेंत 'ह' हें अक्षर येई, म्हणून 'सिंधु' हा शब्द 'हिंदु' असा होऊन गेला. आणि तुम्हांला हें ठाऊक आहे की ग्रीकांना 'ह' या अक्षराचा उच्चार करणें फार अवघड वाटें, म्हणून त्यांनी तें अक्षरच गाळून टाकलें व आपण 'इंडियन' या नांवाने ओळखलें जाऊं लागलों. सिंधुपलीकडील लोकांना लावल्या जाणाऱ्या 'हिंदु' शब्दाचा प्राचीन अर्थ कांहीहि असला तरी, आज मात्र तो अर्थ लागू पडत नाहीं, कारण सिंधुपार राहणारे सर्व लोक आता एकाच धर्माचे राहिलेले नाहीत. या देशांत हिंदु, मुसलमान, पारशी, ख्रिस्ती, बौद्ध आणि जैन आदि लोक आहेत. व्युत्पत्तीच्या दृष्टीने पाहिल्यास 'हिंदु' या शब्दांत या सर्व लोकांचा समावेश होतो, पण धर्माच्या दृष्टीने या सर्वांना हिंदु मानणें योग्य होणार नाही. याकरिता आपल्या धर्माला एखादें सर्वसाधारण नांव देणें कठीण आहे; कारण हा धर्म अनेक पंथांची, विभिन्न धार्मिक मतांची, नाना प्रकारच्या अनुष्ठानपद्धतींची एक समष्टिच आहे. या समष्टीला सर्वसामान्य असें नांव नाही, तिची एकच एक अशी धार्मिक घटना नाही. कदाचित् एकाच बाबतींत आपल्या सर्व संप्रदायांचें एकमत आहे—आपण सर्वचजण वेदांना आपले धर्मग्रंथ मानतों. हें बहुधा खरें की वेदांचें अंतिम प्रामाण्य मान्य नसणाऱ्याला स्वतःस हिंदु म्हणविण्याचा अधिकार नाही. तुम्हांला हें ठाऊक आहे की वेदांचे कर्मकांड व ज्ञानकांड असे दोन विभाग आहेत. कर्मकांडांत अनेक यज्ञ व अनुष्ठानपद्धति यांचा समावेश होतो. त्यांच्यापैकी

अधिकांश आज प्रचलित नाहीत. ज्ञानकांडांत वेदांची आध्यात्मिक शिकवण आलेली आहे व हें ज्ञानकांड उपनिषदें वा वेदान्त या नांवाने प्रसिद्ध आहे. सर्वच आचार्यांनी व तत्त्वज्ञांनी या उपनिषदांना अंतिम प्रमाण म्हणून मानलें आहे. भारतांतील कोणतेंहि तत्त्वज्ञान वा संप्रदाय असो, त्याला हें दाखवून द्यावें लागतें की त्याला उपनिषदांचा आधार आहे. त्याला जर तसें दाखवितां आलें नाही तर तो संप्रदाय पाखंड ठरतो. म्हणून आजच्या काळांत सर्व हिंदूंना लावतां येईल असें एकमेव नांव म्हणजे 'वैदान्तिक' वा 'वैदिक' हें होय. आणि मीहि 'वैदान्तिक' व 'वेदान्त' हे शब्द याच अर्थाने वापरत असतों. मला या ठिकाणीं थोडें अधिक स्पष्टीकरण केलें पाहिजे, कारण बऱ्याच काळापासून बहुतांश लोकांना वेदान्त म्हणजे केवळ अद्वैत वेदान्त असें वाटत आलें आहे. उपनिषदांवर आधारलेल्या भिन्नभिन्न तत्त्वज्ञानांपैकी अद्वैत हें केवळ एक तत्त्वज्ञान आहे. विशिष्टाद्वैती तत्त्वज्ञानाच्या अनुयायांना उपनिषदांबद्दल अद्वैत तत्त्वज्ञानाच्या अनुयायांइतकाच आदर आहे; आणि विशिष्टाद्वैती हे वेदान्ताला अद्वैतवाद्यांइतकेंच प्रमाण मानतात. द्वैतवादी व भारतामधील अन्य संप्रदाय हे देखील वेदान्ताला तितकेंच प्रमाण मानतात, पण 'वेदान्ती'या शब्दाचा अर्थ सामान्यत: 'अद्वैतवादी' असा समजला जातो, आणि त्याला कांही कारणहि आहे. वेद हे जरी आपले मुख्य शास्त्रग्रंथ आहेत, तरी पुराणें व स्मृति हे नंतरचे ग्रंथहि आपले शास्त्रग्रंथ आहेत; त्यांत वेदांमधील तत्त्वें अनेक दृष्टान्तांच्या साहाय्याने स्पष्ट केलीं आहेत. अर्थातच या ग्रंथांना वेदांइतकें प्रामाण्य नाही. यांतहि नियम असा की जिथे पुराणें व स्मृति यांचा वेदांशीं वा श्रुतींशीं मतभेद असेल तेथे श्रुतींचें मत ग्राह्य व स्मृतींचें मत त्याज्य मानावें. थोर अद्वैती तत्त्वज्ञ शंकराचार्य व त्यांचे अनुयायी यांच्या भाष्यांमधून आपल्याला उपनिषदांमधूनच बहुतेक वचनें आधार म्हणून उद्धृत केलेलीं आढळतात; श्रुतींमधे न आढळणारा एखादाच मुद्दा स्पष्ट करण्यासाठी त्यांनी स्मृतीचा आधार दिलेला आढळतो. याउलट इतर तत्त्वसंप्रदाय मात्र श्रुतींपेक्षा स्मृतींचाच अधिक आधार घेतात; आणि आपण जेव्हा अधिकाधिक द्वैती अशा संप्रदायांचा विचार करतों तेव्हा आपल्याला असें आढळतें की त्यांनी श्रुतींपेक्षा स्मृतींचाच इतका अधिक उल्लेख केलेला आहे की वेदान्ती म्हणवणा-

त्यांच्या पक्षीं तसें करणें उचित दिसत नाही. या द्वैतवाद्यांनी पुराणांतील वचनांना इतकें अधिक प्राधान्य दिल्यामुळे, कदाचित् अद्वैत तत्त्वज्ञानास 'शुद्ध वेदान्त' मानलें गेलें असावें असें मला वाटतें.

तें कांहीहि असो, 'वेदान्त' या शब्दांत सर्व भारतीय धर्ममतांचा समावेश होतो. वेदान्त हा वेदांचें अंग असल्यामुळे तो आपलें सर्वांत प्राचीन असें वाङमय आहे हें आपणां सर्वांनाच मान्य आहे; आजच्या विद्वानांचें मत कांहीहि असलें तरी, वेदांचे कांही भाग एका काळीं व बाकीचे भाग नंतर केव्हातरी लिहिले गेले हें हिंदूंना मान्य नाही. त्यांचा अर्थातच अद्यापहि असा विश्वास आहे की सर्व वेद एकाच काळीं निर्माण झाले, किंवा मी म्हणेन की त्यांचा असा विश्वास आहे की वेद हे कधीच निर्माण केले गेले नाहीत, तर ते ईश्वराच्या मनांत नित्याचे वसत आहेत. ही अनादि अनंत ज्ञानराशि म्हणजे वेदान्त हाच 'वेदान्त'या शब्दाचा अर्थ मला अभिप्रेत आहे. भारतांतील द्वैतवाद, विशिष्टाद्वैतवाद व अद्वैत-वाद या सर्वांचाच वेदान्तांत समावेश होतो. बौद्धांची व जैनांची तशी इच्छा असल्यास त्यांच्या धर्मांचा कांहीं भाग सुद्धा आपण वेदान्तांत अंत-र्भूत करून देऊं शकतों. आपलीं हृदयें पुरेशीं विशाल आहेत, पण आप-ल्यांत समाविष्ट होण्यांत त्यांनाच अडचण वाटते; आम्ही त्यांचा समा-वेश करून घेण्यास सिद्धच आहोंत. तसें सूक्ष्म विश्लेषण करून पाहिलें तर आपल्याला दिसून येतें की बौद्धधर्माचा सारभूत भाग उपनिषदांतू-नच घेतलेला आहे; त्याचप्रमाणे बौद्धांचें तथाकथित महान् व आश्चर्य-कारक नीतिशास्त्रहि कोणत्या ना कोणत्या उपनिषदांतून शब्दशः घेत-लेलें आहे; जैन धर्मांतीलहि सर्व चांगलीं तत्त्वें उपनिषदांतीलच आहेत, फक्त त्या धर्मांतील छांदिष्टपणाचा भाग उपनिषदांत सापडणार नाही. नंतरच्या काळांत भारतीय धार्मिक विचारसरणीचा जो विकास झाला त्याचीं बीजेंसुद्धा आपल्याला उपनिषदांत आढळतात. उपनिषदांत भक्ति-विषयक आदर्श आढळत नाही असें कांही वेळां उगीचच, मोठ्या आग्र-हानें प्रतिपादन केलें जातें. ज्यांनी उपनिषदांचें अध्ययन केलें आहे त्यांना या विधानाची असत्यता कळेल. आपण नीट पाहिल्यास, प्रत्येक उप-निषदांत आपल्याला भक्तीचीं पुष्कळशीं तत्त्वें आढळतील. परंतु ज्या बऱ्याचशा कल्पना नंतरच्या स्मृतिग्रंथांतून व पुराणग्रंथांतून विकसित

झालेल्या दिसतात त्या उपनिषदांत केवळ बीजरूपाने आढळतात. या कल्पनांची रूपरेषा वा आराखडा उपनिषदांत पाहावयास मिळतो. कांही पुराण-ग्रंथांतून हा आराखडा पूर्ण केलेला दिसतो. पण चांगला विकसित झालेला असा एकहि भारतीय आदर्श नाही की ज्याचें मूळ या उपनिषदांत सापडत नाही. उपनिषदांचें विशेष ज्ञान नसलेल्या कांही व्यक्तींनी भक्तीचा उगम परदेशांत शोधण्याचा हास्यास्पद प्रयत्न केलेला आहे; पण तुम्ही जाणतां की हे सर्व प्रयत्न अयशस्वी ठरले आहेत. तुम्हांला जेवढी भक्ति हवी तेवढी तीं उपनिषदांतच काय, पण संहितेंत सुद्धा आढळेल--तिथे तुम्हांला उपासना, प्रेम वगैरे सर्वकांही आढळेल.[१] फक्त नंतरच्या काळांत भक्तीचा आदर्श अधिकाधिक विकसित झाला आहे, एवढेंच. संहितेच्या कांही भागांत पुष्कळ ठिकाणीं तुम्हांला भीतींतून उत्पन्न झालेल्या धर्माचीं चिन्हें आढळतील; संहितेंत कितीतरी ठिकाणीं उपासक हा वरुणासमोर किंवा अन्य देवतेसमोर भयाने कापतांना दिसेल. संहितेंत अनेक स्थानीं उपासक हे पापाच्या भयाने अस्वस्थ झालेले दिसतील. पण उपनिषदांत मात्र असल्या गोष्टींच्या वर्णनाला थारा नाही. उपनिषदांतील धर्म हा भयाचा धर्म नाही, तर तो प्रेमाचा व ज्ञानाचा धर्म आहे.

हीं उपनिषदें आपले धर्मग्रंथ आहेत. त्यांतील वचनांचें स्पष्टीकरण भिन्न भिन्न प्रकारें केलें गेलें आहे; आणि मीं तुम्हांला सांगितलेंच आहे की, जेथे नंतरचे पुराणग्रंथ व वेद यांच्यांत विरोध आढळेल तेथे पुराणांचें मत त्याज्य मानून वेदांचें मत ग्राह्य मानलें पाहिजे. पण प्रत्यक्षत: आपल्याला असें दिसतें की आपण नव्वद टक्के 'पौराणिक' वा पुराणांचे अनुयायी आहोंत व दहा टक्के 'वैदिक' आहोंत. तसेंच, आपल्याला दिसून येतें की आपल्या समाजांत परस्परविरोधी असे नाना प्रकारचे आचार प्रचलित आहेत; आपल्याला आपल्या समाजांत अशीं धर्ममतें आढळतात की ज्यांना हिंदुशास्त्रांत क्वचितच आधार सापडतो; आणि पुष्कळ वेळां आपण ग्रंथांत वाचतों व आश्चर्याने पाहतों की, आपल्या देशांतील अनेक चालीरीतींना वेदांचा, स्मृतींचा वा पुराणांचा, कुणाचाच आधार नसतो--त्या चालीरीति केवळ स्थानिक स्वरूपाच्या असतात. आणि तरीहि प्रत्येक अज्ञ खेडुताला वाटतें की ही क्षुद्र

स्थानिक रूढि नष्ट झाली तर त्याचें हिंदुत्व नष्ट होईल. त्याच्या मनांत वेदान्त धर्म व या क्षुद्र स्थानिक रूढि हीं दोन्हीं अविभाज्यपणें एकरूप होऊन गेलेलीं असतात. शास्त्रें वाचूनहि त्याला कळत नाही की आपण जें कांही करतों त्याला शास्त्राची संमति नाही. त्याला हें समजणें अत्यंत अवघड जातें की या रूढींचा त्याग केल्याने त्याची कांहीच हानि होणार नाही, तर उलटपक्षीं त्यामुळे तो अधिक चांगला माणूस होईल. तसेंच, दुसरीहि एक अडचण आहे. आपलीं शास्त्रें बृहत् स्वरूपाचीं होतीं व त्यांची संख्याहि फार मोठी होती. पतंजलींच्या 'महाभाष्य' नामक शब्द-शास्त्रावरील महान् ग्रंथावरून आपल्याला कळतें की सामवेदाच्या एक हजार शाखा होत्या. त्या सर्व आता कुठे आहेत ? तें कोणालाच ठाऊक नाही. प्रत्येक वेदाच्या बाबतींत असेंच झालें आहे; त्यांचा अधिकांश भाग नाहीसा झाला आहे आणि थोडासाच भाग शिल्लक उरला आहे. विशिष्ट घराण्यांनी वेदांच्या विशिष्ट शाखांची जबाबदारी उचलली होती. एकतर हीं कुटुंबें नष्ट झालीं, किंवा परकीय आक्रमकांच्या हल्ल्यास बळी पडलीं किंवा अन्य रीतीने नाश पावलीं; त्यांच्या बरोबरच त्यांच्या स्वाधीन असलेल्या वेदशाखाहि नष्ट झाल्या. ही वस्तुस्थिति आपण लक्षांत घेतली पाहिजे; कारण ज्यांना नवें कांही सांगावयाचें असतें अशा लोकांच्या हातांतील ती एक महत्त्वाचें साधन बनते, किंवा वेदांविरुद्ध असलेल्या एखाद्या गोष्टीचें समर्थन करतांनाहि तिचा उपयोग केला जातो. भारतांत जेथे म्हणून स्थानिक रूढि व श्रुति यांत वाद निर्माण होतो, आणि असें दाखविलें जातें की सदर रूढि श्रुतिविरुद्ध आहेत तेथे असा युक्तिवाद करण्यांत येतो की हें असें नाही, तर सदर रूढि कालौघांत नष्ट झालेल्या श्रुतिशाखांमधे होत्या आणि म्हणून त्यांना वेदाधार आहे. शास्त्रांचा अर्थ लावण्याच्या या सर्व विभिन्न पद्धति व भाष्यें यांमध्ये एक सर्वसामान्य सूत्र शोधून काढणें खरोखरच कठीण आहे. पण आपल्या या सर्व पंथोपपंथांना आधारभूत असें एक निश्चित सूत्र असलें पाहिजे अशी मात्र आपल्याला खात्री वाटते. या सर्वांमधे सुसंवादित्व असलें पाहिजे. या सर्वांना आधारभूत असा सर्वसामान्य पाया असला पाहिजे. वरपांगीं विशृंखल दिसणाऱ्या धर्ममतांच्या ज्या समष्टीला आपण आपला धर्म म्हणतों तिचा निश्चित असा सर्वसामान्य आधार असला पाहिजे.

असें नसतें तर आपला हा धर्म इतक्या काळपर्यंत टिकून राहूं शकला नसता.

भाष्यकारांसंबंधी विचार केला असतां आपल्याला आणखी एक अडचण येते. अद्वैताला पोषक असा उतारा आढळल्यास अद्वैतवादी भाष्यकार तो तशाच स्वरूपांत राखून ठेवतो, पण तोच द्वैतपर उतारा असेल तर तो शक्य तेवढी त्याची ओढाताण करतो व त्यामधून विचित्र अर्थ काढतो. भाष्यकाराला सोयीचें म्हणून कित्येकदा ‘अजा’ (जन्मरहित) पदाचा ‘शेळी’ असा अर्थ लावण्याचे चमत्कारिक प्रयत्न होतात. द्वैतवादी भाष्यकारांनी अशाच प्रकारें--कधीकधी अधिक वाईट रीतीने--वेदांचा अर्थ लावला आहे. प्रत्येक द्वैतपर उतारा जतन करावयाचा व प्रत्येक अद्वैतपर उतारा आपल्याला हव्या त्या विकृत स्वरूपांत मांडावयाचा, असें त्यांनी केलें आहे. संस्कृत भाषा इतकी जटिल आहे, वेदांचें संस्कृत एवढें प्राचीन आहे आणि संस्कृत शब्दशास्त्र इतकें परिपूर्ण आहे की, युगानुयुगें एखाद्या विशिष्ट शब्दार्थावर चर्चा चालवितां येईल. एखाद्या पंडिताने मनांत आणलें तर, युक्तिवादाच्या साहाय्याने व शास्त्राधार व नियम यांच्या मदतीने तो कोणाचीहि निरर्थक बडबड शुद्ध संस्कृत असल्याचें दाखवून देऊं शकतो. उपनिषदांचा अर्थ समजून घेतांना आपल्या मार्गांत या अडचणी येतात. ईश्वरेच्छेने मला अशा एका महापुरुषाचा सहवास लाभला की जे जितके घोर द्वैती होते तितकेच घोर अद्वैतीहि होते, जितके परम भक्त होते तितकेच परम ज्ञानीहि होते. त्यांच्या सहवासामुळे माझ्या मनांत आलें की, उपनिषदें व अन्य शास्त्रें यांचा अभ्यास भाष्यकारांचें अंधानुसरण न करतां स्वतंत्रपणें व उत्कृष्ट मार्गाने करावा. आणि मीं जें कांही संशोधन केलें त्यावरून माझी खात्री पटली की शास्त्रांतील उतारे परस्परविरोधी नाहीत. तेव्हा आपल्याला शास्त्रांचा विकृत अर्थ करण्याची गरज नाही. श्रुतींतील वाक्यें सुंदर आहेत, नव्हे, तीं आश्चर्यमुग्ध करून सोडणारीं आहेत; तीं विसंगत नसून सुसंवादी आहेत, त्यांच्यांतील एक एक कल्पना अधिक उच्च अशा दुसऱ्या कल्पनेप्रत पोहोचण्याची जणु पायरीच आहे. सर्व उपनिषदांतून मला आढळलेली महत्त्वाची गोष्ट ही की त्यांचा प्रारंभ उपासना, भक्ति आदि द्वैतमूलक कल्पनांनी होतो व त्यांची समाप्ति उदात्त अशा अद्वैत तत्त्वांत होते.

म्हणून या महापुरुषाच्या जीवनाच्या प्रकाशांत मला असें दिसून

आलें की द्वैतवादी व अद्वैतवादी यांनी परस्परांशीं भांडण्याचें कारण नाही. त्यांच्यापैकी प्रत्येकाला आपल्या समाजाच्या जीवनांत महत्त्वाचें स्थान आहे. द्वैतवादी राहतीलच; त्यांचाहि अद्वैतवाद्यांइतकाच आपल्या समाजाच्या धार्मिक जीवनांत वांटा आहे. एकाविना दुसरा राहूं शकत नाही; एकाची परिणति दुसऱ्यांत होते; एक इमारत, तर दुसरा कळस आहे; एक वृक्षाच्या मुळाप्रमाणे आहे, तर दुसरा फळाप्रमाणे आहे. म्हणून उपनिषदांच्या अर्थाची कोणत्याहि प्रकारची ओढाताण करणें मला हास्यास्पद वाटतें. आपल्याला दिसून येतें की उपनिषदांची भाषा फार सुंदर आहे. एक सर्वोच्च तत्त्वज्ञान म्हणून जरी आपण त्यांचा विचार केला नाही, मानवजातीला मोक्षाचा मार्ग दाखविणारे उत्कृष्ट असे धर्मग्रंथ म्हणून जरी आपण त्यांचा विचार केला नाही, तरी उदात्ततेचें चित्रण या दृष्टीने देखील उपनिषद्-साहित्य हें जगांत सर्वश्रेष्ठ आहे. विकसित अशा मानवी मनाचें वैशिष्टच येथे पूर्णांशाने दिसतें, अंतर्दृष्टिपरायण अशा हिंदु मनाचें दर्शन येथे स्पष्टपणें घडतें. उदात्ततेचें चित्रण अन्य सर्व जातींनी केलेलें आपल्याला पाहावयास मिळतें, परंतु निरपवादपणें तुम्हांला आढळेल की, बाह्य प्रकृतींतील उदात्तता आकळणें हेंच त्यांचें उद्दिष्ट आहे. मिल्टन, डॅन्टे, किंवा होमर यांपैकी वा अन्य कोणाहि पाश्चात्त्य कवीचें उदाहरण घ्या. त्यांच्या काव्यांत भव्योदात्त वर्णनाचे उतारे आहेत, पण त्यांतहि इंद्रियें व बाह्य प्रकृति यांच्या द्वारें अनंतत्वाचें आकलन करण्याचा प्रयत्न दिसतो--बाह्य प्रकृतीची अनंत विशालता, अवकाशाचें अनंतत्व आकळण्याचा प्रयत्न दिसून येतो. असेच प्रयत्न संहितेमधे केलेले आढळतात. कांही आश्चर्यकारक ऋचांमधे सृष्टीच्या उत्पत्तीचें वर्णन असल्याचें तुम्हांला माहीत आहेच. विशाल बाह्य प्रकृतींतील उदात्तता आणि अवकाशाचें अनंतत्व यांचें वर्णन त्या ठिकाणीं अत्यंत उच्च प्रतीचें आहे. पण लवकरच त्यांना असें दिसून आलें की अनंतत्व या मार्गाने आकळतां येत नाही, आणि त्यांच्या मनांतील साकार होऊं पाहणाऱ्या कल्पना ह्या अनंत अवकाश, अनंत विस्तार व अनंत बाह्य प्रकृति यांच्या द्वारें सुद्धा पूर्णपणें व्यक्त होऊं शकत नाहीत. म्हणून अनंतत्वाच्या स्पष्टीकरणार्थ ते दुसरे कांही उपाय शोधूं लागले. उपनिषदांतील भाषा नवी दिसूं लागली, ती एकप्रकारें नास्तिभावद्योतक आहे, कुठेकुठे ती अस्फुट आहे,

कधी कधी ती तुम्हांला इंद्रियातींत अवस्थेकडे घेऊन जाते, तुम्हांला अनाकलनीय व इंद्रियातीत असें कांहीतरी दुरून दाखवून देते व तुम्हांला तें जरी संवेद्य नसलें, तरीहि तुम्हांला त्याच्या अस्तित्वाविषयी खात्री वाटूं लागते. जगांतील कोणत्या कवितेची तुलना पुढील अवतरणाशीं करतां येईल ? 'न तत्र सूर्यो भाति न चंद्रतारकं नेमा विद्युतो भान्ति कुतोऽयमग्निः'—'तेथे सूर्य तळपत नाही, चंद्र वा तारे प्रकाशत नाहीत, विजा चमकून प्रकाश देत नाहीत, मग भौतिक अग्नीबद्दल काय सांगावें?" तसेंच जगाविषयीच्या तत्त्वज्ञानाचें जेवढें परिपूर्ण चित्रण पुढील श्लोकांत आढळतें तेवढें अन्यत्र कोठे आढळेल ? हिंदूंच्या समग्र विचारसरणीचें व मानवजातीच्या मोक्षाकांक्षेसंबंधीच्या समग्र कल्पनेचें सार पुढील श्लोकांत जेवढ्या सुंदर भाषेंत व जेवढ्या सुंदर रूपकाच्या साहाय्याने चित्रित केलेलें आहे तेवढें सुंदर चित्रण आणखी कोठे आढळेल ?

द्वा सुपर्णा सयुजा सखाया समानं वृक्षं परिषस्वजाते ।
तयोरन्यः पिप्पलं स्वाद्वत्त्यनश्नन्नन्यो अभिचाकशीति ।।
समाने वृक्षे पुरुषो निमग्नोऽनीशया शोचति मुह्यमानः ।
जुष्टं यदा पश्यत्यन्यमीशमस्य महिमानमिति वीतशोकः ।।

—"एकाच वृक्षावर सुंदर पंखाचे दोन पक्षी आहेत, त्यांची एकमेकांशीं दाट मैत्री आहे; त्यांच्यापैकी एक फळें खात आहे, आणि दुसरा कांही न खातां स्वस्थ व शांत बसलेला आहे; खालील फांदीवर बसलेला पक्षी गोड व कडू फळें खात आहे आणि सुख व दुःख यांचा अनुभव घेत आहे, पण शेंड्यावर बसलेला पक्षी शांत व गंभीर दिसत आहे, तो गोड वा कडू कोणतींच फळें खात नाही व म्हणून सुख किंवा दुःख यांविषयी तो उदासीन आहे. आपल्या श्रेष्ठ महिम्यांत तो लीन आहे." मानवी आत्म्याचें हें चित्रण आहे. माणूस या जीवनांतील बरींवाईट फळें चाखत असतो. तो कांचनाच्या मागे लागलेला असतो, तो इंद्रियभोगांच्या मागे धावत असतो, जगांतील असार, क्षणभंगुर गोष्टींचा तो पाठलाग करीत असतो, वेडेपणाचें ध्येयशून्य जीवन तो कंठीत असतो. दुसऱ्या एका ठिकाणीं उपनिषदांनी मानवी आत्म्याची रथाच्या सारथ्याशीं व इंद्रियांची उधळलेल्या, अनियंत्रित अशा घोड्यांशीं तुलना केली आहे. जीवनांतील निष्फळ गोष्टींचा पाठलाग करणाऱ्या मनुष्याचें आयुष्य हें असें

असतें; जीवनाच्या उष:कालीं सोनेरीं स्वप्नें पडतात, पण नंतर तीं खोटीं असल्याचें ध्यानीं येतें; वृद्ध माणसें गत आयुष्यांतील गोष्टींचें चर्वितचर्वण करीत असतात, तथापि त्यांना संसाराच्या जाळयांतून बाहेर पडण्याचा मार्ग दिसत नाही. जगाचें वास्तविक स्वरूप हें असें आहे. तरीहि प्रत्येकाच्या जीवनांत कांही सोनेरी क्षण येत असतात; आत्यंतिक दु:खांतच नव्हे तर आत्यंतिक सुखांत देखील असे कांही क्षण येतात की जेव्हा आत्मप्रकाश रुद्ध करणारे कृष्णमेघ कांहीसे दूर होतात; आपण सीमाबद्ध असलों तरी त्या वेळीं आपल्याला त्या सर्वातीत सत्तेचें ओझरतें दर्शन होतें; इंद्रियगत जीवनाच्या पलीकडील तो अनुभव असतो, जीवनांतील असार गोष्टींचा तेथे मागमूस नसतो, तेथे सुखदु:खें नसतात; प्रकृतीच्या, तसेंच इह किंवा परलोकांतील सुखाच्या आपल्या कल्पनेच्या पलीकडील तो अनुभव असतो; तेथे संपत्ति, कीर्ति, नांवलौकिक, किंवा संतति यांच्या तृष्णेचा लवलेशहि नसतो. हें दर्शन होतांच मनुष्य क्षणैक स्थिरावतो व गोड किंवा कडू कोणतींच फळें न खाणाऱ्या त्या दुसऱ्या शांत व गंभीर पक्ष्याकडे पाहतो. तो त्याला आत्मानंदांत, आत्ममहिम्यांत लीन असलेला दिसतो. गीतेंत ही अवस्था पुढीलप्रमाणे वर्णिली आहे--"यस्त्वात्मरतिरेव स्यात् आत्मतृप्तश्च मानव:। आत्मन्येव च सन्तुष्टस्तस्य कार्यं न विद्यते ॥"--"ज्याची भक्ति आत्म्याच्या ठायीं आहे, आत्म्याविना ज्याची अन्य कामना नाही, आणि जो आत्मसंतुष्ट आहे, त्याला खरोखर कोणतें कर्तव्य उरलेलें असणार?" त्याने असार कामें करण्यांत वेळ कां घालवावा? याप्रमाणे मनुष्याला ओझरतें आत्मदर्शन होतें, नंतर पुन्हा त्याला विस्मरण होतें व तो या जीवनांतील गोड-कडू फळें चाखूं लागतो. कदाचित् कांही कालानंतर त्याला पुन्हा तसेंच ओझरतें दर्शन होतें, आणि जसजसे त्याच्यावर जगाचे आघात होतात तसतसा तो खाली असलेला पक्षी वरच्या पक्ष्याच्या जवळजवळ जाऊं लागतो. सुदैवाने त्याच्यावर जर एकामागून एक कठोर आघात झाले तर तो त्याचा मित्र असलेल्या, त्याचा जणु प्राणच असलेल्या त्या दुसऱ्या पक्ष्याच्या अधिक जवळ जातो, आणि जसजसा तो त्या दुसऱ्या पक्ष्याच्या अधिकाधिक निकट जातो तसतसा त्या वरच्या पक्ष्याकडून आलेला प्रकाश आपल्या पंखावर पडलेला त्याला दिसतो.

आणि तो जसजसा जवळ जातो तसतसें त्याच्यांत परिवर्तन घडून येतें. तो जसजसा जवळ जातो तसतसें आपण विरून जात आहोंत असें त्याला दिसून येतें आणि अखेर तो पूर्णपणें विरून जातो. त्याला कळून येतें की त्याला कधीच वेगळें अस्तित्व नव्हतें आणि तो त्या हलणाऱ्या पानां-मधे बसलेल्या शांत व गंभीर अशा पक्ष्याचें केवळ प्रतिबिंब होता. त्याला मग ज्ञान होतें की तो स्वतःच वरचा पक्षी होता व स्वतःचाच महिमा तो पाहत होता ! नंतर तो निर्भय होतो, पूर्णपणें तृप्त होऊन जातो व शांत होऊन जातो. या रूपकाच्या साहाय्याने उपनिषदें आप-ल्याला द्वैतवादांतून सर्वोच्च अद्वैत तत्त्वाकडे घेऊन जातात.

अशीं अनंत उदाहरणें देतां येतील, पण या व्याख्यानांत तें कर-ण्यास वेळ नाही. उपनिषदांत मनोहर काव्य, उदात्त तत्त्वांचें चित्रण आणि भव्य कल्पना हीं भरपूर आढळतात. आणखी एक गोष्ट येथे सांगावयाची ती ही की उपनिषदांतील भाषा आणि विचार हीं अत्यंत स्पष्ट वा असंदिग्ध आहेत. एखाद्या तीक्ष्ण तरवारीप्रमाणे किंवा घणाच्या घावाप्रमाणे तीं आपल्या हृदयावर जबरदस्त प्रभाव पाडतात. त्यांच्या अर्थांत अचूकपणा आहे. या संगीतांतील प्रत्येक सूर निश्चित स्वरूपाचा आहे व पूर्णतः परिणामकारक आहे. उपनिषदांमधे आडवळणें नाहीत, निरर्थक शब्द किंवा मेंदू शिणविणारीं जटिल वाक्यें नाहीत. त्यांत क्षुद्र विचारांचा मागमूस नाही, अतिरिक्त रूपकांचा हव्यास नाही, अर्थलोप होईतों विशेषणापाठोपाठ विशेषणांची झालेली गर्दी येथे आपलें मस्तक बधिर करीत नाही; एखाद्याला त्यांतील वाक्यांच्या चक्रव्यूहां-तून बाहेर पडण्याची अडचण भासावी असें त्यांत कांहीच नाही. उप-निषदांत या साऱ्या गोष्टी मुळीच आढळत नाहीत. उपनिषदें जर मानवांनी निर्माण केलीं असतील तर तें अशा एका मानवसमाजाचें कार्य असलें पाहिजे की ज्याने आपलें सत्त्व, आपलें तेज त्या वेळीं गमावलें नव्हतें.

आपल्या प्रत्येक पानांपानांतून हीं उपनिषदें सामर्थ्याचा संदेश देत असलेलीं मला दिसत आहेत. ही एक मोठी ध्यानीं घेण्यासारखी गोष्ट आहे; मला जीवनांत मिळालेला हा मोठा उपदेश आहे; उपनिषदें सांगतात, "हे मानवा, सामर्थ्यसंपन्न हो, दुर्बल राहूं नकोस." यावर

मनुष्य म्हणेल, "मानवाच्या ठायीं दुर्बलता नसते काय?" उपनिषदें म्हणतात, मानवाच्या ठायीं दुर्बलता असते खरी, पण ती अधिक दौर्बल्याने दूर होईल काय? घाणीने घाण स्वच्छ होईल काय? पापाने पाप नाहीसें करतां येईल काय? दुर्बलतेने दुर्बलता जाईल काय? म्हणून हे मानवा, सामर्थ्य मिळव, उठून उभा राहा व बलवान् हो. जगांत हें एकच वाङ्मय आहे की ज्यांत तुम्हांला 'अभीः' (भयशून्य) हा शब्द अनेकदा योजलेला आढळेल. जगांतील अन्य कोणत्याहि धर्मग्रंथांत हें विशेषण ईश्वराला किंवा मानवाला लावलेलें दिसून येणार नाही. 'अभीः'--निर्भय व्हा! माझ्या मनश्चक्षूसमोर त्या पूर्वकालीन पाश्चात्त्य शिकंदर बादशहाचें चित्र उभें राहतें; मला असें दिसतें की तो थोर बादशहा सिंधुतीरीं उभा आहे व आपल्या एका अरण्यवासी संन्याशाबरोबर बोलत आहे; त्याच्याशीं बोलत असलेला तो वृद्ध संन्यासी कदाचित् उघडावाघडा असेल, एखाद्या खडकावर बसलेला असेल; बादशहा त्याच्या ज्ञानाने स्तंभित होतो, आणि सुवर्णाचें व मानसन्मानाचें आमिष दाखवून ग्रीस देशाला चलण्याची त्याला विनंती करतो. तेव्हा हा संन्यासी त्या सोन्याच्या व प्रलोभनाच्या गोष्टी ऐकून हसतो व ग्रीस देशांत जाण्यास नकार देतो; आणि नंतर तो बादशहा आपल्या सत्तेच्या जोरावर म्हणतो, "तूं आला नाहीस तर तुला ठार करीन." तेव्हा तो संन्यासी मोठ्याने हसून म्हणतो, "तूं आता जें बोललास त्याच्याइतकें असत्य तूं आपल्या आयुष्यांत कधी बोलला नसशील. मला कोण ठार मारूं शकणार? या जड जगाचा बादशहा तूं; तूं मला मारणार! कधीच शक्य नाही! कारण मीं अज, अमर असा आत्मा आहें; मी कधी जन्मलों नाहीं आणि कधीच मरणार नाहीं. मी सर्वज्ञ, अनंत, सर्वव्यापी आहें; आणि तूं मला मारणार! अगदी पोर आहेस तूं!" याला म्हणतात सामर्थ्य! याला म्हणतात खरें सामर्थ्य! आणि माझ्या मित्रांनो, माझ्या देशबांधवांनो, उपनिषदांचें जितकें जितकें मी अध्ययन करतों, तितकें तितकें मला तुमची अवस्था पाहून दुःख होतें, कारण उपनिषदांतील ही सामर्थ्याची शिकवण प्रत्यक्ष जीवनांत उतरविणें आपल्या पक्षीं अत्यंत आवश्यक होऊन बसलें आहे. आपल्याला सामर्थ्य हवें आहे, आपल्याला शक्तीची गरज आहे. आप-

त्याला सामर्थ्य कोण देईल? आपल्याला दुर्बल बनविणाऱ्या हजारो गोष्टी आहेत. आणि कथाहि आपण पुष्कळ वाचल्या आहेत. आपल्या पुराणांपैकी एखादें जरी घेतलें तरी जगांतील तीनचतुर्थांश ग्रंथालयें भरतील इतक्या कथा त्यांतून निघतील. जें कांही आपल्या समाजाला दुर्बल बनवूं शकतें तें सर्व गेलीं हजार वर्षे आपल्याजवळ आहे. असें दिसतें की या काळांत आपल्या राष्ट्रीय जीवनाचें एकच एक ध्येय होतें आणि तें म्हणजे अधिकाधिक दुर्बल होणें हेंच होय. त्यामुळे आज आपली अवस्था एखाद्या असहाय किडयासारखी झाली आहे--ज्याची इच्छा असेल त्याने आपल्याला पायदळीं खुशाल तुडवावें! माझ्या मित्रांनो, माझा तुमच्याशीं रक्ताचा संबंध आहे, तुमच्या जीवनांत माझें जीवन आहे, तुमचा मृत्यु म्हणजे माझा मृत्यु आहे, म्हणून मला तुम्हांला सांगावयाचें आहे की आपल्याला हवें आहे सामर्थ्य, सामर्थ्य, केवळ सामर्थ्य. आणि उपनिषदें हीं अशा सामर्थ्याच्या मोठ्या खाणी आहेत. अखिल जगाला तेजस्वी बनविण्याचें सामर्थ्य त्यांच्यांत आहे; त्यांच्या योगाने सर्व जग चैतन्यमय व सामर्थ्यशाली करतां येईल, तें उत्साहाने भरून टाकता येईल. सर्व जातींच्या, सर्व पंथांच्या दीनदुब्रळ्या व दलित लोकांना जागृत करून तीं त्यांना ललकारून सांगतील की आपापल्या पायावर उभे राहा व मुक्त व्हा. मुक्ति वा स्वाधीनता--शारीरिक, मानसिक व आध्यात्मिक स्वाधीनता हींच उपनिषदांचीं घोषवाक्यें आहेत.

जगांतील सर्व शास्त्रांमधे हें असें एकच शास्त्र आहे की जें उद्धाराची (Salvation ची) शिकवण देत नाही, तर मुक्तीची शिकवण देतें. प्रकृतीच्या बंधनांतून मुक्त व्हा, दुर्बलतेपासून मुक्त व्हा! आणि हीं उपनिषदें तुम्हांला दाखवून देतात की ही मुक्ति तुमच्या ठायीं मूलतःच विद्यमान आहे. त्यांच्या शिकवणीचें हें आणखी एक वैशिष्टय आहे. तुम्ही द्वैतवादी असलांत तरी कांही हरकत नाही. तुम्हांला हें मान्य करावेंच लागेल की आत्मा हा स्वभावतः पूर्णस्वरूप आहे; कांही विशिष्ट कर्मांमुळे तो केवळ संकुचित झाला आहे. खरोखर रामानुजाचार्यांचें विस्तार व संकोच यांसंबंधीचें तत्त्व हें अगदी अलीकडच्या विकासवाद्यांच्या क्रमविकास व क्रमसंकोच यासंबंधीच्या तत्त्वाप्रमाणेच आहे. आत्मा जणु संकोच पावतो व त्याच्या शक्ति अव्यक्तावस्थेंत जातात;

आणि सत्कर्मांच्या व सद्विचारांच्या योगाने तो पुन्हा विकसित होऊन आपलें स्वाभाविक पूर्णत्व प्रकट करतो. अद्वैतमताप्रमाणे यांत एकच फरक आहे. तो असा की अद्वैतवादी प्रकृतीचा क्रमविकास मानतात, आत्म्याचा नव्हे. समजा की एक पडदा आहे व त्याला एक लहानसें छिद्र आहे. मी या पडद्यामागून या विराट सभेकडे पाहत आहें. मी येथील फक्त कांही थोडेच चेहरे पाहूं शकेन. समजा तें छिद्र मोठें झालें; तें जसजसें मोठें होईल तसतसा मला सभेचा अधिकाधिक भाग दिसूं लागेल, आणि तें मोठें होऊन जेव्हा पडद्याएवढें होईल तेव्हा मला सगळीच्या सगळी सभा दिसेल. त्या वेळीं तुम्ही आणि मी यांमध्ये कांहीहि राहणार नाही. या ठिकाणीं तुमच्यांत किंवा माझ्यांत कांहीहि बदल झाला नाही; सर्व बदल पडद्यामधेच झाला; प्रथमपासून अखेरपर्यंत तुम्ही होतां तेंच राहिलांत, फक्त पडद्यांतच बदल झाला. विकासवादासंबंधीं अद्वैत्यांचें हेंच मत आहे की प्रकृतीचा क्रमविकास होतो व आंत असलेला आत्मा अधिकाधिक अभिव्यक्त होतो. आत्म्याचा कशानेहि संकोच होऊं शकत नाही. तो अविकारी व अनंत आहे. त्याच्यावर जणु एक आच्छादन--मायेचें आच्छादन--असतें. मायेचें हें आवरण जसजसें विरळ होत जातें तसतसा आत्म्याचा अंगभूत व स्वाभाविक महिमा अधिकाधिक प्रकट होतो. हें एक महान् तत्त्व भारताकडून शिकण्याची जग अपेक्षा करीत आहे. जगांतील लोक कांहीहि म्हणोत, कितीहि फुशारकी मारोत, दिवसेंदिवस त्यांना हें कळेल की कोणताहि समाज हें तत्त्व मान्य केल्याविना टिकूं शकणार नाही. प्रत्येक क्षेत्रांत कसा बदल होत आहे हें तुमच्या ध्यानीं येत नाही काय ? तुम्हांला माहीत नाही काय की, कोणतीहि गोष्ट चांगली म्हणून सिद्ध होत नाही तोंपर्यंत ती वाईट आहे असें गृहीत धरण्याची पद्धति विद्यमान होती ? शिक्षण, गुन्हेगारांना शिक्षा, वेडयांवर उपचार, इतकेंच काय, साध्या रोगांवर उपचार, या सर्वच बाबतींत पूर्वी हाच नियम अमलांत आणला जाई. आधुनिक नियम काय सांगतात पाहा. शरीर हें स्वाभाविकपणें निरोगी आहे, तें स्वतःच रोगनिवारण करीत असतें; औषध फक्त शरीरांतील चांगल्या गोष्टी जतन करण्यास साहाय्यभूत होऊं शकतें. गुन्हेगाराविषयी ते नियम काय सांगतात पाहा. हे नियम असें गृहीत धरतात की गुन्हेगार

कितीहि पतित असो, त्याच्यांत दैवी अंश हा आहेच, तो कोठे जात नाही; याकरिता गुन्हेगारांना याच दृष्टीने वागविलें पाहिजे. जुन्या सर्व गोष्टी आता बदलत आहेत; आणि गुन्हेगारांना वळण लावून सुधारणाऱ्या संस्था निर्माण होत आहेत. अन्य बाबतींतहि असेंच घडून येत आहे. प्रत्येक व्यक्तीमधील दैवी अंशाची भारतीय कल्पना कळत न कळत अन्य देशांतहि आपोआप प्रकट होत आहे. आणि तुमच्या शास्त्रांत असलेलें या गोष्टीचें स्पष्टीकरण अन्य राष्ट्रांना मान्य करावेंच लागेल. माणसामाणसांच्या परस्पर वागणुकींत आमूलाग्र बदल होणार आहे, आणि मानवजातीचें दौर्बल्य दाखवून देणाऱ्या जुनाट कल्पना लुप्त होणार आहेत. या शतकांतच त्या नष्ट होणार आहेत. आज लोक आपल्यावर कदाचित् टीका करतील. जगांत पापाचें अस्तित्व नाही या सैतानी कल्पनेचा प्रचार करणारा असें म्हणून जगाच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत माझ्यावर टीका झालेली आहे! ठीक आहे! मीं पापाचा प्रचार केला नाही तर सद्गुणाचाच प्रचार केला म्हणून याच लोकांचे वंशज मला धन्यवाद देतील. मी सद्गुणाचा प्रचारक आहें, पापाचा नाहीं. तमाचा प्रचार न करतां मीं प्रकाशाचा प्रचार करतों, आणि यांत मला धन्यता वाटते.

आपल्या उपनिषदांतून जगाला दुसरी एक महत्त्वाची कल्पना घ्यावयाची आहे, ती म्हणजे विश्वाच्या एकतेची होय. एका वस्तूला दुसऱ्या वस्तूपासून किंवा एका व्यक्तीला दुसऱ्या व्यक्तीपासून वेगळ्या वा पृथक् करणाऱ्या जुनाट रेषा आता वेगाने नाहीशा होत आहेत. वीज व वाफ यांचें सामर्थ्य जगांतील भिन्न विभागांना परस्परांशीं संबद्ध करीत आहे. परिणामतः हिंदुलोक आता असें म्हणत नाहीत की आपल्या देशाव्यतिरिक्त इतर ठिकाणीं केवळ राक्षस वा भुतेंखेतें वास करीत आहेत; तसेंच ख्रिस्ती देशांतील लोकहि आता असें म्हणत नाहीत की भारत हा नरमांस भक्षण करणाऱ्या रानटी लोकांचा देश आहे. आपण आपल्या देशांतून बाहेर पडतों तेव्हा आपल्याला आपल्या देशांतल्यासारखेच बांधव इतरत्रहि आढळतात, आपल्याला मदत करण्याकरिता ते सिद्ध असतात, त्यांच्या तोंडीं उत्साह देणारी भाषा असते; आणि कित्येकदा आपल्या जन्मभूमींतील लोकांपेक्षाहि त्यांच्यांत जास्त सौजन्य आढळतें. ते येथे येतात तेव्हा त्यांनाहि अशीच बंधुता, सहानु-

भूति व उत्साहाचे शब्द अनुभवास येतात. आपलीं उपनिषदें सांगतात की सर्व दुःखाचें मूळ अज्ञान हेंच आहे; आणि तें पूर्णपणें खरें आहे; जीवनांतील सामाजिक वा आध्यात्मिक अशा प्रत्येक क्षेत्रांत तें खरें असल्याचें आपल्या प्रत्ययास येतें. अज्ञानामुळेच आपण एकमेकांचा द्वेष करतों व अज्ञानामुळेच आपल्याला परस्परावर प्रेम करतां येत नाही. आपल्याला परस्परांचें जेव्हा खरें ज्ञान होईल तेव्हा प्रेमभाव जरूर निर्माण होईल, कारण आपण एकच नाहीं काय? यावरून असें दिसतें की संपूर्ण जगाचें ऐक्य आपोआप निर्माण होत आहे. राजकीय व सामाजिक क्षेत्रांतहि वीस वर्षांपूर्वी राष्ट्रीय मानल्या गेलेल्या समस्या या आज केवळ राष्ट्रीय भूमिकेवरून सोडवितां येत नाहीत. त्यांना व्यापक व विशाल स्वरूप प्राप्त होत आहे. आंतरराष्ट्रीय अशा व्यापक भूमिकेवरूनच त्या सुटण्याची आता शक्यता आहे. आंतरराष्ट्रीय संघटना, आंतरराष्ट्रीय ऐक्य, आंतरराष्ट्रीय कायदे हींच वर्तमान युगाचीं घोषवाक्यें आहेत. यावरून समग्र जगाच्या एकत्वाचा प्रत्यय येतो. तसेंच वैज्ञानिक क्षेत्रांत जडद्रव्याच्या अशाच व्यापक कल्पना उदयास येत आहेत. सर्व विश्व हें एकजिनसी जड द्रव्य आहे असें आजचे वैज्ञानिक म्हणतात; हें विश्व म्हणजे जडद्रव्याचा एक महासागरच असून मी, तुम्हीं, सूर्य, चंद्र आदि सर्वकांही या महासागरांतील लहान लहान भोवऱ्यांप्रमाणे आहे, याहून अधिक कांही नाही. मानसिक दृष्टीने पाहिलें असतां हें विश्व म्हणजे महान् विचारसमुद्र आहे आणि त्यांत तुम्ही व मी असेच विचारांचे लहान लहान भोवरे आहोंत. आणि आत्म्याच्या दृष्टीने पाहिल्यास सर्व विश्व म्हणजे अचल अविकारी अशी सत्ता आहे. हें विश्व म्हणजे अविकारी, अखंड, एकरस, एकमेवाद्वितीय असा आत्माच आहे. जगाच्या नीतिविषयक अपेक्षा मोठ्या प्रमाणावर ऐकूं येत आहेत, आणि आपल्या ग्रंथांच्या साहाय्याने त्या पूर्ण करतां येतील. नीतीचें स्पष्टीकरण, नीतीचा पाया आज जगाला हवा आहे, आणि तो आपल्या ग्रंथांत प्राप्त होऊं शकेल.

आपल्याला भारतांत काय हवें आहे? जर परकीयांना या गोष्टी हव्या असतील, तर आपल्याला त्या वीसपट जास्त आवश्यक आहेत; कारण आपलीं उपनिषदें कितीहि थोर असलीं, आपण ऋषींचे वंशज

आहोंत असा आपल्याला कितीहि गर्व वाटला तरीहि मला हें सांगितलें पाहिजे की अन्य जातींशीं तुलना करतां आपण फार दुर्बल आहोंत. प्रथमतः आपण शरीराने दुर्बल आहोंत. आपलें हें शारीरिक दौर्बल्य निदान आपल्या एकतृतीयांश दुःखांचें कारण आहे. आपण आळशी आहोंत, आपण काम करूं शकत नाहीं; आपण एकत्र येऊन कार्य करूं शकत नाहीं, परस्परावर आपण प्रेम करूं शकत नाहीं; आपण अत्यंत स्वार्थी आहोंत, आपल्यापैकी तीन जण जरीं एकत्र आले तरी ते परस्परांचा द्वेष करतील, मत्सर करतील. आपली सध्याची अवस्था ही अशी आहे. आपल्यांत मुळीच एकोपा नाही, आपली स्वार्थबुद्धि शिगेला पोहोचली आहे, कपाळावर गंध आडवें लावावें की उभें या गोष्टीसाठी आपण गेलीं शेकडों वर्षें परस्पराशीं भांडत आहोंत, एखाद्याच्या नजरेने माझें अन्न दूषित होईल काय, यासारख्या अत्यंत महत्त्वाच्या (!) गोष्टी-वर आपण मोठमोठे ग्रंथ लिहीत आहोंत ! ह्या गोष्टी आपण गेलीं कांही शतकें करीत आलों. असल्या सुंदर (!) व महत्त्वाच्या (!) विषयांचें संशोधन करण्यांत ज्यांचें सर्व बौद्धिक सामर्थ्य खर्ची पडलें आहे अशा जातींकडून आपण कोणतीहि उच्च अपेक्षा करूं शकत नाहीं. आणि आपल्याला स्वतःची कांहीच लाज वाटूं नये काय ? होय, कधी कधी लाज वाटतेहि, परंतु या गोष्टी क्षुद्र आहेत असें समजूनहि आपल्याला त्या टाळतां येत नाहीत. आपण पोपटाप्रमाणे पुष्कळ गोष्टी बोलतों, पण त्या प्रत्यक्ष करीत नाहीं; केवळ बोलणें व कांहीच न करणें ही आपली सवयच होऊन बसली आहे. याचें कारण काय ? शारीरिक दौर्बल्य हेंच याचें कारण होय. दुर्बल मेंदू कांहीच करूं शकत नाही; आपण तो बल-वान केला पाहिजे. प्रथम आपली तरुण पिढी सशक्त बनली पाहिजे. धर्म नंतरची बाब आहे. माझ्या तरुण मित्रांनो, सामर्थ्यसंपन्न व्हा. हा माझा तुम्हांला उपदेश आहे. गीतेच्या अध्ययनापेक्षा फुटबॉल खेळून तुम्ही स्वर्गाच्या अधिक निकट जाऊं शकाल. हे धाडसाचे शब्द आहेत; पण तुमच्यावर माझें प्रेम असल्याने मीं हें तुम्हांला सांगितलें आहे. चूक कोठे होत आहे हें मला दिसतें. मला थोडाफार अनुभव आलेला आहे. तुमचें शरीर चांगलें सुदृढ झाल्यावर गीता तुम्हांला अधिक चांगली कळेल. तुमच्या शरीरांतील रक्त थोडें शक्तिशाली झालें म्हणजे भगवान श्रीकृष्णा-

ची अलौकिक प्रतिभा व अपार सामर्थ्य यांचें तुम्हांला अधिक चांगलें आकलन होईल. तुमचें शरीर मजबूत होऊन आपण 'मनुष्य' आहोंत अशी तुम्हांला जाणीव झाली म्हणजे तुम्हांला उपनिषदांचें मर्म व आत्म्याचा महिमा अधिक चांगल्या रीतीने कळेल. अशा रीतीने उपनिषदांची शिकवण आपल्या गरजेनुरूप आपण प्रत्यक्ष कार्यांत उतरविली पाहिजे.

मी अद्वैतवादाचा प्रचार करतों म्हणून लोकांना पुष्कळवेळां उबग वाटतो. अद्वैतवादाचा, द्वैतवादाचा वा अन्य कोणत्याहि वादाचा प्रचार करण्याचा माझा हेतु नाही. आज आपल्याला एकच 'वाद' वा तत्त्व समजून घेतलें पाहिजे. तें म्हणजे आत्म्याविषयीचें अपूर्व तत्त्व होय--आत्म्याच्या अनंत शक्तीचें, अनंत सामर्थ्याचें, अनंत पावित्र्याचें, आणि अनंत पूर्णतेचें तत्त्व होय. मला अपत्य असतें तर त्याच्या जन्मापासून मीं त्याला हें सांगितलें असतें की, 'त्वमसि निरंजनः'--'तूं तें शुद्ध आत्मतत्त्व आहेस.' पुराणांतील मदालसा राणींची सुंदर कथा तुम्हीं वाचलेली असेल; तिला मूल झालें तेव्हा तिने आपल्या हाताने त्याला पाळण्यांत ठेवलें व झोके देत ती गाऊं लागली, "त्वमसि निरंजनः"--तूं शुद्ध, निर्मल, निष्पाप, शक्तिशाली आणि महान् असें आत्मतत्त्व आहेस. या कथेंत मोठा आशय आहे. आपण मोठे आहोंत अशी भावना ठेवा म्हणजे तुम्ही मोठे व्हाल. 'सर्व जगांत भ्रमण करून मीं कोणता अनुभव मिळविला' असा मला प्रश्न विचारण्यांत येतो. इंग्रज लोक 'पाप', 'पापी' इत्यादि गोष्टींविषयी कांहीहि बोलोत पण ते स्वतःला जर खरोखरच पापी समजत असते, तर त्यांची अवस्था मध्य आफ्रिकेंतील निग्रोंहून वेगळी राहिली नसती. ईश्वरकृपेने त्यांचा असा विश्वास नाही. याउलट इंग्रज लोकांचा असा विश्वास असतो की ते जगावर राज्य करण्यासाठी जन्मले आहेत. 'आपण मोठे आहोंत व आपण हवें तें करूं शकतों' असा त्यांचा विश्वास असतो. इच्छा झाल्यास आपण चंद्रावर वा सूर्यावर जाऊं शकूं असा त्यांचा विश्वास असतो; आणि त्यामुळेच ते महान् बनले आहेत. आपण क्षुद्र पापी आहोंत व आपल्याला अनंत काळ नरकाग्नींत पडून राहावें लागेल या ख्रिस्ती धर्मगुरूंच्या उपदेशांवर त्यांनी विश्वास ठेवला असता, तर आजचा मोठेपणा त्यांना लाभला नसता. याचप्रमाणे प्रत्येक देशांत मला दिसून येतें की धर्मगुरु कांहीहि सांगोत व लोक

खुळचट समजुतींच्या कितीहि आहारीं गेलेले असोत, त्यांच्या हृदयांतला दैवी अंश कधीच लोप पावत नाही, तो प्रकट होतोच होतो. आपण श्रद्धा गमावून बसलों आहोंत. इंग्रज स्त्री-पुरुषाहून आपली श्रद्धा कमी आहे, सहस्रपटीने कमी आहे असें मीं म्हटलें तर तुमचा त्यावर विश्वास बसेल काय ? मी तुम्हांला हें स्पष्ट सांगत आहें, तसें सांगितल्यावांचून मला राहवत नाही. इंग्रज स्त्री-पुरुषांना जेव्हा आपले आदर्श कळतात तेव्हा ते कसे वेडावून जातात, आणि जरी ते राज्यकर्ते आहेत तरी तुमचा धर्म सांगण्याकरिता ते येथे येतात--मग त्यांच्या देशबांधवांकडून त्यांचा कितीहि उपहास होवो, कितीहि निंदा होवो--हें तुम्हांला दिसत नाही काय ? तुमच्यापैकी कितीजण असें करूं शकतील ? आणि तुम्ही असें कां करूं शकत नाही ? तुम्हांला ज्ञान नाही हें याचें कारण आहे काय ? त्यांच्यापेक्षा तुम्हांला जास्त ज्ञान आहे; तुमच्या कल्याणासाठी जेवढें आवश्यक आहे त्यापेक्षा तुम्हांला जास्तच ज्ञान आहे हीच खरी अडचण आहे ! याचें अगदी साधें कारण हें की तुमचें रक्त पाण्यासारखें आहे, तुमचा मेंदू कुजलेला आहे, तुमचें शरीर दुर्बल आहे ! तुम्हांला शरीराची ही अवस्था बदलली पाहिजे. शारीरिक दौर्बल्य हें खरें कारण आहे, दुसरें कांही नाही. तुम्ही सुधारणा, ध्येयवाद, यांबद्दल गेलीं शंभरवर्षें बोलत आहांत. पण प्रत्यक्ष कृतीची वेळ आली की तुमचें कुठे तोंडहि दिसत नाही. त्यामुळे सर्व जगाला तुमच्या वागणुकीचा उबग आला आहे आणि सुधारणा हा शब्दच चेष्टेचा विषय बनला आहे ! याचें कारण काय ? तुम्हांला काय ज्ञान नाही ? तुम्हांला तर फार जास्त ज्ञान आहे. याचें एकमेव कारण हेंच की तुम्ही दुर्बल आहांत, अत्यंत दुर्बल आहांत. तुमचें शरीर दुर्बल आहे, तुमचें मन दुर्बल आहे, तुमच्या ठायीं आत्मविश्वास नाही. बंधूंनो, शतकानुशतकें वरच्या जातींच्या लोकांचे जुलूम, राजे व परकीय यांचे जुलूम, तुमच्याच लोकांचे जुलूम या साऱ्यामुळे तुमची सर्व शक्ति नष्ट होऊन गेली आहे. तुमचा कणाच मोडला आहे, पायदळीं तुडविल्या जाणाऱ्या किड्याप्रमाणे तुमची अवस्था झाली आहे. तुम्हांला सामर्थ्य कसें मिळेल ? आपल्याला सामर्थ्य हवें आहे, बल हवें आहे हें मी तुम्हांला सांगतों. आणि सामर्थ्य मिळविण्याचा पहिला उपाय हाच की उपनिषदांवर श्रद्धा ठेवा आणि 'मी आत्मा आहें, मला तरवार

कापूं शकत नाहीं, शस्त्रें भेदूं शकत नाहीत, अग्नि जाळूं शकत नाही, वारा सुकवूं शकत नाही, मी सर्वशक्तिमान आहें, मी सर्वज्ञ आहें' असा विश्वास बाळगा. उद्धार करणाऱ्या व कल्याणप्रद अशा या मंत्राचा जप करा. 'आम्ही दुर्बल आहोंत' असें म्हणूं नका; आपण सर्वकांही करूं शकतों. आपण काय करूं शकणार नाहीं? आपण सर्वकांही करूं शकतों. आपणां सर्वांच्या ठायीं तोच महान् आत्मा वसत आहे. आपण यावर श्रद्धा ठेवूं या. नचिकेत्यासारखी श्रद्धा असूं द्या. पित्याने केलेल्या यज्ञाच्या वेळीं नचिकेत्याच्या मनांत श्रद्धा उत्पन्न झाली. माझी ही इच्छा आहे की ही श्रद्धा तुमच्यापैकी प्रत्येकाच्या मनांत उत्पन्न होवो आणि तुमच्यापैकीं प्रत्येकजण आपल्या प्रचंड बुद्धिमत्तेने जगाला हलवून सोडणारा महापुरुष होवो--सर्वप्रकारें अनंत अशा ईश्वराप्रमाणे होवो. तुम्ही असें व्हावें असें मला वाटतें. उपनिषदांमधून तुम्हांला हें असें सामर्थ्य लाभेल, ही अशी श्रद्धा प्राप्त होईल.

लोक म्हणतात की उपनिषदें हीं केवळ संन्याशांकरिताच आहेत! तीं गूढ विद्या आहे! अरण्यवासी संन्यासीच उपनिषदांची चर्चा करीत! शंकराचार्यांनी थोडेसें दयाळू होऊन सांगितलें, "गृहस्थहि उपनिषदांचा अभ्यास करूं शकतात. त्यामुळे त्यांचें हितच होईल, अनिष्ट कांही होणार नाही." परंतु अद्यापहि 'उपनिषदें हीं अरण्यांत राहणाऱ्या विरक्तांच्या जीवनाबद्दलच सांगतात' अशी लोकांची समजूत आहे. मीं तुम्हांला परवाच सांगितलें की, वेदांवरील एकच एक अधिकृत भाष्य एकदाच आणि नेहमीकरिता लिहिलें गेलें--तें म्हणजे ज्यांच्यापासून वेद निःसृत झाले त्याच भगवान श्रीकृष्णांनी उपदेशिलेली गीता हें होय. या गीतेंत प्रत्येक क्षेत्रांतील व्यक्तींकरिता वेदान्त उपदेशिला आहे. वेदान्ताचीं हीं तत्त्वें अरण्यांतच अडकून न पडतां तीं समाजांत आलीं पाहिजेत, तीं केवळ गुहेंत न राहतां न्यायालयांत, प्रार्थनामंदिरांत, गरिबांच्या झोपडींत प्रविष्ट झालीं पाहिजेत; मासे पकडणाऱ्या कोळ्यांपासून तों अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांपर्यंत तीं सर्वत्र पोहोचलीं पाहिजेत. प्रत्येक स्त्री-पुरुष, बालक-बालिका, मग त्यांचा व्यवसाय कोणताहि असो व ते कोठेहि असोत, त्या सर्वांसाठी वेदान्त उपयुक्त आहे. आणि भ्यावयाचें कशासाठी? एखादा कोळी किंवा त्यासारखे इतर लोक उपनिषदांतील

आदर्श आचरणांत कसे आणणार ? त्यासाठी उपनिषदांत मार्ग दाखविलेला आहे. मार्ग अनंत आहेत; धर्महि अनंत आहे; त्याच्या बाहेर कोणी जाऊं शकत नाही; आणि तुम्ही प्रामाणिकपणें जें कराल तें तुमच्या हिताचेंच होईल. अगदी लहानसें कर्म जरीं चांगल्या रीतीने केलें तरी त्याचे परिणाम फार चांगले होतात. म्हणून जें कांही थोडें जमेल तें प्रत्येकाने केलें पाहिजे. आपण आत्मरूप आहोंत असा विचार कोळ्याने केला तर तो अधिक चांगला कोळी होईल, विद्यार्थ्याने असा विचार केला तर तो अधिक चांगला विद्यार्थी होईल, वकिलाने जर असा विचार केला तर तो अधिक चांगला वकील होईल. याचप्रमाणे सर्वांच्या बाबतींत घडून येईल. आणि परिणामतः व्यवसायात्मक जाति नित्य राहतील; समाजाचें व्यवसायात्मक वर्गांतून विभाजन होणें अगदी स्वाभाविक आहे. मग यामुळे नष्ट काय होईल ?—विशेषाधिकार नष्ट होतील. जातिव्यवस्था निसर्गास धरून आहे; समाजजीवनांत मी एकप्रकारचें काम करूं शकतों; तुम्ही दुसऱ्या प्रकारचें करूं शकतां; तुम्ही देशाचें राज्य चालवूं शकतां, आणि मी पादत्राणें दुरुस्त करूं शकतों; पण त्यामुळे माझ्याहून तुम्ही श्रेष्ठ कसे ठरणार ? कारण, तुम्ही माझीं पादत्राणें दुरुस्त करूं शकाल काय ? मी देशाचें राज्य चालवूं शकेन काय ? मला पादत्राणें चांगलीं दुरुस्त करतां येतात, तुम्ही वेदपठन चांगलें करूं शकतां; पण त्यामुळे तुम्हीं मला आपल्या पायाखाली कां तुडवावें ? तुम्हीं खून केला तरी तुमची स्तुति व्हावी काय ? आणि मीं एखादें फळ चोरलें तर मला मात्र मृत्युदंड व्हावा काय ? हा प्रकार थांबला पाहिजे. जातिव्यवस्था चांगली आहे. जीवनाचे प्रश्न सोडविण्याचा तो एकमेव नैसर्गिक उपाय आहे. लोकांचे अशा प्रकारें विभाग पडणारच; तुम्हांला ते टाळतां येणार नाहीत. जेथे तुम्ही जाल तेथे असा जातिविभाग राहीलच. पण याचा अर्थ असा नाही की कांही जातींना विशेषाधिकार असावेत. हे विशेषाधिकार समूळ नष्ट झाले पाहिजेत. एखाद्या कोळ्याला तुम्ही वेदान्त शिकवाल तर तो म्हणेल की मी तुमच्या इतकाच चांगला मनुष्य आहें; मी कोळी आहें, तर तुम्ही तत्त्वज्ञ आहांत; पण तुमच्याप्रमाणेच माझ्याहि हृदयांत ईश्वराचें वास्तव्य आहे. आणि आपल्याला नेमकें हेंच हवें आहे. कोणालाहि विशेषाधिकार नकोत, सर्वांना समान

संधि हवी. प्रत्येकाला शिकविलें पाहिजे की ईश्वर त्याच्या हृदयांत आहे, आणि मग प्रत्येकजण स्वतःची मुक्ति स्वतःच साधून घेईल.

स्वातंत्र्य ही विकासासाठी पहिली आवश्यक गोष्ट आहे. जर तुमच्यापैकी एखादा असें म्हणेल की मी अमुक स्त्रीचा किंवा अमुक मुलाचा मोक्ष साधून देईन, तर तें सर्वस्वीं चूक आहे. मला वारंवार विचारण्यांत येतें की, विधवा स्त्रियांच्या प्रश्नाबद्दल, वा एकूण स्त्रियांच्या समस्यांबद्दल आपणांस काय वाटतें? अशा प्रश्नाला माझें एकच उत्तर असें की—'मी काय विधवा आहें की म्हणून तुम्ही मला असा मूर्खपणाचा प्रश्न विचारतां? मी काय स्त्री आहें की म्हणून तुम्हीं हा प्रश्न पुनःपुनः मला विचारीत असतां?' स्त्रियांचे प्रश्न सोडविणारे तुम्ही कोण? तुम्ही काय सर्वशक्तिमान् ईश्वर आहांत, म्हणून तुम्हीं विधवांवर व स्त्रियांवर अशा रीतीने अधिकार गाजवावा? तुम्ही दूर व्हा, त्यांच्यासंबंधीचे प्रश्न त्याच सोडवितील. हे अत्याचाऱ्यांनो, तुम्ही सर्वांसाठी सर्वकांही करूं शकतां असें तुम्हांला वाटतें काय? दूर व्हा, ईश्वर सर्वांची काळजी घेईल. आपल्याला सर्वकांही कळतें असें समजणारे तुम्ही कोण आहांत? हे ईश्वरनिंदकांनो, ईश्वरावर आपला अधिकार आहे असें तुम्हांला कसें वाटतें? प्रत्येक जीव हा परमात्म्याचें स्वरूप आहे हें तुम्हांला माहीत नाही काय? तुम्ही केवळ आपल्या स्वतःच्या कर्माकडे लक्ष द्या. तुमच्या शिरावर कर्माचें भलें मोठें ओझें आहे. तुमचा देश तुम्हांला मोठ्या मानाचें स्थान देवो, समाज तुमची हवी तेवढी स्तुति करो, आणि मूर्ख लोक तुमच्यावरून दिवे ओवाळोत; पण ईश्वर झोपलेला नाही, तुमच्या कर्माचें प्रायश्चित्त तुम्हांला निश्चित मिळेल, मग तें इहलोकीं मिळो की परलोकीं मिळो.

प्रत्येक स्त्रीपुरुषाकडे, सर्वांकडे ते सारेजण ईश्वराचीं रूपें आहेत या दृष्टीने पाहा. तुम्ही कोणालाहि साहाय्य करूं शकत नाही, तुम्ही केवळ सेवा करूं शकतां; ईश्वराच्या या लेकरांची सेवा करा; जर तुमचे सद्-भाग्य असेल तर स्वयं ईश्वराची सेवा करा. ईश्वराच्या कृपेने जर त्याच्या एखाद्या संतानाला तुम्ही साहाय्य करूं शकलां तर तुम्ही स्वतःला धन्य माना. स्वतःबद्दल अवास्तव कल्पना करून घेऊं नका. इतर कुणाला न मिळतां सेवा करण्याचा हा अधिकार तुम्हांला मिळाला, म्हणून तुम्ही

धन्य आहांत. केवळ 'पूजा' या भावनेने ही सेवा करा. मला गरिबांमधे परमेश्वर पाहतां आला पाहिजे, आणि माझ्या मोक्षप्राप्तीकरिता मीं त्यांच्याकडे जाऊन त्यांची पूजा केली पाहिजे. गरीब आणि दुःखी लोक हे आपल्या मुक्तीकरिता आहेत. रुग्ण, वेडा, कुष्ठपीडित आणि पतित यांच्या रूपाने आपल्यासमोर आलेल्या ईश्वराची आपल्याला सेवा करतां यावी यासाठीच हे लोक आहेत. माझें बोलणें धाडसाचें आहे, पण मी तुम्हांला पुनः सांगतों की या सर्व रूपांत आपल्याला ईश्वराची सेवा करावयास मिळणें हेंच आपल्या जीवनांतील सर्वांत मोठें सद्भाग्य आहे. दुसऱ्यावर अधिकार चालवून आपण त्यांचें हित करूं शकतों ही कल्पना सोडून द्या. एखाद्या रोपाच्या बाबतींत तुम्ही जेवढें करूं शकाल तेवढेंच तुम्ही परहिताच्या बाबतींतहि करूं शकाल. वाढत्या अंकुराच्या पुष्टी-साठी आवश्यक असलेल्या गोष्टींची तुम्ही तरतूद करूं शकाल; त्याला हवी असलेली माती, पाणी, हवा तुम्ही मिळवून देऊं शकाल; मग तो अंकुर आपल्या प्रकृतीनुसार आवश्यक तें सर्वकांही ग्रहण करील आणि तें आत्मसात् करून आपल्या स्वभावानुसार तो वाढेल.

या जगांत ज्ञानाचा प्रकाश पसरवा. प्रकाश पसरवा, प्रकाश पसरवा! प्रत्येकाला ज्ञानाचा प्रकाश मिळूं द्या; प्रत्येकजण ईश्वराप्रत पोहोचेपर्यंत हें कार्य चालूं द्या. गरीब लोकांना ज्ञानाचा प्रकाश द्या, आणि धनिकांना अधिक प्रकाश द्या, कारण गरिबांपेक्षा त्यांना त्याची अधिक जरूरी आहे. अशिक्षित लोकांना ज्ञानाचा प्रकाश द्या; आणि सुशिक्षितांना तो अधिक द्या, कारण आजकाल शिक्षणाविषयीचा आपला व्यर्थ अभिमान फार प्रबळ झालेला आहे. याप्रमाणे सर्वांपर्यंत ज्ञानाचा प्रकाश पोहोचवा व उर्वरित कार्य भगवंतावर सोपवा, कारण भगवंतांनीच सांगितलें आहे की, "तुम्हांला कर्म करण्याचाच अधिकार आहे, त्याच्या फलावर तुमचा अधिकार नाही." "तुम्ही अशा रीतीने कर्म करा की जेणेंकरून तुम्हांला त्याचें फल भोगावें लागणार नाही. पण याचबरोबर तुम्ही कर्मत्यागहि करूं नका."

ज्याने अनेक युगांपूर्वी आपल्या पूर्वजांना अशा उदात्त तत्त्वांची शिकवण दिली, तोच आपल्याला त्याचे आदेश आचरणांत आणण्या-साठी बल देवो!

---

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ........ वि: ........
क्रमांक ........ नों: दि: ........

# भारतांतील महापुरुष

( मद्रास येथे दिलेलें व्याख्यान )

भारतांतील महापुरुषांविषयी बोलत असतां माझें मन अशा कालखंडांत प्रवेश करतें की ज्याची नोंद इतिहासांत नाही, व परंपरागत दंतकथा ज्या काळाच्या उदरांतील रहस्यें बाहेर काढण्यास असमर्थ ठरतात. भारतांत असंख्य महापुरुष होऊन गेलेले आहेत, कारण या हिंदु जातीने गेलीं हजारो वर्षें असे महापुरुष निर्माण करण्याशिवाय दुसरें कोणतें कार्य केलें आहे ? म्हणून त्यांच्यापैकी कांही अत्यंत श्रेष्ठ व युगप्रवर्तक अशा महापुरुषांचीं जीवनें घेऊन, त्यांच्याविषयी मीं जें अध्ययन केलें आहे त्याचें सार मी तुमच्यापुढे मांडणार आहें.

प्रथमत: आपण आपल्या शास्त्रग्रंथाविषयी थोडी माहिती करून घेतली पाहिजे. आपल्या शास्त्रांत दोन प्रकारचीं सत्यें सांगितलेलीं आहेत; पहिल्या प्रकारचीं सत्यें हीं सनातन स्वरूपाचीं आहेत, दुसऱ्या प्रकारचीं सत्यें तितकीं प्रमाणभूत नसलीं तरी विशिष्ट परिस्थितींत, विशिष्ट स्थळीं व विशिष्ट काळीं तीं बंधनकारक आहेत. जीवात्मा व परमात्मा यांचें स्वरूप व त्यांच्यामधील परस्परसंबंध यांविषयींचे नित्य स्वरूपाचे सिद्धान्त 'श्रुतीं'त वा वेदग्रंथांत ग्रथित केले आहेत. दुसऱ्या प्रकारच्या सत्यांना आपण 'स्मृति' म्हणतों. हीं सत्यें मनु, याज्ञवल्क्य व अन्य स्मृतिकारांच्या ग्रंथांत आणि पुराणांमधे व तंत्रांमधे सांगितलेलीं आहेत. स्मृतींचें प्रामाण्य श्रुतीच्या तुलनेने दुय्यम प्रतीचें आहे. अर्थात् जेव्हा स्मृतींचा श्रुतीवचनांशीं विरोध येईल, तेव्हा श्रुतिवचनच प्रमाण मानलें जाईल. हाच सामान्य नियम आहे. मनुष्याचें ध्येय व भवितव्य यांविषयीचे सर्व मुख्य सिद्धान्त वेदांतून सांगितलेले असून स्मृतिग्रंथ व पुराणें यांच्याकडे बारीकसारीक तपशिलाच्या गोष्टींचें वर्णन करण्याचें कार्य सोपविलेलें आहे. सर्वसामान्य मार्गदर्शन म्हणून श्रुतिग्रंथ पुरेसे आहेत; आध्यात्मिक जीवनाविषयी यापेक्षा अधिक कांही सांगतां येण्यासारखें नाही व अधिक कांहीं जाणतां येण्यासारखें नाही. यासंबंधी जें कांही ज्ञान आवश्यक आहे तें सर्वच या श्रुतींमधे दिलेलें आहे. जीवात्म्याला पूर्णत्वाप्रत नेण्या-

साठी जो उपदेश आवश्यक आहे तो श्रुतिग्रंथांनी पूर्णपणें दिलेला आहे; केवळ तपशिलाच्या गोष्टी शिल्लक राहिल्या होत्या, आणि त्या स्मृतिग्रंथांनी वेळोवेळीं आपल्यापुढे मांडलेल्या आहेत.

श्रुतींचें दुसरें वैशिष्टय असें की या श्रुतिग्रंथांतील सत्यांची नोंद करून ठेवणारे पुष्कळ ऋषि आहेत; त्यांच्यापैकी बहुतेकजण पुरुष असून, कांही स्त्रियाहि आहेत. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाविषयी, त्यांच्या जन्मकालाविषयी व त्यांच्या जीवनासंबंधीच्या इतर गोष्टींविषयी फारच थोडी माहिती उपलब्ध आहे, पण त्यांचे सर्वोत्कृष्ट विचार किंवा त्यांचीं सर्वोत्कृष्ट संशोधनें मात्र आपल्या देशाच्या पवित्र अशा वेदवाङ्मयांत लिपिबद्ध केलेलीं असून तीं सुरक्षित आहेत. याउलट स्मृतिग्रंथांत महापुरुषांचीं जीवनें व त्यांचीं कार्यें यांचेंच अधिक वर्णन आढळतें. अद्भुत, महाशक्तिशाली, प्रभावी व जग हलवून सोडणाऱ्या व्यक्ति स्मृतिग्रंथांतच आपल्याला पहिल्यांदा आढळतात. आणि कधीकधी त्यांच्या उपदेशांपेक्षाहि त्यांचें व्यक्तिमत्त्वच आपल्याला अधिक श्रेष्ठ वाटतें.

आपण आपल्या धर्माचें हें वैशिष्टय समजून घेतलें पाहिजे की आपल्या धर्माने उपदेशिलेला ईश्वर हा निर्गुण व सगुण दोन्ही स्वरूपाचा आहे. आपल्या धर्मांत व्यक्तित्वाच्या अतीत असलेल्या निर्गुण ब्रह्माविषयी कितीतरी सिद्धान्त सांगितले आहेत, आणि त्याबरोबरच कितीतरी व्यक्तींचें अर्थात् महापुरुषांचेंहि त्यांत वर्णन आहे. परंतु आपल्या धर्माचें उगमस्थान ज्या श्रुति किंवा वेद, त्यांत मात्र व्यक्तित्वाच्या अतीत असलेल्या सनातन ब्रह्मतत्त्वाचाच उपदेश आहे; विशिष्ट व्यक्तींचीं —अवतारांचीं वा महापुरुषांचीं वर्णनें हीं स्मृतिग्रंथांत व पुराणांत आलेलीं आहेत. आणि आपण हेंहि लक्षांत ठेवलें पाहिजे की आपल्या धर्माव्यतिरिक्त इतर सर्व धर्म हे विशिष्ट व्यक्तींवर, म्हणजेच धर्मसंस्थापकांच्या जीवनावर आधारलेले आहेत. ख्रिस्ती धर्म हा येशू ख्रिस्तांच्या, इस्लाम धर्म हा महंमदांच्या, बौद्धधर्म हा बुद्धदेवांच्या, आणि जैनधर्म हा जिनांच्या जीवनावर उभारलेला आहे. म्हणून हें स्वाभाविकच आहे की या धर्मसंस्थापकांच्या जीवनासंबंधीच्या ऐतिहासिक प्रमाणांविषयी या धर्मांतून मोठमोठे कलह माजलेले दिसून येतात. जर का एखाद्या वेळीं या विशिष्ट धर्मसंस्थापकांच्या अस्तित्वाविषयीचीं ऐतिहासिक प्रमाणें

डळमळीत झालीं तर त्यांच्यावर उभारलेल्या धर्मांच्या इमारती कोसळून पडतात व त्यांचे तुकडे तुकडे होऊन जातात. आपण याप्रकारच्या संकटापासून बचावलों आहोंत, कारण आपला धर्म विशिष्ट व्यक्तींच्या जीवनावर आधारलेला नसून सनातन तत्त्वांवर आधारलेला आहे. तुम्ही आपल्या धर्माचे आदेश मानतां ते एखाद्या ऋषीने सांगितले आहेत म्हणून नव्हे, किंबहुना एखाद्या अवताराने सांगितले आहेत म्हणूनहि नव्हे. श्रीकृष्णांच्या वचनांमुळे वेदांचें प्रामाण्य सिद्ध होत नाही, तर वेदांवर आधारलेलीं असल्यामुळेच श्रीकृष्णांच्या वचनांचें प्रामाण्य सिद्ध होतें. श्रीकृष्णाची थोरवी हीच की ते वेदांचे सर्वश्रेष्ठ प्रचारक होते. इतर अवतारांच्या व महापुरुषांच्या बाबतींतहि हेंच खरें आहे. आपलें पहिलें तत्त्व असें आहे की पूर्णत्वाच्या प्राप्तीसाठी व मोक्षासाठी मनुष्याला जें जें म्हणून आवश्यक आहे, तें तें सर्व वेदांमधे ग्रथित केलेलें आहे. तुम्हांला त्या बाबतींत नवीन असें कांहीहि शोधून काढतां येणार नाही. सर्व ज्ञानाचें अंतिम लक्ष्य जें पूर्ण एकत्व त्याच्या पलीकडे तुम्ही जाऊं शकणार नाही; हें लक्ष्य वेदांनी केव्हाच गांठलें आहे. आणि त्याच्या पलीकडे जाणें शक्य नाही. ज्या वेळीं 'तत्त्वमसि' ('तें तूं आहेस') हें सत्य शोधून काढलें गेलें, तेव्हाच आध्यात्मिक ज्ञान पूर्णावस्थेला पोहोचलें, आणि हें सत्य वेदांनीच शोधून काढलें. त्यानंतर उरलें फक्त एवढेंच की, देश, काल व परिस्थिति यांच्या अनुरोधाने लोकांना वेळोवेळीं मार्गदर्शन करणें. त्या प्राचीन श्रेष्ठ मार्गावरून लोकांना नेण्याचें कार्य करावयाचें उरलें होतें, आणि त्याकरिता हे थोर आचार्य व महापुरुष आविर्भूत झाले. या गोष्टीचें श्रीकृष्णांनी गीतेमधे केलेल्या वर्णनाइतकें स्पष्ट व अचूक वर्णन कशानेच करतां येणार नाही. श्रीकृष्ण म्हणतात--

"यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।
अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ।।"

अर्थात् "ज्या ज्या वेळीं धर्माला अवकळा प्राप्त होते व अधर्म बळावतो त्या त्या वेळीं धर्मरक्षणासाठी मी जन्म घेत असतों; आणि अधर्माच्या नाशाकरिता मी युगांयुगांमधे आविर्भूत होत असतों." भारतीय धारणा ही अशी आहे.

यावरून काय सिद्ध होतें ? हेंच सिद्ध होतें की एका बाजूस हीं

नित्यस्वरूपाचीं तत्त्वें आहेत; तीं स्वयंसिद्ध आहेत, तर्कबुद्धीचाहि त्यांना आधार लागत नाही, ऋषींच्या, मग ते कितीहि थोर असोत, वचनांवर तीं अवलंबून नाहीत; तसेंच अवतारांच्याहि, मग ते कितीहि महान् असोत, शब्दांवर तीं अवलंबून नाहीत. भारताच्या या वैशिष्टचपूर्ण विचारसरणीमुळे आम्ही आग्रहपूर्वक म्हणूं शकतों की केवळ वेदान्तच सार्वजनीन धर्म होऊं शकेल; आजदेखील या जगांत तो सार्वजनीन धर्म म्हणून नांदत आहेच, कारण तो शाश्वत तत्त्वांचें प्रतिपादन करतो, व्यक्तींचें नाही. विशिष्ट व्यक्तीवर आधारलेला कोणताच धर्म सर्व मानवसमाजांना ग्रहण करतां येणार नाही. आपल्या देशांतहि आपल्याला आढळतें की कितीतरी सच्छील व्यक्ति होऊन गेल्या आहेत; एखाद्या लहानशा शहरांतहि भिन्न भिन्न मनोवृत्तीच्या लोकांना विभिन्न व्यक्ति आदर्श वाटत असतात. मग महंमद, बुद्ध किंवा ख्रिस्त यासारखी एखादी व्यक्ति अखिल जगाला आदर्श म्हणून कशी मानतां येईल? किंवा सर्व नीतिमत्ता, आध्यात्मिकता व धर्म ही अशा एकाच एका व्यक्तीच्या प्रामाण्यावर कशीं ग्राह्य मानलीं जाऊं शकतील! वेदान्तधर्माला अशा व्यक्तिप्रामाण्याची आवश्यकता वाटत नाही. मानवाचा शाश्वत स्वभाव हेंच त्याचें प्रामाण्य आहे, त्याचे नैतिक सिद्धान्त मानवजातीच्या शाश्वत आध्यात्मिक एकत्वावर आधारलेले आहेत; हें एकत्व प्रयत्नाने मिळवावयाचें नसून तें आधीचेंच अस्तित्वांत आहे.

दुसऱ्या बाजूस आपल्याला असें दिसतें की अगदी प्राचीन काळापासून आमच्या ऋषींना याहि वस्तुस्थितीची जाणीव होती की बहुसंख्य मानवांना व्यक्तिरूप आदर्श हवा असतो. त्यांना कोणत्यातरी स्वरूपांत मूर्त वा सगुण असा ईश्वर हवा असतो. ज्या बुद्धाने ईश्वराच्या सगुण रूपाविरुद्ध शिकवण दिली त्याच्या मृत्यूनंतर पन्नास वर्षांच्या आंतच त्याच्या शिष्यांनी, त्या बुद्धालाच सगुण ईश्वराचें रूप दिलें. सगुण ईश्वर आवश्यक आहे; आणि आपल्याला माहीत आहे की सगुण ईश्वराविषयीच्या व्यर्थ कल्पना करण्याऐवजी याच जगांत वेळोवेळीं आविर्भूत होऊन आपल्या समक्ष वास करणाऱ्या जिवंत ईश्वरांची उपासना करणें कितीतरी चांगलें आहे. केवळ कल्पनेने निर्माण केलेले प्राय: सर्वच प्रकारचे ईश्वर हे मानवाच्या द्वारे पूजिले जाण्यास योग्य नसतात. कोणत्याहि

काल्पनिक ईश्वरापेक्षा, कल्पनेने निर्माण केलेल्या कोणत्याहि वस्तूपेक्षा, ईश्वरासंबंधी आपण जी कांही धारणा करूं शकतों तिच्यापेक्षा हे जिवंत ईश्वर उपासनेसाठी अधिक योग्य असतात. तुम्हीं किंवा मीं केलेल्या कोणत्याहि ईश्वरविषयक कल्पनेपेक्षा श्रीकृष्ण कितीतरी थोर आहेत; आपण मनांत केलेल्या वा आपण करूं शकणाऱ्या कोणत्याहि कल्पनेपेक्षा बुद्धदेव हे अधिक उदात्त व जिवंत असा आदर्श आहेत; आणि म्हणूनच सर्व प्रकारच्या काल्पनिक देवतांना बाजूला सारून ते मानवाच्या पूजेस सर्वथा पात्र ठरले आहेत.

ऋषींना हें माहीत होतें, म्हणून त्यांनी भारतीयांना अशा महापुरुषांची व अवतारांची पूजा करण्यास मुभा दिली. इतकेंच नव्हे, तर या अवतारांमधे सर्वश्रेष्ठ अशा भगवान श्रीकृष्णांनी याच्याहि पुढे जाऊन म्हटलें आहे :

"यद्यद्विभूतिमत्सत्त्वं श्रीमदूर्जितमेव वा ।
तत्तदेवावगच्छ त्वं मम तेजोंऽशसंभवम् ।।"

अर्थात् "ज्या ठिकाणीं माणसामधून अलौकिक अशी आध्यात्मिक शक्ति प्रकट झालेली आढळेल त्या ठिकाणीं मीं आहें असें समज, माझ्यामुळेच ही आध्यात्मिक शक्ति प्रकट होत असते."* यामुळेच सर्व देशांतील सर्व अवतारांची उपासना करण्याची मोकळीक हिंदूंना मिळाली आहे. कोणत्याहि देशांतील कोणत्याहि संताची पूजा हिंदु माणूस करूं शकतो—आणि आपण प्रत्यक्ष पाहतों की आपण पुष्कळदा ख्रिस्ती लोकांच्या चर्चमधे व मुसलमानांच्या मशिदींत जाऊन उपासना करीत असतों, आणि हें योग्यच आहे. आणि असें कां नसावें? मी म्हणालों त्याप्रमाणे आपला धर्म हा सर्वसमावेशक धर्म आहे. तो एवढा व्यापक व समावेशक आहे की सर्व प्रकारच्या धार्मिक आदर्शांना त्यांत स्थान मिळूं शकतें. आज जगांत विद्यमान असलेले सर्व धार्मिक आदर्श यांत आताच अंतर्भूत होऊं शकतील. आणि भावी कालांतहि निर्माण होणाऱ्या सर्व आदर्शांची प्रतीक्षा आपण करूं शकूं व याच पद्धतीने त्यांचाहि आपल्या धर्मांत समावेश होऊं शकेल. वेदान्त धर्माची व्यापकता ही अशी सर्वसमावेशक आहे.

मराठी
३४८१५
९६५८
२०।१।६३

* गीता, १०–४१

ईश्वराचे अवतार असलेल्या महापुरुषांबद्दल आपली कल्पना हीं सामान्यत: अशाच स्वरूपाची आहे. याशिवाय थोड्या खालच्या श्रेणीचेहि महापुरुष आहेत. ‘ऋषि’ हा शब्द वेदांमधे वारंवार योजलेला आढळतो, आणि आज तो बराच रूढ झालेला आहे. ऋषींच्या वचनांना विशेष प्रामाण्य आहे. आपण ही गोष्ट समजून घेतली पाहिजे. ‘ऋषि म्हणजे मंत्रद्रष्टा’ अशी या शब्दाची व्याख्या आहे. धर्माच्या सत्यतेचें प्रमाण कोणतें ?—असा प्रश्न फार प्राचीन काळीं विचारला गेला होता. इंद्रियगम्य असें कोणतेंहि प्रमाण देतां येणार नाही, असें त्यास उत्तर दिलें गेलें. "यतो वाचो निवर्तन्ते अप्राप्य मनसा सह"—"जें प्राप्त न झाल्यामुळे जेथून मनासह शब्द परत येतात." "न तत्र चक्षुर्गच्छति न वाग्गच्छति नो मन:"—"तेथे दृष्टि पोहोचूं शकत नाहीं, शब्द वा मनहि पोहोचूं शकत नाही." युगानुयुगें हेंच उत्तर देण्यांत आलें. आत्म्याचें अस्तित्व, ईश्वराचें अस्तित्व, अमरत्व, मनुष्याचें अंतिम ध्येय इत्यादि गोष्टींविषयी बाह्य प्रकृति कांहीच उत्तर देऊं शकत नाही. मन नित्य परिवर्तनशील आहे व तें प्रवाही अवस्थेंत असतें, तें मर्यादित असून त्याचे खंड खंड झालेले असतात. मग अनंत, अपरिवर्तनीय, अखंड अविभाज्य व नित्य अशा तत्त्वाविषयी प्रकृति काय सांगूं शकणार ? ती कधीच सांगूं शकणार नाही. आणि ज्या वेळीं मनुष्याने या जड व मृत अशा द्रव्याच्या साहाय्याने उत्तर शोधण्याचा प्रयत्न केला त्या वेळीं त्याचे परिणाम कसे विघातक ठरले हें इतिहास आपल्याला सांगतो. मग वेदांनी सांगितलेलें ज्ञान कुठून येतें ? ‘ऋषि’ बनल्याने तें प्राप्त होतें. हें ज्ञान इंद्रियांच्या साहाय्याने प्राप्त होत नाही. पण इंद्रियें काय मनुष्याचें सारसर्वस्व आहेत ? इंद्रियें हींच मनुष्याचें सर्वस्व आहेत असें कोण म्हणूं शकेल ? आपल्या जीवनांत, आपल्यापैकी प्रत्येकाच्या जीवनांत असे कांही क्षण येतात की जेव्हा आपलें मन स्थिर होऊन जातें; कदाचित् आपली एखादी प्रिय व्यक्ति आपल्या डोळ्यासमोर मरण पावते, किंवा आपल्यावर एखादा आघात होतो किंवा आपल्याला आत्यंतिक आनंद होतो, अशा वेळीं हे क्षण येत असतात. दुसऱ्याहि कित्येक प्रसंगीं, मन अगदी शांत होतें व क्षणभर स्वत:चें खरें स्वरूप त्याला उमजतें; त्या वेळीं, जेथे मन आणि शब्द पोहोचूं शकत नाहीत अशा अनंत व सर्वातीत

अशा तत्त्वाची क्षणभर अनुभूति येते. सामान्य- जीवनांतहि हें घडत असतें, परंतु अभ्यासाच्या साहाय्याने या अवस्थेला उत्कटता व पूर्णता आणणें आवश्यक आहे. हजारो वर्षांपूर्वी मनुष्याने शोधून काढलें आहे की आत्मा हा इंद्रियांनी बद्ध वा मर्यादित केला जात नाहीं, तसेंच जाणिवेनेहि तो मर्यादित होत नाही. आपण हें ध्यानीं घेतलें पाहिजे की जाणीव म्हणजे आत्मारूपी अनंत शृंखलेंतील एका दुव्याला दिलेलें नांव आहे. आत्मसत्ता म्हणजे जाणीव नव्हे, पण जाणीव ही या आत्मसत्तेचा केवळ एक अंश आहे. साहसी व्यक्तींनी या जाणिवेपलीकडेहि आत्म्याचा शोध घेतला. जाणीव ही इंद्रियांनी मर्यादित आहे. मनुष्याने जाणिवे-पलीकडे, इंद्रियांच्या पलीकडे गेलें पाहिजे, मगच त्याला आध्यात्मिक सत्यांप्रत पोहोचतां येईल. आणि आजहि असे लोक आहेत की ज्यांना इंद्रियातीत अनुभव प्राप्त करण्यांत यश मिळालें आहे. त्यांना 'ऋषि' असें म्हणतात, कारण आध्यात्मिक सत्यांचा त्यांना प्रत्यक्ष साक्षात्कार झालेला असतो.

म्हणून माझ्यासमोर असलेला या टेबलाला जसें मी प्रत्यक्ष प्रमाणाच्या साहाय्याने जाणतों तसेंच वेदांचेंहि प्रमाण प्रत्यक्षानुभूति हेंच आहे. हें टेबल मी इंद्रियांच्या द्वारें अनुभवतों आणि आध्यात्मिक सत्यें देखील माणसाला इंद्रियातीत अवस्थेंत प्रत्यक्ष अनुभवतां येतात. हें ऋषित्व स्थल, काल, लिंग वा जाति यांच्यावर अवलंबून नाही. वात्स्या-यनांनी असें ठामपणें घोषित केलें आहे की हें ऋषित्व ऋषींचे वंशज, आर्य, अनार्य वा म्लेच्छ आदींनाहि प्राप्त करून घेतां येतें, त्यावर सर्वांचाच अधिकार आहे. हेंच वेदांत सांगितलेलें ऋषित्व आहे. आणि भारतीय धर्माचें हें ध्येय आपण नेहमी लक्षांत ठेवलें पाहिजे. आणि मला वाटतें की जगांतील अन्य देशांनीहि तें समजून घ्यावें व ध्यानांत ठेवावें म्हणजे धर्माधर्मांतील विवाद व कलह कमी होतील. धर्म हा केवळ ग्रंथांत, सिद्धान्तांत, मतांत वा बोलण्यांत साठलेला नाहीं; इतकेंच नव्हे तर तो तर्ककौशल्यांतहि साठलेला नाही. धर्म म्हणजे प्रत्यक्ष अनुभूति होय, 'ऋषित्वा'ची प्राप्ति होय. माझ्या मित्रांनो ! जोंपर्यंत तुमच्यापैकी प्रत्येकजण ऋषि होत नाही आणि आध्यात्मिक सत्यांचा साक्षात् अनुभव घेत नाही तोंपर्यंत तुमचें धार्मिक जीवन सुरू झालें असें

म्हणतां येणार नाही. तुम्हांला इंद्रियातीत अनुभूतीचें दालन उघडत नाही तोंवर तुमच्या पक्षीं धर्म म्हणजे केवळ बोलणें आहे, ती केवळ पूर्वतयारी आहे असें म्हणतां येईल. तुम्हांला प्रत्यक्षानुभूति होत नाही तोंवर तुम्ही दुसऱ्यांच्याच अनुभवांसंबंधी बोलत असतां किंवा दुसऱ्यांनी बोंललेलेंच बोलत असतां. एकदा ब्राह्मणांशीं चर्चा करीत असतांना बुद्धदेवांनी काढलेले सुंदर उद्‌गार येथे योग्य ठरतील. ब्रह्माच्या स्वरूपाची चर्चा करीत करीत ते बुद्धदेवांजवळ गेले. बुद्धदेवांनी त्यांना विचारलें, "आपण ब्रह्म पाहिलें आहे काय ?" "नाही," ब्राह्मणांनी उत्तर दिलें. "तुमच्या वडिलांनी ?" "नाही, त्यांनीहि नाही." "मग आपल्या आजोबांनी ?" "नाही, त्यांनी देखील पाहिलें असेल असें वाटत नाही." "मग माझ्या मित्रांनो, ज्याला तुमच्या वडिलांनी वा आजोबांनीहि पाहिलेलें नाहीं त्याच्याविषयी चर्चा करून तुम्ही एकमेकांवर कशी मात करूं पाहतां ?" सर्व जग हें असेंच करीत आहे. वेदान्ताच्या शब्दांत असें सांगतां येईल की, "हा आत्मा मोठमोठ्या शब्दांनी प्राप्त होणार नाही, कुशाग्र अशा बुद्धीलाहि त्याचा थांग लागत नाही, इतकेंच नव्हे तर प्रत्यक्ष वेदांच्या केवळ अभ्यासानेहि तो प्राप्त होणार नाही."

वेदांच्या शब्दांत आपण जगांतील सर्व देशांना सांगू या:--"तुमचे हे विवाद व कलह अगदी व्यर्थ आहेत; तुम्ही ज्या ईश्वराविषयी एवढें प्रतिपादन करतां त्याला तुम्हीं पाहिलें आहे काय ? तुम्हीं पाहिलें नसेल तर तुमचा प्रचार व्यर्थ आहे; तुम्ही काय बोलत असतां हें तुमचें तुम्हांलाच कळत नाही; आणि तुम्हांला ईश्वराचें दर्शन झालें असेल तर तुम्ही भांडत बसणार नाही, तुमच्या मुखावर निराळेंच तेज दिसेल." उपनिषदांतील एका ऋषींनी आपल्या मुलाला ब्रह्मज्ञान प्राप्त करून घेण्यासाठी पाठविलें. तो परत आल्यावर वडिलांनी विचारलें, "तूं काय शिकलास ?" मुलाने उत्तर दिलें, "मी पुष्कळ शास्त्रें शिकलों आहें." त्यावर वडील म्हणाले, "यांत तर विशेष कांहीच नाही, तूं परत जा." नंतर तो मुलगा परत गेला आणि पुन्हा परत आल्यावर वडिलांनी तोच प्रश्न त्याला विचारला, मुलानेहि पुन्हा तसेंच उत्तर दिलें. पुन्हा एकदा त्याला परत जावें लागलें. नंतर पुन्हा ज्या वेळीं तो परत आला त्या वेळीं त्याचें मुख तेजस्वी दिसत होतें; तेव्हा त्याचे वडील त्याला म्हणाले,

"बाळा, आज तुझें मुख ब्रह्मज्ञानी पुरुषाप्रमाणे तेजस्वी दिसत आहे." तुम्हीं ईश्वराला जाणलेंत की तुमचें मुख तेजाने तळपूं लागेल. तुमचा आवाज बदलून जाईल, तुमचें सर्व स्वरूपच पालटून जाईल. मानव-जातीला तुम्ही वरदानच ठराल; आणि 'ऋषि' झाल्यावर तुम्हांला विरोध करण्याचें सामर्थ्य कुणालाच राहणार नाही. आपल्या धर्माचें ध्येय असलेलें ऋषित्व हें अशा प्रकारचें आहे. अन्य सर्व बोलणें, तर्क आणि तत्त्वज्ञानें, तसेंच द्वैतवाद, अद्वैतवाद इतकेंच नव्हे तर प्रत्यक्ष वेदहि गौण स्वरूपाचे आहेत, केवळ साधनरूप आहेत. ऋषित्वाचा लाभ करून घेणें हीच मुख्य गोष्ट आहे. वेद, व्याकरण, ज्योतिष आदि सर्व दुय्यम प्रतीचें आहे. परमोच्च ज्ञान तेंच की ज्यामुळे आपल्याला त्या अविकारी तत्त्वाचा साक्षात्कार होतो. ज्यांना हा साक्षात्कार झाला ते म्हणजे आपल्याला वेदांत आढळणारे ऋषि होत; आणि आपल्याला ठाऊक आहे की ऋषि हें एका विशिष्ट श्रेणींतील व्यक्तींचें नांव आहे. प्रत्येक खऱ्या हिंदूला आयुष्यांत केव्हातरी तें ऋषित्व प्राप्त करून घ्यावयाचें असतें, आणि या ऋषित्वाच्या प्राप्तीलाच हिंदु लोक 'मुक्ति' असें म्हणतात. कांही सिद्धान्तांवर श्रद्धा ठेवणें, हजारो मंदिरांत जाऊन देव-दर्शन घेणें, किंवा जगांतील सर्व नद्यांत स्नान करणें यांमुळे मुक्ति प्राप्त होत नसून मंत्रद्रष्टा ऋषि होणें हेंच परम साध्य आहे, हीच मुक्ति आहे.

यानंतरच्या काळांत आपण पाहिलें तर जग हलवून सोडणारे कितीतरी महापुरुष---मोठमोठे अवतार होऊन गेलेले आपल्याला आढळतात. भागवतांत सांगितल्याप्रमाणे अवतार असंख्य आहेत; त्यांच्या-पैकी भारतांत जास्त पूजिले जाणारे असे अवतार म्हणजे राम व कृष्ण हे होत. राम हा प्राचीन युगांतील वीरांचा आदर्श होता, सत्य व नीतिधर्म यांची तो प्रत्यक्ष मूर्तिच होता, तो आदर्श पुत्र, आदर्श पति, आदर्श पिता होता व त्याहिपेक्षा म्हणजे तो आदर्श राजा होता असें वर्णन थोर वाल्मीकि ऋषींनी केलेलें आहे. या महाकवीने ज्या भाषेंत रामचरित्राचें वर्णन केलें आहे तिच्याहून अधिक शुद्ध, अधिक मधुर व अधिक सोपी अशी भाषा अन्यत्र आढळणार नाही. आणि सीतेबद्दल काय सांगावें? जगां-तील आजवरचें सर्व वाङमय तुम्हीं शोधलें तरी, आणि मला खात्री वाटते की भावी कालांतील जगाचें सर्व वाङमय तुम्हीं विचारांत घेतलें तरीहि

दुसरी सीता तुम्हांला आढळणार नाही. सीतेसारखी फक्त सीताच आहे. असें व्यक्तिचित्रण एकदाच होऊन गेलें आहे. रामाप्रमाणे कदाचित् कित्येक राम झाले असतील, पण सीतेप्रमाणे दुसरी सीता झाली नाही! भारतीय स्त्रियांचा सीता हा आदर्श असून परिपूर्ण स्त्रीत्वाचे सर्व भारतीय आदर्श या सीतेच्या जीवनापासूनच निर्माण झालेले आहेत. आणि हजारो वर्षें या समग्र आर्यभूमींतील सर्व स्त्री-पुरुषांना व आबालवृद्धांना ती पूज्य झालेली आहे. आणि ही तेजस्वी सीता, शुद्धतेहूनहि शुद्ध अशी ही सीता, ही धीरोदात्त आणि सहनशील सीता चिरकाल अशीच पूज्य राहील. एका शब्दानेहि कुरकुर न करतां तिने जीवनांतील सर्व दुःख सहन केलें; ती शुद्ध, पवित्र व आदर्श पत्नी सीता केवळ मानवांचाच नव्हे, तर देवांचाहि आदर्श असून, ती सदैव आमच्या राष्ट्राची देवता म्हणूनच राहील. आपल्यापैकी प्रत्येकजण तिचें चरित्र चांगल्या रीतीने जाणतो, म्हणून जास्त वर्णन करण्याची आवश्यकता नाही. एक वेळ आपलीं पुराणें नाहीशीं होतील, कदाचित् वेदहि लुप्त होतील आणि कदाचित् आपली संस्कृत भाषा कायमची नाहीशी होईल; पण माझे शब्द लक्षांत ठेवा, जोंपर्यंत खेडवळ भाषा बोलणारे पांच देखील हिंदु जिवंत आहेत तोंपर्यंत सीतेची कहाणी अस्तित्वांत राहील. आपल्या समाजाच्या रोमरोमीं सीतेने प्रवेश केला आहे. प्रत्येक हिंदु स्त्री-पुरुषाच्या रक्तांत ती भिनून गेली आहे. आपण त्या सीतेचीं संतानें आहोंत. आपल्या स्त्रियांना आधुनिक बनविण्याचा प्रयत्न, सीतेच्या आदर्शापासून दूर नेणारा असेल तर तो तात्काळ अयशस्वी होईल. हें आपल्याला प्रतिदिनीं दिसून येत आहेच. भारतीय स्त्रियांचा विकास सीतेच्या पदचिन्हांच्या अनुरोधानेच झाला पाहिजे आणि तोच त्यांच्या विकासाचा एकमेव मार्ग आहे.

यानंतर, भिन्नभिन्न स्वरूपांत पूजिला जाणारा, स्त्रीपुरूषांचें, आबालवृद्धांचें प्रिय इष्टदैवत असलेला जो श्रीकृष्ण त्याचा आपण विचार करूं. त्याला केवळ अवतार मानून भागवतकारांचें समाधान झालें नाही. ते म्हणतात, "इतर अवतार परमेश्वराचे केवळ अंश होते, पण श्रीकृष्ण मात्र साक्षात् परमेश्वरच होय." त्याच्या अष्टपैलू चारित्र्याचा विचार केल्यास त्याला अशीं विशेषणें लावलीं जातात यांत कांही आश्चर्य

नाही. तो जसा अपूर्व संन्यासी होता, तसाच तो अपूर्व गृहस्थाश्रमीहि होता; त्याच्या ठिकाणीं विलक्षण रजोगुण होता आणि त्याबरोबरच त्याची त्यागवृत्तिहि विलक्षण होती. गीतेच्या अभ्यासाशिवाय आपल्याला श्रीकृष्णाचें व्यक्तिमत्त्व कळणार नाही, कारण स्वतःच्या उपदेशाचें तो स्वतःच मूर्तिमंत उदाहरण होता. सगळेच अवतार स्वतःच्या उपदेशाचें मूर्तिमंत प्रतीकच होते. गीतेचा उपदेष्टा जो श्रीकृष्ण, त्याचें सगळें जीवनच त्या गीतेचें मूर्तिमंत उदाहरण होतें; त्याचें जीवन अनासक्तीचें एक महान् उदाहरणच होतें. त्याने आपलें राज्य सोडून दिलें, त्याची त्याला कधीच चिंता वाटली नाही. ज्याच्या केवळ शब्दाने राजे सिंहासनावरून खाली येत, त्या भारताच्या या नेत्याला स्वतः राजा होण्याची इच्छा नव्हती. तो कृष्ण, गोपींशीं खेळणारा तो कृष्ण, सदैव साधाच राहिला. अहाहा! त्याच्या जीवनाचा तो भव्योदात्त अध्याय समजण्यास अत्यंत कठीण आहे! आणि स्वतः पूर्णतया शुद्ध व पवित्र झाल्याशिवाय तो समजून घेण्याचा आपण प्रयत्नहि करूं नये. वृंदावनांतील रम्य लीलांमधून विविध रूपकांनी व्यक्त झालेलें तें केवढें उदात्त व व्यापक प्रेम होतें, तें भक्तीने धुंद झालेल्या व भक्तिरस आकंठ प्राशन केलेल्या व्यक्तीखेरीज कोणालाहि आकलन होणें शक्य नाही! गोपींच्या प्रेमजनित विरहदुःखाची उत्कटता कोण समजूं शकेल? त्यांचें प्रेम म्हणजे प्रेमाचा चरम आदर्श होतें, त्यांत कसलीहि अपेक्षा नव्हती, त्यांत स्वर्गाचीहि अभिलाषा नव्हती, इहलोकांतील किंवा परलोकांतील कोणत्याहि सुखाची त्यांत लालसा नव्हती. आणि माझ्या मित्रांनो, या गोपींच्या प्रेमामधूनच सगुण ईश्वरवाद व निर्गुण ईश्वरवाद यांमधील विरोध दूर करण्याचा मार्ग सापडतो. आपल्याला ठाऊक आहे की माणूस ईश्वराच्या सगुण रूपाहून अधिक उच्च अशी ईश्वराची धारणा करूं शकत नाहीं. आपल्याला हेंहि माहीत आहे की जो जगांत सर्वत्र व्याप्त असून सर्वकांही ज्याची अभिव्यक्ति आहे अशा निर्गुण ईश्वरावर विश्वास ठेवणें हें तत्त्वज्ञानाच्या दृष्टीने योग्य आहे. त्याचबरोबर, कोणत्यातरी साकार वस्तूची आस आपल्या हृदयांत असते; ज्याचें आपल्याला आकलन करतां येईल व ज्याच्या चरणीं सर्वस्व अर्पण करतां येईल असें कांहीतरी आपल्याला हवें असतें. म्हणून सगुण

ईश्वर हीच मनुष्याची सर्वोच्च कल्पना होय. परंतु तर्काला ही कल्पना सहन होत नाही. ब्रह्मसूत्रांतून चर्चिला गेलेला हाच तो प्राचीन प्रश्न आहे; द्रौपदीने अरण्यवासांत युधिष्ठिराबरोबर याच प्रश्नाची चर्चा केली होती: जर दयाळू, सर्वशक्तिमान् असा सगुण ईश्वर असेल तर या जगांत अशी नरकावस्था कां आढळते, त्याने असें जग कां निर्मिलें? हा ईश्वर पक्षपाती असला पाहिजे. या प्रश्नाचें उत्तर सापडत नाही; गोपींच्या प्रेमाचें वर्णन वाचतांना या प्रश्नाचें एकमेव उत्तर सापडतें. कृष्णाला कोणतेंच विशेषण लावलेलें त्यांना आवडत नसे. तो सृष्टीचा कर्ता आहे हें जाणण्याची जरूरी त्यांना वाटली नाही, तसेंच तो सर्वशक्तिमान् आहे इत्यादि गोष्टींची आवश्यकता त्यांना भासली नाही. त्यांना एकच गोष्ट कळत होती, ती म्हणजे तो अनंत प्रेममय आहे. एवढेंच त्यांना पुरें होतें. गोपी ह्या कृष्णाला 'वृंदावनांतील कृष्ण' म्हणूनच जाणत होत्या. मोठमोठ्या सैन्यांचा सेनापति व राजांचा राजा असूनहि त्यांच्या दृष्टीने मात्र तो अखेरपर्यंत 'गोपालच' होता. "मला धन नको, लोकांचा परिवार नको, विद्वत्ता नको, इतकेंच काय, स्वर्गाचीहि मला इच्छा नाही. मला वारंवार जन्म घ्यावा लागला तरी चालेल, पण प्रभो, मला तुमच्याबद्दल उत्कट प्रेम वाटो, केवळ प्रेमासाठीच प्रेम वाटो." धर्माच्या इतिहासांतील हा एक महत्त्वाचा टप्पा आहे--प्रेमाकरिता प्रेम, कर्तव्यासाठी कर्तव्य, कर्मासाठी कर्म. आणि सर्वश्रेष्ठ अवतार जो श्रीकृष्ण त्याच्या तोंडून, या भारतभूमीमधे, मानवाच्या इतिहासांत अगदी प्रथमच हें तत्त्व बाहेर पडलें. भीतीचा व प्रलोभनांचा धर्म केव्हाच मागे पडला, आणि नरकाची भीति व स्वर्गीय भोगांचें प्रलोभन हीं मानवी हृदयांत स्वभावतः असूनहि प्रेमाकरिता प्रेम, कर्मासाठी कर्म व कर्तव्यासाठी कर्तव्य यांसारखीं उत्तुंग ध्येयें अवतीर्ण झालीं.

केवढें हें अलौकिक प्रेम! मी आताच तुम्हांला सांगितलें की गोपींची भक्ति आकलन होणें फार कठीण आहे. आपल्यामध्येहि असे मूर्ख कमी नाहीत की ज्यांना अशा अपूर्व कथानकांतील वैशिष्ट्यपूर्ण आशय कळू शकत नाही. मी पुन्हा सांगतों की अपवित्र हृदयाचे व मूर्ख असे आपलेच कांही बांधव आहेत की जे गोपीप्रेमाच्या या कथानकाला एक अत्यंत

अपवित्र गोष्ट समजून त्याच्यापासून दहा हात दूर सरतात. त्यांना मला एवढेंच सांगावयाचें आहे की त्यांनी प्रथम स्वत:चें मन शुद्ध करावें. आणि तुम्हीं ध्यानांत ठेवलें पाहिजे की गोपीप्रेमाची ही अद्‌भुत कथा सांगणारे दुसरे कोणी नसून स्वत: व्यासपुत्र शुकदेवच आहेत. ते जन्मत:च शुद्ध होते, नित्यशुद्ध होते. अंत:करणांत जोंवर स्वार्थवृत्ति आहे तोंवर ईश्वरभक्ति अशक्यच; तोंवर भक्ति म्हणजे एक प्रकारचा व्यापारच असतो. "ईश्वरा, मी तुला कांही देतों, तूं मला मोबदल्यांत कांही दे." या लोकांचा ईश्वर म्हणतो, "तूं जर हें केलें नाहीस तर मेल्यावर मी तुझी खबर घेईन; अनंत काळ मी तुला नरकाग्नींत जाळीन"--इत्यादि. जोंपर्यंत अशा कल्पना डोक्यांत आहेत तोंपर्यंत गोपींच्या प्रेमजनित विरहदु:खाची उत्कटता कशी कळणार? "त्या ओठांचें एकदा तरी चुंबन मिळाल्यास किती चांगलें होईल ! ज्याला तुझ्या दिव्य चुंबनाचा लाभ झाला त्याची तुझ्याबद्दलची आतुरता नित्य वाढीस लागते, सर्व दु:खांचा लय होतो, आणि केवळ तुझ्याव्यतिरिक्त अन्य सर्व गोष्टींबद्दलची त्याची अभिलाषा नाहीशी होते." धनसंपत्ति, नांवलौकिक यांच्याविषयीची आसक्ति प्रथम सोडा; तसेंच या आपल्या क्षुद्र जगाविषयीची अभिलाषा प्रथम विसरा; मगच तुम्हांला गोपींच्या प्रेमाचें आकलन होईल. त्यांचें प्रेम इतकें पवित्र आहे की सर्वस्वाचा त्याग केल्याशिवाय तें समजून घेण्याचा प्रयत्नच करूं नये; पूर्णतया आत्मशुद्धि झाल्याशिवाय तें कळणें शक्यच नाही. मनामधे कामकांचन व नांवलौकिक यांची अभिलाषा बाळगून, व तिच्यामुळे प्रतिक्षणीं मन हेलावून जात असतां, हे लोक गोपींचें प्रेम समजून घेण्याचा व त्यावर टीका करण्याचा बालिश प्रयत्न करीत असतात ! या प्रेमाची शिकवण देणें हेंच कृष्णाच्या अवताराचें सार आहे. गीतेच्या महान् तत्त्वज्ञानाचीहि या प्रेमाच्या उन्मादाबरोबर तुलना होऊं शकणार नाही; कारण गीतेमधे साधकाला अंतिम ध्येयाकडे हळूहळू कसें जावें हें शिकविलें आहे. पण या गोपीप्रेमांत भगवंताच्या आस्वादामुळे आलेला धुंदपणा आहे, त्यांत भगवत्प्रेमाने आलेला उन्माद आहे. तेथे गुरु, शिष्य, उपदेश, शास्त्र आदि सर्व एक झालीं आहेत; ईश्वर, स्वर्ग व भय या कल्पनांचा संपूर्णपणें विसर पडून गेला आहे. उरला आहे फक्त प्रेमाचा उन्माद. यांत

सर्व गोष्टींची विस्मृति होऊन भक्ताला या जगांत कृष्णाशिवाय कांहीच दिसत नाही, प्रत्येकजण त्याला कृष्णरूपच दिसतो, त्याचें स्वतःचेंहि मुख कृष्णासारखें दिसूं लागतें; अशा वेळीं त्याचा आत्माहि कृष्णाच्या रंगाने रंगून जातो. श्रीकृष्णाचा महिमा हा असा आहे !

श्रीकृष्णाच्या जीवनांतील क्षुल्लक तपशिलावर आपला वेळ वाया घालवूं नका. त्या जीवनाचें जें सार आहे, जो मुख्यांश आहे तोच घ्या. कृष्णाच्या चरित्राविषयी कांहीं ऐतिहासिक विसंगतिहि असूं शकतील, कांही प्रक्षिप्त गोष्टीहि त्यांत असूं शकतील. हें सारें खरें असेल, पण त्याचबरोबर या सर्व अपूर्व कल्पनांना कांहीतरी आधार असलाच पाहिजे. आपण दुसऱ्या कोणत्याहि महापुरुषाचें जीवन पाहिलें तर आपल्याला आढळतें की तो थोर पुरुष म्हणजे त्याच्या पूर्वी विद्यमान असलेल्या विचारांचेंच केवळ विकसित स्वरूप असतो. आपण हेंहि पाहतों की, त्याच्या देशांत, इतकेंच काय, पण त्याच्या स्वतःच्याच काळांत प्रचलित असलेल्या कल्पनांचा व विचारांचाच तो प्रचार करीत असतो. असा महापुरुष झाला किंवा नाही याविषयीहि मोठा संदेह असूं शकतो. पण श्रीकृष्णाच्या बाबतींत मी तुम्हांला आव्हान देतों की, 'कर्तव्यासाठी कर्तव्य' 'प्रेमासाठीं प्रेम' व 'कर्मासाठी कर्म' ही श्रीकृष्णाची स्वतःची मौलिक शिकवण नव्हती असें कोणींहि सिद्ध करून दाखवावें. तुम्हांला हें मानावेंच लागेल की ही शिकवण कोणत्या ना कोणत्या व्यक्तीची स्वतःची मौलिक अशी शिकवण असली पाहिजे. त्या व्यक्तीने ह्या कल्पना, हे आदर्श दुसऱ्या कोणाकडूनहि घेतलेले असणें शक्य नाही. कृष्णाच्या जन्माच्या वेळीं ह्या कल्पना सर्वत्र प्रचारांत होत्या असें म्हणतां येत नाही. भगवान् श्रीकृष्णांनी सर्वप्रथम त्यांचा प्रचार केला. त्यांचे शिष्य व्यास यांनी त्यांच्यापासून हे आदर्श घेऊन त्यांचा सामान्य जनांपर्यंत प्रचार केला. अशा प्रकारचे आदर्श मानवीं भाषेंत कधी वर्णिलेले नव्हते. व्यासांच्या ग्रंथामधे आढळणारी सर्वोच्च कल्पना म्हणजे 'गोपीजनवल्लभ'-- वृंदावनांतील गोपींचा 'परम प्रेमास्पद'--ही होय. प्रेमाचा हा उन्माद जेव्हा तुमच्यांत शिरेल, भाग्यशाली गोपींचा भाव जेव्हा तुम्हांला खरोखर समजेल तेव्हाच प्रेम म्हणजे काय हें तुम्हांला कळेल. जेव्हा सर्व जग तुमच्या समोरून लोप पावेल, जेव्हा तुमच्या हृदयांतील सर्व कामना दूर

होतील, जेव्हा तुमचें हृदय पूर्णपणें शुद्ध होईल, जेव्हा दुसरें कोणतेंहि ध्येय तुमच्या समोर उरणार नाही, एवढेंच नव्हे तर सत्यानुसंधानाची तुमची स्पृहा देखील जेव्हा गौण ठरेल तेव्हाच तुमच्या ठायीं प्रेमाचा तो उन्माद प्रकट होईल. अशा अनंत, अहेतुक प्रेमाचें सामर्थ्य गोपींच्या ठायीं वसत होतें. हेंच परमसाध्य होय. तें तुम्हांला प्राप्त झालें की तुम्ही सर्व-कांही मिळविलें.

आता आपण थोडें खाली येऊन गीतेचा उपदेष्टा जो कृष्ण त्याच्या-विषयी विचार करूं. आज भारतांत वस्तुस्थितीचा विपर्यास करण्याचा प्रयत्न चालू आहे. आमच्यापैकी पुष्कळांना असें वाटतें की गोपींचें कृष्णाविषयीचें प्रेम हें विचित्र प्रकारचें असून तें युरोपियन लोकांना पटणार नाही. डॉ. 'क्ष' यांना तें आवडत नाही म्हणून गोपींचें हें आख्यान आपण टाकून दिलें पाहिजे! युरोपियन लोकांच्या मान्यतेशिवाय कृष्णाचें अस्तित्व कसें राहूं शकेल? शक्यच नाही! महाभारतांत एकदोन ठिकाणां-व्यतिरिक्त गोपींचा उल्लेख नाही, आणि जो उल्लेख आहे तोहि विशेष महत्त्वाचा नाही. द्रौपदीच्या प्रार्थनेंत वृंदावनांतील जीवनाचा उल्लेख आहे, व दुसरा उल्लेख शिशुपालाच्या भाषणांत आहे. तेव्हा हे सर्व प्रक्षिप्त उल्लेख असावेत! युरोपियन लोकांना अप्रिय असेल तें टाकून दिलें पाहिजे. गोपींचा उल्लेख, एवढेंच नव्हे तर कृष्णाचाहि उल्लेख प्रक्षिप्त आहे! ठीक. व्यापारांत मुरलेल्या या युरोपियन लोकांच्या बाबतींत धर्म सुद्धा व्यापारी स्वरूपाचा झाला आहे; इहलोकीं कांहीतरी करून ही सर्व मंडळी स्वर्गप्राप्तीच्या प्रयत्नांत आहेत; व्यापाऱ्याला चक्रवाढ व्याज हवें असतें, इहलोकांत कांही भांडवल गुंतवून परलोकीं त्याची वसूली करण्याची त्याची कल्पना असते. खरोखरच त्यांच्या या अशा पद्धतींत गोपींना कांहीच स्थान नाही. असो. आदर्श प्रेमिक असा जो कृष्ण त्याच्यापासून थोडें खाली येऊन गीतेचा उपदेश करणाऱ्या कृष्णाकडे आपण आता वळूं या. वेदांवर गीतेपेक्षा अधिक चांगलें भाष्य लिहिलें गेलें नाहीं व लिहिलें जाणेंहि शक्य नाहीं. श्रुति किंवा उपनिषदें यांचा आशय समजणें कठीण आहे; कारण कितीतरी भाष्यकारांनी आपापल्यापरीने त्यांचा अर्थ लावण्याचा यत्न केला आहे. त्यानंतर श्रुतींचा जो प्रेरक आहे तो स्वतःच श्रुतींचा आशय समजावून देण्यासाठी गीतेच्या

उपदेष्टयाच्या रूपांत आविर्भूत झाला. त्याने श्रुतींचा ज्या पद्धतीने अर्थ लावला त्या पद्धतीची भारताला आणि अखिल जगालाहि अत्यंत आवश्यकता आहे. आश्चर्याची गोष्ट अशी की नंतरचे शास्त्रांचे भाष्यकार गीतेवरहि भाष्य करीत असतां त्यांना कांही ठिकाणी अर्थबोध होत नाही व पुष्कळदा आशय कळत नाही. गीतेंत काय आढळतें, व नंतरच्या भाष्यकारांच्या भाष्यांत काय आढळतें? एखादा अद्वैतवादी भाष्यकार उपनिषदांतील एखादा भाग घेतो, तेथे त्याला पुष्कळ द्वैतात्मक उतारे आढळतात, तो त्या सर्वांच्या अर्थाची ओढाताण करून त्याला आपल्या स्वतःच्या साच्यांत बसविण्याचा प्रयत्न करतो. द्वैतवादी भाष्यकारापुढे जेव्हा अद्वैतात्मक उतारे येतात तेव्हा तोहि त्यांची हवी तशी ओढाताण करून त्यांचा द्वैती पद्धतीने अर्थ लावू पाहतो. पण गीतेमधे श्रुतींच्या अर्थाची अशी ओढाताण करण्याचा प्रयत्न मुळीच आढळत नाही. भगवान म्हणतात, सर्वच श्रुति बरोबर आहेत; कारण मनुष्याची आध्यात्मिक प्रगति पायरीपायरीने होत असते; तो स्थूलापासून सूक्ष्माकडे, सूक्ष्मापासून सूक्ष्मतर विचाराकडे जात जात अखेरीस अंतिम लक्ष्य जें अनंत पूर्णत्व तें प्राप्त करून घेतो. गीतेंत अशा प्रकारें वेदांचा अर्थ समजावून सांगितला आहे. गीतेंत कर्मकांडाचाहि विचार केलेला आहे, आणि असें दाखविलें आहे की त्यामुळे जरी प्रत्यक्ष मोक्षप्राप्ति होत नसली तरी तें मोक्षास अप्रत्यक्षपणें उपकारक आहे व तेवढ्या अर्थाने तें ग्राह्य आहे; मूर्तिपूजा देखील ग्राह्य आहे; विधि, अनुष्ठानें सर्वकांही एका अटीवर ग्राह्य आहेत, आणि ती म्हणजे चित्तशुद्धि ही होय. हृदय जर शुद्ध व कपटहीन असेल तर उपासना ही ग्राह्य मानतां येईल व ती आपल्याला अंतिम लक्ष्याकडे घेऊन जाईल. उपासनेचे सर्व प्रकार आवश्यक आहेत, अन्यथा ते अस्तित्वांत आलेच नसते. आजकालचे कांही लोक म्हणतात की धर्म व संप्रदाय हे कांही ढोंगी व दुष्ट लोकांची निर्मिति असून त्यांनी हे सर्व स्वतःला पैसे मिळावे म्हणून निर्माण केले आहेत, पण हें खरें नाही. हें असलें स्पष्टीकरण कितीहि सयुक्तिक दिसलें तरीहि तें खरें नाही, आणि या प्रकारें धर्मांची व संप्रदायांची निर्मिति झालेली नाही. मानवी आत्म्याची एक गरज म्हणूनच त्यांचा उदय झाला. निरनिराळ्या श्रेणींच्या मानवांच्या आशा व आकांक्षा यांच्या

पूर्तीसाठी हे सर्व विभिन्न धर्म व संप्रदाय आहेत. त्यांच्या विरुद्ध प्रचार करण्याची कांही आवश्यकता नाही. ज्या वेळीं त्यांची आवश्यकता उरणार नाही त्या वेळीं तेहि लोप पावतील आणि जोंवर त्यांची गरज आहे तोंवर ते राहतीलच, मग तुम्ही त्यांच्याविरुद्ध कितीहि प्रचार करा, किंवा त्यांच्यावर कितीहि टीका करा. तुम्ही हातीं तलवार घ्या वा बंदूक घ्या, अथवा सर्व जग मानवी रक्तांत बुडवा, तरी पण मूर्तींची जोंपर्यंत गरज आहे तोंपर्यंत त्या राहणारच. या साऱ्या अनुष्ठानांच्या पद्धति व धर्माच्या या सर्व पायऱ्या राहतीलच, आणि त्या कां राहिल्या पाहिजेत हें आपल्याला भगवान श्रीकृष्णाच्या उपदेशांवरून कळून येतें.

श्रीकृष्णानंतर भारताच्या इतिहासांत एक खेदकारक अध्याय सुरू झाला. गीतेमधेच संप्रदायांमधील कलहाचा अस्पष्ट सूर आपल्याला ऐकूं येतो, आणि त्या सर्वांचा समन्वय साधण्यासाठी भगवान श्रीकृष्ण मधे उभे राहून त्यांच्यामधील विरोध दूर करतांना दिसतात. ते समन्वयाचे सर्वश्रेष्ठ उद्गाते व प्रचारक होते. त्यांनी म्हटलें, "दोऱ्यांत मणि ओवावेत तसे सर्वजण माझ्यामधे वसत आहेत." आपल्याला संप्रदायांमधील विरोधाचे अस्फुट सूर श्रीकृष्णाच्या काळापासूनच ऐकूं येतात. श्रीकृष्णाच्या उपदेशामुळे कांही काळ समन्वय व शांति हीं प्रस्थापित झालीं होतीं असें दिसतें. त्यानंतर पुनः कलहास प्रारंभ झाला. या वेळीं तो केवळ संप्रदायांमधेच नव्हता, तर तो जातीजातींमधे होता. हा कलह आपल्या समाजांतील ब्राह्मण व क्षत्रिय ह्या दोन प्रधान वर्णांत सुरू झाला. आणि त्यानंतर जवळजवळ हजार वर्षें ज्या लाटेने भारताला व्यापून टाकलें तिच्या शिरोभागी आपल्याला आणखी एक महिमाशाली विभूति दिसून येते--ती म्हणजे शाक्यमुनि गौतमबुद्ध ही होय. त्यांच्या उपदेशांविषयी व प्रचारकार्याविषयी तुम्ही जाणतांच. ईश्वराचा अवतार म्हणून आपण त्यांची पूजा करीत असतों. जगांतील एक अद्वितीय व अत्यंत धीट असे ते नीतिमत्तेचे प्रचारक होते, ते सर्वश्रेष्ठ कर्मयोगी होते; भगवान् श्रीकृष्णच स्वतःचे उपदेश कार्यान्वित कसे करावेत हें दाखविण्यासाठी जणु स्वतःचेच शिष्य बनून आविर्भूत झाले. गीतेंत प्रतिपादिलेला संदेश पुनः एकदा आपल्याला ऐकूं येऊं लागतो--"स्वल्पमप्यस्य धर्मस्य त्रायते महतो भयात्"--"या धर्माचें थोडेंसेंहि आचरण आपल्याला मोठ्या

भयापासून वांचवितें." "स्त्रियो वैश्याः तथा शूद्राः तेऽपि यान्ति परां गतिम्"--"स्त्रिया, वैश्य, इतकेंच नव्हे तर शूद्रहि परमगति प्राप्त करून घेऊं शकतात." सर्वांचीं बंधनें नष्ट करून, परमसाध्य जो मोक्ष, त्याचा मार्ग सर्वांना मोकळा करून देणारा गीतेमधील श्रीकृष्णाचा संदेश मेघगर्जनेप्रमाणे आपल्या कानांवर आदळतो--

"इहैव तैर्जितः सर्गो येषां साम्ये स्थितं मनः ।
निर्दोषं हि समं ब्रह्म तस्मात् ब्रह्मणि ते स्थिताः ॥"

अर्थात् "ज्यांना समत्वबुद्धि प्राप्त झाली त्यांनी या जीवनांतच इहलोकावर जय मिळविला; कारण ब्रह्म हें सम व निर्दोष आहे, म्हणून असे महात्मे ब्रह्मांतच वास करीत असतात."

"समं पश्यन् हि सर्वत्र समवस्थितमीश्वरम् ।
न हिनस्त्यात्मनात्मानम् ततो याति परां गतिम् ॥"

अर्थात् "याप्रमाणे परमेश्वराला सर्वत्र समभावें वास करीत असलेला पाहून तो योगी स्वतः आत्म्याचा घात करीत नाही व अखेरीस परमपदाला जाऊन पोहोचतो." या उपदेशाचें जणुकांही जिवंत उदाहरण समोर ठेवण्यासाठी, या उपदेशाचा निदान कांही अंश तरी प्रत्यक्ष व्यवहारांत उतरविण्यासाठी, त्या उपदेष्टयाने स्वतः पुनः अवतार धारण केला, आणि तो म्हणजे शाक्यमुनि गौतमबुद्ध हा होय. आपला उपदेश गरीब व पीडित जनांपर्यंत पोहोचविण्याकरिता त्यांनी प्रत्यक्ष देवभाषेचाहि त्याग करून लोकभाषेचा अंगीकार केला; गरीब भिकाऱ्यांत व दलित जनांत राहतां यावें याकरिता त्यांनी सिंहासनाचा त्याग केला; साक्षात् रामचंद्रांप्रमाणे त्यांनी चांडाळालाहि पोटाशीं धरलें.

त्यांचें महान् कार्य व चारित्र्य यांविषयी तुम्ही जाणतांच. परंतु त्या कार्यांत एक मोठा दोष होता व त्यामुळे आजहि आपल्याला दुःख भोगावें लागत आहे. याचा दोष भगवान बुद्धांकडे नाही. ते शुद्ध व महान् होते. पण बौद्धधर्माच्या प्रचारामुळे ज्या निरनिराळ्या असभ्य व असंस्कृत जाति आर्यांच्या समाजांत प्रविष्ट झाल्या त्या दुर्दैवाने बुद्धदेवांनी शिकविलेले उच्च आदर्श आत्मसात् करूं शकल्या नाहीत. ह्या जाति आपल्या विविध प्रकारच्या खुळचट समजुतींसह व बीभत्स उपासना पद्धतींसह मोठ्या संख्येने आर्यांच्या समाजांत प्रविष्ट झाल्या,

कांहीकाळ त्या सुसंस्कृत झाल्यासारख्या दिसल्या, पण एका शतकाच्या अवधींतच त्यांनी आपल्या वाडवडिलांपासून चालत आलेलीं भुतेंखेतें, सर्प आदि दैवतें पूजण्यास सुरवात केली. याप्रमाणे सर्व भारत खुळचट समजुतींचें आगर बनून जाऊन त्याची अधोगति झाली. प्राण्यांच्या हत्येला विरोध करण्यासाठी आधीच्या बौद्धांनी वेदांतील यज्ञभागांना विरोध केला होता; हे यज्ञ घरोघर होत असत; घरोघर अग्नि प्रज्वलित केलेला असे, आणि उपासनेचें इतर कांहीं अवडंबर नसे. बौद्धांच्या प्रचारामुळे हे यज्ञ लोप पावले व त्यांच्या जागीं भव्य मंदिरें, अवडंबरपूर्ण विधि-अनुष्ठानें व अवडंबरप्रिय पुरोहित वर्ग हीं सारीं निर्माण झालेली आज भारतांत आपण पाहत आहोंत. कांही आधुनिक ग्रंथकार असें म्हणतात की ब्राह्मणवर्णप्रणीत मूर्तिपूजेचा बुद्धदेवांनी नाश केला. त्यांचे ग्रंथ वाचून मला हसूं येतें. या ग्रंथकारांना अधिक कळावयास हवें होतें. बौद्ध-धर्मानेच ब्राह्मणीधर्म व मूर्तिपूजा यांची निर्मिति केली आहे हें त्यांना ठाऊक नाही.

एकदोन वर्षांपूर्वी एका रशियन लेखकाने लिहिलेलें एक पुस्तक प्रसिद्ध झालें. त्यांत त्याने असें म्हटलें आहे की येशू ख्रिस्तांच्या जीवना-विषयीं त्याला आश्चर्यकारक माहिती मिळालेली आहे. या ग्रंथाच्या एका भागांत तो म्हणतो की येशू ख्रिस्त हे जगन्नाथाच्या देवालयांत ब्राह्मणां-कडून धर्माचें शिक्षण घेण्यासाठी गेले होते, परंतु ब्राह्मणांच्या संकुचित-पणाला व त्यांच्या मूर्तिपूजेला विटून ते तिबेटमधील लामांकडे गेले आणि तेथे ज्ञान प्राप्त करून व सिद्ध होऊन ते स्वदेशीं परत गेले. भारताच्या इतिहासाचें थोडेंहि ज्ञान असणाऱ्यास या विधानावरूनच कळेल की या पुस्तकांतील सगळीच माहिती खोटी आहे, कारण जगन्नाथाचें मंदिर हें प्राचीन बौद्धमंदिरच आहे. आपण हें मंदिर व अन्य मंदिरें घेऊन त्यांना पुनः हिंदु देवालयांचें स्वरूप दिलें आहे. अजूनहि अशा अनेक गोष्टी आपल्याला करावयाच्या आहेत. असें हें जगन्नाथाचें स्थान असून त्या वेळीं तेथे एकहि ब्राह्मण नव्हता, आणि तरीहि आपल्याला असें सांगण्यांत येतें की येशू ख्रिस्तांनी त्या ठिकाणीं येऊन ब्राह्मणांकडून शिक्षण घेतलें. आमच्या या रशियन पुराणवस्तुशास्त्रज्ञाचें म्हणजें हें असें आहे!

याप्रमाणे अहिंसा व सर्व प्राण्यांविषयी दया यांचा प्रचार करूनहि,

उदात्त असा नीतिधर्म शिकवूनहि, नित्य अशा आत्म्याच्या अस्तित्वा-नास्तित्वाविषयी भयंकर वितंडवाद घालूनहि, बौद्धधर्माची अवघी इमारत कोसळून धुळीला मिळाली, आणि जे अवशेष उरले तें अगदी बीभत्स स्वरूपाचे होते. बौद्ध धर्माच्या अवनतीबरोबर ज्या बीभत्स गोष्टी निर्माण झाल्या त्यांचें आपणांपुढे वर्णन करण्याचा माझा मानस नाही व मला तेवढा वेळहि नाही. अत्यंत बीभत्स अशीं अनुष्ठानें, मानवाने कधी लिहिलें नसेल असें भयानक व अत्यंत अश्लील असें कल्पनातीत लिखाण, तसेंच धर्माच्या नांवाखाली चालू झालेले पशुतुल्य आचार हीं सर्व अधोगत बौद्धधर्मापासून निर्माण झालेलीं आहेत.

पण, भारताला अजून जिवंत राहावयाचें होतें. म्हणून भगवान पुन्हा आविर्भूत झाले. त्यांनी म्हटलें होतें, "धर्माला ज्या वेळीं अवकळा प्राप्त होते त्या वेळीं मी जन्म घेत असतों." त्याप्रमाणे ते पुन: आविर्भूत झाले आणि या वेळीं त्यांनी दक्षिणेंत जन्म घेतला. ज्याने वयाच्या अवघ्या सोळाव्या वर्षीं आपलें लेखन पूर्ण केलें असें म्हणतात असा ब्राह्मण कुमार उदयास आला आणि तो म्हणजे अद्‌भुत प्रतिभाशाली शंकराचार्य हे होत. या सोळा वर्षांच्या कुमाराचें लेखन म्हणजे जगाच्या आश्चर्याचा एक विषय आहे, आणि त्याचें स्वत:चें व्यक्तिमत्त्व सुद्धा अलौकिक होतें. भारताला त्याच्या प्राचीन विशुद्ध मार्गावर परत आणण्याचा त्याने संकल्प केला होता. पण हें कार्य किती कठीण आणि प्रचंड होतें याचा विचार करा. त्या वेळीं भारतांत जी परिस्थिति होती तिची थोडी-फार कल्पना मीं तुम्हांला दिलीच आहे. तुम्ही सुधारूं पाहत असलेले हे सर्व भयानक आचार त्या अध:पतनाच्या युगापासूनच आलेले आहेत. तार्तर, बलुची व अन्य अघोर जमाती येथे आल्या व बौद्ध बनून आपल्यांत मिसळल्या, आणि बरोबर येतांना त्यांनी आपापल्या जमातींच्या चालीरीती आणल्या आणि त्यामुळे आपल्या सर्व समाजाचें जीवन अत्यंत भयंकर व पशुतुल्य आचारांचें आगर बनलें. बौद्धांकडून या कुमाराला मिळालेला वारसा हा अशा प्रकारचा होता, व त्या वेळेपासून तों आजवर भारतांत चालत आलेलें कार्य म्हणजे, बौद्ध अधोगतीची लाट परतवून लावून वेदान्ताची पुन: स्थापना करणें हें होय. हें कार्य अजूनहि चालू आहे, तें संपलें नाही. शंकराचार्य हे थोर तत्त्वज्ञ होते;

त्यांनी दाखवून दिलें की, बौद्धधर्माचीं आधारभूत तत्त्वें वेदान्ततत्त्वांहून फारशीं वेगळीं नाहीत, परंतु बुद्धदेवांचा हा आशय त्यांच्या शिष्यांनी बरोबर समजून न घेतल्यामुळे त्यांनी स्वतःची अधोगति करून घेतली आणि आत्मा व ईश्वर यांचें अस्तित्व अमान्य करून ते नास्तिक बनले. शंकराचार्यांनी हें दाखवून देतांच सर्व बौद्ध पुन्हा आपल्या पूर्वीच्या धर्मांत येऊं लागले. पण त्या वेळेपर्यंत हे सर्व आचार व अनुष्ठानें त्यांच्या अंगवळणीं पडून गेलीं होतीं. त्यासंबंधी काय करावें ही समस्या निर्माण झाली.

त्यानंतर प्रतिभाशाली रामानुजाचार्यांचा जन्म झाला. शंकराचार्यांना बुद्धिवैभव भरपूर लाभलें होतें, पण मला वाटतें, त्यांचें हृदय तेवढें विशाल नव्हतें. रामानुजाचार्यांचें हृदय अधिक विशाल होतें. दलितांचें जीवन पाहून त्यांना फार दुःख झालें आणि त्यांच्याविषयी त्यांना अत्यंत सहानुभूति वाटली. काळाच्या ओघांत ज्या तऱ्हतऱ्हेच्या अनुष्ठानपद्धति उत्पन्न झाल्या होत्या त्यांचें त्यांनी शक्य तितकें शुद्धीकरण केलें; तसेंच त्यांनी नवीन अनुष्ठानें, नवीन उपासनापद्धति सुरू केल्या आणि ज्या लोकांना या गोष्टींची अत्यंत गरज होती त्यांच्यांत त्यांनी या गोष्टींचा प्रचार केला. त्याचबरोबर ब्राह्मणापासून चांडाळापर्यंत सर्वांकरिता त्यांनी सर्वोच्च आध्यात्मिक उपासनेचा मार्ग मोकळा केला. रामानुजाचार्यांचें कार्य हें अशा स्वरूपाचें होतें. हें कार्य वाढूं लागलें. उत्तरभारत त्यानें व्यापला, तिकडील कांही थोर आचार्यांनी तें कार्य पुढे चालविलें. परंतु ही गोष्ट पुढे पुष्कळ वर्षांनंतर मुसलमानांच्या आमदानींत घडली. नंतरच्या काळांत उत्तर भारतांत होऊन गेलेल्या या सर्व आचार्यांमधे चैतन्य महाप्रभु हे सर्वश्रेष्ठ होते.

रामानुजाचार्यांच्या काळापासूनचें एक वैशिष्टय तुम्ही ध्यानीं घ्या. तें म्हणजे आध्यात्मिक जीवनाचें क्षेत्र प्रत्येकासाठी खुलें झालें. रामानुजाचार्यानंतरच्या प्रत्येक आचार्याचें तें ब्रीदवाक्यच होतें. शंकराचार्यांपूर्वीच्या आचार्यांचेंहि धोरण असेंच होतें. मग शंकराचार्यांना तरी लोक संकुचित मताचे कां म्हणतात हें मला कळत नाही; त्यांच्या ग्रंथांत तरी तशा प्रकारचा कोणताहि भाग मला आढळत नाही. बुद्धदेवांच्या उपदेशांना वस्तुतः त्यांच्या अनुयायांनी विकृत रूप दिलें. त्याचप्रमाणे

शंकराचार्यांच्या उपदेशांवर संकुचितपणाचा जो आरोप करण्यांत येतो त्याबद्दल वस्तुत: शंकराचार्य हे स्वत: जबाबदार नसून त्यांचे शिष्य त्यांचे उपदेश समजून घेण्यास असमर्थ ठरल्यामुळेच त्यांच्यावर हा आरोप करण्यांत आला आहे.

आता आपण उत्तरेकडील थोर संत चैतन्य महाप्रभु यांच्याकडे वळूं. त्यांचें जीवन हें गोपींच्या प्रेमोन्मादाचें प्रत्यक्ष उदाहरण होतें. ते स्वत: ब्राह्मण असून अत्यंत बुद्धिवादी अशा कुटुंबांत त्यांचा जन्म झाला होता; शिवाय वादविवाद करून लोकांवर विजय मिळविणारे ते तर्कशास्त्राचे प्राध्यापक होते, कारण बालपणापासून हेंच मोठें ध्येय आहे असें त्यांच्या मनावर बिंबविलें गेलें होतें; आणि तरीहि एका महात्म्याच्या कृपेने त्यांचें सर्व जीवनच बदलून गेलें; त्यांनी वादविवाद करणें सोडून दिलें, तर्कशास्त्राच्या प्राध्यापकाचें पदहि सोडून दिलें आणि हे प्रेमोन्मत्त चैतन्य महाप्रभु भक्तीचे एक श्रेष्ठ आचार्य बनले. त्यांच्या भक्तीचा प्रभाव सर्व बंगालवर पडला व त्यामुळे सर्वांना शांति लाभली. त्यांच्या प्रेमाला कोणतीच मर्यादा नव्हती. संत वा पापी, हिंदु वा मुसलमान, पवित्र वा अपवित्र, वेश्या, पतित, सर्वांनाच त्यांचें प्रेम लाभत असे, त्यांची सर्वांवरच कृपा असे; आणि कालाच्या ओघांत प्रत्येक गोष्टीचें जसें अध:पतन होत असतें तसेंच त्यांच्या संप्रदायाचेंहि घोर अध:पतन झालें असलें तरी आजहि त्यांचा संप्रदाय हा गरीब, दलित, दुर्बल, जातिबहिष्कृत, आणि समाजाने ज्यांचा त्याग केला आहे अशा सर्वांचें आश्रयस्थान आहे. पण त्याचबरोबर सत्य म्हणून मला पुढील गोष्ट सांगितलीच पाहिजे. तत्त्वज्ञानी संप्रदायांमधे विलक्षण उदारता आढळून येते; भारतांतील संप्रदायांत खरोखरीचा भेद आहे असें शंकराचार्यांचा कोणताहि अनुयायी म्हणणार नाही, पण त्याचबरोबर जातिभेदाच्या बाबतींत मात्र त्यांचीं मतें संकुचिततेला पोषक होतीं. उलटपक्षीं वैष्णव आचार्यांच्या उपदेशांत जातिभेदाच्या बाबतींत अत्यंत उदार मतें आढळतात, परंतु धर्माच्या बाबतींत मात्र त्यांचीं मतें संकुचित स्वरूपाचीं आहेत.

एकाच्या ठायीं अपूर्व बुद्धिमत्ता होती, तर दुसऱ्याजवळ विशाल हृदय होतें. आता अपूर्व बुद्धि व विशाल हृदय या दोहोंनी युक्त अशी

विभूति अवतीर्ण होण्याचा समय आला होता; ती विभूति अशी असावी की तिच्या ठायीं एकाच वेळीं शंकराचार्यांची अद्‌भुत बुद्धि व चैतन्य महाप्रभूंचें अत्यंत विशाल हृदय असावें; सर्व संप्रदायांत एकाच ईश्वराची शक्ति कार्य करीत आहे व प्रत्येक जीवांत तोच ईश्वर विराजमान आहे असा अनुभव तिला आलेला असावा; तिचें हृदय भारतांतील व भारता-बाहेरील सर्व दीन, दुर्बल, पतित व दलित यांच्याविषयीच्या कारुण्याने हेलावून जावें; आणि त्याचबरोबर तिच्या महान् तेजस्वी बुद्धीला, केवळ भारतांतीलच नव्हे, तर भारताबाहेरीलहि सर्व विरोधी संप्रदायां-मधे समन्वय घडवून आणतील असे उदार विचार स्फुरावे; आणि असा समन्वय साधून हृदय आणि बुद्धि या दोहोंचा सुंदर संगम घडवून आणणारा सार्वजनीन स्वरूपाचा धर्म तिने प्रस्थापित करावा. अशी विभूति आविर्भूत होण्याचा आता समय आला होता. अशी विभूति जन्माला आली आणि तिच्या पायांशीं बसून अनेक वर्षें शिक्षण घेण्याचें भाग्य मला लाभलें. अशी विभूति जन्माला येण्याची योग्य वेळ झाली होती, तसें प्रयोजन निर्माण झालें होतें, व ती विभूति अवतीर्ण झाली; आणि आश्चर्याची गोष्ट ही की, त्यांचें जीवितकार्य पाश्चात्त्य विचारांनी भरलेल्या, पाश्च्यात्त्य आदर्शांमागे पिसाटाप्रमाणे धांवणाऱ्या व कोणत्याहि भारतीय शहरापेक्षा वळणाने अधिक युरोपीय बनलेल्या अशा शहराजवळ सुरू झालें. त्यांना कोणतेंहि पुस्तकी शिक्षण लाभलें नव्हतें; अत्यंत बुद्धिमान् असूनहि आपलें नांव लिहावें एवढें शिक्षणहि त्यांना मिळालें नव्हतें. परंतु आमच्या विश्वविद्यालयांतील बुद्धिमान पदवी-धरांनाहि त्यांच्या ठायीं असामान्य बुद्धिमत्तेचा प्रत्यय येत असे. असे हे श्रीरामकृष्ण अगदी असामान्य होते. तो एक महान् इतिहासच होईल, आणि आज त्याविषयी कांही सांगण्यास मला वेळ नाही. म्हणून भार-तीय ऋषिपरंपरेचा ज्यांच्या जीवनांत पूर्ण विकास दिसून येतो त्या श्रीरामकृष्णांच्या नांवाचा आता केवळ निर्देश करून ठेवतों; ते या युगाचे आचार्य होत, त्यांची शिकवण आजच्या काळांत अत्यंत कल्याण-कारक आहे. आणि या महामानवांत कार्य करणारी ईश्वरी शक्ति ध्यानीं घ्या. एका गरीब भिक्षुकाचा मुलगा, अगदी अज्ञात व एकी-कडच्या खेड्यांत जन्मलेला, आज युरोप व अमेरिकेंत अक्षरशः हजारो

लोकांकडून पूजिला जात आहे, व उद्या आणखी हजारो लोक त्यास पूजितील. ईश्वरी योजना कोणाला कळणार ?

आता माझ्या बंधूंनो, या घटनेंत तुम्ही विधात्याची कांही योजना पाहूं शकत नसाल तर त्याचें कारण हें की तुम्हांला ती दृष्टि नाही, तुम्ही जणु जन्मांध आहांत. जेव्हा वेळ येईल आणि संधि लाभेल तेव्हा त्यांच्याविषयी मी तुम्हांला अधिक विस्तारपूर्वक सांगेन. मला आता एवढेंच सांगावयाचें आहे की, मी आपणांपुढे एखादा सत्य शब्द जर बोललों असेन तर तो त्यांचाच आहे, आणि मानवजातीसाठी कल्याण-प्रद नसलेलें असें असत्य वा चुकीचें जर मीं कांही सांगितलें असेल तर तें सर्व माझें आहे असें समजा; आणि त्या सर्वांची जबाबदारी माझ्यावर आहे.

# आपल्यापुढील कार्य

( मद्रास येथील ट्रिप्लिकेन साहित्य समितींत दिलेलें व्याख्यान )

जगांतील प्रगतीबरोबरच जीवनाची समस्या ही प्रतिदिनीं अधिकाधिक सखोल व व्यापक होत आहे. अतिप्राचीन काळीं, संपूर्ण विश्वांतील जीवनाच्या एकत्वाचें तत्त्व जेव्हा वेदान्ताने शोधून काढलें तेव्हापासूनच जीवनाचा मूलमंत्र व जीवनाचें सार हीं शिकविण्यांत आलीं आहेत. अखिल जगताला बरोबर घेतल्यावांचून या विश्वांतील एक अणुसुद्धा गतिमान् होऊं शकत नाही, सर्व जगाची आपल्याबरोबर उन्नति केल्यावांचून कोणत्याहि प्रकारची प्रगति होऊं शकणार नाही. तसेंच, कोणत्याहि समस्येची सोडवणूक जातीय वा राष्ट्रीय वा अन्य कोणत्याहि संकुचित भूमिकेवरून कधीहि होणार नाही हेंहि प्रतिदिनीं अधिकाधिक स्पष्ट होत आहे. प्रत्येक कल्पना सर्व जगाला सामावून घेईल एवढी व्यापक झाली पाहिजे; प्रत्येक आकांक्षा एवढी विशाल होणें आवश्यक आहे की ती अखिल मानवजातीलाच नव्हे तर अखिल जीवसृष्टीला देखील व्यापून टाकील. यावरून हें स्पष्ट होईल की गेल्या कांही शतकांत आपला देश प्राचीन कालाइतका महान् कां राहिला नाही. आपल्याला या अधोगतीचें एक कारण असें आढळून येईल की आपली दृष्टि व आपल्या कार्याचें क्षेत्र हीं दोन्हीं संकुचित झालीं.

एकाच मूळच्या मानववंशांतून निर्माण झालेल्या परंतु भिन्न अवस्था व भिन्न परिस्थिति यांत पडलेल्या अशा दोन विलक्षण जाति, आपल्या विशिष्ट पद्धतीने जीवनसमस्या सोडवूं लागल्या. ह्या दोन जाति म्हणजे प्राचीन ग्रीक व हिंदु ह्या होत. उत्तरेस हिमाच्छादित शिखरें असलेला हिमालय, निर्मल पाणी असलेल्या मैदानांतील सागरतुल्य नद्या, सृष्टीची परमसीमा दर्शविणारीं विशाल अरण्यें या साऱ्यांनी वेढल्यामुळे आर्य हे अंतर्मुख बनले; आर्यवंशामुळे स्वभावतःच लाभलेली कुशाग्र बुद्धिमत्ता व भोवतालचें भव्योदात्त सृष्टिसौंदर्य यांमुळे आर्य साहजिकच अंतर्मुख बनले. स्वतःच्या मनोव्यापारांच्या विश्लेषणाला भारतीय आर्यांनी

स्वत:ला वाहून घेतलें. दुसरीकडे ग्रीक लोकांनी जेथे वसती केली तो भूभाग भव्योदात्त असण्याऐवजी सुंदर होता; ग्रीक द्वीपसमूहांतील तीं बेटें सुंदर होतीं, भोवतालचा निसर्ग समृद्ध असला तरी साधाच होता. या सर्व गोष्टींमुळे ग्रीक लोकांची मनोवृत्ति सहजच बहिर्मुख बनली आणि ते बाह्य जगताच्या विश्लेषणाकडे वळले. यामुळे आपल्याला असें आढळून येतें की भारतांत सर्व विश्लेषणात्मक शास्त्रांचा उदय झाला व ग्रीसमधे बाह्य घटनांचें निरीक्षण करून सामान्यीकरण करणारीं सर्व भौतिक शास्त्रें जन्मास आलीं. हिंदु मन आपल्या विशिष्ट मार्गानें प्रगत झालें व अत्यंत आश्चर्यमुग्ध करणारे सिद्धान्त त्याने शोधून काढले. आजहि हिंदूंची तर्कशुद्ध विचारशक्ति व भारतीय बुद्धीचें विलक्षण सामर्थ्य हीं अतुलनीय आहेत. अन्य देशांतील मुलांशीं आपल्या देशांतील मुलांची स्पर्धा झाल्यास आपल्या देशांतील मुलें नेहमी सरस ठरतात. पण भारतावर मुसलमानांचें राज्य होण्याच्या सुमारें दोन शतकें पूर्वी ज्या वेळीं भारताची शक्ति लोप पावली त्या वेळीं भारतीय विचारसरणीच्या वैशिष्टयाचा इतका अतिरेक झाला की ती पतन पावूं लागली; आणि आपल्याला हें पतन गायन, कला, विज्ञान आदि सर्वच क्षेत्रांत पाहावयास सापडतें. कलेच्या क्षेत्रांत कोणतीहि व्यापकता, प्रमाणबद्धता वा कल्पनेची उदात्तता राहिली नाही, आणि सर्वच बाबतींत केवळ अलंकारप्रियताच वाढीस लागली; आपल्या जातीची मौलिकता—नवीन नवीन कल्पना प्रसवण्याची शक्ति जणुकांही लोप पावली. संगीताच्या क्षेत्रांतहि प्राचीन संस्कृत संगीतांतील हृदयाला हलवून सोडणारा भाव उरला नाही, तसेंच पूर्वी प्रत्येक स्वर आपापलें वैशिष्टय राखून जसा सुसंवाद निर्माण करीत असे तसें आता राहिलें नाही आणि स्वरांचें स्वतंत्र वैशिष्टयहि लोप पावलें. आजचें सर्व संगीत म्हणजे तुटक तुटक अशा सर्व स्वरांची खिचडीच बनलें आहे, त्यांत मिश्र स्वरांचा अस्ताव्यस्त गोंधळच दिसून येतो. संगीतांतील पतनाचेंच हें लक्षण आहे. याप्रमाणे आदर्शवादी विचारांचें तुम्हीं विश्लेषण केलें तर तुम्हांला आढळून येईल की त्यांत देखील मौलिकतेचा अभाव झालेला असून अलंकारप्रियतेकडे अधिक कल झुकत आहे. आणि आपलें वैशिष्टयपूर्ण कार्यक्षेत्र जो धर्म त्यांतहि अतिभयंकर असें पतन घडून आलेलें आहे. पाणी उजव्या हाताने प्यावें

की डाव्या, अशा क्षुल्लक समस्या घेऊन ज्या समाजाने शेकडो वर्षें वाद-विवादांत घालवलीं त्या समाजाकडून तुम्ही कसली अपेक्षा करूं शकाल? देशांतील अत्यंत विचारशील व्यक्ति शेकडो वर्षें स्वयंपाकघरांतील समस्यांवर--सोवळेंओवळें, शिवाशिवीचें प्रायश्चित्त इत्यादि गोष्टींवर वाद घालीत बसाव्यात यापेक्षा अधिक पतन कोणतें असूं शकेल? जगांत ईश्वरासंबंधीच्या व आत्म्यासंबंधीच्या आजवर उपदेशिल्या गेलेल्या तत्त्वांमधे सर्वांत उदात्त व सर्वांत श्रेष्ठ अशीं वेदान्ततत्त्वें नष्टप्राय झालीं, अरण्यांत दडून राहिलीं व केवळ थोड्याशा संन्याशांनी तीं जतन केलीं, आणि बाकीचे सर्व लोक खाद्याखाद्य, सोवळेंओवळें यांसारख्या क्षुल्लक प्रश्नांचा खल करण्यांत निमग्न झाले. मुसलमानांच्या विजयामुळे आपल्याला पुष्कळ चांगल्या गोष्टी प्राप्त झाल्या यांत शंका नाही. जगांतील अत्यंत साधारण मनुष्यसुद्धा सर्वांत उच्च अशा व्यक्तीलाहि कांहीतरी शिकवूं शकतोच; पण मुसलमान लोक भारतीय समाजांत नवीन शक्ति संचारित करूं शकले नाहीत. नंतर बऱ्यासाठी म्हणा किंवा वाइटासाठी म्हणा, आपला देश इंग्रजाकडून जिंकला गेला. अर्थात् एका देशाकडून दुसरा देश जिंकला जाणें हें वाईटच आहे; परकीय शासन हें वाईटच असतें यांत शंका नाही. पण अशा वाइटांतूनहि कांही वेळां चांगलें निष्पन्न होतें, आणि इंग्रजांच्या या विजयांतून निष्पन्न झालेली चांगली गोष्ट पुढीलप्रमाणे आहे. इंग्लंडच काय, पण अवघा युरोप सभ्यतेसाठी ग्रीस देशाचा ऋणी आहे. युरोपांतील प्रत्येक गोष्टीमधून ग्रीक सभ्यता व्यक्त होत असते. प्रत्येक वास्तूवर वा प्रत्येक वस्तूवर ग्रीसचा प्रभाव दिसून येतो. युरोपांतील कला व विज्ञान हीं वस्तुतः ग्रीसचींच आहेत. आज प्राचीन ग्रीक सभ्यता प्राचीन हिंदु सभ्यतेला या भारताच्या भूमीवर भेटत आहे, याप्रमाणे सावकाश व शांतपणें या दोन्ही सभ्यतांचें संमिश्रण होत आहे, आणि आपल्याला व्यापक बनविणारी व चैतन्यदायी अशी पुनरुत्थानाची जी चळवळ आपल्या भोवती दिसत आहे ती या संमिश्रणाचेंच फल होय. जीवनाकडे पाहण्याची व्यापक आणि उदार दृष्टि आपल्याला लाभत आहे, आणि जरी सुरवातीला भ्रांतीमुळे आपण आपले विचार संकुचित करण्याचा प्रयत्न केला तरी आता आपल्या ध्यानीं येत आहे की, या ज्या उदार प्रेरकशक्ति चोहोकडे कार्य करीत

आहेत व जीवनाविषयीच्या या ज्या व्यापक स्वरूपाच्या कल्पना आपल्यासमोर आहेत त्या साऱ्या आपल्या प्राचीन ग्रंथांमधून मांडलेल्या कल्पनांचीच स्वाभाविक परिणति आहेत. आपल्या पूर्वजांनी शोधून काढलेलीं मूलतत्त्वें जर तर्कशुद्ध रीतीने कृतींत आणलीं तर जीवनाविषयीची उदार, व्यापक दृष्टि स्वाभाविकपणेंच अंगीं बाणेल. व्यापक बनणें, संकुचित क्षेत्रांतून बाहेर पडणें, सर्वांशीं मिसळणें, हळूहळू विश्वाशीं एकरूप होणें हीं आपलीं अंतिम ध्येयें आहेत. आणि आपण मात्र सदासर्वदा आपल्या शास्त्रांतील उपदेशांच्या विरुद्ध वागून अधिकाधिक संकुचित बनत आहोंत आणि स्वतःला इतरांपासून वेगळें करीत आहोंत.

आपल्या मार्गांत कितीतरी धोके आहेत. आणि त्यांपैकी एक म्हणजे, या जगांत केवळ आपणच श्रेष्ठ लोक आहोंत ही अभिनिवेशपूर्ण कल्पना होय. भारताबद्दल अतिशय प्रीति, देशभक्ति व आपल्या पूर्वजांविषयी आदर बाळगूनहि मला वाटत आहे की आपल्याला इतर देशांकडून पुष्कळ गोष्टी शिकावयाच्या आहेत. ज्ञानप्राप्तीसाठी प्रत्येकाच्या पायाशीं बसण्याची आपली तयारी असली पाहिजे, कारण प्रत्येकजण आपल्याला उच्च प्रकारचें ज्ञान देऊं शकतो हें लक्षांत ठेवा. थोर स्मृतिकार मनु म्हणतात, "खालच्या जातींतील व्यक्तीपासूनहि चांगलें असेल तें घ्या, व अंत्यजाची देखील सेवा करून त्याच्यापासून स्वर्गप्राप्ति करून देणारी विद्या शिका." अतएव मनूचे खरे वंशज म्हणून आपण त्यांचा आदेश प्रमाण मानला पाहिजे व ऐहिक किंवा पारमार्थिक जीवनासंबंधीची शिकवण जो कोणी सुयोग्य असेल त्याच्याकडून प्राप्त करून घेतली पाहिजे. त्याचबरोबर आपल्याला हेंहि विसरून चालावयाचें नाही की जगाला देण्यासारखें थोर ज्ञान आपल्याजवळसुद्धा आहे. भारताबाहेरील जगाविना आपलें चालणार नाही; आपलें असें चालूं शकेल हा विचार मूर्खपणाचा होता व त्याचें प्रायश्चित्त एक हजार वर्षांच्या गुलामगिरीच्या रूपांत आपल्याला भोगावें लागलें आहे. आपण आपल्या देशाबाहेर गेलों नाहीं, आपल्या देशांतील परिस्थिति व अन्य देशांतील परिस्थिति यांचा तुलनात्मक अभ्यास केला नाही, आणि आपल्या भोवती काय चाललें आहे त्याकडे लक्ष दिलें नाही. हेंच भारतीय मनाच्या अधोगतीचें एक मोठें कारण आहे. आपण त्याबद्दल भरपूर प्रायश्चित्त भोगलें

आहे; यापुढे आपण पुनः असें करण्याचें टाळूं या. भारतीयांनी भारताबाहेर जाऊं नये अशा प्रकारच्या सर्व कल्पना बालिश आहेत, मूर्खपणाच्या आहेत. त्या मुळापासूनच नाहीशा केल्या पाहिजेत. भारताबाहेरील निरनिराळ्या देशांत तुम्ही जितका अधिक प्रवास कराल, तितकें तें तुम्हांला व तुमच्या देशाला हितावह आहे. गेलीं शेकडो वर्षे जर आपण असें केलें असतें तर आज भारतावर राज्य करूं पाहणाऱ्या कोणत्याहि देशाच्या पायांशीं बसण्याचा प्रसंग आपल्यावर येता ना. जीवनाचें पहिलें दृश्य चिन्ह म्हणजे विस्तार पावणें हें होय. तुम्हांला जगावयाचें असेल तर तुम्हीं विस्तार पावलेंच पाहिजे. ज्या क्षणीं तुमचें विस्तार पावणें थांबेल त्या क्षणीं मृत्यु निकट आहे, धोका जवळ आला आहे असें समजा. मी इंग्लंड-अमेरिकेला गेलों या गोष्टीचा तुम्हीं आताच उल्लेख केला; मला जाणेंच भाग होतें. कारण देशाच्या पुनरुत्थानाचें पहिलें लक्षण विस्तार पावणें हेंच होय. या राष्ट्रजीवनाचें पुनरुत्थान होत असतां आंतल्याआंत त्याचा विस्तार झाल्यामुळे मी जणु देशाबाहेर फेकलों गेलों आणि अशा प्रकारें हजारो जण बाहेर फेकले जातील. आपल्या राष्ट्राला जिवंत राहावयाचें असेल तर हें घडून आलेंच पाहिजे, हे माझे शब्द ध्यानांत ठेवा. म्हणून राष्ट्राच्या पुनरुत्थानाचें हें सर्वांत मोठें चिन्ह आहे, आणि या विस्तार पावण्यांतूनच एकंदर मानवी ज्ञानसंपदेंत आपल्याला घालावयाची भर व जगाच्या उन्नतीसाठी आपल्याला द्यावयाचें सहकार्य हीं दोन्हीं जगाला प्राप्त होत आहेत. आणि ही कांही नवीन गोष्ट नाही. हिंदु लोक नेहमीच आपल्या देशाच्या चारी भिंतींच्या आंत युगानुयुगें राहत आले आहेत असें तुमच्यापैकी ज्यांना वाटतें ते मोठी चूक करीत आहेत; तुम्हांला असें वाटत असेल तर, तुम्हीं आपल्या प्राचीन शास्त्रांचें अध्ययन केलें नाही, तुम्हीं आपल्या जातीच्या इतिहासाचा सम्यक् अभ्यास केला नाही असें म्हणावें लागेल. ज्या देशाला जिवंत राहावयाचें असेल त्याने इतर देशांना कांही ना कांही दिलेंच पाहिजे. जीवन दिल्याने जीवन प्राप्त होत असतें; तुम्हांला एखादी गोष्ट प्राप्त होते तेव्हा तुम्ही इतरांना कांहीतरी देऊन तिचें मूल्य चुकविलें पाहिजे. आपण कित्येक सहस्र वर्षे जिवंत आहोंत ही गोष्ट आपण अमान्य करूं शकत नाहीं; याचें एकच कारण हें की आपण बाहेरील जगाला सदैव कांहींतरी देत

आलों आहोंत, मग अज्ञ लोक कांहीहि समजोत. पण भारताने जगाला दिलेली देणगी ही धर्म, तत्त्वज्ञान व आध्यात्मिकता यांचीच आहे. आणि धर्माला आपल्या प्रसाराचा मार्ग मोकळा करण्यासाठी आघाडीवर सैन्य असण्याची आवश्यकता नाही. ज्ञान व तत्त्वज्ञान यांना दुसरीकडे जाण्यासाठी रक्ताचे पाट वाहवावे लागत नाहीत. ज्ञान व तत्त्वज्ञान हीं रक्ताळलेलीं मानवी शरीरें तुडवीत व हिंसा करीत करीत एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं जात नसून प्रेम व शांति यांच्या साहाय्याने तीं संक्रमित होत असतात; आणि नेहमीच असें घडत आलें आहे. याप्रमाणे आपल्याला नेहमीच द्यावें लागलें आहे. लंडनमधे एका तरुण स्त्रीने मला विचारलें, "तुम्हीं हिंदु लोकांनी काय केलें आहे? तुम्हीं कधीहि एक देश सुद्धा जिंकला नाही." शूर, साहसी क्षत्रिय इंग्रजांच्या दृष्टिकोनांतून हें सर्व बरोबर आहे; एखाद्या मनुष्याने दुसऱ्यावर विजय मिळविणें हेंच त्यांच्या दृष्टीने गौरवास्पद कार्य आहे. त्यांच्या दृष्टीनें हें ठीकच आहे. पण आमच्या दृष्टिकोनांतून तें अगदी चुकीचें आहे. भारताच्या महत्तेचें कारण कोणतें, असें मीं स्वतःस विचारलें तर उत्तर येईल की आपण कधीहि कोणाला जिंकलें नाही हेंच आपल्या महत्तेचें कारण आहे. त्यांतच आपला गौरव आहे. आपला धर्म जयिष्णु नाही अशी निंदा तुम्ही प्रतिदिनीं ऐकतां, आणि मला खेद वाटतो की ज्यांना अधिक कळावयास हवें असे लोकहि कधी कधी अशी निंदा करतांना आढळतात. मला वाटतें की नेमका हाच युक्तिवाद, आपला धर्म अन्य कोणत्याहि धर्मापेक्षा अधिक सत्य आहे हें सिद्ध करण्याकरिता योग्य ठरेल. आपल्या धर्माने दुसऱ्याला कधीहि जिंकलें नाहीं, कधी रक्तपात केला नाही, उलट त्याने सर्वांवर आशीर्वचनांचा, शांततेच्या, प्रेमाच्या व सहानुभूतीच्या शब्दांचाच नेहमी वर्षाव केलेला आहे. या भूमींत, आणि केवळ याच भूमींत परमतसहिष्णुतेच्या आदर्शाचा प्रथम प्रचार केला गेला आणि केवळ याच ठिकाणीं सहानुभूति व परमतसहिष्णुता प्रत्यक्ष व्यवहारांत उतरल्या. अन्य सर्व देशांत त्या केवळ सिद्धान्तांतच आढळतात. केवळ याच भूमींत हिंदूंनी मुसलमानांकरिता मशिदी बांधल्या व ख्रिस्ती लोकांकरिता प्रार्थनामंदिरें बांधून दिलीं.

याप्रमाणे तुम्हीं हें पाहिलें की आपला संदेश कितीदातरी जगाला

प्राप्त झाला, परंतु तो अगदी शांतपणें, हळुवारपणें व नकळत दिला गेला आहे. सर्वच बाबतींत भारताची कार्यपद्धति अशीच आहे. भारतीय विचार-सरणीचें वैशिष्ट्य हेंच आहे की ती मूक व शांत आहे. ह्याबरोबरच तिच्यांत विलक्षण शक्ति असूनहि ती हिंसेमधून कधीहि व्यक्त होत नाही. भारतीय विचारांतील शक्ति ही अशी मूक मोहिनीशक्ति आहे. एखाद्या परदेशीय मनुष्यानें आपलें वाङमय अभ्यासासाठी घेतलें, तर प्रथमदर्शनीं तें त्याला कंटाळवाणें वाटतें; कारण त्यांत परदेशीय वाङमयाप्रमाणे उत्तेजना नाही, चटकन् उत्तेजित करणारी तीव्र गति नाही. युरोपांतील दु:खपर्यवसायी नाटकांची आपल्या देशांतील तसल्या प्रकारच्या नाटकांशीं तुलना करा. पाश्चात्त्य दु:खपर्यवसायी नाटकें अत्यंत क्रियायुक्त असतात. तीं तुम्हांला थोडा वेळ उत्तेजित करतात. परंतु तीं संपतांच प्रतिक्रियेला सुरवात होते, आणि तुमच्या मेंदूंतून मग सर्वकांही पुसलें जातें. भारतीय दु:खपर्यवसायी नाटकें जादुगाराच्या शक्तीसारखीं असतात. तीं शांत व मूक अशीं असतात. पण तुम्ही त्यांचें जसजसें परिशीलन करीत जाल तसतशीं तीं तुमच्या मनाची पकड घेत जातात; मग तुम्ही हलूं शकत नाही, तुम्ही मुग्ध होतां. आणि ज्यांनी म्हणून आमच्या वाङमयांत प्रवेश करण्याचें धैर्य दाखविलें त्यांना या विलक्षण प्रभावाची जाणीव झाली, व ते त्या वाङमयांतच नित्य आसक्त राहिले. ऐकूं न येतां व न दिसतां हळुवारपणें पडणारे दंवबिंदु सुंदर गुलाबांना फुलवितात; जगाच्या विचारसंपदेला भारतानें दिलेली देणगी ही ह्या दंवबिंदूंप्रमाणेच आहे. भारताच्या विचारांचा प्रभाव शांत व नकळत पडणारा असूनहि तो सर्वशक्तिमान् आहे; त्यानें जगाच्या विचारांत क्रांति घडवून आणली आहे; ती कशी व केव्हा घडून आली हें मात्र कोणाला माहीत नाही. एकदा मला असें सांगण्यांत आलें, "भारतांतील कोणत्याहि ग्रंथाच्या लेखकाचें नांव शोधून काढणें हें किती अवघड आहे!" यावर मीं उत्तर दिलें, "हें भारतीय विचारसरणीला अनुसरूनच आहे." आजकालचे लेखक नव्वद टक्के कल्पना दुसऱ्याच्या चोरून घेतात व केवळ दहा टक्केच त्यांच्या स्वत:च्या असतात, आणि तरीहि प्रस्तावनेंत ते असा मजकूर लिहिण्याची दक्षता घेतात की "या सर्व मतांबद्दल मी जबाबदार आहें"! भारतांतील प्राचीन लेखक हे अशा आधुनिक लेखकांसारखे

नव्हते. त्या थोर लेखकांनी मानवांच्या मनावर महान् प्रभाव पाडला, पण आपल्या ग्रंथांवर स्वतःचा नामनिर्देश न करतांहि त्यांनी ग्रंथसंपत्ति निर्माण केली आणि भावी पिढ्यांसाठी ती ठेवून त्यांनी शांतपणें या जगाचा निरोप घेतला. आपल्या दर्शनांचे लेखक कोणाला माहीत आहेत? आपल्या पुराणांचे लेखक कोणाला ठाऊक आहेत ? व्यास, कपिल यांसारख्या सामान्य नांवांनी त्यांचा निर्देश होत असतो. ते श्रीकृष्णाचे खरे वारसदार होत. ते गीतेचे खरे अनुयायी होत. "तुम्हांला कर्मं करण्याचा अधिकार आहे, परंतु त्यांच्या फलांवर तुमचा अधिकार नाही" हा गीतेचा महान् संदेश त्यांनी प्रत्यक्ष आचरणांत आणला.

याप्रमाणे भारताचें सर्व जगावर कार्य होत आलें आहे. परंतु त्यासाठी एका गोष्टीची अपेक्षा असते. व्यापारी मालाप्रमाणे विचारदेखील कुणीतरी निर्माण केलेल्या मार्गांनीच एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं जाऊं शकतात. एका ठिकाणाहून दुसरीकडे विचारांचें संक्रमण होण्यापूर्वीहि मार्गाची सिद्धता ही असावीच लागते, आणि जेव्हा जेव्हा जगाच्या इतिहासांत एखादें विश्वविजयी राष्ट्र उदयास येतें, व जगांतील भिन्न विभागांना एकत्र जोडतें तेव्हा तेव्हा निर्माण झालेल्या या मार्गांनी भारतांतील विचारांचा प्रवाह वाहूं लागतो व सर्व मानववंशांच्या नसानसांतून तो प्रविष्ट होतो. बौद्धांच्या जन्मापूर्वीहि भारतीय विचार जगांतील देशांमधून प्रविष्ट झालेले होते अशा स्वरूपाचे पुरावे प्रतिदिनीं अधिकाधिक उपलब्ध होत आहेत. बौद्धधर्माच्या उदयापूर्वीहि वेदान्ताने चीनमधे, इराणमधे व पूर्वेकडील द्वीपसमूहांत प्रवेश केलेला होता. ज्या वेळीं ग्रीसमधील शक्तिशाली पुरुषांनी पौर्वात्य जगाचे भिन्न भिन्न विभाग एकत्र आणले त्या वेळींहि भारतीय विचार तेथे प्रविष्ट झाले. आणि आपल्या सभ्यतेचा गर्व वाहणारा ख्रिस्ती धर्म हा भारतीय विचारखंडांचा केवळ एक समूह आहे. बौद्धधर्म हा कितीहि महान् असला तरी तो आपल्याच धर्माचें एक बंडखोर संतान आहे; तसेंच ख्रिस्तीधर्म देखील आपल्याच धर्माचें एक अपूर्ण अनुकरण आहे. कालचक्र फिरून, आता पुनः तसाच समय आला आहे. आज इंग्लंडच्या भीमपराक्रमाने जगाचे विविध भाग एकत्र जोडले गेले आहेत. इंग्रजांचे वाहतुकीचे मार्ग रोमन लोकांप्रमाणे जमिनीपुरते मर्यादित नाहीत तर ते

समुद्रांतूनहि सर्व दिशांना पसरले आहेत. सागरांमहासागरांवरून इंग्रजांचे मार्ग गेलेले आहेत. जगाचा प्रत्येक भाग दुसऱ्या भागांशीं जोडला गेला असून वीज ही नवीन नेमलेल्या दूताप्रमाणे या सर्व भागांत फार मोठें कार्य करीत आहे. अशी अनुकूल परिस्थिति निर्माण झाल्यामुळे भारत पुन्हा जागृत होत आहे आणि जगाच्या सभ्यतेंतील व प्रगतींतील आपला वांटा उचलण्यास सिद्ध होत आहे. आणि प्रकृतिधर्मानुसारच मला इंग्लंड व अमेरिका या ठिकाणीं धर्माचा प्रचार करण्यासाठी जाणें भाग पडलें हें याचेंच फल होय. आपल्यापैकी प्रत्येकाच्या हें ध्यानीं यावयास हवें की आता योग्य वेळ आलेली आहे. सर्व ठिकाणीं आपल्याला अनुकूल अशीं चिन्हें दिसत आहेत, आणि भारतांतील तत्त्वज्ञानात्मक व आध्यात्मिक विचारांनी पुन्हा एकदा जगभर संचार करून विश्वविजय संपादन केला पाहिजे. म्हणून आपल्यापुढील समस्या दिवसेंदिवस व्यापक होत आहे. केवळ आपल्या देशांतच जागृति करावयाची आहे असें नाही; ती तर एक सामान्य बाब आहे; मी कल्पनाप्रिय आहें--आणि माझी कल्पना हिंदु-जातीने अखिल जगावर विजय मिळवावा ही आहे.

या जगांत महान् विजय मिळविणाऱ्या जाति होऊन गेलेल्या आहेत. आपणहि थोर जेते होतों. आपल्या विजयाचें वर्णन, भारताचा थोर सम्राट् अशोक याने 'धर्म व आध्यात्मिकता यांचा विजय' अशा शब्दांत केलेलें आहे. भारताने पुन्हा एकदा जगावर विजय मिळविलाच पाहिजे. माझ्या जीवनांतील हें एक स्वप्न आहे; आणि आज माझें भाषण ऐकत असलेल्या तुमच्याहि मनांत हेंच स्वप्न निर्माण व्हावें व त्याची प्रत्यक्षांत परिणति झाल्याशिवाय तुम्हीं थांबू नये अशी माझी इच्छा आहे. लोक तुम्हांला हरघडी सांगतील की प्रथम तुम्ही स्वतःच्या घराकडे चांगलें लक्ष द्या आणि नंतरच कार्य करण्यासाठी बाहेर पडा. पण मी तुम्हांला अगदी स्पष्ट शब्दांत सांगतों की जेव्हा तुम्ही दुसऱ्या-साठी कार्य करतां तेव्हाच तुम्ही सर्वोत्तम कार्य करीत असतां. ज्या वेळीं सागरपार होऊन तुम्हीं परकीय भाषेंतून आपल्या विचारांचा प्रचार करून दुसऱ्यांसाठी कार्य केलें त्या वेळींच तुम्हीं स्वतःसाठी सर्वोच्च कार्य संपादन केलें; आणि आपले विचार देऊन अन्य देशांतून ज्ञान-प्रसाराचें कार्य केल्याने आपल्या देशाचाहि कसा लाभ होऊं शकतो याचें,

ही सभाच एक उत्तम उदाहरण आहे. मीं आपलें कार्यक्षेत्र भारतापुरतेंच मर्यादित ठेवलें असतें तर, इंग्लंड व अमेरिका येथे मी गेल्यामुळे या देशांत जो कांही परिणाम घडून आला त्याच्या एकचतुर्थांशहि परिणाम घडून आला नसता. भारताचा सर्व जगावर विजय हेंच आपल्यासमोर महान् ध्येय आहे आणि प्रत्येकाने त्यासाठी तयार असलें पाहिजे. ह्याहून कांहीच कमी नको, आणि त्याकरिता आपण सिद्धता केली पाहिजे, प्रयत्नांची पराकाष्ठा केली पाहिजे. परकीय येथे येवोत व आपल्या सैन्याने देश भरून टाकोत; त्याची कांही पर्वा नाही. भारतीयांनो उठा व आपल्या आध्यात्मिक ज्ञानाने जग जिंकून घ्या ! आणि जसें ह्याच भूमींत प्रथम घोषित केलें गेलें, तदनुसार प्रेमाने द्वेषाला जिकलें पाहिजे, द्वेषाने द्वेषाला जिकतां येत नाही. जडवाद व तज्जन्य दुःखें यांचें निराकरण जडवादाने कधीहि होणार नाही. सैन्यें जेव्हा सैन्यांना जिंकू पाहतात तेव्हा त्यांची संख्या फुगत जाते व माणसें पशुतुल्य होऊन जातात. आध्यात्मिकतेने पाश्चात्त्य देशांवर जय मिळविला पाहिजे. त्यांनाहि हळूहळू हें उमजत आहे की राष्ट्र म्हणून जगावयाचें असेल तर आध्यात्मिकता अंगीं बाणविली पाहिजे. ते याविषयी उत्सुक असून याची ते प्रतीक्षा करीत आहेत. या ज्ञानाचा पुरवठा कोठून होणार ? भारताच्या प्राचीन थोर ऋषींचा संदेश घेऊन प्रत्येक देशांत जाण्यासाठी तयार असलेले लोक कोठे आहेत ? हा संदेश जगाच्या कान्याकोपऱ्यांत पोहचावा यासाठी सर्वस्वाचा त्याग करण्यास सिद्ध असलेलीं माणसें कोठे आहेत ? सत्याच्या प्रसारासाठी असे वीर पुरुष हवे आहेत. वेदान्तांतील थोर तत्त्वें व संदेश परदेशांत जाऊन विशद करण्यासाठी असेच शूर कार्यकर्ते हवे आहेत. जगाला हें हवें आहे, त्याविना जगाचा नाश ओढवेल. अवघें पाश्चात्त्य जगत् आज जणुकांही ज्वालामुखीच्या तोंडावर बसलें आहे; उद्याच त्याचा स्फोट होऊन त्याचे तुकडे तुकडे उडूं शकतील. जगाचा प्रत्येक कोपरान् कोपरा पाश्चात्त्यांनी धुंडाळला असूनहि त्यांना शांति लाभली नाही. सुखाचें आकंठ पान करूनहि त्यांची तृप्ति झाली नाही. भारताचे आध्यात्मिक विचार पाश्चात्त्य देशांत खोलवर रुजविण्याचें कार्य करण्याची हीच वेळ आहे. म्हणून मद्रासमधील तरुणांनो, विशेषतः ही गोष्ट लक्षांत ठेवण्यास मी तुम्हांला सांगत आहें. आपण आपल्या

देशाच्या बाहेर गेलें पाहिजे आणि आपल्या आध्यात्मिकतेने व तत्त्वज्ञानाने जग जिंकलें पाहिजे. दुसरा कांहीहि उपाय नाही, आपण हें केलें पाहिजे, अन्यथा नाश अटळ आहे. जागृत व प्रभावी राष्ट्रजीवन हवें असेल तर भारतीय विचारांनीं जगावर विजय मिळविला पाहिजे.

ह्याबरोबरच आपल्याला हेंहि विसरतां कामा नये की आध्यात्मिक विचारांनी जगावर विजय मिळविणें याचा अर्थ जीवनदायी सिद्धान्तांचा प्रचार करणें हा होय--शतकानुशतकें आपण उराशीं बाळगलेल्या शेंकडो खुळचट समजुतींचा प्रचार करणें नव्हे. या खुळचट समजुतींना तर ह्या भूमींतूनहि अशा प्रकारें दूर केलें पाहिजे की त्या कायमच्या नष्ट होतील. त्या आपल्या समाजाच्या पतनाचें कारण असून त्यांच्यामुळे मेंदु दुर्बल होत असतो. आपला मेंदू थोर व उदात्त विचार ग्रहण करण्यास असमर्थ होऊं नये, नवीन नवीन विचार करण्याची त्याची शक्ति लुप्त होऊं नये, त्याचें सर्व तेज नष्ट होऊं नये, धर्माच्या नांवाखाली क्षुद्र खुळचट समजुतींना कवटाळून त्याने स्वतःस दूषित करूं नये याची आपण काळजी घेतली पाहिजे. या आपल्या भारत देशांत आपल्यासमोर कितीतरी धोके आहेत. एकीकडे घोर जडवाद आहे, तर दुसरीकडे घोर अंधविश्वास आहे. हे दोन्ही धोके आपण टाळले पाहिजेत. आज अशीं कांही माणसें आढळतात कीं, पाश्चात्त्य ज्ञानाची मदिरा पिऊन उन्मत्त झाल्यामुळे त्यांना असें वाटतें की आपल्याला सर्वकांही कळलें आहे. हे लोक प्राचीन ऋषींना हसतात. त्यांच्या दृष्टीने सर्व हिंदुविचारसरणी म्हणजे केवळ एक भारूड आहे, हिंदु तत्त्वज्ञान म्हणजे बालकांची बडबड आहे, आणि हिंदु धर्म म्हणजे मूर्खांच्या अत्यंत खुळचट समजतींचें गाठोडें आहे. याउलट दुसरे कांही लोक आहेत; ते सुशिक्षित आहेत, पण ते एककल्ली आहेत; ते दुसऱ्या टोकाला जातात व प्रत्येक घटनेच्या शुभाशुभ फलाचें स्पष्टीकरण ते देऊं पाहतात. आपल्या विशिष्ट जातीच्या, आपल्या विशिष्ट देवतेसंबंधीच्या व आपल्या विशिष्ट खेड्यांतील सर्व खुळचट समजुतींचें ते तात्त्विक, आध्यात्मिक, आणि तऱ्हतऱ्हेचें बालिश स्पष्टीकरण देत असतात. त्यांच्या मतें खेचांतील प्रत्येक खुळचट समजूत ही वेदवाक्यासारखी असते, व तिचें पालन करण्यावर देशाचें सारें जीवन अवलंबून आहे असें त्यांना वाटतें. यापासून तुम्ही सावध असलें पाहिजे. खुळचट

समजुतींना कवटाळून बसणारे मूर्ख असण्यापेक्षा तुम्ही पूर्णपणें नास्तिक असलेले मला आवडेल, कारण नास्तिकांत एकप्रकारचें जीवन तरी आढळतें आणि त्याच्या उन्नतीची कांही आशा तरी असते. पण एकदा का अंधविश्वास शिरला की मेंदू निकामी बनतो, तो क्षीण होऊन जातो, व मग जीवनाचें अध:पतन सुरू होतें. हे दोन्ही धोके टाळा. आपल्याला आज शूरवीरांचीच गरज आहे. आपल्याला हवें आहे ताज्या दमाचें रक्त, शक्तिशाली स्नायु, लोखंडी मांसपेशी आणि पोलादी स्नायु. आता लेच्या-पेच्या कल्पना नकोत, त्या सर्व टाळा. चमत्कारांच्या वा गूढ गोष्टींच्या मागे लागूं नका. धर्मामधे त्यांना स्थान नाही. वेदान्त, वेद, संहिता वा पुराणें यांत असल्या गूढ गोष्टी आहेत काय? प्राचीन ऋषिवर्यांनी धर्माच्या प्रचारासाठी गुप्त मंडळें स्थापन केलीं होतीं काय? सगळ्या जगाला महान् सत्यें देण्यासाठीं त्यांनी हातचलाखी वा चमत्कार केल्याचा निर्देश आढळतो काय? गुप्त, गूढ गोष्टींच्या मागे लागणें आणि खुळ-चट समजुती बाळगणें हीं दौर्बल्याचीं लक्षणें आहेत, तीं नेहमीच पतनाचीं व मृत्यूचीं लक्षणें असतात. म्हणून त्यांच्यापासून सावध राहा. सामर्थ्य-शाली व्हा व स्वावलंबी बना. जगांत मोठमोठ्या व आश्चर्यकारक अशा गोष्टी आहेत. प्रकृतीची आपण जेवढी कल्पना करूं शकतो त्या दृष्टीने पाहतां आपण त्यांना प्रकृतीच्या पलीकडील वा अद्‌भुत म्हणूं शकूं, परंतु त्यांच्यापैकी एकहि गोष्ट गूढ नाही. या भारतभूमींत असें कधीहि सांग-ण्यांत आलेलें नाही की धर्मांतील सत्यें हीं गूढ आहेत, किंवा हिमालयाच्या शिखरावर वास करणाऱ्या कांही गुप्त मंडळांचाच त्यांच्यावर अधिकार आहे. मींहि हिमालयांत वास्तव्य केलेलें आहे. तुम्ही तेथे गेलेलां नाहीत; तुमच्या घरांपासून तो शेकडो मैल दूर आहे. मी एक संन्यासी आहें; आणि गेलीं चौदा वर्षें मी सतत प्रवास करीत आहें; पण मी सांगतों की अशा प्रकारचीं गूढ वा गुप्त मंडळें मला कोठेहि आढळलीं नाहीत. ह्या खुळ्या समजुतींच्या मागे लागूं नका. तुम्ही व तुमचा समाज, दोघेहि अगदी जडवादी झालांत तरी चालेल, निदान त्यामुळे तुमच्या ठायीं सामर्थ्य तरी राहील, पण तुम्ही जर या खुळचट समजुतींच्या मागे लागलांत तर मात्र तुमचें पतन व तुमचा मृत्यु अनिवार्य आहे. बलसंपन्न लोकांनी या खुळचट समजुतींचा खल करण्यांत व अत्यंत खुळ्या समजुतींचीं रूपकात्मक

स्पष्टीकरणें शोधून काढण्यांत आपला वेळ खर्च करावा ही गोष्ट समस्त मानवजातीला लज्जास्पद अशी आहे. धीट व्हा; प्रत्येक समजुतीचें अशा-प्रकारें स्पष्टीकरण देण्याचा प्रयत्न करूं नका. वस्तुस्थिति अशी आहे की आपल्यामधे पुष्कळच भोळचा समजुतीं आहेत, आपल्या समाजरूपी शरीरावर कितीतरी फोड व व्रण आहेत; ते कापून काढून नष्ट केले पाहिजेत; पण त्यामुळे आपला धर्म, आपलें राष्ट्रीय जीवन व आपली आध्यात्मिकता यांचें कांहीहि नुकसान होणार नाही. धर्माचीं सर्व मूलतत्त्वें सुरक्षित आहेत आणि एकदा हे दुष्ट व्रण नाहीसे झाले की हीं मूलतत्त्वें अधिक तेजाने चमकूं लागतील. या तत्त्वांनाच तुम्ही चिकटून राहा.

आमचाच धर्म सार्वजनीन धर्म आहे असा दावा प्रत्येक धर्माच्या वतीने मांडण्यांत येतो हें तुम्हांला माहीतच आहे. सुरवातीलाच मला तुम्हांला हें सांगितलें पाहिजे की, संभवतः कोणताच धर्म कधीहि सार्व-जनीन धर्म होऊं शकत नाही, पण असा दावा सांगूं शकणारा एखादा धर्म असेल तर तो केवळ आपलाच धर्म आहे, दुसरा नाही; कारण अन्य प्रत्येक धर्म हा एका वा अनेक विशिष्ट व्यक्तींवर अवलंबून आहे. अन्य सर्व धर्म हे ऐतिहासिक मानल्या गेलेल्या व्यक्तींच्या जीवनाभोवती गुंफलेले आहेत; या धर्मांना असें वाटतें की यांतच आपली शक्ति आहे, पण वास्तविक पाहतां त्यांतच त्यांचें दौर्बल्य आहे; कारण अशा व्यक्तींची ऐतिहासिकता असत्य ठरली की या धर्मांचा सर्व डोलारा कोसंळून पडतो. या थोर धर्मसंस्थापकांची अर्धीअधिक जीवनें असत्य सिद्ध झालीं आहेत, आणि उरलेल्या अर्ध्या भागाबद्दल बळकट संशय घेण्यांत येत आहे. म्हणून ज्या सत्यांचें प्रामाण्य केवळ त्यांच्याच शब्दांवर अवलंबून होतें तीं सर्व सत्यें हवेंत विरून जात आहेत. पण आपल्या धर्मांत अशा अनेक व्यक्ति होऊन गेलेल्या असल्या तरी आपल्या धर्मांतील सत्यें त्यांच्यावर अव-लंबून नाहीत. श्रीकृष्णाची थोरवी ते श्रीकृष्ण होत यांत नसून ते वेदान्ताचे थोर आचार्य होत यांत आहे. ते तसे नसते तर बुद्धदेवांप्रमाणे त्यांचाहि नामनिर्देश या देशांत शिल्लक राहिला नसता. याप्रमाणे आपली निष्ठा ही नेहमीच तत्त्वांवर राहिलेली आहे, व्यक्तींवर नाही. व्यक्ति ह्या केवळ तत्त्वांच्या साकार मूर्ति वा उदाहरणें होत. तत्त्वें जर सुरक्षित असतील तर हजारो, लाखो व्यक्ति निर्माण होतील. तत्त्व जर सुरक्षित

असेल तर गौतमबुद्धांसारख्या शेकडो हजारो व्यक्ति जन्माला येतील. परंतु जर तत्त्व लुप्त वा विस्मृत झालेलें असेल आणि सर्व राष्ट्रीय जीवन जर तथाकथित ऐतिहासिक व्यक्तींभोवती घोटाळत राहील, तर अशा धर्माची अवनति अनिवार्य आहे, असा धर्म धोक्यांत आल्यावांचून राहणार नाही. केवळ आपलाच धर्म असा आहे की जो एखाद्या वा अनेक व्यक्तींवर आधारलेला नसून तत्त्वांवर आधारलेला आहे. त्याबरोबरच त्यांत लक्षावधि व्यक्तींना--महापुरुषांना--वाव आहे. नूतन महापुरुषांना वा अवतारांनाहि त्यांत भरपूर वाव आहे, पण त्यांच्यापैकी प्रत्येकजण या शाश्वत तत्त्वांचें उदाहरण असला पाहिजे हें आपण विसरून चालणार नाही. आपल्या धर्माचीं हीं सर्व तत्त्वें सुरक्षित आहेत, आणि तीं सुरक्षित राखणें हें प्रत्येकाचें जीवितकार्य झालें पाहिजे; युगायुगांतून साठणाऱ्या धुळीपासून व दोषांपासून आपण त्यांचें संरक्षण केलें पाहिजे. आपल्या समाजाची वारंवार अधोगति होत असतांनाहि वेदान्ताचीं तत्त्वें कधीहि मलिन झालेलीं नाहीत हीं आश्चर्याची गोष्ट आहे. अत्यंत दुष्ट व्यक्तीने देखील त्यांना कलंकित करण्याचें धाडस केलेलें नाही. आपलीं शास्त्रें हीं जगांतील सर्वांत सुरक्षित अशीं शास्त्रें आहेत. इतर ग्रंथांशीं तुलना केली असतां, त्यांच्यांत प्रक्षिप्त गोष्टी, अर्थाची ओढाताण, वा त्यांतील आशय नष्ट करण्याचा प्रयत्न दिसत नाही. प्रथम त्यांचें जसें स्वरूप होतें, अगदी तसेंच तें अजूनहि आहे, व हीं शास्त्रें मानवांना त्याच ध्येयाच्या दिशेने अजूनहि घेऊन जात आहेत.

या ग्रंथांवर निरनिराळ्या भाष्यकारांनी भाष्यें लिहिलेलीं आहेत, थोर आचार्यांनी त्यांचा प्रचार केला आहे, त्यांवर विविध संप्रदायहि आधारले गेले आहेत, आणि तुम्हांला असें आढळेल की या वेदग्रंथांत वरपांगी विरोधी वाटणारे विचारहि आहेत. या वेदग्रंथांतील कांही श्लोक पूर्ण द्वैतवादी आहेत, तर दुसरे कांही श्लोक पूर्ण अद्वैतवादी आहेत. द्वैतवादी भाष्यकार हा द्वैताहून दुसरें कांही समजूं शकत नाही; तो अद्वैतमूलक उतारे दडपून टाकूं पाहतो. द्वैतवादी आचार्य व पुरोहित हे त्यांचा अर्थ द्वैतमताप्रमाणे लावण्याचा प्रयत्न करतात. अद्वैतवादी भाष्यकार द्वैतमूलक उताऱ्यांची अशाच प्रकारें संभावना करतात. हा कांही वेदांचा दोष नव्हे. सर्व वेदच द्वैतवादी आहेत असें सिद्ध करण्याचा

प्रयत्न करणें मूर्खपणाचें आहे. तसेंच, सर्व वेद पूर्णपणें अद्वैतमूलक आहेत असें सिद्ध करण्याचा प्रयत्न करणें हेंहि तितकेंच मूर्खपणाचें आहे. वेद हे द्वैत व अद्वैत अशा दोन्ही विचारसरणींनी युक्त आहेत. नव्या कल्पनांच्या आधारें आज आपण त्यांना अधिक चांगल्या रीतीने समजूं शकतों या नवीन कल्पनांनी आपण या निष्कर्षाप्रत पोहोचतों कीं द्वैत-मूलक, अद्वैतमूलक अशीं सर्वच तत्त्वें मनाचा पायरीपायरीने विकास होण्यासाठी आवश्यक आहेत, आणि म्हणूनच वेदांनी त्यांचा पुरस्कार केलेला आहे. मानवजातीवर कृपा करून वेदांनी सर्वोच्च ध्येयाप्रत नेणाऱ्या या विविध पायऱ्या दाखविलेल्या आहेत. या पायऱ्या कांही परस्परविरोधी नाहीत; त्या म्हणजे लहान बालकांना भुलविण्यासाठी वेदांनी योजिलेले निरर्थक शब्द नाहीत; त्या पायऱ्या केवळ मुलांनाच उपयुक्त आहेत असें नव्हे, तर अनेक प्रौढ माणसांना देखील त्या उपयुक्त आहेत. जोंपर्यंत आपण शरीरधारी आहोंत, जोंपर्यंत आपण देहालाच आत्मा मानण्याच्या भ्रमांत पडलेलों आहोंत, जोंपर्यंत आपण पंचेंद्रियबद्ध आहोंत आणि जोंपर्यंत आपल्याला बाह्य सृष्टि दिसत आहे, तोंपर्यंत आपल्याला सगुण ईश्वर मानणें भाग आहे कारण या सर्व गोष्टी जर आपण सत्य मानल्या, तर रामानुजाचार्यांनी दाखवून दिल्या-प्रमाणे आपल्याला ईश्वर, प्रकृति, जीवात्मा या तिन्ही गोष्टी सत्य मानणें भाग आहे. या तीन गोष्टींपैकी एक जर तुम्हीं सत्य मानली तर सर्व त्रयी तुम्हांला सत्य मानावीच लागते. तें तुम्ही टाळूं शकत नाही. म्हणून जोंवर तुम्हांला बाह्य जगाचा अनुभव येत आहे तोंवर सगुण ईश्वर व जीवात्मा हे अमान्य करणें वेडेपणाचें आहे. पण ऋषींच्या जीवनांत असेहि क्षण येतात की ज्या वेळीं मानवी मन आपल्या मर्यादांच्या पलीकडे जातें, मनुष्य प्रकृतीच्या बंधनांच्या पार होतो व सर्वा-तीत प्रदेशांत प्रविष्ट होतो. या सर्वातीत सत्तेविषयी वेदांनी म्हटलें आहे, "जेथे पोहोचूं न शकल्यामुळे वाणी मनासह परत येते"; "तिथे डोळे, वाणी व मन पोहोचूं शकत नाहीत"; "त्याचें ज्ञान आपल्याला झालें असें आपण म्हणूं शकत नाहीं, त्याचें ज्ञान झालें नाही असेंहि आपण म्हणूं शकत नाहीं." ह्या ठिकाणीं मानवी आत्मा सर्व बंधनातीत होतो, आणि केवळ अशाच वेळीं त्याच्या ठायीं अद्वैताचें पुढील मूलतत्त्व

स्फुरतें : 'मी व सर्व विश्व एकच आहे; मीं व ब्रह्म एकच आहे.' आणि तुम्हांला आढळून येईल की केवळ ज्ञान व तत्त्वज्ञान यांच्या योगानेच या निष्कर्षाप्रत पोहोचतां येतें असें नव्हे, तर भक्तीच्या सामर्थ्यानेहि त्याच्याप्रत पोहोचतां येतें. भागवतांत तुम्हांला वाचावयास मिळतें की जेव्हा कृष्ण अंतर्धान पावला व गोपी शोकाकुल झाल्या तेव्हा कृष्णाविषयीचे विचार त्यांच्या मनांत एवढे तीव्र झाले की त्यांच्यापैकी प्रत्येक गोपी देहभान विसरली व 'मी कृष्ण आहें' अशी तिची धारणा झाली, तिने कृष्णासारखा साज करून कृष्णासारखी क्रीडा करण्यास सुरवात केली. यावरून आपल्या हें ध्यानांत येतें की ही एकत्वानुभूति भक्तींतूनहि प्राप्त होते. पूर्वी एक पर्शियन सुफी कवि होऊन गेला. त्याने आपल्या एका कवितेंत म्हटलें आहे, "मीं माझ्या प्रियेकडे गेलों व पाहिलें तों दार बंद असल्याचें दिसलें; मीं दार ठोठावलें तेव्हा आंतून आवाज आला, 'कोण आहे?' 'मी आहें'--मीं उत्तर दिलें. दरवाजा उघडला गेला नाही. दुसऱ्यांदा पुन्हा मी गेलों, मीं दार ठोठावलें, पुन्हा तोच प्रश्न विचारला गेला, 'कोण आहे?' मीं उत्तर दिलें, 'मी अमुक अमुक आहें.' दार उघडलें गेलें नाही. तिसऱ्या वेळेस मी गेलों. त्या वेळीं तेच शब्द आले, 'कोण आहे?' 'प्रिये, मी तूंच आहें'--असें मीं उत्तर दिलें आणि दार उघडलें गेलें."

याप्रमाणे अनुभूतींच्या विविध पायऱ्या वा अवस्था आहेत; त्यांच्याविषयी आपण वाद करीत बसण्याचें कारण नाही; आपल्या अत्यंत आदरणीय अशा प्राचीन भाष्यकारांत तीव्र मतभेद असले तरीहि आपण वाद करीत बसण्याचें कारण नाही, कारण ज्ञान हें अमर्याद आहे, आणि सर्वज्ञता ही कांही आजच्या वा प्राचीन काळच्या कोणा विशिष्ट व्यक्तीची मक्तेदारी नाही. प्राचीन काळीं ऋषि, मुनि होऊन गेले असतील तर आताहि पुष्कळ होतील याविषयी खात्री बाळगा. प्राचीनकाळीं व्यास, वाल्मीकि व शंकराचार्य होऊन गेले असतील, तर तुमच्यापैकी प्रत्येकाने शंकराचार्य कां होऊं नये? आपल्या धर्माचें आणखी एक वैशिष्टच तुम्हीं ध्यानीं घेतलें पाहिजे. अन्य सर्व धर्मग्रंथांमधून ईश्वरी आदेश लाभलेल्या व्यक्तींचे शब्दच त्या ग्रंथांचें प्रमाण होत असें सांगितलें आहे. त्यांच्यामतें असे आदेश फारच थोड्या व्यक्तींना लाभत असतात, आणि

त्यांच्याच द्वारें सत्यें हीं सामान्य जनापर्यंत पोहोचत असतात व आपणां सर्वांना या व्यक्तींचे शब्द मानावेच लागतात. नाझरेथच्या येशूंना सत्याची अनुभूति झाली आणि आपण सर्वांनी त्यांचे शब्द मानलेच पाहिजेत असें ख्रिस्तीधर्म सांगतो. पण आपला धर्म म्हणतो की भारतांतील प्राचीन ऋषींना---मंत्रद्रष्टयांना---सत्याचें दर्शन झालें, तसेंच तें भावी काळांतील सर्व ऋषींनाहि होईल. केवळ बडबड करणारे, केवळ शास्त्रपाठ करणारे, कोरे पंडित, शब्दशास्त्री, अशा लोकांना सत्याचें दर्शन होणार नाही, तर तें केवळ मंत्रद्रष्टया ऋषींनाच होईल.

'नायमात्मा प्रवचनेन लभ्यो न मेधया न बहुना श्रुतेन ।'

---अर्थात् 'हा आत्मा फार बोलण्याने अथवा बुद्धिकौशल्याने अथवा वेदांच्या पठनाने प्राप्त होणार नाही.' स्वत: वेदच असें सांगत आहेत. 'वेदांच्या पठनानेहि हा आत्मा प्राप्त होणार नाही'---असें धीटपणाचें विधान तुम्हांला दुसऱ्या कोणत्याहि धर्मग्रंथांत आढळेल काय ? तुम्हीं आपलें हृदय खुलें केलें पाहिजे. प्रार्थनामंदिरांत जाणें वा कपाळावर टिळे लावणें, किंवा विशिष्ट पद्धतीने वेषभूषा करणें म्हणजे धर्म नव्हे; तुम्ही स्वत:ला इंद्रधनुष्याच्या सर्व रंगांनी चित्रित करूं शकाल; पण तुमचें हृदय खुलें झालें नसेल, तुम्हांला ईश्वराची अनुभूति झाली नसेल तर हें सर्व अवडंबर व्यर्थ आहे. हृदय जर ईश्वराच्या रंगाने रंगलें असेल तर त्याला बाह्य रंगांची जरूरी राहणार नाही. तात्पर्य हेंच कीं धर्माची प्रत्यक्ष अनुभूति झाली पाहिजे. आपण हें विसरतां कामा नये कीं, रंग आदि बाह्य गोष्टी जोंवर आपल्या आध्यात्मिक उन्नतीस साहाय्यक आहेत तोंवर त्या चांगल्या आहेत, तोंवर त्या सर्व स्वागतार्ह आहेत. पण त्यांच्यांतील सारतत्त्व निघून जाण्याचें भय असतें आणि मग त्या आध्यात्मिक उन्नतीस साहाय्य करण्याऐवजी अडथळा उत्पन्न करतात. अशा वेळीं मनुष्य बाह्य अवडंबरासच धर्म मानूं लागतो. मंदिरांत जाणें व पुरोहिताला दक्षिणा देणें यालाच तो धर्म समजूं लागतो. ह्या गोष्टी अनिष्टकारक व विघातक आहेत, आपण त्यांना तात्काळ आळा घातला पाहिजे. आपलीं शास्त्रें पुन:पुन: घोषित करतात की इंद्रियांच्या द्वारें लाभणारें ज्ञान म्हणजे कांही धर्म नव्हे. ज्यामुळे त्या अविकारी आत्मतत्त्वाची अनुभूति येते तो धर्म होय, आणि प्रत्येकाच्या

पक्षीं हाच खरा धर्म आहे. ज्याला इंद्रियातीत सत्याची अनुभूति झालेली आहे, ज्याने स्वत:मधे आत्मतत्त्वाचा साक्षात्कार करून घेतला आहे, ज्याने ईश्वराला प्रत्यक्ष पाहिलें आहे व ज्याला सर्वभूतीं ईश्वराचें दर्शन होत आहे तो 'ऋषि' झाला असें समजावें. आणि जोंवर तुम्ही 'ऋषि' होत नाही तोंवर तुमच्या धार्मिक जीवनास प्रारंभ होत नाही. 'ऋषि' झाल्यावरच तुमचें धार्मिक जीवन सुरू होईल, सध्या तुम्ही त्या जीवनाची केवळ पूर्वतयारी करीत आहांत असें म्हणतां येईल. 'ऋषि' झाल्यावरच तुमच्या धार्मिक जीवनाचा उदय होईल; तोंवर केवळ बौद्धिक कसरत व कायिक कष्ट एवढेंच तुमच्या प्रयत्नाचें स्वरूप असतें.

म्हणून आपण हें लक्षांत ठेवलेंच पाहिजे की ज्याला म्हणून मोक्ष हवा असेल त्याने 'ऋषित्व' प्राप्त करून घेतलें पाहिजे, त्याने मंत्रद्रष्टा झालें पाहिजे, त्याला ईश्वराचें दर्शन झालें पाहिजे असें आपला धर्म आपल्याला स्पष्ट व नि:संदिग्ध शब्दांत सांगतो. यालाच मोक्ष असें म्हणतात. हाच आपल्या शास्त्रांचा सिद्धान्त आहे.

आता, आपल्याला स्वत:च्या बुद्धीने शास्त्रांचें परिशीलन करणें सोपें होईल; आता आपण स्वत:च त्यांचा अर्थ समजूं शकूं, त्यांचें विश्लेषण करून आपल्याला ज्या गोष्टींचें प्रयोजन असेल तेवढ्या आपण ग्रहण करूं शकूं; आपण स्वत:च सत्य समजून घेऊं शकूं. आपण असेंच केलें पाहिजे. त्याबरोबरच प्राचीन ऋषींबद्दल, त्यांच्या कामगिरी-बद्दल आपण सर्वप्रकारें आदर बाळगला पाहिजे. हे प्राचीन ऋषि थोर होते, पण आपल्याला त्यांच्याहून अधिक थोर व्हावयाचें आहे. त्यांनी प्राचीन काळीं मोठें कार्य केलें, पण आपण त्यांच्याहिपेक्षा अधिक प्रभावी कार्य केलें पाहिजे. प्राचीन काळीं भारतांत शेकडो ऋषि होते; आता आपल्यामधून लक्षावधि ऋषि उदयास येतील--होय, ते निश्चितच उदयास येतील. आणि जेवढ्या लवकर यावर तुमच्यापैकी प्रत्येकाचा विश्वास बसेल तेवढें भारताच्या व जगाच्या दृष्टीने हिताचें होणार आहे. जशी तुमची श्रद्धा असेल तसे तुम्ही व्हाल. आपण ऋषि व्हावें अशी तुमची श्रद्धा असेल तर तुम्ही उद्याच ऋषि व्हाल. तुम्हांला कोणीहि अडवूं शकणार नाही. कारण वरपांगी विरोधी दिसणाऱ्या व भांडणाऱ्या आपल्या सर्व संप्रदायांमधे जें एकच समान तत्त्व विद्यमान आहे तें हेंच

की सर्व ऐश्वर्य, सामर्थ्य व पावित्र्य हीं आत्म्यामधे मूलतःच वसत आहेत; फक्त, रामानुजाचार्यांच्या मतें या आत्म्याचा कधी संकोच व कधी विस्तार होतो, तर 'हे सर्व विकार म्हणजे भ्रम होत' असें शंकराचार्यांचें मत आहे. या मतभेदांकडे लक्ष देऊं नका. व्यक्त असो की अव्यक्त असो, सामर्थ्य हें आत्म्यांतच आहे हें सर्वांनाच मान्य आहे. आणि यावर जेवढ्या लवकर तुम्ही विश्वास ठेवाल तेवढें तुमचें हित होईल. तुमच्यांतच सर्व शक्ति आहे, तुम्ही सर्वकांहीं करूं शकतां यावर श्रद्धा ठेवा; 'आपण दुर्बल आहोंत' असें समजूं नका; आजकाल आपल्याला वाटत असतें तसें स्वतःला वेडे वा अर्धवट समजूं नका. कोणाच्या मार्गदर्शनावांचूनहि तुम्ही कोणतीहि गोष्ट करूं शकाल. सर्व प्रकारचें सामर्थ्य तुमच्यांत वसत आहे. उठून उभे राहा आणि स्वतःमधील ईश्वरत्व प्रकट करा.

---

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ..................... दि: .....................
क्रमांक ..................... ग्रं. दि. .....................

# भारताचा भावी काळ

( मद्रास येथे दिलेलें व्याख्यान )

अन्य कोणत्याहि देशांत प्रकट होण्यापूर्वी ज्ञानाने जेथे वास्तव्य केलें तो हा प्राचीन भारत देश होय. ह्या भारतांत वाहणाऱ्या सागर-तुल्य नद्या ह्या येथील आध्यात्मिक प्रवाहाचीं जणु भौतिक स्वरूपांतील प्रतीकेंच होत; या भारतांतील हिमाच्छादित शिखरांनी शोभिवंत दिसणाऱ्या हिमालयाच्या एकाहून एक उंच होत जाणाऱ्या असंख्य रांगा ह्या जणु स्वर्गांतील रहस्यांचा शोध घेत आहेत. ज्याची भूमि सर्वश्रेष्ठ ऋषिवर्यांच्या चरणरजांनी पवित्र झाली तोच हा भारत देश होय. मानवाच्या स्वरूपाचें व अंतर्जगतांतील रहस्यांचें अनुसंधान याच भारतांत प्रथम सुरू झालें. ह्याच भारतांत प्रथम आत्म्याचें अमरत्व, सर्वसाक्षी ईश्वराचें अस्तित्व, समस्त प्रकृतींत व समस्त जीवांत ओतप्रोत भरलेला ईश्वर यांसंबंधीचे सिद्धान्त उदयास आले; धर्म व तत्त्वज्ञान यांतील सर्वोच्च आदर्श ह्या भारतांतच चरम अवस्थेप्रत पोहोचले. याच भूमी-मधून तत्त्वज्ञान व धर्म ह्यांनी महापुराप्रमाणे वेगाने बाहेर पडून सर्व जग वारंवार व्यापून टाकलें होतें; आणि ह्याच भूमींतून, जीर्ण झालेल्या विभिन्न मानववंशांना नवजीवन व शक्ति प्रदान करण्यासाठी, पुन्हा एकदा तसाच महापूर वाहूं लागला पाहिजे. शतकानुशतकें होत आलेले आघात, परकीयांच्या शेकडो स्वाऱ्या आणि चालीरीतींमधे झालेले शेकडो बदल या सर्वांना पुरून उरणारा हाच भारत देश होय. ही भूमि आपल्या अमर शक्तीनिशीं व अविनाशी जीवनानिशीं जगांतील कोण-त्याहि पर्वताहून अधिक दृढपणें उभी आहे. तिचें जीवन आत्म्याप्रमाणेच अनादि, अनंत व अविनाशी आहे. आपण अशा या भारतभूमीचे सुपुत्र आहोंत.

भारताच्या सुपुत्रांनो, आज मी तुमच्यापुढे प्रत्यक्ष करावयाच्या कांही गोष्टींविषयी बोलण्यासाठी येथे उभा आहें, आणि तुमच्या प्राचीन वैभवाचें तुम्हांला स्मरण करून देण्यांतहि माझा हेतु हाच आहे. पुष्कळदा

मला असें सांगण्यांत आलें आहे की, भूतकाळाकडे पाहत राहिल्याने अधोगति होते व कांहीच साध्य होत नाही, आणि म्हणूनच आपण नेहमी भविष्यकाळाकडे नजर ठेवली पाहिजे. हें खरें आहे. पण भूतकाळाच्या पायावरच भविष्याची उभारणी होत असते. म्हणून शक्य तेवढा भूतकाळाचा मागोवा घ्या; भूतकालांतील ज्ञानाच्या शाश्वत झऱ्यांचें जल आकंठ प्राशन करा, आणि मग समोर पाहा, प्रगतिपथावर पुढे पुढे चला व भारताला पूर्वीपेक्षाहि अधिक तेजस्वी, अधिक थोर व अधिक उन्नत बनवा. आपले पूर्वज थोर होते याचें प्रथम आपण स्मरण ठेवलें पाहिजे. आपण आपल्या जीवनाचे आधारभूत घटक समजून घेतले पाहिजेत, आपल्या शिरांमधून कोणतें रक्त वाहत आहे हें आपण जाणून घेतलें पाहिजे; त्या रक्तावर व त्याने प्राचीनकाळीं बजावलेल्या कामगिरीवर आपली श्रद्धा असली पाहिजे; आणि ही श्रद्धा व प्राचीन महत्तेची ही जाणीव यांच्या बलावर आपण पूर्वीपेक्षाहि अधिक थोर अशा भारताची उभारणी केली पाहिजे. भारताच्या अवनतीचे व पतनाचे कालखंडहि होऊन गेले आहेत. मी त्यांना फारसें महत्त्व देत नाहीं; आपणां सर्वांना ते ठाऊक आहेतच. असे कालखंड आवश्यक होते. एखादा प्रचंड वृक्ष सुंदर व परिपक्व फल निर्माण करतो. तें फल जमिनीवर पडतें, कुजतें व त्यांतून भावी वृक्षाचा अंकुर वर येतो व तो वृक्ष पहिल्याहूनहि कदाचित् अधिक प्रचंड होतो. ह्या ज्या पतनाच्या कालखंडांतून आपल्याला जावें लागलें, तो आवश्यकच होता. ह्या पतनांतूनच भावी काळांतील भारत जन्माला येत आहे, तो अंकुरित होत असून त्याचीं पहिलीं कोवळीं पानें केव्हाच बाहेर पडलेलीं आहेत, आणि एक बलवान, विशाल व ऊर्ध्वमूल असा अश्वत्थ वृक्ष येथे दिसूं लागलेला आहे; आणि त्याच्याविषयीच मला तुमच्याशीं आज बोलावयाचें आहे.

भारतापुढील समस्या अन्य कोणत्याहि देशांतील समस्यांहून अधिक गुंतागुंतीच्या असून अधिक महत्त्वाच्या आहेत. वंश, धर्म, भाषा व शासन या सर्वांनी राष्ट्र बनत असतें. जगांतील इतर राष्ट्रांचे घटक पाहिल्यास ते फार थोडे असल्याचें दिसतें; ह्या दृष्टीने एकेका देशाशीं आपल्या देशाची तुलना करतां येईल. या ठिकाणीं आर्य, द्रविड, तार्तर, तुर्क, मोगल, युरोपीय आदि जगांतील प्राय: सर्व वंशांच्या लोकांचें वास्तव्य

आहे; त्या सर्वांचें रक्त या भूमींत आढळतें. भाषांचेंहि एक अद्‌भुत संमेलन येथे आढळतें. रीतीरिवाजांच्या बाबतींतहि पौर्वात्य व पाश्चात्त्य समाजांतील फरकापेक्षाहि अधिक फरक भारतीय समाजाच्या कोणत्याहि दोन शाखांमधे आढळेल.

आपणां सर्वांना समान अशी एक भूमिका आहे, ती म्हणजे आपली पवित्र परंपरा व आपला धर्म. या एकाच समान भूमिकेवर आपल्याला देशाची उभारणी करावयाची आहे. युरोपांत राजकीय विचारसरणी ही राष्ट्रीय ऐक्याचा आधार असते. आशिया खंडांत धार्मिक विचारसरणी ही राष्ट्रीय ऐक्याचा आधार असते. म्हणून भारताचा भविष्यकाळ उज्ज्वल बनविण्यासाठी धर्मातील ऐक्याची नितान्त आवश्यकता आहे. या देशाच्या सर्व विभागांत एकाच धर्माला मान्यता असली पाहिजे. एकच धर्म या शब्दाने मला काय अभिप्रेत आहे ? ख्रिस्ती, मुसलमान व बौद्ध यांचा जसा एक एक धर्म आहे त्या अर्थाने मी 'एक धर्म' म्हणत नाहीं. आपल्याला ठाऊक आहे की आपल्या सर्व संप्रदायांचे सिद्धान्त कितीहि भिन्न असले व त्यांच्या घोषणा कितीहि वेगवेगळ्या असल्या तरी त्या सर्व संप्रदायांना समान अशीं आपल्या धर्माचीं कांही तत्त्वें आहेत. हीं समान तत्त्वें मान्य केल्यानंतर आपल्याला असें दिसतें की आपल्या धर्मांत विविधतेला भरपूर वाव आहे व त्यामुळेंच आपला धर्म अपार विचारस्वातंत्र्य व जीवनपद्धतीचें स्वातंत्र्य देतो. निदान आपल्यापैकी जे विचारवंत आहेत त्यांना हें ठाऊक आहे; आणि हीं जीवनदायी अशीं आपल्या धर्माचीं सर्वसामान्य तत्त्वें सर्वांपुढे मांडणें आज आवश्यक आहे; आपल्या देशांतील सर्व आबालवृद्ध स्त्रीपुरुष हीं तत्त्वें समजून घेवोत व आपल्या आचरणांत उतरविण्याचा प्रयत्न करोत. हेंच आपलें पहिलें कार्य होय व आपण तें केलेंच पाहिजे.

आशिया खंडांत, विशेषतः भारतांत आपल्याला हें दिसून येतें की वंश, भाषा, समाज व राष्ट्र यांच्याशीं संबंधित असलेल्या सर्व प्रकारच्या अडचणी धर्माच्या ऐक्य घडवून आणणाऱ्या सामर्थ्यापुढे विलीन होऊन जातात. आपल्याला हें माहीत आहे की भारतीयांच्या जीवनांत धार्मिक आदर्शाहून अधिक उच्च स्थान इतर कोणत्याहि आदर्शांना नाही. आणि धर्म हाच त्यांच्या जीवनाचा मूलमंत्र आहे. तसेंच,

आपल्याला हेंहि ठाऊक आहे की ज्या मार्गांत कर्मांत कमी अडथळे असतील त्याच मार्गाने आपण कार्य केलें पाहिजे. धार्मिक आदर्श हे सर्वोच्च आदर्श आहेत हेंच केवळ सत्य आहे असें नव्हे, तर भारताच्या बाबतींत त्यांच्या अनुरोधाने कार्य करणें हाच एकमेव मार्ग आहे. धर्माची ही बाजू दृढ न करतां अन्य कोणत्याहि पद्धतीने कार्य करणें अनर्थावह ठरेल. म्हणून भावी भारताच्या निर्मितींतील पहिलें पाऊल, किंवा भारतरूपी प्राचीन प्रस्तरांत खोदावयाची पहिली पायरी म्हणजे धर्माचें ऐक्य हीं होय. आपण सर्वांनी हें जाणून घेतलें पाहिजे की आपण द्वैती, विशिष्टाद्वैती, अद्वैती, शैव, वैष्णव वा पाशुपत कोणीहि असलों, कोण-त्याहि संप्रदायाचे अनुयायी असलों, तरी आपलीं--सर्व हिंदूंचीं कांही समान अशीं धार्मिक तत्त्वें आहेत, आणि आपल्या कल्याणासाठी, आपल्या समाजाच्या कल्याणासाठी आपण सर्व क्षुद्र कलह व भेद टाकून देण्याची आता वेळ आलेली आहे. निश्चित जाणून असां की हे कलह अगदी चुकीचे आहेत; आपल्या धर्मग्रंथांनी त्यांचा निषेध केलेला आहे; आपल्या पूर्वजांनी त्यांचा धिक्कार केलेला आहे; आणि ज्या थोर महात्म्यांचा आपण वारसा सांगतों व ज्यांचें रक्त आपल्या शरीरांतून खेळत आहे ते महात्मे, क्षुद्र भेदांवरून भांडत बसणाऱ्या आपल्या वंशजांकडे तिरस्काराने पाहत असतील.

हे कलह बाजूस सारल्यानंतरच मग अन्य सर्व प्रकारच्या सुधारणा होतील. जेव्हा रक्त शुद्ध व शक्तिशाली असतें तेव्हा कोणतेहि रोगजंतु शरीरांत जगूं शकत नाहीत. आध्यात्मिकता हेंच आपल्याला जीवन देणारें रक्त आहे. तें जर शुद्ध व शक्तिशाली असेल, तें जर निर्विघ्नपणें वाहत असेल तर सर्वकांही ठीकच होईल. हें रक्त जर शुद्ध असेल तर राजकीय, सामाजिक वा अन्य ऐहिक क्षेत्रांतील दोष दूर होतील; इतकेंच नव्हे, तर देशाचें दैन्यहि दूर होईल, कारण रोगजंतु जर बाहेर टाकले गेले तर दुसरें कांहीहि रक्तांत शिरूं शकणार नाही. आधुनिक वैद्यकाचा दाखला द्यावयाचा झाला तर असें म्हणतां येईल की रोग निर्माण होण्यास दोन कारणें असावीं लागतात--एक म्हणजे बाहेरील विषारी रोगजंतु व दुसरें म्हणजे शरीराची विशिष्ट अवस्था. जोंवर शरीर रोगजंतूंना स्वतःत प्रवेश करूं देत नाही, जोंवर शरीराची

प्रतिकारशक्ति जंतूंच्या प्रवेशाला वा वाढीला प्रतिबंध करूं शकत आहे, तोंवर जगांतील कोणत्याहि जंतूंच्या अंगीं शरीरांत रोग निर्माण करण्याची शक्ति नाही. वस्तुत: लक्षावधि जंतु प्रत्येकाच्या शरीरामधून नेहमीच जात येत असतात; पण जोंवर तें शक्तिशाली असतें तोंवर त्याला या गोष्टीची जाणीवहि नसते. शरीर दुर्बल होतें त्या वेळींच हे जंतु त्यावर ताबा मिळवितात व रोग निर्माण करतात. राष्ट्राच्या जीवनाचेंहि असेंच आहे. जेव्हा राष्ट्रशरीर दुर्बल होतें तेव्हा राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, वा बौद्धिक क्षेत्रांत रोगजंतु गर्दी करतात व राष्ट्रशरीरांत रोग निर्माण करतात. म्हणून या रोगाचा प्रतिकार करण्यासाठी आपण रोगाचें मूळ कारण शोधून रक्तांतील सर्व दोष दूर केले पाहिजेत. अतएव आपलें एकमेव कर्तव्य हेंच आहे की आपण राष्ट्राला सबल केलें पाहिजे, त्याचें रक्त शुद्ध केलें पाहिजे व त्याचें शरीर सामर्थ्यसंपन्न केलें पाहिजे, म्हणजे तें प्रतिकारक्षम बनून बाहेरून शिरलेलें सर्व प्रकारचें विष बाहेर फेकून देईल.

आपण पाहिलें आहे की, आपलें तेज, आपलें सामर्थ्य, एवढेंच नव्हे तर आपल्या राष्ट्राचें जीवन--या सर्वांचा आधार धर्मच आहे. धर्माला आपल्या जीवनाचा आधार बनविणें हें बरोबर आहे की चूक आहे, चांगलें आहे की वाईट आहे, परिणामीं कल्याणकारक आहे की अकल्याणकारक आहे याची चर्चा मी आज करीत नाहीं; पण चांगलें असो वा वाईट असो, धर्मच आपल्या राष्ट्राच्या जीवनाचा आधार आहे. तो तुम्ही टाळूं शकत नाही. तो नेहमीच तुमच्या राष्ट्राच्या जीवनाचा आधार राहणार आहे; आणि म्हणून आपल्या धर्मावर माझ्याइतकी तुमची श्रद्धा नसली तरीहि तुम्हांला याचा आश्रय घ्यावाच लागेल. या धर्माने तुम्ही निबद्ध आहांत आणि जर तुम्हीं त्याचा त्याग केला तर तुमचा सर्वनाश होईल. आपल्या जातीचा तोच जीवनाधार आहे व तो सुदृढ केला पाहिजे. शतकानुशतकें तुम्हीं आघातांचा प्रतिकार करूं शकलां, कारण तुम्हीं धर्माची जोपासना केली, त्याच्याकरिता तुम्हीं सर्व गोष्टींचा त्याग केला. धर्माचें रक्षण करण्यासाठी तुमच्या पूर्वजांनी प्रत्येक गोष्ट धैर्याने सहन केली, प्रत्यक्ष मरणहि पत्करलें. परकीय आक्रमकांनी मंदिरांमागून मंदिरें पाडलीं, परंतु आक्रमणाची ती लाट ओसर-

तांच त्याच ठिकाणीं पुन: मंदिरांचीं शिखरें दिसूं लागलीं. दक्षिणेंतील कांही प्राचीन मंदिरें व गुजराथमधील सोमनाथासारखें देवालय हीं तुम्हांला पुष्कळ गोष्टी शिकवूं शकतील; आपल्या जातीच्या इतिहासाकडे पाहण्यासाठी, कितीहि ग्रंथ वाचून लाभणार नाही एवढी तीक्ष्ण दृष्टि हीं मंदिरें तुम्हांला देतील. हीं मंदिरें शेकडो आघातांची व पुनरुज्जीवनांची साक्ष कशीं देत आहेत तें पाहा ! तीं पुन:पुन्हा नष्ट केलीं गेलीं व त्याच भग्नावशेषांमधून तीं पुन: निर्मिलीं गेलीं आणि पूर्वीप्रमाणेच आजहि तीं दृढपणें उभीं आहेत. आपल्या राष्ट्राचें मन, आपल्या राष्ट्राचें जीवन धर्मांतच आहे. या धर्माचें अनुसरण केल्यास तुम्ही वैभवशाली व्हाल आणि त्याचा जर त्याग कराल तर तुम्ही नाश पावाल. ज्या क्षणीं तुम्ही धर्माचा आधार सोडून द्याल त्याच क्षणीं तुमचा मृत्यु ओढवेल. अन्य गोष्टी आवश्यक नाहीत असें मी म्हणत नाहीं, राजकीय वा सामाजिक सुधारणा आवश्यक नाही असें सांगण्याचा माझा आशय नाही. माझें सांगणें हेंच आहे, आणि तें तुम्ही नीट लक्षांत ठेवा की या गोष्टी भारतांत गौण आहेत व धर्म हीच मुख्य गोष्ट आहे. भारतीय मन हें प्रथम धर्मशील आहे व नंतर तें अन्य गोष्टींचा विचार करतें. म्हणून आधी धर्मभाव सुदृढ केला पाहिजे. आणि हें कसें करावयाचें ? मी आपल्या कल्पना तुमच्यापुढे मांडतों. फार पूर्वीपासून ह्या कल्पना माझ्या मनांत आहेत, मद्रासहून इंग्लंड-अमेरिकेकडे रवाना होण्याच्या कित्येक वर्षें पूर्वी त्या माझ्या मनांत होत्या, आणि त्या प्रसृत करण्याच्या हेतूनेच मी त्या देशांत गेलों होतों. सर्वधर्मपरिषदेची वा अन्य कशाची मीं मुळीच चिंता केली नाही. ती केवळ एक संधि मात्र होती; खरोखर माझ्या कल्पनांनीच मला जगभर संचार करावयास लावलें.

आध्यात्मिकतेचीं जीं रत्नें आपल्या ग्रंथांमधे कांही थोड्याशा लोकांच्या हातांमधे, मठांमधे व अरण्यांमधे पडून आहेत तीं प्रकाशांत आणणें ही माझी प्रथम कल्पना आहे. ज्यांच्या हातीं हें ज्ञान गुप्त रूपांत दडून बसलें आहे त्यांच्या हातून तें बाहेर काढणें एवढेंच कार्य नसून, ज्या ज्या संस्कृत शब्दांच्या अभेद्य कवचांत तें शतकानुशतकें पडून आहे त्यांतूनहि तें बाहेर काढणें हें आपलें कार्य आहे. एका शब्दांत सांगावयाचें तर मला तें ज्ञान सर्वसामान्य लोकांत पसरवून द्यावयाचें आहे. या कल्पना

व हे विचार, संस्कृत जाणणाऱ्या व न जाणणाऱ्या भारतांतील सर्व लोकांची समान अशी संपत्ति व्हावी अशी माझी इच्छा आहे. या मार्गांतील मोठी अडचण म्हणजे आपली वैभवशाली संस्कृत भाषा ही कठीण आहे; आणि जोंवर आपलें सर्व राष्ट्र संस्कृतज्ञ होऊं शकत नाही तोंवर ही अडचण दूर होणार नाही. सर्व आयुष्यभर मी ही भाषा शिकत आहें, आणि अद्यापहि प्रत्येक नवीन संस्कृत ग्रंथांतील भाषा मला अपरिचित वाटते हें मी तुम्हांला सांगितलें तर ही अडचण तुमच्या लक्षांत येईल. मग ज्यांना ह्या भाषेचा सांगोपांग अभ्यास करण्याची संधि मिळाली नाही अशा लोकांच्या बाबतींत ही अडचण केवढी मोठी असेल ! म्हणून लोकांच्या भाषेंतच या कल्पना शिकविल्या गेल्या पाहिजेत; त्याबरोबरच संस्कृतचें शिक्षणहि चालू राहिलें पाहिजे. कारण संस्कृत शब्दांच्या केवळ उच्चारानेच आपल्या समाजाला प्रतिष्ठा, शक्ति व सामर्थ्य हीं प्राप्त होतात. रामानुजाचार्य, चैतन्य महाप्रभु व कबीर यांचे भारतांतील खालच्या वर्गांतील लोकांना उन्नत करण्याचे प्रयत्न हे त्यांच्या जीवनकालांतच चांगले फलदायी झालेले होते; तरीहि हे थोर महात्मे दिवंगत झाल्यावर एका शतकाच्या अवधींतच त्यांच्या शिकवणीचा प्रभाव कां खुंटला याचींहि कारणें पाहिलीं पाहिजेत. त्यांतील रहस्य असें आहे की, त्यांनी सामान्य जनांची उन्नति केली, सामान्य लोकांनी उन्नत व्हावें अशी त्यांची सर्वप्रकारें इच्छाहि होती, परंतु त्यांनीं आपली शक्ति संस्कृत भाषेचा सामान्य जनांत प्रसार करण्यांत वेंचली नाही. थोर बुद्धदेवांनी देखील सामान्य जनांना संस्कृत भाषा शिकूं दिली नाही ही त्यांची एक चूकच झाली असें म्हणावें लागेल. त्यांना शीघ्र व तात्कालिक फल हवें होतें, म्हणून त्यांनी आपले विचार तत्कालीन लोकभाषा जी पाली, तिच्यांत मांडले. हें उत्तमच झालें; ते लोकभाषेंत बोलले व लोकांना त्यांचें म्हणणें कळलें ही खरोखरच चांगली गोष्ट आहे. त्यामुळे विचार शीघ्र गतीने दूरवर पसरले; पण त्याचबरोबर संस्कृतचाहि प्रसार व्हावयास हवा होता. ज्ञानाचा प्रसार झाला, परंतु प्रतिष्ठा व संस्कृति हीं निर्माण झालीं नाहीत. संस्कृति हीच आघातांपुढे ठामपणें उभी राहूं शकते; केवळ वरवरच्या ज्ञानाची राशि आघातांना तोंड देऊं शकत नाही. तुम्ही जगापुढे ज्ञानाचा संभार मांडाल, परंतु त्याचा त्याला फारसा उपयोग होणार नाही.

हें ज्ञान रक्तांत भिनून संस्कृति निर्माण झाली पाहिजे. आज जगांत ज्ञानसंपन्न राष्ट्रें आहेत हें आपणा सर्वांना विदितच आहे, पण त्यांचा उपयोग काय ? तीं वाघांप्रमाणे, रानटी लोकांप्रमाणे आहेत, कारण त्यांच्यांत संस्कृति मुरलेली नाही. सभ्यतेप्रमाणे, ज्ञानदेखील वरवरचें असतें, व अल्पशा ओरखड्यानेंहि अंतःस्थ रानटीपणा बाहेर पडूं शकतो. अशा गोष्टी घडत असतात, आणि खरा धोका त्यांतच आहे. लोकांना त्यांच्या भाषेंतून शिक्षण द्या, त्यांना विचार शिकवा, त्यामुळे त्यांना कांही गोष्टींची माहिती होईल; पण यापेक्षा त्यांना अधिक कांहीतरी हवें आहे ---त्यांना संस्कृति द्या. त्यांना जोंवर ती प्राप्त होत नाही तोंवर त्यांची उन्नत अवस्था टिकून राहणार नाही. मग पूर्वीप्रमाणे आणखी एखादी नवी जात निर्माण होईल व संस्कृत भाषेच्या ज्ञानाचा लाभ घेऊन ती अन्य सर्वांवर अधिकार गाजवूं लागेल. खालच्या मानल्या गेलेल्या जातींतील लोकहो, तुमची स्वतःची स्थिति उन्नत करण्याचा व ती टिकवून ठेवण्याचा एकच उपाय मी तुम्हांला सांगतों. तो म्हणजे तुम्ही संस्कृत भाषेचा अभ्यास करा. आणि हा उच्च जातींशीं कलह व त्यांच्याविरुद्ध तुम्ही करीत असलेलें निंदाव्यंजक लेखन अगदी निरर्थक आहे; त्यामुळे हित तर कांहीच होत नाही, उलट कलह व विवाद निर्माण होतील, आणि हा आपला समाज जो आधीचाच विभागलेला आहे तो अधिकाधिक विभागला जाईल. जातीजातींतील पातळी समान करण्याचा एकमेव उपाय म्हणजे, संस्कृति व शिक्षण हें जें उच्च वर्णांचें सामर्थ्य आहे तें तुम्ही प्राप्त करून घ्या. आणि एकदा हें घडून आलें की तुम्हांला जें हवें आहे तें तुम्हांला प्राप्त होईल.

याबरोबरच विशेषतः मद्रासशीं संबद्ध असलेल्या एका प्रश्नाचें विवेचन मला करावयाचें आहे. असा एक सिद्धान्त मांडला जातो की, दक्षिण भारतांत उत्तर भारतांतील आर्यांहून भिन्न असा द्रविड नांवाचा एक मानववंश होता, आणि दक्षिण भारतांतील ब्राह्मण हेच केवळ उत्तर भारतांतून आलेल्या आर्यांच्या वंशाचे आहेत, आणि अन्य दक्षिण भारतीय हे या ब्राह्मणांहून अगदी वेगळ्या जातीचे व मानववंशांचे आहेत. सन्मान्य भाषाशास्त्रज्ञांची क्षमा मागून मी म्हणतों की हें सर्व अगदी निराधार आहे. यासाठी एकच पुरावा देण्यांत येतो,

आणि तो म्हणजे दक्षिणेंतील भाषा ह्या उत्तरेंतील भाषांहून भिन्न आहेत हा होय. दुसरा कोणताहि भेद मला आढळत नाही. आम्ही कितीतरी उत्तरेकडील माणसें येथे आहोंत, तेव्हा माझ्या युरोपीय मित्रांना मी विचारतों की त्यांनीं या सभेंतील उत्तर व दक्षिण भारतीय वेगळे करून दाखवावेत. भेद आहे कोठे ? केवळ थोडासा भाषेचा भेद आहे. पण हे भाषाशास्त्रज्ञ म्हणतात की फक्त संस्कृत बोलणारे ब्राह्मण तेवढे उत्तरेकडून येथे आले आणि त्यांनी द्राविड भाषा आत्मसात् केली व आपली संस्कृत भाषा ते विसरून गेले ! ठीक तर, अन्य सर्व जातींनी देखील असें कशावरून केलें नाही ? अन्य सर्व जाती उत्तरेकडून एकापाठोपाठ एक येथे आल्या, द्राविड भाषा शिकून घेऊन त्या स्वतःची संस्कृत भाषा विसरल्या असें कां म्हणूं नये ? दोन्ही बाजूंनी लागू पडणारें हें विधान आहे. असल्या मूर्खपणाच्या युक्तिवादांवर विश्वास ठेवूं नका. द्रविड नांवाचा वेगळा मानववंश पूर्वी येथे राहत असेलहि; पण आता तो लोप पावला आहे व त्यांच्यापैकी जे लोक उरले आहेत ते आता अरण्यांत, डोंगरांत वास करीत आहेत. असेंहि अगदी शक्य आहे की, संस्कृत टाकून द्राविड भाषा आत्मसात् केली गेली असेल, परंतु हे सर्व उत्तरेकडून आलेले आर्यच आहेत, सर्व भारत आर्यमय आहे, दुसरें कांहीहि नाही.

नंतर दुसरी एक कल्पना अशी आहे की शूद्र हे निस्संशय अनार्य असे आदिवासी लोक आहेत. ते कोण आहेत ? आर्यांचे ते दास आहेत असें म्हटलें जातें. इतिहासाची पुनरावृत्ति होते असें लोक म्हणतात. अमेरिकन, इंग्रज, डच व पोर्तुगीज यांनी बिचाऱ्या आफ्रिकन लोकांना जिंकून घेतलें, त्यांच्याकडून मरेपर्यंत काम करून घेतलें, व गुलाम म्हणून जन्मलेल्या मिश्र संततीस त्यांनीं बरेच दिवस त्याच अवस्थेंत ठेवलें. ह्या अद्‌भुत उदाहरणावरून कांही लोकांचें मन हजारो वर्षांपूर्वीच्या काळांत प्रविष्ट होतें व येथेहि असेंच घडलें असावें अशी तें कल्पना करतें. आणि आमच्या पुराणवस्तुसंशोधकाला असें वाटतें की तत्कालीन भारत कृष्णचक्षु असलेल्या आदिवासींनी भरलेला होता, आणि नंतर गौरवर्णीय आर्य आले —ते कोठून आले देव जाणे! कांहींच्या मतें ते मध्य तिबेटमधून आले असावेत, अन्य लोकांना वाटतें की ते मध्य आशियांतील असावेत. असे देशभक्त

इंग्रज आहेत की ज्यांना सर्व आर्य हे तांबड्या केसांचे होते असें वाटतें. अन्य लोकांना त्यांच्या मतीप्रमाणे वाटतें की सर्व आर्य काळ्या केसांचें होते. लेखक काळ्या केसांचा असेल तर आर्यहि तसलेच असले पाहिजेत! अलीकडे असें सिद्ध करण्याचा प्रयत्न झालेला आहे की आर्य हे स्वित्झर्लंड-मधील सरोवरांच्या कांठीं राहत होतें. अशा सिद्धान्तासह ते सर्व त्या सरोवरांत बुडून नष्ट जरी झाले असते तरी मला वाईट वाटलें नसतें! सध्या कांहीजण असें म्हणतात की ते उत्तर ध्रुवाजवळ राहत होते. अशा आर्यांचें व त्यांच्या वसतिस्थानांचें देव भलें करो! अशा सिद्धान्तांच्या सत्यतेसाठी आपल्या शास्त्रांमधून एक शब्दहि आढळणार नाही; आर्य बाहेरून कोठूनतरी आले अशा आशयाचा एक शब्दहि आपल्या शास्त्रा-मधून आढळत नाही; आणि प्राचीन भारतांत अफगाणिस्थानचा समा-वेश होता. आता दुसरी गोष्ट ही की सर्व शूद्र जात ही अनार्य असून त्यांची संख्या जास्त होती हा सिद्धान्तहि तितकाच तर्कविसंगत व बुद्धीस न पटणारा असा आहे. त्या काळांत मूठभर आर्य हे हजारो दासांना आपल्या ताब्यांत ठेवून राहत असतील हें शक्य नाहीं. या दासांनी कांही क्षणांतच त्यांची चटणी करून त्यांना खाऊन टाकलें असतें. याचें योग्य स्पष्टीकरण केवळ महाभारतांत केलेलें आढळतें; त्यांत म्हटलें आहे की सत्ययुगाच्या सुरवातीस ब्राह्मण ही एकच जाति होती, आणि नंतर व्यवसायभेदानुसार त्यांचे भिन्न भिन्न जातींत विभाजन होत गेलें, आणि हेंच केवळ सत्य व तर्कसंगत असें स्पष्टीकरण आहे. भावी सत्ययुगांत देखील अन्य सर्व जाति आपल्या मूळ अवस्थेप्रत--ब्राह्मणत्वाप्रत--निश्चितच जातील.

म्हणून भारतांतील जातिसमस्या सोडविण्याचा उपाय पुढीलप्रमाणे आहे. उच्च जातींचें पतन घडवून आणणें वा ब्राह्मणांचा उच्छेद करणें हा कांही उपाय नव्हे. गीतेवरील भाष्याच्या सुरवातीस श्रीशंकराचार्यांनी वैशिष्ट्यपूर्ण रीतीने सांगितल्याप्रमाणे ब्राह्मणत्व हा भारतांतील मानवांचा आदर्श आहे. श्रीकृष्ण हे धर्माचार्य म्हणून कां अवतरले याचें कारण श्रीशंकराचार्यांनी असें सांगितलें आहे की, ब्राह्मणत्वाचें रक्षण करण्या-साठीच श्रीकृष्ण आविर्भूत झाले. त्यांच्या येण्याचा हाच महान् उद्देश होता. आदर्श पुरुष, पूर्णत्वाप्रत पोहोचलेला पुरुष, ब्रह्मज्ञ पुरुष अशा

या ब्राह्मणाचें समाजाला प्रयोजन आहेच. त्याचा लोप होतां कामा नये. आज ब्राह्मण जातींत कितीहि दोष असले तरी या जातीला आपण हें श्रेय दिलेंच पाहिजे की अन्य जातींपेक्षा ब्राह्मणजातींतूनच खऱ्या ब्राह्मणत्वाने युक्त अशीं माणसें अधिक प्रमाणांत निर्माण झालेलीं आहेत. हें सत्य आहे. अन्य जातींनी हें श्रेय त्यांना दिलें पाहिजे. आपण धैर्यपूर्वक त्यांचे दोष दाखविणें जसें उचित आहे, तसेंच योग्य तें श्रेयहि आपण त्यांना दिलें पाहिजे. एक इंग्रजी म्हण ध्यानीं ठेवा--"प्रत्येकास त्याचें श्रेय द्या." म्हणून माझ्या मित्रांनो, जातीजातींनी भांडत बसणें योग्य नाही. त्यामुळे कोणतें हित होणार आहे ? त्यामुळे आपण अधिक विभागलें जाऊं, अधिक दुर्बल होऊं, अधिक अधोगतीस जाऊं. जन्मजात हक्कांचे व विशेष अधिकारांचे दिवस आता कायमचे संपले आहेत; भारतांतील ब्रिटिश शासनाचें हें वरदानच म्हटलें पाहिजे. या जातिविशिष्ट अधिकारांना नष्ट करण्याचें श्रेय मुसलमान शासकांनाहि दिलें पाहिजे. त्यांचें शासन, तसें पाहिलें तर, पूर्णपणें वाईट नव्हतें. कोणतीहि गोष्ट सर्वस्वी वाईट वा सर्वस्वी चांगली नसते. भारतावर मुसलमानांनी मिळविलेला विजय गरिबांच्या व दलितांच्या उन्नतीस कारणीभूत झाला. म्हणूनच आपल्यापैकी एकपंचमांश लोक मुसलमान बनले केवळ तरवारीने हें सर्व घडलेलें नाहीं. तरवार व बंदुका यांनीच हें सर्व घडून आलें असें समजणें हा कमालीचा वेडेपणा ठरेल. आणि तुमच्या मद्रासमधील एकपंचमांश, नव्हे, अर्धेअधिक लोक, तुम्ही बेफिकीर राहाल तर ख्रिस्ती बनतील. मलबारमधे मीं जें पाहिलें त्याहून अधिक मूर्खपणाची गोष्ट या जगांत तरी आढळेल काय ? ज्या रस्त्याने उच्चवर्णीय लोक जातात त्याच रस्त्याने जाण्यास बिचाऱ्या 'परिया'ला ( चांडाळाला ) परवानगी नाही, पण त्याने ख्रिस्ती बनून इंग्रजी वळणाचें कोणतेंहि विद्रूप नांव धारण केलें की सर्वकांही ठीक; किंवा मुसलमान बनून मुसलमानी वळणाचें नांव घेतलें तरीहि काम झालें. हे सर्व मलबारी लोक वेडे आहेत, व त्यांचीं घरें हीं वेड्यांचीं इस्पितळें आहेत ह्याव्यतिरिक्त वरील गोष्टीवरून तुम्ही कोणता निष्कर्ष काढाल ? जोंवर ते आपल्या चालीरीती सुधारत नाहीत तोंवर भारतांतील प्रत्येक समाजाने त्यांचा तिरस्कार केला पाहिजे असेंच तुम्हांलाहि वाटेल. या दुष्ट व राक्षसी

रूढि चालूं ठेवण्याबद्दल त्यांचा धिक्कार असो ! ते स्वतःच्या बांधवांना उपासमारीने मरूं देतात, परंतु त्या लोकांनी अन्य धर्माचा स्वीकार करतांच त्यांची चांगली सोय होत असते. असो, महत्त्वाची गोष्ट हीच की आता जातीजातींमधे अधिक झगडे होतां कामा नये.

उच्च जातींतील लोकांना खाली ओढून हा प्रश्न सुटणार नसून खालच्या जातींना उन्नत अवस्थेस नेण्यानेच तो सुटणार आहे. आणि ज्यांचें आपल्या शास्त्रांचें ज्ञान व प्राचीन लोकांच्या महान् योजनांचें स्वरूप आकलन करण्याची पात्रता केवळ शून्यवत् आहे, अशा लोकांकडून तुम्हांला कांहीहि ऐकावयास मिळालें तरी आपल्या सर्व शास्त्रग्रंथांमधून हीच कार्यपद्धति सांगितलेली आहे. ह्या लोकांना हें आकलन होत नाही, परंतु ज्यांना बुद्धि व आकलनशक्ति आहे त्यांना आपल्या पूर्वजांची ही कार्यपद्धति व तिची व्याप्ति कळूं शकेल. आपल्या राष्ट्रीय जीवनाचा जो अद्‌भुत प्रवाह युगानुयुगें वाहत आहे तो हे बुद्धिमान लोक साक्षीरूपाने पाहतात. प्राचीन व अर्वाचीन अशा सर्व ग्रंथांमधून ते या प्रवाहाच्या सर्व अवस्थांचा मागोवा घेत असतात.

आपल्या पूर्वजांची ही कार्यपद्धति कोणती होती ? एका टोकास ब्राह्मण हा आदर्श असून दुसऱ्या टोकास चांडाळ जातीचा माणूस आहे. आणि चांडाळाला ब्राह्मण अवस्थेप्रत नेण्याकरिता सर्व कार्य व प्रयत्न करणें ही आपल्या पूर्वजांची कार्यपद्धति होती. हळूहळू शूद्रांना अधिकाधिक अधिकार प्रदान केल्याचें तुम्हांला आढळेल. असे कांही ग्रंथ आहेत की ज्यांत तुम्हांला पुढील भयानक उल्लेख आढळतील, "शूद्र जर वेद ऐकत असेल तर त्याच्या कानांत तापलेल्या शिशाचा रस ओता; आणि तो वेदांच्या एखाद्या ओळीचें पाठांतर करील तर त्याची जीभ छाटून टाका. तो जर ब्राह्मणाला 'अरे ब्राह्मणा' असें म्हणेल तर त्याची जीभ छाटून टाका." हा जुनाट, राक्षसी रानटीपणा आहे हें निस्संशय, व न सांगतांहि हें तुम्हांला कळेल. परंतु याबद्दल स्मृतिकारांना दोष देऊं नका, कारण ते समाजांतील विशिष्ट वर्गांतील चालीरीतींची केवळ नोंद करीत असतात. असे आसुरी वृत्तीचे लोक प्राचीन कालांतहि उत्पन्न झाले होते. प्रत्येक युगांत कमीअधिक प्रमाणांत असा आसुरीपणा सर्वत्र आढळतो. त्याचबरोबर नंतरच्या काळांत हा सूर थोडा सौम्य झाल्याचें

आपल्याला आढळतें; उदाहरणार्थ, ह्या काळांत असें म्हटलें आहे की, "शूद्रांना पीडा देऊं नका, परंतु त्यांना उच्च ज्ञान देऊं नका." नंतर, विशेषत: आजच्या काळांत प्रभावी असलेल्या अन्य स्मृतींतून असें म्हटलें आहे की, जर शूद्र ब्राह्मणांच्या चालीरीतींचें व वर्तनाचें अनुकरण करतील तर तें चांगलेंच आहे. त्यांना उत्तेजन दिलें पाहिजे. याप्रमाणे शूद्रांना अधिकाधिक अधिकार देण्याचें कार्य चालू आहे. हें सर्व कार्य कसें घडत आलें आहे व आपल्या शास्त्रांमधून त्याचा उल्लेख कसा आढळतो हें सविस्तर सांगण्यास मला वेळ नाही, परंतु वस्तुस्थिति सांगावयाची तर असें म्हणतां येईल की, सर्व जाती ह्या हळूहळू उन्नत होणार आहेत. जाती हजारो आहेत. आणि कांही ब्राह्मणजातींत समाविष्टहि होत आहेत, कारण आपण ब्राह्मण आहोंत असें एखाद्या जातीने सांगण्यांत कोणतीं अडचण असणार? जातिभेद कितीहि कडक असला तरी हें असें घडतच असतें. समजा की, प्रत्येकींत दहा हजार व्यक्ति असलेल्या कांही जाती आहेत. या सर्वांनी मिळून असें म्हटलें की आम्ही ब्राह्मण आहोंत, तर त्यांना कोणीहि अडवूं शकणार नाही. मीं माझ्या आयुष्यांत हें पाहिलें आहे. कांही जाती प्रबळ होतात; आणि त्या सर्वांचें एकमत झालें की त्यांना कोण नको म्हणणार? कारण, कितीहि झालें तरी एक जात दुसरीपासून तुटकच होती, एक जात दुसऱ्या जातीच्या बाबतींत ढवळाढवळ करीत नसे, इतकेंच नव्हे तर एका जातींतील पोटविभागहि परस्परांच्या बाबतींत ढवळाढवळ करीत नसत. आणि शंकराचार्यादि थोर युगपुरुषांनीहि जाति निर्माण केल्या होत्या. त्यांनी प्रचारांत आणलेल्या सर्वच अद्‌भुत गोष्टी मी तुमच्यापुढे सांगूं शकणार नाहीं, आणि मी जें कांही सांगणार आहें त्याबद्दल कांही लोक माझ्यावर रागावतील, पण माझ्या प्रवासांत आलेल्या अनुभवाने मला ह्या अद्‌भुत गोष्टींचा शोध लागला आणि त्यापासून मीं काही निष्कर्ष काढले. या युगपुरुषांनी कधीकधीं बलुची लोकांची टोळीची टोळी घेऊन त्यांना एका क्षणांत क्षत्रिय बनवून टाकलें. कधी कधी त्यांनी कोळी लोकांची टोळीची टोळी घेऊन त्यांना एका क्षणांत ब्राह्मण करून टाकलें. ते सर्व ऋषिमुनि होते व आपण त्यांच्या कार्याविषयी श्रद्धा प्रकट केली पाहिजे. तुम्ही सर्वजण देखील ऋषिमुनि व्हा, हेंच खरें

रहस्य आहे. थोड्याफार प्रमाणांत आपण सर्व ऋषि होऊंच. ऋषि म्हणजे काय? शुद्ध, पवित्र पुरुष. प्रथम शुद्ध, पवित्र व्हा, म्हणजे तुम्हांला सर्व प्रकारचें सामर्थ्य प्राप्त होईल. 'मी ऋषि आहें' असें केवळ म्हटल्याने कार्यभाग होणार नाही; पण जेव्हा तुम्ही खरोखर ऋषि व्हाल तेव्हा सर्वजण स्वभावतःच तुमच्या म्हणण्याप्रमाणे वागतील. तुमच्यांतून असें अद्भुत सामर्थ्य निर्माण होईल की त्याच्या प्रभावानेच ते तुमचें अनुसरण करतील, तुमचा शब्द मानतील, स्वतःच्या इच्छे-विरुद्धहि ते न कळत तुमच्या योजना सफल करण्यास तुम्हांला साहाय्य करतील; यालाच 'ऋषित्व' असें म्हणतात.

आणि आता, कार्यपद्धतीच्या तपशिलासंबंधी सांगावयाचें म्हणजे वरील कल्पनेनुसार पिढ्यान् पिढ्या कार्य करतां करतां या तपशिलाच्या गोष्टी आपोआपच निश्चित होतील. मी आता जें कांही सांगितलें तें हेंच सुचविण्यासाठी की सर्व प्रकारचे कलह आता थांबले पाहिजेत. आजच्या या काळांतहि जातींजातींतील वैमनस्य एवढें तीव्र असावें याचा मला विशेष खेद वाटतो. हें सर्व थांबलेंच पाहिजे. दोन्ही बाजूंनी विचार करतां हें व्यर्थ आहे; विशेषतः उच्च वर्णाच्या---ब्राह्मणांच्या---दृष्टीने हें व्यर्थ आहे, कारण विशिष्ट हक्क व सवलती यांचे दिवस आता संपले आहेत. आपल्या मृत्यूची पूर्वतयारी करणें हें प्रत्येक उच्च जातीचें कर्तव्यच आहे, आणि जितक्या लवकर ती तें पार पाडेल तितकें बरें. ती जेवढा विलंब लावेल तेवढी ती कुजेल व तिचा मृत्यु अधिक दुःखद रीतीने घडून येईल. म्हणूनच भारतांतील अन्य सर्व जातींच्या उद्धाराचा प्रयत्न करणें हें ब्राह्मणांचें कर्तव्य आहे. ते जोंवर हें कर्तव्य करीत राहतील तोंवरच त्यांचें ब्राह्मणत्व; व ते जर अर्थसंचयाच्या मागे लागले तर त्यांचें ब्राह्मणत्व संपलें असेंच म्हणावें लागेल. त्याचप्रमाणे तुम्हीहि खऱ्या अर्थाने जो ब्राह्मण असेल त्यालाच साहाय्य केलें पाहिजे; त्यामुळे तुम्हांला स्वर्गप्राप्ति होईल. पण कांही वेळां अपात्र अशा व्यक्तीला दान दिलें जातें, आणि अशा वेळीं दान देणारा मनुष्य दुर्गतीस प्राप्त होतो असें आपलीं शास्त्रें सांगतात. म्हणून या बाबतींत तुम्हीं सावध असलें पाहिजे. जो पैशासाठी कामधंदा वा नोकरीचाकरी करीत नाही त्यालाच 'ब्राह्मण' म्हणावें. असलीं कामें इतर जातींसाठी आहेत, ब्राह्मणांसाठी

नाहीत. ब्राह्मणांना माझें आवर्जून सांगणें आहे की त्यांच्याजवळ असलेलें ज्ञान भारतांतील सामान्य जनतेला देऊन, कित्येक शतकें संचित केलेला संस्कृतीचा ठेवा सर्वसाधारण लोकांना देऊन त्यांनी त्या लोकांच्या उन्नतीसाठी प्राणपणाने प्रयत्न केले पाहिजेत. खरें ब्राह्मणत्व म्हणजे काय याची स्मृति जागृत ठेवणें हें भारतांतील ब्राह्मणांचें कर्तव्य आहे. "ब्राह्मणांजवळ धर्माचें भांडार असतें" म्हणूनच त्यांना सन्मान व विशेष अधिकार दिलेले आहेत, असें भगवान् मनूंनी म्हटलें आहे. हें भांडार खुलें करून त्यांतील रत्नें त्यांनी जगाला वांटलीं पाहिजेत. भारतांतील सर्व मानवांना धर्माची शिकवण सर्वप्रथम ब्राह्मणांनीच दिली व जीवनांतील सर्वोच्च सत्याचा साक्षात्कार व्हावा म्हणून ब्राह्मणांनीच सर्वप्रथम सर्व गोष्टींचा त्याग केला हें खरें आहे. अन्य जातींच्या आधी या क्षेत्रांत त्यांनी आघाडी मारली हा कांही त्यांचा दोष नव्हे. अन्य जातींनीं त्यांच्याप्रमाणे ज्ञान कां मिळविलें नाही, त्यांच्याप्रमाणे प्रयत्न कां केला नाही ? या जाती आळसांत स्वस्थ कां बसल्या आणि ब्राह्मणांना त्यांनी ही शर्यत कां जिंकूं दिली ?

परंतु अशा प्रकारें आघाडी मारणें व अधिकार मिळविणें वेगळें व तो अधिकार स्वतःसाठी राखून ठेवून त्याचा दुरुपयोग करणें वेगळें. वाईट गोष्टीसाठी सामर्थ्याचा वापर होणें हें दुष्टपणाचें आहे; त्याचा उपयोग सत्कारणींच झाला पाहिजे. म्हणून शेकडो वर्षांपासून संचित होत आलेल्या ज्या संस्कृतीचे ब्राह्मण हे रक्षक आहेत, ती त्यांनीं आता सर्वसाधारण जनतेस दिली पाहिजे. तशी ती दिली न गेल्यामुळे मुसलमानी आक्रमण शक्य झालें. त्यांनी हें संस्कृतीचें भांडार प्रथमपासून खुलें न केल्यामुळेच, जो कोणी येथे आला त्याच्या पायदळीं आपण गेलीं हजार वर्षें तुडविलें गेलों. ह्या कारणानेच आपली अधोगति झालेली आहे. आणि आता आपलें पहिलें कार्य हें आहे की आपल्या सर्वांच्या पूर्वजांनी साठविलेला हा ठेवा ज्या गुहांमधे दडलेला आहे त्यांतून तो बाहेर काढून सर्वांसाठी खुला केला पाहिजे; हें भांडार खुलें करा व प्रत्येकास तें वाटून द्या; आणि ब्राह्मणांनीं हें कार्य करण्यास सर्वप्रथम पुढे आलें पाहिजे. बंगालमधे अशी एक जुनी समजूत आहे की एखाद्याला चावा घेणाऱ्या सापाने आपलें विष स्वतःच जर परत शोषून

घेतलें तर तो माणूस वांचलांच पाहिजे. तद्वतच ब्राह्मणाने आपलें विष स्वत:च शोषून घेतलें पाहिजे. ब्राह्मणेतर जातींना माझें सांगणें आहे की थांबा, घाई करूं नका. ब्राह्मणांशीं कलह करण्याची संधि शोधूं नका, कारण मीं हें दाखवून दिलें आहे की तुम्ही स्वत:च्याच दोषाचें फळ भोगीत आहांत. आध्यात्मिकता व संस्कृत भाषेचें शिक्षण ह्यांची उपेक्षा करण्यास तुम्हांला कोणीं सांगितलें होतें ? हा सर्व काळ तुम्हीं काय करीत होतां ? तुम्ही उदासीन कां राहिलांत ? आणि आता, कांही लोकांजवळ तुमच्यापेक्षा अधिक बुद्धिमत्ता, अधिक शक्ति, अधिक साहस व अधिक कर्मतत्परता आहे म्हणून तुम्ही त्रागा व संताप कशाला करीत बसतां ? आपली शक्ति अशा प्रकारच्या व्यर्थ कलहांत व वृत्त-पत्रीय वादांत खर्च करूं नका; आपल्याच घरांत भांडत बसूं नका, कारण तें पाप आहे; त्याच्या ऐवजी ही सर्व शक्ति ब्राह्मणांजवळ असलेली संस्कृति मिळविण्याच्या कामीं वेंचा, म्हणजे तुमचा सर्व कार्यभाग होईल. तुम्हीं संस्कृत जाणणारे विद्वान कां होत नाही ? भारतांतील सर्व जातींना संस्कृत शिकतां यावें म्हणून तुम्ही लाखो रुपये खर्च कां करीत नाही ? माझा तुम्हांला हाच प्रश्न आहे. ज्या क्षणीं तुम्हीं ह्या गोष्टी कराल त्याच क्षणीं तुम्ही ब्राह्मणांच्या बरोबरीचे व्हाल. भारतांत अधिकार मिळविण्याचें हेंच रहस्य आहे.

संस्कृत भाषेचें ज्ञान लाभलें की भारतांत प्रतिष्ठाहि प्राप्त होतेच. एकदा तुम्हांला तें ज्ञान लाभलें की तुमच्याविरुद्ध कोणाला कांहीहि बोल-ण्याची हिंमत होणार नाही. हेंच एकमेव रहस्य आहे; तें समजून घ्या. अद्वैत्यांची प्राचीन उपमा द्यावयाची तर असें म्हणतां येईल की अखिल विश्वाने स्वत:च स्वत:ला संमोहित करून ठेवलें आहे. दृढ निश्चय हेंच सामर्थ्य आहे. दृढ निश्चयाचा मनुष्य स्वत:भोवती जणुकांही तेजाचें वलय निर्माण करीत असतो, व त्याच्या स्वत:च्या मनाची जी अवस्था असते तीच अवस्था तो इतरांच्या ठायीं उत्पन्न करीत असतो. अशा दृढ निश्चयाचीं माणसें वेळोवेळीं आविर्भूत होत असतातच. जेव्हा अशी एखादी प्रभावी व्यक्ति निर्माण होते तेव्हा तिच्या व्यक्तिमत्त्वामुळे तिचे विचार आपल्यापैकी पुष्कळांच्या मनांत उत्पन्न होतात व अशाप्रकारें आपण सामर्थ्यसंपन्न होतों. संघटना ह्या एवढ्या शक्तिशाली कशामुळे होत

असतात ? संघटना ही कांही जड वस्तु नव्हे. उदाहरणच द्यावयाचें तर, चार कोटी इंग्रज लोक येथील तीस कोटी लोकांवर राज्य कसें करूं शकतात ? याचें मानसशास्त्रदृष्ट्या स्पष्टीकरण कसें कराल ? हे चार कोटी लोक आपली इच्छाशक्ति एकत्र करतात व त्यामुळे अपार सामर्थ्य निर्माण होतें, आणि तुम्हां तीस कोटी लोकांपैकी प्रत्येकाची इच्छाशक्ति वेगवेगळ्या रीतीने कार्य करीत असते. म्हणून, भारताचें भवितव्य उज्ज्वल करण्याचें रहस्य संघटना, शक्तिसंचय व इच्छाशक्तीचें परस्पर सहकार्य यांतच सांठलेलें आहे.

याच वेळीं ऋग्वेदांतील पुढील अपूर्व मंत्र माझ्या मनांत येत आहे :

"सं गच्छध्वं सं वदध्वं सं वो मनांसि जानताम्
देवा भागं यथा पूर्वे...." (१०-१९१-२)

हा मंत्र आपल्याला सांगतो, "तुम्ही सर्वजण मनाने एक व्हा, तुमचे विचार एक असोत, कारण विचाराने एक असल्यामुळेच पूर्वी देव यज्ञांतील हविर्भाग घेऊं शकत असत. मनुष्याकडून उपासना ग्रहण करण्यास देव योग्य होते, कारण ते एका विचाराचे होते." मनाने एक होणें यांत समाजाच्या स्थैर्याचें रहस्य आहे. आणि जर तुम्ही आर्य-द्रविड, ब्राह्मण-अब्राह्मण यांसारख्या क्षुल्लक प्रश्नांवरून कलह माजवीत बसाल, तर भारताचें भविष्य घडविण्यासाठी आवश्यक असलेल्या शक्तिसंचयास तुम्ही मुकाल. कारण, लक्षांत ठेवा की, भारताचें भविष्य सर्वस्वी ह्या गोष्टीवरच अवलंबून आहे. इच्छाशक्तींचें संमीलन, त्यांचें परस्पर सहकार्य व त्यांचें केंद्रीकरण हेंच रहस्य होय. प्रत्येक चिनी मनुष्य वेगवेगळ्या रीतीने विचार करतो, आणि मूठभर जपानी सर्वच्या सर्व एका विचाराने राहतात, आणि याचा परिणाम आपल्याला दिसतच आहे. जगाच्या इतिहासांत सर्वत्र हें असेंच घडत आलें आहे. प्रत्येक ठिकाणीं तुम्हांला हें आढळेल की छोटीं संघटित राष्ट्रें नेहमीच विशाल परंतु विस्कळीत अशा भूभागावर राज्य करीत असतात, आणि हें स्वाभाविकच आहे; कारण या छोट्या संघटित राष्ट्रांना आपल्या कल्पना केंद्रित करून विकास साधणें अधिक सुलभ असतें. विशाल आकाराच्या देशांना तें अधिक अवघड होतें. जन्मतःच असंघटित असलेल्या या लोकांना एका विचाराचे होतां येत नाही. असो. आपल्या देशांत विघटन उत्पन्न करणाऱ्या या गोष्टी

आपण थांबविल्या पाहिजेत.

आपल्यामधे आणखी एक दोष आहे. स्त्रियांची क्षमा मागून मी असें म्हणतों की, शतकानुशतकें गुलामगिरींत राहिल्यामुळे आपण सर्वजण स्त्रियांप्रमाणे होऊन गेलों आहोंत. या किंवा अन्य देशांत तुम्हांला असें आढळेल की पांच मिनिटें जरी तीन स्त्रिया एकत्र आल्या तरी त्या भांडूं लागतात. युरोपीय देशांमधून स्त्रिया मोठमोठीं मंडळें स्थापन करतात, स्त्रियांच्या अधिकारांविषयी व सामर्थ्याविषयी मोठमोठे जाहीरनामेहि काढले जातात. नंतर त्यांच्यांत कलह माजतात, आणि मग एखादा पुरुष पुढे येतो व त्यांच्यावर आपली सत्ता चालवितो. सर्व जगांत आपल्याला दिसून येतें की अद्यापहि स्त्रियांवर सत्ता चालविण्यासाठी कोणीतरी पुरुष हवा असतो. आपली अवस्था त्यांच्यासारखी आहे. आपण स्त्रिया बनलों आहोंत. एखादी स्त्री जर स्त्रियांचें नेतृत्व करूं लागेल तर लगेच त्या सर्वजणी तिच्यावर टीका करूं लागतात, तिचे वाभाडे काढूं लागतात व तिला खाली बसण्यास भाग पाडतात. एखाद्या पुरुषाने पुढे येऊन त्यांना जरी कठोरपणें वागविलें, वारंवार टोचण्या जरी दिल्या तरी तें मात्र सर्व ठीक असतें; कारण, अशा प्रकारच्या वागणुकीचा, अशा प्रकारच्या प्रभावाने प्रभावित होण्याचा त्यांना सरावच पडलेला असतो. सर्व जग हें अशाप्रकारें स्वतःच्या प्रभावाने इतरांवर सत्ता गाजविणाऱ्या व्यक्तींनी भरलेलें आहे. याचप्रमाणे आपल्या देशबांधवांपैकी कोणीं पुढे येऊन थोर बनण्याचा प्रयत्न केला तर आपण सर्वजण त्याला खाली ओढण्याचा प्रयत्न करीत असतों. पण तेंच एखाद्या परकीयाने येऊन आपल्याला लाथा जरी मारल्या तरी तें मात्र आपल्याला बरें वाटतें. आपण त्या गोष्टीला अगदी सरावलेले आहोंत, खरें ना? आणि आपण असे गुलाम असून मालक होऊं इच्छितों! म्हणून गुलामी वृत्ति आधी सोडून द्या.

आगामी पन्नास वर्षें आपली थोर भारतमाता हीच आपली आराध्यदेवता असली पाहिजे. अन्य सर्व देवदेवता कांही काळ आपल्या मनांतून दूर राहूं द्या. आपला समाज हेंच एकमेव जागृत दैवत आहे. त्याचे हात, पाय सर्वत्र आहेत, त्याचे कान सर्व ठिकाणीं आहेत, त्याने सर्वकांही व्यापलें आहे. बाकी सर्व देव निद्रिस्त आहेत. व्यर्थ अशा देवतांच्या

मागे आपण धावत आहोंत, पण भोवतालीं पसरलेल्या विराट् अशा साक्षात् परमेश्वराला मात्र आपण पूजीत नाहीं. ज्या वेळीं आपण ह्याचीं पूजा करूं त्या वेळीं अन्य देवतांची पूजाहि आपण करूं शकूं. अर्धा मैलहि आपल्याला धड चालतां येत नाही, आणि हनुमानाप्रमाणे समुद्र पार करण्याची आपण इच्छा बाळगीत आहोंत ! तें शक्य नाही. प्रत्येकजण योगी बनूं पाहत आहे. प्रत्येकजण ध्यानस्थ होऊं पाहत आहे ! तें अशक्य आहे. दिवसभर जगांतील व्यवहार पाहावयाचे, कर्मे करावयाचीं आणि संध्याकाळीं नाक दाबून बसावयाचें ! इतकें का हें सुलभ आहे ? तुम्हीं नाकाने तीन वेळां प्राणायाम केलांत, म्हणून ऋषींनी हवेंतून उडत यावें काय ? ही काय थट्टा आहे ? हा सर्व मूर्खपणा आहे. आवश्यकता कशाची असेल तर ती चित्तशुद्धीची आहे, हृदयाच्या पावित्र्याची आहे. ही चित्तशुद्धि कशी होईल ? प्रथम आवश्यक आहे विराटाची पूजा-- आपल्या भोवतालीं असणाऱ्या सर्व जीवांची पूजा. त्या विराटाची पूजा करा. 'पूजा' हा शब्दच या ठिकाणीं योग्य आहे, दुसरा कोणताहि शब्द चालणार नाही. माणसें व पशु हे सर्व आपले देव आहेत. आणि ज्यांची आपण सर्वप्रथम पूजा करावी असे देव म्हणजे आपले देश-बांधव होत. परस्परांचा मत्सर करण्याऐवजी व परस्पराशीं कलह करीत बसण्याऐवजी ह्या देशबांधवांची पूजा आपण केली पाहिजे. परस्परांचा मत्सर व परस्पराशीं कलह हें आपलें भयंकर दुष्कर्म आहे. आणि त्याचीं फळें आपण भोगीत आहोंत, आणि तरीहि त्यामुळे आपले डोळे उघडत नाहीत.

असो, हा विषय एवढा मोठा आहे की तो कोठे पुरा करावा हें मला कळत नाही. मद्रासमधे पार पाडण्याकरिता मनाशीं ठरविलेल्या कांही योजना आपणांपुढे थोडक्यांत मांडून हें माझें भाषण मी संपवीन. आपल्या सर्व देशाच्या आध्यात्मिक व भौतिक शिक्षणाचा भार आपण घेतला पाहिजे हें तुमच्या ध्यानांत येतें काय ? त्याचें तुम्हीं स्वप्न पाहिलें पाहिजे, त्याच्याविषयी चर्चा केली पाहिजे, त्याचें चिंतन केलें पाहिजे; त्यासाठी प्रत्यक्ष कार्य केलें पाहिजे. असें तुम्ही जोंवर करीत नाही तोंवर तुमच्या समाजाचा उद्धार होणार नाही. आज तुम्हांला मिळत असलेल्या शिक्षणांत कांही चांगल्या गोष्टी आहेत खऱ्या, पण त्यांत दोष एवढे

भयंकर आहेत की त्यांच्यामुळे चांगल्या गोष्टी निरुपयोगी ठरतात. पहिली गोष्ट अशी की हें शिक्षण 'मनुष्य' निर्माण करणारें नाही, तें सर्वस्वी अकरणात्मक आहे. अकरणात्मक शिक्षण वा निषेधप्रधान शिक्षण हें मृत्यूहूनहि वाईट होय. मुलाला शाळेंत घातलें जातें; तो प्रथम हें शिकतो की आपले वडील मूर्ख आहेत, दुसरें म्हणजे आपले आजोबा वेडे आहेत, तिसरें असें की आपले सर्व प्राचीन आचार्य ढोंगी होते, आणि चवथी गोष्ट म्हणजे आपले सर्व धर्मग्रंथ खोटारे आहेत ! याप्रमाणे सोळा वर्षांचा होतां होतां तो 'नन्ना'चें भेंडोळें होऊन जातो, कणा नसलेला व निर्जीव होऊन जातो. याचा परिणाम असा की पन्नास वर्षांच्या या शिक्षणामधून, या तीन प्रांतांतून मौलिक विचार करणारी एकहि व्यक्ति निर्माण होऊं शकली नाही. मौलिक विचार कारणाऱ्या ज्या कांही व्यक्ति निर्माण झाल्या त्यांचें शिक्षण एकतर या देशांत न होता अन्यत्र झालें, किंवा पुनश्च जुन्या पद्धतीने शिक्षण घेऊन त्यांनी आपले चुकीचे संस्कार धुऊन टाकले. आयुष्यभर आत्मसात् न झालेला व मेंदूंत अस्ताव्यस्तपणें कोंबलेला असा ज्ञानाचा भारा म्हणजे कांही शिक्षण नव्हे ! आपल्याला जीवन घडविणारें, 'माणूस' निर्माण करणारें, चारित्र्य घडविणारें व चांगले विचार आत्मसात् करविणारें शिक्षण हवें आहे. तुम्ही जर चारपांच विचार चांगले आत्मसात् करून आपल्या जीवनांत व आचरणांत उतरविलेत तर अवघें ग्रंथालय मुखोद्गत करणाऱ्या व्यक्तीपेक्षाहि तुमचें शिक्षण सरसच ठरेल.

"यथा खरश्चन्दनभारवाही भारस्य वेत्ता न तु चंदनस्य।"

—"चंदनकाष्ठें वाहणाऱ्या गाढवाला ओझ्याचीच जाणीव होत असते, चंदनाच्या गुणांची नव्हे." शिक्षण व निव्वळ माहिती हीं एकच मानली तर ग्रंथालयांना थोर महात्मे व ज्ञानकोषांना ऋषि म्हणावें लागेल. म्हणून आपलें ध्येय पुढीलप्रमाणे आहे: आपल्या देशाचें आध्यात्मिक व ऐहिक असें दोन्ही प्रकारचें शिक्षण आपण आपल्या हातीं घेतलें पाहिजे व शक्यतों तें आपल्याच राष्ट्रीय पद्धतीनुसार दिलें पाहिजे.

अर्थात् ही फारच मोठी योजना आहे, हें फारच मोठें कार्य आहे. ती प्रत्यक्षांत येईल किंवा नाही हें मला सांगतां येणार नाही. पण आपण कामाला लागलें पाहिजे. तें कसें करावयाचें ? उदाहरणार्थ मद्रासच घ्या.

आपलें एखादें मंदिर असलें पाहिजे, कारण हिंदूंना सर्व गोष्टींच्या आधी धर्म हवा असतो. यावर तुम्ही म्हणाल की या मंदिराविषयी विभिन्न संप्रदायांत कलह सुरू होतील पण आपण हें मंदिर संप्रदायातीत बनवूं; सर्व संप्रदायांचें सर्वोच्च प्रतीक जें 'ॐ' तेंच केवळ या मंदिरांत राहील. येथे जर असा एखादा संप्रदाय असेल की ज्याला 'ॐ' हें प्रतीक असूं नये असें वाटत असेल, तर त्याला स्वतःस हिंदु म्हणविण्याचा अधिकार नाही. आपापल्या संप्रदायांच्या तत्त्वांनुसार हिंदुधर्माचा अर्थ लावण्याची प्रत्येकास मोकळीक राहील, पण आपलें एक सर्वसामान्य मंदिर असलेंच पाहिजे. अन्य ठिकाणीं तुमच्या विशिष्ट मूर्ति व प्रतीकें असूं शकतील, पण या ठिकाणीं मात्र मतभेद असणाऱ्यांशीं भांडण करूं नये. या ठिकाणीं सर्व संप्रदायांना समान असलेले सिद्धान्त विशद केले जावेत; त्याचबरोबर विभिन्न संप्रदायांना आपापलीं तत्त्वें या मंदिरांत येऊन मांडण्याचें पूर्ण स्वातंत्र्य असावें. त्यांना फक्त एक पथ्य पाळावें लागेल, आणि तें म्हणजे अन्य पंथांशीं कलह करावयाचा नाही. तुम्हांला जें कांही सांगावयाचें तें खुशाल सांगा, जगाला तें हवेंच आहे, पण दुसऱ्याविषयी तुम्हांला काय वाटतें तें ऐकण्यास जगाला वेळ नाही, तें तुम्ही स्वतःपाशीच राहूं द्या.

दुसरें असें की या मंदिराला जोडूनच, आपल्या समाजांत जाऊन लोकांना धार्मिक वा भौतिक शिक्षण देणारे शिक्षक तयार करणारी संस्था असावी; त्यांनी दोन्ही प्रकारचें कार्य करावयाचें. ज्याप्रमाणे आपण घरोघर जाऊन धर्माचें शिक्षण देत असतों त्याचप्रमाणे भौतिक शिक्षणहि देऊं या. हें सहज होऊं शकेल. नंतर हें कार्य या शिक्षकांच्या व प्रचारकांच्या प्रयत्नांनी व्यापक होत जाईल व अशीं मंदिरें अन्यत्रहि स्थापिलीं जातील, आणि तीं अखेर सर्व भारतभर पसरतील. माझी योजना ही अशी आहे. ती प्रचंड वाटते खरी, पण ती अत्यावश्यक आहे. तुम्ही विचाराल की यासाठी द्रव्य कोठे आहे ? यासाठी द्रव्य आवश्यक नाही. द्रव्य खरोखर, कांहीच नव्हे. आयुष्याचीं गेलीं बारा वर्षें, मला माझें पुढचें भोजन कोठून मिळेल हें माहीत नसे; पण मी जाणून होतों की पैसे व आवश्यक त्या वस्तु मला प्राप्त होतीलच, कारण त्या माझे दास आहेत, मी त्यांचा दास नाहीं. पैसा व अन्य सर्व गोष्टी ह्या प्राप्त

झाल्याच पाहिजेत. 'झाल्याच' पाहिजेत असें मी म्हणतों. पण माणसें कोठें आहेत ? हाच खरा प्रश्न आहे. मद्रासमधील तरुणांनो, तुमच्यापासूनच मला आशा आहे. आपल्या देशाच्या ह्या हांकेला तुम्ही साद द्याल काय ? माझ्यावर विश्वास ठेवण्याचें धैर्य दाखवाल, तर तुमच्यापैकी प्रत्येकाचें भविष्य उज्ज्वल आहे असें मी तुम्हांला सांगतों. स्वत:वर प्रचंड विश्वास असूं द्या. माझ्या बालपणीं माझा स्वत:वर प्रचंड विश्वास होता व त्याच्याच बळावर मी आज सर्व कार्य करीत आहें. तुमचाहि स्वत:वर असाच विश्वास असूं द्या. प्रत्येक आत्म्यांत अनंत सामर्थ्य वसत असतें अशी श्रद्धा तुम्ही प्रत्येकजण दृढपणें बाळगा, मग तुम्ही सर्व भारताचें पुनरुज्जीवन करूं शकाल. मग आपण जगांतील प्रत्येक देशांत जाऊं, नंतर लवकरच आपल्या कल्पना व आपले विचार जगांतील राष्ट्र घडविणाऱ्या शक्तींचा अंश बनून जातील. भारतांतील व भारताबाहेरील प्रत्येक जातीच्या जीवनांत आपण प्रवेश केला पाहिजे; हें घडवून आणण्यासाठी आपल्याला परिश्रम केले पाहिजेत. यासाठी मला तरुण लोक हवे आहेत. "जे तरुण, बलशाली, निरोगी व तीक्ष्ण बुद्धीचे असतील तेच ईश्वराला प्राप्त करून घेतील" असे वेद सांगतात. तारुण्यांतील सामर्थ्य आहे, वार्धक्यांतील जीर्णतेची छाया पडलेली नाहीं, तारुण्यांतील उत्साह आणि जोम कायम आहे तोंवरच तुम्हांला आपलें भविष्य ठरविण्याची संधि आहे. कामाला लागा, हीच वेळ आहे; कारण अनाघ्रात व अस्पृष्ट अशीं ताजीं पुष्पेंच ईश्वराच्या चरणीं अर्पिलीं जाण्यास योग्य असतात व प्रभु अशींच फुलें ग्रहण करतो. म्हणून उठा, सिद्ध व्हा, कारण जीवन हें अल्प आहे. वकील होऊन भांडणें उकरून काढीत बसण्यापेक्षा श्रेष्ठ प्रतीचीं अशीं कितीतरी कामें आपल्याला करावयाचीं आहेत. आपल्या समाजाच्या कल्याणासाठीं, समग्र मानवजातीच्या कल्याणासाठी सर्वस्वाचा त्याग करणें हें कितीतरी श्रेष्ठ कार्य आहे. या जीवनांत तसें आहे तरी काय ? तुम्ही हिंदु आहांत, व जीवनाच्या नित्यत्वावर तुमचा स्वाभाविकपणेंच विश्वास आहे. कधीकधी कांही तरुण माझ्याकडे येतात व माझ्याशीं नास्तिकतेसंबंधी बोलतात. पण एखादा हिंदु नास्तिक होईल यावर माझा विश्वास नाही. 'पाश्चात्त्य देशांतील ग्रंथांचें वाचन करून मी जडवादी झालों आहें' असें कुणी

म्हणेल, परंतु हें थोडें दिवसच टिकेल. तें तुमच्या रक्तांतच नाही. तुमच्या पिंडांतच जें नाही त्यावर तुम्ही श्रद्धा ठेवूं शकणार नाही; तसा प्रयत्न केल्यास तुमची विचित्र अवस्था होईल. म्हणून तसा प्रयत्न करूं नका. युवकावस्थेंत मीं एकदा असा प्रयत्न केला होता, पण तो निष्फळ ठरला. जीवन अल्प आहे, परंतु आत्मा हा अविनाशी व अमर आहे; आणि मृत्यु ही एकच गोष्ट ज्याअर्थी निश्चित आहे त्याअर्थी आपण थोर ध्येयाचा अंगीकार करून आपलें सर्व जीवन त्यासाठी समर्पण करूं या. असाच आपला निश्चय असो; आणि ज्या भगवंतांनी "निजजनांच्या उद्धारासाठी मी पुनःपुन्हा अवतार घेतों" असें गीतेंत म्हटलें आहे ते भगवान् श्रीकृष्ण आपल्याला आशीर्वाद देवोत व आपल्या ध्येयाच्या पूर्तीसाठी ते आपल्याला साहाय्य करोत !

अनुक्रम ३४८२५ दि.
क्रमांक ... नोंद दि. ...

# दान

( मद्रास येथे दिलेलें व्याख्यान )

मद्रासमधील मुक्कामांत 'चेन्नापुरी अन्नदान समाजम्' नामक एका धर्मार्थ संस्थेच्या वार्षिक संमेलनाच्या प्रसंगीं स्वामी विवेकानंद अध्यक्षस्थानीं होते; त्यांच्या आधीच्या वक्त्याने, अन्य जातींहून ब्राह्मणांना विशेषरीतीने दानधर्म करण्याच्या पद्धतीबद्दल तीव्र नापसंती व्यक्त केली. आपल्या अल्पशा वक्तव्यांत या विधानाचा परामर्श घेतांना स्वामीजी म्हणाले—

"या प्रथेची जशीं वाईट बाजू आहे तशी चांगली बाजूहि आहे. वस्तुत:, आपल्या देशाची सर्व संस्कृति ही ब्राह्मणांच्या हातीं आहे, आणि आपल्या देशांतील विचारवंतहि तेच आहेत. त्यांना दान देणें बंद करून त्यांच्या उपजीविकेचें साधन काढून घेतलें तर त्यांना विचार करावयास वेळ मिळणार नाही व परिणामीं सगळ्या देशाचें नुकसान होईल."

इतर देशांतील कायदेशीर दानधर्माशीं तुलना करून भारतांतील तारतम्य-शून्य दानाविषयी बोलतांना ते म्हणाले,

"भारतांतील दानपद्धतीमुळे या देशांतील उडाणटप्पू लोक त्यांना सहजपणें दिल्या जाणाऱ्या दानावर संतुष्ट राहतात व शांततेचें जीवन व्यतीत करतात, तर पाश्चात्त्य देशांतील पद्धतीप्रमाणे तिकडील उडाण-टप्पू लोकांना जबरदस्तीने 'आश्रय-गृहां'त ठेवण्यांत येतें; पण ते लोक आश्रय-गृहांत राहण्यास तयार नसतात, कारण मनुष्याला अन्नाहून स्वातंत्र्य अधिक प्रिय आहे. अखेर असे लोक समाजशत्रु, चोर बनतात व त्यांच्यासाठी न्यायसंस्था, पोलीस, तुरुंग आदि व्यवस्था ठेवावी लागते, जोंवर सभ्यतारूपी व्याधि समाजांत आहे तोंवर दारिद्र्य राहणारच; आणि म्हणूनच दानाचीहि आवश्यकता राहणारच. म्हणून आपल्याला भारतांतील तारतम्यशून्य दान व पाश्चात्त्य देशांतील कायदेशीर दान यांपैकी कोणत्यातरीं एका पद्धतीची निवड करणें भाग आहे. भारतांतील पद्धतीमुळे, निदान संन्याशांच्या बाबतींत, ते जरी खरेखुरे संन्यासी नसले तरी निदान अन्न मिळविण्यासाठी त्यांना थोडातरीं शास्त्रांचा अभ्यास करावाच लागतो; याउलट पाश्चात्त्य पद्धतीमुळे अत्यंत खर्चाचा असा

'गरिबांना साहाय्य करण्याचा कायदा' अंमलांत आणावा लागतो, आणि त्यामुळे शेवटीं भिक्षा मागणाऱ्यांचें रूपान्तर गुन्हेगारांत होतें. दानाच्या या दोन पद्धतींपैकी कोणती निवडावी हें थोडासा विचार केल्यास आपल्याला कळून येईल."

अनुक्रम ३४८१५ दि:
नों. दि. ३०।७।८७

# कलकत्ता येथील स्वागतसमारंभांत दिलेलें

## मानपत्र व त्यास उत्तर

कलकत्त्यास येतांच स्वामी विवेकानंदांचें अत्यंत उत्साहपूर्ण असें स्वागत करण्यांत आलें. शहरांतील सुशोभित केलेल्या त्यांच्या आगमनाच्या मार्गावर अफाट जनसागर त्यांच्या दर्शनासाठी उत्सुकतेने प्रतीक्षा करीत होता. स्वागताचा अधिकृत समारंभ नंतर एका आठवड्याने कै. राजा राधाकांत देव बहादुर यांच्या शोभा बाजार येथील निवासस्थानीं राजा विनयकृष्ण देव बहादुर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. अध्यक्षांच्या लहानशा प्रास्ताविक भाषणानंतर पुढील मानपत्र वाचण्यांत येऊन तें रौप्यकरंडकांतून स्वामीजींना अर्पण करण्यांत आलें.

श्रीमत् विवेकानंद स्वामी यांना--

प्रिय बंधो,

आपण आपल्या स्वतःच्या जन्मस्थानीं परत आलां आहांत; या शुभ प्रसंगीं कलकत्त्यांतील व बंगालमधील इतरहि कित्येक नगरांतील आम्ही हिंदु रहिवासी आपलें हार्दिक स्वागत करीत आहोंत. आपलें स्वागत करतांना आम्हांला कृतज्ञतेबरोबर गर्वहि वाटत आहे; कारण, जगांतील विभिन्न देशांमधे आपण जें महान् कार्य केलें आहे आणि स्वतःच्या उदात्त जीवनाने जगाला जें उदाहरण घालून दिलें आहे त्यामुळे केवळ आपल्या धर्मालाच गौरव प्राप्त झाला आहे असें नसून आपला देश व विशेषतः आपला प्रांत यांनाहि गौरव प्राप्त झाला आहे.

इ. स. १८९३ सालीं शिकागो येथे भरलेल्या जागतिक प्रदर्शनाचा एक भाग असलेल्या महान् अशा सर्वधर्मपरिषदेंत आपण आर्यांच्या धर्माचीं तत्त्वें विशद केलींत. आपण केलेलें विवरण अधिकांश श्रोत्यांना दैवी वाणीसारखेंच वाटलें व आपल्या वक्तृत्वाच्या उदात्त आणि ओजस्वी शैलीने त्यांना अत्यंत प्रभावित केलें. कांहींनी हे विचार संदेहयुक्त मनाने ऐकले असतील, कांही थोड्या व्यक्तींनी त्यांच्यावर टीकाहि केली असेल, परंतु त्यांनी बहुतांश सुशिक्षित अमेरिकन लोकांच्या धार्मिक विचारांत क्रांति घडवून आणली. त्यांच्या हृदयांत ज्ञानाचा नवीन प्रकाश पडला आणि त्यांच्या स्वभावसिद्ध उत्साही व सत्यप्रिय वृत्तीनुसार

त्यांनी त्या प्रकाशाचा पूर्ण लाभ करून घेण्याचें ठरविलें. त्यामुळे आपलें कार्यक्षेत्र विस्तृत झालें व आपलें कार्य वाढलें. अमेरिकेच्या निरनिराळ्या संस्थानांतील कितीतरी शहरांतून आलेलीं निमंत्रणें आपणांस स्वीकारावीं लागलीं, अनेक प्रश्नांचीं उत्तरें द्यावीं लागलीं, अनेक शंकांचें समाधान करावें लागलें व अनेक समस्या सोडवाव्या लागल्या. हें सर्व कार्य आपण उत्साहाने, दक्षतेने व कळकळीने केलेंत; आणि त्याचा चिरस्थायी परिणाम घडून आला. अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांमधील सुसंस्कृत वर्गावर आपल्या शिकवणुकीचा खोल प्रभाव पडलेला असून, त्यामुळे त्यांच्या विचारांना व त्यांच्या शोधक वृत्तींला चालना मिळाली आहे; तसेंच आपल्या शिकवणुकीने अनेकांच्या धार्मिक विचारांत निश्चित परिवर्तन घडविलें असून त्यांच्याठायीं हिंदु आदर्शांसंबंधी अधिक आवड व अधिक गुणग्राहकता निर्माण होत आहे. विभिन्न धर्मांच्या तौलनिक अभ्यासासाठी व आध्यात्मिक सत्यांच्या संशोधनासाठी तेथे स्थापन झालेल्या संस्थांची व मंडळांची वेगाने होत असलेली वाढ ही पाश्चात्त्य देशांतील आपल्या कार्याची साक्ष देत आहे. लंडनमध्ये वेदान्त तत्त्वज्ञानाच्या अभ्यासासाठी एक महाविद्यालय स्थापन करण्याचें श्रेय आपणांस देतां येईल. आपलीं व्याख्यानें नियमितपणें होत, श्रोतेहि वक्तशीरपणें उपस्थित राहून त्यांचा लाभ घेत, आणि सर्व ठिकाणच्या लोकांना तीं आवडत. त्यांचा प्रभाव सभागृहांच्या भिंतीबाहेरहि विस्तारला आहे. आपण लंडन सोडतांना तेथील वेदान्त तत्त्वज्ञानाच्या विद्यार्थ्यांनी आपणांस समर्पिलेल्या त्या मानपत्रामधे आपणांविषयी जी हार्दिक कृतज्ञता व्यक्त केली आहे तिच्यावरून, आपल्या शिकवणुकीने त्यांच्या अंत:करणांत आपणांविषयी किती प्रेम व किती आदर निर्माण झाला आहे याची कल्पना येते.

आर्यधर्मांतील तत्त्वांशीं आपला सखोल व दृढ परिचय आहे आणि लेखणीने व वाणीने तीं विशद करण्याचें कौशल्य आपल्या ठायीं आहे यामुळेच आपल्याला वेदान्ताचे आचार्य या नात्याने यश लाभलें असें नसून, त्याचें श्रेय बहुतांशीं आपल्या उदात्त व्यक्तिमत्त्वास दिलें पाहिजे. आपलीं व्याख्यानें, आपले निबंध व आपले ग्रंथ हीं आध्यात्मिक व साहित्यिक अशा दोन्ही दृष्टींनी उच्च प्रतीचीं असून त्यांचा प्रभाव

पडल्यावांचून राहिला नाही. परंतु आपल्या निष्कपट, कळकळीच्या व आत्मत्यागमय जीवनाच्या प्रत्यक्ष उदाहरणाने आणि आपला विनय, आपली आदर्शनिष्ठा व आपली तत्परता यांमुळे हा प्रभाव एवढा वाढला कीं त्याचें वर्णन करतां येत नाही.

आपल्या उदात्त धर्मतत्त्वांचा एक उद्गाता या नात्याने आपण केलेल्या कार्याविषयीं कृतज्ञता व्यक्त करतांना आपले पूजनीय गुरुदेव श्रीरामकृष्ण यांच्या स्मृतीलाहि श्रद्धांजलि वाहणें आमचें कर्तव्य आहे असें आम्हांला वाटतें. आपण आम्हांला लाभलांत तेंहि बहुतांशीं त्यांच्याचमुळे. आपल्या ठिकाणीं जो दैवी स्फुलिंग होता, तो त्यांनीं स्वतःच्या अपूर्व दिव्यदृष्टीने आधीच ओळखला होता, आणि त्याच्या अनुरोधाने त्यांनी आपल्याविषयी जी भविष्यवाणी उच्चारली होती ती आता सफल होण्याच्या मार्गावर आहे हें बघून आम्हांला अतोनात हर्ष होतो. ईश्वराने आपणांस दिलेल्या दिव्यदृष्टीवरील व दिव्यशक्तीवरील आवरण श्रीरामकृष्णांनीच दूर केलें; पावन स्पर्शाची जणु प्रतीक्षा करीत असलेल्या आपल्या विचारांना व आकांक्षांना त्यांनीच अपेक्षित व उचित वळण दिलें; आणि इंद्रियातीत क्षेत्रांतील सत्यांचा साक्षात्कार करून घेण्याच्या आपल्या प्रयत्नांना त्यांनीच साहाय्य केलें. भावी पिढ्यांसाठी त्यांनी ठेवलेला सर्वांत मोल्यवान वारसा म्हणजे आपणच आहांत.

हे महात्मन्, स्वतः निश्चित केलेल्या मार्गाने खंबीरपणें व साहसपूर्वक पुढे जा. तुम्हांला सारें जग जिंकावयाचें आहे. अज्ञानी, संशयात्मे व बुद्धयाच अंधळे बनणाऱ्या लोकांना हिंदूंचा धर्म आपणांस विशद करून सांगावयाचा आहे, त्याचें समर्थन करावयाचें आहे. ज्या भावनेने आपण कार्य सुरू केलें आहे ती बघून आम्ही मुग्ध झालों आहोंत. आपलें कार्य यशस्वीहि झालें आहे याची ग्वाही कितीतरी देश देत आहेत. परंतु अद्यापि कितीतरी कार्य व्हावयाचें आहे; आणि आमचा हा देश, नव्हे, तुमचा स्वतःचा हा देश तुमची आशेने प्रतीक्षा करीत आहे. हिंदुधर्माचीं तत्त्वें अगणित हिंदुलोकांनाच विशद करून सांगावयाचीं आहेत. म्हणून या महान् कार्यासाठी आपण कटिबद्ध व्हा. आपणांवर व आपल्यापुढे असलेल्या कार्याच्या पावित्र्यावर व न्याय्यपणावर आमची दृढ श्रद्धा आहे. आमचा धर्म कोणताहि भौतिक विजय मिळवूं इच्छीत नाही. त्याचें ध्येय

आध्यात्मिक आहे, आणि चर्मचक्षूला न दिसणारें व केवळ चिंतनशील बुद्धीलाच गवसणारें असें सत्यच त्याचें शस्त्र आहे. सर्व जगाला व आवश्यक तेथे हिंदूंनाहि आवाहन करून सांगा की, त्यांनी अंतश्चक्षु उघडावे, इंद्रियांच्या राज्याच्या पलीकडे जावें, धर्मग्रंथांचें नीट परिशीलन करावें व अंतिम सत्याचें प्रत्यक्ष दर्शन करून घेऊन मानव या नात्याने आपलें स्थान व भवितव्य काय आहे याची जाणीव करून घ्यावी. सर्वांना जागें करण्यासाठी व सर्वांना आवाहन करण्यासाठी आपणांपेक्षा योग्य आणखी कुणीहि नाही. आम्ही आपणांस एवढेंच आश्वासन देऊं शकतों की, विधात्याच्या संकेताने ज्या कार्यासाठी आपला जन्म झाला आहे त्या कार्यांत आम्हीं हार्दिक सहानुभूतिपूर्वक सहकार्य देऊं, निष्ठापूर्वक सहकार्य देऊं.

आपल्यावर प्रेम करणारे
आपले प्रिय मित्र व चाहते.

स्वामीजींनी या मानपत्राला पुढीलप्रमाणे उत्तर दिलें :—

एखाद्याला आपलें व्यक्तित्व समष्टीमधे विलीन करावेसें वाटतें. तो जगाचा त्याग करतो, दूर निघून जातो, देहाच्या सर्व संबंधांचा, जुन्या सर्व संस्कारांचा त्याग करण्याचा तो यत्न करतो, एवढेंच काय पण आपण मनुष्य आहोंत हेंहि विसरण्यासाठी तो धडपडत असतों; तरीहि त्याच्या अंतर्हृदयांत एक नाद, कंपन वा अस्फुट शब्द उठत असतो, तो हा की, 'मी जगांत कुठेहि गेलों तरी माझी जन्मभूमि हीच मला सर्वांहून जास्त प्रिय आहे.' भारताच्या राजधानींतील नागरिकांनो, तुमच्यापुढे मी उभा आहें तो एक संन्यासी म्हणून नव्हे, तसेंच धर्माचा प्रचारक म्हणूनहि नव्हे. तर मी तोच कलकत्त्याचा एक मुलगा पूर्वीप्रमाणेच तुमच्याशीं गोष्टी करण्यासाठी तुमच्याकडे आलों आहें. होय, बंधूंनो, मला इच्छा होत आहे की या शहराच्या रस्त्यांतील धुळींत बसून बालपणींच्या मोकळे-पणाने मनांतल्या सर्व गोष्टी तुम्हांला सांगाव्या. अतएव तुम्हीं मला 'बंधु' म्हणून संबोधिलें याबद्दल मी तुम्हांला अगदी मनापासून धन्यवाद देतों. होय, मी तुमचा भाऊ आहें आणि तुम्ही माझे भाऊ आहांत. इंग्लंडहून निघतेवेळीं एका इंग्रज मित्राने मला विचारलें, "स्वामी, या विलासी, वैभवशाली व सामर्थ्यसंपन्न अशा पाश्चात्त्यभूमींत चार वर्षें राहिल्यावर

तुम्हांला आता आपला मायदेश कसा काय वाटेल ?" उत्तरादाखल मी हेंच म्हणूं शकलों की, "पाश्चात्त्य देशांत येण्यापूर्वी मी भारतावर प्रेम करीत असे. आता तर भारतांतील धूळहि मला पवित्र वाटत आहे, तेथील हवा देखील मला आता पवित्र वाटते. भारत आता मला परमपवित्र धाम वाटतो. तोमाझ्या पक्षीं आता तीर्थस्थान होऊन बसला आहे." कलकत्त्यांतील नागरिकांनो, माझ्या बंधूंनो, तुम्हीं दाखविलेल्या सहृदयतेविषयी कृतज्ञता कशी व्यक्त करावी हें मला समजेनासें झालें आहे. किंवा मीं असेंहि म्हणेन की मीं तुमचे मुळीच आभार मानावयास नको, कारण तुम्ही माझे भाऊ आहांत आणि तुम्ही फक्त भावाचें कर्तव्य केलें आहे —'हिंदु' भावाचें कर्तव्य केलें आहे. होय, 'हिंदु' भावाचें असें मी म्हणतों, कारण अशी कौटुंबिक भावना, असा ऋणानुबंध, असें प्रेम आपल्या या मातृभूमीच्या सीमेबाहेर आणखी कुठेंहि आढळत नाही.

सर्वधर्मपरिषद हें एक फार मोठें कार्य होतें यांत शंका नाही. या देशांतील विविध नगरांतर्फे आम्ही या परिषदेच्या निमंत्रकांचे आभार मानलेले आहेत आणि त्यांनी आमच्याशीं जीं सहृदय वर्तणूक केली तिच्याबद्दल ते आमच्या धन्यवादास सर्वथैव पात्र आहेत. तरीपण या सर्वधर्मपरिषदेची थोडीशी पूर्वपीठिका सांगण्याची माझी इच्छा आहे. स्वत:चें घोडें पुढे दामटण्याची, स्वत:चें श्रेष्ठत्व प्रस्थापित करण्याचीच त्या लोकांची इच्छा होती. स्वत:चा धर्म हा इतर सर्व धर्मांपेक्षा श्रेष्ठ आहे हें सिद्ध करण्यासाठीच हा खटाटोप करण्यांत आला होता. ही परिषद भरविणाऱ्यांपैकी अधिकांश लोकांची महत्त्वाकांक्षा ख्रिस्ती धर्माचा मोठेपणा शाबीत करून इतर सर्व धर्मांचें हसें करण्याचीच होती. पण प्रत्यक्षांत निराळेंच घडलें, आणि विधिलिखितानुसार जें घडलें त्याखेरीज दुसरें कांहीच घडणें शक्यच नव्हतें. तें कसेंहि असलें तरी त्यांच्यांतील अनेकजण माझ्याशीं सहृदयतेनेच वागले. आणि त्याबद्दल आपण त्यांचे उचित आभारहि मानलेले आहेत.

उलटपक्षीं, खरें सांगावयाचें म्हणजे मी कांही सर्वधर्मपरिषदेसाठीं अमेरिकेला गेलों नव्हतों. तो केवळ एक योगायोग होता. तिच्यामुळे माझा मार्ग मोकळा होऊन माझें कार्य सुकर झालें, मला संधि मिळाली, आणि त्याबद्दल या परिषदेच्या सदस्यांचे आपण अत्यंत आभारी आहोंत.

पण वस्तुत: आपण संयुक्त संस्थानांतील थोर जनतेचे आभारी असलें पाहिजे; ज्या देशांत इतर कोणत्याहि देशापेक्षा बंधुभावनेचा अधिक विकास झालेला आहे त्या अमेरिकेंतील सहृदय, आतिथ्यशील अशा थोर जनतेचे आपण आभार मानले पाहिजेत. एखादा अमेरिकन मनुष्य तुम्हांला आगगाडींत थोडा वेळ भेटला कीं तो तुमचा मित्र होतो. लगेच तो तुम्हांला आपल्या घरीं येण्याचें आमंत्रण देतो व आपल्या घरीं घेऊन जाऊन आपल्या पोटांतील गुपितें तुम्हांला मोकळ्या मनाने सांगूं लागतो. अमेरिकन लोकांचा स्वभाव हा असा आहे व आम्हांला तो कौतुकास्पद वाटतो. माझ्याशीं ते ज्या सहृदयतेने वागलें तिचें वर्णन करून सांगतां येणें शक्य नाही. मला त्यांनी केवढ्या अपूर्व सहृदयतेने वागविलें हें सांगतों म्हटल्यास कित्येक वर्षें लागतील. तसेंच अंटलाटिक महासागराच्या दुसऱ्या बाजूस असलेल्या इंग्लंड देशाचेहि आपण तितकेच आभार मानलें पाहिजेत. इंग्रज लोकांविषयीं माझ्यापेक्षा अधिक द्वेष मनांत बाळगून कुणीहि कधी इंग्लंडच्या भूमीवर पाय ठेवला नसेल; या व्यासपीठावर उपस्थित असलेले माझे इंग्रज मित्र याची साक्ष देतील. पण मी जसजसा त्यांच्यांत अधिकाधिक राहिलों, मिसळलों व जसजसें त्यांचें जीवन मीं अधिक जवळून पाहिलें तसतसें त्या राष्ट्राचें हृदय कुठे स्पंदत आहे हें मला अधिकाधिक कळूं लागलें व मी त्यांच्यावर जास्त जास्त प्रेम करूं लागलों. आणि बंधूंनो ! आता इंग्रज लोकांवर माझें जितकें प्रेम आहे त्यापेक्षा अधिक तुमच्यापैकी कुणाचेंहि नसेल. त्यांना नीट जाणून घ्यावयाचें झाल्यास त्यांच्या देशांत काय चाललें आहे हें तुम्हीं प्रत्यक्ष पाहिलें पाहिजे आणि त्यांच्यांत मिसळलें पाहिजे. आम्हां हिंदूंच्या तत्त्वज्ञानाने--वेदान्ताने--सर्व दु:खदैन्याचें मूळ अज्ञान आहे असा निष्कर्ष काढला आहे; येथेहि हा निष्कर्ष लागूं पडतो. इंग्रज व आपण यांत जो विरोध आहे तो बहुताशीं अज्ञानामुळेच आहे; आपण त्यांना जाणत नाहीं व ते आपल्याला जाणत नाहीत; आणि हेंच या विरोधाचें कारण आहे.

दुर्दैवाने पाश्चात्त्यांच्या मतें आध्यात्मिकतेचाच नव्हे, तर नीतीचाहि ऐहिक उत्कर्षाशीं अच्छेद्य संबंध आहे; आणि म्हणून ज्या वेळीं एखादा इंग्रज वा पाश्चात्त्य मनुष्य आपल्या देशांत येतो व त्याला या ठिकाणीं

दु:ख व दैन्य सर्वत्र पसरलेलें दिसतें, त्या वेळीं तो असा निष्कर्ष काढतो की या ठिकाणीं धर्म असूं शकणार नाही, इतकेच नव्हे तर नीतिहि असूं शकणार नाही. त्याच्या स्वत:च्या अनुभवाच्या दृष्टीने अर्थातच हें खरें आहे. युरोपांत अत्यंत थंड हवामानामुळे व इतरहि अनेक गोष्टींमुळे दारिद्र्य व पाप हीं नेहमी बरोबरच असतात, पण भारताचें तसें नाही. उलट माझा तर असा अनुभव आहे की भारतांत मनुष्य जेवढा गरीब, तेवढा तो नीतिमत्तेच्या बाबतींत अधिक सरस असतो. ही गोष्ट नीट ध्यानीं यावयास वेळ लागतो; आणि भारताच्या राष्ट्रीय जीवनाचें गुप्त रहस्य समजून घेण्यापुरता वेळ खर्च करण्याची किती विदेशियांची तयारी असते बरें? या देशांतील परिस्थितीचा नीट अभ्यास करून ती जाणून घेण्याचा धीर खरोखर फारच थोड्या लोकांच्या ठायीं असतो. येथेच व ह्याच देशांत अशी एक जात वास करते की जी दारिद्र्याला गुन्हा वा पाप मानीत नाही, इतकेंच नव्हे तर येथे दारिद्र्याला अत्यंत उच्च स्थान देण्यांत येत असतें, दारिद्र्याला दैवी स्वरूपाचें मानण्यांत येत असतें. येथे दरिद्री संन्याशाचा वेषच सर्वांत श्रेष्ठ गणला जात असतो. उलटपक्षीं, आपणहि तद्वतच पाश्चात्त्यांच्या सामाजिक संस्था, त्यांच्या चालीरीती धीर धरून नीट अभ्यासिल्या पाहिजेत, त्यांच्यासंबंधी घाईघाईने वेडगळपणाचीं मतें बनवून चालणार नाही. त्यांच्यांतील स्त्रीपुरुषांचें मिसळणें, त्यांचे रीतीरिवाज, या साऱ्यांना अर्थ आहे, या साऱ्याला चांगली बाजू आहे, या साऱ्या गोष्टींचें नीट निरीक्षण करण्यापुरता धीर जर तुमच्या ठायीं असेल तर हें तुमच्या निदर्शनास येईल. ह्याचा अर्थ आपण त्यांचे रीतीरिवाज उसने घ्यावे वा त्यांनी आपले उसने घ्यावे असा नाही. प्रत्येक समाजांतील चालीरीती व रूढि ह्या त्या समाजाच्या शतकानुशतकें हळूहळू झालेल्या विकासाचें फळ असतात, आणि त्या सर्वांना सखोल असा अर्थ असतो. म्हणून आपण त्यांच्या चालीरीतींचा उपहास करावयास नको, किंवा त्यांनीहि आपल्या चालीरीतींचा उपहास करावयास नको.

या सभेपुढे मला आणखी एक गोष्ट सांगावयाची आहे. अमेरिकेंतील कार्यापेक्षा इंग्लंडमधे माझें काम अधिक समाधानकारक झालें आहे असें मला वाटतें. इंग्रज माणूस हा शूर, धीट व स्थिर वृत्तीचा असतो;

आणि तसें म्हणावयाचें तर इतरांच्या मानाने त्याच्या मस्तकाची कवटी थोडी जाडच असते--अर्थात् त्याच्या डोक्यांत एखादी कल्पना शिरविणें कठीण असतें; पण कुणी जर कसेंतरी करून त्याच्या डोक्यांत एखादी कल्पना एकदाची शिरवूं शकला तर मग ती तेथून कधी सुद्धा निघून जावयाची नाहीं; आणि त्या जातीची असीम व्यवहार्यता व शक्ति यांच्यामुळे त्या कल्पनेच्या बीजाला अंकुर येऊन त्याचें झपाट्याने झाड होऊन त्याला लवकरच फळें लागतात. इंग्रज जातीइतकी असीम व्यवहार्यता व जोम तुम्हांला इतरत्र कुठेंहि आढळून येणार नाही. त्यांच्या ठिकाणीं कल्पनाशक्ति कमी असते. पण प्रत्यक्ष कार्य करण्याची शक्ति मात्र खूपच असते. आणि त्यांच्या हृदयांतील गुप्त झऱ्याची कल्पना कुणालाहि नसते ! त्या सखोल जागीं किती कल्पना व भावना दडलेल्या असतात म्हणून सांगावें ! त्यांची जात ही शूरांची जात आहे, ते खरेखुरे क्षत्रिय आहेत; स्वतःच्या भावना लपवून ठेवण्याचें, त्या कधी बाहेर न दाखविण्याचेंच शिक्षण त्यांना मिळत असतें. बालपणापासूनच त्यांना असें शिक्षण मिळालेलें असतें. एखादा इंग्रज मनुष्य स्वतःच्या भावना व्यक्त करीत आहे असें तुम्हांला क्वचितच दिसेल; इंग्रज पुरुषच काय, इंग्रज स्त्रीदेखील स्वतःच्या भावना बाहेर दिसूं द्यावयाची नाही. इंग्रज स्त्रियांना मीं अशीं कामें करतांना बघितलें आहे की जीं करायला अगदी धीटांतला धीट बंगाली माणूसहि कचरल्याशिवाय राहणार नाही. परंतु या वीरत्वाच्या मुखवट्यामागे, या लढाऊपणाच्या आच्छादनाच्या मागे इंग्रजांच्या हृदयांत खूप खोल जागीं भावनांचा झरा झरत असतो. तेथपर्यंत कसें पोहोचावयाचें हें जर तुम्हांला एकदाचें कळलें, तेथे जर तुम्ही पोहोचूं शकलां, तुमचा जर त्यांच्याशीं घनिष्ठ असा वैयक्तिक संबंध आला, तुम्ही जर त्यांच्याशीं मिसळलां तर मग ते तुमच्याजवळ स्वतःचें हृदय उघडें करतील, मग ते तुमचे कायमचे मित्र होऊन जातील, तुमचे अगदी चाकर बनून जातील. म्हणूनच माझ्या मतें इंग्लंडमधील माझें कार्य इतर कोठल्याहि स्थानापेक्षा अधिक समाधानकारक झालें आहे. मला असा दृढ विश्वास वाटतो की उद्या समजा मी कालवश झालों तरीहि इंग्लंडमधील माझें कार्य नाहीसें होणार नाहीं, उलट त्याचा सदैव विस्तार होत राहील.

बंधूंनो, माझ्या आचार्यांचा, माझ्या गुरुदेवांचा, जीवनांतील माझ्या आदर्शाचा, माझ्या इष्टदैवताचा, माझ्या आराध्याचा--श्रीरामकृष्ण-देवांचा--उल्लेख करून तुम्हीं माझ्या हृदयांतील एक नाजूक तार, माझ्या हृदयांत अत्यंत खोल जागीं असलेली तार झंकृत केली आहे. मनाने, वाणीने वा क्रियेने जर माझ्याकडून कांही सत्कार्य घडलें असेल, ज्यामुळे दुनियेंतील कुणाचेंहि भलें झालें असा एखादाहि शब्द जर माझ्या मुखावाटे कधी बाहेर पडला असेल तर त्यावर माझा स्वतःचा कांहीच अधिकार नाही. तें सारें त्यांचें होय! परंतु माझ्या तोंडांतून कांही शाप निघाले असतील, मीं जर कुणाविषयी तिरस्काराने कांही बोललों असेन तर तें सारेचें सारें माझें होय. त्यांतलें कांहीच त्यांचें नाही. माझ्या ठायीं जें कांही दुबळेपणाचें आहे, सदोष आहे, तें सारें माझें आहे; आणि जें कांही जीवनदायी आहे, बलदायी आहे, पवित्र आहे, पावन आहे तें सगळें त्यांच्याच शक्तीचें स्फुरण आहे, तें सगळें त्यांचीच वाणी आहे, तें सगळें-कांही स्वयं तेच आहेत. मित्रांनो, हें खरें की जगाला अजून त्यांची ओळख पटावयाची आहे. जगाच्या इतिहासांत अनेक महापुरुषांच्या जीवनकथा आपण वाचीत असतों. आज आपल्याला उपलब्ध असलेल्या त्यांच्या चरित्रांवरून शतकानुशतकें त्या महापुरुषांच्या शिष्यप्रशिष्यांचा हात फिरत आला आहे--त्यांत त्यांनी कितीतरी बदल केला आहे. ह्या प्राचीन महापुरुषांचीं चरित्रें हजारो वर्षें काटछाट होऊन आणि घासलीं-पुसलीं जाऊन आपल्या हातीं पडत आहेत. आणि तरीहि ज्यांचें जीवन मीं स्वतःच्या डोळ्यांनी पाहिलें आहे, ज्यांच्या कृपेच्या सावलींत मी राहिलों आहें, ज्यांच्या पायाशीं बसूनच मीं सारेंकांही शिकलों आहें त्या रामकृष्णांच्या चरित्राइतकें देदीप्यमान आणि महिमामय चरित्र माझ्या मतें ह्यांतील कुणाहि महापुरुषाचें नाही. मित्रहो, तुम्हां सर्वांनाच गीतेंतील तें सुप्रसिद्ध वचन ठाऊक असेलच--

"यदा यदाहि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत।
अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम्॥
परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम्।
धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे॥"

--"हे अर्जुना, जेव्हा जेव्हा धर्माला अवकळा प्राप्त होते व अधर्माचा

प्रसार होतो, तेव्हा तेव्हा मी शरीर धारण करून अवतरतों. सज्जनांच्या रक्षणासाठी व दुष्टांच्या निर्दालनासाठी आणि धर्म फिरून नीट प्रतिष्ठित करण्यासाठी, मी प्रत्येक युगांत जन्म घेतों."

ह्याबरोबरच आणखी एक गोष्ट तुम्हीं समजून घेतली पाहिजे. अशी गोष्ट, अशी घटना आज आपल्या समोरच विद्यमान आहे. आध्यात्मिकतेचा असा एक प्रचंड लोंढा येण्यापूर्वी समाजांत सर्वत्र तसल्याच परंतु लहान लहान लाटा एकामागून एक उठत असतात. आणि मग यांमधीलच एक लाट--पहिल्याने जी कुणाच्या नजरेस पडली नाही, जिच्या अस्तित्वाची कुणीं दखल घेतली नाही, जिच्या गुप्त शक्तीची कुणाला कल्पना देखील आली नाही अशी त्यांमधीलच एक लाट--हळूहळू मोठी होते, इतर साऱ्या लहान लहान लाटांना जणु गिळंकृत करून स्वतःमधे समाविष्ट करून घेते; अशा रीतीने क्रमशः ती एका प्रचंड लोंढ्याचें रूप धारण करते आणि कुणीहि रोधूं शकणार नाही अशा शक्तीने ती समाजावर आदळते. अशी ही घटना आपल्यासमोर घडत आहे, तुम्हांला जर डोळे असतील तर ती तुम्हांला दिसेल, तुमच्या हृदयाचें कवाड जर उघडें असेल तर तुम्ही तिचें स्वागत करूं शकाल, तुम्ही जर खरोखरच सत्याचे शोधक असाल तर ती तुम्हांला आकळतां येईल. काळाचीं पाउलें ज्याला दिसत नाहीत तो पुरताच आंधळा म्हटला पाहिजे ! अहो, तुम्हीं ज्याचें नांव कधी ऐकलेंहि नसेल अशा एका आडगावांत हा मुलगा एका गरीब ब्राह्मण दांपत्याच्या पोटीं जन्माला आला, परंतु कित्येक शतकें मूर्तिपूजेविरुद्ध ओरडणाऱ्या देशांतून आज त्याची अक्षरशः पूजा होत आहे. ही कोणाची शक्ति आहे ? माझी की तुमची ? नाही, ही दुसरी तिसरी कोणतीच शक्ति नसून जी शक्ति या पृथ्वीतलावर श्रीरामकृष्णांच्या रूपाने आविर्भूत झाली होती तीच ही शक्ति आहे. कारण तुम्ही, मी, संतमहात्मे, एवढेंच नाही तर अवतारदेखील--थोडक्यांत म्हणजे हें समस्त विश्वच--शक्तीची अभिव्यक्ति आहे; कुठे ती कमी, तर कुठे जास्त घनीभूत वा पुंजीकृत झालेली असते, इतकेंच. श्रीरामकृष्णांच्या रूपाने प्रकट झालेल्या त्या महाशक्तीच्या कार्याची सध्या आपण केवळ सुरुवातच बघत आहोंत. ही पिढी अस्तास जाण्यापूर्वीच आपल्याला त्या शक्तीचें अत्याश्चर्यकारक कार्य बघावयास

मिळणार आहे. भारताच्या पुनरुत्थानासाठी ही शक्ति अगदी योग्य वेळीं आविर्भूत झाली आहे, कारण जी मूलभूत जीवनशक्ति भारताला नेहमी सजीव ठेवीत असते तिचा आपल्याला वेळोवेळीं विसर पडून जात असतो.

प्रत्येक राष्ट्राची स्वतःची अशी विशिष्ट कार्यप्रणाली असते. कांहींचें कार्य राजकारणाच्या मार्गानें होत असतें, कांहीजण समाज-सुधारणेच्या मार्गाने कार्य करतात, तर कुणी आणखीच एखाद्या मार्गाने कार्य करीत असतात. आपल्या पक्षीं धर्माला मुख्य आधार करून कार्य केल्याखेरीज दुसरा उपाय नाही. इंग्रज मनुष्य धर्मसुद्धा राजनीतीमधूनच समजूं शकतो. अमेरिकन मनुष्याला धर्मसुद्धा समाजसुधारणांमधून समजूं शकत असेल. परंतु हिंदु लोकांना राजनीतिसुद्धा धर्मामधून सांगितली तरच समजूं शकते; समाजशास्त्र म्हणा की आणखी कांही म्हणा, सारें-कांही धर्मामधून सांगितलें गेलें तरच तें हिंदु लोकांना कळूं शकतें. कारण, हिंदु जातीच्या जीवनसंगीतांतील धर्म हाच मुख्य सूर आहे; अन्य सर्व गोष्टी या संगीतांतील पूरक स्वरांप्रमाणे आहेत. आणि ही प्रधान गोष्टच धोक्यांत आली होती; आपल्या जीवनसंगीताचा हा मूळ सूरच आपण बदलून टाकावयास निघालों होतों; ज्या कण्याच्या साहाय्याने आपण उभे आहोंत तो कणाच जणु बदलून टाकण्याच्या प्रयत्नांत आपण होतों--आपल्या जातीच्या जीवनाचा धर्मरूपी कणा बदलून त्या जागीं राजनीतिरूपी कणा बसविण्याचा उद्योग आपण आरंभिला होता. यांत जर आपल्याला यश मिळालें असतें तर समूळ विनाश हाच त्याचा परिणाम झाला असता. परंतु असें व्हावयाचें नव्हतें. म्हणूनच ही महा-शक्ति अविर्भूत झाली. या थोर विभूतीकडे तुम्ही कोणत्या दृष्टीने पाहतां याची मला चिंता नाही, तुम्ही तिला किती मान देतां याचेंहि विशेष महत्त्व नाही; परंतु मी छातीठोकपणें अगदी आव्हानपूर्वक सांगूं इच्छितों की असल्या अद्भुत महाशक्तीचा आविर्भाव भारतांत गेल्या कित्येक शतकांमधे झालेला नाही. आणि भारताच्या पुनरुज्जीवनासाठी, भारताच्या कल्याणासाठी, समस्त मानवजातीच्या कल्याणासाठी ह्या शक्तीच्या द्वारें काय कार्य होत आहे हें बघण्याकरिता त्या शक्तीची नीट माहिती करून घेणें, तिचें अनुशीलन करणें हें हिंदु या नात्याने तुमचें

कर्तव्य आहे. होय, सार्वजनीन धर्म आणि पंथापंथांमधील बंधुभाव यांसंबंधीच्या कल्पना जगांतील कोणत्याहि देशांत उदयास येण्याच्या आणि चर्चिल्या जाण्याच्या कितीतरी पूर्वीच, येथे, या कलकत्ता नगराजवळच असा एक महापुरुष राहत होता की ज्याचें उभें आयुष्यच एक खरीखुरी सर्वधर्मपरिषद होतें.

बंधूंनो, आपल्या शास्त्रांनुसार निर्गुण ब्रह्मच आपलें अंतिम लक्ष्य होय, आणि ईश्वरेच्छेने आपण सर्वचजण जर त्या निर्गुण ब्रह्माचा साक्षात्कार करून घेण्यास समर्थ असतों तर फार चांगलें झालें असतें. परंतु वस्तुस्थिति ज्याअर्थी तशी नाही त्याअर्थी अधिकांश मानवजातीचें एखादा सगुण आदर्श समोर असल्याखेरीज मुळीच चालावयाचें नाही; असल्या एखाद्या थोर आदर्श पुरुषावर मनापासून प्रेम करून परम उत्साहाने त्यांच्या पताकेखाली एकत्रित झाल्याखेरीज कोणतीहि जात वर येऊं शकत नाही, मोठीं होऊं शकत नाही, फार काय, पण मुळीं कामच करूं शकत नाही. राजकारणाच्या क्षेत्रांतील, समाजकारणाच्या क्षेत्रांतील अथवा व्यापारविषयक क्षेत्रांतील कोणीहि आदर्श पुरुष भारतीयांच्या मनावर प्रभाव पाडूं शकणार नाही. आम्हां भारतीयांना आध्यात्मिक आदर्श हवे आहेत; अध्यात्मराज्यांतील थोर महापुरुषांच्या नांवाने आम्ही उत्साहाने एकत्र होऊं इच्छितों. केवळ धर्मवीर पुरुषालाच आम्ही आदर्श मानीत असतों. श्रीरामकृष्णांच्या रूपाने आपल्याला अशा प्रकारचा एक धर्मवीर--अशा प्रकारचा एक आदर्श पुरुष लाभला आहे. मी अगदी ठामपणें सांगतों की या राष्ट्राचें जर उत्थान व्हावयाचें असेल तर त्यासाठी आपणां सर्वांना अत्यंत उत्साहाने ह्या नांवाभोवती गोळा व्हावें लागेल. श्रीरामकृष्णांचा प्रचार मी करतों की तुम्ही करतां की आणखी कुणी करतो हा कांही महत्त्वाचा प्रश्न नाही. पण ह्या महापुरुषाचा आदर्श मीं तुमच्यासमोर ठेवला आहे, आणि आपल्या समाजाच्या व राष्ट्राच्या कल्याणासाठी ह्या आदर्शाचा कसा लाभ करून घ्यावयाचा हें तुम्हींच ठरवावयाचें आहे. एक गोष्ट मात्र लक्षांत ठेवा की तुम्हीं ज्या साऱ्या महापुरुषांना बघितलें आहे, किंवा स्पष्टच बोलावयाचें म्हणजे ज्या साऱ्या महापुरुषांचीं चरित्रें तुम्हीं वाचलीं आहेत त्या सगळ्यांमधे ह्यांचें जीवन सर्वांत जास्त पवित्र होतें. आणि ही तर तुमच्या

डोळ्यांसमोर असलेली वस्तुस्थितिच आहे की आध्यात्मिक शक्तीच्या ह्या असल्या अत्यद्‌भुत अभिव्यक्तीविषयी तुम्हांला कधी अन्यत्र वाचावयासहि सापडावयाचें नाही, मग ती बघावयास मिळणें तर दूरचीं गोष्ट. त्यांच्या तिरोधानानंतर दहा वर्षांच्या आंतच त्यांच्या शक्तीने जगाला व्यापून टाकलें आहे हें तुम्ही प्रत्यक्ष बघतच आहांत. म्हणून आपल्या जातीच्या व धर्माच्या कल्याणासाठी कर्तव्यबुद्धीने प्रेरित होऊन मी हा महान् आध्यात्मिक आदर्श तुमच्यासमोर ठेवींत आहें. माझ्या-वरून तुम्ही त्यांची पारख करूं नका. मी त्यांच्या हातांतील केवळ एक अत्यंत असमर्थ, अगदी यःकश्चित् असें साधन आहें. माझ्याकडे बघून तुम्ही त्यांचें चारित्र्य जोखूं नका. ते इतके थोर होते, इतके महान् होते की मीं किंवा त्यांच्या आणखी कोणत्याहि शिष्याने शेकडो जीवनें घालविलीं तरी देखील त्यांच्या कणाचीहि आम्हांला कुणास सर याव-याची नाही--ते खरोखर जें कांही होते त्यांच्या कोटयंशाचीहि आम्हीं कोणी शेकडो जन्मांतहि बरोबरी करूं शकणार नाहीं. म्हणून तुम्हीच विचार करून ठरवा, तुमच्या हृदयांत तो सनातन साक्षीस्वरूप भगवान विराजमान आहे; आणि मी अंतःकरणपूर्वक प्रार्थना करतों की तुमच्या हृदयांत विराजमान असलेले भगवान श्रीरामकृष्ण आपल्या जातीच्या, आपल्या देशाच्या व समग्र मानवजातीच्या कल्याणासाठी तुमचीं हृदयें खुलीं करोत; आपण कांही प्रयत्न केला किंवा न केला तरी जें युगपरिवर्तन घडून येणारच आहे त्याला साहाय्य करण्यासाठी भगवान तुम्हांला निष्कपट व स्थिरमति करोत. तुमच्यासारख्या वा माझ्यासारख्या लोकांसाठी भगवंताचें कार्य थांबत नसतें. ते आपल्या कार्यासाठी धुळीं-तूनहि शेकडो हजारो कार्यकर्ते उत्पन्न करूं शकतात. त्यांचें कार्य करण्याची संधि मिळणें ही तर आपल्या पक्षीं मोठ्या गौरवाची व सद्‌भाग्याची गोष्ट आहे.

मी आपली कल्पना आपल्यासमोर आता विस्ताराने मांडतों.

तुम्हीं म्हटल्याप्रमाणे आपल्याला सर्व जग जिंकावयाचें आहे. होय, आपल्याला तसें केलेंच पाहिजे! भारताने जगावर विजय संपादन केलाच पाहिजे; याहून कमी प्रतीचें कोणतेंहि ध्येय माझें समाधान करूं शकणार नाही. हें ध्येय फार विशाल असेलहि व त्यामुळे तुमच्यापैकी

अनेकांना आश्चर्याचा धक्काहि बसेल, पण तरीहि हेंच आपलें ध्येय असलें पाहिजे. आपण जगावर विजय मिळविलाच पाहिजे किंवा विनाश तरी पत्करला पाहिजे. याहून अन्य पर्याय नाही. विस्तार पावणें हें जीवनाचें लक्षण आहे. आपण आपल्या सीमेबाहेर पडलेंच पाहिजे. आपला विस्तार केलाच पाहिजे, आपला जिवंतपणा दाखविलाच पाहिजे, अन्यथा अवनत होऊन, सडून विनाश पत्करला पाहिजे. याहून दुसरा पर्याय नाही. या दोहोंपैकी कोणतेंतरी एक निवडा—जिवंत राहा किंवा मरून जा. आता, आपल्या देशांत विद्यमान असलेले क्षुद्र कलह व मत्सर हे आपणां सर्वांना ठाऊक आहेतच. पण मीं तुम्हांला सांगतों की हें असें सर्वंच ठिकाणीं आहे. अन्य राष्ट्रांना त्यांच्या राजकीय प्रणालीनुसार परराष्ट्रीय धोरणें असतात. जेव्हा त्यांना स्वतःच्या देशांत पुष्कळ कलह चाललेले आढळतात तेव्हा ते दुसऱ्या कोणत्यातरी देशाशीं कलह सुरू करतात व मग त्यांच्या देशांतील भांडणें थांबतात. आपल्या देशांत असेच कलह चालू आहेत, पण ते थांबविण्यासाठी आपल्या देशाचें कोणतेंहि परराष्ट्रीय धोरण नाही. म्हणून, आपल्या धर्मग्रंथांतील सत्यें हीं अन्य राष्ट्रांना शिकविणें हें आपलें नित्याचें परराष्ट्रीय धोरण असलें पाहिजे. त्यामुळे आपल्या राष्ट्रांत ऐक्य निर्माण होईल. याचें तुम्हांला कांही प्रमाण हवें आहे काय ? तुमच्यापैकी जे राजनैतिक विचार बाळगणारे आहेत त्यांना मी हा प्रश्न विचारीत आहें. ही सभाच या गोष्टीचें पुरेसें प्रमाण नाही काय ?

दुसरें असें की, हा स्वार्थमूलक विचार जरी सोडून दिला तरी आपल्याला प्रेरणा देणारीं कितीतरी निःस्वार्थ, उदात्त व जिवंत उदाहरणें आपल्याजवळ आहेत. भारताच्या दुःस्थितीचें व पतनाचें एक मोठें कारण हें की, त्याने स्वतःला संकुचित करून घेतलें, एखाद्या शिंपल्यांतील किड्याप्रमाणे तो स्वतःच्या कवचांत दडून बसला व अन्य मानववंशांना आपलीं विचाररत्नें देण्याचें त्याने नाकारलें. आर्यांव्यतिरिक्त इतर पिपासु जातींना जीवनदायी सत्यें त्याने दिलीं नाहीत. आपण बाहेर गेलों नाहीं आणि अन्य देशांतील परिस्थितीशीं आपल्या देशांतील परिस्थितीची तुलना केली नाही. हेंच आपल्या पतनाचें एक मोठें कारण ठरलें; आणि तुमच्यापैकी प्रत्येकास हें ठाऊक आहे की भारतामधे जें

कांही थोडेसें चैतन्य दिसत आहे तें राजा राममोहन रॉय यांनी आपल्या देशाच्या संकुचितपणाच्या सीमा जेव्हा मोडल्या तेव्हापासूनच दिसूं लागलें आहें. तेव्हापासून भारतीय इतिहासाला नवें वळण मिळालें असून आता त्याचा द्रुतगतीनें विकास होत आहे. भारतांत पूर्वी जर छोटे छोटे प्रवाह दिसले असतील तर आता एक महापूर येत आहे. त्याला कोणीहि रोधूं शकणार नाही. म्हणून आपण देशांतून बाहेर पडलें पाहिजे, कारण आदानप्रदान हेंच जीवनाचें रहस्य आहे. काय आपण नेहमीच पाश्चात्यांच्या पायाशीं बसून प्रत्येक गोष्ट ग्रहण करणार आहोंत ?--धर्म देखील त्यांच्यापासून शिकणार आहोंत? आपण त्यांच्यापासून यंत्रविद्या शिकूं शकूं, अन्यहि पुष्कळ गोष्टी शिकूं शकूं, पण त्यांनाहि आपण कांही गोष्टी शिकवूं शकतों. आणि त्या म्हणजे आपला धर्म व आपली आध्यात्मिकता ह्या होत. परिपूर्ण संस्कृतीसाठी जग वाट पाहत आहे; पूर्वजांपासून वारसा म्हणून भारतास प्राप्त झालेली धर्मसंपदा भारताकडून सर्वांना मिळावी यासाठी जग आतुर झालें आहे; आपल्या जातीनें कित्येक शतकांचें पतन व दुर्गति यांमधेहि उराशीं कवटाळून ठेवलेली अपूर्व आध्यात्मिक संपदा मिळावी म्हणून जग वाट पाहत आहे, हीं विचाररत्नें मिळावींत यासाठी जग आतुर आहे; भारताबाहेर या आपल्या पूर्वजांच्या अलौकिक संपदेविषयी केवढी पिपासा व औत्सुक्य आहे याची फारच थोडी कल्पना तुम्हांला असेल. येथे आपण बडबडतों, एकमेकांशीं भांडत असतों, पवित्र अशा प्रत्येक गोष्टीला आपण हसतों, इतकें की अखेर प्रत्येक पवित्र गोष्टीचा उपहास करणें हा आपला एक राष्ट्रीय दुर्गुण होऊन बसला आहे. आपल्याला याचें फारच थोडें ज्ञान आहे की या देशाच्या सीमेपार असलेले लक्षावधि लोक, आपले हात पसरून भारतामधे आपल्या पूर्वजांनी संचित करून ठेवलेलें हें अमृत, थोडें का होईना, प्राशन करावयास मिळावें यासाठी उत्कंठित झालेले आहेत. म्हणून आपण आपल्या देशाच्या बाहेर पडलें पाहिजे व इतर देशांजवळ जें कांही देण्यासारखें असेल तें घेऊन त्याबद्दल त्यांना आध्यात्मिकता दिली पाहिजे; आध्यात्मिक क्षेत्रांतील अपूर्व तत्त्वें त्यांना देऊन भौतिक क्षेत्रांतील अपूर्व तत्त्वें आपण त्यांच्यापासून घेतलीं पाहिजेत. आपण सदैव शिष्यच न राहतां गुरुहि होऊं या. समान झाल्याशिवाय मैत्री होऊं शकणार

नाही; व जोंवर एक समाज सदैव गुरूच्या भूमिकेंत राहील व दुसरा समाज सदैव त्याच्या पायांशीं शिष्य म्हणून बसेल तोंवर समता प्रस्थापित होणार नाही. इंग्रज व अमेरिकन लोकांच्या बरोबरीचे तुम्हांस व्हावयाचें असेल तर त्यांच्यापासून शिकण्याबरोबरच त्यांनाहि तुम्हीं शिकवलें पाहिजे. आणि जगाला आगामी कित्येक शतकें देतां येईल इतका आध्यात्मिक ज्ञानाचा साठाहि तुमच्याजवळ आहे. म्हणून हें कार्य तुम्हीं केलेंच पाहिजे. आपल्या रक्तांत जोम व उत्साह असला पाहिजे. लोक म्हणतात की वंगवासियांची कल्पनाशक्ति मोठी प्रखर असते. ह्यावर माझा विश्वास आहे. एक कल्पनाप्रिय व भावनाशील समाज म्हणून आपली हेटाळणीहि झालेली आहे. पण मित्रांनो, मी तुम्हांला सांगतों की बुद्धि ही थोर खरी, पण ती विशिष्ट मर्यादेपर्यंतच जाऊं शकते; हृदयांतून, केवळ हृदयांतूनच स्फूर्ति प्राप्त होते. सर्वोच्च रहस्यांचा उकलहि भावनेच्या द्वारेंच होत असतो; आणि म्हणून भावनाप्रधान वंगवासियांनाच हें कार्य करावयाचें आहे.

'उत्तिष्ठत जाग्रत प्राप्य वरान्निबोधत '—"उठा जागे व्हा, व ध्येय प्राप्त केल्याविना थांबूं नका." कलकत्त्यामधील तरुणांनो, उठा, जागे व्हा, कारण हीच शुभ वेळ आहे. सध्या आपल्यासाठी सर्व गोष्टी अनुकूल आहेत. धीट व्हा, भिऊं नका. केवळ आपल्याच धर्मग्रंथांत ईश्वराला 'अभीः अभीः' असें विशेषण लावण्यांत आलें आहे. आपल्याला अभीः—निर्भय—झालें पाहिजे, म्हणजे आपलें काम पूर्ण होईल. उठा, जागे व्हा, कारण आपल्या देशाला अशा मोठ्या त्यागाची जरूरी आहे. तरुण लोकच तो करूं शकतील. "तरुण, उत्साही, शक्तिमान्, सुदृढ, बुद्धिमान्" अशांचें हें कार्य आहे. आणि आपल्या या कलकत्त्यांत असे शेकडो, हजारो तरुण आहेत. तुम्ही म्हणतां त्याप्रमाणे मीं कांही कार्य केलें असेल, तर हें लक्षांत असूं द्या की कलकत्त्यांतील रस्त्यांत खेळणारा मी एक अगदी सामान्य असा मुलगा होतों. मीं जर फार मोठें कार्य केलें असेल तर तुम्ही त्याहून कितीतरी अधिक करूं शकाल! उठा, जागे व्हा, हें जग तुम्हांला आवाहन करीत आहे. भारताच्या अन्य विभागांत बुद्धिमत्ता आहे, पैसा आहे, पण उत्साहशक्ति केवळ या माझ्या वंगभूमींतच आहे. हा उत्साह प्रतीत होऊं द्या. म्हणून कलकत्त्यांतील

तरुणांनो उठा, हृदयांतील उत्साह जागवून उठा. आपण गरीब आहोंत, आपल्याला मित्र नाहीत असें समजूं नका. पैशाने मनुष्य घडविलेला कोणीं पाहिला आहे काय ? मनुष्यच पैसा निर्माण करीत असतो. मनुष्याच्या शक्तीने, उत्साहाच्या बळाने व श्रद्धेच्या सामर्थ्याने हें सर्व जग बनलेलें आहे.

सर्व उपनिषदांत अतिशय सुंदर असें कठ उपनिषद् तुमच्यापैकी ज्यांनी वाचलें असेल त्यांना आठवेल की नचिकेत्याचा पिता एक मोठा यज्ञ करीत होता, आणि मूल्यवान् अशा वस्तूंचें दान देण्याऐवजी तो विशेष उपयुक्त नसलेल्या गायींचें व घोड्यांचें दान देत होता. हें उपनिषद् पुढे सांगतें की त्याचा मुलगा जो नचिकेता त्याच्या हृदयांत त्या वेळीं श्रद्धेने प्रवेश केला. 'श्रद्धा' या शब्दाचा इंग्रजी अनुवाद करून मी सांगणार नाहीं, कारण तो चुकीचा अनुवाद होईल; हा समजण्यास कठीण असा एक विलक्षण शब्द आहे, व तो समजून घेण्यावर पुष्कळ गोष्टी अवलंबून आहेत. श्रद्धेचा कसा प्रभाव पडतो तें पाहा. श्रद्धेचा उदय होतांच नचिकेता स्वतःशीं म्हणतो, 'मी पुष्कळांहून श्रेष्ठ आहें, कांही लोकांमधे मी मध्यम आहें, परंतु अगदी कनिष्ठ मात्र कोठेच नाहीं, मीहि कांहीतरी करूं शकतों.' त्याचें धैर्य वृद्धिगत झालें, आणि आपल्या मनांत घोळणारी मृत्यूची समस्या सोडवावी असें त्याला वाटूं लागलें. आता, ही समस्या यमाच्या निवासस्थानीं जाण्यानेच सुटणारी होती, म्हणून तो कुमार तेथे गेला. तेथे तो शूर नचिकेता यमाच्या दाराशीं तीन दिवस बसून होता. आणि त्याने आपलें ईप्सित कसें साध्य करून घेतलें हें तुम्हीं जाणतांच. आपल्याला जर कांही हवें असेल तर तें म्हणजे ही श्रद्धाच होय. दुर्दैवाने आज ती भारतांतून प्रायः लोप पावली आहे, आणि म्हणूनच आपली अशी दुर्दशा झाली आहे. मनुष्यामनुष्यांत जर कांहीं फरक दिसत असेल तर तो या श्रद्धेमुळेच होय, दुसऱ्या कशामुळे नाहीं. एक जण थोर, तर दुसरा सामान्य व दुर्बल, असें कशामुळे होत असेल तर तें श्रद्धेमुळेच होय. माझे गुरुदेव म्हणत की जो स्वतःला दुर्बल समजतो तो दुर्बल होतो. आणि हें खरें आहे. ही श्रद्धा तुमच्यांत निर्माण झालीच पाहिजे. पाश्चात्त्य जातींत दिसून येणारें जें कांही भौतिक सामर्थ्य आहे तें सर्व या श्रद्धेमुळेच होय. कारण त्यांची स्वतःच्या शारीरिक बळावर श्रद्धा आहे;

आणि तुम्ही जर आपल्या आत्मबलावर श्रद्धा ठेवाल तर तुम्ही कितीतरी अधिक कार्य करूं शकाल! तुमचीं शास्त्रें व तुमचे ऋषि एकमुखाने ज्या आत्म्याची शिकवण देत आहेत त्या अनंत आत्म्यावर, त्या अनंत शक्तिसंपन्न आत्म्यावर श्रद्धा ठेवा. ह्या आत्म्याचा कोणी नाश करूं शकत नाही, त्याच्या ठायीं अनंत शक्ति वसत आहे, ती केवळ जागृत करावयास हवी. याच बाबतींत भारतीय तत्त्वज्ञान व इतर सर्व तत्त्वज्ञानें यांत मोठा भेद आढळतो. द्वैत, विशिष्टाद्वैत वा अद्वैत, कोणतेंहि भारतीय तत्त्वज्ञान असो, आत्म्याच्या ठायीं सर्व प्रकारची शक्ति असून ती केवळ प्रकट करावयाची असते अशी त्या सर्वांची अविचल श्रद्धा आहे. म्हणून मला जें हवें आहे, आणि आपणां सर्वांनाहि जें हवें आहे ती गोष्ट म्हणजे ही श्रद्धा, हा आत्मविश्वास होय, आणि तो प्राप्त करून घेण्याचें महान् कार्य तुमच्यापुढे आहे. प्रत्येक गोष्टीचा उपहास करणें व कशाविषयीच गांभीर्य न वाटणें हा जो भयंकर रोग आपल्या राष्ट्राच्या रक्तांत भिनूं पाहत आहे, तो दूर करा, संपूर्णपणें नाहीसा करा. बलवान व्हा व ही श्रद्धा बाळगा आणि मग सर्वकांही आपोआप घडून येईल.

मीं तर अद्यापि कांहीच केलेलें नाही; तुम्हांलाच सर्व कार्य करावयाचें आहे. उद्या मी जरी कालवश झालों तरी कार्य नष्ट होणार नाही. माझा असा दृढ विश्वास आहे की सर्वसाधारण जनतेंतून हजारो तरुण पुढे येऊन हें कार्य हातीं घेतील आणि मीं कल्पनाहि केली नसेल इतका ह्या कार्याचा ते विस्तार आणि प्रसार करतील. माझी या वंग-देशावर, विशेषतः येथील तरुणांवर श्रद्धा आहे. तरुणांवर पूर्वी कधीहि सोपविलें गेलें नसेल असें महान् कार्य बंगालमधील तरुणांवर येऊन पडलें आहे. सुमारे दहा वर्षें मीं भारतभर प्रवास केला व माझी अशी खात्री पटली आहे की आध्यात्मिक जगतांतील भारताचें योग्य स्थान त्याला पुनः एकदा प्राप्त करून देणारें सामर्थ्य बंगाली तरुणांमधून प्रकट होईल. अत्यंत भावनाशील व उत्साही अशा वंगवासी तरुणांमधून असे वीर निर्माण होतील की जे आपल्या पूर्वजांनी दिलेल्या सनातन आध्यात्मिक तत्त्वांचा प्रचार करीत करीत जगाच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत जातील. हें महान् कार्य तुमच्यापुढे आहे. म्हणून पुन्हा एकदा त्या महान् वचनाची तुम्हांला आठवण करून देऊन मी आपलें भाषण

संपवितों. "उठा, जागे व्हा व ध्येय साध्य केल्याविना थांबूं नका." भिऊं नका, कारण मानवाच्या सर्व इतिहासांत दिसून येतें की महान् म्हणून ठरलेलें सर्व सामर्थ्य हें सर्वसामान्य लोकांमधूनच प्रकट झालेलें आहे. त्यांच्यामधूनच जगांतील थोर प्रतिभासंपन्न पुरुष निर्माण झालेले आहेत. आणि इतिहासाची पुनरावृत्ति होईलच. कशाचेंहि भय बाळगूं नका. तुमच्या हातून अपूर्व कार्य होऊं शकेल. ज्या क्षणीं तुम्ही भयभीत व्हाल त्याच क्षणीं तुमची शक्ति नष्ट होईल. जगांतील सर्व दुःखांचें मूळ कारण भय हेंच आहे. भय हीच सर्वांत जास्त खुळचट अशी समजूत आहे. हें भयच आपल्या दुर्गतीचें कारण असून निर्भय झाल्याने एका क्षणांत स्वर्गप्राप्तिदेखील होऊं शकेल. म्हणून "उठा, जागे व्हा, व ध्येय प्राप्त केल्याविना थांबूं नका."

सज्जनहो, माझ्याविषयीं आपण दर्शविलेल्या सहृदयतेबद्दल मीं आपले पुनः एकदा आभार मानतों. अल्प का होईना, जगाची सेवा माझ्या हातून घडावी आणि त्यांतहि माझा देश व माझे देशबांधव यांची सेवा माझ्या हातून घडावी अशी माझी तीव्र इच्छा आहे, अगदी अंतःकरणापासून इच्छा आहे.

---

अनुक्रम 38275 दि:
30/11/63

# वेदान्ताचे विविध पैलू

(कलकत्ता येथे दिलेलें व्याख्यान)

इतिहासाचें लिपिबद्ध ज्ञानच नव्हे, तर परंपरेने चालत आलेल्या दंतकथांचा अंधुकसा प्रकाशकिरणहि जेथवर पोहोचूं शकत नाही अशा अतिप्राचीन भूतकालापासून, संथपणें प्रकाशणारा, बाह्यपरिस्थितीमुळे कधी मंद तर कधी तेजाळ होणारा, परंतु चिरंतन व सुस्थिर असा हा नंदादीप, आपली प्रभा केवळ भारतांतच नव्हे तर अखिल विचार-जगतांत पसरवीत आहे. तो आपल्या सामर्थ्यानें ही अलक्षित, शांत पण सर्वशक्तिमान अशी प्रभा चोहोकडे पसरवीत आहे. न दिसतां, न ऐकूं येतां प्रात:काळीं दवबिंदु पडावेत, परंतु त्यांनीं अतिसुंदर असे गुलाब फुलवावेत तशी या नंदादीपाची ही प्रभा आहे. आणि हा नंदादीप म्हणजे उपनिषदांचें वा वेदान्ताचें तत्त्वज्ञान होय. भारताच्या भूमीवर या तत्त्व-ज्ञानाचा प्रथम केव्हा विकास झाला हें कोणालाहि विदित नाही. त्या-विषयी अंदाज करण्याचे प्रयत्न व्यर्थ ठरले आहेत. विशेषत: पाश्चात्त्य संशोधकांनी केलेले अंदाज इतके परस्परविरोधी आहेत की त्यांच्या-वरून कोणताच कालनिर्णय करतां येत नाही. परंतु आपण हिंदु लोक आध्यात्मिकदृष्टया असें मानतों की उपनिषदांना कोणताच प्रारंभकाल नाही. तीं अनादि आहेत. उपनिषदांतील हें वेदान्त तत्त्वज्ञान म्हणजे मानवाला स्फुरलेले आध्यात्मिक क्षेत्रांतील सर्वप्रथम व त्याबरोबरच अंतिम स्वरूपाचे विचार आहेत असें मी ठामपणें सांगतों.

या वेदान्तमहासागरांतून ज्ञानप्रकाशाच्या लाटा वेळोवेळीं पूर्वेकडे व पश्चिमेकडे गेल्या आहेत. प्राचीनकाळीं त्या पश्चिमेकडे गेल्या व त्यांनी अथेन्स, अलेक्झांड्रिया व अँटिऑक येथे जाऊन ग्रीक लोकांच्या विचारांना प्रेरणा दिली. सांख्यदर्शनाने प्राचीन ग्रीक लोकांच्या मनावर स्पष्टपणें आपला प्रभाव पाडला असला पाहिजे. आणि सांख्य व इतर सर्वच भारतीय दर्शनें हीं वेदान्ताच्या वा उपनिषदांच्याच प्रामाण्यावर आधारलेलीं होतीं. भारतांतहि आज जे सर्व परस्पराविरोधी संप्रदाय

आढळतात, किंवा प्राचीन काळीं भारतांत जे परस्परविरोधी संप्रदाय अस्तित्वांत होते ते सर्वच या वेदान्ताच्या, या उपनिषदांच्याच प्रामाण्यावर आधारलेले आहेत. तुम्ही द्वैतवादी असां, विशिष्टाद्वैतवादी असां, शुद्धाद्वैतवादीं असां किंवा कोणत्याहि प्रकारचे अद्वैतवादी वा द्वैतवादी असां, किंवा तुम्ही आणखी कांहीहि असां, तुम्हांला शास्त्र म्हणून, प्रमाण म्हणून उपनिषदांचा स्वीकार करावाच लागेल. उपनिषदांचें प्रामाण्य न मानणारे तत्त्वज्ञानाचे संप्रदाय हे भारतांत वैदिक वा सनातनी मानले जात नाहीत, आणि जैन व बौद्ध दर्शनांना उपनिषदांचें प्रामाण्य नाही म्हणूनच त्यांना या भारतभूमींत थारा मिळाला नाही. याप्रमाणे आपल्याला जाणीव असो वा नसो, भारतांतील सर्व संप्रदायांतून वेदान्ताने प्रवेश केलेला आहे; आणि आपण ज्याला हिंदुधर्म म्हणतों त्या विशाल वटवृक्षाच्या अनंत शाखांमधे वेदान्ताने प्रवेश केलेला असून त्या सर्वांवर वेदान्ताचा प्रभाव दिसून येतो. आपल्याला माहीत असो वा नसो, आपण वेदान्ताचाच विचार करतों, वेदान्तांतच जगतों, वेदान्तांतच श्वसोच्छ्वास करतों, व शेवटीं वेदान्तांतच आपण विलीन होतों; आणि प्रत्येक हिंदूच्या बाबतींत हेंच खरें आहे. म्हणून भारतांत हिंदु श्रोत्यांसमोर वेदान्तावर प्रवचन करणें हें विसंगतच दिसतें. पण आज वेदान्ताचाच प्रचार करण्याची खरी गरज आहे; या युगाची ती आवश्यकताच आहे. कारण मीं आताच तुम्हांला सांगितलें की सर्व भारतीय संप्रदायांनी उपनिषदांचें प्रामाण्य मानलें पाहिजे, पण या संप्रदायांमधे वरपांगी बराच विरोध आढळतो. पुष्कळदा प्राचीन ऋषींनाहि उपनिषदांतील विभिन्न उपदेशांमधे निहित असलेल्या समन्वयाचें आकलन होऊं शकलें नाही. पुष्कळदा ऋषींमधेहि मतभेद झाले, ते इतके की, 'मतभेद नसेल तर ते ऋषि नव्हेतच' अशी म्हण प्रचारांत आली. उपनिषदांतील उपदेश द्वैतात्मक, विशिष्टाद्वैतात्मक किंवा अद्वैतात्मक असले तरी त्या सर्वांमधे जो समन्वय निहित आहे तो उत्तम प्रकारें समजून घेण्याची व त्याचा प्रचार करण्याची आज गरज निर्माण झालेली आहे. अखिल जगापुढे हा समन्वय मांडला गेला पाहिजे आणि हें कार्य भारतांत व भारताबाहेर दोन्ही ठिकाणीं होण्याची आवश्यकता आहे. ईशकृपेने मला अशा एका महापुरुषाच्या चरणांपाशी

बसण्याचें भाग्य लाभलें की ज्यांचें जीवन हेंच उपनिषदांमधील समन्वय दाखविणारें भाष्य होतें; त्यांच्या उपदेशापेक्षाहि त्यांचें प्रत्यक्ष जीवन उपनिषदांवरील सहस्रपट श्रेष्ठ असें जिवंत भाष्य होतें; त्यांना पाहून असें वाटे की उपनिषदांचें मर्मच जणु मानवीरूप धारण करून प्रकट झालें आहे. कदाचित् माझ्यांत त्या समन्वयाचा अल्पसा अंश उतरला असेल; तो मी व्यक्त करूं शकेन किंवा नाहीं हें मला सांगतां येत नाही. पण तो समन्वय आपणांपुढे मांडण्याचा मी प्रयत्न करीन. वेदान्ताचे विभिन्न संप्रदाय हे परस्परविरोधी नाहीत, ते सगळेच आवश्यक आहेत. ते परस्पर-पूरक आहेत, उत्तरोत्तर उन्नत होत जाणाऱ्या त्या पायऱ्या असून त्यांचें अंतिम लक्ष्य अद्वैत किंवा 'तत्त्वमसि' हें आहे हें दाखवून देणें माझें जीवितकार्य होय. भारतांत एक काळ असा होता की त्या वेळीं कर्मकांडाचा मोठा प्रभाव होता. वेदांच्या त्या विभागांत कांही उच्च आदर्श आढळ-तात यांत शंका नाही. आजहि आपल्या पूजाविधींतील कांही आचार हे कर्मकांडानुसारच आहेत. परंतु तरीहि वेदांमधील कर्मकांड हें भारता-मधून प्राय: लोप पावलें आहे. आज आपल्या जीवनाचा फारच थोडा भाग वेदांतील या कर्मकांडाने नियमित केला जात आहे. आपल्या सर्व-साधारण जीवनांत आपण बहुतांशीं पुराणांचे वा तंत्रांचे अनुयायी बनलों आहोंत. आणि जरी कांही ठिकाणीं ब्राह्मण मंडळी वैदिक मंत्रांचा उपयोग करीत असली तरी या मंत्रांची मांडणी, क्रम इत्यादि वेदांनुसार नसून तंत्रांनुसार वा पुराणांनुसार असतात. म्हणून वेदांच्या कर्मकांडाचे अनुयायी या अर्थाने स्वत:स वैदिक म्हणवून घेणें आपल्या पक्षीं योग्य होणार नाही असें मला वाटतें. पण आपण सर्वजण वैदान्तिक आहोंत ही गोष्ट मात्र निश्चित आहे. स्वत: हिंदु म्हणविणाऱ्या लोकांनी स्वत:ला वैदान्तिक म्हणविणें हें अधिक सयुक्तिक आहे, आणि मीं हें आधीच दाखवून दिलें आहे की वैदान्तिक या संज्ञेंत आपले द्वैती वा अद्वैती सर्वच संप्रदाय समाविष्ट होत असतात.

आज भारतांत विद्यमान असलेले सर्व संप्रदाय हे मुख्यत: द्वैती व अद्वैती या दोन विभागांत विभागले जातात. यांतील कांही संप्रदायांनी किरकोळ भेदांवर दिलेला भर व ह्या भेदांच्या आधारें त्यांनी घेतलेलीं शुद्ध अद्वैती, विशिष्टाद्वैती इत्यादि नांवें विशेष महत्त्वाचीं नाहीत. विभाग

करतांना त्या सर्वांना द्वैती वा अद्वैती यांपैकी कोणत्यातरी एका विभागांत घालतां येईल. आणि आज विद्यमान असलेल्या संप्रदायांतील कांही संप्रदाय तर अगदी नवीन आहेत व कांही संप्रदाय हे अतिप्राचीन संप्रदायांचीं केवळ नवीं स्वरूपें आहेत. रामानुजाचार्यांचें जीवन व तत्त्वज्ञान हीं या विभागांपैकी एका विभागाचे व शंकराचार्य हे दुसऱ्या विभागाचे प्रतिनिधि होत.

नंतरच्या काळांतील भारतांतील प्रमुख द्वैतवादी तत्त्वज्ञ रामानुजाचार्य हे होत. इतर सर्व द्वैतवादी संप्रदायांनी प्रत्यक्षपणें वा अप्रत्यक्षपणें त्यांच्या शिकवणीचें तात्पर्य, संप्रदायांची रचना व पुष्कळशा बारीकसारीक गोष्टी देखील त्यांच्याचपासून घेतल्या आहेत. रामानुजाचार्य व त्यांचें कार्य यांची अन्य द्वैती वैष्णवसंप्रदायांशीं तुलना केली तर, संघटना, शिकवण व पद्धति या बाबतींत त्यांच्यांत असलेलें साम्य पाहून आपल्याला आश्चर्य वाटेल. मध्वाचार्य हे दक्षिण भारतांतील एक थोर वैष्णव आचार्य होते. त्यानंतर झालेले बंगालमधील चैतन्यमहाप्रभु यांनी त्यांच्या तत्त्वज्ञानाचा बंगालमधे प्रचार केला. दक्षिण भारतांत दुसरे कांही विशिष्टाद्वैती असे शैव संप्रदाय आहेत. भारताच्या बहुतेक भागांतील शैव हे अद्वैती आहेत, तर दक्षिणभारताच्या कांही भागांतील व सिलोनमधील शैव त्यास अपवाद आहेत. ते विष्णूच्या ऐवजी शिव मानतात व आत्म्याविषयीच्या सिद्धान्ताव्यतिरिक्त अन्य सर्व बाबतींत ते रामानुजाचार्यांचेंच मत मानतात. रामानुजाचार्यांचे अनुयायी आत्म्याला अणुरूप म्हणजे सूक्ष्म मानतात, तर शंकराचार्यांचे अनुयायी त्याला विभु म्हणजे सर्वव्यापी मानतात. प्राचीनकाळीं कितीतरी अद्वैतवादी संप्रदाय होऊन गेले. प्राचीनकाळच्या कितीतरी संप्रदायांना शंकराचार्यांच्या संप्रदायाने स्वत:मधे समाविष्ट करून आत्मसात् करून घेतलें असावें असें वाटतें. कित्येकदा शंकराचार्यांवरहि टीकास्त्र सोडलेलें कांही भाष्यांमधे, विशेषत: विज्ञानभिक्षूच्या भाष्यामधे दिसून येतें; विज्ञानभिक्षु हे अद्वैतवादी असूनहि त्यांनी शंकराचार्यांचा मायावाद उडवून लावण्याचा प्रयत्न केला. असें दिसतें की मायावाद न मानणारे कांही संप्रदाय त्या काळीं असून शंकराचार्यांना प्रच्छन्न बौद्ध म्हणण्यापर्यंत त्यांची मजल गेलेली होती, व हा मायावाद बौद्धांपासून घेऊन शंकराचार्यांनी तो

वेदान्ततत्त्वज्ञानांत शिरवून दिला असें त्यांना वाटत होतें. तें कांहीहि असलें तरी आज मात्र सर्व अद्वैतवादी संप्रदाय शंकराचार्यांच्या ध्वजाखाली एकत्र आलेले दिसतात; आणि शंकराचार्य व त्यांचे शिष्य यांनीच दक्षिण भारतांत व उत्तर भारतांत अद्वैताचा मोठ्या प्रमाणावर प्रचार केला. बंगाल, काश्मीर व पंजाब या ठिकाणीं शंकराचार्यांचा प्रभाव फारसा पसरला नाही, पण दक्षिण भारतांतील सर्व स्मार्त हे शंकराचार्यांचे अनुयायी आहेत आणि उत्तर भारतांत वाराणसी हें शंकराचार्यांच्या अनुयायांचें केंद्रस्थान असून तिकडील कितीतरी भागांत त्यांचा सखोल प्रभाव पडलेला दिसून येतो.

आणखी एक गोष्ट म्हणजे शंकराचार्य व रामानुजाचार्य या दोघांनीहि आपली शिकवण अगदी नवीन असल्याचा दावा मांडला नाही. 'थोर भाष्यकार बोधायन यांच्या भाष्याचेंच मी अनुसरण करीत आहें' असें रामानुजाचार्यांनी स्पष्टच सांगितलें आहे. ब्रह्मसूत्रांवरील आपल्या श्रीभाष्याच्या प्रारंभीं ते म्हणतात--"भगवद् बोधायनकृतां विस्तीर्णां ब्रह्मसूत्रवृत्तिं पूर्वाचार्याः संचिक्षिपुः तन्मतानुसारेण सूत्राक्षराणि व्याख्यास्यन्ते ।"--"प्राचीन आचार्यांनी भगवान् बोधायनांच्या ब्रह्मसूत्रांवरील विस्तृत भाष्याला संक्षिप्त रूप दिलें; त्यांच्या मतानुसार सूत्रांचा अर्थ मी स्पष्ट करीत आहें." त्यांनी बोधायनांचें भाष्य घेऊन त्याला संक्षिप्त रूप दिलें व तें आज आपल्याला उपलब्ध आहे. बोधायनांचें भाष्य मला कधीच पाहायला मिळालें नाही. स्वामी दयानंद सरस्वती हे बोधायनांच्या भाष्याखेरीज ब्रह्मसूत्रांवरील दुसरें कोणतेंहि भाष्य स्वीकारण्यास तयार नव्हते; आणि जरी रामानुजाचार्यांवर टीकास्त्र सोडण्याची एकहि संधि त्यांनी दवडली नाही तरी ते स्वतःदेखील बोधायनांचें भाष्य लोकांपुढे ठेवूं शकले नाहीत. भारतांत सर्वत्र मीं तें मिळविण्याचा प्रयत्न केला, परंतु अद्याप मला तें मिळालें नाही. पण ह्या बाबतींत रामानुजाचार्यांची भूमिका अगदी स्पष्ट आहे. 'पुष्कळसे विचार व कांही वेळां प्रत्यक्ष उतारेहि बोधायनभाष्यावरून घेऊन व त्यांना संक्षिप्त रूप देऊन मीं आपलें भाष्य तयार केलें आहे' असें त्यांनी स्पष्टपणें म्हटलें आहे. शंकराचार्यांनी देखील असेंच केलेलें आहे असें दिसतें. त्यांच्या भाष्यांत कांही ठिकाणीं

पूर्वीच्या भाष्यांचा उल्लेख आहे, आणि त्यांचे गुरु व गुरूंचे गुरु हे, शंकराचार्य ज्या संप्रदायाचे वेदान्ती होते त्याच संप्रदायाचे होते, इतकेंच नव्हे तर त्या दोघांनीहि कांही मुद्यांवर शंकराचार्यांहूनहि अधिक स्पष्टपणें व ठामपणें अद्वैतमत मांडलें आहे, ही गोष्ट ध्यानीं घेतल्यास आपल्याला कळून येईल की शंकराचार्यांनीहि विशेष नवीन असें कांहीं सांगितलें नाही. रामानुजाचार्यांनी ज्याप्रमाणे बोधायनभाष्यावरून आपल्या भाष्याची रचना केली त्याचप्रमाणे शंकराचार्यांनीहि कोणत्या-तरी प्राचीन भाष्यावरून आपलें भाष्य रचलें असावें, पण कोणत्या भाष्या-वरून त्यांनी तसें केलें हें निश्चित सांगण्यास आज कांहीं मार्ग नाही. तुम्हीं पाहिलेलीं वा ऐकलेलीं हीं सर्व दर्शनें उपनिषदांच्या प्रामाण्यावर आधार-लेलीं आहेत. जेव्हा तीं श्रुतींमधील अवतरणें देतात तेव्हा उपनिषदेंच त्यांना अभिप्रेत असतात. तीं नेहमीच उपनिषदांतील वचनें उद्धृत करीत असतात. उपनिषदांचा मागोवा घेणारीं दुसरीं अनेक दर्शनें भारतांत निर्माण झालीं, पण व्यासांच्या दर्शनाइतका प्रभाव भारतांत कोणत्याहि दर्शनाचा पडला नाही. तसें पाहिलें तर व्यासांचें तत्त्वज्ञानहि पूर्वीच्या सांख्यदर्शनाचेंच विकसित स्वरूप आहे, आणि भारतांतील प्रत्येक दर्शनच नव्हे तर जगांतील सर्व तत्त्वज्ञानेंहि कपिल ऋषींची ऋणी आहेत. तत्त्व-ज्ञानाच्या व मानसशास्त्राच्या क्षेत्रांत भारताच्या इतिहासांत संभवतः कपिल ऋषिच सर्वांहून जास्त महशूर होते. सर्व जगांतच कपिलांच्या विचारसरणीचा प्रभाव दिसून येतो. जेथे म्हणून मान्यता पावलेला तत्त्वज्ञानाचा संप्रदाय आहे तेथे त्यांचा प्रभाव तुम्हांला आढळेल. एखादा संप्रदाय हजार वर्षांपूर्वीचा जरी असला तरी तेथेहि तेजस्वी, महिमाशाली व प्रतिभासंपन्न अशा कपिलांचा प्रभाव आढळेल. त्यांचें मनोविज्ञान व त्यांच्या तत्त्वज्ञानाचा बराचसा भाग भारतांतील सर्वच संप्रदायांनी थोडाफार बदल करून स्वीकारलेला आहे. आपल्या बंगाल-मधील नैयायिक तत्त्वज्ञ भारतीय तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रांत फारसा प्रभाव पाडूं शकले नाहीत. 'सामान्य', 'विशेष', 'जाति', 'द्रव्य', 'गुण' इत्यादि लहान लहान गोष्टींतच, आणि त्यांनी निर्माण केलेल्या अत्यंत अवघड अशा पारिभाषिक शब्दांतच ते सर्वदा व्यग्र राहिले. याप्रमाणे त्यांनी तर्कशास्त्र हेंच आपलें क्षेत्र मानलें व तत्त्वज्ञानाचें क्षेत्र वेदान्त्यांकडे

सोपविलें. पण भारतांतील प्रत्येक दर्शनाने आज बंगालमधील नैयायिकांचे पारिभाषिक शब्द उपयोगांत आणले आहेत. जगदीश, गदाधर व शिरोमणि हे नदिया शहरीं जेवढे विख्यात आहेत तितकेंच ते मलबारमधील कांही शहरांतूनहि प्रसिद्ध आहेत. पण व्यासांचें तत्त्वज्ञान--व्याससूत्रें हीं भारतांत सर्वत्र सुप्रतिष्ठित झालेलीं आहेत आणि लोकांना वेदान्त-तत्त्वज्ञानांतील ब्रह्माची शिकवण देऊन तीं चिरस्थायी झालीं आहेत. या व्याससूत्रांत तर्काला श्रुतींच्या पूर्णपणें अधीन मानलें आहे, आणि शंकराचार्यांनी असें म्हटलें आहे की व्यासांनी तर्कविचाराचा प्रयत्नच केलेला नाही. सूत्रांची रचना करण्यांत त्यांचा हेतु, वेदान्तांतील मंत्र फुलांप्रमाणे एका सूत्रांत गुंफून त्यांचा एक हार करावा एवढाच होता. जोंवर त्यांचीं सूत्रें उपनिषदांचें अनुसरण करतात तोंवरच त्यांचें प्रामाण्य आहे, त्याहून अधिक नाहीं.

तेव्हा मीं सांगितल्याप्रमाणे भारतांतील सर्वच संप्रदाय आज व्याससूत्रांना सर्वश्रेष्ठ प्रमाण मानतात व येथे कोणालाहि नवीन संप्रदाय स्थापन करावयाचा झाल्यास तो आधी आपल्या मताप्रमाणे व्याससूत्रांवर नवीन भाष्य लिहितो. कित्येकदा या विभिन्न भाष्यांमधे फार मोठा मतभेद आढळतो; कित्येकदा त्यांतील अर्थाची ओढाताण ही चीड आणणारी अशी असते. पण व्याससूत्रांना असें असाधारण प्रामाण्य मिळालेलें असून, त्यावर नवीन भाष्य लिहिल्याविना येथे कोणताहि नवा संप्रदाय निर्माण होऊं शकत नाही.

प्रामाण्याच्या बाबतींत व्याससूत्रांनंतर जगप्रसिद्ध गीतेचें स्थान आहे. शंकराचार्यांचें महान् कार्य म्हणजे त्यांनी केलेला गीतेचा प्रचार हें होय. या थोर पुरुषाने आपल्या महान् जीवनांत पार पाडलेल्या महान् कार्यांपैकी गीतेचा प्रचार व गीतेवरील अत्यंत सुंदर भाष्य हीं सर्वश्रेष्ठ कार्यें होत. भारतांतील सर्वच वैदिक संप्रदायांच्या संस्थापकांनी त्यांचें अनुसरण करून गीतेवर आपापलें भाष्य लिहिलें आहे.

उपनिषदें हीं पुष्कळच म्हणजे एकशेआठ आहेत असें म्हणतात. पण कांहींच्या मतें तीं त्याहिपेक्षा अधिक आहेत. त्यांच्यापैकी कांही उघडच अगदी अलीकडील आहेत; उदाहरणार्थ अल्लोपनिषद्; या उपनिषदांत अल्लाची स्तुति असून महंमदास 'रजसुल्ला' म्हटलें आहे. मीं असें ऐकलें

आहे की अकबराच्या काळांत हिंदु व मुसलमान यांना एकत्र आणण्या-करिता हें उपनिषद् लिहिलें गेलें. संहितेमधील अल्ला किंवा इल्ला यांसारखा एखादा शब्द घेऊन त्यावरून हें उपनिषद् रचण्यांत आलें. याप्रमाणे या उपनिषदांत महंमदास 'रजसुल्ला' म्हटलें आहे, मग या शब्दाचा अर्थ कांही का असेना. अशाच प्रकारचीं दुसरींहि सांप्रदायिक उपनिषदें आहेत. तीं अगदी अर्वाचीन आहेत. अशीं उपनिषदें लिहिणें कठीण नव्हतें, कारण वेदांच्या संहिताभागांतील भाषा इतकी प्राचीन आहे की ती व्याकरणाच्या कोणत्याच नियमांनी बांधलेली नाही. पुष्कळ वर्षांपूर्वी, वेदांतील भाषेचें व्याकरण शिकावें असें मला वाटलें, म्हणून मोठ्या तत्परतेने मीं पाणिनीचें व्याकरण व त्यावरील महाभाष्य वाचावयास सुरुवात केली. पण हें पाहून मला आश्चर्य वाटलें की वेदांच्या व्याकरणाचा अधिकांश भाग हा व्याकरणाच्या सामान्य नियमांना असलेल्या अपवादांनीच भरलेला आहे. व्याकरणाचा एखादा नियम मांडण्यांत येतो व नंतर लगेच म्हटलें जातें की "वेद या नियमाला अपवाद होत." कोणालाहि कांहींहि लिहिण्यास केवढें स्वातंत्र्य आहे, हें तुम्हांला यावरून कळून येईल. फक्त यास्काचार्यांच्या 'निरुक्ता'मुळेच या गोष्टीवर थोडेंसें नियंत्रण आहे. पण त्यांतहि बहुतेक ठिकाणीं केवळ समानार्थी शब्द दिलेले तुम्हांला आढळतील. अशी परिस्थिति असल्यामुळे कितीहि उपनिषदें लिहिणें अगदी सोपें झालें आहे. संस्कृतचें थोडेसें ज्ञान असलें व प्राचीन वैदिक शब्दांच्या वळणाचे कांही शब्द तयार करतां आले की तुमचें काम झालें, मग तुम्हांला व्याकरणाची भीति मुळीच बाळगायला नको. मग तुम्ही त्यांत रजसुल्ला आणा वा अन्य तुम्हांस वाटेल तो सुल्ला आणा. अशाप्रकारें पुष्कळशीं उपनिषदें तयार केलीं गेलीं आणि आजहि पुष्कळशीं उपनिषदें तयार केलीं जात आहेत असें मीं ऐकलें आहे. मला अगदी निश्चित माहीत आहे की भारताच्या कांही भागांत कांही संप्रदायांमधे अशीं उपनिषदें रचण्याचा प्रयत्न चालू आहे. पण या उपनिषदांपैकी कांही उपनिषदें अशीं आहेत की जीं खरीं आहेत असें स्पष्टच दिसून येतें आणि याच उपनिषदांवर शंकराचार्यांनी, रामानुजाचार्यांनी व इतर थोर भाष्यकारांनी भाष्यें लिहिलीं आहेत.

उपनिषदांसंबंधी आणखी एकदोन विचार मला तुमच्यापुढे मांडा-

वयाचे आहेत, कारण उपनिषदें हीं ज्ञानाचा महासागर असून माझ्या-सारख्या साधारण माणसालासुद्धा त्यांतील सर्व तत्त्वांसंबंधी बोलण्यास कित्येक वर्षें लागतील. एखाद्या व्याख्यानांत तें शक्य होणार नाही. म्हणून उपनिषदांच्या अध्ययनासंबंधीचे एकदोन मुद्देच मी तुम्हांला सांगेन. पहिली गोष्ट म्हणजे तीं जगांतील सर्वोत्कृष्ट काव्यें आहेत. वेदांचा संहिताभाग तुम्ही वाचाल तर अनेक ठिकाणीं तुम्हांला उत्कृष्ट काव्याचे नमुने आढळतील. उदाहरणार्थ, प्रलयावस्थेचें वर्णन करणारा तो श्लोक पाहा, "तम आससीत्तमसा गूढमग्रे" इ.--"ज्या वेळीं अंधार अंधाराने झाकलेला होता," असें त्यांत वर्णन आहे. हीं वर्णनें वाचलीं म्हणजे त्यांतील काव्याची उदात्तता आपल्याला जाणवते. तुम्हांला हें माहीत आहे काय, की उदात्ततेचें चित्रण करण्याचा प्रयत्न भारतांत व भारताबाहेर झालेला आहे. पण भारताबाहेर हें चित्रण जड प्रकृतीच्या अनंततेच्या वर्णनाच्या रूपाने झालेलें आहे--तिकडे केवळ अनंत भौतिक शक्ति, अनंत बहि:प्रकृति, अनंत जडद्रव्य, अनंत अवकाश यांचेंच वर्णन आढळतें. जेव्हा मिल्टन किंवा डँटे किंवा अन्य प्राचीन वा आधुनिक थोर पाश्चात्त्य कवि अनंततेचें चित्रण करूं जातात तेव्हा ते बाह्य जगतांत संचार करतात व अनंततेची जाणीव भौतिक शक्तीद्वारा करून देण्याचा प्रयत्न करतात. येथे भारतांतहि तसा प्रयत्न झालेला आहे. संहितांमधे तो तुम्हांला आढळेल; बाह्यप्रकृतीच्या विस्ताराची अनंतता अत्यंत उदात्त रीतीने चित्रित करून वाचकांसमोर मांडलेली त्यांत आढळेल, आणि अशा प्रकारचें चित्रण अन्यत्र कोठेहि आढळत नाही. 'तम आसीत् तमसा गूढम्' हें एकच वाक्य पाहा आणि तमाचें अन्य कवींनी केलेलें चित्रण पाहा. आपल्या कालिदासांनी म्हटलें आहे, "सुईच्या अग्राने भेदला जाऊं शकणारा अंधार"; आता मिल्टनने केलेलें वर्णन पाहा--"प्रकाश नव्हे तर अंधारच दृग्गोचर होत होता"; पण आता संहितांमधील वर्णन पाहा, "अंधारच अंधाराने झाकलेला होता","अंधारच अंधारांत दडलेला होता." विषुववृत्ताजवळील प्रदेशांत वास्तव्य करणाऱ्यांना हें वर्णन समजूं शकतें. जेव्हा पावसाळा अकस्मात् सुरूं होतो तेव्हा क्षणार्धांत सर्व दिशा काळोखाने भरून जातात व काळे ढग त्यांहूनहि जास्त काळ्या ढगांनी झाकले जातात. याप्रमाणे तेथे वर्णन आढळतें. तरीपण संहितेंतील हें सर्व वर्णन

बाह्य प्रकृतीसंबंधीचेंच आहे. अन्यत्र आढळतें त्याप्रमाणे येथेहि जीवनांतील मोठमोठ्या समस्या सोडविण्याचे प्रयत्न हे बाह्य प्रकृतीच्या द्वारेंच झाल्याचें आपल्याला दिसून येतें. प्राचीन ग्रीक लोकांनी व अर्वाचीन युरोपीय लोकांनी जीवनसमस्या व अंतिम तत्त्वाविषयीच्या पवित्र समस्या बाह्य प्रकृतीच्या द्वारें सोडविण्याचा जसा प्रयत्न केला तसाच प्रयत्न आपल्या पूर्वजांनीहि केलेला आहे; आणि या प्रयत्नांत युरोपीय लोकांना जसें अपयश आलें तसेंच आपल्या पूर्वजांनाहि आलें. पण पाश्चात्त्य लोकांनी पुढे जाण्याचा कांहीच प्रयत्न केला नाही; ते तेथेच थांबले; जीवन व मृत्युविषयक समस्या बाह्य प्रकृतीच्या द्वारें सोडविण्यांत त्यांना अपयश आलें व ते तेथेच घोटाळत राहिले; आपल्या पूर्वजांनाहि ही समस्या याप्रमाणे सोडविणें अशक्य असल्याचें आढळलें, पण ही समस्या सोडविण्यास इंद्रियें असमर्थ आहेत असें त्यांनी निर्भयतेने जगासमोर घोषित केलें. ही गोष्ट उपनिषदांत जितक्या स्पष्टपणें व सुंदर रीतीने मांडलेली आहे तितकी कोठेहि मांडलेली दिसत नाही. उपनिषदें म्हणतात,

"यतो वाचो निवर्तन्ते अप्राप्य मनसा सह।"

--"जेथे पोहोचूं न शकल्यामुळे मनासह वाणी तशीच परत फिरते";

"न तत्र चक्षुर्गच्छति न वाग्गच्छति।"

--"तेथे दृष्टि पोहोचूं शकत नाही, वाणीहि तेथवर जाऊं शकत नाही." उपनिषदांत दुसरींहि अशीं कित्येक वचनें आहेत की जीं इंद्रियांची असमर्थता व्यक्त करतात. पण उपनिषदांतील ऋषि तेथेच थांबले नाहीत. ते मनुष्याच्या अंतःप्रकृतींत शोध घेऊं लागले. ही समस्या सोडविण्यासाठी ते आत्म्याकडे वळले, ते अंतर्मुख झाले. त्यांना कळून आलें की प्राणहीन जडद्रव्यापासून त्यांना सत्य प्राप्त होऊं शकणार नाही, बाह्य प्रकृतींत त्यांच्या प्रश्नाचें उत्तर मिळणार नाही आणि बाह्य प्रकृतीपासून कांहीच आशा नाही; म्हणून बाह्य प्रकृतींत सत्याचा शोध करणें व्यर्थ आहे हें जाणून ते मानवाच्या ज्योतिर्मय आत्म्याकडे वळले. आणि तेथेच त्यांना त्यांच्या समस्येचें उत्तर सापडलें.

ते म्हणाले--"तमेवैकं जानथ आत्मानम् अन्या वाचो विमुंचथ" --"ह्या आत्मतत्त्वाचें ज्ञान करून घ्या, अन्य सारें वृथा बोलणें सोडून द्या, दुसरें कांहीहि ऐकूं नका." ह्या आत्म्यांतच त्यांच्या सर्व समस्येचा

उकल झाला, त्यांतूनच परमात्मा, ईश्वर, सृष्टिकर्ता, जीवात्म्याशीं त्याचे संबंध, त्याच्याविषयीचें आपलें कर्तव्य व त्यावर आधारलेले आपणां परस्परांमधील संबंध या सर्व गोष्टींचा उकल झाला. आणि याच ठिकाणीं आपल्याला जगांतील सर्वांत भव्य व उदात्त असें काव्य आढळतें. जडाच्या भाषेंत ह्या आत्मतत्त्वाचें चित्रण करण्याचें प्रयत्न त्यांनी सोडून दिले, इतकेंच नव्हे, तर त्याकरिता त्यांनी विशिष्ट गुणवाचक शब्दांचा उपयोग करण्याचेंहि टाळलें. अनंताची धारणा करण्यासाठी इंद्रियांचें साहाय्य घेण्याचा प्रयत्न त्यांनी सोडून दिला; तसेंच बाह्य, इंद्रियग्राह्य, अचेतन, जड अशा अवकाशाच्या अनंततेचें वर्णनहि त्यांनी मग केलें नाही, आणि त्याऐवजी अनंत अशा आत्मतत्त्वाचें त्यांनी अशा शब्दांत वर्णन केलें की जें वाचतांच मन जणु सूक्ष्म अतींद्रिय राज्यांत प्रवेश करतें. उदाहरणार्थ पुढील श्लोक पाहा--

"न तत्र सूर्यो भाति न चन्द्रतारकं ।
नेमा विद्युतो भान्ति कुतोऽयमग्निः ।।
तमेवभान्तमनुभाति सर्वं ।
तस्य भासा सर्वमिदं विभाति ।।"

जगांतील कोणतें काव्य ह्याहून अधिक उदात्त असेल! "तेथे सूर्य तळपूं शकत नाही, चंद्रहि प्रकाशूं शकत नाही, तारकाहि चमकूं शकत नाहीत, वीजहि तेथे प्रकाश देऊं शकत नाही, मग या लौकिक अग्नीबद्दल काय सांगावें!" असें काव्य तुम्हांला अन्यत्र आढळणार नाही. तें अत्युत्तम असें कठोपनिषद पाहा. केवढें आश्चर्यमुग्ध करणारें, केवढें सुंदर असें काव्य तेथे आढळतें! अंतःकरणांत श्रद्धेचा उदय झालेल्या त्या छोट्या बालकाच्या गोष्टीपासून या उपनिषदाची सुरवात होते. त्या बालकाला यमास भेटण्याची इच्छा होते, आणि ते सर्वश्रेष्ठ गुरु, साक्षात् यमराज त्याला जीवन व मृत्यु ह्यासंबंधीचें रहस्य शिकवितात! आणि त्याच्यापुढील समस्या तरी कोणती होती? मृत्यूचें रहस्य समजून घेणें हीच ती समस्या होती.

उपनिषदांसंबंधी दुसरी जी गोष्ट मी तुम्हांला सांगूं इच्छितों तीं ही की उपनिषदांतील शिकवण ही कुण्या व्यक्तींची शिकवण नव्हे, ती 'अपौरुषेय' आहे. त्यांत आपल्याला अनेक व्यक्ति, अनेक आचार्य, अनेक

वक्ते यांचा उल्लेख आढळतो हें खरें, पण त्यांच्यापैकी कोणावरहि उपनिषदांचें प्रामाण्य अवलंबून नाही, त्यांच्यापैकी कोणाच्याहि चरित्रावर उपनिषदांतील एकहि उपदेश अवलंबून नाही. हे सर्व आचार्य व वक्ते सावलीसारखे पार्श्वभागीं दिसतात; ते स्पष्टपणें दिसत नाहीत, त्यांचें अस्तित्व स्पष्टपणें जाणवत नाही; उपनिषदांचें खरें सामर्थ्य हें त्यांतील अपूर्व, महिमाशाली व ज्योतिर्मय अशा मंत्रांमधेच आहे. कुण्याहि व्यक्तींशीं या मंत्रांचा कांहीच संबंध नाही. पंधरावीस याज्ञवल्क्य आले व गेले तरी त्याने कांही लाभ-हानि होणार नाही, हे मंत्र जसेच्या तसे राहतील. आणि तरीहि हीं उपनिषदें कोणत्याहि व्यक्तीला विरोधी नाहीत; तीं इतकीं व्यापक, इतकीं विशाल आहेंत की जगांतील सर्व प्राचीन व भविष्यकालीन महापुरुषांना व आचार्यांना त्यांत स्थान आहे. त्यांना विशिष्ट व्यक्तींच्या--महापुरुषांच्या वा अवतारांच्या पूजेविरुद्ध कांही म्हणावयाचें नाही. उलट अशा पूजेस त्यांनी नेहमी पाठिंबाच दिला आहे. आणि असें असूनहि तीं पूर्णपणें व्यक्तिनिरपेक्ष आहेत. उपनिषदांतील ईश्वर हा जसा निर्गुण आहे अर्थात् व्यक्तिरूप ईश्वराहून तो जसा पलीकडचा आहे तशींच स्वतः उपनिषदें हीं देखील व्यक्तिनिरपेक्ष स्वरूपाचीं आहेत. आधुनिक वैज्ञानिकांना जशीं व्यक्तिनिरपेक्ष तत्त्वें हवीं असतात तशींच तत्त्वें ज्ञानी, विचारवंत, तत्त्वज्ञ व बुद्धिवादी लोकांना उपनिषदांत आढळतील. हीं उपनिषदेंच आपलीं शास्त्रें होत. तुम्हीं हें लक्षांत ठेवलें पाहिजे की ख्रिस्ती लोकांचें जसें बायबल, मुसलमानांचें जसें कुराण, बौद्धांचें जसें त्रिपीटक, पारशांचा जसा झेंद अवेस्ता हे धर्मग्रंथ आहेत, तशींच उपनिषदें हीं आपले धर्मग्रंथ आहेत. उपनिषदें हींच आपलीं शास्त्रें होत, इतर कोणतींहि नव्हेत. पुराणग्रंथ, तंत्रें आणि अन्य सर्व ग्रंथ, फार काय व्याससूत्रेंहि प्रामाण्याच्या दृष्टीने दुय्यम दर्जाचीं आहेत, पण वेद हेच आपले मुख्य प्रमाणग्रंथ आहेत. मनुस्मृति, पुराणें व अन्य सर्व ग्रंथ हे जोंवर उपनिषदांना अनुसरतात तोंवरच त्यांचें प्रामाण्य मानावयाचें, आणि जेथे त्यांचा उपनिषदांशीं मतभेद असेल तेथे त्यांचा कठोरपणें त्याग करावयाचा हें आपण नेहमी लक्षांत ठेवलें पाहिजे. परंतु भारताचें दुदैव हें की आज आपण ही गोष्ट विसरून गेलों आहोंत. आज एखाद्या खेड्यांतील क्षुल्लक रूढि ही उपनिषदांच्या शिकवणीपेक्षाहि अधिक

प्रमाण मानली जात आहे. बंगालमधील एखाद्या आडगावांत प्रचलित असलेलें मत हें वेदवाक्यासारखें किंवा त्याहूनहि श्रेष्ठ मानलें जात आहे. 'सनातनी' या शब्दाचा प्रभाव केवढा मोठा आहे! कर्मकांडांतील बारीकसारीक गोष्टींचें कांटेकोर पालन करणें यालाच खेड्यांतील लोक खराखुरा सनातनीपणा समजतात. आणि जर एखाद्याने असें केलें नाही तर त्याला सांगितलें जातें, "चल जा, तूं हिंदु म्हणून राहूं शकत नाहीस." दुर्दैवाने माझ्या या मातृभूमींत असे कांही लोक आहेत की जे एखादा विशिष्ट तंत्रग्रंथ स्वीकारून तदनुसार आचरण करण्यास लोकांना सांगतात, आणि जो तसें करीत नाही त्याला ते सनातनी मानीत नाहीत. म्हणून हें लक्षांत ठेवणें आपल्या हिताचें आहे की, उपनिषदें हींच आपले मुख्य प्रमाणग्रंथ आहेत आणि गृह्यसूत्रें व श्रौतसूत्रें यांचें प्रामाण्य देखील वेदांच्या मानाने दुय्यम प्रतीचें आहे. वेद हे आपले पूर्वज असलेल्या ऋषींचे शब्द आहेत, आणि तुम्हांला हिंदु म्हणवावयाचें असेल तर तुम्हांला वेदांवर विश्वास ठेवलाच पाहिजे. ईश्वरविषयक कोणत्याहि प्रकारच्या कल्पनेवर तुम्ही श्रद्धा ठेवा, परंतु तुम्ही जर वेदांचें प्रामाण्य अमान्य कराल तर मात्र तुम्ही नास्तिक ठराल. ह्या ठिकाणीं, आपले धर्मग्रंथ आणि ख्रिस्ती व बौद्ध धर्मग्रंथ ह्यांतील भेद दिसून येतो; त्यांच्या धर्मग्रंथांना 'शास्त्र' न म्हणतां पुराणेंच म्हटलें पाहिजे, कारण त्यांत प्रलयाचा वृत्तान्त, राजे व त्यांचीं घराणीं यांचा इतिहास, थोर पुरुषांचें जीवनवृत्तान्त वगैरे गोष्टी आहेत. हें सर्व पुराणांचें कार्य आहे, आणि तीं जोंवर वेदांचें अनुसरण करतात तोंवरच तीं ग्राह्य आहेत. जोंपर्यंत बायबल व अन्य देशांचे धर्मग्रंथ हे वेदानुकूल आहेत तोंपर्यंत ते पूर्णपणें ग्राह्य समजले पाहिजेत, पण वेदांशीं विरोध आला असतां मात्र त्यांना ग्राह्य मानतां येणार नाही. कुराणालाहि हीच गोष्ट लागू आहे. या सर्व धर्मग्रंथांतून बरीचशी नैतिक शिकवण आहे, आणि जोंवर हे धर्मग्रंथ वेदानुकूल आहेत तोंवर त्यांना पुराणांइतकें प्रामाण्य आहे. परंतु त्याहून अधिक मात्र नाही. वेदांसंबंधी आमचा असा विश्वास आहे की ते कधी लिहिले गेले नाहीत, कधी उत्पन्न केले गेले नाहीत. एकदा एका ख्रिस्ती मिशनऱ्याने मला सांगितलें की, "आमच्या शास्त्रांना ऐतिहासिकता आहे व म्हणून तीं सत्य आहेत." त्यावर मी म्हणालों, "आमच्या शास्त्रांना

ऐतिहासिकता नाही आणि म्हणूनच तीं सत्य आहेत; तुमचीं शास्त्रें ऐतिहासिक असल्याने तीं एखाद्या व्यक्तीने, एखाद्या विशिष्ट काळीं निर्माण केलेलीं असणार. म्हणून तुमचीं शास्त्रें मानवनिर्मित आहेत व आमचीं तशीं नाहीत; त्यांची अनैतिहासिकता हेंच त्यांच्या सत्यतेचें प्रमाण आहे." वेद व आज अस्तित्वांत असलेले सर्व धर्मग्रंथ ह्यांचा संबंध हा अशा प्रकारचा आहे.

आता आपण उपनिषदांच्या शिकवणीकडे वळूं या. त्यांत अनेक प्रकारचे मंत्र आहेत. त्यांतील कांही पूर्णपणें द्वैतवादात्मक आहेत, तर दुसरे कांही पूर्णपणें अद्वैतवादात्मक आहेत. पण त्यांत असेहि कांही सिद्धान्त आहेत की जे भारतांतील सर्वच संप्रदायांना मान्य आहेत. पहिला म्हणजे 'संसरण'विषयक सिद्धान्त होय; यालाच 'पुनर्जन्माचा सिद्धान्त' असेंहि म्हणतात. दुसरें असें की त्यांचें मनोविज्ञानाच्या बाबतींतहि एकमत आहे. प्रथमतः स्थूल शरीर, नंतर सूक्ष्म शरीर वा मन आणि या सर्वांच्या मागे जीवात्मा आहे असें ते मानतात. भारतीय व पाश्चात्त्य मानसशास्त्रांत हा मोठा फरक आहे की पाश्चात्त्य मनोविज्ञानांत मन हाच आत्मा असें मानलें जातें, पण येथे तसें मानलें जात नाही. मनाला येथे 'अंतःकरण' म्हणजे जीवाच्या हातांतील साधन मानलें आहे, व य मनाच्या द्वारेंच जीवात्मा शरीरावर व बाह्य जगावर कार्य करीत असतो. या बाबतींत सर्व संप्रदायांचें एकमत आहे. ज्याला कोणी जीव, कोणी आत्मा, तर कोणी जीवात्मा म्हणतात तो अनादि अनंत असून मोक्षाची प्राप्ति होईपर्यंत तो अनेक योनींमधून भ्रमण करीत असतो, याहि बाबतींत त्या सर्वांचें एकमत आहे. याव्यतिरिक्त दुसऱ्या एका अत्यंत महत्त्वपूर्ण बाबतींत त्यांचें मतैक्य आहे. आत्म्याच्या ठायीं मूलतः सर्व प्रकारच्या शक्ति आहेत असें भारतांतील सर्व संप्रदाय मानतात आणि हाच भारतीय व पाश्चात्त्य विचारसरणींतील वैशिष्ट्यपूर्ण व महत्त्वाचा फरक आहे. इंग्रजी भाषेंतील 'Inspiration' ('इन्स्पिरेशन') शब्दाचा असा अर्थ होतो की बाहेरून कांहीतरी आंत येतें, पण आपल्या संप्रदायांचें असें मत आहे की सर्व प्रकारच्या शक्ति आत्म्यांतूनच बाहेर प्रकट होत असतात. सर्व शक्ति, सर्व पवित्रता, सर्व महत्ता ही आत्म्यांतच असते. योगी तुम्हांला सांगेल की अणिमा, लघिमा आदि त्याला हव्या

असणाऱ्या सिद्धि ह्या अन्यत्र कोठून प्राप्त करावयाच्या नसून त्या आत्म्याच्या ठायीं मूलतःच वसत असतात; त्यांची अभिव्यक्ति साधण्याचें कार्यच तेवढें करावयाचें असतें. उदाहरणार्थ पतंजलि सांगतात की तुमच्या पायाशीं सरपटणाऱ्या अति क्षुद्र अशा किड्यांतहि योग्याच्या सर्व अष्टविध सिद्धि मूलतःच वसत असतात. त्याचा देह उपयुक्त नसल्यामुळे या सिद्धि प्रकट होत नाहीत, एवढेंच. त्याला अधिक चांगला देह प्राप्त झाला की त्या प्रकट होतील; पण त्याच्या ठायीं त्या मूलतःच आहेत हें निश्चित. "निमित्तमप्रयोजकं प्रकृतीनां वरणभेदस्तु ततः क्षेत्रिकवत्"--"बरींवाईट कर्मे हीं प्रकृतींतील परिवर्तनांचीं प्रत्यक्ष कारणें नव्हेत, पण प्रकृतीच्या विकासाच्या मार्गांतील अडथळे दूर करण्याचें कार्य मात्र तीं करीत असतात; पाण्याच्या मार्गातील अडथळे शेतकऱ्याने दूर सारल्यावर पाणी जसें स्वाभाविकपणेंच वाहूं लागतें तसेंच हें आहे." येथे पतंजलि मोठ्या जलाशयांतून आपल्या शेतांत पाणी आणणाऱ्या शेतकऱ्याचें प्रसिद्ध उदाहरण देतात. तलाव भरलेला आहे व तो त्याची जमीन एका क्षणांत भिजवून टाकीलहि, पण त्याचें शेत व तलाव यांच्यामधे मातीचा एक बांध आहे. हा बांध तोडला गेला की पाणी आपल्या स्वाभाविक शक्तीने व गतीने त्याच्या शेतांत शिरेल. सर्व सामर्थ्य, पावित्र्य व पूर्णता हीं आत्म्याच्या ठायीं विद्यमान आहेतच. केवळ या आत्म्याला झाकणाऱ्या आवरणामुळे तीं प्रकट होत नाहीत, एवढेंच. हें आवरण दूर झालें कीं आत्म्याच्या ठिकाणीं असलेल्या पावित्र्य, पूर्णता आदि शक्ति व्यक्त होऊं लागतात. पाश्चात्त्य व पौर्वात्य विचारसरणींतील हा महत्त्वाचा भेद आपण लक्षांत ठेवला पाहिजे. आपल्याला पाश्चात्त्य लोक अशीं चमत्कारिक मतें सांगतात की, आपण सर्वजण जन्मतःच पापी आहोंत, आणि आपण अशा चमत्कारिक मतांवर विश्वास ठेवला नाही तर ते म्हणतात की 'तुम्हीं जन्मतःच दुष्ट आहांत.' ते किंचित् थांबून विचार करीत नाहीत की आपण जर स्वभावतःच वाईट असलों तर आपण कधीच चांगले होऊं शकणार नाहीं, कारण स्वभाव बदलणें कसें शक्य आहे ? स्वभाव जर बदलेल तर त्याला 'स्वभाव'च म्हणतां येणार नाही. आपण हें लक्षांत घेतलें पाहिजे. या बाबतींत द्वैतवादी, अद्वैतवादी व अन्य सर्व भारतीय संप्रदाय

यांचें एकमत आहे.

भारतांतील सर्व संप्रदायांचें एकमत असलेला आणखी एक मुद्दा म्हणजे ईश्वराचें अस्तित्व हा होय. त्यांच्या ईश्वरविषयक कल्पना ह्या अर्थातच भिन्न भिन्न आहेत. द्वैतवादी हे सगुण, केवळ सगुण ईश्वरच मानतात. या 'सगुण' शब्दाचा अर्थ तुम्हीं नीट समजून घ्यावा असें मला वाटतें. 'सगुण' याचा अर्थ ईश्वराला शरीर आहे, तो कोठेतरी सिंहासनावर बसून या जगाचें राज्य चालविणारी विशिष्ट व्यक्ति आहे असा नाही, तर 'सगुण' याचा अर्थ हाच की ईश्वर गुणांनी युक्त असा आहे. ह्या सगुण ईश्वराचीं पुष्कळ वर्णनें आढळतात. हा सगुण ईश्वर जगाचा शास्ता, निर्माता, पालनकर्ता व संहर्ता आहे हें सर्वच संप्रदायांना मान्य आहे. अद्वैतवादी लोक सगुण ईश्वराला याहिपेक्षा अधिक कांहीतरी मानतात. या सगुण ईश्वराचें उच्चतर स्वरूप ते मानतात. ह्या स्वरूपाला सगुण-निर्गुण असें म्हणतां येईल. ज्यांत गुण नाहींत त्यास कोणतेंच विशेषण देतां येणार नाही, आणि अद्वैतवादी हे ईश्वराला सत्-चित्-आनंद ह्याव्यतिरिक्त कोणतेंहि विशेषण लावूं इच्छीत नाहीत. शंकराचार्यांनीं ईश्वराला 'सच्चिदानंद' असें म्हटलें आहे. पण उपनिषदें याच्याहि पुढे जाऊन म्हणतात की ह्या ईश्वराविषयी 'नेति नेति'--'हें नव्हे, हें नव्हे' ह्याव्यतिरिक्त कांहींच सांगतां येणार नाही.

याप्रमाणे भारतांतील भिन्न भिन्न संप्रदायांचें ईश्वराच्या अस्तित्वाच्या बाबतींत एकमत आहे. पण आता आपण द्वैतवादाचा विचार करूं. मीं आधींच म्हटल्याप्रमाणे रामानुजाचार्यांना मी द्वैतवाद्यांचा प्रतिनिधि समजतों. द्वैतदर्शनाचे आधुनिक कालांतील ते थोर प्रतिनिधि आहेत.भारताच्या अन्य भागांत जन्मलेल्या थोर धर्माचार्यांविषयी आपल्या बंगालमधील लोकांना फारच अल्प माहिती असते ही दुर्दैवाची गोष्ट आहे. मुसलमानी आमदानींत, आपल्या एका चैतन्य महाप्रभूंव्यतिरिक्त सर्व मोठमोठे धर्माचार्य दक्षिण भारतांत जन्मलेले होते; आणि आजहि दक्षिण भारताचें बुद्धिसामर्थ्यच खरोखर भारतावर राज्य करीत आहे, कारण चैतन्य महाप्रभुदेखील दक्षिण भारतांतीलच एका संप्रदायाचे म्हणजे माध्व संप्रदायाचे अनुयायी होते. रामानुजाचार्यांच्या मतें तीन

तत्त्वें नित्य स्वरूपाचीं आहेत--ईश्वर, जीवात्मा व प्रकृति हींच तीं तत्त्वें होत. जीवात्मे नित्य आहेत, आणि ईश्वराहून ते नेहमी पृथक्पणेंच अस्तित्वांत राहतील, त्यांचें स्वतंत्र अस्तित्व कधीच नष्ट होणार नाही. रामानुजाचार्यांच्या मतें तुमचा आत्मा माझ्या आत्म्याहून सदैवच भिन्न असणार; तसेंच प्रकृतिहि नेहमी पृथक्पणेंच अस्तित्वांत राहील. त्यांच्या मतें ईश्वर आणि जीवात्मा यांच्याप्रमाणेच प्रकृतिहि सत्य आहे. ईश्वर हा सर्वांचा अंतर्यामी आहे. याच अर्थानें कांही ठिकाणीं रामानुजाचार्यांनी म्हटलें आहे की ईश्वर आणि जीवात्मा यांच्यांत भेद नाही. ईश्वर हा जीवात्म्याचें सारभूत तत्त्व आहे. त्यांच्या मतें प्रलयाच्या वेळीं सर्व जग जेव्हा संकोच पावतें तेव्हा जीवात्मेदेखील संकोच पावून सूक्ष्म होतात व कांही कालपर्यंत त्याच अवस्थेंत राहतात. नंतर पुन्हा पुढील कल्पाच्या आरंभकाळीं ते सर्व व्यक्त होतात व आपापल्या पूर्वकर्मांनुसार फळें भोगूं लागतात. ज्या कर्मांमुळे जीवात्म्याची स्वाभाविक पवित्रता व पूर्णता संकोच पावते तीं कर्में वाईट व ज्या कर्मांमुळे त्यांचा विकास व अभिव्यक्ति होते तीं कर्में चांगलीं असें रामानुजाचार्य म्हणतात. जीवात्म्याचा विकास ज्यामुळे घडून येतो तें सर्व चांगलें व ज्यामुळे त्याचा संकोच होतो तें सर्व वाईट होय. याप्रमाणे आपल्या कर्मांमुळे ह्या जीवात्म्यांचा कधी संकोच तर कधी विकास होत असतो व अखेरीस ईश्वराच्या कृपेने त्यांना मुक्ति प्राप्त होते, आणि जे शुद्ध हृदयाचे आहेत व जे कृपालाभासाठी यत्नशील आहेत त्या सर्वांना ही कृपा प्राप्त होते, असें रामानुजाचार्यांनी म्हटलें आहे.

श्रुतींत एक प्रसिद्ध वचन आहे, "आहारशुद्धौ सत्त्वशुद्धिः सत्त्वशुद्धौ ध्रुवा स्मृतिः"--"आहार शुद्ध असला म्हणजे सत्त्वशुद्धि होते व सत्त्व शुद्ध झालें म्हणजे स्मृति अचल व स्थिर होते." स्मृति म्हणजे ईश्वराचें स्मरण, किंवा अद्वैतवाद्यांच्या मतें स्वतःच्या पूर्णत्वाचें स्मरण. या वचनावरून मोठा वाद झालेला दिसून येतो. प्रथमतः हें सत्त्व म्हणजे काय? आपल्याला माहीत आहे की, सांख्यांच्या मतें--आणि आपल्या सर्व संप्रदायांच्या मतें--शरीर हें तीन प्रकारच्या द्रव्यांनी बनलेलें आहे, गुणांनी नव्हे. सत्त्व, रज व तम हे गुण आहेत अशी सर्वसाधारण समजूत आहे. पण तसें मुळीच नसून या विश्वांतील तीं घटक-

द्रव्यें आहेत, आणि आहाराच्या शुद्धीने ह्या सत्त्वद्रव्याची शुद्धी होते. शुद्ध सत्त्व प्राप्त करून घेण्यावरच वेदान्ताने भर दिला आहे. मीं तुम्हांला सांगितलें त्याप्रमाणे आत्मा हा मूलतः शुद्ध व पूर्ण आहे, आणि वेदान्ताच्या मतें तो रज व तम या द्रव्यांनी झाकलेला असतो. सत्त्व द्रव्य हें सर्वांत अधिक तेजोमय असून त्यांतून आत्मतेज, कांचेंतून प्रकाश बाहेर पडावा त्याप्रमाणे, सहज अभिव्यक्त होत असतें. म्हणून रज व तम ह्या द्रव्यांचे कण नाहीसे होऊन केवळ सत्त्वद्रव्यच उरलें तर त्या अवस्थेंत आत्म्याची शक्ति व पवित्रता प्रकट होते व आत्मा अधिक प्रमाणांत अभिव्यक्त होतो.

म्हणून ह्या शुद्ध सत्त्वाची प्राप्ति होणें आवश्यक आहे. आणि श्रुतींने म्हटलें आहे की, "आहार शुद्ध असला म्हणजे सत्त्वशुद्धि होते." रामानुजाचार्यांनीच 'आहार' ह्या शब्दाचा अर्थ 'अन्न' असा घेतला आहे आणि त्यामुळे त्यांच्या तत्त्वज्ञानाला निराळें वळण मिळालें आहे. एवढेंच नव्हे, तर याचा अखिल भारतांतील सर्व संप्रदायांवर प्रभाव पडलेला दिसून येतो. म्हणून ह्या शब्दाचा नेमका अर्थ कोणता, हें समजून घेणें आवश्यक आहे; कारण रामानुजाचार्यांच्या मतें ही आहारशुद्धि जीवनांतील एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. रामानुजाचार्य म्हणतात, "अन्न कशामुळे अशुद्ध होतें?" तीन प्रकारच्या दोषांमुळे तें अशुद्ध होत असतें. पहिला आहे जातिदोष, म्हणजे अन्नाचा स्वभावतगत दोष; उदाहरणार्थ कांदा, लसूण इत्यादि पदार्थांचा उग्र दर्प. दुसरा आहे आश्रयदोष, म्हणजे ज्या व्यक्तीपासून अन्न प्राप्त होतें त्या व्यक्तींतील दोष; दुष्ट माणसाकडून प्राप्त झालेलें अन्न आपल्याला दोषयुक्त करील. या देशांत मीं स्वतः असे अनेक महात्मे पाहिले आहेत की ज्यांनी आयुष्यभर हा आश्रयदोष कटाक्षाने टाळला आहे. अर्थातच, अन्न कोणीं आणलें, त्यास स्पर्श कोणाचा झाला इत्यादि जाणण्याचें सामर्थ्य त्यांच्या ठिकाणीं होतें; अशा घटना मीं माझ्या आयुष्यांत एकदा नव्हे तर शेकडो वेळां पाहिल्या आहेत. तिसरा आहे निमित्त दोष, म्हणजे अन्नांत पडणाऱ्या अशुद्ध गोष्टींमुळे उत्पन्न होणारा दोष. हा दोष टाळण्याचा आपण विशेष प्रयत्न केला पाहिजे. घाण, धूळ, केस इत्यादि पडलेलें अन्न खाणें ही भारतांत नित्याची गोष्ट होऊन बसली आहे. हे तीन दोष

दूर करून जर अन्न घेतलें गेलें तर सत्त्वशुद्धि होते असें रामानुजाचार्य म्हणतात. मग तर धर्म ही फार सोपी गोष्ट होऊन जाईल! केवळ शुद्ध अन्नामुळे धर्मसाधना होत असेल तर ती प्रत्येकालाच करतां येईल. या दोषांपासून ज्याला स्वतःचें रक्षण करतां येणार नाही इतका दुबळा, अपात्र माणूस या जगांत मीं तरी कोणी पाहिला नाही. आता शंकराचार्य या आहारशुद्धीच्या बाबतींत काय म्हणतात तें आपण पाहूं या. शंकराचार्यांचें मत असें की, आहार म्हणजे मनांत गोळा झालेले विचार होत; ते जेव्हा शुद्ध होतील तेव्हाच सत्त्वशुद्धि होईल, तत्पूर्वी नाही. तुम्हीं आहार कोणताहि घ्या. केवळ आहाराने सत्त्वशुद्धि होत असेल तर एखाद्या वानराला आयुष्यभर दुधभाताचा आहार द्या; त्यामुळे तो थोर योगी होईल काय? असें जर असतें तर गायी आणि हरणें हींच सर्वांत थोर योगी झालीं असतीं. असें म्हटलें आहे की, पुष्कळदा स्नान केल्याने स्वर्गप्राप्ति होत असेल तर माशांना ती प्रथम होईल. भाजीपाला खाल्ल्याने जर मनुष्याला स्वर्गप्राप्ति होत असेल तर गायी व हरिण यांना ती प्रथम होईल.

यांतून मार्ग कोणता? आवश्यकता तर दोन्हींची आहे. अर्थातच शंकराचार्यांनी दिलेली आहाराची कल्पना ही प्राथमिक महत्त्वाची आहे. परंतु शुद्ध अन्नाने विचारशुद्धीस मदत होते यांत शंका नाही; या दोहोंचा संबंध घनिष्ठ आहे. हीं दोन्हींहि असलीं पाहिजेत. पण भारतांत आज आपण शंकराचार्यांचा उपदेश विसरून शुद्ध आहाराचा केवळ 'शुद्ध अन्न' एवढाच अर्थ घेऊन बसलों आहोंत. म्हणूनच धर्म स्वयंपाकघरांत शिरला आहे असें मी म्हणतों तेव्हा लोकांना राग येतो. तुम्ही माझ्याबरोबर मद्रासला आलांत तर तुम्हांला माझें म्हणणें पटेल. बंगालमधील लोक त्याहून बरे म्हणावयाचे. मद्रासमधे अन्नाकडे एखाद्याने पाहिलें तर तेथील लोक तें अन्न फेकून देतात. इतकें करूनहि तेथील लोक कांही चांगल्या अवस्थेंत असल्याचें मला दिसलें नाही. एखाद्या विशिष्ट प्रकारचें अन्न खाणें व तें एखाद्या विशिष्ट माणसाच्या नजरेपासून दूर ठेवणें यांमुळे जर पूर्णता लाभली असती तर तेथील सर्वच लोक पूर्णतेस पोहोचलेले दिसले असते; पण तसें कांही दिसत नाही.

तेव्हा, आहारशुद्धीविषयीचीं हीं दोन्ही मतें एकत्र करून त्यांचा समन्वय साधल्याने एक संपूर्ण सिद्धान्त तयार होत असला तरी शुद्ध अन्नालाच अवास्तव महत्त्व देऊं नका. आजकाल हें अन्न योग्य की तें याविषयी आणि वर्णाश्रमाविषयी बरीच ओरड ऐकूं येतें, आणि या बाबतींत बंगाली लोक आघाडीवर आहेत. तुमच्यापैकी प्रत्येकास मी विचारतों की तुम्हांला या वर्णाश्रमाविषयी काय माहिती आहे? या देशांत ते चार वर्ण आता कोठे आहेत? माझ्या या प्रश्नाचें उत्तर द्या. मला तर ते चार वर्ण दिसत नाहीत. "डोक्याविरहित डोकेंदुखी" असें एका बंगाली म्हणींत म्हटलें आहे, तशांतलाच हा प्रकार. तुम्ही वर्णाश्रमधर्माचा येथे प्रचार करूं पाहतां, पण येथे तर चार वर्णच नाहीत. मला तर फक्त ब्राह्मण आणि शूद्र हे दोनच वर्ण दिसत आहेत. येथे जर क्षत्रिय व वैश्य असतील तर ते कोठे आहेत? आणि तुम्ही ब्राह्मण लोक त्यांना यज्ञोपवीत देऊन, प्रत्येक हिंदूच्या पक्षीं आवश्यक असलेला वेदांचा अभ्यास करण्याचा आदेश त्यांना कां देत नाही? आणि जर येथे वैश्य व क्षत्रिय नसतील आणि फक्त ब्राह्मण व शूद्रच असतील तर "केवळ शूद्रांचीं वस्ती असलेल्या देशांत ब्राह्मणांनी राहतां कामा नये" ही शास्त्राज्ञा पाळून तुम्ही आपलें चंबूगवाळें उचलून चालते व्हा! म्लेच्छांचें अन्न खाणाऱ्या व म्लेच्छ सत्तेखाली राहणाऱ्या लोकांबद्दल शास्त्रांनी काय म्हटलें आहे हें तुम्हांला ठाऊक आहे काय? तुम्ही तर गेलीं हजार वर्षें हेंच करीत आलां आहांत. त्याबद्दल कोणतें प्रायश्चित्त आहे हें तुम्हांला माहीत आहे काय? आपल्या हाताने स्वतःलाच जाळून घेणें हेंच तें प्रायश्चित्त आहे. आचार्य म्हणवावयाचें व दांभिक बनावयाचें, असें तुम्हांला करावयाचें आहे काय? शास्त्रांवर तुमची श्रद्धा असेल तर, शिकंदर बादशहाबरोबर गेलेल्या व आपण म्लेच्छांचें अन्न खाल्लें या विचाराने स्वतःस जाळून घेतलेल्या त्या थोर ब्राह्मणाप्रमाणे तुम्हीहि कां आचरण करीत नाही? त्याप्रमाणे वागा, मग सारा देश तुमच्या पायाशीं विनम्र झालेला तुम्हांला दिसेल. तुमची आपल्या स्वतःच्या शास्त्रांवर श्रद्धा नाही, आणि तरीहि लोकांनी ती ठेवली पाहिजे असें तुम्हांला वाटतें. ह्या काळांत आपण हें करूं शकत नाही असें तुम्हांला वाटत असेल तर आपली असमर्थता मान्य करा, इतरांच्याहि असमर्थतेबद्दल त्यांना

क्षमा करा, अन्य जातींना मदतीचा हात देऊन त्यांची उन्नति साधा, त्यांना वेदाध्ययन करूं द्या, आणि जगांतील अन्य आर्यांप्रमाणेच चांगले आर्य व्हा. बंगालमधील ब्राह्मणांनो, तुम्हीं खरेखुरे आर्य व्हा हेंच माझें तुम्हांला सांगणें आहे. वंगदेशाला जो बीभत्स वामाचार विनाशाकडे नेत आहे तो पूर्णपणें टाकून द्या. भारतांतील इतर प्रांत कांही तुम्हीं पाहिले नाहीत. आपल्या प्रांताने संस्कृतीचा कितीहि गर्व वाहिला तरी आपल्या प्रांतांतील समाजांत शिरलेला वामाचार पाहिला की शरमेने मान खाली घालावी लागते. बंगालमधील आपला समाज या वामाचारी पंथांनी अगदीं भरून गेला आहे. दिवसा 'आचारा'विषयी प्रवचनें झोडणारे हे लोकच रात्रीं भयंकर व्यभिचार करीत असतात व त्यांना अतिभयानक अशा ग्रंथांचा आधार मिळतो; असें आचरण करण्याचे आदेश हे ग्रंथ त्यांना देत असतात. बंगालमधील तुम्हां लोकांना हें ठाऊकच आहे; वामाचारतंत्रें हींच बंगाली लोकांचीं शास्त्रें आहेत. अशा भाराभर पुस्तकांचें प्रकाशन केलें जात असून, आपल्या मुलांना श्रुतिग्रंथ शिकविण्या-ऐवजी ह्या वामाचारतंत्रग्रंथांनी त्यांचीं मनें कलुषित करण्यांत येत आहेत. कलकत्त्यांतील पित्यांनो, ह्या वामाचारतंत्रांसारखें भयंकर वाङ्मय भाषांतरासहित आपल्या मुलामुलींच्या हातीं पडावें व त्यांचीं मनें कलुषित व्हावींत आणि हींच आपलीं हिंदूंचीं शास्त्रें आहेत अशी त्यांची लहानपणापासून समजूत व्हावी ह्या गोष्टीची तुम्हांला शरम वाटत नाहीं काय? तुम्हांला अशी शरम वाटत असेल तर आपल्या मुलांपासून हे भयंकर ग्रंथ दूर ठेवा व त्यांना वेद, उपनिषदें, गीता या खऱ्याखुऱ्या शास्त्रांचें अध्ययन करूं द्या.

भारतांतील द्वैतवादी संप्रदायांच्या मतें जीवात्म्यांचें स्वतंत्र अस्तित्व अखेरपर्यंत अबाधित राहतें; ईश्वर हा आधीपासूनच अस्तित्वांत असलेल्या उपादानांतून सृष्टीची निर्मिति करतो; तो केवळ निमित्तकारण आहे. याउलट अद्वैतवाद्यांच्या मतें ईश्वर हा विश्वाचें निमित्तकारण व उपादानकारण दोन्ही आहे. तो विश्वाचा केवळ निर्माता आहे असें नसून तो तें स्वतःतूनच निर्माण करीत असतो. अद्वैतवाद्यांचें मत हें असें आहे. ईश्वराने विश्व स्वतःमधून निर्माण केलें असूनहि तो विश्वाहून नित्य भिन्नच आहे व सर्वकांही ह्या विश्वनियंत्याच्या सदैव अधीन

आहे असें मानणारेहि कांही विचित्र द्वैतवादी संप्रदाय आहेत. ईश्वराने स्वत:मधूनच विश्व विकसित केलें असून जीवात्म्यांना शेवटीं निर्वाण प्राप्त होईल, ते सान्त न राहतां अनंतत्वास प्राप्त होतील असें मानणारेहि संप्रदाय आहेत. पण हे संप्रदाय नाहीसे झाले आहेत. आज भारतांत विद्यमान असलेला एकच एक अद्वैतसंप्रदाय हा शंकराचार्यांच्या अनुयायांचा आहे. शंकराचार्यांच्या मतें ईश्वर हा मायेमुळे निमित्त व उपादान कारण वाटत असतो, पण वस्तुत: तो तसा नाही. ईश्वर हें विश्व झालेला नाही, तर विश्वाला अस्तित्व नसून केवळ ईश्वराचेंच अस्तित्व आहे. अद्वैतवेदान्तांतील ही मायेची कल्पना समजणें ही एक अत्यंत कठीण गोष्ट आहे. आपल्या तत्त्वज्ञानांतील समजण्यास अतिशय कठीण असा हा विषय असून त्याची विस्ताराने चर्चा करण्यास सध्या मला वेळ नाही. तुमच्यापैकी ज्यांचा पाश्चात्त्य तत्त्वज्ञानांशीं परिचय असेल त्यांना मायेच्या या कल्पनेचे कांटच्या विचारांशीं सादृश्य आहे असें वाटेल. पण कांटवर प्रो. मॅक्समुलर यांनी केलेलें लेखन तुमच्यापैकी ज्यांनी अभ्यासिलें असेल त्यांनी ध्यानांत ठेवावें की त्यांत एक मोठी चूक आहे. देश, काल व कार्यकारणभाव यांसंबंधीची कल्पना प्रथम कांटने पुढे मांडली असें प्रो मॅक्समुलर यांचें म्हणणें आहे, परंतु तें खरें नाही. देश, काल व कार्यकारणभाव आणि माया हीं एकच आहेत अशी कल्पना प्रस्थापित करणारे प्रथम शंकराचार्य हे होते, आणि शंकराचार्यांच्या भाष्यांतील तत्संबंधी एकदोन निवडक उतारे सुदैवाने माझ्या पाहण्यांत आले व माझे मित्र प्रो. मॅक्समुलर यांना मीं ते लिहून पाठविले. यावरून आपल्याला दिसून येतें की ही कल्पनाहि भारतांत होतीच. अद्वैतवेदान्त्यांचा मायावाद हा एक वैशिष्टयपूर्ण सिद्धान्त आहे. त्यांच्या मतें जें कांही आहे तें ब्रह्मच आहे. जो कांही भेद दिसतो तो मायेमुळे निर्माण झालेला आहे. हें एकमेवाद्वितीय ब्रह्मच आपलें अंतिम लक्ष्य आहे, आणि याच मुद्यावर भारतीय व पाश्चात्त्य विचारांत नित्य स्वरूपाचे मतभेद आहेत. 'तुमच्यांत शक्ति असेल तर आमच्या मायावादाचें खंडन करा' असें आव्हान गेलीं हजारो वर्षें भारताने जगाला दिलेलें आहे. अनेक देशांनी तें स्वीकारलें, आणि परिणामीं त्या सर्वांचा विनाश ओढवला, पण आपण अजून जिवंत आहोंत. भारताने सर्व जगासमोर घोषणा केली की हें सारें

जग म्हणजे भ्रम आहे, माया आहे; तुम्ही मातींतून अन्न उचलून खाणारे भिकारी असां किंवा सोन्याच्या ताटांत जेवणारे श्रीमंत असां, राजमहालांत राहणारे बलिष्ठ राजे असां किंवा अत्यंत दरिद्री असां, मृत्यु हा सर्वांनाच येणार आहे; सर्वांची एकच गति आहे, सर्वच माया आहे. हा भारताचा प्राचीन असा सिद्धान्त आहे. तो अमान्य करण्याचा प्रयत्न करणारीं, तो फोल ठरवूं पाहाणारीं राष्ट्रें वारंवार उदयास येतात, तीं मोठीं होतात, भोग हेंच त्यांचें ब्रीदवाक्य असतें, त्यांच्या हातांत सत्ता असते, ह्या सत्तेचा तीं पुरेपूर उपयोग करतात व शक्य तितके सुखोपभोग भोगतात, पण पुढच्याच क्षणीं तीं विनाशास प्राप्त होतात. आपण चिरकाल जिवंत राहिलों आहोंत, कारण सर्वकांही माया आहे अशी आपली धारणा आहे. महामायेचीं संतानें चिरजीवन जगतात, तर भोगप्रवणतेचीं अपत्यें मृत्युमुखीं पडतात.

आणखी एका बाबतींत प्राच्य व पाश्चात्त्य विचारप्रणालींत महत्त्वाचा फरक आहे. जर्मन तत्त्वज्ञानांत हेगेल व शौपेनहॉर यांचीं मतें जशा प्रकारचीं दिसतात तशाच प्रकारचीं मतें प्राचीन भारतांतहि मांडलेलीं तुम्हांला आढळतील. पण आपल्या सुदैवानें भारतांत हीं हेगेलांसारखीं मतें मुळांतच खच्ची करण्यांत आलीं, त्यामुळे तीं वाढून आपल्या मायभूमींत त्यांचा घातक प्रसार होऊं शकला नाही.. हेगेलची एक मुख्य कल्पना ही आहे कीं, निरपेक्ष असें जें एक तत्त्व आहे तें घुकाळ आणि अस्ताव्यस्त स्वरूपाचें आहे, आणि साकार व्यक्ति ह्या त्याहून श्रेष्ठ आहेत. सृष्टि ही सृष्टिपूर्व अवस्थेहून श्रेष्ठ असून, संसार हा मुक्तीहून श्रेष्ठ आहे. हीच हेगेलची मुख्य कल्पना आहे आणि म्हणून त्याच्या मतें या संसारांत तुम्ही जितकें अधिक रमाल, जितका तुमचा आत्मा या जीवनांतील कर्मांत अधिक गुंतेल तितके तुम्ही अधिक चांगले व्हाल. ते लोक म्हणतात, 'आम्ही कशीं घरें बांधतों, रस्ते कसे स्वच्छ ठेवतों, इंद्रियभोग कसे उपभोगतों हें तुम्हांला दिसत नाही काय ?' या प्रत्येक भोगामागे द्वेष, दुःख, भयंकर पशुवृत्ति इत्यादि गोष्टी दडलेल्या असल्या तरी काय हरकत आहे !

याउलट आपल्या देशांतील तत्त्वज्ञ प्रथमपासूनच घोषणा करीत आहेत की प्रत्येक अभिव्यक्ति--ज्याला तुम्ही क्रमविकास म्हणतां--

ही व्यर्थ आहे, व्यक्ताचा अव्यक्त होण्याचा तो व्यर्थ प्रयत्न आहे. तुम्ही सृष्टीचे सर्वशक्तिमान आदिकारण आहांत, तुम्ही क्षुद्र डबक्यांमधे स्वतःला प्रतिबिंबित करण्याचा प्रयत्न करतां ! पण कांही वेळ असा प्रयत्न केल्यावर तुम्हांला कळेल की हें सर्व व्यर्थ आहे, आणि मग जिथून तुम्ही आलांत त्या मूळ स्थानीं जाण्यासाठी तुम्ही परत फिराल. यालाच वैराग्य किंवा त्याग म्हणतात आणि येथूनच धर्माचा प्रारंभ होतो. त्यागावांचून धर्माचा किंवा नीतिमत्तेचा प्रारंभ कसा होऊं शकेल ? त्यागापासून धर्माचा प्रारंभ आहे व त्यागांतच धर्माची समाप्ति आहे. वेदांनी म्हटलें आहे, "त्याग करा, त्याग करा." त्याग हाच एकमेव मार्ग आहे. "न प्रजया धनेन त्यागेनैकेऽमृतत्वमानशुः"--"संपत्तीने नव्हे, संततीने नव्हे, तर केवळ त्यागानेच अमरत्व प्राप्त होत असतें." भारतीय शास्त्रांचा हा आदेश आहे. अर्थातच सिंहासनावर अधिष्ठित असूनहि त्यागमय जीवन व्यतीत करणाऱ्या व्यक्ति झालेल्या आहेत. जनकालाहि कांही दिवस संसाराचा त्याग करावा लागला होता आणि त्याच्याहून अधिक त्यागी कोण आहे ? पण आज आपल्यापैकी प्रत्येकाला जनक म्हणवून घेण्याची इच्छा असते ! ते सर्वजण 'जनक' आहेत हें खरें--वस्त्रहीन, अर्धपोटी अशा दुर्दैवी बालकांचे ते 'जनक' आहेत ! जनक हा शब्द त्यांना याच अर्थाने लावणें योग्य होईल. त्या प्राचीन जनकराजाप्रमाणे त्यांच्या ठायीं ब्रह्मनिष्ठा नाही. आपले आधुनिक जनक हे असे आहेत! असलें जनकत्व थोडें कमी करून सरळ रस्त्यावर या बघूं. तुम्ही त्याग करूं शकाल तरच धार्मिक व्हाल. तुम्ही त्याग करूं शकत नसाल तर जगांतील सर्व ग्रंथालयांतील ग्रंथ तुम्हीं वाचलेत व तुम्ही मोठे पंडित झालांत तरी जोंवर तुम्ही केवळ कर्मकांडांतच अडकून पडलां आहांत तोंवर तुम्हीं कांहीच प्राप्त करून घेतलें नाही, तुमच्यांत आध्यात्मिकतेचा मुळीच विकास झाला नाही असें म्हणावें लागेल. त्यागाच्या द्वारेंच हें अमरत्व प्राप्त करावयाचें असतें. त्याग हीच महाशक्ति आहे, ती ज्याच्या ठायीं असते तो अवघ्या जगाची पर्वा करीत नाही, त्याच्यापक्षीं "ब्रह्मांण्डं गोष्पदायते"--"अवघें विश्व गाईच्या खुराने केलेल्या खळग्याएवढें होऊन जाते."

जगावर डोलणारें भारताचें निशाण हें त्यागाचें निशाण आहे,

भारताने जगाला वारंवार दिलेला अमर संदेश हा त्यागाचा संदेश आहे, तो जणु या जगांतील मरायला टेकलेल्या जातींना, सर्व प्रकारच्या जुलूमशाहीला व दुष्टपणाला दिलेली एक ताकीदच आहे. हिंदूंनो, त्यागाचा हा ध्वज टाकून देऊं नका, तो उंच धरा, तुम्ही दुर्बल असलां, त्याग करूं शकत नसलां तरीहि ध्येयाला खाली ओढूं नका. "आम्ही दुर्बल आहोंत व म्हणून त्याग करूं शकत नाहीं," असें म्हणा, परंतु दांभिकपणा करूं नका, शास्त्रांतील अर्थाची ओढाताण करूं नका, तसेंच पोकळ विधानें करून अज्ञजनांच्या डोळ्यांत धूळ फेकूं नका. हें तुम्ही करूं नका व आपण दुर्बल आहोंत हें मान्य करा; कारण त्यागाचें ध्येय हें महान् ध्येय आहे. त्यागाचें हें ध्येय गाठण्याच्या प्रयत्नांत समजा लाखो लोक अपयशी ठरले व दहा वीर किंवा दोनच वीर यशस्वी झाले तर काय बिघडलें ? ते लाखो मृत वीर धन्य आहेत ! त्यांच्या रक्ताने विजय मिळवून दिला. मुंबई प्रांतांतील वल्लभाचार्यांचा संप्रदाय सोडला तर भारतांतील सर्वच वैदिक संप्रदायांनी त्यागाला आपलें ध्येय मानलें आहे; आणि जिथे त्याग नसतो तिथे काय घडतें हें आपण सर्वजण जाणतांच. त्यागाच्या आदर्शाचें रक्षण करण्यासाठी आपल्याला सनातनीपणाला आश्रय द्यावा लागला तरी चालेल. हे सनातनी लोक अगदी विक्षिप्त असले, सर्वांगाला भस्म फासून बसणारे जरी असले किंवा ते हात वर करून उभे राहणारे जरी असले तरी ते आपल्याला हवे आहेत. ते अस्वाभाविक वाटत असले तरी त्यागाचा आदर्श उचलून धरणारे आहेत, व आत्यंतिक भोगवादाला बळी पडूं नका असा इशारा देण्याचें कार्य ते करीत आहेत. पुरुषत्वाचा नाश करणारा हा भोगवाद आज भारतांत शिरत असून आमच्या जीवनशक्तीला ग्रासून टाकीत आहे व त्यामुळे येथील संपूर्ण समाज दांभिक बनूं पाहत आहे. आपल्याला थोडीशी त्यागी वृत्ति हवी आहे. त्यागाने प्राचीन काळीं भारताला जिंकून घेतलें होतें. आजहि त्याला हेंच करावयाचें आहे. आजहि हा त्याग भारतामधे महान् व सर्वोच्च ध्येय मानलें जात आहे. बुद्ध, रामानुजाचार्य, श्रीरामकृष्ण यांची ही भूमि आहे, साक्षात् त्यागाची ही भूमि आहे; येथे प्राचीन काळापासून कर्मकांडाविरुद्ध शिकवण दिली गेली आहे; आजहि या देशांत शेकडोजण सर्वस्वाचा त्याग करून जीवन्मुक्त झालेले आहेत--असा हा देश आपले

आदर्श टाकून देईल काय ? कधीच नाही. आपल्या देशांत पाश्चात्त्य भोगवादाने माथीं भडकलेले कांही लोक असतीलहि, पाश्चात्त्यांनी जगाला ज्या इंद्रियभोगांचा व भोगप्रवणतेचा शाप दिलेला आहे त्या भोगप्रवणतेचें आकंठ पान केलेले हजारो, लाखो लोक आपल्या देशांत असतीलहि; पण आपल्या या भूमींत असेहि हजारो लोक नेहमीच असतील की जे धर्म ही एक सत्य वस्तु समजतील व जे जरूर पडल्यास कशाचीच पर्वा न करतां सर्वस्वाचा त्याग करावयास सदैव सिद्ध राहतील.

आपल्या सर्व संप्रदायांना समान असें आणखी एक ध्येय आहे; तें मी आता तुम्हांला सांगतों. हाहि एक मोठाच विषय आहे. धर्म हीं अनुभूतीची बाब आहे ही वैशिष्टयपूर्ण कल्पना केवळ भारतांतच आढळते. "नायमात्मा प्रवचनेन लभ्यो न मेधया न बहुना श्रुतेन"--"हें आत्मतत्त्व फार वाद करून किंवा बुद्धीच्या बळावर किंवा शास्त्रांचा पुष्कळ अभ्यास करूनहि प्राप्त करून घेतां येणार नाही." जगांत केवळ आपलींच शास्त्रें हें सांगतात की शास्त्रांच्या अभ्यासानेहि आत्म्याची अनुभूति होऊं शकणार नाही; आत्मा हा वादाने अथवा प्रवचनाने प्राप्त होत नाही, तर त्याची प्रत्यक्ष अनुभूतिच करून घ्यावयास हवी. ही अनुभूति करून घेण्याची शक्ति गुरूकडून शिष्यास प्राप्त होत असते. जेव्हा शिष्याला ही अंतर्दृष्टि प्राप्त होते तेव्हा सर्व अडथळे दूर होतात व त्याला प्रत्यक्ष आत्मसाक्षात्कार होतो.

मला आपणांस आणखी एक गोष्ट सांगावयाची आहे. बंगालमधे एक विचित्र प्रथा आढळते, तिला 'कुलगुरुप्रथा' असें म्हणतात. "माझे वडील तुमचे गुरु होते तेव्हा आता मी तुमचा गुरु आहें. माझे वडील तुमच्या वडिलांचे गुरु होते, म्हणून मी तुमचा गुरु आहें." गुरु म्हणजे काय ? आपण श्रुतीचें मत पाहूं या. श्रुति म्हणतात--"वेदांचें मर्म ज्याला आकलन झालें आहे तो गुरु होय." केवळ पुस्तकांतील किडे, व्याकरण जाणणारे वा सर्वसाधारण पंडित हे गुरु होऊं शकत नाहीत, तर ज्याला वेदांचा खरा अर्थ कळला आहे तोच गुरु होय. "यथा खरश्चन्दनभारवाही भारस्य वेत्ता न तु चन्दनस्य"--"चंदनाचीं लाकडें लादलेल्या गाढवाला केवळ त्यांचें वजन कळतें, पण त्यांचे मूल्यवान् गुणधर्म कळत नाहीत." सर्वसाधारण पंडित हे असे असतात. आपल्याला

तसले पंडित नकोत. त्यांना प्रत्यक्ष अनुभूति आलेली नसेल तर ते काय शिकवूं शकणार? जेव्हा मी लहान होतों तेव्हा या कलकत्ता शहरांत धर्माच्या शोधार्थ मीं ठिकठिकाणीं जात असे, आणि मोठमोठीं व्याख्यानें ऐकल्यावर त्या व्याख्यात्यांना मी विचारीत असे, "तुम्हीं ईश्वराला पाहिलें आहे काय?" ईश्वराला पाहण्याच्या कल्पनेने त्यांना विस्मयाचा धक्का बसत असे. "मीं ईश्वराला पाहिलें आहे" असें उत्तर देणारी एकच व्यक्ति मला आढळली, ती म्हणजे भगवान श्रीरामकृष्ण होत. त्यांनी एवढेंच उत्तर दिलें नाही, तर त्यांनी असेंहि म्हटलें की "ईश्वराचें दर्शन तुलाहि होईल असा मार्ग मी तुला दाखवीन." शास्त्रांच्या अर्थाची ओढाताण करणारा व त्यांतून हवे तसे अर्थ काढणारा माणूस गुरु होऊं शकत नाही.

"वाग्वैखरी शब्दझरी शास्त्रव्याख्यानकौशलं ।
वैदुष्यं विदुषां तद्वद्भुक्तये न तु मुक्तये ।।"

--"अस्खलित भाषण करण्याच्या विविध पद्धति, शास्त्रवचनांचा तऱ्हतऱ्हेचा अर्थ लावण्याच्या पद्धति ह्या विद्वानांच्या करमणुकीकरिता असतात, त्या मुक्तीकरिता नसतात." गुरु हा 'श्रोत्रिय' म्हणजे श्रुतीचें रहस्य जाणणारा असतो. तो 'अवृजिन' म्हणंजे निष्पाप असतो. तो 'अकामहत' म्हणजे वासनारहित असतो--तुम्हांला ज्ञान देऊन द्रव्यप्राप्तीची इच्छा तो करींत नाही. तो शांत व साधु असून वसंतऋतूप्रमाणे त्याचें आगमन होतें. वसंतऋतु आला म्हणजे विविध वनस्पतींना पालवी व मोहोर येतो, परंतु त्या वनस्पतींकडून वसंतऋतूला कांही अपेक्षा नसते, कारण परोपकार हा त्याचा स्वभावच असतो, हित करणें एवढेंच त्याचें कार्य असतें. यथार्थ गुरु हा या वसंतऋतुसारखाच असतो. "तीर्णाः स्वयं भीमभवार्णवं जनानहेतुनान्यानपि तारयन्त:"--"जो स्वत: दुस्तर असा भवसागर तरून गेलेला असतो व स्वत: कोणत्याच लाभाची अपेक्षा न ठेवतां जो दुसऱ्यांना तरून जाण्यास साहाय्य करतो" त्यालाच गुरु म्हणतात. आणि लक्षांत ठेवा की अन्य कोणीहि गुरु होऊं शकत नाही, कारण--

"अविद्यायामन्तरे वर्तमाना: स्वयं धीरा: पण्डितम्मन्यमाना: ।
जंघन्यमाना: परियन्ति मूढा: अन्धेनैव नीयमाना यथान्धा: ।।"

--"स्वत: अंधारांत चाचपडत असलेले, पण अहंकारामुळे स्वत:ला सर्वज्ञ समजणारे मूर्ख लोक दुसऱ्यांना साहाय्य करूं पाहतात; ते वेड्यावाकड्या मार्गाने मागेपुढे फिरत राहतात; आणि आंधळ्याने आंधळ्याचें मार्गदर्शन करावें त्याप्रमाणे ते दोघेहि अखेर खड्ड्यांत पडतात" असें वेदांनी म्हटलें आहे. या वेदवचनाशीं तुमच्या आजच्या प्रथेची तुलना करा. तुम्ही स्वत:ला वेदान्ती म्हणवतां, सनातनी म्हणवतां! तुम्ही स्वत:ला खरे हिंदु म्हणवतां, कट्टर सनातनी म्हणवतां! मी तुम्हांला आणखी अधिक सनातनी बनवूं इच्छितों. खऱ्या अर्थाने तुम्ही जेवढे अधिक सनातनी व्हाल तेवढे तुम्ही अधिक समंजस बनाल, आणि आजकालच्या सनातन्यांचें तुम्ही जेवढें अनुकरण कराल तेवढे तुम्ही अधिक मूर्ख व्हाल. आपल्या प्राचीन सनातनीपणाचा आश्रय घ्या, कारण त्या काळांतील शास्त्रांमधून बाहेर पडणारा प्रत्येक शब्द, प्रत्येक स्पंदन हें सुदृढ, स्थिर व निष्कपट अशा हृदयांतून येत असें; त्यांचा प्रत्येक शब्द अमोघ असे. त्यानंतर कला, विज्ञान, धर्म प्रभृति सर्व क्षेत्रांत पतन घडून आलें. सर्व देशाचेंच पतन झालें. या पतनाच्या कारणांची चर्चा करावयास मला सध्या वेळ नाही, पण त्या काळांत लिहिले गेलेले ग्रंथ आपल्या देशाला झालेल्या रोगाची, आपल्या देशाच्या अवनतीची साक्ष देत आहेत. या ग्रंथांतून वीरत्वाऐवजी, उत्साहाऐवजी करुण क्रंदनच आढळून येतें. सामर्थ्य व जीवनशक्ति यांनी युक्त असलेल्या भूतकालांत चला. तुम्ही पुनश्च बलवान व्हा, त्या प्राचीन झऱ्याचें जीवनदायी जल आकंठ प्राशन करा, कारण भारताच्या जीवनाचा तोच एकमेव आधार आहे.

अद्वैतमतानुसार, आपलें हें आजचें व्यक्तित्व म्हणजे एक भ्रम आहे. या गोष्टीचें आकलन होणें जगांतील सर्व लोकांच्या पक्षीं अत्यंत कठीण आहे. एखाद्या मनुष्याला तुम्हीं सांगितलें की 'तुला व्यक्तित्व नाही', तर तो आपलें व्यक्तित्व, मग तें कांही का असेना, नष्ट होण्याच्या भीतीने घाबरून जातो. पण अद्वैत तत्त्वज्ञान सांगतें की, व्यक्तित्व असें कांही नसतेंच, जीवनांतील प्रत्येक क्षणीं तुम्ही बदलत आहांत. तुम्ही बालक होतां तेव्हा तुमचे विचार एका प्रकारचे होते, आज तुम्ही प्रौढ आहांत व वेगळ्या प्रकारें विचार करतां, आणि तुम्ही वृद्ध व्हाल तेव्हा तुमचे विचारहि भिन्न प्रकारचे असतील. प्रत्येकजण बदलत आहे.

तर मग तुमचें व्यक्तित्व कशांत आहे ? तें खरोखर तुमच्या शरीरांतहि नाही, मनांतहि नाही व विचारांतहि नाही. या सर्वांच्या पलीकडे तुमचा आत्मा आहे, आणि अद्वैतवादी म्हणतात की हा आत्मा ब्रह्मच आहे. दोन अनंत वस्तु असूं शकत नाहीत. खरें व्यक्तित्व एकाच वस्तूला आहे आणि ती वस्तु अनंत आहे. सोप्या शब्दांत सांगावयाचें तर, आपण बुद्धिप्रधान प्राणी आहोंत व आपण प्रत्येक गोष्ट तर्कविचाराने समजून घेऊं इच्छितों. तर्कविचार म्हणजे तरी काय ? तर्कविचार म्हणजे कमीअधिक प्रमाणांत वर्गीकरण करणें होय; आणि अखेर आणखी वर्गीकरण अशक्य होईपर्यंत ही तर्कबुद्धि वर्गीकरण करीत जातें. सान्त गोष्टी अनंतांत विलीन झाल्यावरच हें वर्गीकरण थांबतें. एखादी सान्त वस्तु घ्या व तिचें विश्लेषण करूं लागा, अंतिम सत्ता जें अनंत, त्या अनंतापर्यंत गेल्यावरच तुमचें विश्लेषण थांबूं शकेल. आणि अद्वैतवादी म्हणतात की हें अनंत तत्त्वच एकमेव सत्ता होय; बाकी सर्वकांही माया आहे; अन्य कशासहि खऱ्या अर्थानें अस्तित्व नाही; जड वस्तूंत जी कांही सत्ता असते, ती म्हणजे ब्रह्मच होय; आपण हें ब्रह्मच आहोंत. आणि नामरूपादि अन्य गोष्टी ह्या माया आहेत. नामें व रूपें काढून टाकलीं की तुम्ही व मी एकच आहोंत. पण 'मी' या शब्दाचा उपयोग आपण काळजीपूर्वक केला पाहिजे. सामान्यत: लोक म्हणतात, "मी ब्रह्म आहें, तर मी हें कां करूं शकणार नाहीं, तें कां करूं शकणार नाहीं ?" या ठिकाणीं 'मी' हा शब्द लोक वेगळ्या अर्थानें वापरीत असतात. ज्या वेळीं 'मी बंधनांत आहें' असा विचार तुम्ही करतां त्या वेळीं तुम्ही ब्रह्म नसतां, कारण ब्रह्माला वा आत्म्याला कशाचीच उणीव नसते, आत्मा हा ज्ञानस्वरूपच असतो. त्याचें सर्व सुख व आनंद त्याच्या आंतच असतात, तो स्वत:तच संतुष्ट असतो, त्याला कशाचाहि अभाव नसतो, कशाचीहि कामना नसते तो पूर्णपणें निर्भय व स्वाधीन असतो. हा आत्माच ब्रह्म होय. अशा या ब्रह्मांत आपण सर्वजण एक आहोंत.

द्वैती व अद्वैती विचारसरणींत हाच एक महत्त्वाचा फरक असल्याचें दिसून येतें. शंकराचार्यांसारखे थोर भाष्यकार देखील कधी कधी श्रुति-ग्रंथांतील मंत्रांवर भाष्य करतांना त्यांचा तंतोतंत बरोबर अर्थ घेत नाहीत असें मला वाटतें. कांही ठिकाणीं रामानुजाचार्यांनी केलेला अर्थहि

पुरेसा स्पष्ट नसल्याचें तुम्हांला आढळेल. आपल्या विद्वान् मंडळींतहि एक कल्पना रुजलेली आढळते; ती म्हणजे, एकच संप्रदाय सत्य असूं शकतो व बाकीचे सर्व संप्रदाय मिथ्या असले पाहिजेत. आपल्या श्रुतींत एक अपूर्व सत्य सांगितलेलें असून भारताला त्याचा संदेश सर्व जगाला द्यावयाचा आहे. "एकं सत् विप्राः बहुधा वदन्ति"--"सद्‌वस्तु ही एकच असून ऋषि तिला विविध नांवें देत असतात" हेंच तें सत्य होय. आपल्या राष्ट्रजीवनाचा हाच मूलमंत्र असून तो प्रत्यक्ष जीवनांत कसा कार्यान्वित करावयाचा हीच आपल्या राष्ट्रापुढील समस्या आहे. पण भारतांतील कांही अगदी थोडे विद्वान्, अर्थात् आध्यात्मिकदृष्टचा ज्ञानी असलेले लोक सोडले तर, आपण सर्वजण हें सत्य विसरून जात असतों. आपल्याला या महान् सत्याचें सर्वदा विस्मरण होतें. आणि अधिकांश पंडितांचें--मला वाटतें, शेकडा अठ्याण्णव पंडितांचें--मत तुम्हांला असें आढळेल की एकतर अद्वैती बरोबर असतील वा विशिष्टाद्वैती बरोबर असतील किंवा द्वैती बरोबर असतील; आणि तुम्ही काशीला जाऊन एखाद्या घाटावर पांच मिनिटें बसाल तर मी म्हणतों त्याचें प्रात्यक्षिक तुम्हांला तेथे पाहावयास मिळेल. तेथे तुम्हांला या सर्व संप्रदायांचें व मतांचें युद्धच चाललेलें दिसेल.

आपल्या देशांतील परिस्थिति ही अशी आहे. मतामतांचा हा कलह चालू असतां श्रीरामकृष्णांचा आविर्भाव झाला व त्यांनी भारतांतील विभिन्न संप्रदायांमधे मूलतः असलेला समन्वय आपल्या जीवनांत प्रत्यक्षपणें आचरून व स्पष्ट करून दाखविला. त्यांच्या जीवनाने हें स्पष्ट झालें की द्वैतमत व अद्वैतमत हीं दोन्हीं आवश्यकच आहेत. तीं खगोलशास्त्रांतील भू-केंद्रक (Geo-centric) व सूर्य-केंद्रक (Helio-centric) सिद्धान्तांप्रमाणे आहेत. एखाद्या मुलाला खगोलशास्त्र शिकवावयाचें असतें तेव्हा त्याला प्रथम भू-केंद्रांत सिद्धान्त शिकवितात, अर्थात् पृथ्वीला मध्य कल्पून सर्व खगोलशास्त्र शिकवितात. पण खगोलशास्त्रांतील सूक्ष्म तत्त्वांपर्यंत त्याची मजल गेली की त्याला सूर्य-केंद्रक सिद्धान्त शिकवावा लागतो, अर्थात् सूर्याला मध्य कल्पावयास सांगावें लागतें आणि त्यामुळे त्याला खगोलशास्त्र अधिक चांगल्या रीतीने समजतें. इंद्रियबद्ध जीव हा स्वभावतःच द्वैतवादी असतो. जोंवर आपण इंद्रियांनी बद्ध आहोंत

तोंवर आपल्याला ईश्वर हा सगुण प्रतीत होणें क्रमप्राप्तच आहे, तोंवर तो आपल्याला केवळ सगुणच प्रतीत होणार व जगाची प्रतीतिहि आपल्याला आज होत आहे तशीच होणार. रामानुजाचार्य म्हणतात, "जोंवर तुम्ही स्वतःला शरीर, मन वा जीव समजतां तोंवर तुमच्या प्रत्येक अनुभवांत जीव, जगत् आणि या दोहोंचें कारण असलेली वस्तु अशा तीन गोष्टी राहतीलच." पण ज्या वेळीं मन सूक्ष्म होतां होतां अखेर विलीन होतें त्या वेळीं देहबोधहि नाहीसा होतो, त्या वेळीं आपल्याला भयभीत, दुर्बल व जडदेहाशीं बद्ध करून ठेवणाऱ्या गोष्टीहि नाहीशा होतात. केवळ तेव्हाच आपल्याला त्या प्राचीन व उदात्त शिकवणींतील सत्य प्रतीत होऊं लागतें. ही शिकवण कोणती ?

"इहैव तैर्जितः सर्गो येषां साम्ये स्थितं मनः ।
निर्दोषं हि समं ब्रह्म तस्माद्ब्रह्मणि ते स्थिताः ।"

—"ज्यांच्या ठायीं सर्व वस्तूंविषयी समदृष्टि बाणली आहे त्यांनी याच जीवनांत संसारचक्रावर जय मिळविला आहे, कारण ब्रह्म हें शुद्ध असून तें सर्वत्र समभावें विद्यमान आहे; आणि म्हणून असे लोक ब्रह्मांत वास करतात असें म्हटलें जातें."

"समं पश्यन् हि सर्वत्र समवस्थितमीश्वरम् ।
न हिनस्त्यात्मनात्मानं ततो याति परां गतिम् ।।"

—"याप्रमाणे ईश्वराला सर्वत्र समभावें अवस्थित असलेला पाहून ज्ञानी पुरुष स्वतः आत्म्याचा घात करीत नाही व म्हणून तो परमपदाला प्राप्त होतो."

# अल्मोरा येथील मानपत्र व त्यास उत्तर

अल्मोरा येथे आल्यावर तेथील नागरिकांच्या वतीने स्वामी विवेकानंदांना हिंदी भाषेंत पुढील अर्थाचें एक मानपत्र देण्यांत आलें—

महात्मन्,

पाश्चात्त्य देशांत आपण आध्यात्मिक विजय मिळविल्यानंतर आपण इंग्लंडहून आपल्या मायदेशीं येण्यास निघाल्याचें ऐकल्यापासून आम्हांला स्वाभाविकपणेंच आपल्या दर्शनाची इच्छा होती. ईशकृपेने तो मंगल अवसर आज प्राप्त होत आहे. "कुणीं एखाद्या व्यक्तीवर उत्कट प्रेम केल्यास ती व्यक्ति त्यास निश्चित भेटत असते" हें भक्तशिरोमणि महाकवि तुलसीदास यांचें वचन आज पूर्णांशाने अनुभवास येत आहे. आंतरिक भक्तीने आपलें स्वागत करण्यासाठीं आम्ही या ठिकाणीं एकत्र जमलों आहोंत. या शहराला पुनश्च भेट देण्याची तसदी घेऊन आम्हांला आपण अत्यंत उपकृत केलें आहे. आपल्या या कृपेबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यास आमच्याजवळ शब्द नाहीत. आपण धन्य आहांत! आपणांस योगाची दीक्षा देणारे आपले पूज्य गुरुदेव धन्य आहेत. या भयंकर कलियुगांतहि आर्य लोकांमधे आपल्या सारखे थोर नेते जन्मास आले म्हणून हा भारतदेशहि धन्य आहे. एवढ्या लहान वयांत आपला साधेपणा, निष्कपटता, चारित्र्य, परोपकारबुद्धि, कठोर साधना, शुद्ध आचरण व ज्ञानाचा प्रचार इत्यादींमुळे आपण जी दिगन्त कीर्ति संपादन केलीत तिचा आम्हांला मोठा अभिमान वाटतो.

वस्तुतः शंकराचार्यांनंतर कोणीं अंगीकृत न केलेलें महाकठीण असें कार्य आपणच पार पाडलेलें आहे. प्राचीन भारतीय आर्यांचा एक वंशज आपल्या तपश्चर्येच्या प्रभावाने इंग्लंड-अमेरिकेंतील सुशिक्षित लोकांना प्राचीन भारतीय धर्माचें श्रेष्ठत्व पटवून देईल असें आम्हांला स्वप्नांतहि वाटलें नव्हतें. शिकागो येथे भरलेल्या जागतिक सर्व-धर्मपरिषदेंत, प्राचीन भारतीय धर्माचें श्रेष्ठत्व आपण एवढ्या प्रभावीपणें मांडलें की तेथे जमलेल्या प्रनिनिधींचे डोळेच उघडले. त्या थोर परिषदेंत प्रत्येक प्रतिनिधीने आपापल्या धर्माची बाजू मांडण्याचा

प्रयत्न केला, पण आपण त्या सर्वांना मागे टाकलें. वैदिक धर्माची बरोबरीं कोणताच धर्म करूं शकणार नाही हें आपण पूर्णपणें सिद्ध करून दाखविलें. एवढेंच नव्हे तर, अमेरिकेंतील कित्येक ठिकाणीं आपल्या प्राचीन ज्ञानाचा प्रचार करून प्राचीन आर्यधर्म व तत्त्वज्ञान यांकडे कितीतरी विद्वान लोकांना आपण आकर्षित केलें. इंग्लंडमधेहि आपल्या प्राचीन धर्माची पताका रोवलीं व आता ती तेथून हलविली जाणें अशक्य आहे.

आजपावेतों युरोपांतील आधुनिक प्रगत राष्ट्रांना व अमेरिकेला आपल्या धर्माच्या यथार्थ स्वरूपाविषयी मुळीच ज्ञान नव्हतें, परंतु आपण आपल्या आध्यात्मिक उपदेशाने त्यांच्या डोळ्यांत अंजन घातलें. याचा परिणाम असा झाला की, केवळ अज्ञानामुळे ते ज्याला "पंडितंमन्य लोकांचा सूक्ष्म व जटिल धर्म किंवा मूर्खांकरिता केलेलें भाराभर विवेचन" असें म्हणत, तो धर्म खरोखर रत्नांची खाण आहे याचें त्यांना ज्ञान झालें. खरोखर, "शेकडो मूर्ख मुलें असण्यापेक्षा एकच सद्‌गुणी व कीर्तिमान् मुलगा असणें चांगलें". "एकटा चंद्र आपल्या प्रभेने सर्व अंधार नाहीसा करतो, पण तेंच कार्य सर्व ताऱ्यांना एकत्र येऊनहि करतां येत नाही." आपल्यासारख्या सद्‌गुणी व सुशील पुत्राचें जीवनच जगाला खरोखर उपयुक्त होत असतें. आपल्यासारखा धार्मिक वृत्तीचा पुत्र लाभल्यामुळे भारतमातेला आजच्या विपन्नावस्थेंतहि समाधान वाटत आहे. सागरपार होऊन कितीतरी लोक अनेकदा परदेशांत गेले व आले, पण आपल्या पूर्वसुकृतामुळे आपल्याच हातून आपल्या धर्माचें माहात्म्य समुद्रापलीकडील देशांत सिद्ध झालें. कायावाचामनेंकरून समग्र मानवजातीला आध्यात्मिक शिक्षण देणें हेंच आपण आपल्या आयुष्याचें उद्दिष्ट मानलें आहे. असें धार्मिक ज्ञान देण्यास आपण सदैव तत्पर असतां.

या ठिकाणीं एक मठ स्थापन करण्याची आपली इच्छा आहे हें ऐकून आम्हांला अत्यंत आनंद झाला आणि आपले याविषयीचे प्रयत्न सफल व्हावेत अशी आम्ही मनापासून प्रार्थना करीत आहोंत. श्रीमत् शंकराचार्यांनीहि आध्यात्मिक विजय प्राप्त केल्यानंतर आपल्या सनातन धर्माच्या रक्षणाकरिता हिमालयांत बदरिकाश्रमांत एक मठ स्थापन केला होता. त्याचप्रमाणे आपलीहि इच्छा सफल झाल्यास भारताचा मोठाच

लाभ होणार आहे. आम्हां कुमाऊनी लोकांना या गोष्टीचा विशेष असा आध्यात्मिक लाभ मिळेल, व सनातन धर्म आम्हांमधून नष्ट होत असल्याचें आम्हांला पाहावें लागणार नाही.

अतिप्राचीन कालापासून हा हिमालय तपस्येची भूमि म्हणून प्रसिद्ध आहे. भारतांतील थोर ऋषींनी आपलें तपस्यामय धार्मिक वृत्तीचें जीवन याच परिसरांत व्यतीत केलें आहे; पण आता ही गोष्ट भूतकालांत जमा झाली आहे. आम्हांला अशी दृढ आशा वाटते की येथे मठ स्थापन करून आपण ह्या गोष्टीचा अनुभव आम्हांला पुन: प्राप्त करून द्याल. अखिल भारतामधे हीच पावन भूमि, सद्धर्म, कर्म, साधना, सद्वर्तन इत्यादींसाठी प्रसिद्ध होती, पण कालाच्या प्रभावाने या सर्वांचा ऱ्हास होत असल्याचें दिसत आहे. आम्हांला अशी आशा वाटत आहे की आपल्या उदात्त श्रमांचें चीज होऊन या भूमीला तिचें प्राचीन धार्मिक जीवन पुन: प्राप्त होईल.

आपल्या येथील आगमनामुळे आम्हांला किती आनंद झाला आहे हें आम्ही शब्दाने व्यक्त करूं शकत नाहीं. असें परोपकारयुक्त जीवन व्यतीत करीत, पूर्ण आरोग्ययुक्त असें दीर्घायुष्य आपणांस लाभो, हीच ईश्वराला आमची नम्र प्रार्थना आहे. आपलें आध्यात्मिक सामर्थ्य दिवसेंदिवस वृद्धिगत होवो व आपल्या प्रयत्नामुळे भारताची आजची दैनावस्था लवकर नाहीशी होवो !

आणखी दोन मानपत्रें स्वामीजींना अर्पण करण्यांत आलीं. त्यांना स्वामीजींनी पुढीलप्रमाणे थोडक्यांत उत्तर दिलें:—

आपले पूर्वज शयनीं-स्वप्नीं ज्या भूमीचें चिंतन करीत तीच ही भूमि आहे. येथेच भारताची माता पार्वती हिचा जन्म झाला होता. ऐहिक जीवनाचा शेवटचा अध्याय पूर्ण करण्यासाठी आपल्या आयुष्याचा अखेरचा भाग या पवित्र भूमींत व्यतीत करावा अशी भारतांतील प्रत्येक साधकाची इच्छा असते. या पवित्र भूमींतील पर्वतराजीवर, येथील गुहांमधे, येथून वाहणाऱ्या वेगवान नद्यांच्या तीरावर अत्यंत आश्चर्यकारक विचारांचा उगम झाला असून त्यांच्या अत्यंत अल्प अशा अंशानेच परदेशांतील लोकांना मुग्ध करून टाकलें आहे व अत्यंत सुयोग्य अशा विद्वानांनीहि ते विचार निरुपम आहेत असाच स्पष्ट अभिप्राय दिलेला

आहे. माझ्या बालपणापासून, येथे जीवन व्यतीत करण्याचें स्वप्न मी चितारीत आलों आहें आणि आपणां सर्वांना हें विदित आहेच की येथे राहावयाचा मीं वारंवार प्रयत्नहि केला, पण त्यासाठी सुयोग्य वेळ आलेली नसल्यामुळे पुढे असलेल्या कार्यार्थं मला या पवित्र भूमीबाहेर राहावें लागलें. तरीहि मला आशा वाटत आहे की ऋषींची निवासभूमि व तत्त्वज्ञानांचें उगमस्थान असलेल्या या नगाधिराजाच्या परिसरांत कोठेतरी मी आपल्या आयुष्याचे शेवटचे दिवस काढूं शकेन. मित्रहो, पूर्वी ठरविलेल्या पद्धतीने कदाचित् मला येथे जीवन व्यतीत करतां येणार नाही, कारण जी शांतता, जो अज्ञातपणा मला हवाहवासा वाटतो तो कदाचित् मला मिळणार नाही, पण तरीहि मी अंत:करणपूर्वक प्रार्थना करतों व आशा बाळगतों की जगांतील अन्य कोणत्याहि ठिकाणापेक्षा येथेच माझ्या जीवनांतील अखेरचा काळ व्यतीत व्हावा, आणि हें असें घडेल असा मला जवळजवळ विश्वासहि वाटतो.

या पवित्र भूमींतील रहिवाशांनो, पाश्चात्त्य देशांत माझ्या हातून घडलेल्या लहानशा कामाबद्दल आपण माझा जो गौरव केलांत त्याविषयी मी आपला अत्यंत कृतज्ञ आहें. पण त्याचबरोबर मला सांगावयाचें आहे की पौर्वात्य वा पाश्चात्त्य देशांत मीं केलेल्या कार्याबद्दल बोलण्याची या वेळीं मला इच्छा होत नाही. या नगाधिराजाची शिखरांमागून शिखरें माझ्या दृष्टिपथांत येतात तेव्हा कर्म करण्याची माझी प्रवृत्ति व गेलीं कित्येक वर्षे डोक्यांत सुरू असलेलें विचारचक्र हीं एकदम शांत होतात आणि मीं काय कार्य केलें व मला काय करावयाचें आहे यासंबंधी बोलणें राहून जातें, आणि हिमालयाने दिलेल्या सनातन संदेशाकडे चित्त आकृष्ट होतें. येथील वातावरणांतच जणु घुमणारा हा संदेश आताहि मला वेगान धावणाऱ्या येथील आवर्तयुक्त नद्यांच्या प्रवाहांतून अस्फुटपणें ऐकूं येत आहे--तो संदेश म्हणजे त्यागाचा संदेश, वैराग्याचा संदेश होय ! "सर्वं वस्तु भयान्वितं भुवि नृणां वैराग्यमेवाभयम्"--"या जीवनांतील प्रत्येक गोष्ट भयाने व्याप्त आहे. केवळ वैराग्यच मनुष्याला निर्भय करूं शकतें." होय, ही वैराग्याचीच भूमि आहे हें सदैव लक्षांत असूं द्या.

आता वेळहि थोडा आहे व परिस्थितिहि आपणांपुढे सविस्तर बोलावें अशी नाहीं. म्हणून एवढेंच सांगून मी आपलें भाषण संपवितों

की, हिमालय हें त्या त्याग-वैराग्याचें प्रतीक आहे आणि आपल्याला ह्या त्यागाचाच उदात्त संदेश मानवजातीला द्यावयाचा आहे. आपल्या पूर्वजांना ज्याप्रमाणे आपल्या आयुष्याच्या उत्तरकालांत या महान् गिरिराजाचें आकर्षण वाटत असे त्याचप्रमाणे भावीकालांत जगाच्या कान्याकोपऱ्यांतील महात्म्यांनाहि तें वाटूं लागेल. ज्या वेळीं पंथापंथांमधील कलह व मतामतांमधील वाद यांचें स्मरणहि उरणार नाही, ज्या वेळीं धर्माधर्मांतील भांडणें पूर्णपणें मिटलेलीं असतील, ज्या वेळीं मानवजातीला हें उमगलेलें असेल की स्वतःतील ईश्वराला अनुभविणें हा एकच शाश्वत असा धर्म असून बाकीच्या सर्व गोष्टी व्यर्थ आहेत, त्या वेळीं सत्यान्वेषी साधक, हा जगाचा पसारा केवळ पोकळ आहे व केवळ ईश्वराच्या उपासनेव्यतिरिक्त सर्वकांही व्यर्थ आहे हें जाणून या हिमालयाच्या परिसरांत येतील.

मित्रहो, माझ्या एका कल्पनेचा आपण कृपापूर्वक उल्लेख केलांत; ती म्हणजे या हिमालयांत एक केंद्र प्रस्थापित करणें ही होय. आणि असें कां झालें पाहिजे, अन्य कोणत्याहि ठिकाणापेक्षा सार्वजनीन धर्माच्या शिकवणीसाठी हेंच एक महान् केंद्र निवडणें मला प्रशस्त कां वाटलें याचें पुरेसें स्पष्टीकरण मीं आधीच केलें आहे. हिमालयाच्या ह्या पर्वतराजी आपल्या जातीच्या उज्ज्वल स्मृतींशीं संबद्ध आहेत; ह्या देशाच्या धार्मिक इतिहासांतून हिमालयास वगळलें तर फारच थोडचा गोष्टी शिल्लक राहतील. म्हणून येथे एक केंद्र झालेंच पाहिजे; या केंद्रांत केवळ कर्मशीलता नको, तर तेथे शांति, चिंतनशीलता व निःस्तब्धताच अधिक प्रमाणांत हवी. आणि मला आशा वाटते की, कधी ना कधी ही कल्पना साकार होईलच. आणखी एखादे वेळीं आपणांस भेटून आपणांशीं बोलण्याची चांगली संधि मिळेल अशी मला आशा आहे. आता आपण माझ्याविषयीं जी सहृदयता दाखविली तिच्याबद्दल मी पुनः कृतज्ञता व्यक्त करतों. आपण माझ्याविषयीं हा जो लोभ प्रकट केलांत तो व्यक्तिशः माझ्याविषयीं नसून मी आपल्या धर्माचा प्रतिनिधि आहें म्हणून आपण तो प्रकट केला असें मी मानतों. धर्माविषयीचें हें प्रेम आपल्या हृदयांत सदैव राहो आणि आपण आज जसे मनाने शुद्ध आहांत व आज धर्माच्या बाबतींत जसे आपण उत्साही आहांत तसेंच आपण सदैव राहावें अशी मी प्रार्थना करतों.

# वेदांची तात्त्विक व व्यवहार्य शिकवण

( अलमोरा येथे दिलेलें व्याख्यान )

स्वामीजींचा अलमोऱ्याहून जाण्याचा दिवस जेव्हा जवळ आला तेव्हा अलमोरा येथील त्यांच्या मित्रांनी त्यांना हिंदींत व्याख्यान देण्याची विनंति केली. हिंदींत व्याख्यान देण्याचा त्यांचा हा पहिलाच प्रसंग होता, तरी स्वामीजींनी ही विनंति मान्य केली. त्यांनी संथपणें सुरवात केली, पण लवकरच त्यांच्या वक्तृत्वाचा ओघ वाढला व नवीन नवीन शब्द व वाक्यें त्यांच्या मुखांतून बाहेर पडूं लागलीं. ज्यांना हिंदी भाषेचें चांगलें ज्ञान होतें व ही भाषा वक्तृत्वाचें माध्यम म्हणून विशेष उपयुक्त नाही हें ज्यांना माहीत होतें त्यांनी असें मत व्यक्त केलें की, स्वामीजींनी हिंदी भाषेंत उत्कृष्ट व्याख्यान देण्याचा नवीनच विक्रम केला असून त्यांनी असेंहि दाखवून दिलें की वक्तृत्वाचें माध्यम म्हणून हिंदी भाषेचा कल्पनातीत विकास केला जाऊं शकतो.

'इंग्लिश क्लब'मधे त्यांचें आणखी एक इंग्रजी व्याख्यान झालें. त्याचा सारांश पुढीलप्रमाणे आहे:--

"वेदांची तात्त्विक व व्यवहार्य शिकवण" असा व्याख्यानाचा विषय होता. भिन्न भिन्न जमातींच्या देवांच्या उपासनेची उत्पत्ति व एका जमातीने दुसऱ्या जमातींना जिंकल्यामुळे या उपासनेचा झालेला विस्तार या दोहोंचा संक्षिप्त इतिहास सांगून स्वामीजी वेदांकडे वळले. त्यांचें स्वरूप, त्यांचें वैशिष्टय व त्यांची शिकवण या सर्वांचा त्यांनी थोडक्यांत परामर्श घेतला. नंतर त्यांनी आत्मतत्त्वाविषयी सांगितलें व पाश्चात्त्य पद्धतीशीं पौर्वात्य पद्धतीची तुलना केली. पाश्चात्त्य लोक धर्माविषयीच्या व जीवनाविषयीच्या गूढ सत्यांचा शोध बाह्य जगांत करीत असल्याचें सांगून, अखेर पौर्वात्यांना या जीवनसमस्येचें उत्तर बाह्य जगांत न आढळल्यामुळे ते अंतर्मुख झाले, असें त्यांनी प्रतिपादन केलें. आपल्या हिंदुजातीनेच अंतर्निरीक्षण पद्धतीचा शोध लावला आहे व ही पद्धति आपल्या जातीचें वैशिष्टय आहे असें उचित शब्दांत सांगून, याच

पद्धतीने प्राप्त झालेलीं अमूल्य आध्यात्मिक तत्त्वें आपल्याच जातीने समग्र जगाला दिलीं आहेत असें त्यांनी स्पष्ट केलें. हिंदूंना स्वाभाविकपणेंच प्रिय असलेल्या ह्या विषयाकडून ते आत्मा व परमात्मा यांच्या संबंधाकडे वळले. आत्म्याची परमात्म्याविषयीची ओढ आणि आत्मा व परमात्मा यांचें मूलभूत ऐक्य या मुद्याचें विवेचन करण्यास जेव्हा त्यांनी सुरवात केली तेव्हा धर्माचार्यांचें सर्वोच्च सामर्थ्य त्यांच्या ठायीं असल्याचा प्रत्यय येऊं लागला. कांही वेळ असें वाटूं लागलें की वक्ता, त्यांचे शब्द व श्रोते हे सर्वव्यापक आत्म्याशीं एकरूप होऊन गेले आहेत. 'मी' व 'तूं', 'हें' वा 'तें' ही जाणीव लुप्तप्राय झाली. त्या वेळीं, तेथे जमलेले विविध प्रकारचे श्रोते त्या वक्त्याच्या देहांतून महान् शक्तीनिशी निःसृत होणाऱ्या आध्यात्मिक तेजांत जणु लय पावले. अशा आपल्या विलक्षण प्रभावाने त्या थोर वक्त्याने तेथे जमलेल्या सर्वजणांना भारून टाकलें.

ज्यांनी स्वामीजींचीं भाषणें वारंवार ऐकलीं होतीं त्यांना अशाच प्रकारचा अनुभव अनेकदा आला होता. व्याख्यान देतांना कांहीं काळ ते चिकित्सक व उत्सुक श्रोत्यांपुढे व्याख्यान देणारे स्वामी विवेकानंद राहत नाहीत, तर सर्व व्यक्तींचीं वैशिष्टयें व त्यांची विविधता हीं लय पावतात, नामरूपें नष्ट होतात आणि वक्ता, श्रोते व शब्द ह्यांना एकरूप करणारें आत्मतत्त्वच केवळ तेथे उरतें.

# भक्ति

( पंजाबमधील सियालकोट येथे दिलेलें व्याख्यान )

पंजाब व काश्मीर येथील निमंत्रणांवरून स्वामीजींनी त्या भागांत एक दौरा काढला. ते काश्मीरमधे एक महिनाभर राहिले. तेथील त्यांचें कार्य काश्मीरचे महाराज व त्यांचे बंधु यांना फार आवडलें. नंतर त्यांनी मरी, रावळपिंडी व जम्मू या ठिकाणीं कांही दिवस घालविले व त्या प्रत्येक ठिकाणीं व्याख्यानें दिलीं. नंतर ते सियालकोट येथे गेले. तेथे त्यांचीं एक इंग्रजींत व एक हिंदींत अशीं दोन व्याख्यानें झालीं. स्वामीजींच्या हिंदी व्याख्यानाचा विषय 'भक्ति' हा होता. त्याचा सारांश अनुवादरूपाने पुढे देत आहोंत:—

जगांत असलेले भिन्नभिन्न धर्म वेगवेगळ्या उपासनापद्धति मानीत असले तरी वस्तुत: ते एकच आहेत. कांही ठिकाणीं लोक मंदिरें उभारतात व त्यांत पूजा करतात, कांही मंदिरांतून अग्नीची उपासना चालते, कांहींत लोक मूर्तीपुढे विनम्र होतात, तर दुसरे असे कित्येक लोक आहेत की जे देवावर मुळी विश्वासच ठेवीत नाहीत. या सर्वांत सत्य हें आहेच, कारण या सर्व धर्मांतील खरा भाव, त्यांतील मूलभूत अंश, त्यांतील सत्यें जर तुम्हीं पाहाल तर तीं सर्व एकसारखींच आहेत असें तुम्हांला दिसेल. कांही धर्मांत ईश्वराची पूजाच होत नाही, इतकेंच नव्हे, तर त्याचें अस्तित्वहि मानलें जात नाही. परंतु त्या धर्मांत थोर महात्म्यांची देवांप्रमाणे पूजा होत असते. बौद्धधर्म हें याचें उत्तम उदाहरण होय. भक्ति ही सर्वच धर्मांमधे आहे, मग ती ईश्वरविषयक असो वा साधुमहात्म्यांविषयीची असो. भक्तीच्या स्वरूपांत असलेली उपासना ही सर्वच ठिकाणीं श्रेष्ठ मानली जाते. आणि भक्ति ही ज्ञानाहून अधिक सुलभ आहे. ज्ञानाकरिता अनुकूल परिस्थिति व दृढ अभ्यास यांची आवश्यकता असते. शारीरिकदृष्टया सुदृढ व निरोगी असल्याविना व संसाराच्या आसक्तीचा पूर्णपणें त्याग केल्याविना योगसाधनाहि नीटपणें करतां येत नाही. परंतु जीवनाच्या कोणत्याहि अवस्थेंत, लोकांना भक्तीची साधना अधिक सुलभ रीतीने करतां येते. भक्तीविषयी विवेचन

करणारे शांडिल्य ऋषि म्हणतात की, ईश्वराविषयीचें उत्कट प्रेम म्हणजे भक्ति होय, प्रल्हादानेहि असेंच म्हटलें आहे. मनुष्याला एक दिवस अन्न मिळालें नाही तर तो अस्वस्थ होतो; त्याला जर पुत्रवियोग झाला तर केवढें दुःख होतें! ईश्वराविषयीच्या तळमळीने खऱ्या भक्ताच्याहि हृदयास अशाच वेदना होत असतात. मन शुद्ध करणें हा भक्तीचा सर्वांत मोठा गुण आहे. आणि परमात्म्याच्या ठायीं दृढ भक्ति निर्माण होणें एवढीच गोष्ट चित्तशुद्धीस पुरेशी आहे. "हे भगवन् तुमचीं अनंत नामें आहेत, परंतु त्या प्रत्येक नामांत विलक्षण शक्ति व सखोल अर्थ भरलेला आहे." आपण भगवंताचें सदैव चिंतन करावें, त्यासाठी स्थल-कालाचा विचार करण्याची गरज नाही.

भिन्न भिन्न नांवांनी ईश्वराची उपासना होत असली तरी ही भिन्नता वरपांगी आहे. आपली उपासनापद्धति ही सर्वांहून अधिक प्रभावी आहे असें एखाद्यास वाटतें, तर मुक्तीचा आपला मार्ग हा अधिक निश्चित आहे असें दुसऱ्याला वाटत असतें. पण या सर्व उपासनापद्धतींचा मूळ आधार पाहाल तर तो एकच असल्याचें दिसून येईल. शैव शिवाला सर्वशक्तिमान् मानतात; वैष्णव विष्णूला तें स्थान देतात; तर देवीचे उपासक, देवी हीच विश्वांतील सर्व शक्तीचा स्रोत आहे हा विश्वास कधी सोडीत नाहीत. तुम्हांला शाश्वत भक्ति हवी असेल तर सर्व-प्रकारचा द्वेषभाव दूर केला पाहिजे. द्वेष ही भक्तिमार्गातील मोठीच धोंड असून, द्वेषरहित मनुष्यच अखेर ईश्वराची प्राप्ति करून घेत असतो. तरीहि आपल्या इष्टदेवतेविषयी निष्ठा असणें हें आवश्यक आहे. हनुमान म्हणतात, "विष्णु व राम एकच आहेत हें मी जाणतों परंतु कमललोचन रामच माझें सर्वस्व आहेत." प्रत्येक मनुष्याच्या प्रवृत्ति भिन्न भिन्न असतात. जन्मतःच मनुष्य ज्या प्रवृत्ती बरोबर घेऊन येतो त्या त्याच्या ठायीं सदैव राहतात. जगांत एकच धर्म नसण्याचें हेंच मुख्य कारण आहे. ईश्वर करो आणि सर्व जग हें एकाच धर्माचें न होवो, कारण तसें झाल्यास जगाची सुसंवादी व व्यवस्थित रचना नाहीशी होऊन केवळ गोंधळ उरेल. मनुष्याने आपल्या विशिष्ट प्रवृत्तींनुसार वागलें पाहिजे व ह्या प्रवृत्तींच्या अनुरोधाने मार्गदर्शन करणारा गुरु त्याला मिळाला तर त्याची प्रगति होईल. मनुष्याला

ज्या मार्गाने जावें असें वाटत असेल त्या मार्गाने आपण त्यास जाऊं द्यावें, पण जर आपण त्याला बळेंच अन्य मार्गाने नेण्याचा प्रयत्न केला तर त्याने जें कांही प्राप्त केलें असेल तेंहि तो गमावून बसेल, इतकेंच नव्हे तर तो मग कांहीच करूं शकणार नाही. एका व्यक्तीचा चेहरा दुसऱ्या व्यक्तीच्या चेहऱ्यासारखा नसतो, तद्वतच एका व्यक्तीचा स्वभावहि दुसऱ्या व्यक्तीच्या स्वभावासारखा नसतो. आणि प्रत्येकाला आपल्या स्वभावानुसार चालण्याची मोकळीक कां असूं नये ? नदी एका विशिष्ट वळणाने वाहत असते; तिच्या प्रवाहाला तुम्हीं योग्य दिशा दिली की तो वेगवान् होऊन वाहूं लागतो, पण त्याच्या वळणाहून भिन्न अशीं दिशा त्याला दिल्यास त्याचा व्याप व वेग हीं दोन्हीं कमी होऊन जातील. हें जीवन अतिशय महत्त्वपूर्ण आहे, आणि म्हणूनच त्याला वैयक्तिक स्वभावानुसार योग्य तें वळण दिलें पाहिजे. भारतामधे धर्मा-धर्मांमधे वैरभाव नव्हता व प्रत्येक धर्माला येथे स्वातंत्र्य होतें; म्हणून भारतांत धर्म अजूनहि टिकून आहे. हें ध्यानीं घेतलें पाहिजे की धर्मा-धर्मांतील कलहांचें कारण पुढीलप्रमाणे असतें. एकाला वाटत असतें की सत्य हें केवळ माझ्यापाशीच आहे व ज्याचा यावर विश्वास नाही तो मूर्ख आहे, तसेंच दुसऱ्याला वाटत असतें की हा पहिला मनुष्य दांभिक आहे, कारण तसा तो नसता तर तो माझ्या म्हणण्याप्रमाणे वागूं लागला असता.

लोकांनी एकच धर्म मानावा अशी जर ईश्वराची इच्छा असती, तर इतके धर्म कशाला उत्पन्न झाले असते ? सर्वांवर एकच धर्म लादण्याचे निष्फळ प्रयत्न अनेक पद्धतीने करण्यांत आलेले आहेत. सर्वांना एकच एक धर्म स्वीकारावयास लावण्यासाठी तरवारीचा उपयोग केला गेला त्या वेळीं देखील त्या ठिकाणीं दहा नवे धर्म निर्माण झाल्याचें इतिहास आपल्याला सांगतो. एकच धर्म सर्वांसाठी उपयुक्त होऊं शकत नाही. क्रिया व प्रतिक्रिया अशा दोन प्रकारच्या शक्तींनी मानवी जीवन बनलेलें आहे आणि त्यामुळेच तो विचारशीलहि होतो. अशा प्रकारच्या परस्परविरोधी शक्तींचे कार्य मानवी मनावर झालें नसतें तर तें विचार करूं शकलें नसतें. मनुष्य हा विचारशील प्राणी आहे--मनुष्य म्हणजे मनस्युक्त अर्थात् मन असलेला जीव आहे; आणि त्याची विचारशक्ति

नष्ट झाली तर पशूहून त्याच्यांत कोणतेंच वेगळें वैशिष्टय राहणार नाही. असा मनुष्य कोणाला आवडेल? ईश्वर करो आणि भारतवासीयांची अशी अवस्था न होवो. मनुष्याचें मनुष्यत्व राहावें म्हणून एकतेंतील ही विविधता आवश्यक आहे. प्रत्येक बाबतींतील विविधता सुरक्षित राहिली पाहिजे, कारण अशी विविधता आहे तोंवरच या जगाचेंहि अस्तित्व अहे. अर्थातच एक लहान व दुसरा मोठा यालाच विविधता म्हणतात असें नाही, पण जीवनांतील आपापल्या क्षेत्रांतील कर्तव्यें सर्वांनी योग्य रीतीने बजावलीं तरीहि विविधता सुरक्षित राहील. प्रत्येक धर्मांत चांगले व कर्तृत्ववान् लोक झालेले आहेत व त्यांनी आपापल्या धर्माला मानाचें स्थान मिळवून दिलेलें आहे; आणि असे थोर लोक प्रत्येक धर्मांत असल्यामुळे कोणत्याहि धर्माविषयी द्वेषभाव बाळगण्याचें कारण नाही.

यावर असा प्रश्न उपस्थित केला जाईल की दुराचरणाचा पुरस्कार करणाऱ्या धर्मालाहि मान द्यावा काय? याचें उत्तर निश्चितच नकारार्थी आहे, आणि असा धर्म अपायकारक असल्याने त्याला ताबडतोब दूर सारणेंच योग्य ठरेल. नीतिमत्तेवर धर्म आधारलेला असला पाहिजे व व्यक्तिगत पावित्र्य हें धर्माहून श्रेष्ठ समजलें गेलें पाहिजे. या संदर्भात हें लक्षांत ठेवलें पाहिजे की पावित्र्य म्हणजे अंतर्बाह्य पावित्र्य होय. बाह्यशुद्धि ही शास्त्रांत सांगितल्याप्रमाणे स्नानादि कर्में केल्याने होऊं शकेल. अंतःशुद्धि मात्र असत्य भाषण, सुरापान व अनैतिक आचरण यांचा त्याग केल्याने आणि परहिताचीं कार्यें केल्यानेच होऊं शकेल. पापाचरण न करणें, असत्य न बोलणें, सुरापान न करणें, जुगार न खेळणें, चौर्यकर्म न करणें हें चांगलें आहे, पण हें तर तुमचें कर्तव्यच आहे, त्यासाठी तुमची प्रशंसा कशाला करावयाची? याबरोबरच दुसऱ्यांची कांही ना कांही सेवा केलीच पाहिजे. स्वतःचें जसें तुम्हीं हित करतां तसेंच इतरांचेंहि तुम्हीं हित केलें पाहिजे.

आहाराच्या नियमांविषयी आता मी आपणांस कांहीं सांगतों. आहारासंबंधीचे सर्व प्राचीन नियम लोप पावले असून, फक्त ह्या वा त्या व्यक्तीबरोबर भोजन करूं नये अशा कांही अस्पष्ट समजुती आपल्या देशांत उरल्या आहेत. शेकडो वर्षांपूर्वी आहारासंबंधी प्रचलित असलेल्या

चांगल्या नियमांचा अवशेष म्हणून आता केवळ स्पर्शास्पर्शविचार मांग उरला आहे. शास्त्रांनी तीन प्रकारचें अन्न निषिद्ध मानलें आहे. प्रथम म्हणजे, मूलतःच दोषयुक्त असलेलें अन्न--उदाहरणार्थ कांदा, लसूण वगैरे. मनुष्याने असें अन्न फार प्रमाणांत सेवन केलें तर कामविकाराचें प्राबल्य वाढून तो अनैतिकतेच्या आहारीं जाईल, व त्यामुळे तो ईश्वर व मानव या दोघांच्याहि घृणेस पात्र होईल. दुसरें म्हणजे, बाह्य दोषांनी युक्त असलेलें अन्न निषिद्ध मानलेलें आहे. आपलें अन्न ठेवण्यासाठी आपण स्वच्छ व सुरक्षित असें ठिकाण निवडलें पाहिजे. तिसरें म्हणजे, दुष्ट लोकांनी स्पर्शिलेलें अन्न खाण्याचें आपण टाळले पाहिजे, कारण अशांशीं संबंध आल्याने आपल्यांतहि वाईट विचार निर्माण होतात. स्वैराचारी व अनैतिक आचरण करणारा माणूस जरी ब्राह्मणकुलांतील असला तरीहि त्याच्या हातचें अन्न आपण भक्षण करतां कामा नये.

पण या सर्व आचारांमधील मूळ हेतु आता लोप पावला आहे. आता शिल्लक आहे तें इतकेंच की, एखादी व्यक्ति कितीहि ज्ञानी व सदाचारीं असली तरी ती जर उच्चवर्णीय नसली तर तिच्या हातचें खावयाचें नाही. मिठाईच्या दुकानांत, त्या आहाराविषयक प्राचीन नियमांची पायमल्ली सदैवच आढळते. तेथे पाहाल तर त्या मिठाईवर माशा घोंगावतांना तुम्हांला दिसतील, आणि रस्त्यावरील धूळ त्या मिठाईवर उडतांना दिसेल, तसेंच त्या दुकानदाराचा वेषहि कांही मोठा स्वच्छ नसतो. गिऱ्हाइकांनी एकमुखाने हें जाहीर केलें पाहिजे की हलवायाच्या दुकानांतील पदार्थ कांचेच्या कपाटांत ठेवलेले नसतील तर ते आम्ही घेणार नाहीं. कॉलऱ्याचे व प्लेगादि अन्य रोगांचे जंतु प्रसारित होण्यास एक प्रतिबंधक उपाय म्हणून हें परिणामकारक ठरेल. आपल्यांत सुधारणा व्हावयास हवी होती, पण सुधारणेऐवजी आपण मागे मागे मात्र जात आहोंत. मनूने म्हटलें आहे की पाण्यांत थुंकूं नका, पण आपण नद्यांच्या पाण्यांत सर्व प्रकारची घाण टाकीत असतों. या सर्व गोष्टींचा विचार केला तर असें आढळून येईल की आपण बाह्य शुद्धीकडेहि लक्ष देणें आवश्यक आहे. शास्त्रकारांनी ही गोष्ट चांगल्या प्रकारें जाणलेली होती. पण आता आहारशुद्धिविषयक नियमांमधील तथ्य लोप पावलें

असून त्यांचें केवळ बाह्यांग बाकी आहे. चोर, दारुडे व गुन्हेगार आपले जातिबांधव असूं शकतात, पण एखाद्या सज्जन व सुशील माणसाने खालच्या जातींतील, परंतु स्वतःइतक्याच सन्मान्य अशा व्यक्ती-बरोबर भोजन केलें की त्याला जातिबाह्य करण्यांत येतें व तो जातीस कायमचा मुकतो. ही प्रथा आपल्या देशाला घातक ठरली आहे. याकरिता हें अगदी स्पष्टपणें समजून घेणें आवश्यक आहे की, पापी लोकांशीं संबंध येण्याने आपण पापयुक्त होत असतों व सत्संगतीने आपण उन्नत होत असतों; म्हणून दुष्टांपासून अलिप्त राहणें हीच बाह्यशुद्धि होय.

अंतःशुद्धि हें याहून अधिक कठीण असें कार्य आहे. त्यांत सत्य-भाषण, गरिबांची सेवा, गरजूंना साहाय्य आदींचा अंतर्भाव होतो. आपण नेहमी खरें बोलत असतों काय? बहुधा घडतें तें असें की, लोक स्वतःच्या कांही कामानिमित्त धनिकाकडे जातात व गरिबांचा कैवारी म्हणून त्याचे गोडवे गातात, मग ती धनिक व्यक्ति तिच्याकडे धांव घेणाऱ्या गरिबांचे गळे का कापीत असेना. याला काय म्हणावें? हें तर शुद्ध खोटें बोलणें होय. आणि अशा गोष्टींनीच मन दूषित होतें. म्हणून शास्त्रांनीं बरोबरच म्हटलें आहे की जर एखाद्या व्यक्तीने सतत बारा वर्षें सत्य भाषणादींच्या द्वारें आपलें चित्त शुद्ध केलें असेल आणि या बारा वर्षांत तिने कोणताच वाईट विचार मनांत आणला नसेल तर तिच्या तोंडून जे शब्द बाहेर पडतील ते खरेच होतील. सत्याचा प्रभाव हा असा आहे, व ज्याने अशाप्रकारें अंतर्बाह्य शुद्धि प्राप्त केली असेल तोच भक्तीस योग्य होय. परंतु भक्तीचें माहात्म्य हें की भक्ति ही स्वतःच पुष्कळ अंशीं मनाची शुद्धि घडवून आणते. यहुदी, मुसलमान व ख्रिस्ती लोक शरीराच्या बाह्य शुद्धीस हिंदूंइतकें अतिरिक्त महत्त्व देत नसले, तरीहि या ना त्या स्वरूपांत हे सर्व लोक बाह्य शुद्धीचें साहाय्य घेतात; विशिष्ट प्रमाणांत ती नेहमीच आवश्यक आहे हें त्यांनाहि माहीत आहे. यहुदी लोकांत मूर्तिपूजा निषिद्ध मानली आहे, परंतु त्यांच्या मंदिरांत, जिला ते 'आर्क' म्हणत ती पेटी ठेवलेली असे. तींत त्यांचें धर्मशास्त्र जपून ठेवलेलें असे. त्या पेटीच्या वरच्या बाजूस देवदूतांच्या, पंख विस्तार-लेल्या दोन मूर्ति बसविलेल्या असत व त्या दोहोंच्या मध्ये एका मेघाच्या रूपांत ईश्वराचा अविर्भाव होतो अशी त्यांची समजूत असे. त्या

मंदिराचा पुष्कळ वर्षांपूर्वी विध्वंस झाला, पण नंतरच्या काळांत अगदी त्याच जुन्या पद्धतीवर नवीन मंदिरें उभारलीं गेलीं आहेत व तशाच प्रकारच्या पेटींत धर्मग्रंथ जतन करून ठेवण्यांत आले आहेत. ख्रिस्ती धर्माच्या रोमन कॅथॉलिक व ग्रीक संप्रदायांमधे विशिष्ट स्वरूपांत मूर्ति-पूजा विद्यमान आहे. येशू ख्रिस्त व मेरी माता यांच्या मूर्तींची ते पूजा करतात. प्रॉटेस्टंट पंथांत मूर्तिपूजा नाही, पण ईश्वराची सगुण रूपांत ते उपासना करतात; मूर्तिपूजेचेंच तें एक निराळें स्वरूप मानतां येईल. पारशीं व इराणी लोकांत अग्निपूजा मोठ्या प्रमाणावर रूढ आहे. मुसलमानांत साधुसंतांची पूजा होते व प्रार्थना करतांना ते आपलीं तोंडें 'काबा' नामक स्थानाकडे वळवीत असतात. या सर्व गोष्टींवरून दिसून येतें की धार्मिक विकासाच्या प्रथमावस्थेंत लोकांना अशा बाह्य प्रतीकांचा उपयोग करावा लागतो, व जेव्हा त्यांची अंतःशुद्धि होते तेव्हा ते अधिकाधिक सूक्ष्म तत्त्वांची कल्पना करूं शकतात.

"उत्तमो ब्रह्मसद्भावो ध्यानभावस्तु मध्यमः ।
स्तुतिर्जपोऽधमो भावो बाह्यपूजाधमाधमा ।।"

--अर्थात् "जीवब्रह्मैक्याची अनुभूति ही सर्वश्रेष्ठ होय; ध्यान हें मध्यम प्रतीचें होय; ईश्वराची स्तुति व जप हीं कनिष्ठ प्रतीचीं होत; आणि बाह्यपूजा ही कनिष्ठाहूनहि कनिष्ठ होय." पण हें पूर्णपणें समजून घेणें इष्ट आहे की बाह्यपूजेचा अवलंब करणें हें कांही पापकर्म नव्हे. ज्याला जें करणें शक्य असेल त्याने तें करावें; त्यापासून त्याला परावृत्त केल्यास तो आपलें ईप्सित साध्य करण्यासाठी तीच गोष्ट दुसऱ्या कोणत्यातरी रूपांत करील. म्हणून मूर्तिपूजा करणाऱ्या व्यक्तीबद्दल आपण अनुदार-पणें बोलूं नये. विकासाच्या त्याच पायरीवर तो आहे, म्हणून त्याला तसें करूं दिलें पाहिजे, अशा लोकांना विचारवंतांनी प्रगत होण्यास साहाय्य केलें पाहिजे व त्यांचा अधिक विकास साधला पाहिजे. पण अशा भिन्न उपासनापद्धतींवरून उगीचच कलह माजविण्यांत कांही अर्थ नाही.

कांहीजण द्रव्यप्राप्तीकरिता ईश्वराची पूजा करतात, इतर कांहींना पुत्र हवा असतो म्हणून ते ईश्वराची उपासना करतात, व असे हे लोक स्वतःस भक्त म्हणवीत असतात. ही भक्ति नव्हे व हे खरे भक्तहि नव्हेत.

'मी सोनें तयार करतों' असें म्हणणारा एखादा बुवा येतो, त्याच्याकडे हे धांव घेतात, व तरीहि स्वतःस ते भक्तच समजत असतात. पुत्र-प्राप्तीच्या इच्छेने आपण पूजा करूं तर ती भक्ति नव्हे; धनप्राप्तीच्या इच्छेने केलेली पूजाहि भक्ति नव्हे; स्वर्ग हें आपलें उद्दिष्ट असेल तरीहि ती भक्ति होणार नाही; नरकयातनांतून बचावण्यासाठी एखादा माणूस पूजा करील तरी तेंहि भक्तीच्या कक्षेंत येणार नाही. भक्ति ही भय वा लोभ यांतून निर्माण होत नाही. खरा भक्त म्हणतों, "हे ईश्वरा, मला सुंदर स्त्री, ज्ञान वा मोक्ष आदि कांहीहि नको. मला शेकडो जन्म वा मृत्यु आले तरी चालतील. पण मीं सदैव तुझ्या सेवेंत राहावें एवढीच माझी कामना आहे." या अवस्थेंत--मनुष्य जेव्हा सर्वांभूतीं ईश्वर व ईश्वराच्या ठायीं सर्वकांही पाहतो त्या अवस्थेंत त्याला परमभक्ति साध्य होते. त्याच वेळीं त्याला आब्रह्मस्तम्बपर्यंत म्हणजे गवताच्या काडीपासून तों ब्रह्मदेवापर्यंत सर्वांच्या ठायीं विष्णूचें रूप प्रतीत होतें, त्याला सर्वत्र ईश्वराचेंच दर्शन होतें; त्याच वेळीं ईश्वराविना एकहि वस्तु नाही अशी त्याची धारणा बनते, आणि सर्व चराचरांत आपण अगदी क्षुल्लक आहोंत अशी कल्पना होऊन भक्ताच्या खऱ्या भावनेने तो ईश्वराची उपासना करूं लागतो. त्या वेळीं बाह्य पूजाविधि, तीर्थें आदि गोष्टी त्याने मागे टाकलेल्या असतात, व प्रत्येक मानव हाच त्याला परिपूर्ण असें मंदिर वाटूं लागतो.

शास्त्रग्रंथांतून भक्ति ही अनेकप्रकारें वर्णिलेली आहे. आपण ईश्वराला आपला पिता मानतों. तद्वतच त्याला आपण माता इत्यादीहि मानतों. भक्ति दृढ व्हावी व ईश्वराचें सान्निध्य उत्कट रीतीने प्रतीत व्हावें ह्याकरिता आपण ईश्वराशीं अशा प्रकारचीं नातीं जोडीत असतों. म्हणून हीं नांवें एका दृष्टीने यथार्थ आहेत. तीं उत्कट अशीं भाव-निदर्शक असून भक्ताला ईश्वराविषयी जें प्रेम वाटतें त्यामुळेच तो त्याला हीं नांवें देत असतो. राधा व कृष्ण यांच्या रासलीलेची गोष्ट घ्या. त्यांत केवळ भक्ताच्या खऱ्या भावाचें दर्शन घडविलें आहे, कारण जगांत स्त्री व पुरुष ह्यांच्यांतील प्रेमभावाहून अन्य कोणतेंच प्रेम उत्कट असूं शकत नाही. जेथे असें उत्कट प्रेम आहे तेथे भय असूं शकत नाही, आसक्ति असूं शकत नाही, केवळ एक अच्छेद्य बंधन दोघांना बांधून

ठेवीत असतें. आईवडिलांच्या बाबतींत मात्र प्रेम हें आपल्याला त्यांच्याबद्दल वाटणाऱ्या आदरयुक्त भीतीने युक्त असतें. पण ईश्वराने सृष्टि निर्माण केली वा नाही, तो आपला पालनकर्ता आहे वा नाही याचा आपण विचार कशाला करावा ? तो आपला परमप्रेमास्पद आहे, आणि म्हणून आपण भीतीची कल्पना टाकून देऊन त्याची उपासना करावी. जेव्हा माणसाला कोणतीहि कामना नसेल, जेव्हा त्याने अन्य गोष्टींचा विचार टाकून दिला असेल, जेव्हा त्याने ईश्वराचा ध्यास घेतला असेल तेव्हाच त्या माणसाला ईश्वरावर खरें प्रेम करतां येतें. प्रेमिक आपल्या प्रेमास्पदावर जसें प्रेम करतों तसें प्रेम आपण ईश्वरावर केलें पाहिजे. कृष्ण हा स्वयं ईश्वर आहे व राधा त्याच्या प्रेमाने उन्मत्त झाली आहे ही कथा तुम्ही वाचा. म्हणजे ईश्वरावर कसें प्रेम करावें हें तुम्हांला कळून येईल. पण राधा आणि कृष्ण यांचें हें प्रेम कितीं लोकांना समजतें ? ज्यांचें अंतकरण पापानेंच पूर्णपणें भरलें आहे व नीतिमत्ता कशाशी खातात हेंहि ज्यांना माहीत नसतें त्यांना हें प्रेम कसें आकलन होणार ? जेव्हा लोक आपल्या अंत:करणांतून सर्व ऐहिक विचार काढून टाकतात व जेव्हा ते निर्मल व आध्यात्मिक अशा वातावरणांत राहतात तेव्हा, ते अशिक्षित असले तरीं, गहनातिगहन विचार त्यांना आकलन होतात. पण अशा प्रकारचे लोक किती अत्यल्प आहेत ! असा कोणताहि धर्म नाही की जो मनुष्य आपल्या गैरसमजुतींनी दूषित करूं शकत नाही. उदाहरणार्थ एखादा माणूस असें म्हणेल की ज्याअर्थी आत्मा हा शरीराहून अगदीं भिन्न आहे त्याअर्थी देहाने कितीहि पापाचारण केलें तरी त्याचा माझ्या आत्म्याला स्पर्श होणार नाही. लोकांनी धर्माचें यथार्थ अनुसरण केलें असतें तर हिंदु, मुसलमान वा ख्रिस्ती, सर्वच लोक पूर्णपणें पवित्र होऊन गेले असते. परंतु माणसें आपल्या बऱ्यावाईट वृत्तींनुसार वागत असतात हें नाकारण्यांत कांही अर्थ नाही. तरीदेखील जगांत सदैवच असेहि कांही लोक असतात की जे ईश्वराचें नांव ऐकतांच तल्लीन होतात व ईश्वरासंबंधी पठन करीत असतांना ज्यांच्या डोळ्यांतून आनंदाश्रु वाहूं लागतात. हेच लोक खरे भक्त होत.

धार्मिक विकासाच्या प्राथमिक अवस्थेंत मनुष्य ईश्वराला आपला धनी व स्वत:ला त्याचा सेवक मानतो. आपल्या दैनंदिन गरजा आदि

भागविल्याबद्दल तो ईश्वराचे आभार मानतो. असले विचार दूर करा या जगांत एकच आकर्षक शक्ति आहे आणि ती म्हणजे ईश्वर ही होय. या आकर्षक शक्तींच्या प्रभावानेच सूर्यचंद्रादि गोल फिरत असतात. या जगांत बरेंवाईट जें कांही आहे तें ईश्वराचेंच आहे. आपल्या जीवनांत जें कांही बरेंवाईट घडतें तें आपल्याला ईश्वराकडेच घेऊन जात असतें. स्वार्थवश एखादा माणूस दुसऱ्याची हत्त्या करतो, पण त्यामागे प्रेरणा ही प्रेमाचीच असते, मग तें प्रेम स्वत:विषयीचें असो वा अन्य कोणाविषयीचें असो. आपण पाप वा पुण्य कांहीहि केलें तरी त्यामागील प्रेरकशक्ति प्रेम हीच असते. एखादा वाघ म्हशीला ठार करतो तेव्हाहि त्याला वा त्याच्या पिलांना लागलेली भूक हेंच त्याचें कारण असतें.

ईश्वर म्हणजे मूर्तिमंत प्रेम होय. तो प्रत्येक वस्तूंत विद्यमान आहे, कळत न कळत प्रत्येकजण त्याच्याकडे आकर्षित होत आहे. एखादी स्त्री आपल्या पतीवर प्रेम करते तेव्हा तिला याची जाणीव नसते की आपल्या पतीच्या ठायीं जो ईश्वर वसत आहे तोच आकर्षित करणारी महान् शक्ति आहे. प्रेमस्वरूप ईश्वर हाच एकमेव उपास्य आहे. जोंवर आपण त्याला स्रष्टा व पालनकर्ता म्हणूनच मानत असतों तोंवर आपण त्याची केवळ बाह्य पूजा करूं शकतों, पण आपण जेव्हा या सर्वांच्या पलीकडे जातों व त्याला प्रेमस्वरूप मानतों, जेव्हा आपण सर्व वस्तूंना त्याच्या ठायीं पाहतों व त्याला सर्व वस्तूंमधे पाहतों तेव्हाच आपल्याला पराभक्ति प्राप्त होते.

# हिंदु धर्माचीं सामान्य आधारभूत तत्त्वें

( लाहोर येथे दिलेलें व्याख्यान )

लाहोरला आल्यावर, आर्यसमाज व सनातन धर्मसभा या दोन्ही संस्थांच्या पुढाऱ्यांनी स्वामीजींचें भव्य स्वागत केलें. लाहोरमधील आपल्या थोडचा दिवसांच्या वास्तव्यांत स्वामीजींनी तीन व्याख्यानें दिलीं. त्यांतील पहिलें 'हिंदुधर्माचीं सामान्य आधारभूत तत्त्वें' या विषयावर झालें, दुसरें 'भक्ती'वर झालें, आणि तिसरें प्रसिद्ध व्याख्यान 'वेदान्त' या विषयावर झालें. पहिलें व्याख्यान पुढीलप्रमाणे आहे:—

पवित्र अशा आर्यावर्तांतहि पवित्रतम अशी ही भूमि समजली गेली आहे; या भूमीलाच थोर मनूंनी 'ब्रह्मावर्त' असें म्हटलें आहे; याच भूमींतून आत्मज्ञानाविषयी प्रचंड आकांक्षा निर्माण झालेली आहे, आणि इतिहास सांगतो त्याप्रमाणे भविष्यकाळांत देखील ही आकांक्षा महापुराप्रमाणे जगाला व्यापून टाकणार आहे. येथील प्रचंड नद्यांप्रमाणे येथें आध्यात्मिक प्रवाहहि निर्माण झाले, ते एकत्र आले व सर्व जगांत संचार करून मेघगंभीर वाणीने त्यांनी आपल्या सामर्थ्याची जगासमोर घोषणा केली. भारतावरील सर्व आक्रमकांचे पहिले आघात याच भूमीला सहन करावे लागले; या पराक्रमी भूमीने बाहेरून या देशावर आलेल्या रानटी टोळचांचे आघात आपल्या छातीवर झेलले; सर्व प्रकारचे आघात सोसूनहि या भूमीने अद्यापि आपलें वैभव व सत्त्व गमावलेलें नाही. नंतरच्या काळांत, याच भूमींत दयाळू नानकांनी उदात्त अशा विश्वप्रेमाचा संदेश दिला. याच भूमींत त्यांनी आपलें विशाल हृदय खुलें केलें, व अखिल जगाला प्रेमाने जवळ करण्यासाठी इथेंच त्यांनी आपले बाहु पसरले. केवळ हिंदूंनाच नव्हे, तर मुसलमानांनाहि त्यांनी जवळ केलें. आपल्या देशांतील अखेरचे व अत्यंत तेजस्वी असे वीर गुरु गोविंदसिंह हे याच भूमींत जन्मास आले. धर्मासाठी आपल्या प्रियतम अशा पुत्रांचें रक्त सांडल्यावर व ज्यांच्यासाठी हें रक्त सांडलें त्यांनी त्याग केल्यावर ते दक्षिणेंत गेले व मर्मी बाण लागलेल्या सिंहाप्रमाणे त्यांनी तिथे मरणाचें स्वागत केलें, परंतु आपल्या मायभूमीविरुद्ध एका शब्दानेंहि

त्यांनी कुरकुर केली नाही.

पंजाबच्या पुत्रांनो, या आपल्या प्राचीन भूमींत मी तुमच्यापुढे उभा आहें तो आचार्य या नात्याने नाहीं; कारण तुम्हांला शिकवण्या-सारखें फारच थोडें ज्ञान माझ्याजवळ आहे. मी पूर्वेकडून, भारताच्या या पश्चिम भागांतील बांधवांशीं हितगुज करण्यासाठी आलों आहें, आपलें मनोगत तुम्हांला सांगण्यास व तुमचें मनोगत समजून घेण्यास मी येथे आलों आहें. आपल्यामधे असलेले भेद पुढे मांडावेत हा माझा हेतु नसून आपलें कोणत्या बाबतींत एकमत आहे हें मला पाहावयाचें आहे. कोणत्या भूमिकेवर आपण सदैव बांधव या नात्याने राहूं शकूं व अनादि कालापासून दिला गेलेला संदेश कोणत्या आधारावर अधिकाधिक व्यापक व प्रभावी होऊं शकेल हें मला बघावयाचें आहे. मी आपणांस कांही विधायक गोष्टी सांगण्याचा प्रयत्न करणार आहें, विघातक गोष्टी नव्हे. टीका करण्याचे दिवस आता संपले असून आपण विधायक कार्याची प्रतीक्षा करीत आहोंत. जगाला कांही वेळां टीका हवी असते, कठोर टीकाहि हवी असते; पण ती कांही काळच. नेहमीसाठी म्हणून प्रगति व रचनात्मक कार्यें हींच जगाला हवीं असतात, टीका व विघातक कार्यें नव्हे. गेल्या शंभर वर्षांत या आपल्या भूमींत टीकेचा महापूरच वाहत आहे, येथील सर्व वैगुण्यांवर पाश्चात्त्य वैज्ञानिक जडवादाने मनसोक्त तोंडसुख घेतलें असून त्याचा परिणाम म्हणून आपल्या समाजांतील दोषच इतर गोष्टींपेक्षा अधिक ठळकपणें दिसूं लागले आहेत. आपल्या देशांत स्वाभाविकपणेंच सर्वत्र प्रभावी बुद्धिमत्तेचे वीर निर्माण झाले; ते तेजस्वी व थोर असून त्यांच्या ठायीं सत्य व न्याय यांविषयी प्रेम वसत होतें, देशप्रेम वसत होतें व या सर्वांपेक्षाहि आपला धर्म व ईश्वर यांच्या-विषयी उत्कट प्रेम त्यांच्या हृदयांत होतें. या महात्म्यांच्या ठायीं उत्कट प्रेम व कळकळ असल्याने त्यांना जें चूक वाटलें त्यावर त्यांनी टीका केली. हे प्राचीन महात्मे धन्य होत ! त्यांनी देशाचें पुष्कळच हित केलें; पण आज आपल्याला वर्तमानकाळाची हांक ऐकूं येत आहे. ती आपल्याला सांगत आहे की 'पुरे झाली ही टीका.' आजवर झाली ती टीका पुरे झाली, दोष दाखविणें आता पुरें झालें; आतां पुनर्रचनेची वेळ आलेली आहे; आपल्या इतस्ततः विखुरलेल्या शक्ति एकत्र करून, त्यांच्यांत

एकसूत्रीपणा आणून, कित्येक शतकें थांबून राहिलेलें राष्ट्रीय उत्थानाचें व प्रगतीचें कार्य आता आपल्याला साधावयाचें आहे. घर स्वच्छ करण्याचें काम आता झालें आहे; त्यांत आता पुन: नव्याने वास करूं या. मार्ग साफ झाला आहे; आर्यांच्या वंशजांनो, आता पुढे चला !

सज्जनहो, ह्याच हेतूने प्रेरित होऊन मी तुमच्यापुढे उभा आहें. आणि प्रारंभींच मला हें सांगावयाचें आहे की मी कोणत्याहि पक्षाचा वा संप्रदायाचा नाहीं. ते सर्वच मला थोर व गौरवास्पद वाटतात, मला ते आवडतात, आणि त्यांच्यांत काय सत्य व चांगलें आहे हें पाहण्याचा मी जीवनभर प्रयत्न करीत आलों आहें म्हणून आज माझा असा विचार आहे की आपलें ज्यावर एकमत आहे असे मुद्दे आपणांपुढे मांडावेत व शक्य तेवढ्या एकतेच्या भूमिका शोधून काढाव्यात; आणि ईशकृपेने तसें शक्य झालें तर ज्या तत्त्वांवर आपलें सर्वांचें एकमत आढळतें तीं सारीं तत्त्वें आपण प्रत्यक्षांत आणण्याचा प्रयत्न करूं या. आपण हिंदु आहोंत. 'हिंदु' हा शब्द मी कोणत्याहि वाईट अर्थाने योजीत नाहीं, किंवा त्याचा कांही वाईट अर्थ आहे असें जे म्हणतात त्यांच्याशीं मी सहमत नाहीं. पूर्वी या शब्दाचा अर्थ 'सिंधूपार राहणारे लोक' एवढाच होता. आपला द्वेष करणाऱ्या कांही लोकांनी या शब्दाला आज कुत्सित अर्थ चिकटविला असेलहि, पण नांवाचें कांही विशेष महत्त्व नाही. 'हिंदु' हें नांव सर्वांगीण वैभव व पूर्ण आध्यात्मिकता ह्यांचें प्रतीक राहावयाचें की कुचकामाच्या पददलित, धर्मभ्रष्ट लोकांना लावण्यांत येणारें तिरस्कारदर्शक नांव राहावयाचें हें आपल्यावरच अवलंबून आहे. आजच्या काळांत 'हिंदु' या शब्दाला वाईट अर्थ प्राप्त झाला असेल तर असो. पण बंधूंनो, या, आपण आपल्या कृतीने दाखवून देऊं या की कोणत्याहि भाषेंतील कोणत्याहि शब्दापेक्षा अधिक श्रेष्ठ असा हा शब्द आहे. आपल्या पूर्वजांची लाज वाटूं देऊं नये हें माझ्या जीवनाचें एक प्रधान सूत्र आहे. अत्यंत अभिमानी अशा व्यक्तींपैकी मी एक आहे, पण मी आपल्याला हें स्पष्टपणें सांगूं इच्छितों की हा अभिमान स्वत:विषयीचा नसून माझ्या पूर्वजांच्या गौरवाविषयीचा आहे. आपल्या प्राचीन इतिहासाचा मीं जेव्हा अधिकाधिक अभ्यास केला, मीं जेव्हा भूतकाळांत अधिकाधिक दृष्टि फिरवली तेव्हा ही गौरवाची भावना अधिकाधिक दृढ झाली व तिच्यामुळे मला

विश्वासाचें सामर्थ्य व निश्चयाचें बळ प्राप्त झालें, तिने मला जणुकांही धुळींतून वर उचललें व आपल्या थोर पूर्वजांनी निर्धारित केलेल्या योजना प्रत्यक्ष कृतींत आणण्याचा प्रयत्न करण्याची तिने मला प्रेरणा दिली. प्राचीन आर्यांच्या वंशजांनो, ईशकृपेने ही गौरवाची भावना तुमच्या ठायींहि निर्माण होवो, आपल्या पूर्वजांवरील श्रद्धा तुमच्या रक्तांत भिनून जावो, तुमच्या जीवनाचें ती एक अंगच बनून जावो व तिच्यामुळे तुमच्या द्वारें समस्त जगताचा उद्धार होवो !

आपलें सर्वांचें ज्या विशिष्ट बाबतींत एकमत आहे अशी भूमिका शोधण्यापूर्वी व आपल्या जातीच्या जीवनाचा सर्वसामान्य आधार पाहण्यापूर्वी एक गोष्ट लक्षांत घेणें आवश्यक आहे. ज्याप्रमाणे प्रत्येक माणसाचें विशिष्ट व्यक्तित्व असतें त्याचप्रमाणे प्रत्येक जातीचेंहि विशिष्ट असें व्यक्तित्व असतें. एक व्यक्ति दुसरीपासून गुणधर्माने वा अन्य वैशिष्टयाने वेगळी असते, त्याचप्रमाणे एक जाति दुसऱ्या जातीहून आपल्या अंगभूत गुणांनी वेगळी असते. एखादें उद्दिष्ट पूर्ण करणें हें जसें प्रत्येक व्यक्तीचें जीवितकार्य असतें, आपल्या पूर्वकर्मानुसार नियोजित झालेल्या मार्गाने ती व्यक्ति जशी हें कार्य करीत असते तसेंच जातींचेंहि आहे—प्रत्येक जाति ही पूर्वनियोजित अशा विशिष्ट मार्गावरून जात असते. दुसऱ्यास देण्यासाठी तिच्याजवळ विशिष्ट असा संदेश असतो व तिला विशिष्ट प्रकारचें कार्य पार पाडावयाचें असतें. म्हणून, आपल्या जातीचें जीवितकार्य कोणतें आहे, विधात्याने तिला कोणत्या कार्यासाठी नियुक्त केलें आहे, अन्य जातींच्या समवेत तिला कोणतें स्थान प्राप्त करावयाचें आहे व विभिन्न जातींच्या सुसंवादी संगीतांत तिला कोणता सूर मिळवावयाचा आहे हें आपण सुरवातीसच समजून घेणें अत्यंत आवश्यक आहे. आपल्या देशांत, बालपणीं आपण अशा गोष्टी ऐकतों की कांही सापांच्या मस्तकांत मणि असतात व जोंवर हा मणि सुरक्षित असतो तोंवर कांहीहि केलें तरी त्या सापाचा नाश होऊं शकत नाही. त्याचप्रमाणे आपण कांही राक्षसांच्याहि गोष्टी ऐकतों; या राक्षसांचें प्राण लहान-लहान पक्ष्यांत असतात व ते पक्षी जोंपर्यंत सुरक्षित असतात तोंपर्यंत त्या राक्षसांना कुणीहि ठार मारूं शकत नाही. त्यांचे तुकडे तुकडे केले किंवा त्यांचें हवें तें केलें तरी हे राक्षस मरत नाहीत. जातींचेंहि असेंच

आहे. प्रत्येक जातीचें जीवन हें एखाद्या विशिष्ट गोष्टींत केंद्रित झालेलें असतें. तिच्यांतच त्या जातीचें 'जातित्व' वसत असतें; तें जोंवर सुरक्षित असेल तोंवर ती जाति मरणें शक्य नाही. हें सत्य लक्षांत घेतल्यास इतिहासांतील सर्वांत अपूर्व अशी घटना आपण समजून घेऊं शकतों. रानटी आक्रमकांच्या लाटांमागून लाटा या आपल्या पावन भूमीवर कोसळल्या. "अल्ला हो अकबर"च्या गगनभेदी गर्जना या भूमींत शेकडो वर्षे घुमत राहिल्या, आणि कोणत्याहि हिंदु माणसाला आपल्या जीवनाची शाश्वती राहिली नव्हती. जगाच्या इतिहासांत प्रसिद्ध असलेल्या इतर कोणत्याहि देशापेक्षा आपल्या देशाने सर्वांत जास्त दुःख व परकीय शासनाचे अत्याचार सोसलेले आहेत. असें असूनहि आपली जाति जशी पूर्वी होती तशीच अस्तित्वांत आहे; आणि आपण पूर्वीप्रमाणेच ठामपणें उभे राहून, जरूर तर संकटांना तोंड देण्यास पुन्हा सिद्ध आहोंत. एवढेंच नव्हे तर अलीकडे अशींहि चिन्हें दिसत आहेत की, आपण केवळ सबल आहोंत एवढेंच नव्हे, तर आपण आपल्या देशाबाहेर जाण्यासहि सिद्ध आहोंत; कारण विस्तार हेंच जीवनाचें लक्षण आहे.

आज आपल्याला दिसून येत आहे की, आपले विचार भारतापुरतेच मर्यादित राहिलेले नसून, आपली इच्छा असो वा नसो, ते आपल्या देशाबाहेर जात आहेत, इतर देशांच्या वाङ्मयांत प्रविष्ट होत आहेत, देशांदेशांतून त्यांना विशिष्ट स्थान प्राप्त होत आहे, आणि कांही ठिकाणीं तर त्यांना असामान्य महत्त्व प्राप्त होत आहे. यांचें एकच सुस्पष्ट कारण देतां येईल. तें हें की धर्म व तत्त्वज्ञान हे मानवी मनाला आकर्षित करणाऱ्या सर्व विषयांहून अधिक श्रेष्ठ व उदात्त असे विषय आहेत आणि याच धर्माचें व तत्त्वज्ञानाचें दान करून भारताने जगाच्या एकंदर प्रगतीला हातभार लावला आहे. आपल्या पूर्वजांनी अन्य क्षेत्रांतहि खूप यत्न केले; आपल्याला हेंहि विदित आहे की, अन्य जातींप्रमाणे त्यांनी बाह्य सृष्टीचीं रहस्यें उकलण्याचा प्रयत्नहि केला होता, व आपल्या विशाल बुद्धीच्या जोरावर या श्रेष्ठ जातीने त्याहि क्षेत्रांत, जगाला अभिमान वाटावा असे चमत्कार करून दाखविलेहि असते. पण उच्चतर अशा ध्येयासाठी त्यांनी हा मार्ग सोडून दिला. वेदांच्या पानांपानांतून त्या उच्च ध्येयाचा प्रतिध्वनि उमटत आहे : "परा विद्या

तीच की जिच्यामुळे आपल्याला त्या अविनाशी पुरुषाचें ज्ञान होतें." सृष्टिविज्ञान--परिवर्तनशील, विनाशी, मर्त्य, दुःखमय व विकारयुक्त अशा जगताचें शास्त्र हें महत्त्वपूर्ण आहे हें खरें, पण अविकारी, आनंदमय, शांतस्वरूप, नित्य, पूर्ण, दुःखशून्य अशा पुरुषासंबंधीचें शास्त्र--अध्यात्मशास्त्र--हेंच आपल्या पूर्वजांच्या मतें सर्वश्रेष्ठ शास्त्र आहे. केवळ अन्नवस्त्र प्राप्त करून देणारीं, आपल्या बांधवांवर सत्ता प्राप्त करून देणारीं, आपल्याच बांधवांवर विजय प्राप्त करून त्यांच्यावर राज्य करण्याचें शिक्षण देणारीं व सबलांना दुर्बलांस दडपून टाकण्यास शिकविणारीं शास्त्रें--आपल्या पूर्वजांच्या मनांत असतें तर--ते निर्माण करूं शकले असते. पण ईश्वरकृपेनें त्यांना दुसरेंच वळण मिळालें. ह्या शास्त्रांपेक्षा अधिक उच्च, त्यांच्याहून अनंतपट अधिक उदात्त व आनंदमय अशा शास्त्राची -- धर्माची -- त्यांनीं कास धरली. आणि आपल्या जातीचें तो वैशिष्टयच बनला, हजारो वर्षें तो आपल्याकडे वाडवडिलांकडून परंपरेने चालत आला; आज तो आपल्या नसांनसांतून वाहत असून आपल्या जीवनाचें तो अविभाज्य अंगच बनला आहे, तो आपला स्वभावच झाला आहे, आणि 'हिंदु' व 'धर्म' हे शब्द आज समानार्थक होऊन बसले आहेत. धर्म हाच आपल्या जातीचें वैशिष्टय असून त्याला कोणीहि धक्का पोहोचवूं शकणार नाही. तरवारी व बंदुका यांनी सुसज्ज असलेल्या व रानटी धर्म बरोबर घेऊन आलेल्या रानटी लोकांपैकी कोणीहि आपल्या जातीच्या जीवनाच्या केंद्राला, आपल्या जातीच्या मस्तकांतील त्या 'मण्या'ला, आपल्या जातीचा प्राण ज्या ज्या पक्ष्यांत आहे त्या 'पक्ष्या'ला स्पर्श करूं शकला नाही. याप्रमाणे धर्म हाच आपल्या जातीची जीवनशक्ति आहे व तो जोंवर सुरक्षित आहे तोंवर जगांतील कोणतीहि शक्ति आपल्या जातीला नष्ट करूं शकत नाही. जोंवर परंपरेने आपल्याला प्राप्त झालेला आध्यात्मिकतेचा हा सर्वश्रेष्ठ ठेवा आपण सुरक्षित ठेवूं तोंवर सर्व प्रकारच्या हालअपेष्टा व दुःख हीं आपल्याला इजा न करतां विरून जातील, आणि आपण प्रल्हादाप्रमाणे या अग्निदिव्यांतून सुरक्षितपणें बाहेर पडूं. हिंदु माणूस हा जर अध्यात्मप्रवण नसेल तर मी त्याला हिंदु म्हणावयास तयार नाहीं. अन्य देशांत मनुष्य हा प्रथम राजकारणी

असेल, नंतर तो कदाचित् धार्मिक असेल, परंतु भारतामधे आपल्या जीवनाची इतिकर्तव्यता म्हणजे प्रथम धार्मिक असणें हीं होय आणि मग वेळ उरल्यास आपण इतर कांही केल्यास हरकत नाही. हें ध्यानीं घेतल्यावर, आपल्या जातीच्या हितासाठी आजहि आपल्या जातीच्या सर्व आध्यात्मिक शक्ति शोधून काढून त्या एकत्र करणें कां आवश्यक आहे हें नीटपणें ध्यानांत येईल, कारण पूर्वींच्या काळांत असेंच केलें गेलें होतें व भावी काळांतहि प्रत्येक वेळीं तेंच करावें लागेल. भारताचें राष्ट्रीय ऐक्य साधावयाचें झाल्यास या विखुरलेल्या आध्यात्मिक शक्तींचें एकत्रीकरण करावें लागेल. ज्यांच्या हृदयांत आध्यात्मिक विचारांचें एकाच प्रकारचें स्पंदन चालूं आहे अशांच्या ऐक्यांतूनच भारतीय राष्ट्र निर्माण होईल.

या देशांत कितीतरी संप्रदाय होऊन गेले आहेत. आजहि येथे पुष्कळ संप्रदाय आहेत आणि भावी काळांतहि पुष्कळ होतील; कारण आपल्या धर्माचें हें वैशिष्टयच आहे की त्याचीं मूलतत्त्वें अत्यंत उदार व व्यापक आहेत आणि नंतर बऱ्याच तपशिलाच्या गोष्टी निर्धारित झाल्या असल्या तरी त्या सर्व गोष्टी ज्या मूलतत्त्वांमधून विकसित झाल्या आहेत तीं मूलतत्त्वें आकाशाप्रमाणे व्यापक व प्रकृतीप्रमाणे नित्य स्वरूपाचीं आहेत. म्हणून स्वाभाविकपणें येथे अनेक संप्रदाय अस्तित्वांत राहणारच; पण म्हणून या विभिन्न संप्रदायांमधे कलह असण्याची कांही आवश्यकता नाही. संप्रदाय असलेच पाहिजेत, परंतु सांप्रदायिक संकुचितता नसावी. संकुचित सांप्रदायिकतेमुळे जगाची उन्नति होऊं शकणार नाही, पण संप्रदायांच्या अभावीं जग चालूंहि शकणार नाही. एकाच प्रकारचे लोक सर्व कार्यं करूं शकणार नाहीत. जगांतील अपार शक्तीचें संचालन थोडेसे लोक करूं शकणार नाहीत. येथे आपल्याला हें सहजपणें कळून येईल की श्रमविभाग आवश्यक असल्यामुळेच विभिन्न संप्रदायांमधे आपली विभागणी झाली. विभिन्न आध्यात्मिक शक्तींचें योग्यप्रकारें संचालन व्हावें म्हणून हे सर्व संप्रदाय अस्तित्वांत असूं द्या, पण, हे सर्व भेद अगदी वरपांगी आहेत व ते असले तरी त्या सर्वांमधे एकत्वाचें एक सुंदर सूत्र गुंफलेलें आहे असें आपले अतिप्राचीन ग्रंथ निसंःदिग्धपणें सांगत असतांना, हीं संप्रदायांमधील भांडणें कशाला हवींत ? आपल्या

अत्यंत प्राचीन ग्रंथांनी घोषणा केली आहे, "एकं सद्विप्रा बहुधा वदन्ति" --"सद्वस्तु एकच आहे, विद्वान् लोक तिला अनेक नांवें देत असतात." म्हणून ज्या भारतांत सर्व संप्रदायांना सदैव मान दिला जात असे त्या भारतांत जर सांप्रदायिक कलह असतील, विभिन्न संप्रदायांमधे भांडणें, द्वेष व मत्सर हीं जर नांदत असतील तर महिमाशाली पूर्वजांचे वंशज म्हणविणाऱ्या आम्हां भारतीयांच्या पक्षीं ही गोष्ट लज्जास्पद आहे.

मला वाटतें, अशीं कांही महान् तत्त्वें आहेत की ज्यांच्यावर आपला सर्वांचाच विश्वास आहे. आपण वैष्णव, शैव, शाक्त वा गाणपत्य असलों, आपण प्राचीन वा अर्वाचीन वैदान्तिक संप्रदायाचे अनुयायी असलों, आपण प्राचीन सनातनी संप्रदायाचे वा अर्वाचीन सुधारक संप्रदायांचे अनुयायी असलों तरी त्या तत्त्वांच्या बाबतींत आपलें सर्वांचेंच एकमत आहे. आणि जो स्वतःला हिंदु म्हणवितो त्याची या तत्त्वांवर श्रद्धा असते. या तत्त्वांचा अर्थ लावण्याच्या पद्धतींत अर्थातच भेद आहे, आणि तो राहणारच. असा भेद आपण मान्य केला पाहिजे, कारण आपलीच विचारपद्धति सर्वांनी स्वीकारावी हें आपल्याला सुसंगत वाटत नाही. या मूलतत्त्वांचा आपण जसा अर्थ करतों तसाच तो सर्वांनी करावा व आपल्याच पद्धतीनुसार सर्वांनी आचरण करावें अशी सक्ति करणें हें खरोखर पाप आहे. येथे उपस्थित असलेल्या सर्वांना बहुधा हें मान्य असेल की वेद हे धर्माच्या रहस्यांचा उपदेश करणारे सनातन ग्रंथ आहेत. आपलें सर्वांचें एकमत असलेला हा पहिला मुद्दा आहे. आपली सर्वांची अशी श्रद्धा आहे की हे पवित्र ग्रंथ अनादि व अनंत आहेत; सृष्टीला ज्याप्रमाणे आदि व अंत नाही त्याप्रमाणेच या ग्रंथांनाहि आदि व अंत नाही. या पवित्र ग्रंथांना शरण गेल्याने आपल्यांतील सर्व धार्मिक कलह व भेद नष्ट झालेच पाहिजेत; आपणां सर्वांचें असें मत आहे की आपल्या सर्व धार्मिक कलहांचें हेंच अंतिम न्यायमंदिर आहे. वेदग्रंथ काय आहेत याविषयी आपले दृष्टिकोन भिन्न असूं शकतील. एखादा संप्रदाय वेदांतील एका भागाहून दुसरा भाग अधिक पवित्र मानीत असेल, पण त्याला कांही विषेष महत्त्व नाही; कारण आपला सर्वांचा वेदांवर विश्वास असल्यामुळे आपण सर्वजण बांधव आहोंत आणि आज आपल्याजवळ जें कांही चांगलें, पावन व शुद्ध आहे तें आपल्याला याच

सनातन, पवित्र व अपूर्व ग्रंथांमधून प्राप्त झालेलें आहे. आता ह्यावर जर आपली सर्वांची श्रद्धा असेल तर प्रथम ही गोष्ट आपण आपल्या संपूर्ण देशभर सर्वांना उद्‌घोषित करून सांगूं या. ही गोष्ट जर सत्य असेल तर वेदांना नेहमीच जें महत्त्व मिळावयास हवें व वेदांचा ज्या महत्त्वावर आपला विश्वासहि आहे तें महत्त्व त्यांना आपण देऊं या. म्हणून आपल्या ऐक्याची पहिली भूमिका वेद ही होय.

दुसरा मुद्दा असा की आपला सर्वांचा ईश्वरावर विश्वास आहे. जो ईश्वर सर्व विश्वाचें सृजन व पालन करणारी शक्ति आहे, ज्या ईश्वरांत कालान्तराने विश्वाचा लय होतो व पुनः ज्यांतून हें अद्‌भुत विश्व प्रकट होतें त्या ईश्वरावर आपला सर्वांचा विश्वास आहे. ईश्वराच्या स्वरूपाविषयी आपली धारणा भिन्न भिन्न प्रकारची असूं शकेल. एखाद्याची संपूर्णपणें सगुण अशा ईश्वरावर श्रद्धा असेल, तर दुसऱ्याची सगुण पण मानवरूप नसलेल्या ईश्वरावर श्रद्धा असेल व तिसऱ्या एखाद्याची संपूर्णपणें निर्गुण अशा ईश्वरावर श्रद्धा असेल, आणि या सर्वांना वेदवचनांचा आधारहि मिळत असेल; पण तरीहि ईश्वरावर श्रद्धा मात्र आपणां सर्वांचीच आहे. याचा अर्थ असा की जिच्यांतून सर्वकांही उत्पन्न झालें आहे, जिच्यांत सर्वकांही अवस्थित आहे व अंतीं जिच्यांत सर्वकांही लीन होतें अशा एका अद्‌भुत अनंत शक्तीवर ज्या व्यक्तीचा विश्वास नाही तिला हिंदु म्हणतां येणार नाही. हें जर खरें असेल तर ह्या कल्पनेचाहि आपण आपल्या देशांत सर्वत्र प्रचार करूं या. ईश्वरासंबंधी जी कल्पना तुम्हांला योग्य वाटेल तिचा तुम्ही प्रचार करा, त्यामुळे कांही फरक होणार नाही, त्यावरून आपण भांडणार नाहीं. पण कसेंहि करून तुम्ही ईश्वराचा प्रचार करा. हेंच आपल्याला हवें आहे. ईश्वराविषयीची एखादी कल्पना दुसरीहून सरस असेल, पण लक्षांत ठेवा की त्यांच्यापैकी एकहि कल्पना वाईट नाही. एक चांगली, तर दुसरी अधिक चांगली, आणि तिसरी एखादी सर्वांत चांगली कल्पना असेल, पण 'वाईट' या शब्दाला आपल्या धर्माच्या शब्दकोशांत स्थान नाही म्हणून आपल्या कोणत्याहि कल्पनेप्रमाणे का होईना, जे ईश्वरनामाचा प्रचार करीत असतात ते खरोखरच धन्य होत! ईश्वरनामाचा जेवढा अधिक प्रचार होईल तेवढें आपल्या जातीचें कल्याण होईल.

ईश्वरनामाचें हें तत्त्व आपल्या मुलांना लहानपणापासून शिकवा, तें गरिबांतील गरिबांच्या घरीं, तसेंच श्रीमंतांतील श्रीमंतांच्या घरीं प्रविष्ट होऊं द्या.

आपणांपुढे मला जो तिसरा मुद्दा मांडावयाचा आहे तो हा.की, जगाची उत्पत्ति कांही हजार वर्षांपूर्वी झाली व एका विशिष्ट दिवशीं तें कायमचें नष्ट होणार आहे असें आपण जगांतील अन्य जातींप्रमाणे मानीत नाहीं. तसेंच जीवात्मा हा या जगाबरोबरच एका विशिष्ट वेळीं शून्यांतून निर्माण झाला हेंहि आपण मानीत नाहीं. मला वाटतें की आपणां सर्वांना मान्य होण्यासारखा हा आणखी एक मुद्दा आहे. आपण असें मानतों की सृष्टि ही अनादि व अनंत आहे, आणि कल्पाच्या अंतीं हें स्थूल जडद्रव्यात्मक विश्व आपल्या सूक्ष्म अवस्थेप्रत जातें, तें कांहीं काळ तसेंच राहतें व पुन्हा या सृष्टिनामक अनंत जगत्प्रपंचाच्या रूपानें तें प्रकट होतें. काळाच्या अस्तित्वापूर्वीहि ही तरंगाकार गति चालू होती, ती अनंत काळ चालू आहे व पुढेहि अनंत काळ चालू राहील.

तसेंच, सर्व हिंदूंचा असाहि विश्वास आहे की मनुष्य म्हणजे कांही जड शरीर नव्हे, त्याचप्रमाणे तो जड शरीराच्या आंतील मनादि सूक्ष्म शरीरहि नव्हे, तर तो या दोहोंपेक्षा अधिक श्रेष्ठ असें कांहीतरी आहे. कारण, शरीर व मन हीं दोन्हीं परिवर्तनशील आहेत. पण त्यांच्याहि पलीकडे आत्मा असून तोच मनुष्याचें खरें स्वरूप होय. हा आत्मा अनादि अनंत आहे; त्याला मृत्यु नाही. या 'आत्मा' शब्दाचा मी इंग्रजींत अनुवाद करणार नाहीं, कारण त्यासाठी कोणताहि इंग्रजी शब्द योज-त्यास तो चुकीचा ठरेल. त्याचप्रमाणे आणखी एका बाबतींत अन्य सर्व जातींच्या मतांहून आपलें मत भिन्न आहे. आपण असें मानतों की आत्मा हा देहामागून देह धारण करीत जातो; असें होतां होतां अशी अवस्था येते की त्याला शरीर धारण करणें आवश्यक वाटत नाही व तशी त्याला इच्छाहि उरत नाही; त्या वेळीं तो मुक्त होऊन जातो आणि मग त्याला पुन: जन्म घ्यावा लागत नाही. यालाच आपल्या शास्त्रांमधे 'संसरणवाद' वा 'पुनर्जन्मवाद' आणि 'आत्म्याचें नित्यत्व' म्हटलें आहे. आपला संप्रदाय कोणताहि असला तरी आपलें सर्वांचें एकमत व्हावें असा हा आणखी एक मुद्दा आहे. जीवात्मा व ईश्वर यांच्यांतील संबंधाविषयी आपल्यांत

मतभेद असूं शकतील, जीवात्मा हा ईश्वराहून नित्य भिन्न आहे असें एखाद्या संप्रदायाला वाटत असेल, दुसऱ्याला तो ईश्वररूपी अनंत अग्नीचा एक स्फुलिंग आहे असें वाटत असेल, तर तिसऱ्या एखाद्या संप्रदायाला तो अनंत ईश्वराशीं अभिन्न आहे असें वाटत असेल. जीवात्मा आणि ईश्वर यांच्यामधील संबंधाविषयीचा आपण कोणताहि शास्त्रार्थ घेतला तरी त्याने कांही विशेष फरक पडत नाही, कारण आपण सर्वचजण असें मानतों की आत्मा हा अनंत आहे. त्याला प्रारंभ नाही, आणि म्हणून त्याला अंतहि नाही; तो विविध देहांमधून भ्रमण करीत करीत अधिकाधिक विकसित होत जातो आणि अखेर मानवदेहांत त्याला पूर्णत्व प्राप्त होतें. या मुद्द्यावर आपलें सर्वांचें एकमत आहे.

ह्यानंतर अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण, सुंदर व सर्वोत्कृष्ट असा अध्यात्म-क्षेत्रांतील एक अपूर्व सिद्धान्त मी तुम्हांला सांगतों. आपणांपैकी ज्यांनी पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला असेल त्यांच्या हें ध्यानीं आलें असेल की पाश्चात्त्य विचार व पौर्वात्य विचार यांना पूर्णपणें पृथक् करणारा एक महत्त्वाचा मुद्दा आहे. तो मुद्दा म्हणजे, आपण शाक्त, सौर, वैष्णव, फार काय, बौद्ध वा जैनहि असलों तरी, आपण सर्वचजण असें मानतो की, आत्म हा मूलतः शुद्ध, पूर्ण, सर्वशक्तिमान् व आनंदमय आहे. भेद फक्त एवढाच की, द्वैतमतानुसार आत्म्याचा हा मूलभूत आनंदमय स्वभाव वाईट पूर्वकर्मांनी संकोच पावला आहे व ईशकृपेने तो पुनः विकास पावून पूर्णत्वास प्राप्त होईल, तर अद्वैत मतानुसार ही संकोचाची कल्पनादेखील कांहीशी सदोष आहे. आत्मा या शक्तींना वंचित झाला आहे असें केवळ अज्ञानरूप मायेमुळे आपल्याला वाटत असतें, पण वस्तुतः या सर्व शक्ति त्याचा ठायीं पूर्णांशाने वसत असतातच. द्वैत व अद्वैत मतांत हा भेद असला तरी आत्मा हा स्वभावतः पूर्ण आहे या मूळ सत्यावर आपला सर्वांचाच विश्वास आहे. आणि हाच पाश्चात्त्य व पौर्वात्य विचारांत कधीहि मेळ न साधूं देणारा मूलभूत फरक आहे. जें कांही चांगलें व महान् आहे तें शोधण्यासाठी पौर्वात्यलोक अंतर्मुख होतात. आपण पूजा करतों तेव्हा आपण डोळे मिटतों व ईश्वराला हृदयांत शोधण्याचा यत्न करतों. पाश्चात्त्य लोक आपल्या ईश्वराला बाहेर कोठेतरी शोधीत असतात. पाश्चात्त्यांचें धर्मग्रंथ 'inspired'

आहेत, म्हणजे ते श्वासाप्रमाणे बाहेरून आंत आलेले आहेत, म्हणजेच बाहेरच्या प्रेरणेमुळे त्यांची रचना झाली आहे, तर आपले धर्मग्रंथ हे 'expired' आहेत, म्हणजे ते निःश्वासाप्रमाणे--ईश्वराच्या निःश्वासाप्रमाणे--मंत्रद्रष्टया ऋषींच्या हृदयांतून बाहेर प्रकट झाले आहेत.

ही एक ध्यानीं घेण्याजोगी मोठी गोष्ट आहे. आणि माझ्या मित्रांनो, माझ्या बंधूंनो, भावी काळांत ज्यावर भर द्यावा लागणार आहे असा हा महत्त्वपूर्ण मुद्दा आहे. माझी ह्या गोष्टीबद्दल खात्री पटली आहे, व तुम्हांलाहि ही गोष्ट समजून घेण्याची मी विनंती करतों की स्वतःला अहोरात्र दीन, हीन व कुचकामाचा समजणाऱ्या व्यक्तीच्या हातून कांहीहि चांगलें व्हावयाचें नाही. मनुष्य जर स्वतःला दुःखी, हीन व कुचकामाचा समजत असेल तर तो कुचकामाचाच होऊन जाईल. 'मी आहें, माझ्या ठायीं शक्ति आहे' असें जर तुम्ही म्हणाल तर तुमच्या ठायीं शक्ति प्रकट होईल आणि 'मी नाहीं, मी कुणीच नाहीं' असा मंत्र जर तुम्ही जपत राहाल आणि अहोरात्र 'मी क्षुद्र व दुर्बल आहें' असें चिंतन करीत राहाल तर तुम्ही कुचकामाचे होऊन जाल. ही महत्त्वाची गोष्ट तुम्हीं लक्षांत ठेवणें आवश्यक आहे. आपण सर्वशक्तिमान ईश्वराचीं लेकरें आहोंत, आपण अनंत व दिव्य अशा अग्नीचे स्फुलिंग आहोंत, आपण दीनहीन कसें होऊं शकूं ? आपल्या ठायीं सर्व शक्ति आहे, आपण सर्वकांही करण्यास सिद्ध आहोंत, आपण सर्वकांही करूं शकतों, आणि आपण सर्वकांही केलेंच पाहिजे. हा आत्मविश्वास आपल्या पूर्वजांच्या ठायीं होता, ह्या आत्मविश्वासाच्या बळावरच ते सांस्कृतिक प्रगतींत सदैव अग्रसर राहिले; आणि जर आता पतन घडून आलें असेल, आपल्यांत जर दोष उत्पन्न झाले असतील, तर मी निश्चितपणें सांगतों की आपल्या देशांतील लोकांनी ज्या दिवशीं स्वतःवरील विश्वास गमावला त्याच दिवसापासून हें पतन सुरू झालें. आत्मश्रद्धा गमावणें म्हणजे ईश्वरावरील श्रद्धा गमावणें होय. तुमच्या द्वारें व तुमच्या ठायीं कार्यशील असलेल्या त्या अनंत मंगलमय ईश्वरावर तुमची श्रद्धा आहे काय? तो सर्वव्यापी, सर्वान्तर्यामी ईश्वर अणुरेणूंत, तुमच्या देह-मन-आत्म्यांत ओतप्रोत भरलेला आहे यावर जर तुमचा विश्वास असेल तर तुम्हीं निराश कसें होऊं शकाल ? मी कदाचित् लहानसा बुडबुडा असेन व

तुम्ही एखादी पर्वतप्राय लाट असाल, पण म्हणून काय झालें ? तो एकच अपार सागर तुमचा व माझा दोघांचाहि आधार आहे. जीवन, सामर्थ्य व आध्यात्मिकता यांच्या ह्या अनंत सागरावर जसा तुमचा अधिकार आहे तसाच माझाहि आहे. माझ्या जन्मापासूनच--माझ्या ठायीं जीवन आहे यावरूनच--दिसून येत आहे की मी त्या अनंत जीवनाशीं, त्या अनंत शक्तीशीं, त्या अनंत मंगलमयाशीं नित्यसंयुक्त आहें. तुम्ही पर्वताप्रमाणे मोठे असलां व मी अगदी लहान असलों तरीहि तुमच्याप्रमाणे मीहि त्या अनंत ईश्वराशीं नित्यसंयुक्त आहें. म्हणून बंधूंनो, आपल्या मुलांना हें जीवनदायी, महान् व उन्नत बनविणारें तत्त्व शिकवा, अगदी लहानपणापासून शिकवा. तुम्हीं त्यांना अद्वैतवादच शिकवावा असें नाही, त्यांना द्वैतवाद वा अन्य कोणताहि 'वाद' शिकवा, पण आपण हें पाहिलेंच आहे की आपल्या देशांत एकच सर्वसामान्य वाद वा मत आहे. आत्मा हा स्वभावत:च पूर्ण आहे या एका सिद्धान्तावर आपल्या सर्व संप्रदायांचा विश्वास आहे. आपले थोर तत्त्वज्ञ कपिल यांनी म्हटलें आहे कीं पावित्र्य हा जर आत्म्याचा स्वभाव नसेल तर त्याला तें नंतर केव्हाहि लाभणार नाही, कारण जें पूर्णत्व मूलतः नाहीच तें प्राप्त झालें तरीहि तें स्थायी असूं शकणार नाही. अपवित्रता हा जर मनुष्याचा स्वभाव असला तर तो पांच मिनिटें पवित्र झाला तरी त्याला सदैव अपवित्रच राहावें लागेल. एखादा क्षण येईल की जेव्हा हें वरवरचें पावित्र्य निघून जाईल व पूर्वीचें स्वभाविक अपावित्र्य पुन: प्रभावी होईल. म्हणूनच आपल्या सर्व दर्शनकारांनी म्हटलें आहे की आपण मूलत: पूर्ण व शुद्ध असे आहोंत, अपूर्ण व अपवित्र नाहीं. आणि ही गोष्ट आपण नेहमी लक्षांत ठेवली पाहिजे. आसन्नमरण असतांना आपल्या मनास, आपण केलेल्या थोर कृत्यांचें व उदात्त विचारांचें स्मरण करावयास सांगणाऱ्या त्या थोर ऋषीचें उदाहरण पाहा.* तो आपल्या मनाला दुर्बलतेचें व आपल्या चुकांचें स्मरण करावयास सांगतांना तुम्हांला आढळत नाही. माणसाच्या ठायीं दोष, दुर्बलता आदि असतात व असणारच, पण आपल्या खऱ्या स्वरूपाचें नेहमी स्मरण करा. दोष व दुर्बलता दूर करण्याचा हाच एकमेव उपाय होय.

* 'ॐ क्रतो स्मर कृतं स्मर क्रतो स्मर कृतं स्मर।'—ईशोपनिषद्, १७.

मीं आतापर्यंत सांगितलेल्या या कांही मुद्द्यांवर भारतांतील सर्व विभिन्न संप्रदायांचें एकमत आहे असें दिसतें, आणि कदाचित् या समान भूमिकेवर भावी काळांत उदारमतवादी व पुराणमतवादी, जुन्या व नव्या संप्रदायांचे लोक एकत्र येऊं शकतील. याहूनहि महत्त्वाची एक गोष्ट आपण नेहमी लक्षांत ठेवली पाहिजे. ही गोष्ट आपण वारंवार विसरतों असें मला मोठ्या खेदाने म्हणावें लागतें. ती गोष्ट हीच की आपल्या देशांत धर्माचा अर्थ प्रत्यक्षानुभूति हाच होय; दुसऱ्या कशालाहि आपल्या देशांत धर्म म्हणत नाहीत. अमुक मतावर विश्वास ठेवल्यानेच तुमचा निश्चित उद्धार होईल असें आपल्याला कोणी शिकवूं शकत नाही, कारण असल्या गोष्टींवर आपला विश्वास नाही. जसें तुमचें आचरण असेल तसे तुम्ही व्हाल. तुमचे प्रयत्न व ईशकृपा यांनीच तुम्ही आज जें कांही आहांत तें झालां आहांत. कांही विशिष्ट सिद्धान्तांवर वा तत्त्वांवर नुसती श्रद्धा ठेवण्याने कांहीहि होणार नाही. भारताच्या आध्यात्मिक गगनांत एकच प्रभावी शब्द घुमत आहे आणि तो म्हणजे 'अनुभूति' हा होय, आणि केवळ आपलींच शास्त्रें पुनःपुनः कंठरवाने सांगतात की "ईश्वराचें साक्षात् दर्शन करून घेतलें पाहिजे." हे शब्द अत्यंत धाडसाचे तर खरेच, पण त्यांतील एक अक्षरहि खोटें नाही, ते अगदी यथार्थ आहेत. धर्माचें नुसतें श्रवण कामाचें नाही, तर त्याची प्रत्यक्ष अनुभूति करून घेतली पाहिजे; एखाद्या पोपटाप्रमाणे कांही शब्द पाठ करून ते उच्चारणें म्हणजे कांही धर्म नव्हे. तसेंच कांही सिद्धान्तांना केवळ बौद्धिक मान्यता देणें म्हणजेहि धर्म नव्हे——त्यांत कांहीच अर्थ नाही. धर्म हा आपल्या आंत प्रविष्ट झाला पाहिजे. म्हणूनच ईश्वराच्या अस्तित्वाचें आपलें सर्वांत मोठें प्रमाण तर्कविचार हें नसून, प्राचीन लोकांनी व अर्वाचीन लोकांनीहि ईश्वराचा प्रत्यक्ष अनुभव घेतलेला आहे, हेंच होय. आत्म्याच्या अस्तित्वावर आपण विश्वास ठेवतों याचें कारण युक्तिवादाने तें अस्तित्व सिद्ध होतें हें नव्हे, तर आपल्या विश्वासाचें कारण हेंच की प्राचीन काळीं भारतांत हजारो व्यक्तींनी आत्मसाक्षात्कार करून घेतला, आजहि आत्मानुभूति करून घेतलेल्या अनेक व्यक्ति भारतांत आहेत व भावी काळांतहि अशा हजारो व्यक्ति होतील की ज्यांना आपल्या आत्म्याचें

दर्शन झालेलें असेल. आणि जोंवर मनुष्य ईश्वराचें प्रत्यक्ष दर्शन प्राप्त करून घेत नाही, जोंवर त्याला आत्मसाक्षात्कार होत नाही तोंवर त्याला मोक्ष प्राप्त होऊं शकत नाही. म्हणून सर्वप्रथम आपण हीच गोष्ट समजूत घेऊं या, व आपण ती जितकी अधिक समजून घेऊं तितक्या प्रमाणांत भारतांतील संकुचित सांप्रदायिकता कमी होईल. कारण ज्याला ईश्वराचें दर्शन व प्रत्यक्ष अनुभूति प्राप्त झाली तोच धार्मिक होय.

"भिद्यते हृदयग्रंथिश्छिद्यन्ते सर्वसंशयः ।
क्षीयन्ते चास्य कर्माणि तस्मिन् दृष्टे परावरे ॥"

--"जो आपल्या अत्यंत निकट असूनहि अत्यंत दूर आहे त्या आत्म्याचें ज्याला दर्शन झालें त्याच्याच हृदयांतील गाठी उकलल्या आहेत, त्याचेच सर्व संशय दूर झाले आहेत, तोच कर्मफलांतून मुक्त झाला आहे." हाय ! पुष्कळदा आपण केवळ वाग्जालासच धर्म समजतों, पांडित्यपूर्ण वक्तृत्वालाच 'आध्यात्मिक अनुभूति' हें नांव देतों, आणि मग सांप्रदायिकता येते, कलह निर्माण होतात. प्रत्यक्षानुभूति हाच धर्म आहे हें एकदा आपल्याला कळलें की मग आपण आत्मनिरीक्षण करूं लागून आध्यात्मिक सत्यांच्या अनुभूतीच्या दिशेने आपली किती प्रगति झाली आहे हें पाहूं लागूं. तेव्हाच आपल्याला हें उमजेल की आपण अंधारांत चाचपडत होतों व इतरांनाहि तशाच अंधारांत चाचपडाव्रयास लावीत होतों. तेव्हाच संकुचित सांप्रदायिकतेपासून आपला बचाव होईल व आपल्यांतील कलह, भांडणें आदि थांबतील. सांप्रदायिक कलह सुरू करूं पाहणाऱ्या मनुष्याला विचारा, "तुला ईश्वराचा अनुभव आला आहे काय ? तूं आत्मा पाहिला आहेस काय ? तसें नसेल, तर त्याच्या नांवाचा प्रचार करण्याचा तुला काय अधिकार आहे ? तूं स्वतः अंधारांत भटकत आहेस व मलाहि त्याच अंधारांत ढकलण्याचा तूं प्रयत्न करीत आहेस--आंधळा आंधळ्याला मार्गदर्शन करणार व दोघेहि खड्डयांत पडणार, असेंच ना ?"

म्हणून दुसऱ्याचे दोष शोधण्यापूर्वी थोडा विचार करा. सर्वांनाच आपापल्या मार्गाने प्रत्यक्षानुभूति प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न करूं द्या, सगळ्यांनाच स्वतःच्या हृदयांत सत्याचा साक्षात्कार करून घेण्याचा प्रयत्न करूं द्या. आणि जेव्हा त्यांना सर्वव्यापक सत्याचें अत्यंत स्पष्ट असें दर्शन होईल तेव्हा त्यांना अपूर्व आनंदाचा लाभ होईल.

भारतांतील सर्व ऋषींना--ज्यांनी ज्यांनी त्या सत्याचा साक्षात्कार करून घेतला त्या सर्वांना ज्या अपूर्व आनंदाचा प्रत्यय आला तोच आनंद त्यांनाहि लाभेल. मग त्यांच्या तोंडून केवळ प्रेममय शब्दच बाहेर पडतील, कारण त्या प्रेमस्वरूप ईश्वराचा त्यांच्या हृदयाला स्पर्श झालेला असेल. तेव्हाच, केवळ तेव्हाच सर्व सांप्रदायिक कलह संपुष्टांत येतील व मग आपण 'हिंदु' हा शब्द आणि स्वतःला हिंदु म्हणवणारी प्रत्येक व्यक्ति यांना समजून घेण्यास, त्यांना आपल्या हृदयांत स्थान देण्यास, त्यांच्यावर उत्कट प्रेम करण्यास व त्यांना आलिंगन देण्यास समर्थ होऊं. माझे शब्द लक्षांत ठेवा की, जेव्हा 'हिंदु' हें नांव ऐकतांच तुमच्यांत शक्तीचा विजेसारखा संचार होईल तेव्हाच तुम्ही खरे हिंदु आहांत असें म्हणतां येईल. तुमची वा अन्य कोणतीहि भाषा बोलणारा व कोणत्याहि देशांत राहणारा असा कोणताहि हिंदु माणूस जेव्हा तुम्हांला अतिशय जवळचा व प्रिय वाटूं लागेल तेव्हाच तुम्ही खरे हिंदु आहांत असें म्हणतां येईल. जेव्हा 'हिंदु' हें नांव धारण करणाऱ्या कोणाहि व्यक्तीचें दुःख पाहून तुमचें हृदय व्यथित होईल व तुमच्याच मुलाचें दुःख पाहून तुम्हांला जसा कळवळा येतो तसाच तुम्हांला प्रत्येक हिंदू-विषयी वाटूं लागेल तेव्हाच तुम्ही खरे हिंदु आहांत असें म्हणतां येईल. हृचा व्याख्यानाच्या प्रारंभीं उल्लेखिलेल्या तुमच्या थोर गुरु गोविंद-सिंहांप्रमाणे हिंदु लोकांसाठी सर्व प्रकारच्या आपत्ति सहन करण्यास जेव्हा तुम्ही तयार व्हाल तेव्हाच तुम्ही खरे हिंदु आहांत असें म्हणतां येईल. गुरु गोविंदसिंहांना या त्यांच्या प्रांतांतून बाहेर घालवून देण्यांत आलें; त्यांनी आपल्या धर्माच्या रक्षणार्थ आक्रमकांविरुद्ध लढण्यांत स्वतःचें रक्त सांडलें होतें; त्यांचे पुत्र त्यांच्यासमोर रणांगणावर मारले गेले होते; पण ज्यांच्यासाठी त्यांनी स्वतःचें व आपल्या प्रिय पुत्रांचें रक्त सांडलें त्यांनीच त्यांचा त्याग केला आणि मग हा जखमी सिंह आपल्या कार्यक्षेत्रांतून बाहेर पडला व शांतपणें दक्षिणेंत येऊन त्यांनी आपला देह ठेवला. पण कृतघ्नपणें ज्यांनी त्यांचा त्याग केला त्यांच्याबद्दल निंदेचा एक शब्दहि त्यांनी काढला नाही! हें त्या थोर गुरूंचें उदाहरण पाहा! मी सांगतों तें लक्षांत ठेवा की, आपल्या देशाचें तुम्हांला कांही भलें करावयाचें असेल तर तुमच्यापैकी प्रत्येकाला

गोविंदसिंह झालें पाहिजे. आपल्या देशबांधवांत तुम्हांला हजारो दोष दिसत असतीलहि, पण त्यांचें हिंदु रक्त ध्यानीं घ्या. त्यांनी तुमचें सर्वप्रकारें अनिष्ट करण्याचा प्रयत्न केला तरी प्रथम त्यांची ईश्वर म्हणून तुम्ही पूजा करा; त्यांच्यापैकी प्रत्येकाने तुम्हांला शिव्याशाप दिले तरी तुम्ही त्यांच्याशीं प्रेमानेच बोला. त्यांनी तुम्हांला बाहेर काढून दिलें तरी त्या नरसकेरी गुरु गोविंदसिंहाप्रमाणे कार्यक्षेत्रांतून बाहेर पडून शांतपणें मृत्यूची प्रतीक्षा करा. असाच मनुष्य 'हिंदु' या नांवास पात्र आहे; असा आदर्श आपल्यापुढे सदैव असावयास हवा. आपले सर्व भेद व कलह यांना आपण मूठमाती देऊं या आणि प्रेमाचा हा महान् प्रवाह आपण सर्वत्र पसरवूं या.

भारताच्या पुनरुज्जीवनाविषयी लोकांना हवें तें बोलूं द्या. मी आयुष्यभर काम करीत आलों आहें, निदान काम करण्याचा प्रयत्न करीत आलों आहें; माझें आपणांस हेंच सांगणें आहे कीं आपण सर्वजण आध्यात्मिक वृत्तीचे झाल्याशिवाय भारताचें पुररुज्जीवन होणार नाही. एवढेंच नव्हे, तर यावर सर्व जगाचेंच हित अवलंबून आहे. मी आपणांस स्पष्टपणें सांगतों की पाश्चात्त्य सभ्यतेचा पायाच डळमळीत झाला आहे. मोठमोठ्या इमारती जर वाळूसारख्या भौतिकतेच्या कच्च्या पायावर उभारल्या गेल्या तर कधी ना कधी त्या कोसळून नष्ट होणारच. जगाचा इतिहास याची साक्ष देईल. राष्ट्रामागून राष्ट्रें उदयास आलीं, त्यांनी आपली महत्ता जडवादावर आधारली, मनुष्यालाहि त्यांनी जडद्रव्य मानलें. पाश्चात्त्यांच्या भाषेंत मृत्यूविषयी म्हणतात की माणसाने आपला आत्मा टाकून दिला (man gave up the ghost), पण आपल्या भाषेंत आपण म्हणतों की माणसाने देहाचा त्याग केला. पाश्चात्त्य लोक माणसाला प्रथम देह समजतात व त्याला आत्माहि असतो असेंहि म्हणतात. याउलट आपल्या दृष्टीने मनुष्य हा प्रथम आत्मा असून त्याला शरीरहि असतें. या दोन कल्पनांमध्ये दोन ध्रुवांइतकें अंतर आहे. म्हणून ज्या सर्व सभ्यता भौतिक ऐषआराम इत्यादींच्या वाळूसारख्या ठिसूळ पायावर आधारलेल्या होत्या त्या अल्पकाळ जिवंत राहिल्यानंतर एकामागून एक नष्ट झाल्या; पण भारताची सभ्यता, व भारताच्या पायाशीं बसून ज्यांनी शिक्षण प्राप्त करून घेतलें अशा चीन व जपान येथील सभ्यता

आजहि जिवंत असून ह्या देशांमधे पुनरुज्जीवनाचीं चिन्हेंहि दिसत आहेत. त्यांचीं जीवनें 'फोनिक्स' पक्ष्यांप्रमाणे, हजारो वेळां विनाशाप्रत जाऊनहि, पुनश्च अधिक तेजस्वीपणें प्रकट होतात. पण जडवादावर उभारलेली सभ्यता एकदा नष्ट झालीं की पुनः वर उठूं शकत नाही; ती इमारत एकदा कोसळून तिच्या ठिकऱ्या उडाल्यानंतर ती कायमचीच जमीनदोस्त होऊन जाते. म्हणून शांतपणें प्रतीक्षा करा. उज्ज्वल भविष्यकाळ आपली वाट पाहत आहे.

कोणतेंहि काम घाईने करूं नका. अन्य कोणाचेंहि अनुकरण करूं नका. हा आणखी एक नियम आपण लक्षांत घेतला पाहिजे की अनुकरण म्हणजे सभ्यता नव्हे. मी राजाच्या पोशाखांत हिंडूं शकेन, पण म्हणून मी काय राजा होऊं शकेन ? सिंहाचें कातडें पांघरलेलें गाढव कधीहि सिंह होऊं शकणार नाही. अनुकरणानें--भिऊन केलेल्या अनुकरणानें--कधीच प्रगति होऊं शकणार नाही. मनुष्याच्या पतनाचें तें एक भयानक लक्षण आहे. मनुष्य स्वतःचाच द्वेष करूं लागला की समजावें की त्याच्यावर अंतिम आघात झाला आहे. आपल्या पूर्वजांची लाज आपल्याला वाटूं लागली की समजावें की विनाश समीप आला आहे. मी एक क्षुल्लक हिंदु आहें, आणि तरीहि मला हिंदु जातीचा मोठा गौरव वाटतो, माझ्या पूर्वजांचाहि मला मोठा अभिमान वाटतो. हिंदु म्हणविण्यांत मला मोठा गौरव वाटतो, तसेंच तुम्हां हिंदूंचा मी एक सामान्य सेवक आहें याचाहि मला गौरव वाटतो. तुम्ही ऋषींचे वंशज आहांत, त्या थोर पूर्वजांचे तुम्ही वंशज आहांत; तुमचा देशबांधव म्हणविण्यांतहि मला मोठा अभिमान वाटतो. म्हणून स्वतःवर श्रद्धा ठेवा, आपल्या पूर्वजांचा अभिमान बाळगा, त्यांत लाज वाटावी असें कांहीहि नाही. आणि अनुकरण करूं नका, कुणाचेंहि अनुकरण करूं नका ! जेव्हा तुम्ही दुसऱ्याच्या प्रभावाखाली असतां तेव्हा तुम्ही आपलें स्वातंत्र्य गमावतां. इतरांच्या आदेशानुसार जर तुम्ही कार्य कराल, आध्यात्मिक बाबतींत देखील जर तुम्ही इतरांच्या आदेशानुसार कार्य कराल तर तुमच्या सर्व शक्ति, फार काय तर तुमची विचार-शक्तिहि हळूहळू लोप पावूं लागेल. तुमच्या आंत जें कांही आहे तें स्वतःच्या परिश्रमाने प्रकट करा, पण अनुकरण करूं नका. अर्थात्, इतरांचें जें चांगलें असेल तें अवश्य घ्या. आपल्याला इतरांपासून शिकलें

हें पाहिजेच. तुम्ही जमिनींत बी पेरतां; त्याला हवा, पाणी, खतमाती आदि देऊन त्याची जोपासना करतां; पण जेव्हा त्याचें पुढे रोप व नंतर विशाल वृक्ष होतो तेव्हा तो काय हवा बनतो की माती बनतो की पाणी बनतो ? नाही, तो हवा, पाणी, माती यांमधून सार भाग आत्मसात् करून स्वतःच्या प्रकृतिधर्मानुसार एक विशाल वृक्ष बनतो. तुमचेंहि धोरण असेंच असलें पाहिजे. खरोखर इतरांपासून आपण शिकाव्यात अशा पुष्कळ गोष्टी आहेत; जो दुसऱ्याकडून शिकण्याचें नाकारतो तो खरोखर मेल्याप्रमाणेच होय. आपले महर्षि मनु म्हणतात—"श्रद्धधानः शुभां विद्यामाददीतावरादपि। अन्त्यादपि परं धर्मं स्त्रीरत्नं दुष्कुलादपि ॥" —"चांगल्या रत्नाप्रमाणे असलेल्या स्त्रीचें कुल हीन प्रतीचें असलें तरी तिचा स्वीकार करावा; तसेंच सेवेच्या द्वारें शूद्राकडूनहि श्रेष्ठ ज्ञान प्राप्त करावें; चांडाळाचीहि सेवा करून त्याच्याकडून मोक्षाचा मार्ग शिकून घ्यावा." दुसऱ्याजवळ चांगली म्हणून असलेली प्रत्येक गोष्ट शिकावी. परंतु ती आपल्या पद्धतीने ग्रहण करून आत्मसात् करून घ्यावी, आपण आपलें स्वातंत्र्य गमावून दुसऱ्याप्रमाणे होऊं नये. भारतीय जीवनपद्धतीच्या बाहेर जाऊं नका; अन्य समाजाप्रमाणे सर्व भारतीयांनी पोशाख केला, अन्न घेतलें व त्यांच्या चालीरीती उचलल्या म्हणजे कल्याण होईल असा विचार क्षणभरदेखील मनांत आणूं नका. कांही वर्षांची सवय मोडणें किती कठीण असतें हें तुम्ही जाणतां. किती सहस्र वर्षांचे संस्कार आपल्या रक्तांत आहेत देव जाणे; आपल्या राष्ट्राचा हा वैशिष्टयपूर्ण जीवनप्रवाह एका विशिष्ट वळणाने किती सहस्र वर्षे वाहत आहे देव जाणे ! आणि तुम्हांला असें वाटते काय की हा प्रचंड व सागरासमीप आलेला प्रवाह पुन्हा हिमालयाच्या बर्फमय शिखरावर जाऊं शकेल ? हें केवळ अशक्य आहे ! तसा प्रयत्न केल्याने हा प्रवाह नाहीसा होऊन जाईल. म्हणून या राष्ट्राच्या जीवनप्रवाहाचा मार्ग मोकळा करा. या ओघवती नदीच्या प्रवाहाला अडविणारे अडथळे दूर करा, तिचा मार्ग मोकळा करा, तिचें पात्र स्वच्छ करा आणि मग तुम्हांला दिसेल की ही नदी आपल्या स्वाभाविक गतीने कशी पुढे पुढे जात आहे. अशा रीतीने आपल्या राष्ट्राच्या जीवनप्रवाहाचा मार्ग मोकळा झाला की मग आपलें राष्ट्र सतत कार्यशील राहून अधिकाधिक प्रगत होत जाईल.

भारतांत आध्यात्मिक कार्य करण्याच्या दृष्टीने मी आपणांस वरील उपाय सुचविले आहेत. दुसऱ्याहि अनेक महत्त्वाच्या समस्या आहेत, पण मी त्या आज वेळेच्या अभावीं आपणांपुढे मांडूं शकत नाहीं. उदाहरणार्थ, जातिभेदासंबंधीची जटिल समस्या. मी माझ्या आयुष्यभर या समस्येचा सर्व बाजूंनी विचार करीत आलों आहें; भारताच्या जवळ-जवळ सर्व प्रांतांत या समस्येचें काय स्वरूप आहे तें मीं पाहिलें आहे. ह्या देशाच्या प्रत्येक भागांतील सर्व जातींच्या लोकांमधे मी मिसळलों आहें. ह्या जातिसंस्थेच्या उद्दिष्टाचा व तिच्या महत्त्वाचा मी जितका अधिक खोल अभ्यास करतों तितका मी अधिक दिङ्मूढ होऊन जातों. पण अखेर आता मला थोडा प्रकाश दिसूं लागला आहे, आणि या जाति-संस्थेचें उद्दिष्ट व महत्त्व मला कळूं लागलें आहे. तसेंच आपल्या देशांत खाद्याखाद्यासंबंधीची समस्या आहे. ती खरोखर एक मोठी समस्या आहे. खाद्याखाद्यविचार हा आपल्याला जेवढा अनावश्यक वाटतो तेंवढा तो नाही. मी ह्या निर्णयाप्रत येऊन पोहोचलों आहें की, आपण खाद्य-पेयादींसंबंधी आज ज्या प्रकारचा कांटेकोरपणा पाळतों तो मोठा विलक्षण असून तो शास्त्रसंमत नाही, इतकेंच नव्हे, तर तो शास्त्रविरोधी आहे; याचा अर्थ असा की खाद्यपेयांच्या शुद्धतेचे योग्य नियम न पाळल्यामुळे आपल्याला दुःख भोगावें लागत आहे; या नियमांमागील हेतु आपण विसरून गेलों आहोंत.

अन्यहि अनेक समस्या आपणांपुढे मांडून त्यांची उकल कशी करावी हें मला सांगावयाचें होतें; तसेंच त्यांसंबंधी सुचलेले विचार कार्यान्वित कसे करावयाचे हेंहि मला सांगावयाचें होतें. पण ही सभा बऱ्याच उशीरा सुरू झाली, व तुम्हांला फार वेळ थांबवून घ्यावें अशी माझी इच्छा नाही. म्हणून जातीसंबंधीच्या व तत्सम समस्यांविषयी, मी पुन्हा एखाद्या प्रसंगीं सांगेन.

आता आणखी एक मुद्दा आपणांपुढे मांडून आध्यात्मिक तत्त्वां-विषयीचें हें माझें वक्तव्य मी संपवीन. भारतांत, गेलीं कित्येक वर्षें, धर्म ही बाब निश्चलशी होऊन गेली आहे. आपल्याला ती क्रियाशील करावयाची आहे. धर्म हा प्रत्येकाच्या जीवनांत उतरावा असा प्रयत्न मला करावयाचा आहे. प्राचीन कालाप्रमाणे या देशांत धर्म हा राज-

प्रासादांपासून तों अत्यंत गरीब अशा श्रमिकांच्या झोपड्यांपर्यंत सर्वत्र प्रविष्ट झाला पाहिजे. धर्म हा आपल्या जातीचा समान असा वारसा असून आपल्या जातीचा तो जन्मसिद्ध हक्क आहे, तो प्रत्येकाच्या दाराशीं मुक्तपणें पोहोचविला पाहिजे. भारतांत धर्म ही गोष्ट वायूप्रमाणे प्रत्येकास मुक्तपणें व सुलभतेने उपलब्ध असली पाहिजे. भारतांत आपल्याला हेंच कार्य करावयाचें आहे; पण संकुचित स्वरूपाचे संप्रदाय स्थापून व क्षुल्लक मतभेदांच्या मुद्द्यांवरून भांडून तें कार्य साध्य होणार नाही. ज्या मुद्द्यांवर आपलें सर्वांचें एकमत आहे त्याच मुद्द्यांचा आपण प्रचार करूं या, आणि मग मतभेदांवरून होणारे कलह आपोआप थांबतील. मी भारतीयांना वारंवार हेंच सांगतों की एखाद्या खोलींत शेकडो वर्षांपासून अंधार असेल तर तेथे जाऊन केवळ 'अंधार! अंधार!' असें ओरडत बसण्यांत काय अर्थ आहे? त्यामुळे अंधार नाहीसा होईल काय? आंत प्रकाश आणा की अंधार तत्क्षणीं नाहीसा होईल. लोकांना सुधारण्याचें हेंच रहस्य आहे--त्यांच्यापुढे अधिक उच्च कल्पना मांडा; प्रथम मनुष्यावर विश्वास ठेवा. मनुष्य हा पतित व अधोगत आहे असें सुरवातीला कां समजावें? अत्यंत वाईट अशा माणसावरहि विश्वास ठेवून माझें कार्य कधी असफल झालें नाही. जेथे म्हणून मी मनुष्यावर विश्वास ठेवला तेथे प्रथमतः जरी नेहमीच आशादायक परिस्थिति आढळली नसली, तरी अखेर यशच पदरीं आलें. मनुष्यावर विश्वास ठेवा, मग तो तुम्हांला पंडित वाटो वा अगदी अज्ञानी वाटो. मनुष्यावर विश्वास ठेवा, मग तो तुम्हांला देवदूत वाटो वा प्रत्यक्ष सैतान वाटो. प्रथम मनुष्यावर विश्वास असूं द्या आणि मनुष्यावर विश्वास ठेवल्यावर मग असाहि विश्वास असूं द्या की त्याच्या ठिकाणीं जरी दोष असतील, तो जरीं प्रमादशील असेल, ग्राम्य व अत्यंत निकृष्ट मतांना तो जरी कवटाळून बसत असेल तरीहि हा त्याचा खरा स्वभाव नव्हे, उच्चतर विचारांच्या व ध्येयांच्या अभावींच तो तसें करीत असला पाहिजे. मनुष्य चुकीच्या मार्गाने जात असेल तर त्याचें कारण हेंच की त्याला सत्याचा मार्ग सापडलेला नसतो. म्हणून असत्य गोष्टी दूर करण्याचा एकमेव उपाय म्हणजे त्या व्यक्तीला जें सत्य असेल तें द्या. तुम्ही त्याला सत्य दिलें म्हणजे त्याच्याजवळ जें आधी होतें त्याच्याशीं

तो या सत्याची तुलना करून पाहील. त्याला सत्याचें दर्शन घडविलें की तुमचें काम झालें. त्याच्यापाशी आधी असलेल्या गोष्टींशीं तुम्ही शिकविलेल्या सत्याची त्यालाच तुलना करून पाहूं द्या, आणि मी निश्चयपूर्वक सांगतों की, तुम्ही जर त्याला खरोखर सत्याचें यथार्थ दर्शन घडविलें असेल तर असत्य नाहीसें झालेंच पाहिजे. प्रकाशाच्या आगमनानें अंधार गेलाच पाहिजे. आणि त्याला सत्याचा लाभ झाला म्हणजे त्याच्या ठिकाणीं जें चांगलें आहे तें प्रकट होईलच. आध्यात्मिकदृष्टया देशाची सुधारणा करण्याचा हाच उपाय आहे. यानेच सुधारणा होईल, भांडत बसल्याने किंवा 'तुम्ही जें करीत आहांत तें वाईट आहे' असें लोकांना सांगत बसल्याने कांहीच सुधारणा होणार नाही. त्यांच्यासमोर चांगल्या गोष्टी ठेवा, आणि किती उत्सुकतेने लोक त्यांचा स्वीकार करतात तें पाहा. मानवांत असलेला अमर असा दैवी अंश जागृत होऊन जें म्हणून चांगलें व महान् आहे तें ग्रहण करण्यासाठी नेहमीच आपले हात पुढे करीत असतो असें तुम्हांला दिसून येईल.

आपल्या जातीचा तो पिता, पालनकर्ता व रक्षणकर्ता,--ज्याला विष्णु, शिव, शक्ति वा गणपति इत्यादि नांवें दिलीं जातात तो आपल्या पूर्वजांचा ईश्वर,--ज्याची सगुण वा निर्गुण रूपांत उपासना होत असते, जो व्यक्त वा अव्यक्त स्वरूपांत पूजिला जात असतो तो परमेश्वर,--ज्याला आपल्या पूर्वजांनीं जाणलें व 'एकं सत् विप्रा बहुधा वदन्ति' --"सद्‌वस्तु एकच असून ऋषि तिला भिन्न भिन्न नांवें देत असतात" अशा शब्दांनी ज्याला त्यांनी संबोधिलें तो परमात्मा आपल्या अपार प्रेमासह आपल्या सर्वांच्या हृदयांत प्रवेश करो, आपल्यावर असीम करुणेचा वर्षाव करो, परस्परांचे विचार समजून घेण्याची आपल्याला सद्‌बुद्धि देवो, परस्पर प्रीतियुक्त सहकार्याची आपल्याला प्रेरणा देवो, आपली सत्यप्रीति शतगुणित करो, आणि भारताच्या आध्यात्मिक पुनरुज्जीवनाच्या या महान् कार्यांत व्यक्तिगत कीर्ति, व्यक्तिगत प्रतिष्ठा आणि व्यक्तिगत लाभ यांविषयीची आपली अभिलाषा मुळीच न शिरो.

# भक्ति

( ९ नोव्हेंबर १८९७ रोजीं लाहोर येथे दिलेलें व्याख्यान )

उपनिषदांच्या गंभीर गर्जना घुमत असतांना त्यांमधून एक दुरून येतोसा वाटणारा अस्फुट ध्वनि आपल्याला ऐकूं येत असतो; कांही वेळां त्याचा सूर वाढतो व तो स्पष्टहि ऐकूं येतो, पण तरीहि सर्व वेदान्त-वाङमयांत हा ध्वनि स्पष्ट वाटला तरी तो फारसा प्रभावी वाटत नाही. आपल्यापुढे त्या सर्वव्यापक आत्म्याचें तत्त्व व त्याचे विविध पैलू मांडणें हें उपनिषदांचें प्रमुख कार्य आहे असें वाटतें; तरीसुद्धा या अद्‌भुत आणि उदात्त आत्म्याच्या वर्णनाबरोबरच उत्कृष्ट काव्याचे नमुनेहि उपनिषदांमधे इतस्तत: आढळतात. उदाहरणार्थ, "न तत्र सूर्यो भाति न चन्द्रतारकं नेमा विद्युतो भान्ति कुतोऽयमग्नि: "—"तेथे सूर्य तळपत नाही, चंद्रहि प्रकाशत नाही, तारे वा वीजहि चमकत नाही, मग या सामान्य अग्नीविषयी काय बोलावें ?" हृदयाला हलविणाऱ्या ह्या उत्कृष्ट काव्यपंक्ति जेव्हा आपण ऐकतों तेव्हा आपल्याला वाटूं लागतें की आपण इंद्रियविश्वापासून दूर कोठेतरी नेलें जात आहोंत, बुद्धीच्याहि मर्यादा ओलांडून आपण पलीकडे गेलों आहोंत, व कोठल्यातरी अशा राज्यांत आपण प्रवेश केला आहे की जें आपल्या ज्ञानाचा विषय कधीहि होऊं शकत नाही आणि तरीहि जें सर्वदा आपल्याजवळच असतें. या उदात्त आदर्शाच्या बरोबरच त्याच्या सावलीप्रमाणे असलेला आणखी एक आदर्श आहे, आणि तो म्हणजे भक्तीचा आदर्श होय. तो मानवांना अधिक पटणारा व अधिक व्यवहार्य असा आहे. मानवी जीवनाच्या सर्वच क्षेत्रांत त्याचा प्रवेश होऊं शकतो. हा भक्तीचा आदर्श नंतरच्या काळांत मोठ्या प्रमाणावर विस्तार पावला व पुराणग्रंथांनी त्याचें सविस्तर व सुस्पष्टपणें वर्णन केलें. भक्तीचीं बीजें आधीपासूनच विद्यमान होतीं; तीं संहितेंतहि आढळतात; उपनिषदांत त्यांचा थोडाफार विकासहि झाला आहे; पण त्यांचें सविस्तर विवेचन मात्र पुराणांमधेच आलेलें आहे.

म्हणून भक्ति म्हणजे काय हें समजून घ्यावयाचें असेल तर

आपण पुराणग्रंथांचा आशय समजून घेतला पाहिजे. पुराणग्रंथांच्या विश्वसनीयतेविषयी आजकाल बरीच चर्चा होऊन गेली आहे. त्यांतील अस्पष्ट अर्थाचे उतारे घेऊन त्यांच्यावर भरपूर टीकाहि झालेली आहे. बऱ्याच ठिकाणीं असेंहि दाखविण्यांत आलें आहे की हे उतारे आधुनिक विज्ञानाशीं सुसंगत नाहीत, इत्यादि इत्यादि. पण अशा स्वरूपाचे वाद, पुराणवचनांची शास्त्रीयता, त्यांतील भौगोलिक वर्णनांची सत्यासत्यता, त्यांतील खगोलशास्त्रविषयक सिद्धान्तांची ग्राह्याग्राह्यता इत्यादि गोष्टींचा विचार सोडून दिल्यास आपल्याला निश्चितपणें दिसून येतें की या प्रत्येक पुराणग्रंथांत प्रारंभापासून शेवटपर्यंत संतांच्या व राजांच्या जीवनांमधून भक्तीचा आदर्श पुनःपुनः वर्णिलेला व स्पष्ट केलेला आहे. सौंदर्याच्या महान् आदर्शाचीं, भक्तीच्या महान् आदर्शाचीं उद्बोधक उदाहरणें सादर करणें हेंच ह्या ग्रंथांचें कर्तव्य असावें असें वाटतें. आणि मी आधी म्हणालों त्याप्रमाणे हा आदर्श सामान्य मनुष्याला अगदी जवळचा वाटतो. वेदान्ताचे अत्यंत तेजस्वी आदर्श समजून घेऊन त्यांचें गुणग्रहण करणारे लोक खरोखर फारच थोडे आहेत; आणि ह्या आदर्शानुसार आचरण करणारे लोक तर त्याहूनहि थोडे आहेत; कारण खराखुरा वेदान्ती होण्याची पहिली पायरी 'अभीः' म्हणजे निर्भय होणें ही होय. वेदान्ती होण्यापूर्वी दुर्बलता दूर केलीच पाहिजे, आणि हें काम किती कठीण आहे याची आपल्याला कल्पना आहेच. ज्यांनी ह्या जगाशीं असलेले बहुतेक सर्व बंध तोडलेले आहेत व ज्यांना दुर्बल करणारीं फारच थोडीं बंधनें शिल्लक आहेत अशांनाहि अंतरींच्या अंतरीं अशी जाणीव होते की ते कधी कधी अत्यंत दुर्बल होऊन जातात, अगदी मृदु होऊन जातात, अगदी भयभीत होऊन जातात; मग ज्यांच्यामागे पुष्कळच बंध आहेत, ज्यांना आंतील व बाहेरील शेकडो, हजारो गोष्टींचे दास होऊन राहावें लागतें व जे गुलामगिरीमुळे प्रतिक्षणीं खाली खाली ओढले जात आहेत त्यांच्याविषयी काय बोलावें? अशा लोकांना पुराणग्रंथ हे भक्तीचा अतिसुंदर असा संदेश देत असतात.

अशा लोकांसाठी पुराणांनी कोमल व काव्यमय भक्ति उपदेशिली आहे, त्यांच्यासाठी ध्रुव व प्रल्हाद यांच्या आणि हजारो संतांच्या अद्भुत व उदात्त गोष्टी सांगितलेल्या आहेत व त्या सर्व उदाहरणां-

मधून भक्तीची व्यवहार्यता दाखविलेली आहे. पुराणांतील या गोष्टींच्या वैज्ञानिक कांटेकोरपणावर तुमचा विश्वास असो वा नसो, पण तुमच्या-पैकीं एकहिजण असा नाही की ज्याचें जीवन ध्रुव वा प्रल्हाद यांच्या-सारख्या पौराणिक संतांच्या गोष्टींनी प्रभावित झालेलें नाहीं. आधुनिक कालांत आपल्या जीवनावर पडत असलेला पुराणांचा प्रभाव आपण मान्य केला पाहिजे; इतकेंच नव्हे, तर प्राचीन काळीं अवनत झालेला बौद्धधर्म ज्या धर्माची आपल्याला शिकवण देत होता त्याहून अधिक व्यापक व अधिक उच्च असा सर्वसामान्य लोकांच्या उपयोगी पडणारा धर्म पुराणांनी आपल्याला शिकविला याबद्दलहि आपण कृतज्ञ असलें पाहिजे. भक्तीची ही सरळ व सोपी कल्पना पुराणांमधून आपल्यासमोर मांडली गेली आहे व तिचें विवरणहि केलें गेलें आहे, पण आपण ती दैनंदिन जीवनांत प्रत्यक्षपणें अनुभवावयास हवी; कारण आपल्याला पुढे आढ-ळून येईल की भक्तीची ही कल्पना हळूहळू विकसित होऊन शेवटीं ही भक्तिच प्रेमाचें सार होऊन बसते. जोंवर आपल्या ठायीं व्यक्तिगत व जड ऐहिक गोष्टींसंबंधीचें प्रेम आहे तोंवर आपल्याला पुराणांमधील शिकवणीच्या पलीकडे जातां येणार नाही. जोंवर कोणत्या ना कोणत्या व्यक्तीचा आश्रय घेऊन राहण्याचें दौर्बल्य शिल्लक आहे तोंवर या ना त्या स्वरूपांत पुराणांचें अस्तित्व असणें अनिवार्य आहे. तुम्ही त्यांचीं नांवें बदलून टाकाल; आज विद्यमान असलेल्या पुराणांचा धिक्कारहि कराल; पण लगेच त्यांच्याऐवजी तुम्हांला दुसरें एखादें पुराण निर्माण करावेंच लागेल. आपल्यामधे प्राचीन पुराणें न आवडणारा कोणी महा-पुरुष निर्माण झाला, तर तुम्हांला आढळून येईल की त्याच्या मृत्यूनंतर वीस वर्षांच्या आंतच त्याचे शिष्य त्याच्या जीवनांतून एक नवें पुराण निर्माण करतील. मग जुन्या पुराणांऐवजी नवें पुराण--एवढाच काय तो फरक राहील.

मानवी स्वभावाची ही गरज आहे. मानवी दौर्बल्याच्या जे पली-कडे गेले आहेत, जे खऱ्या परमहंसाप्रमाणे निर्भय झाले आहेत, जे मायेच्या बंधनांच्या आणि प्राकृतिक गरजांच्याहि पलीकडे गेले आहेत अशा शूर-वीरांसाठी, जे या जगांतील जणु साक्षात् ईश्वरच आहेत त्यांच्यासाठी, केवळ त्यांच्याचसाठी हीं पुराणें आवश्यक नाहीत. सगुण ईश्वराच्या

उपासनेवांचून सामान्य मनुष्याचें चालावयाचें नाही; प्रकृतीमधे अवस्थित असलेल्या ईश्वराची तो जर उपासना करीत नसेल तर पत्नी, पुत्र, पिता, मित्र, गुरु वा अन्य कोणत्यातरी स्वरूपांत त्याला ईश्वराची उपासना करावीच लागेल; आणि ही गरज पुरुषांहून स्त्रियांच्या बाबतींत अधिक प्रमाणांत आहे. प्रकाशलहरींचें स्पंदन सर्व ठिकाणीं असेल, ज्याअर्थीं मांजरासारख्या प्राण्यांना अंधारांतहि दिसते त्याअर्थीं प्रकाशलहरींचें स्पंदन अंधारांतहि असेल, पण आपल्याला दृष्टीगोचर होण्यासाठी तें आपल्याच स्तरानुरूप असलें पाहिजे. आपण निर्गुण ईश्वरासंबंधी बोलत असूं, पण जोंपर्यंत आपण सामान्य मर्त्य जीव आहोंत तोंपर्यंत आपल्याला मानवांतूनच ईश्वराची प्रतीति येऊं शकेल. म्हणूनच आपली ईश्वरविषयक धारणा व आपली उपासना ही स्वाभाविकपणेंच मानवी स्वरूपाची असते. "हें मानवशरीर ईश्वराचें सर्वश्रेष्ठ मंदिर आहे." म्हणून थोर मानवांची उपासना आपल्याला युगानुयुगें चालूं असलेली आढळेल; आणि त्यांत स्वाभाविकपणें शिरणाऱ्या कांही अतिरेकी गोष्टींवर जरीं आपण टीका केली तरी आपल्याला दिसून येईल की या उपासनेमागील मूळ कल्पना सुस्थिर आहे; या उपासनेंत बाष्कळ व अतिरेकी प्रकार असले तरीहि मानवाच्या उपासनेच्या या सिद्धान्तांत निश्चित असें सार आहे, त्याचा गाभा व आधार हे सुदृढ आहेत. 'कोणतीहि अशास्त्रीय गोष्ट वा जुन्या कथा विचार न करतां ग्रहण करा' असें मी तुम्हांला सांगत नाहीं. दुर्दैवाने कांही पुराणांतून शिरलेल्या सर्व वामाचारी विवेचनांवर विश्वास ठेवा असें मी तुम्हांला सांगत नाहीं; पण मला हेंच सांगावयाचें आहे की पुराणांचें जें सार आहे, पुराणांचा जो हेतु आहे तो आपण विसरतां कामा नये. हा हेतु म्हणजे धर्माला त्याच्या महान् तात्त्विक पातळीवरून सामान्य लोकांच्या दैनंदिन जीवनांत उतरविण्यासाठी भक्तीची शिकवण देणें हा होय.

[व्याख्यात्यांनी भक्तिमार्गांत भौतिक साधनांचें साहाय्य घेण्याचें समर्थन केलें. ते म्हणाले, "मनुष्याचीं आज जशी अवस्था आहे तशी नसती तर ईश्वरकृपेने चांगलें झालें असतें, पण वस्तुस्थिति नाकारण्यांत कांही अर्थ नाही; मनुष्य आध्यात्मिकतेविषयी कितीहि बोलत राहो, पण आज तो एक जड जीव आहे. ह्या जड मानवाला हाताशीं धरून,

तो अध्यात्मसंपन्न होईपर्यंत त्याची उन्नति केली पाहिजे. आजच्या काळांत आपल्यापैकी ९९ टक्के लोकांना आध्यात्मिकता म्हणजे काय हें कळणें कठीण आहे. आपल्याला पुढे नेणाऱ्या प्रेरक शक्ति व आपलीं नियोजित उद्दिष्टें हीं सर्व भौतिक स्वरूपाचीं आहेत. हर्बर्ट स्पेन्सरच्या भाषेंत बोलावयाचें तर आपण किमान विरोधाच्या मार्गानेच कार्य करूं शकतों; आपल्या पुराणकारांना हें व्यवहारज्ञान होतें आणि म्हणून त्यांनी आपल्याला किमान विरोधाचा मार्ग दाखवून दिला. या बाबतींत पुराणांनी मिळविलेलें यश स्पृहणीय व अपूर्व असें आहे. भक्तीचें ध्येय हें अर्थातच आध्यात्मिक स्वरूपाचें आहे, परंतु तिचा मार्ग मात्र भौतिक स्वरूपाचा आहे; पण याला कांही इलाज नाही. अध्यात्मसाधनेसाठी ह्या जड जगांत जें जें उपयुक्त म्हणून आढळेल, त्याचा उपयोग करून आध्यात्मिकतेच्या मार्गावर मनुष्याचा विकास घडवून आणला पाहिजे."

आपल्या शास्त्रांनी लिंग, जाति व पंथ ह्यांचा विचार न करतां वेदाध्ययन करण्याचा अधिकार सर्वांना दिलेला आहे असें सांगून, स्वामीजी पुढे म्हणाले, "जडद्रव्याने निर्मिलेल्या एखाद्या मंदिराने मनुष्य जर ईश्वरभक्तीस प्रवृत्त होत असेल तर तें चांगलेंच आहे; ईश्वराची मूर्ति बनविल्याने भक्तीचें ईप्सित साधत असेल, तर तशा पंधरावीस मूर्तिहि त्याला देण्यास कोणताच प्रत्यवाय नाही. ह्या आध्यात्मिक ध्येयप्राप्तीस जें म्हणून साहाय्यक असेल त्याचें स्वागत करा, मात्र तें नैतिक स्वरूपाचें हवें; कारण अनैतिक गोष्टींनी साहाय्य होण्याऐवजी पतनच घडून येत असतें."

भारतांत मूर्तिपूजेस जो विरोध झाला त्यांत अंशत: कबीर हे कारणीभूत होते असें सांगून स्वामीजी म्हणाले, "भारतांत इतरहि असे थोर तत्त्वज्ञ व धर्मोपदेशक होऊन गेले आहेत की ज्यांचा सगुण ईश्वरावर विश्वास नव्हता व तसें त्यांनी ठामपणें सांगितलेंहि, आणि तरीहि त्यांनी मूर्तिपूजेचा धिक्कार केला नाहीं. फार तर त्यांनी एवढें म्हटलें की हा कांही उपासनेचा उच्च प्रकार नव्हे, आणि मूर्तिपूजा ही उच्च उपासना आहे असें एकादेखील पुराणांत म्हटलेलें नाही."

एका विशिष्ट पेटींत जिहोवा वास करतो असा यहुद्यांचा विश्वास असून ते देखील मूर्तिपूजा करीत असत असा ऐतिहासिक दाखला देऊन

स्वामींजींनी, केवळ दुसरे लोक मूर्तिपूजेला वाईट म्हणतात म्हणून आपणहि तिची निंदा करावयाची ह्या वृत्तीचा निषेध केला. ते पुढे म्हणाले, "मनुष्याला अध्यात्मसंपन्न बनविण्यासाठी ह्या मूर्तींचा वा जड साधनांचा उपयोग विहित मानलेला असला, तरी आपल्या सर्व धर्मग्रंथांनी स्पष्टपणें सांगितलें आहे की हा उपासनेचा अगदी निकृष्ट असा प्रकार आहे, कारण त्यांत उपासना ही जड साधनांच्या साहाय्याने केली जात असते."

"ही मूर्तिपूजा भारतभर सर्वांवर सक्तीनें लादण्याचे प्रयत्न करूं पाहणाऱ्यांचा धिक्कार करण्यास माझे शब्द अपुरे पडतात" असें सांगून स्वामीजी म्हणाले, "कोणी कोणाची उपासना करावयाची व ती कशाच्या साहाय्याने करावयाची हें ठरविण्याचा व आपलें मत सर्वांवर लादण्याचा एखाद्या व्यक्तीला काय अधिकार आहे? आपला विकास कशाने होईल हें इतरांना कसें कळूं शकेल? आपला आध्यात्मिक विकास एखादी मूर्ति पूजिल्याने होईल की अग्नीची उपासना केल्याने होईल की एखाद्या स्तंभाची पूजा केल्याने होईल हें इतरांना कसें कळूं शकेल? हें मार्गदर्शन आपापल्या गुरूंकडून व गुरु-शिष्य संबंधाच्या द्वारें लाभत असतें. भक्तिशास्त्रांत 'इष्टदेवते'चा सिद्धान्त सांगितलेला आहे. प्रत्येक माणसाने ईश्वरोपासनेची पद्धति व ईश्वराकडे जाण्याचा आपला मार्ग स्वतःच निर्धारित करावयाचा असून त्याने उपासनेसाठी निवडलेल्या देवतेलाच 'इष्टदेवता' असें म्हणतात. त्याने उपासनेच्या अन्य पद्धतींबद्दल सहानुभूति बाळगली पाहिजे, पण स्वतःच्याच पद्धतीने उपासना करीत गेलें पाहिजे. जोंवर तो आपल्या ध्येयाप्रत पोहोचत नाही, जेथे जड साधनांच्या साहाय्याने उपासना करण्याची आवश्यकता उरत नाही अशा अवस्थेप्रत जोंवर तो पोहोचत नाही, तोंवर त्याने स्वतःच्या विशिष्ट पद्धतीनेच उपासना करीत गेलें पाहिजे. या संदर्भात, भारताच्या कांही भागांत प्रचलित असलेल्या कुलगुरूच्या प्रथेविषयी सावध करून देणें आवश्यक आहे. आपल्या धर्मग्रंथांमधे सांगितलें आहे की, 'ज्याने वेदांचें मर्म जाणलें आहे, जो निष्पाप आहे, द्रव्याच्या वा अन्य कशाच्या अभिलाषेने जो शिकवीत नाही, ज्याची कृपा अकारण असते, वृक्षलतादींकडून कोणत्याच प्रतिफलाची अपेक्षा न ठेवतां त्यांना जीवनशक्ति देऊन

त्यांना पानाफुलांनी भरून टाकणाऱ्या वसंत ऋतूप्रमाणे लोकांचें हित करणें हा ज्याचा स्वभावच असतो, ज्याला कशाचीहि अपेक्षा नसते, परंतु ज्याचें संपूर्ण जीवनच लोककल्याणार्थ असतें--असाच माणूस गुरु होऊं शकतो, अन्य कोणी नाही. आणखी एक धोका आहे, कारण गुरु हा केवळ शिक्षक नसतो; शिकविणें हा तर त्याच्या कार्याचा एक लहान अंश आहे. हिंदूंच्या मतें गुरु हा आपल्या शिष्यांत आध्यात्मिक शक्तीचा संचार करीत असतो. साधें उदाहरण द्यावयाचें तर, एखाद्या माणसाला योग्य अशी लस टोचली नाही तर अन्य वाईट जंतु त्याच्या आंत शिरण्याचा धोका निर्माण होतो, तद्वत् अयोग्य गुरूने शिक्षण दिलें तर विपरीत गोष्टी ग्रहण केल्या जाण्याचा धोका उत्पन्न होतो. म्हणून ही कुलगुरूची प्रथा भारतांतून संपूर्ण नाहीशी होणें अगत्याचें आहे. गुरु होणें ही व्यापाराची बाब होतां कामा नये; ही प्रथा थांबली पाहिजे, कारण तीं शास्त्राच्या विरुद्ध आहे. स्वत:ला गुरु म्हणविणाऱ्या कोणत्याहि व्यक्तीने कुलगुरुप्रथेचें समर्थन करणें उचित नाही."

अन्नादि प्रश्नासंबंधी बोलतांना स्वामीजी म्हणाले, "अन्नग्रहणाविषयी आज जे कांटेकोर नियम आढळून येतात, ते बऱ्हंशीं वरवरचे असून त्यांनी साधावयाचा मूलभूत उद्देश बाजूलाच राहिला आहे." अन्नाला स्पर्श कोणीं करावा याविषयी कटाक्षाने लक्ष दिलें जावें या कल्पनेचा स्वामीजींनी विशेषकरून उल्लेख केला व त्यांनी सूचित केलें की यांत खोल असा मानसशास्त्रीय अर्थ आहे, पण साधारण लोकांच्या दैनंदिन जीवनांत ही एवढीं दक्षता घेणें फार कठीण आहे. स्वामीजी पुढे म्हणाले, "खाण्यापिण्याचे हे सर्व नियम सर्वसामान्य लोकांवर लादण्याचा प्रयत्न चुकीचा आहे. आपलें जीवन आध्यात्मिकतेला वाहिलेल्या लोकांनाच हे सर्व नियम पाळणें शक्य आहे; पण बहुसंख्य लोकांची इंद्रियगम्य सुखांनी तृप्ति झालेली नसते आणि कांही प्रमाणांत त्यांची तृप्ति झाल्याविना त्यांच्यावर आध्यात्मिकता लादणें व्यर्थ आहे.

"भक्तासाठी आवश्यक असलेल्या उपासनेचा सर्वोच्च प्रकार म्हणजे मानवपूजा होय. खरोखर, पूजा करावयाचीच असेल तर परिस्थितीनुसार एखाद्या गरिबाला वा दहाबारा गरिबांना आपल्या घरीं बोलावून त्यांना ईश्वररूप मानून त्यांची सेवा केल्यास तें सर्वोत्तम होय. मीं अनेक

देशांतील दानधर्म करण्याच्या पद्धति पाहिल्या आहेत व त्या फलदायी न होण्याचें कारण म्हणजे त्या चांगल्या भावनेने चालविल्या जात नाहीत हेंच होय. 'हें घे आणि जा'--हें कांही खरें दान नव्हे, तर हृदयांतील अहंकाराचा तो आविष्कार होय, आपण दानधर्म करीत असल्याबद्दल जगाकडून प्रशंसा मिळविण्याचाच तो एक प्रकार होय. हिंदूंनी हें ध्यानीं घ्यावें की स्मृतिवचनानुसार दाता हा याचकाहून कनिष्ठच होय, कारण याचक हा तेवढ्या वेळेपुरता ईश्वररूपच असतो. म्हणून मला असें वाटतें की कांही गरीब नारायणांना, अंध नारायणांना वा भुकेल्या नारायणांना बोलवावें व मूर्तीची आपण ज्याप्रमाणे पूजा करतों त्याप्रमाणेच त्यांना अन्नवस्त्रादि अर्पण करून त्यांची पूजा करावी. दुसऱ्या दिवशीं पुन: तशाच कांही नारायणांना बोलावून त्यांची पूजा करावी. मी कोणत्याहि पूजापद्धतीची निंदा करीत नाहीं, पण मला वाटतें की ही गरीब नारायणाची पूजा सर्वश्रेष्ठ प्रतीची असून भारतांत आज तिची अत्यंत गरज आहे."

शेवटीं भक्तीची त्रिकोणाशीं तुलना करून स्वामीजी म्हणाले, "या त्रिकोणाचा पहिला कोन म्हणजे, भक्ति वा प्रेम हें निरपेक्ष असतें. प्रेमांत भयाला स्थान नसतें हा दुसरा कोन होय. पारितोषिक वा मोबदला यांसाठी प्रेम करणें हा भिकाऱ्यांचा धर्म होय, तो दुकानदारांचा धर्म होय, खऱ्या धर्माशीं त्याचा फारच थोडा संबंध आहे. आपण भिकारी होऊं नये, कारण तसें होणें म्हणजे नास्तिकताच होय. 'गंगेच्या तीरावर राहून पिण्याच्या पाण्यासाठी विहीर खोदणारा मनुष्य खरोखर मूर्खच म्हटला पाहिजे.' तद्वतच ईश्वराकडे ऐहिक वस्तूंची याचना करणारा माणूस मूर्ख होय. भक्ताने ठामपणें म्हटलें पाहिजे, 'देवा, मला तुमच्याकडून कांहीहि नको, पण तुम्हांला कांही हवें असल्यास तें देण्याची माझी सिद्धता आहे.' प्रेमाला भय ठाऊक नसतें. एखादी क्षीण, दुबळी स्त्री रस्त्याने जात असतां कुत्रीं भुंकतांच पळून जाऊन जवळच्याच घराचा आश्रय घेते, हें तुम्हीं पाहिलें नाही काय ? दुसऱ्या दिवशीं रस्त्याने जात असतां कदाचित् तिचें मूल तिच्याजवळ असेल; त्या वेळीं एखाद्या सिंहाने तिच्यावर उडी घेतल्यास तीं काय करील? आपल्या मुलाला वांचविण्यासाठी ती सिंहाच्या तोंडीं उडी

घेईल. भक्तीच्या त्रिकोणाचा तिसरा कोन हा की भक्ति हेंच भक्तीचें साध्य आहे. शेवटीं भक्ताची ही धारणा बनते की प्रेम म्हणजेच ईश्वर होय, दुसरें कांही नाही. ईश्वराचें अस्तित्व सिद्ध करण्यासाठी मनुष्याने कोठे जावें ? दृश्य म्हणून असणाऱ्या सर्व वस्तूंत प्रेम हेंच सर्वांहून अधिक दृश्यमान आहे. सूर्य, चंद्र व तारे यांना गतिमान् करणारीं, तसेंच स्त्री, पुरुष व प्राणी यांच्यामधून व्यक्त होणारी आणि सर्वत्र व सर्व वस्तूंमधून व्यक्त होणारी प्रेम हीच एक महान् शक्ति आहे. गुरुत्वाकर्षणादि जड शक्तींच्या रूपांतहि तीच व्यक्त होत असते. हें प्रेम सर्वत्र आहे, तें प्रत्येक अणुरेणूंत आहे, सर्वत्र तेंच प्रकट होत आहे. हें प्रेम या विश्वाची एकमेव अनंत प्रेरक शक्ति आहे, त्याचा सर्वत्र प्रत्यय येत आहे, आणि हें प्रेमच ईश्वर आहे."]*

---

* 'दि ट्रिब्यून' नामक वृत्तपत्रांत प्रसिद्ध झालेला अहवाल

मराठी ग्रंथ संग्रहालय,
अनुक्रम ... वि:
क्रमांक ... नों. दि:

# वेदान्त

( १२ नोव्हेंबर १८९७ रोजीं लाहोर येथे दिलेलें व्याख्यान )

आपण ज्यांत वास्तव्य करतों अशीं दोन जगतें आहेत--एक आंतर व दुसरें बाह्य. अतिप्राचीन काळापासून मानवाने या दोन्हीं जगतांत प्राय: समान प्रगति केली आहे. शोधाची सुरुवात प्रथम बाह्य जगतांत झाली व गहन अशा समस्यांचीं उत्तरें प्रथम बाह्य प्रकृतींत शोधण्याचा मानवाने प्रयत्न केला. भोवताली पसरलेल्या सृष्टीच्या साहाय्याने उदात्तता व सौंदर्य यांविषयीची आपली तृष्णा तृप्त करण्याचा मनुष्याने प्रयत्न केला. स्वत:ला व स्वत:च्या ठायीं वसत असलेल्या सर्व गोष्टींना त्याने स्थूल व जड वस्तूंच्या भाषेंत व्यक्त करण्याचा प्रयत्न केला. आणि बाह्य प्रकृतींत त्याला जीं उत्तरें सापडलीं, ईश्वराविषयी व उपासनेविषयी त्याने जे आश्चर्यकारक सिद्धान्त शोधून काढले आणि अत्यानंदाच्या भरांत त्याने सौंदर्याचीं जीं वर्णनें केलीं तीं खरोखर अत्यंत विलोभनीय अशींच होतीं. बाह्य प्रकृतीच्या प्रेरणेने त्याच्या ठायीं खरोखरच उदात्त अशा भाव-भावना निर्माण झाल्या. पण नंतर त्याच्या समोर जें दुसरें जगत् म्हणजेच जें अंतर्जगत् खुलें झालें तें त्याहूनहि अधिक उदात्त, अधिक सुंदर व अनंत पटीने विस्तृत असें होतें. वेदांच्या कर्मकांड विभागांत आपल्याला अतिशय अद्‌भुत अशा धर्मविषयक कल्पना आढळतात; तसेंच त्यांत जगाचा स्रष्टा, पालनकर्ता व संहारकर्ता असलेल्या ईश्वराविषयीच्या आश्चर्यकारक कल्पना कित्येकदा अत्यंत हृदयस्पर्शी भाषेंत मांडलेल्या दिसून येतात. ऋग्वेदसंहितेंतील प्रलयावस्थेचें वर्णन करणारा तो अद्‌भुत मंत्र तुमच्यापैकी बहुतेकांना ठाऊक असेल; इतकें उदात्त वर्णन इतर कोणत्याहि वाङमयांत आढळणार नाही. असें असलें तरी तें बाह्य-प्रकृतीच्या उदात्ततेचें चित्रण आहे, तें स्थूल प्रकृतीचें वर्णन आहे, त्यांतहि थोडातरी जडाचा अंश हा आहेच. तें केवळ जडाच्या भाषेंत, सान्ताच्या भाषेंत केलेलें अनंताचें वर्णन आहे; तें जडद्रव्याचें अनंतत्व आहे, मनाचें नाही; तें अवकाशाच्या अनंतत्वाचें वर्णन आहे, विचाराच्या

अनंतत्वाचें नाही. म्हणूनच वेदांच्या दुसऱ्या विभागांत--ज्ञानकांडांत--आपल्याला अगदी वेगळी विचारपद्धति आढळते. पहिल्या पद्धतींत विश्वामधील रहस्यांचा शोध बाह्य प्रकृतींत घेण्याचा प्रयत्न आढळतो; जडसृष्टीच्या द्वारें जीवनांतील गूढ समस्यांची सोडवणूक करण्याचा तो एक प्रयत्न होता. "यस्यैते हिमवन्तो महित्वा"--"ज्याचें वैभव या हिमगिरीच्या रांगा उद्घोषीत असतात"--ही कल्पना अत्यंत उदात्त आहे, पण भारताच्या दृष्टीने तीं पुरेशी उदात्त नाही. भारतीय मन ही पद्धति सोडून देऊन पुन्हा विचार करूं लागलें; त्याच्या संशोधनाला अगदी वेगळी दिशा मिळाली; बाह्यप्रकृति टाकून देऊन अंत:प्रकृतींत संशोधन सुरू झालें; जडवस्तूंकडून संशोधनाची दिशा मनाकडे वळली. मग एकच प्रश्न ऐकूं येऊं लागला, "मरणानंतर मनुष्याचें काय होतें ?" "अस्तीत्येके नायमस्तीति चैके"--"कांहीजण म्हणतात, त्याचें अस्तित्व असतें, दुसरे सांगतात की त्याचें कांहीच उरत नाही; म्हणून हे यमराज, यांतील सत्य काय तें सांगा ?" येथे आपल्याला अगदीच वेगळी विचारपद्धति आढळते. बाह्य जगतांतून भारतीय मनाने शक्य तेवढें सर्वकांही प्राप्त करून घेतलें होतें, पण तेवढ्याने त्याचें समाधान झालें नाही; अधिक शोध घ्यावा, स्वत:च्या आत्म्यांत खोल बुडी मारून पाहावें असें त्याला वाटलें, आणि त्यांतून त्याच्या प्रश्नांना अंतिम स्वरूपाचें उत्तर लाभलें.

वेदांच्या या भागाचें नांव उपनिषद्, वेदान्त, आरण्यक किंवा रहस्य असें आहे. येथे आपल्या हें लगेच ध्यानांत येतें की धर्मांतील सर्व बाह्योपचार नाहीसे झाले आहेत. या विभागांत आपल्याला दिसतें की आध्यात्मिक गोष्टी जडाच्या भाषेंत सांगितलेल्या नसून त्या आत्म्याच्याच भाषेंत सांगितलेल्या आहेत; इथे सूक्ष्मातिसूक्ष्म तत्त्वें त्यांना उपयुक्त अशा भाषेंत वर्णिलेलीं आहेत, आता त्यांत जडतेचा कसलाहि लेश नसून ऐहिक स्वरूपाच्या कोणत्याहि गोष्टींशीं त्यांचा मेळ घालण्याचा प्रयत्न केलेला नाही. उपनिषत्कालीन ऋषींचीं विशाल मनें, आज कल्पनाहि करतां येणार नाही इतक्या धैर्याने व शौर्याने पुढे झेपावलीं आणि त्यांनी, आजवर मानवजातीला कधीहि सांगितलीं गेलीं नव्हतीं इतकीं उदात्त सत्यें निर्भयपणें व कोणत्याहि प्रकारची तडजोड न करतां उद्घोषित केलीं. माझ्या देशबांधवांनो, मला आपणांपुढे हींच सत्यें मांडावयाचीं

आहेत. वेदांचें केवळ ज्ञानकांडच एखाद्या महासागराप्रमाणे आहे; त्याचा अल्पसा अंशहि आत्मसात् करण्यासाठी कित्येक जन्म आवश्यक आहेत. 'उपनिषदें हीं वेदांच्या मस्तकाप्रमाणे आहेत' असें जें रामानुजाचार्यांनी म्हटलें आहे तें यथायोग्य असून खरोखर उपनिषदें हीं भारताचे प्रमाणभूत धर्मग्रंथ होत. हिंदूंना कर्मकांडाबद्दल अतिशय आदर आहे, तरीहि आपण हें जाणतों की, कित्येक युगांपासून श्रुति म्हणजे केवळ उपनिषदेंच असा अर्थ प्रत्यक्षत: रूढ आहे. आपल्याला हेंहि माहीत आहे की, आपल्या सर्व थोर दर्शनकारांना--व्यास, पतंजलि, गौतम व सर्व तत्त्वज्ञानाचे जनक असे कपिल महामुनि यांना देखील--जेव्हा म्हणून स्वमतांना आधार हवासा वाटला, तेव्हा त्यांच्यापैकी प्रत्येकाला तो उपनिषदांतच आढळला, अन्यत्र कोठेहि नाही; कारण शाश्वत अशीं सत्यें उपनिषदांतच ग्रथित केलेलीं आहेत.

कांही सत्यें अशीं असतात की जीं विशिष्ट दृष्टीने, विशिष्ट परिस्थितींत व विशिष्ट काळीं सत्य असतात; हीं सत्यें त्या त्या काळांतील सामाजिक परिस्थितीवर आधारलेलीं असतात. दुसऱ्या प्रकारचीं सत्यें हीं मानवाच्या यथार्थ स्वरूपावर आधारलेलीं असतात व जोंवर मानव विद्यमान आहे तोंवर तीं राहणारच. हीं दुसऱ्या प्रकारचीं सत्येंच सार्वजनीन व सर्वकालीन स्वरूपाचीं असतात. भारतामध्ये कितीहि बदल घडून आलेले असले, आपल्या सामाजिक संस्था, वेशभूषा, खाण्यापिण्याच्या पद्धति, उपासनापद्धति यांत कितीहि बदल झालेला असला तरी श्रुतींतील सार्वजनीन सत्यें--वेदान्तांतील हे अपूर्व सिद्धान्त स्वत:च्या महिम्याने अढळ, अजय, अमर व अविकारी अशा रूपांत आजहि विद्यमान आहेत. पण उपनिषदांत विकास पावलेल्या सर्व कल्पना ह्या बीजरूपाने कर्मकांडांत प्रतिपादिल्या गेल्या आहेत. वेदान्ताच्या सर्व संप्रदायांना मान्य असलेली विश्वरचनेची कल्पना, भारतांतील सर्व तत्त्वज्ञानांचा सर्वसामान्य आधार असलेलें मानसशास्त्र हीं सर्व कर्मकांडांत विवेचिलीं गेलीं आहेत. म्हणून वेदांचा आध्यात्मिक भाग जो वेदान्त त्याविषयी कांही सांगण्यापूर्वी कर्मकांडाबद्दल चार शब्द सांगणें आवश्यक आहे; आणि वेदान्त या शब्दाने मला काय अभिप्रेत आहे, हें प्रथमच सांगणें बरें होईल.

आज भारतामधे एक चुकीची समजूत झालेली दिसते, ती ही की वेदान्त म्हणजे केवळ अद्वैत दर्शनच होय; पण तुम्हीं हें लक्षांत ठेवलें पाहिजे की आधुनिक भारतांतील सर्वच धर्मसंप्रदायांच्या अभ्यासाच्या दृष्टीने आज प्रस्थानत्रयीला सारखेंच महत्त्व आहे. या प्रस्थानत्रयीपैकी प्रथम म्हणजे श्रुति वा उपनिषदें होत. दुसरीं आहेत व्याससूत्रें. भारतांतील सर्व दर्शनांमधे व्यासांचीं सूत्रें अत्यंत महत्त्वाचीं आहेत, कारण त्यांत पूर्वीच्या सर्व दर्शनांचा समावेश असून त्या सर्वांची परिणति ह्या व्याससूत्रांमधे आढळते. हीं दर्शनें परस्परविरोधी नसून एकदुसऱ्यावर आधारलेलीं आहेत, त्यांत सत्याचें क्रमशः अधिकाधिक प्रकटीकरण झालेलें असून त्यांची परिणति अखेर व्याससूत्रांत झालेली आहे. प्रस्थानत्रयीपैकी तिसरी आहे गीता. उपनिषदें, आणि वेदान्तांतील अपूर्व सत्यांची व्यवस्थित मांडणी करणारीं सूत्रें या दोहोंच्या मध्यभागीं, वेदान्तावर भगवंतांनी स्वतः केलेलें भाष्य जी गीता, तिचें स्थान आहे.

द्वैती, विशिष्टाद्वैती व अद्वैती यांपैकी कोणताहि भारतीय संप्रदाय असो, आपण सनातन मतावलंबी आहोंत हें सिद्ध करण्यासाठी त्या प्रत्येकाने उपनिषदें, व्याससूत्रें व गीता यांचें प्रामाण्य मान्य केलें आहे; त्या प्रत्येकाचा आधार ही प्रस्थानत्रयी आहे. शंकराचार्य, रामानुजाचार्य, मध्वाचार्य, वल्लभाचार्य व चैतन्य महाप्रभु यांनी म्हणा की कुणीहि म्हणा जेव्हा एखादा नवीन संप्रदाय स्थापन केला तेव्हा त्यांनी ही प्रस्थानत्रयी घेऊन तिच्यावर एक नवें भाष्य लिहिलें असें आपल्याला दिसून येतें. म्हणूनच उपनिषदांतून निर्माण झालेल्या संप्रदायांपैकीं एकालाच वेदान्त हें नांव देणें बरोबर होणार नाही. 'वेदान्त' या शब्दांत या सर्व संप्रदायांचा समावेश होतो. अदैतवाद्याप्रमाणेच विशिष्टाद्वैतवाद्यासहि वेदान्ती म्हणवून घेण्याचा अधिकार आहे; आणि थोडें पुढे जाऊन मी असें म्हणेन की 'हिंदु' या शब्दाने आपण जो अर्थ समजतों तोच वस्तुतः 'वेदान्ती' शब्दासहि आहे. तुम्ही हें ध्यानीं घ्या की हीं तिन्हीं दर्शनें भारतांत अनंत काळापासून प्रचलित आहेत. शंकराचार्यांनी अद्वैत दर्शन शोधून काढलें असें समजण्याचें कारण नाही. शंकराचार्यांच्या जन्मापूर्वीहि कित्येक युगें तें प्रचलित होतें; ते या दर्शनाच्या अंतिम प्रतिनिधींपैकी एक होते. विशिष्टाद्वैत दर्शनाचेंहि असेंच आहे; रामानुजाचार्यांपूर्वी

कित्येक युगें तें अस्तित्वांत होतें ही गोष्ट त्यांच्या भाष्यावरून दिसून येते. या दोन्ही दर्शनांच्या बरोबरीने भारतांत जे द्वैती संप्रदाय अस्तित्वांत होते त्यांना देखील हीच गोष्ट लागू आहे. आणि माझ्या अल्पमतीनुसार मी ह्या निष्कर्षाप्रत आलों आहें की हीं तिन्हीं दर्शनें परस्परविरोधी नाहीत. आपल्या षड्दर्शनांच्या बाबतींत आपल्याला हें आढळतें कीं त्यांत महान् तत्त्वांचा क्रमशः विकास झालेला आहे. त्यांचा प्रारंभ मंद स्वरांत होतो व त्यांची समाप्ति अद्वैतवेदान्ताच्या विजयभेरीने होत असते. तसेंच या तीन दर्शनांत मानवी मन क्रमशः अधिकाधिक उच्च आदर्शांप्रत प्रगत होत जातें आणि शेवटीं सर्वकांही अद्वैतवादाच्या त्या अद्भुत एकत्वांत विराम पावतें; म्हणूनच हीं तिन्हीं दर्शनें परस्परविरोधी नाहीत.

पण मला हें सांगणेंहि भाग आहे की हीं तीन दर्शनें परस्परविरोधी आहेत असें समजण्याची चूक अनेक लोक करीत असतात. आपल्याला असें दिसतें की अद्वैतवादी आचार्य अद्वैतपर उतारे तसेंच ठेवतो, पण द्वैती वा विशिष्टाद्वैती आशयाच्या उताऱ्यांची ओढाताण करून त्यांचा आपल्या मताप्रमाणे अर्थ करण्याचा प्रयत्न करतों. त्याचप्रमाणे द्वैतवादी आचार्य अद्वैतपर उताऱ्यांचा द्वैतपर अर्थ लावण्याचा प्रयत्न करतो. आपले हे आचार्य थोर होते, पण अशीहि म्हण आहे की "गुरूच्याहि चुका व प्रमाद हे सांगितलेच पाहिजेत." मला वाटतें की केवळ एवढ्याच बाबतींत त्यांची चूक झाली आहे. आपल्याला अधिकारभेदाचा तो उत्कृष्ट सिद्धान्त आकलन झाला की मग शास्त्रग्रंथांचे अर्थ लावण्याचें काम अगदी सुगम होईल; मग ती अर्थाची ओढाताण करण्याची जरूर पडणार नाही, धर्माच्या क्षेत्रांत अप्रामाणिक बनण्याची गरज उरणार नाही, कसल्याहि व्याकरणविषयक जंजाळांत पडण्याचें काम पडणार नाहीं, तसेंच ज्या ठिकाणीं मूलतःच जो आशय नाही तेथे तो कल्पिण्याचें व आपल्या कल्पनांचें तेथे आरोपण करण्याचेंहि कारण उरणार नाही.

ही गोष्ट खरी आहे की उपनिषदांसमोर पुढील एकच विषय होता—"कस्मिन्नु भगवो विज्ञाते सर्वमिदं विज्ञातं भवति"—"जें जाणून घेतल्याने सर्वकांही ज्ञात होतें तें तत्त्व कोणतें ?" आधुनिक भाषेंत सांगावयाचें तर, वस्तुमात्रांतील अंतिम एकत्व शोधून काढणें हाच उपनिषदांचा विषय होय. ज्ञान म्हणजे विविधतेंत ऐक्य पाहणें, दुसरें

कांही नव्हे, प्रत्येक शास्त्र याच तत्त्वावर आधारलेलें आहे, विविधतेंत एकत्व शोधून काढण्यावरच सर्व मानवी ज्ञान आधारलेलें आहे; आणि ज्यांना आपण विज्ञानें म्हणतों, त्या मानवी ज्ञानाच्या छोटचा छोटचा दालनांचेंहि कार्य कांही थोडचा घटनांमधील एकत्व शोधून काढणें हेंच असेल तर, विविधतेने नटलेल्या ह्या समग्र विश्वांतील एकत्व शोधणें हें केवढें प्रचंड कार्य ठरेल ! या विश्वांत तर नामरूपात्मक असंख्य भेद आहेत, चेतन-अचेतनात्मक असे असंख्य भेद आहेत, शिवाय येथे प्रत्येक विचार दुसऱ्या विचाराहून भिन्न आहे व प्रत्येक रूप दुसऱ्या रूपाहून भिन्न आहे; आणि तरीहि या सर्व विभिन्न स्तरांमधे व विश्वांतील स्वर्ग, पृथ्वी प्रभृति असंख्य 'लोकां'मधे--या अनंत अशा विविधतेमधे एकत्व शोधणें हाच उपनिषदांचा विषय आहे. हें जरी खरें आहे तरी अरुंधतीन्यायाचा सुद्धा आपण उपयोग केला पाहिजे. एखाद्याला अरुंधतीचा लहानसा तारा दाखवावयाचा असेल तर जवळच्या एखाद्या मोठचा ताऱ्या-वर लक्ष केंद्रित करण्यास सांगतात, आणि मग त्याचें लक्ष अरुंधतीच्या ताऱ्याकडे वळविणें सुलभ होतें. त्याचप्रमाणे सूक्ष्म तत्त्वें समजावून सांगण्याच्या आधी कांही स्थूल तत्त्वें सांगून मग हळूहळू अधिकाधिक सूक्ष्म तत्त्वें शिकवावीं लागतात. माझी ही कल्पना सिद्ध करण्यासाठी मी उपनिषदांचा निर्देष करीन; या उपनिषदांचें अनुशीलन केल्यास तुम्हांला माझी कल्पना पटेल. उपनिषदांतील बहुधा प्रत्येक अध्यायाची सुरवात द्वैती शिकवणीने म्हणजे उपासनेपासून होते. प्रथमतः, ईश्वर हा विश्वाचा निर्माता, पालनकर्ता व संहारकर्ता आहे अशी शिकवण देण्यांत आली आहे. त्याची आपण उपासना करावी, तो आपला शास्ता आहे, तो आंतर व बाह्य प्रकृतीचा नियन्ता आहे आणि तरीहि तो जणु सृष्टीच्या बाहेर आहे असें सांगण्यांत आलें आहे. त्याच्या थोडेसें पुढे गेल्यास आपल्याला हें आढळेल की तेच आचार्य असें सांगतात की ईश्वर हा सृष्टीच्या बाहेर कोठे नसून या सृष्टींतच व्याप्त आहे. अखेर या दोन्ही कल्पना बाजूला सारून असें शिकविलेलें आढळेल कीं जें म्हणून कांही सत्य आहे तें ईश्वरच आहे, भेद म्हणून कांहीच नाही. "तत्त्वमसि श्वेतकेतो"--"हे श्वेतकेतो, तें तूं आहेस." जो सर्व श्रृष्टींत व्याप्त आहे तोच मानवी आत्म्यांतहि आहे असा सिद्धान्त शेवटीं मांडण्यांत आला

आहे. ह्या ठिकाणीं कोणत्याच प्रकारची तडजोड नाही; इतरांना काय वाटेल याची भीति नाही. सत्य, निर्भेळ सत्य येथे सुस्पष्ट व निर्भय वाणीने सांगितलें गेलें आहे. आजहि तशाच निर्भयपणें सत्याचें प्रतिपादन करणें आवश्यक आहे; आणि ईशकृपेने निदान मी तरी सत्याचा असा निर्भय प्रचारक होईन अशी मला आशा आहे.

आता आपल्या पूर्वीच्या मुद्यांकडे वळूं. सुरवातीला आपण दोन गोष्टी समजून घेतल्या पाहिजेत. प्रथम म्हणजे वेदान्ताच्या सर्व संप्रदायांना मान्य असलेलें मानसशास्त्र, आणि दुसरी म्हणजे विश्वरचनेसंबंधीची कल्पना. आधी आपण दुसऱ्या गोष्टीचा विचार करूं. आज असें दिसतें की विज्ञानाच्या क्षेत्रांत अद्‌भुत असे शोध लागत आहेत आणि हे शोध जणु विजेप्रमाणे आपल्यावर कोसळून आपण स्वप्नांत देखील न कल्पिलेल्या गोष्टी आपल्याला दाखवीत आहेत. पण वस्तुतः यांपैकी पुष्कळशा गोष्टी अतिप्राचीन काळीं शोधल्या गेल्या असून त्यांचा आता पुन्हा शोध लावण्यांत येत आहे, इतकेंच. विविध प्रकारच्या शक्तींमधे सुद्धा एकत्व आहे असा शोध विज्ञानाला कालपरवाच लागला आहे. त्याला एवढ्यांतच असें आढळून आलें आहे की उष्णता, चुंबकत्व, विद्युत् आदि ज्या विभिन्न शक्ति आहेत त्या सर्व एका मूळ शक्तींत परिवर्तित केल्या जाऊं शकतात, आणि म्हणून विज्ञान या सर्व शक्तींचा एकाच नांवाने निर्देश करतें, मग तें नांव तुम्ही कोणतेंहि ठरवा. परंतु अतिप्राचीन अशा वेदांच्या संहिताभागांतहि शक्तीविषयीची ही कल्पना आढळते. सर्व शक्ति, मग त्यांना गुरुत्वाकर्षण, आकर्षण, प्रतिसारण वा उष्णता, विद्युत्, चुंबकत्व कांहीहि नांव द्या, त्या एकाच मूळ शक्तीचीं विविध रूपें होत. अंतःकरणांतून विचाररूपाने प्रकट होणारी शक्ति असो, वा कर्मेंद्रियांनी केलेल्या कर्माच्या रूपाने व्यक्त होणारी शक्ति असो, ह्या दोन्ही शक्ति एकाच मूळ शक्तींतून उत्पन्न झाल्या आहेत आणि त्या मूळ शक्तीला 'प्राण' असें नांव आहे. पण प्राण म्हणजे तरी काय? प्राण म्हणजे स्पंदन. जेव्हा सर्व विश्व त्याच्या मूळ अवस्थेप्रत जातें तेव्हा या अनंत शक्तीचें काय होतें? ती पूर्ण नष्ट होते असें तुम्हांला वाटतें काय? नाही. ती नष्ट होत नाही. ती नष्ट होत असेल तर नंतरचा तरंग कशांतून उत्पन्न होईल?--कारण, या विश्वाची

गति तरंगाकार आहे, तें एकदा वर येतें, तर एकदा खाली जातें. याप्रमाणे ही गति अनंत कालापासून चालू आहे. विश्वाची कल्पना येथे 'सृष्टि' या शब्दाने व्यक्त झालेली आहे. या शब्दाचा अर्थ 'क्रिएशन' (उत्पत्ति) असा नाही हें लक्षांत घ्या. इंग्रजींत बोलत असल्याने माझा नाइलाज होत आहे, संस्कृत शब्दांचें शक्य तेवढें अचूक भाषांतर करण्याचा मी प्रयत्न करीत आहें. ही सृष्टि म्हणजे 'प्रोजेक्शन' (अभिव्यक्ति) होय. प्रत्येक कल्पाच्या अखेरीस सर्वकांही सूक्ष्मसूक्ष्म होत जाऊन आपल्या मूळ अवस्थेप्रत प्राप्त होतें, त्या अवस्थेंत तें कांही काळ तसेंच शांत राहतें व पुन्हा प्रकट होऊं लागतें. यालाच 'सृष्टि' म्हणतात. या वेळीं सर्व शक्तींचें वा 'प्राणा'च्या निरनिराळ्या रूपांचें काय होतें? त्या सर्व शक्तींचें 'आदि प्राणां'त रूपान्तर होतें व हा प्राण निश्चेष्टप्राय होतो, पण पूर्णपणें तो निश्चेष्ट होत नाही. याचें वर्णन वेदांतील सूक्तांत "आनीदवातम्"—"स्पंदनाविना त्याचें स्पंदन होतें" या शब्दांत केलें आहे. वेदांमधे दुर्बोध असे पुष्कळच पारिभाषिक शब्द आहेत. उदाहरणार्थ 'वात' हाच शब्द घ्या. पुष्कळदा त्याचा अर्थ 'हवा' आणि पुष्कळदा 'गति' असा होतो, आणि अनेकदा या अर्थाबाबत लोकांचा गोंधळहि उडतो. या बाबतींत आपण सावध राहिलें पाहिजे. असो. तुम्ही ज्याला 'जडद्रव्य' म्हणतां त्याचें त्या वेळीं काय होतें? शक्ति ही जडद्रव्यांत ओतप्रोत भरलेली असते. कल्पान्तीं सर्व जडद्रव्य 'आकाशां'त लीन होतें व तेथून तें पुन्हा प्रकट होतें. हें 'आकाश' मूळ जडद्रव्य वा आदिभूत होय. त्याला तुम्ही 'ईथर' हें नांव द्या, वा अन्य कांही म्हणा, 'आकाश' हें जडद्रव्याचें मूळ रूप होय. प्राणाच्या योगाने ह्या आकाशाचें स्पंदन होत असतें, आणि नव्या सृष्टीच्या वेळीं हें स्पंदन वेगाने होऊं लागतें, व मग आकाश तरंगाकार होतें आणि या तरंगांनाच आपण सूर्य, चंद्र, तारे, ग्रहमाला इत्यादि नांवें देतों.

आपल्याला वेदांत दुसरें एक वचन आढळतें : "यदिदं किं च जगत् सर्वं प्राण एजति निःसृतम्"—"या विश्वांतील सर्वकांही प्राणाच्या स्पंदनामुळेच अभिव्यक्त झालेलें आहे." येथे 'एजति' हा शब्द लक्षांत घ्या, तो 'एज' म्हणजे 'स्पंदन पावणें' ह्या धातूपासून बनला आहे.

'निःसृतम्' म्हणजे 'अभिव्यक्त झालेलें' व 'यदिदं किं च' म्हणजे 'या विश्वांतील सर्वकांही'.

हा सृष्टिरचनेचा भाग झाला. ह्यांत तपशिलाच्या पुष्कळच गोष्टी आहेत. उदाहरणार्थ, ही प्रक्रिया कशी घडते, प्रथम आकाश कसें असतें, त्यापासून अन्य गोष्टी कशा उत्पन्न होतात, आकाशाचें स्पंदन कसें सुरू होतें, आणि त्यापासून वायु कसा निर्माण होतो ह्या तपशिलाच्या गोष्टी आहेत. पण येथे मुख्य कल्पना अशी की, सूक्ष्मापासून स्थूल उत्पन्न होत असतें. स्थूल जडद्रव्य ही अगदी अखेरची निष्पत्ति आहे व हें स्थूल जडद्रव्य म्हणजे अगदी बाहेरची वस्तु आहे, आणि ह्या स्थूल जडद्रव्याच्या आधी सूक्ष्म जडद्रव्याचें स्थान आहे. एवढें विश्लेषण केल्यानंतरहि आपल्याला दिसतें की सर्व सृष्टीचीं मूळ अशीं दोन तत्त्वें झालीं, पण अंतिम एकत्व अजून आपल्याला गवसलें नाही. सर्व शक्तींचें एकत्व प्राणाच्या ठिकाणीं आहे व सर्व जडवस्तूंचें एकत्व आकाशाच्या ठिकाणीं आहे असा शोध लागला. आता प्राण आणि आकाश या दोहोंमधे कांही एकत्व शोधतां येईल काय ? हीं दोन्हीं एखाद्या तत्त्वांत एकरूप होऊं शकतील काय ? आपलें आजचें विज्ञान येथे मूग गिळून बसतें, त्याला अद्यापि कांही मार्ग सापडलेला नाही; त्याला जर मार्ग शोधावयाचा असेल तर ज्याप्रमाणे त्याने 'प्राण' व 'आकाश' या प्राचीन तत्त्वांचा पुन:शोध लावला त्याप्रमाणेच त्याला प्राचीन ऋषींच्या मार्गाचें अनुसरण करीतच पुढे जावें लागेल.

आकाश व प्राण हीं दोन्हीं ज्या एका तत्त्वांतून निघालेलीं आहेत तें सर्वव्यापी निर्गुण असें तत्त्व आहे. त्यालाच पुराणांत 'ब्रह्मा' किंवा 'चतुर्मुख ब्रह्मा' असें नांव आहे. मानसशास्त्रीय परिभाषेंत त्यालाच 'महत्' म्हटलें आहे. यांतच आकाश व प्राण हीं दोन्हीं एकत्व पावतात. ज्याला 'मन' असें म्हणतात तें म्हणजे मेंदूच्या जाळ्यांत अडकलेला 'महत्'चा अंशच होय; अशा सर्व व्यक्तींच्या मेंदूंतील मनांच्या गोळाबेरजेला 'समष्टि' असें नांव आहे. पण विश्लेषण इथेच संपलें नाही, तें आणखी पुढे जाणें आवश्यक होतें. आपल्यापैकी प्रत्येकजण एक 'पिंड' असून समग्र विश्व हें 'ब्रह्मांड' होय. पण व्यष्टींत जें म्हणून आहे तेंच समष्टींतहि आहे असें सहज अनुमान काढतां येतें. आपण

स्वत:च्या मनाचें विश्लेषण करूं शकलों तर समष्टिमनांत काय आहे याचें आपल्याला निश्चितपणें अनुमान करतां येईल. पण हें मन म्हणजे काय हाच प्रश्न आहे. आज पाश्चात्त्य देशांत वैज्ञानिक प्रगतीची घोडदौड चालू आहे. प्राचीन धर्मांतील दृढमूल कल्पना शरीरविज्ञानशास्त्रें एकामागून एक ढासळून टाकीत आहे. काय करावें हें पाश्चात्त्यांना सुचेनासें झालें आहे, कारण आजच्या शरीरविज्ञानशास्त्राने मेंदू म्हणजेच मन असें वारंवार सांगून त्यांना अगदी अस्वस्थ केलें आहे. पण भारतांत ही गोष्ट आपल्याला नेहमीच माहीत होती. हिंदु बालकाला पहिला पाठ हाच शिकविण्यांत येतो की मन म्हणजे जडपदार्थ आहे, फक्त तें सूक्ष्म आहे इतकेंच. देह हा स्थूल आहे व त्याच्यामागे सूक्ष्म शरीर वा मन आहे. तेंहि जडच आहे, तें केवळ सूक्ष्म आहे इतकेंच; आणि हें मन म्हणजे कांही आत्मा नव्हे.

या 'आत्मा' शब्दाचें इंग्रजी भाषान्तर मी करणार नाहीं, कारण आत्म्याची कल्पनाच युरोपांत अस्तित्वांत नाही. म्हणून या शब्दाचें भाषान्तर शक्य नाही. जर्मन तत्त्वज्ञ 'आत्मा' या शब्दाचें भाषान्तर 'सेल्फ' (Self) या शब्दाने करूं लागले आहेत, पण त्यांचा हा शब्द जोंवर सर्वमान्य होत नाही तोंवर त्याचा उपयोग करणें शक्य नाही. म्हणून त्याला 'सेल्फ' म्हणा वा अन्य कांही नांव द्या, आपल्या दृष्टीने तो 'आत्मा'च आहे. हा आत्माच देह व मन यांच्या मागील 'खरा माणूस' होय. हा आत्मा जड अशा मनाला साधन म्हणून वा मानसशास्त्रीय भाषेंत सांगावयाचें तर 'अंत:करण' म्हणून उपयोगांत आणतो. हें मन अनेक अंतरिंद्रियांच्या साहाय्याने, शरीरांत दिसणाऱ्या बहिरिंद्रियांवर कार्य करतें. हें मन आहे तरी काय ? पाश्चात्त्य तत्त्वज्ञांना अगदी परवा हें उमगलें की डोळे हे खरोखर पाहत नाहीत, पण त्यांच्या मागे दुसरी खरीं इंद्रियें आहेत, आणि जर तीं नष्ट झालीं तर मनुष्याला इंद्राप्रमाणे हजारो डोळे जरी लाभले तरी त्याला कांही दिसूं शकणार नाही. आपल्या भारतीय तत्त्वज्ञानाने आधीपासूनच हें गृहीत धरलें आहे की दृष्टि म्हणजे बाह्य दृष्टि (डोळे) नव्हे. खरी दृष्टि मेंदूमधे असलेल्या केंद्रांना वा अंतरिंद्रियांनाच असते. तुम्ही त्यांना हवें तें नांव द्या, पण कान, नाक, डोळे हीं खरीं इंद्रियें नव्हत. खरीं इंद्रियें हीं आंत असतात.

हीं सर्व खरीं इंद्रियें व मन, बुद्धि, चित्त, अहंकार या सर्वांना मिळून 'मन' असें म्हणतात. आधुनिक शरीरशास्त्रज्ञ येऊन तुम्हांला जर सांगूं लागले की मेंदू म्हणजेच मन होय आणि मेंदूंतहि पुष्कळ प्रकारचीं इंद्रियें आहेत, तर तुम्हांला बिचकून जाण्याचें मुळीच कारण नाही; तुम्ही त्यांना सांगा की, आमच्या दार्शनिकांना ही गोष्ट नित्य परिचयाचीच आहे व आमच्या धर्माचें तें अगदी प्राथमिक स्वरूपाचें असें तत्त्व आहे.

तर मग मन, बुद्धि, चित्त, अहंकार आदि म्हणजे तरी काय तें आपण समजून घेतलें पाहिजे. प्रथम चित्त म्हणजे काय तें पाहूं. मनाचें तें उपादानद्रव्य आहे--तें महत्‌चाच अंश आहे--मनाच्या विविध अवस्थांचें तें एक सर्वसाधारण नांव आहे. समजा, उन्हाळ्यांतील संध्याकाळीं एका शांत व स्थिर सरोवराच्या कांठीं तुम्ही उभे आहांत. या सरोवराच्या पृष्ठभागावर एकहि तरंग नाही. समजा एखाद्याने त्यांत एक धोंडा टाकला, तर काय होईल ? प्रथम पाण्यावर आघात झाल्याचीं क्रिया होईल; नंतर पाणी दगडावर प्रतिक्रिया करील व ही प्रतिक्रिया लाटेचें स्वरूप धारण करील. प्रथम पाणी थोडें कंप पावतें व मग लगेच लाटेच्या स्वरूपांत तें प्रतिक्रिया करतें. चित्त हें या सरोवराप्रमाणे आहे असें समजा व बाह्य वस्तु ह्या त्यांत फेकलेले धोंडे आहेत असें समजा. बाह्य विषयांशीं अशा प्रकारें इंद्रियांच्या द्वारें चित्ताचा संपर्क आला--बाह्यवस्तूंना संवेदनारूपाने आंत नेण्यासाठी इंद्रियें हीं हवींतच--की त्यांत स्पंदन निर्माण होतें; त्याला 'मन' असें म्हणतात; तें संशयात्मक आहे, तें निश्चय करूं शकत नाही. नंतर एक प्रतिक्रिया होते, तिला 'निश्चयात्मिका बुद्धि' असें म्हणतात. आणि ह्या बुद्धीबरोबरच अहंबोध व बाह्य वस्तूचें ज्ञान हीं एकदमच उत्पन्न होतात. समजा की माझ्या हातावर एक डास बसला आहे; याची संवेदना चित्तापर्यंत पोहोचते व तेथे एक मंद स्पंदन निर्माण होतें; आपल्या मानसशास्त्रांत यालाच 'मन' म्हणतात. नंतर प्रतिक्रिया घडते, व लगेच हा विचार निर्माण होतो की हातावर डास आहे व त्याला हाकललें पाहिजे. याप्रमाणे चित्तरूपी सरोवरावर आघात होत असतात; परंतु एक गोष्ट आपण लक्षांत ठेवली पाहिजे, ती ही की, सरोवराच्या बाबतींत प्रत्येक आघात बाहेरून येत असतो, पण या चित्तरूपी सरोवरावर होणारे

आघात बाह्य जगतांतून येऊं शकतात किंवा अंतर्जगतांतूनहि येऊं शकतात. चित्त व त्याच्या ह्या सर्व अवस्था या साऱ्यांना मिळून 'अंतःकरण' असें म्हणतात.

याबरोबरच एक गोष्ट समजून घेतली तर पुढे अद्वैतदर्शन समजण्यास मदत होईल. तुमच्यापैकी सर्वांनी मोत्यें पाहिलीं असतील व तीं कशीं बनतात हेंहि तुमच्यापैकी पुष्कळांना माहीत असेल. वाळूचा एक कण त्या मोतीं बनविणाऱ्या कालवाच्या कवचांत शिरतो, त्यामुळे तेथे एकप्रकारचें खुपणें सुरू होतें, कालवाचें शरीर त्यावर प्रतिक्रिया करतें व स्वतःच्या अंगांतील एकप्रकारच्या रसाने त्यास वेष्टित करतें; मग तो रस घनीभूत होऊन त्याचें मोतीं बनतें. याप्रमाणे हें अखिल विश्व त्या मोत्याप्रमाणे आहे, व आपणच तें घडवीत असतों. बाह्य जगापासून आपल्यावर संवेदनांचे आघात होत असतात, त्या आघातांची नुसती जाणीव होण्यासहि आपल्याला प्रतिक्रिया करावी लागते; आणि आपण जेव्हा ती प्रतिक्रिया करतों तेव्हा आपण खरोखर आपल्या मनाचा एक अंश त्या आघाताकडे पाठवितों व जेव्हा आपल्याला जाणीव होते तेव्हा खरोखर त्या आघातामुळे विशिष्ट आकार प्राप्त झालेलें मनच आपल्या प्रत्ययास येत असतें. म्हणून बाह्य जग वस्तुतः अस्तित्वांत आहे असा विश्वास ठेवणाऱ्यांनाहि हें मानावेंच लागेल--या शरीरविज्ञानशास्त्राच्या युगांत हें मानणें भागच आहे--की बाह्य जगाला जर आपण 'क्ष' म्हटलें तर आपल्याला प्राप्त होणारें ज्ञान 'क्ष + मन' हें असतें; व ज्ञानाच्या ह्या प्रक्रियेंत मनाचा भाग एवढा जास्त आहे की त्याने 'क्ष' पूर्णपणें वेढला जातो व अखेरपर्यंत तो अज्ञेय व अज्ञातच राहतो. आणि म्हणून बाह्य जगाला जर अस्तित्व असेल तर तें चिरकाल अज्ञात व अज्ञेयच असतें. आपल्याला बाह्य जगाचें जें ज्ञान होतें तें, आपल्या मनाने बाह्य जगाला जो आकार वा रूप दिलेलें असतें त्या रूपाचेंच ज्ञान असतें. अंतर्जगालाहि हीच गोष्ट लागू आहे. आपल्या आत्म्यालाहि हीच गोष्ट लागू आहे. आत्म्याचें ज्ञान करून घ्यावयाचें असेल तर तें मनाच्या द्वारेंच करून घ्यावें लागतें. म्हणूनच आत्म्याविषयी आपल्याला जें थोडेंफार ज्ञान होतें तें 'आत्मा + मन' अशा स्वरूपाचें असतें, म्हणजेच मनाने वेष्टित व मनाचा आकार प्राप्त झालेलें असें आत्म्याचें रूपच आपल्याला प्रत्ययास येतें, त्याहून

अधिक कांही नाही. पुढे आपण या विषयाकडे पुन्हा वळूं. पण मीं आता जें सांगितलें तें सध्या ध्यानांत ठेवा.

नंतर, आणखी एक गोष्ट समजून घ्यावयास हवी. हें शरीर म्हणजे जडद्रव्याचा नित्य वाहत असलेला प्रवाह होय. प्रत्येक क्षणीं आपण त्यांत नवीन द्रव्य टाकीत असतों व प्रत्येक क्षणीं शरीरहि द्रव्य बाहेर टाकीत असतें. शरीर हें एखाद्या नदीसारखें आहे. नदींतून पाण्याचे लोट सारखे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं जात असतात, नदी नित्य वाहत असते, तरीहि आपण कल्पनेने ती सगळी नदी डोळ्यासमोर आणतों व म्हणतों की ही एकच नदी आहे. पण आपण कशाला 'नदी' म्हणतों ? पाणी क्षणाक्षणाला बदलत असतें, किनारा बदलत असतो, क्षणोक्षणीं परिसरहि बदलत असतो, मग नदी ती काय असते ? परिवर्तनांच्या ह्या मालिकेचें तें नांव आहे. मनाचेंहि तसेंच आहे. हेंच बौद्धांचें क्षणिकविज्ञानवादाचें तत्त्व असून, तें समजण्यास अत्यंत कठीण आहे, पण बौद्ध तत्त्वज्ञानांत तें अत्यंत कांटेकोर तर्कपद्धतीने मांडलें आहे; आणि भारतांत वेदान्तांतील कांही भागास विरोध करण्यासाठी तें उत्पन्न झालें होतें. याचा प्रतिवाद करणें आवश्यक होतें, आणि नंतर आपल्याला दिसेल की केवळ अद्वैतदर्शनच त्याचें खंडन करूं शकलें, दुसरें कोणी नाही. नंतर आपण हेंहि पाहूं की, अद्वैतदर्शनासंबंधी लोकांच्या विचित्र कल्पना असल्या व त्यांना त्याचें भयहि वाटत असलें तरी अद्वैतदर्शनच जगाचा उद्धार करूं शकेल, कारण त्यांतच सगळ्या गोष्टींची तर्कसंगत उपपत्ति दिलेली आहे. द्वैत वा अन्य वाद हे उपासनेच्या दृष्टीने फार चांगले असतील, त्यांच्यामुळे मनाला मोठें समाधान लाभत असेल, तसेंच मनाची पातळी उंचावण्यास ते साहाय्यभूत होत असतील; पण मनुष्याला एकाच वेळीं धार्मिक व बुद्धिवादी व्हावयाचें असेल तर त्याच्या पक्षीं अद्वैत हेंच एकमेव उपयुक्त दर्शन आहे. असो. आपण पूर्वी पाहिलेंच आहे की देहाप्रमाणे मनदेखील एखाद्या नदीसारखें आहे; एका ठिकाणीं तें सतत भरलें जात आहे व दुसरीकडे तें सतत रिक्त होत आहे. मग आपण ज्याला आत्मा म्हणतों तें एकत्व कोठे आहे ? याचें उत्तर असें की शरीरांत नित्य बदल होत असला व मनांतहि नित्य परिवर्तन होत असलें तरीहि आपल्या ठायीं अपरिवर्तनीय असें कांहीतरी आहे व त्याच्या-

मुळेच आपल्या वस्तुविषयक कल्पना अपरिवर्तनीय व स्थिर असतात. निरनिराळ्या दिशेने येणारे प्रकाशकिरण जेव्हा एखाद्या पडद्यावर, भिंतीवर किंवा स्थिर अशा कोणत्यातरी गोष्टीवर केंद्रित होतात तेव्हाच ते एकत्व पावूं शकतात व त्याच वेळीं त्यांना एकप्रकारचें अखंडत्व येऊं शकतें. मानवी शरीरांत अपरिवर्तनीय, अखंड असें काय आहे की ज्यांत विविध कल्पना एकीकृत होऊन त्यांना अखंडत्व प्राप्त होतें? ती वस्तु मन असूं शकणार नाही. कारण तें स्वतःच परिवर्तनशील आहे. म्हणून आपल्या ठायीं कांहीतरी असलें पाहिजे की जें मनहि नाही व शरीरहि नाही, पण जें अपरिवर्तनीय व शाश्वत असून त्यामधे आपल्या सर्व कल्पना व संवेदना केंद्रित होऊन त्यांना एकत्व व अखंडत्व प्राप्त होत असतें; हाच खरोखर आपला आत्मा होय. आणि ज्याअर्थीं आपण ज्याला जडद्रव्य म्हणतों--मग तें सूक्ष्म जडद्रव्य वा मन असो किंवा स्थूल जड असें हें बाह्य जग असो--तें सगळें ह्या आत्म्याच्या तुलनेने परिवर्तनीय आहे, त्याअर्थीं हा आत्मा जडरूप असूं शकत नाही; अतएव तो चैतन्यरूप आहे, म्हणजेच तो अ-जड, अविनाशी व अपरिवर्तनीय आहे.

यानंतर दुसरा एक प्रश्न उपस्थित होतो. बाह्य जग पाहून तें कुणीं निर्माण केलें, जडद्रव्य कुणीं निर्माण केलें इत्यादि हेतुवादाचें (Design Theory चें) समर्थन करणारे जे प्रश्न विचारले जातात त्यांच्याविषयी मला येथे बोलावयाचें नाही. येथे मनुष्याच्या अंतःप्रकृतीच्या साहाय्याने सत्य जाणून घ्यावयाचें आहे. आणि आत्म्यासंबंधीचा प्रश्न जसा उत्पन्न झाला तशाच प्रकारें पुढील प्रश्नहि उत्पन्न होतो. शरीर व मन या दोहोंहून भिन्न असा एकेक अपरिवर्तनीय आत्मा प्रत्येक मनुष्यांत आहे हें गृहीत धरलें तर हेंहि मानावेंच लागेल की या सर्व आत्म्यांमधे कल्पना, भावना व सहानुभूति यांच्या बाबतींत एकप्रकारचें ऐक्य आहे. माझ्या आत्म्याचा तुमच्या आत्म्यावर प्रभाव कसा पडतो? हा प्रभाव पडण्यास कोणतें माध्यम आहे? तुमच्या आत्म्याबद्दल मी समवेदना अनुभवूं शकतों, हें कसें घडतें? तुमचा आत्मा व माझा आत्मा या दोहोंना एकाच वेळीं स्पर्श करणारें असें काय आहे? म्हणून आणखी एक आत्मा मानणें हें तात्त्विकदृष्ट्या आवश्यक आहे. जो आत्मा ह्या सर्व आत्म्यांमधून

व जडवस्तूंमधून कार्य करतो, जो आत्मा जगांतील असंख्य आत्म्यांना व्यापून त्यांत प्रविष्ट झाला आहे, ज्या आत्म्याच्या अस्तित्वामुळे ह्या सर्व आत्म्यांना जीवन लाभलें आहे, ज्या आत्म्याच्या अस्तित्वामुळे हे सर्व आत्मे परस्परांवर प्रेम करतात, परस्पराविषयी सहानुभूति बाळगतात व परस्परासाठी कार्य करतात असा एक आत्मा मानणें आपल्यापक्षीं आवश्यक आहे. आणि ह्या सर्वव्यापी आत्म्याला 'परमात्मा' असें म्हणतात. तोच विश्वाचें नियमन करणारा ईश्वर होय. तसेंच हें ओघानेच येतें की आत्मा ज्याअर्थी जडरूप नाही व ज्याअर्थी तो चैतन्यरूप आहे त्याअर्थी तो जडाच्या नियमांनी बद्ध असूं शकत नाही, जडाच्या नियमांनुसार त्याचा विचार करतां येणार नाही. म्हणूनच तो अजेय, अज, अमर व अविकारी आहे.

नैनं छिन्दन्ति शस्त्राणि नैनं दहति पावकः ।
न चैनं क्लेदयन्त्यापो न शोषयति मारुतः ।।
अच्छेद्योऽयमदाह्योऽयमक्लेद्योऽशोष्य एव च ।
नित्यः सर्वगतः स्थाणुरचलोऽयं सनातनः ।।

—गीता, २-२३, २४.

"या आत्म्याला शस्त्रें तोडूं शकत नाहीत, अग्नि जाळूं शकत नाही, पाणी भिजवूं शकत नाही, वा वारा शोषूं शकत नाहीं. अविकारी, सर्वगत, स्थिर, अविचल व नित्य असा हा आत्मा आहे." गीता व वेदान्त यांच्या मतें हा आत्मा विभु आहे व कपिलांच्याहि मतें तो सर्वव्यापी आहे. भारतांतील कांही संप्रदायांच्या मतें, आत्मा हा अणुरूप आहे म्हणजे तो अत्यंत सूक्ष्म आहे; पण वस्तुतः याचा अर्थ असा की तो व्यक्त दशेंत अणूप्रमाणे प्रतीत होतो, पण त्याचें वास्तविक स्वरूप विभु अर्थात् सर्वव्यापी असें आहे.

यानंतर आणखी एक कल्पना उपस्थित होते. ती तुम्हांला कदाचित् विलक्षण वाटेल, पण भारताची ती वैशिष्टयपूर्ण अशी कल्पना आहे व भारतांतील एकूणएक सर्वच संप्रदायांमधे आपल्याला ती आढळते. म्हणून या कल्पनेकडे आपण विशेषेंकरून लक्ष द्यावें व तीं ध्यानांत ठेवावी असें माझें आपणांस सांगणें आहे; कारण जें म्हणून भारतीय आहे त्या सर्वांचा ही कल्पना जणु मूलाधारच आहे. ती कल्पना पुढील-

प्रमाणे आहे. इंग्रज व जर्मन विज्ञानांनी पाश्चात्त्य देशांत प्रचारिलेला भौतिक क्रमविकासाचा सिद्धान्त तुम्हांला माहीत असेल. हा सिद्धान्त आपल्याला सांगतो की, भिन्नभिन्न प्राण्यांचीं शरीरें मूलत: एकच आहेत; आपल्याला दिसून येणारे भेद हे एकाच वस्तूचीं भिन्न भिन्न रूपें होत; निकृष्ट अशा किड्यापासून तों सर्वश्रेष्ठ मानवापर्यंत शरीरांची एकच मालिका आहे; एकाचा दुसऱ्यांत क्रमशः विकास होऊन तें अधिकाधिक उन्नत होऊन अखेर पूर्णत्व पावणार आहे. ही कल्पना आपल्याकडेहि पूर्वीपासूनच आहे. योगदर्शनकार पतंजलि यांनी म्हटलें आहे--"जात्यन्तरपरिणामः प्रकृत्यापूरात् ।" एक जाति--एका श्रेणीचे जीव--दुसरींत परिणत होते. यालाच 'क्रमविकास' असें म्हणतात. 'परिणाम' म्हणजे एका गोष्टीचें दुसरींत परिवर्तन होणें होय; उदाहरणार्थ, एक जाति दुसरींत परिवर्तित होणें. मग युरोपीय तत्त्वज्ञांशीं आपला मतभेद कोणत्या बाबतींत आहे ? पतंजलि म्हणतात, "प्रकृत्यापूरात्"--"प्रकृतीकडून पूर्ति झाल्यामुळे." युरोपीय तत्त्वज्ञ म्हणतात की स्पर्धा, प्राकृतिक व लैंगिक निवड इत्यादींमुळे एका जीवाला दुसऱ्या प्रकारच्या जीवाचें शरीर धारण करणें भाग पडतें. पण ही दुसरी कल्पना अधिक खोल विश्लेषणांतून निष्पन्न झालेली आहे, ती म्हणजे 'प्रकृत्यापूरात्' ही होय. याचा अर्थ काय ? जीवाणु (amoeba) अधिकाधिक उन्नत होत होत अखेर बुद्ध होऊं शकेल हें आम्हांला मान्य आहे, पण त्याबरोबरच आम्हांला हेंहि निश्चितपणें माहीत आहे की एखाद्या यंत्रांत कोणत्या ना कोणत्या रूपांत विशिष्ट प्रमाणांत शक्ति घातल्याशिवाय त्या यंत्राकडून त्याच प्रमाणांत काम घेतां येणार नाही. शक्ति कोणत्याहि रूपांत प्रकट झाली तरी तिचें एकूण परिमाण हें सर्वदा सारखेंच राहतें. एका टोकाला विशिष्ट शक्ति अपेक्षित असेल तर दुसऱ्या टोकाला तितकीच शक्ति समाविष्ट करावी लागेल; तिचें तेथील स्वरूप वेगळें असूं शकेल, पण तिच्यामुळे पुढे निर्माण होणाऱ्या शक्तीएवढेंच तिचें परिमाण असलें पाहिजे. विकासाचें एक टोक बुद्ध हें असेल तर दुसऱ्या टोकाकडील जीवाणु हा देखील निराळ्या स्वरूपांतील बुद्ध असला पाहिजे. बुद्ध म्हणजे जर क्रमविकसित जीवाणु असेल तर जीवाणु हा देखील क्रमसंकुचित बुद्ध असला पाहिजे. हें विश्व म्हणजे जर अनंत शक्तीचें मूर्त स्वरूप असेल तर प्रलयावस्थेमधेहि तेवढीच

शक्ति त्यामधे संकुचित स्वरूपांत असलीच पाहिजे. यावरून प्रत्येक आत्मा हा अनंत असला पाहिजे हें सिद्ध होतें. आपल्या पायाशीं सरपटणाऱ्या लहानशा किड्यापासून तों मोठ्यांत मोठ्या संतापर्यंत सर्वांच्या ठायीं अनंत शक्ति, अनंत पावित्र्य व इतरहि सर्व गुण अनंत प्रमाणांत आहेत, त्यांच्यांतील भेद हा अभिव्यक्तीच्या कमीअधिक प्रमाणामुळेच आहे. किड्यामधे ही शक्ति अल्पशा प्रमाणांत व्यक्त होते, तुमच्यांत ती अधिक प्रमाणांत व्यक्त होत असेल, तर एखाद्या देवमानवांत ती त्याहूनहि जास्त प्रमाणांत व्यक्त होत असेल, एवढाच काय तो फरक. पण हें मात्र खरें की ही अनंत शक्ति सर्वांच्याच ठायीं आहे. पतंजलि म्हणतात, "ततः क्षेत्रिकवत्"—"शेतकरी शेतांत पाणी आणतो त्याप्रमाणे." आपल्या शेताच्या एखाद्या कोपऱ्यांतून शेतकरी तलावाचें पाणी आंत घेतो. पाण्याचा लोंढा शेतांत घुसूं नये यासाठी त्या कोपऱ्यांत एक दार बंद ठेवलेलें असतें. त्याला जेव्हा पाणी हवें असतें तेव्हा तो केवळ हें दार उघडतो व पाणी आपल्या स्वाभाविक गतीने शेतांत प्रविष्ट होतें. त्यासाठी त्यास अधिक शक्ति वापरावी लागत नाही. कारण ती शक्ति त्या जलाशयांत निहित असतेच. तद्वतच आपल्या प्रत्येकाच्या पाठीशीं—प्रत्येक जीवाच्या पाठीशीं अनंत शक्ति, अनंत पावित्र्य, अनंत आनंद, अनंत सत्ता यांचें भांडार आहे; फक्त हें दार म्हणजेच आपलें हें शरीर, आपण वस्तुतः जें कांही आहोंत त्याची पूर्ण अभिव्यक्ति होण्यामधे अडथळा आणीत असतें.

ज्या वेळीं ह्या शरीराची घडण अधिकाधिक उच्च प्रतीची होते —ज्या वेळीं तमोगुणाचें रजोगुणांत परिवर्तन होतें व रजोगुणाचें सत्त्वगुणांत परिवर्तन होतें त्या वेळीं ही शक्ति व हें पावित्र्य अधिकाधिक व्यक्त होऊं लागतें; आणि म्हणूनच आपले लोक खाण्यापिण्याचे नियम इतक्या काटेकोरपणें पाळीत असत. आता ह्या नियमांमधील मूळ तत्त्व कदाचित् लुप्त झालें असेल—जसें आपल्या विवाहप्रथेच्या बाबतींत झालें आहे तसें. आपल्या विषयाशीं या विवाहप्रथेचा जरी संबंध नाही, तरी उदाहरण म्हणून आपण तिचा विचार करूं या. दुसऱ्या एखाद्या प्रसंगीं याविषयी मी अधिक बोलेन; पण ह्या प्रसंगीं मी एवढेंच सांगूं इच्छितों की, आपल्या विवाहसंस्थेच्या मुळाशीं जीं तत्त्वें आहेत त्यांच्याच

आधारें खरी सभ्यता निर्माण होऊं शकते, अन्य कशाच्याहि आधारें नव्हे. स्त्रीला वा पुरुषाला कोणत्याहि पुरुषाशीं वा कोणत्याहि स्त्रीशीं केव्हाहि विवाह करण्याचें स्वातंत्र्य दिलें, वैयक्तिक सुखांची इच्छा आणि पाशवी वासनांची तृप्ति यांना समाजांत मोकळिक दिली तर त्याचा परिणाम वाईटच होईल; त्यामुळे अधम व राक्षसी वृत्तीची प्रजा निर्माण होईल. प्रत्येक देशांत एकीकडे मनुष्य अशी पाशवी प्रजा निर्माण करीत आहे, तर दुसरीकडे तिला नियंत्रणांत ठेवण्यासाठी पोलिसांच्या संख्येंत वाढ केली जात आहे, या पद्धतीने समाजांतील दोष दूर कसे करावयाचे ही खरी समस्या नसून या दोषांचें मूळ कारण कसें नष्ट करतां येईल हाच खरा प्रश्न आहे. आणि जोंवर तुम्ही समाजांत राहतां तोंवर तुमच्या विवाहाचा परिणाम समाजांतील प्रत्येक व्यक्तीवर होणारच आणि म्हणूनच तुम्ही कुणाशीं विवाह करावा व कुणाशीं करूं नये असा निर्बंध घालण्याचा अधिकार समाजाला आहे. आपल्या देशांतील विवाहसंस्थेच्या मुळाशीं अशीं उच्च तत्त्वें आहेत. वधूवरांच्या जन्मकुंडलींत जाति, गुण इत्यादींविषयीचा जो निर्देष असतो त्यानुसार आपल्या समाजांत विवाह होतात. या संदर्भांत मी सांगूं इच्छितों की, मनूंच्या मतें काम-वासनेंतून जी संतति उत्पन्न होते ती आर्य नाही. वेदांनी सांगितलेल्या नियमांनुसार ज्याचा जन्म व मृत्यु घडून येतो त्यालाच 'आर्य' असें नांव देतां येईल. आज प्रत्येक देशांत अशी फारच थोडीं आर्य प्रजा निर्माण होत आहे, म्हणूनच या युगांत पापाची वाढ होत असल्यामुळे आपण त्याला 'कलियुग' असें नांव देतों. हीं सर्व प्राचीन उच्च तत्त्वें आपण गमावून बसलों आहोंत, आज आपण ह्या सर्व कल्पना पूर्णांशाने प्रत्यक्षांत आणूं शकत नाही हें खरें आहे, तसेंच ह्या कल्पनांपैकी पुष्कळशा थोर कल्पनांना आपण विकृत रूप दिलें आहे हेंहि खरें आहे. आजचे आईबाप पूर्वीच्या आईबापांसारखे नाहीत, समाज पूर्वी जेवढा सुसंस्कृत होता तेवढा आज नाही, प्रत्येक व्यक्तीविषयी समाजाची पूर्वी जी आस्था होती ती आज शिल्लक राहिलेली नाही हें दुर्दैवाने खरें आहे. परंतु व्यवहारांत तत्त्वें सदोष रीतीने आणलीं गेलीं असलीं तरी तीं मूलतः निर्दोष आहेत; तत्त्वांचें आचरण नीट झालें नसलें, एखादी पद्धत असफल ठरली असली तरी आपण दुसरी एखादी पद्धति घेऊन

तीं तत्त्वें अधिक चांगल्या रीतीने व्यवहारांत आणण्याचा प्रयत्न करावा. मूळ तत्त्वें कां म्हणून नष्ट करावीं ? खाद्याखाद्यविचारालाहि हीच गोष्ट लागू आहे. या बाबतींतील तत्त्वें ज्या प्रकारें व्यवहारांत आणलीं जात आहेत तो प्रकार खरोखरच अगदी वाईट आहे, पण यांत मूळ तत्त्वांचा कांहीच दोष नाही. हीं तत्त्वें नित्य स्वरूपाचीं असून तीं नेहमी अनुसरलीं पाहिजेत. तीं आपण पुन: नव्याने, चांगल्या पद्धतीने व्यवहारांत आणण्याचा प्रयत्न करूं या.

असो. मीं पूर्वी सांगितलेल्या आत्म्याच्या कल्पनेवर भारतांतील प्रत्येक संप्रदायाला विश्वास ठेवावा लागतो. फरक एवढाच की, द्वैतवादी म्हणतात की दुराचरणाने आत्म्याचा संकोच होतो, म्हणजेच त्याची सर्व शक्ति व त्याचा स्वभाव हीं मर्यादित होऊन जातात व सत्कर्मांनी त्याच्या स्वभावाचा पुन: विकास होतो; तर याउलट अद्वैती म्हणतात की आत्मा संकोच वा विस्तार पावत नसून, आपल्याला तसा भास होत असतो. आत्म्याचा संकोच हा केवळ भास आहे. अद्वैतवादी व द्वैतवादी यांच्यांत एवढा भेद आहे, पण सर्वांचाच यावर विश्वास आहे की आत्मा हा मूलत:च सर्वशक्तिमान् आहे, त्यांत बाहेरून कांही शक्ति येत नाहीं किंवा आकाशांतून त्यांत कांही येऊन पडत नाही. तुम्ही हें ध्यानीं घ्या की वेद हे बाहेरून कुठूनतरी आंत आले (inspired) नसून ते आंतून बाहेर प्रकट झाले (expired) आहेत. बाहेरून त्यांची प्रेरणा मिळालेली नसून ते म्हणजे प्रत्येक आत्म्याच्या ठायीं नित्य वसत असलेले शाश्वत सिद्धान्त आहेत. वेद हे मुंगीच्या आत्म्याच्या ठायीं जसे आहेत तसेच ते देवदेवतांच्या ठायींहि आहेत. मुंगीचा केवळ विकास होऊन एखाद्या ऋषीचा देह तिला प्राप्त झाला म्हणजे वेद हे शाश्वत सिद्धान्तांच्या रूपांत तिच्यांतून प्रकट होऊं लागतील. सर्व शक्ति ही मूलत: आपल्या ठायीं आहे व मुक्ति ही आपल्या आंतच विद्यमान आहे हें तत्त्व आपण विशेषेंकरून समजून घेतलें पाहिजे. आत्मा हा संकुचित होतो असें म्हणा किंवा त्यावर मायेचें आवरण पडतें असें म्हणा, त्याला विशेष महत्त्व नाही; पण आम्त्याची मूळ कल्पना जशीच्या तशीच आहे, तिच्यावर तुम्हांला विश्वास ठेवावाच लागेल. प्रत्येकाच्या ठायीं अनंत शक्ति अव्यक्त रूपांत वास करीत असते--बुद्धाच्या ठायीं जी शक्ति

वसत असते तीच क्षुद्रातिक्षुद्र मानवांतहि वसत असते यावर तुम्हांला विश्वास ठेवावाच लागेल. हाच हिंदूंचा आत्म्याविषयीचा सिद्धान्त आहे.

परंतु या मुद्द्यावर मोठा संघर्ष सुरू होतो. बौद्धदेखील देहाचें विश्लेषण करून त्याला 'जडप्रवाह' म्हणतात, व मनाचें विश्लेषण करून त्यालाहि 'जडप्रवाह' म्हणतात. आणि आत्म्यासंबंधी ते म्हणतात की तो अनावश्यक आहे, त्याचें अस्तित्व मानण्याची गरज नाही. ते म्हणतात, "द्रव्य व द्रव्याच्या आधारें राहणारे गुण यांची कल्पना करण्याची काय गरज ? आम्ही केवळ गुणच मानतों. जेथे एक कारण मानल्याने सर्व गोष्टींची उपपत्ति लावतां येते तेथे दोन कारणें मानणें तर्कविसंगत आहे." याप्रमाणे तात्त्विक संघर्ष चालू झाला व द्रव्याचें अस्तित्व मानणाऱ्या सर्व सिद्धान्तांचें खंडन करून बौद्धांनी ते धुळीस मिळविले. जे तत्त्वज्ञ द्रव्य आणि गुण या दोहोंचें अस्तित्व मानीत होते, जे म्हणत असत की 'तुमचा एक आत्मा आहे, माझा एक आत्मा आहे, शरीर व मन यांहून भिन्न असा प्रत्येकाचा एकेक आत्मा आहे व प्रत्येकाला स्वतंत्र व्यक्तित्व आहे,' त्यांच्या मतांत सुरवातीपासूनच दोष होता.

आतापर्यंत द्वैतमत ठीकच आहे असें आपण पाहिलें. द्वैतवादी म्हणतात की एक स्थूल शरीर आहे, एक सूक्ष्म शरीर वा मन आहे, प्रत्येकाचा एकेक आत्मा आहे व या सर्व आत्म्यांना व्यापून असलेला परमात्मा वा ईश्वर आहे. आता येथेच अडचण उपस्थित होते. आत्मा व परमात्मा ह्या दोन्ही द्रव्यात्मक वस्तु आहेत व देह, मन इत्यादि त्यांना गुणांप्रमाणे चिकटलेले आहेत असें द्वैतवादी मानतात. पण द्रव्य कोणींहि पाहिलेलें नाही व त्याची कोणाला कल्पनाहि करतां येणार नाही; असें हें द्रव्य मानण्याचा काय उपयोग ? यापेक्षा क्षणिकविज्ञानवादी होऊन असें कां मानूं नये की सर्वकांही मानसिक तरंगांचा एक प्रवाहच आहे. हे तरंग परस्परसंबद्ध नाहींत, ते सर्व मिळून एक वस्तु बनत नाहीत, तर सागरांतील लाटांप्रमाणे ते एकामागूनएक येत असतात, त्यांच्यांत पूर्णता कधीच नसते व त्यांच्यांत अखंड एकत्वहि नसतें. मनुष्य म्हणजे अशा तरंगांची एक साखळीच आहे, एक तरंग विरून दुसऱ्यास जन्म देतो आणि अशा तरंगांची समाप्ति म्हणजे निर्वाण होय. तुम्हांला

आढळेल की द्वैतवादाजवळ याला कांही उत्तर नाही; त्याच्या वतीने याच्या विरुद्ध कांही युक्तिवाद केला जाऊं शकत नाही; तसेंच द्वैतवाद्यांचा ईश्वरहि येथे टिकाव धरूं शकत नाही. ईश्वर हा सर्वव्यापी आहे आणि तरीहि तो एक विशिष्ट व्यक्ति आहे, तो हातांविना सृष्टीची निर्मिति करतो व पायांविना चालतो, कुंभार ज्याप्रमाणे घट निर्माण करतो त्याप्रमाणे तो हें विश्व उत्पन्न करतो--या सर्व कल्पना बौद्धांच्या मतें अगदीं पोरकटपणाच्या आहेत. ते म्हणतात कीं ईश्वर हा असा असेल तर आम्ही त्याला कसून विरोध करूं, त्याची उपासना आम्ही मुळीच करणार नाहीं. सर्व विश्व हें दुःखमय आहे. हें असलें विश्व जर ईश्वराचें कार्य असेल तर अशा ईश्वराशीं दोन हात करणेंच योग्य होईल. आणि दुसरें असें की, ही ईश्वरविषयक कल्पना अशक्य व तर्कविसंगत आहे हें तुम्हां सर्वांना माहीत आहेच. विश्वरचनेचें कौशल्य पाहून जे तत्त्वज्ञ विश्वाचा एक निर्माता असला पाहिजे असा निष्कर्ष काढतात, त्यांच्या सिद्धान्तांतील ( Design Theory मधील ) दोषस्थळें शोधण्याचें आपल्याला प्रयोजन नाही, कारण या आपल्या क्षणिकविज्ञानवाद्यांनी तें कार्य भरपूर प्रमाणांत केलेलें आहे; व म्हणूनच सगुण ईश्वराची ही कल्पना कोलमडून पडते.

सत्य, केवळ सत्यच अद्वैतवाद्याचें ब्रीदवाक्य आहे. "सत्यमेव जयते नानृतं । सत्येन पन्था विततो देवयानः"--"सत्याचाच अखेर विजय होतो, असत्याचा नाही. सत्यामधूनच देवलोकाचा मार्ग गेलेला आहे." सत्याचा हा ध्वज हातीं घेऊन प्रत्येकजण पुढे चालत असतो; पण तें केवळ दुर्बलांना दडपून टाकण्यासाठीच असतें. ईश्वराविषयीच्या आपल्या द्वैतवादी कल्पनेनुसार तुम्ही मूर्तिपूजा करणाऱ्या एखाद्या गरीब बिचाऱ्या माणसाशीं भांडण उकरून काढतां, आपले विचार अगदी तर्कशुद्ध आहेत व आपण त्याला गोंधळांत टाकूं शकूं असें तुम्हांला वाटतें; पण त्याने तशाच युक्तिवादाने तुमच्या ईश्वरविषयक कल्पनेवर हल्ला केला व तुमचा सगुण ईश्वर हा केवळ कल्पनेचा खेळ आहे असें म्हटलें, तर तुम्ही काय करतां ? मग तुम्ही 'विश्वासा'ची ढाल पुढे करतां, किंवा तुम्ही त्याच्यावर नास्तिकपणाचा छाप मारून ओरड करूं लागतां. दुर्बल माणूस नेहमीच असें करीत असतो, जो त्याला पराभूत करतो

त्याला तो 'नास्तिक' असें म्हणून मोकळा होतो. तुम्हांला जर बुद्धिवादी व्हावयाचें असेल तर सर्वच बाबतींत बुद्धिवादी व्हा व तें जर शक्य नसेल तर तुम्हांला ज्या सवलती हव्या असतात त्या इतरांनाहि द्या. अशा सगुण ईश्वराचें अस्तित्व तुम्ही कसें सिद्ध करणार? उलटपक्षीं त्याचें अस्तित्व नाही असें एकप्रकारें सिद्ध करतां येईल. त्याचें अस्तित्व सिद्ध करूं शकेल असा अल्पमात्रहि पुरावा आढळत नाही, उलट विरोधी मताचे युक्तिवाद मात्र प्रबळ आहेत. तुमचा ईश्वर, त्याचे गुण, द्रव्यरूप असलेले असंख्य आत्मे, त्यांचें स्वतंत्र व्यक्तित्व या साऱ्या गोष्टी तुम्ही कशा सिद्ध करूं शकाल? तुमचें व्यक्तित्व कोठे आहे? देह म्हणून तुम्हांला स्वतंत्र व्यक्तित्व नाही, कारण पूर्वीच्या बौद्धांपेक्षाहि तुम्हांला आज हें अधिक चांगल्या रीतीने कळलें आहे की सूर्यांत या क्षणीं जें जडद्रव्य आहे तें पुढच्या क्षणीं तुमच्यांत येऊं शकेल व तेंच नंतरच्या क्षणीं तुमच्यांतून निघून वनस्पतींत जाऊं शकेल. अहो महाशय, मग तुमचें स्वतंत्र व्यक्तित्व कशांत आहे? मनालाहि हीच गोष्ट लागूं आहे. मग तुमचें व्यक्तित्व कोठे आहे? तुमचा विचार आज एक असतो, तर उद्या तो दुसराच असतो, बालवयांत तुम्ही जसा विचार करीत होतां तसा आज करीत नाही, व वृद्ध आपल्या तरुणपणीं जसा विचार करीत होते तसा आज ते करीत नाहीत. मग तुमचें व्यक्तित्व उरलें कोठे? तुमच्या जाणिवेंत वा अहंकारांत तें आहे असें म्हणतां येणार नाही. कारण या अहंकाराने तुमच्या अस्तित्वाचा केवळ अल्पसा अंशच व्यापलेला असतो. मी तुमच्याशीं बोलत आहें, या वेळीं माझीं सर्व इंद्रियें कार्यशील आहेत, पण त्यांची मला जाणीव नाही. जाणीव हेंच जर अस्तित्वाचें प्रमाण असेल तर त्या वेळीं माझीं इंद्रियें अस्तित्वांतच नाहीत असें म्हणावें लागेल, कारण मला त्यांची जाणीव नाही. मग तुमच्या सगुण ईश्वराच्या कल्पना कशा टिकतील? अशा ईश्वराचें अस्तित्व तुम्ही कसें प्रमाणित करणार?

शिवाय, बौद्ध ठामपणें म्हणतील की, अशी ईश्वरकल्पना नुसती तर्कविसंगतच आहे असें नव्हे, तर ती अनीतीला कारणीभूत होणारीहि आहे; कारण माणसाला ती दुर्बल बनविते व बाहेरून मदतीची याचना करण्यास त्याला शिकविते, पण बाहेरून कोणीहि साहाय्य करूं शकत

नाही. हें विश्व माणसानेच निर्मिलें आहे, मग या विश्वाबाहेरच्या एका काल्पनिक व्यक्तीवर कां म्हणून विसंबून राहावें ? ज्याला कोणीं कधी पाहिलें नाही, ज्याला कोणीं कधीं अनुभविलें नाही वा ज्याच्याकडून कोणाला कधी साहाय्य लाभलें नाही त्याच्यावर कां म्हणून विसंबून राहावें ? तुम्ही स्वतः भित्रे कां बनतां, आणि एखाद्या कुत्र्याप्रमाणे बनून त्या काल्पनिक व्यक्तीपुढे गुढघे टेकून 'मी दुर्बल आहें, अपवित्र आहें, जगांत जें कांही वाईट आहे तें सगळें माझ्यांत आहे' असें म्हणणें हीच माणसाची सर्वोच्च अवस्था आहे असें आपल्या मुलांना कां शिकवितां? इतकेंच नव्हे, तर बौद्ध म्हणतील की जेव्हा तुम्ही वरीलप्रमाणे शिकवितां तेव्हा तुम्ही केवळ खोटे बोलतां असें नसून आपल्या मुलाबाळांचें भयंकर अनिष्ट करीत असतां; कारण, लक्षांत ठेवा की या जगांत माणूस स्वतःला जसें मानतों तसा तो बनतो. भगवान बुद्धांनी सर्वप्रथम पुढील शब्द उच्चारले--"तुम्ही जसा विचार करतां तसें तुम्ही असतां व जसा तुम्ही विचार कराल तसें तुम्ही व्हाल." हें खरें असेल तर, 'मी कांहीच नव्हे' असें स्वतःला शिकवूं नका; तसेंच, 'जो या जगांत राहत नसून मेघांच्या पलीकडे वास्तव्य करतो, त्याने साहाय्य केल्याविना मी कांहीच करूं शकत नाही' असा विचारहि करूं नका. असा विचार केल्यास परिणामीं तुम्ही दिवसेंदिवस दुबळें होत जाल. "आम्ही अत्यंत अपवित्र आहोंत, हे ईश्वरा, तूं आम्हांला पवित्र कर" असें वारंवार म्हटल्यामुळे संमोहित होऊन तुम्ही सर्व प्रकारच्या पापकर्मांत पडाल. बौद्ध म्हणतात की सगुण ईश्वराच्या या कल्पनेमुळे समाजांतील नव्वद टक्के पाप उत्पन्न झालें आहे; ह्या सुंदर मानवी जीवनाचें अंतिम उद्दिष्ट कुत्र्याप्रमाणे परावलंबी बनणें हें आहे ही कल्पनाच अत्यंत भयंकर आहे. बौद्ध वैष्णवाला म्हणेल की, 'ईश्वराचें निवासस्थान असलेल्या वैकुंठांत जाऊन, तेथे ईश्वरापुढे हात जोडून अनंतकाळ उभे राहणें हाच जर तुमचा आदर्श असेल व हेंच जर तुमच्या जीवनाचें उद्दिष्ट असेल, तर तसें करण्यापेक्षा आत्महत्या करणें बरें!' बौद्ध आग्रहपूर्वक असेंहि म्हणतील की, यांतून सुटण्याकरिताच आम्ही निर्वाण वा शून्यावस्था प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न करीत असतों. या कल्पना थोडा वेळ मी बौद्ध दृष्टिकोनांतून तुमच्यापुढे मांडीत आहें,

कारण, अद्वैतपर कल्पनांमुळे आपण नीतीपासून भ्रष्ट होतों असें आपल्याला आजकाल सांगण्यांत येत असते, आणि म्हणून दुसऱ्या पक्षाचें काय म्हणणें आहे हें मी दाखवीत आहें. आपल्याला या दोन्ही पक्षांचा धीटपणें व निर्भयपणें विचार केला पाहिजे.

आपण प्रथम हें पाहिलें की सगुण ईश्वराने ही सृष्टि निर्माण केली हें सिद्ध करतां येणार नाही. आज यावर एखादें लहान मूल तरी विश्वास ठेवील काय ? ज्याअर्थी कुंभार घट निर्माण करतो त्याअर्थी ईश्वरानेहि तद्वतच हें जग निर्माण केलें आहे !--हें जर खरें असेल तर कुंभार हाहि ईश्वरच झाला असें म्हणावें लागेल. आणि कोणी जर असें म्हणेल की कुंभार हा मस्तकाविना वा हाताविनाहि काम करूं शकतो तर तुम्ही त्याला वेड्यांच्या इस्पितळांत न्याल! ज्याची तुम्ही साहाय्या-साठी नेहमी विनवणी करीत असतां त्या तुमच्या सृष्टिकर्त्या सगुण ईश्वराने तुम्हांला कधीतरी साहाय्य केलें आहे काय ?--हें आधुनिक विज्ञानाचें तुम्हांला दुसरें आव्हान आहे. हे वैज्ञानिक असें सिद्ध करतील की, तुम्हांला जें साहाय्य झालें असेल तें तुमच्या प्रयत्नांनीच तुम्हांला प्राप्त झालें असतें, व तुम्ही आपली शक्ति असल्या रडण्या-आळवण्यांत खर्च करावयास नको होती, कारण त्याविना अन्यप्रकारें तुमचें कार्य अधिक चांगल्या रीतीने साध्य झालें असतें. आणि आपल्याला हें माहीत आहे की या सगुण ईश्वराच्या कल्पनेबरोबरच अत्याचार व पुरोहितगिरी येते. सगुण ईश्वराची ही कल्पना जेथे म्हणून आहे तेथे अत्याचार व पुरोहितगिरी ही असतेच, आणि बौद्ध म्हणतात कीं सगुण ईश्वराची ही खोटी कल्पना मुळापासून खणून काढल्याशिवाय अत्याचाराचा अंत होणें शक्य नाही. एखाद्या देवतेपुढे आपल्याला विनम्र होऊन राहिलें पाहिजे असें जोंवर मनुष्याला वाटतें तोंवर हा पुरोहित वर्ग राहणारच, तो विशेष हक्कांवर अधिकार सांगणारच, आणि लोकांना स्वतःपुढे शिर नमविण्यास लावणारच; व हे बिचारे लोक पुरोहितांना ईश्वराजवळ स्वतःची मध्यस्थी करावयास विनंती करणारच. तुम्ही ब्राह्मणांना नाहीसे करूं शकाल, पण लक्षांत ठेवा की जे ब्राह्मणांना नाहीसे करतील तेच त्यांच्या जागीं येतील व ते अधिक अत्याचारी ठरतील; कारण ब्राह्मणांच्या ठायीं थोडेंतरी औदार्य आहे, पण त्यांच्या जागीं आलेले हे

उपटसुंभ नेहमीच भयंकर अत्याचारी ठरतील. भिकाऱ्याला धन प्राप्त झालें तर तो जगाला तुच्छ लेखतो. म्हणून ही सगुण ईश्वराची कल्पना जोंवर आहे तोंवर पुरोहितवर्ग राहीलच व तोंवर समाजांत उच्च नैतिकता निर्माण करण्याची व ती नांदविण्याची आशा करणें अशक्य आहे. पुरोहितगिरी व अत्याचार यांची नित्य युति असते. सगुण ईश्वराची ही कल्पना कां निर्माण झाली ?--कारण प्राचीन काळीं कांही बलवान लोकांनीं सामान्य लोकांवर कब्जा बसविला आणि 'तुम्ही आमच्या आज्ञेंत राहा, नाहीतर आम्ही तुमचा नाश करूं' असें त्यांना सांगितलें. या अशा लोकांनीच सगुण ईश्वराची कल्पना शोधून काढली; ही कल्पना अस्तित्वांत येण्याचें दुसरें कांही कारण नाही. 'महद्भयं वज्रमुद्यतम्'--आज्ञेचें पालन न करणाऱ्या प्रत्येकास ठार करण्यासाठी वज्र उगारून उभ्या असलेल्या पुरुषाची ही कल्पना आहे.

यानंतर, बौद्ध म्हणतात की, सर्वकांही कर्मविपाकाच्या नियमानें घडत असतें या मुद्द्यापर्यंत तुमचें म्हणणें तर्कसंगत आहे. तुम्ही असंख्य आत्मे मानतां, त्यांना जन्म व मृत्यु नाही असें म्हणतां; तुमचा कर्मवाद व असंख्य आत्म्यांवर तुमचा हा विश्वास निस्संशय तर्कास धरून आहे. कारण असलें कीं कार्य असलेंच पाहिजे; वर्तमानकाळांत जें कांही घडत आहे त्याचें कारण भूतकाळांत असलेंच पाहिजे व वर्तमानकाळांत जें कांही घडतें त्याचें फल भविष्यकाळांत दिसेलच. हिंदु म्हणतात की कर्म हें जड आहे, चेतन नाहीं, म्हणून तें फलित होण्यासाठी कोणत्या ना कोणत्या रूपांत चैतन्याची आवश्यकता आहेच. यावर बौद्ध म्हणतात कीं, 'एखाद्या झाडास फळें लागण्यासाठी चैतन्य आवश्यक आहे काय ? मीं बीं पेरलें व झाडाला पाणी दिलें तर त्याला फळें लागतीलच, त्यासाठी चैतन्य आवश्यक नाही.' यावर तुम्ही म्हणाल की तेथे मूलतः कांही चैतन्य असलें पाहिजे; पण आत्मे हेच चैतन्य असल्याने दुसरें कोणतें चैतन्य मानण्याची आवश्यकता नाही. यावर जैन म्हणतील की, 'आत्म्यांत जर चैतन्य असेल तर ईश्वर मानण्याची आवश्यकता ती काय?' बौद्धांचा आत्म्यावर विश्वास नाही, पण जैनांचा आत्म्यावर विश्वास असूनहि ते ईश्वर मानीत नाहीत. म्हणून हे द्वैतवाद्यांनो, तुमची तर्कसंगति व तुमची नैतिकता आता कोठे राहिली ? अद्वैतवादावर टीका

करून, या अद्वैतवादामुळे अनैतिकतेचें पोषण होईल असें तुम्ही म्हणतां, पण द्वैती संप्रदायांनी भारतांत काय काय केलेलें आहे याचेंहि थोडें परिशीलन करून पाहा. अद्वैत विचारसरणीचे जर वीस हजार गुन्हेगार असतील तर द्वैतवाद्यांमधेहि तेवढेच गुन्हेगार आढळतील. सामान्यत: द्वैतवाद्यांमधेच अधिक गुन्हेगार आढळतील, कारण अद्वैताचें आकलन होण्यास अधिक उन्नत मनाची जरूरी असते व अद्वैतवाद्याला भय दाखवून त्याच्याकडून कांही करवून घेणें क्वचितच शक्य असतें. मग तुम्ही हिंदु लोक जाल कुठे ? बौद्धांच्या पकडींतून सुटण्याचा कांही मार्ग तर दिसत नाही. तुम्ही वेदांचा आधार दाखवाल, पण ते तर वेद मानीत नाहीत. ते म्हणतील, "आमचे त्रिपीटक वेगळेंच सांगतात, ते अनादि व अनंत आहेत, ते बुद्धदेवांनी रचलेले नाहीत, कारण त्यांनी स्वत: म्हटलें आहे की त्यांनी त्यांचा केवळ पुनरुच्चार केला; हे त्रिपीटक नित्य आहेत." शिवाय बौद्ध असेंहि म्हणतील की "तुमचें वेद चूक आहेत, आमचेच ग्रंथ खरे वेद होत. तुमचे वेद ब्राह्मण पुरोहितांनी रचलेले आहेत, म्हणून ते टाकाऊ आहेत." यांतून तुम्ही सुटका कशी करून घेणार ?

यांतून सुटण्याचा मार्ग पुढीलप्रमाणे आहे. द्रव्य व गुण हे भिन्न मानल्यामुळे बौद्धांनी पहिला आक्षेप घेतला आहे. हा तात्त्विक स्वरूपाचा आक्षेप आहे. अद्वैती म्हणतात की, "तसें नाही; द्रव्य व गुण यांत भिन्नता नाही. तुम्हांला तो प्राचीन दृष्टान्त माहीत असेलच की दोरीच्या ठिकाणीं सापाचा आभास होतो; तुम्ही साप पाहतां त्या वेळीं दोरीचें ज्ञान मुळीच नसतें, तेव्हा दोरी लुप्त झालेली असते. द्रव्य व गुण असा भेद तात्त्विक स्वरूपाचा असून तो तत्त्वज्ञाच्या डोक्यांतच असतो, त्याला प्रत्यक्षांत कांही अस्तित्व नाही. तुम्ही जर सामान्य माणूस असाल तर तुम्हांला फक्त गुणच दिसतील, व तुम्ही जर योगी असाल तर तुम्हांला केवळ द्रव्यच दिसेल; पण गुण व द्रव्य हीं दोन्हीं एकाच वेळीं दिसणें शक्य नाही. म्हणून बौद्धांनो, द्रव्य व गुण यासंबंधी तुम्ही घालीत असलेला वाद चुकीचा व वस्तुस्थितीला सोडून आहे. द्रव्य जर गुणरहित असेल तर एकच एक द्रव्य असलें पाहिजे. तुम्ही आत्म्यांतून गुण जर काढून घेतलेत, व ते केवळ मनांत असून आत्म्यावर आरोपित आहेत

असें दाखविलें, तर आत्मे अनेक असूंच शकणार नाहीत, कारण गुणांमुळेच एक आत्मा दुसऱ्याहून भिन्न होत असतो. एक आत्मा दुसऱ्याहून भिन्न आहे हें तुम्हांला कसें कळतें ?––कोणत्यातरी भेददर्शक लक्षणांमुळे, म्हणजेच गुणांमुळे. आणि जेथे गुणच नाहीत तेथे भेद तरी कसा असूं शकेल ? म्हणून आत्मे हे एकाहून अधिक नाहीत, तो एकच आहे. तुम्ही म्हणतां तो परमात्माहि मानणें अनावश्यक आहे, कारण वस्तुतः तुमचा आत्माच परमात्मा आहे. त्या एका आत्म्यालाच 'परमात्मा' हें नांव आहे. त्यालाच 'जीवात्मा' म्हणतात व त्याला इतरहि अनेक नांवें देतात. आणि हे सांख्यादि द्वैतवाद्यांनो, तुम्ही म्हणतां की आत्मा विभू वा सर्वव्यापी आहे; तर मग तुम्ही अनेक आत्मे कसे मानतां ? अनंत तत्त्वें दोन कशीं असूं शकतात ? अनंत तत्त्व एकच असूं शकतें. तें एक तत्त्व म्हणजे अनंत आत्मा हेंच होय; बाकी सर्वकांही त्याचींच रूपें आहेत." या उत्तराने बौद्ध हतबल होतात. पण अद्वैतदर्शन येथेच संपत नाही.

अद्वैतमत हें केवळ खंडन करणाऱ्या इतर दुबळ्या मतांसारखें नाही. जेव्हा अन्य मतें खूप जवळ येऊन संभ्रम निर्माण करूं लागतात तेव्हा अद्वैतमत त्यांचें खंडन करून त्यांना दूर सारतें व आपली भूमिका स्पष्ट करतें, इतकेंच काय तें. केवळ अद्वैतमतच असें आहे की जें केवळ खंडन करून व शास्त्रांचा आधार दाखवून थांबत नाही. असो. अद्वैतवाद्यांचें म्हणणें पुढीलप्रमाणे आहे: विश्व म्हणजे नित्य गतिमान प्रवाह आहे असें तुम्ही म्हणतां. व्यष्टि या दृष्टीने सर्वकांहीं गतिमान असतें; तुम्ही गतिमान् आहां, टेबल गतिमान् आहे, गति सर्वत्र आहे; म्हणूनच ह्याला 'संसार' (सृ=गमन) म्हणतात; म्हणूनच ह्याला 'जगत्' (गम्=गमन) म्हणतात. म्हणून या जगांत व्यक्तित्व असें कांही असूंच शकत नाही, कारण व्यक्तित्व हें अपरिवर्तनीय असतें; परिवर्तनीय वा विकारी व्यक्तित्व असूंच शकणार नाही, तो एक वदतो व्याघात होईल. या आपल्या लहानशा जगांत 'व्यक्तित्व' अशी वस्तुच नाही. विचार व भावना, मन व शरीर, मानव, पशु व वनस्पति हीं सर्व नित्यप्रवाही अशा अवस्थेंत आहेत; पण समजा की तुम्हीं साकल्याने समस्त विश्वाचा 'समष्टि' म्हणून विचार केला; मग त्यांत गति वा

परिवर्तन संभवतें काय ? निश्चितच नाहीं. कमी गतिमान् असलेल्या वा मुळीच गति नसलेल्या अशा वस्तूशीं तुलना केल्यानेच गतीची कल्पना शक्य होते. म्हणून समष्टिरूपाने हें विश्व स्थिर व अविकारी असेंच आहे. म्हणून जेव्हा 'मीच हें समग्र विश्व आहें' अशी तुम्हांला अनुभूति येईल तेव्हाच तुम्हांला खरें व्यक्तित्व असेल. म्हणून वेदान्ती म्हणतात की जोंवर द्वैतभाव आहे तोंवर भय राहणारच.जेव्हा दुसरा म्हणून कोणी दिसणार नाही, जेव्हा दुसरें म्हणून कांही अनुभवास येणार नाही, जेव्हा सर्वकांही एक आहे अशी धारणा बनेल तेव्हाच भय नाहीसें होईल, तेव्हाच मनुष्य मृत्यूच्या पलीकडे, संसाराच्या पलीकडे जाऊं शकेल. मनुष्याचें व्यक्तित्व त्याच्या व्यष्टिरूपांत नसून विश्वरूप होण्यांतच त्याचें व्यक्तित्व आहे असें अद्वैतदर्शन आपल्याला शिकवितें. समग्र जगताशीं एकरूप असल्याची जेव्हा तुम्हांला अनुभूति येईल तेव्हाच तुम्हांला अमरत्व लाभेल. जेव्हा तुम्ही विश्वरूप व्हाल तेव्हाच तुम्ही भय व मृत्यु यांच्या पलीकडे जाल. आणि मग तुम्हांला अनुभव येईल कीं विश्व, ईश्वर, समग्र अस्तित्व व समष्टि ही सर्व एकच आहेत. ती एक अखंड सत्ता आपल्याला वैविध्यपूर्ण जगाच्या रूपांत दिसत असते. ज्यांचीं मनें आपल्यासारखीं आहेत त्यांनाहि तसेंच दिसत असतें. ज्यांनी थोडीफार सत्कर्में केलीं आहेत व ज्यांचें मन थोडेंफार उच्चावस्थेंत गेलें आहे त्यांना मृत्यूनंतर हीच अखंड सत्ता स्वर्गरूप दिसूं लागते व त्यांना तेथे इंद्रादि देवता दिसूं लागतात. याहून अधिक उन्नत मन असलेल्या लोकांना तीच सत्ता ब्रह्मलोकाच्या रूपांत दिसते व पूर्णत्व पावलेल्या सिद्धांना पृथ्वी, स्वर्ग, वा अन्य कोणताच लोक दिसत नाही, सर्व ब्रह्मांड विलीन होऊन त्या जागीं त्यांना एकमेव ब्रह्माचीच अनुभूति येऊं लागते.

या ब्रह्माचें ज्ञान आपल्याला होऊं शकेल काय ? संहितेमधे केलेल्या अनंताच्या चित्रणाविषयी मीं तुम्हांला सांगितलेंच आहे. येथे उपनिषदांत दुसरी बाजू, म्हणजे, अंतर्जगतांतील अनंत चित्रित करण्याचा प्रयत्न तुम्हांला आढळेल. संहितेंत बाह्य जगताच्या अनंतत्वाचें वर्णन होतें; येथे विचारजगताच्या वा भावजगताच्या अनंतत्वाचें वर्णन आहे. संहितेंत अस्तिवाचक भाषेंत अनंताचें वर्णन करण्याचा प्रयत्न होता, तर येथे ती

भाषा कुंठित होऊन नास्तिवाचक शब्दांनी तें व्यक्तविण्याचा प्रयत्न केला आहे. हें विश्व आहे, तें ब्रह्मच आहे हें खरें आहे; पण आपण तें जाणूं शकतों काय ? नाही ! मुळीच नाही ! ही गोष्ट तुम्हीं पुन्हा एकदा नीटपणें समजून घेतली पाहिजे. पुनःपुनः तुमच्या मनांत हा प्रश्न निर्माण होईल की हें जर ब्रह्म असेल तर आपल्याला त्याचें ज्ञान कसें होऊं शकेल ? "विज्ञातारमरे केन विजानीयात्"—"ज्ञात्याचें ज्ञान कशाने होणार ?" या ज्ञात्याला कसें जाणतां येईल ? डोळे सर्व-कांही पाहतात, पण ते स्वतःला पाहूं शकतात काय ? त्यांना तें शक्य नाही. ज्ञान हीच मुळांत खालची अवस्था आहे. आर्यांच्या वंशजांनो, तुम्हीं ही गोष्ट ध्यानीं घेतली पाहिजे, कारण त्यांत मोठें रहस्य साठ-विलेलें आहे. तुमच्या समोर येणारीं सर्व पाश्चात्त्य प्रलोभनें एकाच तात्त्विक आधारावर आधारलेलीं आहेत; तो आधार म्हणजे इंद्रिय-जन्य ज्ञानाहून श्रेष्ठ असें कांहीच नाही हा होय. आपल्या पौर्वात्यांच्या वेदांनीं असें म्हटलें आहे की, हें इंद्रियजन्य ज्ञान वस्तूहून हिणकसच असतें, कारण ज्ञान म्हणजे वस्तूला मर्यादित करणें होय. एखादी वस्तु जाणावयाची म्हटलें की ती तुमच्या मनाच्या द्वारें तात्काळ मर्यादित केली जाते. एखादें कालव मोतीं कसें तयार करतें याविषयी पूर्वी सांगित-लेला दृष्टान्त आठवा, मग ज्ञान म्हणजे मर्यादित करणें कसें तें तुमच्या लक्षांत येईल. एखाद्या वस्तूचें तुम्हांला जेव्हा ज्ञान होतें तेव्हा ती वस्तु आंत घेऊन तिला तुम्ही आपल्या जाणिवेच्या पातळीवर आणतां. त्यामुळे त्या वस्तूचें संपूर्ण ज्ञान तुम्हांला होत नाही. सगळ्या वस्तूंच्या ज्ञानाच्या बाबतींत हें सत्य आहे, मग अनंत तत्त्वाच्या बाबतींत तरी वेगळें काय असणार ? जो सर्व ज्ञानाचें मूळ उपादान आहे, जो सर्वसाक्षी आहे, ज्याच्यावांचून ज्ञान संभवत नाही, जो निर्गुण आहे, जो सर्व विश्वाचा व आपल्या आत्म्याचा साक्षी आहे, त्या परमात्म्याला तुम्ही कसें मर्यादित करूं शकाल ? त्याला तुम्ही कसें जाणूं शकाल ? कोणत्या साधनांनी त्याला तुम्ही बांधूं शकाल ? प्रत्येक गोष्ट, नव्हे, अवघें विश्व हें त्याला जाणण्याचा एक व्यर्थ असा प्रयत्न आहे. हा अनंत आत्मा जणुकांही स्वतःचें रूप आरशांत पाहण्याचा प्रयत्न करीत आहे, आणि निकृष्ट जीवापासून तों ब्रह्मदेवापर्यंत सर्वकांही त्याचे आरसे आहेत;

हा आत्मा एक एक आरसा घेऊन त्यांत आपलें रूप पाहण्याचा प्रयत्न करतो; एक आरसा अपुरा वाटला की तो टाकून तो दुसरा आरसा घेतो, आणि असें करतां करतां मनुष्यदेह प्राप्त झाल्यावर त्याला कळून येतें की हें सर्वकांहीं सान्त आहे व सान्तांत अनंताचें रूप प्रकट होऊं शकत नाहीं. नंतर माघार सुरू होते. यालाच 'वैराग्य' असें नांव आहे. इंद्रियांपासून परत फिरा, इंद्रियांकडे जाऊं नका--हाच वैराग्याचा मूलमंत्र आहे, हाच सर्व नीतिमत्तेचा मूलमंत्र आहे, हाच सर्व प्रकारच्या कल्याणाचा मूलमंत्र आहे; कारण तुम्ही हें लक्षांत ठेवा की तपस्येंतून, त्यागांतूनच विश्वाची उत्पत्ति झाली असें आपल्या शास्त्रांनी सांगितलें आहे. आणि जेव्हा तुम्ही मागे मागे जाल तेव्हा सर्व रूपें, सर्व शरीरें तुमच्यापुढे प्रकट होतील, तुम्ही एकामागून एक त्यांचा त्याग कराल आणि अखेर तुमचें स्व-रूप तेवढें उरेल. हाच मोक्ष होय.

"विज्ञातारमरे केन विजानीयात्"--"ज्ञात्याला कसें जाणावयाचें?" --हें तत्त्व आपण समजून घेतलें पाहिजे. ज्ञात्याला जाणतां येणार नाही, कारण तसें झालें तर तो ज्ञाता म्हणून उरणारच नाही. आरशांत तुम्ही आपल्या डोळ्यांचें प्रतिबिंब पाहिलें तर तेथे दिसणारे डोळे हे कांही तुमचे खरे डोळे नव्हत, तें दुसरेंच कांहीतरी आहे--तें केवळ प्रतिबिंब आहे. आता प्रश्न असा की तुम्ही जो आत्मा आहांत तो आत्मा, तो अनंत सर्वव्यापी पुरुष जर नुसता साक्षीच असेल तर त्याचा उपयोग काय? तो आपल्याप्रमाणे चालूंफिरूं शकत नाही, जीवन धारण करूं शकत नाही, जगाचा उपभोग घेऊं शकत नाही. साक्षी उपभोग कसा घेऊं शकेल हें लोकांना समजत नाही. ते म्हणतात, "अहो, तुम्ही हिंदु लोक निष्क्रिय झालां आहांत, कुचकामाचे झालां आहांत; व ही अवस्था 'मी साक्षी आहें' या सिद्धान्तामुळे झालेली आहे!" त्यांना पहिलें उत्तर हेंच की, साक्षी हाच खऱ्या अर्थाने उपभोग घेऊं शकतो. एखादी कुस्ती चालूं असेल तर तिचा आनंद कोण घेऊं शकेल, तींत भाग घेणारा की बाहेरील प्रेक्षक? या जीवनांत एखाद्या गोष्टीकडे तुम्ही जेवढ्या अधिक प्रमाणांत साक्षीवृत्तीने पाहाल तेवढा त्या गोष्टींपासून तुम्हांला अधिक आनंद मिळेल. हाच खरा आनंद होय: आणि म्हणून तुम्ही या विश्वाचे जेव्हा साक्षी व्हाल तेव्हाच तुम्ही अनंत आनंदाचे धनी व्हाल,

आणि तेव्हाच तुम्ही मुक्त पुरुष व्हाल. जो साक्षी असतो तोच निष्काम भावाने, स्वर्गाचीहि कामना न बाळगतां, निंदास्तुतीविषयी निरपेक्ष होऊन कर्म करूं शकतो. जो साक्षी असतो तोच खरा आनंद उपभोगीत असतो, अन्य कोणीहि नाही.

अद्वैतवादाच्या नैतिक पैलूकडे वळण्याआधी त्याच्या तात्त्विक व नैतिक पैलूंच्या मध्यभागीं असलेल्या एका विषयाचा विचार करावा लागेल. हा विषय म्हणजे 'मायावाद' होय. अद्वैतदर्शनांतील एक एक विषय समजण्यास कित्येक वर्षें लागतील व एक एक विषय विशद करण्यास महिनेहि पुरणार नाहींत. म्हणून मीं त्यांचा नुसता ओझरता उल्लेख केल्यास मला आपण क्षमा करा. हा मायावाद समजण्यास नेहमीच अत्यंत कठीण असा मानला गेला आहे. थोडक्यांत मी आपणांस सांगेन की हा कांही एखादा वाद नसून, देश-काल-निमित्त या तीन कल्पनांचें एकीकरण आहे, आणि देश-काल-निमित्ताचें आणखी विश्लेषण करून त्यांना 'नामरूप' हें नांव देण्यांत आलें आहे. उदाहरण म्हणून सागरांतील एक लाट घ्या. सागराहून ती केवळ नाम व रूप यांमुळेच वेगळी आहे, या नाम-रूपास लाटेहून वेगळें अस्तित्व नाही; लाटे बरोबरच तीं असतात. लाट शांत होईल व लाटेशीं संबद्ध असलेलें नाम-रूप कायमचें विरून जाईल, पण पाणी होतें तेवढेंच राहील. म्हणून मी व तुम्ही, मानव व पशु, देव व मानव ह्यांच्यांत ही मायाच भेद निर्माण करते. वस्तुतः या मायेमुळेच हा आत्मा जणु लाखो जीवांमधे बद्ध होऊन राहतो व नामरूपांमुळेच जीवाजीवांमधे भेद दिसत असतो. हीं नामरूपें टाकून देतां आलीं तर हे सर्व भेद कायमचे लयास जातील व तुमचें सत्य स्वरूप तेंवढेंच उरेच. यालाच 'माया' असें म्हणतात.

तसेंच माया हा कांही एखादा वाद नसून तें वस्तुस्थितीचें वर्णन आहे. जेव्हा वास्तववादी (Realist) म्हणतात की हें टेबल सत्य आहे, तेव्हा त्याचा अर्थ असा असतो की टेबल या वस्तूस स्वतःचें असें स्वतंत्र अस्तित्व आहे, जगांत दुसऱ्या कशावरहि त्याचें अस्तित्व अवलंबून नाही व हें सर्व जग जरी नाश पावलें तरीहि हें टेबल आता आहे तसेंच राहील. थोडासा विचार केला तरी हें कळेल की असें असणें शक्य नाही. ह्या इंद्रियग्राह्य जगांतील प्रत्येक गोष्ट परस्परावलंबी व परस्परसापेक्ष अशी

आहे; तसेंच एकीचें अस्तित्व दुसरीवर आधारलेलें आहे. म्हणून वस्तु-मात्राचें आपलें जें ज्ञान आहे त्याच्या तीन अवस्था आहेत; पहिली अवस्था म्हणजे प्रत्येक वस्तु दुसरीपासून स्वतंत्र व वेगळी आहे अशी आपली जाणीव असते; दुसऱ्या अवस्थेंत सर्व वस्तूंमधील परस्परसंबंध ध्यानीं घेतले जातात; व तिसऱ्या अवस्थेंत एकच एक वस्तु बहुविध प्रतीत होते असें आपल्याला ज्ञान होतें. ईश्वरविषयक प्राथमिक अशी अज्ञ माणसाची कल्पना म्हणजे, ईश्वर विश्वाबाहेर कोठेतरी असतो; ही कल्पना पूर्णपणें मानवी आहे; हा ईश्वर मनुष्याप्रमाणेच सर्वकांही करतो, केवळ तो तें फार मोठ्या प्रमाणावर करतो, इतकेंच. ही कल्पना कशी तर्कविसंगत व अपुरी आहे हें मागे थोड्याच शब्दांत दाखवून दिलें आहे. ईश्वरविषयक दुसरी कल्पना म्हणजे सर्वत्र प्रत्ययास येणाऱ्या शक्तीची कल्पना होय. हीच दुर्गासप्तशतींत आढळणारी यथार्थ सगुण ईश्वराची कल्पना होय. पण लक्षांत घ्या की हा ईश्वर केवळ सर्व सद्-गुणांचाच समुच्चय नाही. तुम्ही दोन ईश्वर--ईश्वर व सैतान--मानूं शकत नाही; तुम्हीं एकच ईश्वर मानला पाहिजे, व त्याला चांगला व वाईट दोन्ही म्हणण्याचें धैर्य बाळगलें पाहिजे. एकच ईश्वर माना व त्यापासून निघणारे सर्व तर्कसंगत निष्कर्ष स्वीकारा. दुर्गासप्तशतींत म्हटलें आहे--"हे जगन्माते, आम्ही तुला वंदन करतों; सर्व जीवांच्या ठायीं तूं शांतीच्या रूपांत वास करतेस; प्राणिमात्राच्या ठायीं तूं पावि-त्र्याच्या रूपाने वसत असतेस." त्याबरोबरच ईश्वराला सर्वस्वरूप म्हटल्याने जे कांही निष्कर्ष निघतील ते सर्व आपण पत्करले पाहिजेत. "हे गार्गी, हें सर्वकांही आनंदमय आहे; जेथे म्हणून आनंद आहे, तेथे त्या ईश्वराचा अंश आहे," या ईश्वरी अंशाचा उपयोग तुम्ही कसाहि करा. माझ्यासमोर असलेल्या या दिव्याच्या प्रकाशांत तुम्ही एखाद्या गरिबाला शंभर रुपये दान देऊं शकतां किंवा अन्य कोणी खोटी सहीहि करूं शकतो, पण प्रकाश या दोघांनाहि समानच आहे. ईश्वरविषयक कल्पनेची ही दुसरी अवस्था आहे. तिसऱ्या अवस्थेंतील कल्पना अशी की, ईश्वर हा सृष्टीच्या बाहेरहि नाही किंवा आंतहि नाही, तर ईश्वर, सृष्टि, आत्मा व विश्व हे एकाच अर्थाचे शब्द आहेत, एकाच वस्तूचीं तीं विभिन्न नांवें आहेत. तुम्हांला दोन वस्तु कधीच दिसत

नाहीत; तत्त्वज्ञानांतील विशिष्ट शब्दांमुळेच तुम्ही घोटाळ्यांत पडत असतां. तुम्ही असें समजतां की तुम्ही शरीर आहांत व तुम्हांला आत्मा आहे, आणि तुम्हांला असें वाटतें की तुम्ही एकाच वेळीं शरीर व आत्मा दोन्ही आहांत. पण तें कसें शक्य आहे ? तुम्हीच विचार करून पाहा. तुमच्यापैकी जर कोणी योगी असेल तर 'मी चैतन्य आहें' अशी त्याची जाणीव असेल वा त्याच्यापक्षीं शरीर हें अदृश्य झालेलें असेल; सामान्य माणूस 'मी शरीर आहें' असें मानतों; त्याच्यापक्षीं आत्म्याची जाणीव नाहीशी झालेली असते. पण मनुष्याला देह आहे, आत्मा आहे व आणखीहि कांही आहे अशी कल्पना तत्त्वज्ञानांत असल्यामुळे तुम्हांला वाटतें की ह्या सर्व गोष्टी एकाच वेळीं विद्यमान असतात. एका वेळीं कोणती तरी एकच वस्तु अस्तित्वांत असते. तुम्हांला जडद्रव्य प्रतीत होत असतां तुम्ही ईश्वराविषयी बोलूं नकां--त्या वेळीं तुम्हांला केवळ कार्यच दिसत असतें, त्या वेळीं तुम्हांला कारण दिसणें शक्य नाहीं, आणि ज्या क्षणीं तुम्ही कारण पाहूं शकाल त्या क्षणीं कार्य अदृश्य होऊन जाईल--मग जग कोठे गेलें व तें कोणीं नेलें असें तुम्ही म्हणाल.

"नित्य चैतन्यरूप, केवलानंदस्वरूप, मर्यादातीत, अतुलनीय, गुणातीत, नित्यमुक्त, आकाशाप्रमाणे अपार, अंशहीन, निर्विकल्प असें पूर्ण ब्रह्म, समाधिअवस्थेंत, ज्ञानी मनुष्याच्या हृदयांत प्रकाशमान होत असतें."

"ज्यांत प्रकृतींतील परिवर्तनें कायमचीं विराम पावतात, जें विचारांच्या पलीकडील तत्त्व आहे, जें सर्वांत समभावें विद्यमान आहे, पिण ज्याच्या समान कांही नाही, जें अपरिमेय आहे, ज्याची वेद घोषणा करतात आणि जें आपल्या अस्तित्वाचें सार आहे तें पूर्ण ब्रह्म समाधिमग्न असलेल्या ज्ञानी मनुष्याच्या हृदयांत प्रकाशत असतें."

"जें जन्ममरणातीत, अनंत व अतुलनीय आहे; प्रलयकालीं सर्व विश्व जलमय व्हावें, खाली वर चोहीकडे पाणीच पाणी व्हावें, व त्या जलपृष्ठावर एकहि तरंग असूं नये त्याप्रमाणे जें शांत व सुस्थिर आहे; तसेंच ज्यांत सर्व प्रकारचे आभास नाहीसे होतात; ज्यांत सर्व वादविवाद, कलह आणि अज्ञ व सूज्ञ यांचीं भांडणें पूर्णपणें संपुष्टांत येतात असें पूर्ण ब्रह्म समाधिअवस्थेंत ज्ञानी पुरुषाच्या हृदयांत प्रकाशत असतें."*

* विवेकचूडामणि ४०८, ४०९, ४१०.

मनुष्याला ही अवस्थादेखील प्राप्त होते आणि त्या वेळीं जग विलीन झालेलें असतें.

म्हणून हें सत्यस्वरूप ब्रह्म अज्ञात व अज्ञेय आहे असें आपण पाहिलें. याचा अर्थ अज्ञेयवाद्यांच्या मतानुसार नसून, तें जाणलें आहे असें म्हणणें म्हणजे त्याला कमीपणा आणण्यासारखें आहे, कारण तुम्ही मूलतःच तें आहांत. आपण असेंहि पाहिलें की हें ब्रह्म एका दृष्टीने हें टेबल नाहीं व तरीहि दुसऱ्या एका दृष्टीने तें टेबल आहे. नामरूपें काढून घ्या, म्हणजे मग जी सत्य वस्तु उरेल ती तें ब्रह्मच आहे. प्रत्येक वस्तूंतील सत्य तेंच आहे,

"त्वं स्त्री त्वं पुमानसि त्वं कुमार उत वा कुमारी ।
त्वं जीर्णो दण्डेन वंचसि त्वं जातो भवसि विश्वतो मुखः।।"

--श्वेताश्वतर उपनिषद्

--"तूंच स्त्री व तूंच पुरुष आहेस; तूंच कुमार आणि तूंच कुमारी आहेस; काठीच्या आधाराने चालणारा वृद्धहि तूंच आहेस व विश्वांतील सर्वकांही तूंच आहेस." अद्वैतदर्शनाचें हें मूळ सूत्र आहे. यासंबंधी आणखी थोडेंकांही मी सांगणार आहें. या अद्वैतवादांतच आपल्याला सर्व वस्तूंतील मूळ तत्त्वाच्या रहस्याचें स्पष्टीकरण आढळतें. आपण पाहिलें आहे की याच भूमिकेच्या आधाराने विज्ञान व तर्क ह्यांच्या आक्रमणाविरुद्ध आपण सुदृढपणें उभे राहूं शकतो. येथेच तर्काला भक्कम असा आधार मिळतो. पण भारतीय वेदान्ती हा आपल्या सिद्धान्ताच्या आधीच्या पायऱ्यांची कधी निंदा करीत नाही; तो आपल्या सिद्धान्ताच्या भूमिकेवरून त्यांच्याकडे पाहतो व त्यादेखील चांगल्याच आहेत असें म्हणतो; कारण त्याला माहीत असते की त्या सर्व पायऱ्या सत्यच आहेत, केवळ त्या चुकीच्या दृष्टिकोनांतून पाहिल्या व मांडल्या गेल्या आहेत. सत्य तेंच असून तें केवळ मायेच्या आवरणांतून पाहिलें गेलें आहे. त्यामुळे तें कदाचित् विकृत रूपांत दिसत असेल, पण आहे तें सत्यच, दुसरें कांही नाही. अज्ञ माणूस ज्याला प्रकृतीच्या बाहेर पाहतो तो ईश्वर, थोडा जाणता माणूस ज्याला विश्वांत व्याप्त असलेला पाहतो तो ईश्वर, आणि ज्ञानी ज्याला आपल्या आत्म्याशीं अभिन्न आणि समग्र विश्वाशीं अभिन्न अशा रूपांत पाहतो तें ब्रह्म हीं तिन्ही एकच वस्तु होत--एकच वस्तु

विभिन्न दृष्टिकोनांतून पाहिली जात असते, मायेच्या निरनिराळ्या कांचांमधून पाहिली जात असते, निरनिराळ्या मनांमधून पाहिली जात असते, आणि त्यामुळेच हे सर्व भेद निर्माण होत असतात. इतकेंच नव्हे, तर एका दृष्टीमधून दुसरी निष्पन्न होते. सामान्य ज्ञान व विज्ञान ह्यांत कोणता फरक आहे? अंधारांत रस्त्याने जाऊं लागा, व तेथे कांही विशेष चमत्कारिक आढळलें तर तेथून जाणाऱ्या एखाद्याला त्याचें कारण विचारा. दहापैकी नऊ माणसें तुम्हांला सांगतील की भुताने ही घटना घडवून आणली आहे. त्यांच्या डोक्यांत नेहमीच भुताखेतांच्या कल्पना घोळत असतात, कारण अज्ञानी लोकांचें हें लक्षणच आहे की ते कार्याच्या बाहेर कारण शोधण्याचा यत्न करीत असतात. एखादा दगड कोठून तरी पडला तर अडाणी माणूस म्हणतो की, सैतानाने वा भुताने तो फेकला असेल, पण शास्त्रज्ञ म्हणेल की, हा गुरुत्वाकर्षणाचा सृष्टिनियमच आहे.

विज्ञान व धर्म ह्यांच्यांत सगळीकडे कोणता संघर्ष चालू आहे? आजचे सर्व धर्म म्हणजे घटनांचें बाह्य स्पष्टीकरण करणाऱ्या कल्पनांचीं भारुडें बनले आहेत--उदाहरणार्थ, सूर्याचें नियंत्रण करणारी देवता, चंद्रदेवता, अशा असंख्य देवता या धर्मांनी मानल्या आहेत. धर्मांच्या मतें सर्व बदल, सर्व घटना कोणत्या ना कोणत्या देवतेमुळे घडून येतात. ह्या सर्वांमधे समान मुद्दा हा की हीं सर्व कारणें कार्याबाहेरील आहेत. आणि विज्ञानाचा अर्थ हाच की प्रत्येक गोष्टीचें कारण हें तिच्या स्वरूपावरूनच निर्धारित करावयाचें असतें. विज्ञान क्रमशः प्रगत होत असून तें सर्व घटनांचें स्पष्टीकरण भुताखेतांच्या व देवतांच्या हातांतून काढून घेत आहे. आणि आध्यात्मिक गोष्टींच्या बाबतींत अद्वैतदर्शनाने असेंच केलें आहे, म्हणून तोच सर्वांहून अधिक शास्त्रशुद्ध असा धर्म आहे. विश्वाच्या बाहेर राहणाऱ्या ईश्वराने हें विश्व निर्माण केलेलें नाही, तसेंच विश्वाच्या बाहेरील एखाद्या बुद्धिमान् पुरुषाचेंहि तें कार्य नाही. तें स्वतःच सृष्ट होत आहे, स्वतःच विलीन होत आहे, स्वतःच अभिव्यक्त होत आहे--तें एकमेव अनंत सत्स्वरूप असें ब्रह्म आहे--"तत्त्वमसि श्वेतकेतो"--"हे श्वेतकेतो, तें तूं आहेस."

याप्रमाणे तुम्हीं पाहिलें की केवळ हाच एकमेव शास्त्रशुद्ध असा धर्म आहे. आजच्या अर्धशिक्षित भारतांत विज्ञानाचा जो गाजावाजा

होत आहे, तर्काच्या व बुद्धिवादाच्या ज्या गोष्टी रोज ऐकूं येत आहेत त्यांवरून माझी अशी अपेक्षा आहे की तुमचे सर्व संप्रदाय मतभेदांवर मात करून अद्वैती होण्याचें धैर्य दाखवतील व बुद्धदेवांनी म्हटल्याप्रमाणे 'बहुजनहिताय बहुजनसुखाय' जगांत त्याचा प्रचार करण्यास कटिबद्ध होतील. हें जर तुम्ही करूं शकलां नाहीत तर तुम्ही भित्रे आहांत असें मी समजेन. हा भित्रेपणा जर तुम्हांला सोडून देतां येत नसेल, भयामुळे जर तुम्ही अद्वैतवाद स्वीकारीत नसाल तर दुसऱ्यांनाहि तुमच्याप्रमाणे सवलती द्या, बिचाऱ्या मूर्तिपूजकाची श्रद्धा मोडूं नका, त्याला सैतान म्हणूं नका व तुमच्याशीं पूर्णपणें सहमत नसलेल्या प्रत्येक माणसापुढे आपल्या मताचा प्रचार करूं नका. प्रथम हें ध्यानीं घ्या की तुम्ही स्वतः भित्रे आहांत, आणि जर समाजाचें तुम्हांला भय वाटत असेल व तुमच्या जुन्या खुळचट समजुतींनी तुम्हांला इतके भित्रे करून सोडलें असेल, तर मग ह्या समजुती बिचाऱ्या अज्ञ जनांना किती अधिक भित्रे व किती अधिक निष्क्रिय करून टाकीत असतील याचा विचार करा. अद्वैताची भूमिका ही अशी आहे. इतरांविषयी सहानुभूति बाळगा. ईश्वर करो व सर्व जग उद्याच अद्वैतवादी होवो--केवळ तात्त्विकदृष्ट्याच नव्हे, तर अनुभूतीनेहि तें अद्वैतवादी होवो. पण तें तसें होणार नसेल तर त्याच्यानंतरची जी दुसरी चांगली गोष्ट आहे ती आपण करूं या; अज्ञ माणसांना आपण हात देऊं या व त्यांच्या सामर्थ्याप्रमाणे त्यांना क्रमाक्रमाने पुढे नेऊं या; आणि आपण जाणूं की भारतामधे धार्मिक विकासाची प्रत्येक पायरी ही तिच्याहून वरच्या पायरीकडे नेणारी आहे. हा विकास वाइटांतून चांगल्याकडे नेत नसून चांगल्यांतून अधिक चांगल्याकडे नेत असतो.

अद्वैतवादाच्या नैतिक बाजूविषयी अधिक कांहीं सांगणें आवश्यक आहे. आजकाल आपलीं पोरें सहजपणें बोलून जातात--कोणाकडून तीं शिकतात देव जाणें--की, अद्वैतवादामुळे अनैतिकता येते, कारण आपण सर्वचजण एक असल्यामुळे व सर्वचजण ईश्वर असल्यामुळे नैतिकतेची जरूरी ती काय? प्रथम म्हणजे असा हा युक्तिवाद पाशवी बुद्धीचा निदर्शक असून अशा माणसांना चाबकाच्या साहाय्यानेच नियंत्रणांत ठेवावयास हवें. तुम्ही जर असे पशु असाल तर मानव म्हणून जगण्यापेक्षा

जीव देणें बरें, अन्यथा तुम्हांला चाबकाने नियंत्रणांत ठेवावें लागेल. चाबकाचा धाक जर दूर झाला तर तुम्ही राक्षस व्हाल! आणि असेंच जर तुम्ही असाल तर तुम्हां सर्वांना ठार करणेंच योग्य होईल. तुमच्यासाठी दुसरा पर्यायच नाही; चाबकाच्या किंवा दंडुक्याच्या धाकाखालीच तुम्हांला राहणें भाग आहे, त्यांतून तुमची सुटका नाही, त्यावांचून तुमचा उद्धार होणार नाही.

दुसरें असें की केवळ अद्वैतवादच नैतिकतेचें स्पष्टीकरण देतो. दुसऱ्याचें हित करणें हेंच नीतीचें सार आहे अशी प्रत्येक धर्माची शिकवण आहे. आपण दुसऱ्याचें हित कां करावें? सर्व धर्म सांगतात की निःस्वार्थ व्हा. पण मीं निःस्वार्थ कां व्हावें? एखाद्या ईश्वराने तसें म्हटलें आहे म्हणून? मला त्याच्याशीं कर्तव्य नाही. एखादा ग्रंथ तसें सांगत आहे म्हणून? सांगो तो; मला त्याचें कांही वाटत नाही; सर्व ग्रंथांनी तसें सांगितलें असेल तरी मला त्याचें काय? 'प्रत्येकाने स्वतःपुरतें पाहावें, व जो मागे पडेल तो सैतानाच्या हातीं लागला तरी हरकत नाही' अशीच जगांतील पुष्कळांची नीतिमत्ता असते. मग मीं कां म्हणून नीतिमान व्हावें? गीतेंत सांगितलेलें सत्य उमजल्याविना याचें स्पष्टीकरण तुम्हांला देतां येणार नाही. गीतेंत म्हटलें आहे, 'जो स्वतःच्या ठायीं सर्वांना व स्वतःला सर्वांच्या ठायीं पाहतो तो सर्वांच्या ठायीं समभावें विद्यमान असलेल्या ईश्वराला पाहत असतों; आणि म्हणून असा ज्ञानी पुरुष स्वतःच स्वतःचा घात करीत नाही.' अद्वैतवादाकडून तुम्ही हें सत्य शिका की, तुम्ही जर दुसऱ्या कुणालाहि इजा कराल तर तें स्वतःलाच इजा केल्यासारखें होईल, कारण तुम्हीच ते सारे आहांत. तुम्हांला जाणीव असो वा नसो, सर्व हातांनी तुम्हीच कार्य करतां, सर्व पायांनी तुम्हीच चालतां, प्रासादांत उपभोग घेणारा राजाहि तुम्हीच आहांत व रस्त्यावर दीनवाणें जिणें जगणारा भिकारीहि तुम्हीच आहांत; अजाण व्यक्तींतहि तुम्हीच आहांत व विद्वानांतहि तुम्हीच आहांत; दुर्बलांमधे तुमचेंच वास्तव्य आहे, तसेंच सबलांमधेहि तुमचेंच वास्तव्य आहे. हें जाणून घ्या व सर्वांविषयी सहानुभूति बाळगा. आणि म्हणूनच आपण इतरांना इजा करूं नये. म्हणून, मला उपवास घडतो की काय याचीहि चिंता मला नसते, कारण त्याच वेळीं लक्षावधि

मुखांतून अन्न ग्रहण केलें जात असतें, आणि तीं सर्व मुखें माझींच होत. म्हणूनच 'मी व माझें' यांची चिंता मीं करूंच नये, कारण अवघें विश्व हें माझेंच आहे; जगांतील सर्व आनंद मीच उपभोगीत आहें, माझा व जगाचा कोण विनाश करूं शकणार? यांतच नैतिकता आहे. केवळ या अद्वैतवादांतच नैतिकतेचें स्पष्टीकरण दिलेलें आहे. अन्य मतें नीतीचा उपदेश देत असतात, पण नीतिमान कां व्हावें याचें कारण त्यांना सांगतां येत नाही. असो. अद्वैतवादांतच नीतीचें स्पष्टीकरण कसें आढळतें हें आपण येथवर पाहिलें.

अद्वैतवादाचें अनुसरण केल्याने आपल्याला काय लाभ होईल? आपल्याला त्याने बल लाभेल. जगावर तुम्हीं पसरलेलें हें मोहपटल काढून घ्या; मानवजातीला दुर्बल बनविणारे विचार शिकवूं नका; किंवा दुर्बल बनविणारे शब्द बोलूं नका. लक्षांत ठेवा की 'दुबळेपणा' ह्या एका शब्दांत सर्व पापांचा व वाईट गोष्टींचा समावेश होतो. दुर्बलता हीच सर्व दुराचारामागील प्रेरक शक्ति आहे; दुर्बलता हीच सर्व स्वार्थी वृत्तीचें मूळ आहे; दुर्बलतेमुळेच माणूस दुसऱ्यांना इजा करीत असतो. आणि दुर्बलतेमुळेच माणूस स्वतःचें खरें स्वरूप प्रकट करूं शकत नाही. आपण काय आहोंत हें सर्व लोकांना कळूं द्या; आपल्या खऱ्या स्वरूपाचा त्यांना वारंवार उद्‌घोष करूं द्या. "सोऽहम्." मातेच्या दुधाबरोबर 'मी तो आहें, मी तो आहें' हें शक्तिदायी तत्त्व त्यांना ग्रहण करूं द्या. "श्रोतव्यो मन्तव्यो निदिध्यासितव्यः" इत्यादि. हें तत्त्व त्यांना प्रथम श्रवण करूं द्या; नंतर त्यांना त्याचें चिंतन करूं द्या व मग ह्या चिंतनांतून, ह्या मननांतून, जगाने कधीहि पाहिलीं नसतील अशीं कार्यें निष्पन्न होतील. हा अद्वैतवाद प्रत्यक्षांत कसा आणावयाचा? कांही लोक म्हणतात की हा अद्वैतवाद प्रत्यक्षांत आणणें शक्य नाही; याचा अर्थ असा की जडाच्या पातळीवर तो अद्यापि प्रकट झालेला नाही. हें थोडेंफार खरें आहे, कारण वेदांनी काय म्हटलें आहे हें पाहा:—

"एतद्ध्येवाक्षरं ब्रह्म एतद्ध्येवाक्षरं परम् ।
एतद्ध्येवाक्षरं ज्ञात्वा यो यदिच्छति तस्य तत् ॥"

—"हें ॐ म्हणजेच ब्रह्म होय; ॐ हें परमसत्य होय; ज्याला ॐ चें रहस्य आकलन झालें त्याच्या सर्व इच्छा पूर्ण होतात." म्हणून प्रथम

ह्या ॐ चें रहस्य समजून घ्या; तुम्हीच ॐ आहांत हें जाणून घ्या; या 'तत्त्वमसि'चें रहस्य आकलन करून घ्या; मगच तुम्हांला जें हवें असेल तें प्राप्त होईल. ऐहिकदृष्टया तुम्हांला मोठें व्हावयाचें असेल तर आपण तसें आहोंत ही श्रद्धा बाळगा. मी कदाचित् एक क्षुद्र बुडबुडा असेन, तुम्ही कदाचित् मोठ्या लाटेप्रमाणे असाल, पण हें जाणून असा की अनंत सागर आपल्या दोघांच्याहि पार्श्वभागीं आहे; अनंत ब्रह्म हेंच आपल्या शक्तीचें भांडार आहे; आणि एक क्षुद्र बुडबुडा असा मी व पर्वतप्राय लाट असे तुम्ही--आपण दोघेहि ह्या भांडारांतून हवी तेवढी शक्ति घेऊं शकतों. म्हणून तुम्ही स्वतःवर श्रद्धा ठेवा. अद्वैताचें रहस्य हें आहे की प्रथम स्वतःवर श्रद्धा ठेवा, आणि मग दुसऱ्या कशा-वरहि श्रद्धा ठेवा. जगाच्या इतिहासांत तुम्हांला आढळेल की, स्वतःवर श्रद्धा ठेवणारीं राष्ट्रेंच मोठीं व प्रबळ झालेलीं आहेत. प्रत्येक राष्ट्राच्या इतिहासांतहि तुम्हांला आढळेल की आत्मविश्वास असलेल्या व्यक्तिच थोर व प्रबल झालेल्या आहेत. एक इंग्रज ह्या भारतांत एक साधा कारकून म्हणून आला होता, पैशाच्या अभावीं व अन्य कारणांनी त्याने दोनदा आत्महत्या करण्याचा यत्न केला, पण त्यांत अपशय आल्यानंतर त्याच्या ठिकाणीं आत्मविश्वास उत्पन्न झाला; आपण महान् कार्यें करण्यास जन्मलों आहोंत असा त्याला विश्वास वाटूं लागला; आणि मग तो मनुष्य ब्रिटिश साम्राज्याचा संस्थापक लॉर्ड क्लाइव्ह बनला. पाद्र्यांवर विश्वास ठेवून आयुष्यभर, "हे प्रभो, मी दुर्बल आहें, मी दीन आहें" असें तो गुडघे टेकून म्हणत बसला असता तर त्याचें काय झालें असतें? तो वेड्यांच्या इस्पितळांत जाऊन पडला असता. असल्या अनिष्ट शिकवणीने तुम्हांलाहि वेड लावलें आहे. 'मी दीन आहें' ह्या दुर्बलता निर्माण करणाऱ्या शिकवणीच्या दुष्परिणामांमुळे मानववंशाचा विनाश ओढवतो हें मीं जगभर पाहिलें आहे. आपल्या मुलांना लहान-पणापासून अशाच प्रकारची शिकवण मिळत आहे, आणि परिणामीं तीं अर्धवट निपजत आहेत यांत आश्चर्य तें काय?

अद्वैतवादाची व्यवहार्य शिकवण हीं अशी आहे. तुम्ही स्वतःवर श्रद्धा ठेवा. तुम्हांला ऐहिक ऐश्वर्य हवें असेल तर ऐहिक क्षेत्रांत ही शिकवण प्रत्यक्ष कार्यांत आणा म्हणजे तुम्हांला तें प्राप्त होईल. तुम्हांला

बौद्धिक श्रेष्ठता हवी असेल, तर त्या पातळीवर ही शिकवण कार्यान्वित करा म्हणजे तुम्हांला अपार बुद्धिसामर्थ्य लाभेल. आणि तुम्हांला मुक्ति हवी असेल, तर आध्यात्मिक पातळीवर हीं शिकवण प्रत्यक्षांत आणा म्हणजे तुम्ही मुक्त व्हाल, आणि नित्य आनंदमय असें निर्वाणपद पावाल. परंतु ह्यांतील एक दोष असा की आतापर्यंत हा अद्वैतवाद केवळ आध्यात्मिक क्षेत्रांतच उपयोगांत आणला गेला, अन्य क्षेत्रांत तसा प्रयत्नच केला गेला नाहीं; आता तो प्रत्यक्ष कर्माच्या क्षेत्रांत उपयोगांत आणण्याची वेळ आली आहे. यापुढे तो 'रहस्य' म्हणून राहूं नये, यापुढे तो गिरिकंदरांत व हिमालयांत केवळ संन्याशांपाशीच राहूं नये; तो लोकांच्या दैनंदिन जीवनांत उतरलाच पाहिजे; राजप्रासादांत त्याचा अवलंब झाला पाहिजे, तसाच संन्याशाच्या गुहेंतहि झाला पाहिजे; गरिबांच्या झोपडींत तो व्यवहार्य झाला पाहिजे, तसेंच रस्त्यांतील भिकाऱ्यानेंहि तो कार्यान्वित केला पाहिजे; तो सर्वत्र व्यवहार्य होऊं शकेल. म्हणून तुम्ही स्त्री आहांत किंवा शूद्र आहांत याचें भय बाळगूं नका, कारण हा धर्म एवढा महान् आहे की त्याच्या अल्पशा आचरणानेंहि मोठें कल्याण होतें असें भगवान् श्रीकृष्ण आपल्याला सांगतात.

म्हणून हे आर्यांच्या वंशजांनो, स्वस्थ बसूं नका; उठा, जागे व्हा व ध्येयपूर्ति झाल्याविना थांबूं नका. अद्वैतवाद प्रत्यक्ष व्यवहारांत उतरविण्याची वेळ आता आलेली आहे. आपण त्याला स्वर्गांतून पृथ्वीवर आणूं या; सध्या आपल्याला हेंच कार्य करावयाचें आहे. आपल्या प्राचीन पूर्वजांची वाणी आपल्याला हेंच कार्य करावयास सांगत आहे. अद्वैताची ही शिकवण सर्व जग व्यापून टाको, समाजाच्या सर्व थरांतून ती भिनून जावो, ती सर्वांच्या समान मालकीची होऊन जावो, आपल्या जीवनाचें ती अविभाज्य अंग बनून जावो, आणि आपल्या नसानसांमधून वाहूं लागून ती आपल्या रक्ताच्या प्रत्येक बिंदूंत मिसळून जावो.

तुम्हांला हें ऐकून आश्चर्य वाटेल की अमेरिकन लोक हे व्यावहारिक दृष्टीने आपल्याहून अधिक वेदान्ती आहेत. न्यूयॉर्क येथील समुद्रकिनारीं उभा राहून मी पाहत असे की निरनिराळ्या देशांतून बाहेर पडलेले, अत्याचारांनी पीडलेले, दलित, निराश, कुणाकडे डोळे वर करून पाहण्यास भिणारे लोक येत आहेत; कपड्यांचें, नव्हे लक्तरांचें लहानसें

गाठोडें हेंच त्यांचें सर्वस्व असे. एखादा पोलिस दिसतांच ते चटकन् त्याला टाळून, घाबरून रस्त्याच्या दुसऱ्या बाजूनें जात. पण लक्षांत घ्या की सहाच महिन्यांत हेच लोक चांगल्या वेषांत रस्त्याने ताठ चालूं लागत, सगळ्यांकडे ते निर्भयपणें पाहत. हा विलक्षण फरक कशामुळे झाला ? समजा की तो मनुष्य आर्मेनियांतून वा अन्य कोठून आला असेल, तेथे त्याला जन्मजात गुलाम मानण्यांत येत असेल, त्याची चांगलीच पिळणूक झाली असेल व आता आपला जन्म असाच जाणार अशी त्याची धारणा बनली असेल, त्याने थोडीशीहि हालचाल करतांच त्याला दडपून टाकण्यांत आलें असेल; तेथे सर्व बाजूंनी त्याला डिवचण्यांत आलें असेल की, "गुलामा, तूं गुलाम म्हणूनच जन्माला आला आहेस, तूं असाच रहा; निराशेंत तुझा जन्म झाला आहे, जन्मभर आता तुला कसलीच आशा नाही." भोवतालच्या हवेंतूनहि त्याला जणु असेंच ऐकूं येत होतें की, "जा, तुला कसलीच आशा नाहीं, तूं असाच गुलाम म्हणून निराशेंत खितपत राहा." तेथे बलवानांनी त्याचें जीवन शोषून घेतलें असेल. पण, जेव्हा तो न्यू यॉर्क येथील रस्त्यावर दाखल झाला तेव्हा त्याला दिसलें की नीटनेटका पोषाख केलेला एक सभ्य गृहस्थ आपल्याशीं हस्तांदोलन करीत आहे; आपल्या अंगावर चिंध्या आहेत व त्या गृहस्थाने उत्तम वेष केला आहे तरीहि कांहीच भेद करण्यांत येत नाही असें त्याला आढळून आलें. तो थोडा पुढे गेला तेव्हा त्याने एक उपहारगृह पाहिलें, तेथील टेबलाशीं कांही सभ्य लोक जेवत होते, त्याच टेबलाच्या बाजूस असलेल्या खुर्चीवर त्याला बसावयास सांगण्यांत आलें. इतरत्र फिरल्यावर त्याला एक नवें जीवन आढळलें. त्याला तेथे अशी जागा आढळली की तेथे इतर सर्व माणसांसारखाच तोहि एक माणूस होता. कदाचित् पुढे तो वॉशिंग्टन येथे गेला असेल व अमेरिकेच्या अध्यक्षांशीं त्याने हस्तांदोलन केलें असेल, आणि कदाचित् त्याने, दूरवरच्या खेड्यांतून आलेल्या, साधाबावळा वेष असलेल्या शेतकऱ्यांना अध्यक्षांशीं हस्तांदोलन करतांना पाहिलें असेल. हीं सारीं दृश्यें पाहिल्यानंतर त्याच्यावरील मायेचें आवरण गळून पडलें. स्वरूपतः तो ब्रह्म आहे; आजवर दौर्बल्य व दास्य यांच्या संमोहनाने तो पछाडला गेला होता; तो आता भानावर आला, उठून उभा राहिला व आपण

मानवांच्या जगांतील एक मानव आहोंत असें त्याला आढळलें. वेदान्ताची जन्मभूमि असलेल्या या आपल्या देशांत सर्वसामान्य लोक गेलीं हजारो वर्षें या भयंकर संमोहनावस्थेंत खितपत पडले आहेत. त्यांना स्पर्श करणें हें पाप, त्यांच्यांत मिसळणें हें पाप ! निराशेंत त्यांचा जन्म झाला व जन्मभर त्यांना कांहीच आशा नाहीं ! याचा परिणाम असा झाला की, ते खालीं जात जात अखेर मानव जेवढ्या हीन अवस्थेस पोहोचूं शकतो तेवढ्या हीन अवस्थेस पोहोचले आहेत; कारण जगांत दुसरा असा कोणता देश आहे की जेथे लोकांना जनावरांबरोबर झोपणें भाग पडतें ? आणि यासाठीं दुसऱ्या कोणाला बोल लावूं नका, अज्ञानी माणूस जी चूक करीत असतो ती चूक तुम्ही करूं नका. येथे परिणाम दिसत आहे; याचें कारणहि येथेच असलें पाहिजे. दोष आपलाच आहे. उठून उभे राहा व धीटपणें या दोषाचा स्वीकार करा. दुसऱ्यांवर वृथा चिखलफेक करूं नका; ज्या चुकांचे परिणाम तुम्ही भोगत आहांत त्यांचें तुम्हीच एकमेव कारण आहांत.

लाहोरच्या तरुणांनो, ह्या पापाचें स्वरूप तुम्ही नीट ध्यानीं घ्या; तें वंशपरंपरेने चालत आलेलें व राष्ट्रीय स्वरूपाचें पाप आहे. आणि त्याला जबाबदार आपणच आहोंत. तें दूर केल्याशिवाय आपली सुटका नाही. तुम्ही शेकडो प्रकारचे समाज स्थापन करा, हजारो राजकीय सभा भरवा, वा लाखो संस्था काढा, पण जोंवर ती सहानुभूति, तें प्रेम व सर्वांचा विचार करणारी ती सहृदयता तुमच्या ठायीं निर्माण होत नाही तोंवर ह्या गोष्टींचा कांहीहि उपयोग नाही. बुद्धदेवांची सहृदयता जोंपर्यंत भारतांत परत येत नाही, जोंपर्यंत भगवान् श्रीकृष्णांचीं वचनें प्रत्यक्ष व्यवहारांत उतरविलीं जात नाहीत तोंपर्यंत आपल्याला कशाचीहि आशा नाही. युरोपियन लोक व त्यांच्या सामाजिक संस्था यांचें तुम्ही अनुकरण करीत आहांत, पण मीं स्वत: प्रत्यक्ष पाहिलेली एक गोष्ट तुम्हांला सांगतों ती तुम्ही ऐका. युरोशियन लोकांच्या एका मंडळाने कांही ब्रह्मी लोकांना लंडन येथे नेलें. त्यांनी लंडनमधे त्यांचें प्रदर्शन केलें, पुष्कळ द्रव्य मिळविलें व नंतर तें द्रव्य स्वत: घेऊन त्यांनी ह्या ब्रह्मी लोकांना युरोपांत कोठेतरी वाऱ्यावर सोडून दिलें व स्वत: पोबारा केला. या बिचाऱ्या ब्रह्मी लोकांना युरोपीय भाषांचा गंधहि नव्हता; पण

ऑस्ट्रियांतील इंग्रज वकिलाने त्यांना लंडन येथे पाठवून दिलें. कोणाचीहि ओळख नसल्यामुळे ते लोक लंडनमधे अगदी असहाय स्थितींत होते. त्यांचीं सहजपणें एका इंग्रज स्त्रीशीं गाठ पडली, तिने या सर्व परकीयांना आपल्या घरीं नेले व अन्नवस्त्रादि सोय करून, ही वार्ता वृतपत्रांत प्रसिद्ध केली. आणि ध्यानीं घ्या की दुसऱ्याच दिवशीं सर्व देश जणु जागा झाला. ह्या लोकांच्या मदतीसाठी द्रव्याचा ओघ वाहूं लागला व त्यांना ब्रह्मदेशांत परत पाठविण्यांत आलें. अशा प्रकारच्या सहानुभूतीवर त्यांच्या राजकीय व अन्य संस्था आधारलेल्या आहेत; प्रेमाचा ––निदान स्वत:च्या जातीवरील प्रेमाचा––हा भक्कम पाया त्यांच्या प्रत्येक कार्याचा आधार असतो. ते जगावर प्रेम करीत नसतील. तसेंच ब्रह्मी लोक कदाचित् त्यांचे शत्रुहि असतील, पण इंग्लंडमधील लोकांना स्वत:च्या बांधवांबद्दल उत्कट प्रेम वाटतें, आणि त्याबरोबरच त्यांच्या ठायीं सत्य व न्याय यांविषयी आस्था आहे आणि आश्रयास आलेल्या परकीयांविषयी परोपकारबुद्धिहि आहे. ही वस्तुस्थिति कुणालाहि नाकारतां येणार नाही. पश्चिमेकडील प्रत्येक देशांत किती विलक्षण प्रेमाने व आतिथ्याने माझें स्वागत झालें हें मीं तुम्हांला सांगितलें नाही तर मी अत्यंत कृतघ्न ठरेन. अशी सहृदयता भारतांत कोठे आहे? उन्नतीसाठी आवश्यक असलेली ही सहृदयता येथे कोठे आहे? चार-पांचजण मिळून आपण एखादी व्यापारी पेढी काढतों; कांही दिवस जातात न जातात तोंच आपण एकमेकांना फसवूं लागतों; आणि लवकरच तो सर्व डोलारा धुळीस मिळतो. तुम्ही इंग्रजांचें अनुकरण करून त्यांच्यासारखें महान् राष्ट्र निर्माण करूं असें म्हणतां, पण त्यासाठी आवश्यक असलेला आधार कोठे आहे? आपल्याकडे केवळ वाळूचा पाया असतो आणि म्हणून कोणतीहि इमारत अल्पावधींतच कोसळून खाली पडते.

म्हणून लाहोरच्या तरुणांनो, अद्वैताचा शक्तिशाली ध्वज पुन: एकवार उंच उचला, कारण अन्य कोणत्याच आधारावर तें अद्‌भुत प्रेम तुमच्या ठायीं उत्पन्न होऊं शकणार नाही; जोंवर सर्वत्र समभावें विद्यमान असणाऱ्या ईश्वराला तुम्ही पाहत नाही तोंवर तें अद्‌भुत प्रेम तुमच्या ठायीं निर्माण होऊं शकणार नाही. हा प्रेमाचा ध्वज उंच उभारा! "उठा, जागे

व्हा व ध्येयपूर्ती झाल्याविना थांबूं नका." उठा, पुन्हा एकवार उठा; कारण त्यागाविना कांहीच साध्य होणार नाही. दुसऱ्यास मदत करावयाची असेल तर क्षुद्र स्वार्थाचा त्याग करावाच लागेल. ख्रिस्ती लोकांच्या शब्दांत सांगावयाचें तर तुम्ही भगवान व भोग ह्यांची एकाच वेळीं सेवा करूं शकणार नाही. वैराग्य अंगीं बाणवा. थोर कार्य पार पाडण्यासाठी तुमच्या पूर्वजांनी जगाचा त्याग केला होता. आज स्वतःच्या मोक्षासाठी जगाचा त्याग करणारे लोक आहेत. तुम्ही आपल्या सर्वस्वाचा त्याग करा, आपल्या मोक्षाचाहि विचार न करतां इतरांचें कल्याण साधा. तुम्हीं नेहमीच मोठमोठ्या गोष्टी बोलतां, पण तुमच्यासमोर हा मीं व्यवहार्य वेदान्त मांडला आहे. ह्या आपल्या क्षुद्र जीवनाचें बलिदान करण्यास तयार व्हा. आपलें राष्ट्र जिवंत राहावें म्हणून तुम्ही उपाशी मरण पावलांत --तुमच्यामाझ्यासारखें हजारो लोक मरण पावले--तर बिघडलें कोठे? आपल्या राष्ट्राची अधोगति होत आहे, असंख्य जीवांचा शाप आपल्या मस्तकावर आहे--हे जीव तहानेने तडफडत होते तेव्हा पाण्याचा नित्य स्रोत शेजारीं वाहत असतांहि आपण त्यांना डबक्यांतलें पाणी दिलें, समोर प्रचुर अन्न असतांनाहि आपण त्यांची उपासमार होऊं दिली, त्यांच्याशीं आपण अद्वैताच्या गोष्टी केल्या, पण प्रत्यक्षतः मात्र आपण त्यांचा शक्य तेवढा द्वेष केला, त्यांच्याविरुद्ध आपण 'लोकाचारा'चें--परंपरागत रूढींचें--तत्त्व शोधून काढलें, 'आपण सर्वजण समान आहोंत', 'आपण सर्वजण तेंच ब्रह्म आहोंत' असें आपण त्यांच्याशीं तोंडाने बोललों, पण तदनुरूप आचरण मात्र मुळीच केलें नाही. "अद्वैत हें मनांतच ठेवायचें असतें, तें आचरणांत कधीच आणावयाचें नसतें!"--हा कलंक धुऊन काढा. उठा, जागे व्हा. हें क्षुद्र जीवन नष्ट झालें तर काय बिघडलें? सज्जन असो वा पतित, गरीब असो वा श्रीमंत, प्रत्येकास मृत्यु हा येणारच. कोणाचेंहि शरीर चिरकाल टिकत नाही. उठा, जागे व्हा व स्वतःशीं पूर्णपणें प्रामाणिक राहा. आपला भारतीयांचा अप्रामाणिकपणा भयंकर आहे; आपल्याला चारित्र्य हवें आहे; मगरमिठीप्रमाणे एखाद्या वस्तूस चिकटून राहण्याची दृढता व चारित्र्याचें बल आज आपल्याला हवें आहे.

"नीतिनिपुण व्यक्ति निंदा करोत वा स्तुति करोत, लक्ष्मी प्राप्त

होवो वा कायमची निघून जावो, मरण ह्या क्षणीं येवो वा शेकडो वर्षांनी येवो, खरा सज्जन तोच की जो सन्मार्गाविरुद्ध एक पाऊलहि उचलत नाही." उठा, जागे व्हा, कारण काळ निघून जात आहे व आपली सर्व शक्ति तोंडची वाफ दवडण्यांत खर्च होत आहे. उठा, जागे व्हा, तपशिलाच्या क्षुद्र गोष्टींवरून किंवा लहानसहान मतभेदांवरून भांडण करणें टाकून द्या; खाली खाली जात असलेल्या लाखो लोकांना वांचविण्याचें सर्वांत मोठें कार्य तुमच्या समोर आहे. मुसलमान प्रथम भारतांत आले तेव्हा येथे हिंदूंची केवढी मोठी संख्या होती; पण आज ती किती कमी झाली आहे याचा विचार करा. हें असेंच चालू राहिल्यास प्रतिदिनीं हिंदूंची संख्या कमी कमी होत जाऊन एक दिवस संपूर्ण हिंदुजात नाहीशी होऊन जाईल. आणि तसें झाल्यास, हिंदूंमधे अनेक दोष असले तरी, व जगासमोर त्यांचें विकृत चित्र रेखाटलें जात असलें तरी अजूनहि ज्या उच्च तत्त्वांचें ते प्रतिनिधित्व करतात तीं तत्त्वेंहि त्यांच्याबरोबर लोप पावतील. आणि हिंदूंचा लोप झाल्यास सर्व आध्यात्मिक विचाराचें मुकुटमणि असलेलें अद्वैत तत्त्वज्ञानहि त्यांच्याबरोबर लुप्त होईल. म्हणून उठा, जागे व्हा, जगांतील आध्यात्मिकतेचें रक्षण करण्यासाठी सिद्ध व्हा, आणि प्रथमतः आपल्या या देशांत हें अद्वैताचें तत्त्व व्यवहार्य करून दाखवा. फार मोठी आध्यात्मिकता निर्माण करावयाची असें नसून, या आपल्या रोजच्या जगांत आपल्याला थोडेसें अद्वैत उतरवावयाचें आहे. लोकांसाठी प्रथम अन्नाची व्यवस्था केली पाहिजे आणि मग धर्माची. ते बिचारे उपासमारीने मरत असतां आपण त्यांच्यावर धर्मोपदेशाचा भडिमार करीत आहोंत. कोणत्याहि मतमतान्तरांनी भूक शांत होणार नाही. आपल्या ठायीं दोन मुख्य दोष आहेत--एक आपलें दौर्बल्य, व दुसरा म्हणजे द्वेष, आपल्या हृदयाची शुष्कता. तुम्ही लाखो तत्त्वांचा उद्घोष करा, तुम्ही कोटयवधि संप्रदाय स्थापन करा, पण भावनाशील हृदय नसेल तर या कशाचाहि काडीचादेखील उपयोग नाही. वेदांनी सांगितलें त्याप्रमाणे सर्व लोकांबद्दल सहानुभूति बाळगा. आपल्याच शरीराचे ते अवयव आहेत ही भावना निर्माण होऊं द्या. गरीब वा श्रीमंत, संत वा पतित हे सर्व लोक आणि आपणहि त्या एकाच पूर्ण ब्रह्माचे अंश आहोंत ही अनुभूति करून घ्या.

सज्जन हो, अद्वैतदर्शनाचे कांही अत्यंत महत्त्वाचे पैलू मीं तुमच्यापुढे मांडण्याचा प्रयत्न केला. आता केवळ याच देशांत नव्हे, तर प्रत्येक ठिकाणीं ते व्यवहारांत उतरविण्याची वेळ आलेली आहे. आधुनिक विज्ञान आपल्या घणांच्या आघातांनी ठिकठिकाणीं द्वैतवादी धर्मांचा पाया खिळखिळा करीत आहे. केवळ आपल्या भारतांतीलच द्वैतवादी लोक शास्त्रवाक्यांच्या अर्थाची ओढाताण करीत आहेत असें नव्हे––त्यांनी इतकी ओढाताण केली आहे की आता यापुढे तो अर्थ आणखीं ताणला जाऊं शकत नाही, कारण शास्त्रांतील आशय म्हणजे कांही रबर नव्हे ––केवळ भारतांतीलच द्वैतवादी अंधारामधे कान्याकोपऱ्यांत लपण्याचा प्रयत्न करीत आहेत असें नव्हे, तर युरोप व अमेरिका या देशांत हा प्रकार जास्तच प्रमाणांत आढळतो. आणि तेथेहि भारतांतून अद्वैताचे कांही विचार जाणें आवश्यक आहे. ते आधीच तेथे गेले आहेत; तेथे त्यांची वाढ झाली पाहिजे. पाश्चात्त्यांच्या सभ्यतेचें देखील रक्षण करण्यासाठी त्यांची आवश्यकता आहे; कारण पाश्चात्त्य देशांत आज जुनी घडी मोडली जात असून नवी घडी प्रस्थापित होत आहे व तींत धनाच्या पूजेस प्राधान्य मिळत आहे. जुना अविकसित धर्म देखील या स्पर्धेच्या व धनोपासनेच्या आधुनिक धर्मापेक्षा सरसच होता असें म्हणणें भाग आहे. कोणताहि देश, मग तो कितीहि बलाढ्य असो, अशा पायावर उभा राहूं शकणार नाही; जगाचा इतिहासच आपल्याला हें सांगतो की अशा पायावर जे देश उभे होते ते सर्व आता नष्ट झाले आहेत. प्रथमत: अशा विचारांची भारतांत येणारी लाट आपण थोपवून धरली पाहिजे. याकरिता, धर्माला आधुनिक विज्ञानाच्या आघातांना तोंड देतां यावें म्हणून प्रत्येकाला अद्वैताची शिकवण द्या. एवढेंच नव्हे, तर तुम्हांला इतर देशांनाहि साहाय्य करावें लागेल; तुमची विचारसरणी युरोप व अमेरिका या देशांनाहि साहाय्यभूत ठरेल. पण सर्वप्रथम मला तुम्हांला ह्या गोष्टीचें पुन्हा स्मरण करून देणें भाग आहे कीं, येथे प्रत्यक्ष कार्याची गरज आहे; व त्या कार्याचा पहिला भाग म्हणजे खाली खाली जात असलेल्या लक्षावधि भारतीयांना मदतीचा हात देऊन तुम्ही त्यांना वर आणा; आणि असें करतांना भगवान श्रीकृष्णांचे पुढील शब्द लक्षांत ठेवा––

"इहैव तैर्जितः सर्गो येषां साम्ये स्थितं मनः ।
निर्दोषं हि समं ब्रह्म तस्मात् ब्रह्मणि ते स्थिताः ॥"

—"ज्यांचीं मनें साम्यावस्थेंत स्थिर झालेलीं आहेत त्यांनी याच जीवनांत या जगावर विजय संपादन केला आहे, कारण ब्रह्म हें शुद्ध व सर्वांना समान असें आहे; म्हणून असे महात्मे ब्रह्मांत वास करीत असतात."

---

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम 3८८२५ विः वेदान्त
क्रमांक ........ नों दि 3....3

# वेदान्ताची शिकवण

स्वामी विवेकानंद आपल्या शिष्यांसह खेत्रीच्या महाराजांच्या ज्या बंगल्यांत राहिले होते तेथे त्यांचें २० डिसेंबर १८९७ रोजीं 'वेदान्ताची शिकवण' या विषयावर व्याख्यान झालें. राजेसाहेबांनी स्वामीजींचा परिचय करून दिला; सभेच्या अध्यक्षस्थानीं तेच होते. स्वामीजी सुमारें दीड तास बोलले. हें भाषण अतिशय सुंदर व उद्‌बोधक झालें, परंतु खेदाची गोष्ट अशी की त्या वेळीं कोणताहि लघुलेखक उपस्थित नसल्याने हें सुरस व्याख्यान संपूर्ण लिहून घेतां आलें नाही. त्या वेळीं घेतलेल्या टिपणांवरून व्याख्यानाचा आशय खाली देत आहोंत.

ग्रीक व आर्य ह्या प्राचीन काळच्या दोन जाती भिन्न प्रकारच्या परिस्थितींत व परिसरांत जीवन व्यतीत करीत होत्या; पहिलीच्या परिसरांत सर्वच गोष्टी सुंदर, मधुर व स्वभावतःच मोहक अशा होत्या व तेथील हवामान उत्साहकारक होतें, तर दुसरीच्या परिसरांत सर्वच गोष्टी उदात्त स्वरूपाच्या होत्या, तिचा जन्म व तिची वाढ अशा वातावरणांत झाली की तिला फारसे शारीरिक श्रम करणें शक्य नव्हतें; यामुळे सभ्यतेचे दोन भिन्न व वैशिष्टयपूर्ण असे आदर्श निर्माण झाले. ग्रीकांच्या विचारांचा विषय अनंत बाह्य प्रकृति हा होता, तर आर्यांच्या अध्ययनाचा विषय अनंत अंतःप्रकृति हा होता. एकाने बृहत् ब्रह्मांडाचा विचार केला तर दुसऱ्याने सूक्ष्म अशा पिंडाचा विचार केला. जगाच्या सभ्यतेंत दोघांचाहि भाग वैशिष्टयपूर्ण असा आहे. एकाने दुसऱ्यापासून विचार उसने घेण्याची गरज नाही, पण दोघांनीं परस्परांचे विचार जाणून घेतले तर दोघांचाहि लाभ होईल. आर्य जाति स्वभावतः विश्लेषक वृत्तीची होती. गणित व व्याकरण ह्या शास्त्रांचा त्यांनीं अद्‌भुत असा विकास केला व मनोविश्लेषणाचें शास्त्र त्यांनी पूर्णत्वास नेलें. पायथॅगोरस, सॉक्रेटिस, प्लेटो व इजिप्तमधील प्लेटोचे अनुयायी यांच्या विचारांत भारतीय विचारांची झाक दिसून येते.

नंतर स्वामीजींनी युरोपवर भारतीय विचारांचा प्रभाव कसा पडलेला आहे याचें सविस्तर विवेचन केलें व दाखविलें की भिन्न भिन्न काळीं स्पेन, जर्मनी व युरोपांतील अन्य देश या विचारांनी चांगलेच प्रभावित झाले होते. भारतांतील राजपुत्र दारा शिकोह याने

उपनिषदांचें पर्शियन भाषेंत भाषांतर केलें, व त्याचा लॅटिन भाषेंतील अनुवाद शोपेनहॉरच्या पाहण्यांत आला आणि त्यामुळे त्याच्या तत्त्वज्ञानाला वेगळें वळण मिळालें. नंतर कांटच्या तत्त्वज्ञानांतहि उपनिषदांच्या शिकवणीचा ठसा उमटलेला आढळतो. युरोपांत तौलनिक भाषाशास्त्रासंबंधी आवड असल्यामुळे तिकडील विद्वानांचें लक्ष संस्कृतच्या अभ्यासाकडे वळतें; तरीहि डॉयसनसारखे कांही विद्वान् खास तत्त्वज्ञानाची आवड असणारे असेहि आहेतच. यापुढे संस्कृतच्या अध्ययनाची अधिक आवड निर्माण होईल अशी आशा स्वामीजींनी व्यक्त केली. नंतर त्यांनी असें सांगितलें की, 'हिंदु' हा शब्द पूर्वी बराच अर्थपूर्ण होता--'सिंधूच्या पलीकडे राहणारे लोक' अशा अर्थानें त्याचा प्रयोग करण्यांत येत असे; पण आज तो शब्द अर्थशून्य झाला असून त्यांतून हिंदु जाति वा हिंदु धर्म यांपैकी कोणताच अर्थ निघत नाही, कारण आज सिंधु नदीच्या पलीकडे विभिन्न जातींचे व विभिन्न धर्मांचे लोक राहत आहेत.

नंतर स्वामीजींनी वेदांविषयी सविस्तर विवेचन केलें. ते म्हणाले की, वेद हे कोणाहि एका व्यक्तीनें सांगितलेले नसून वेदांतील कल्पना क्रमाक्रमानें विकसित होत होत शेवटीं ग्रंथरूपांत प्रकट झाल्या व मग ते ग्रंथ प्रमाण बनले. त्यांनी सांगितलें की कित्येक धर्मांचे आधारभूत असे ग्रंथ असून या ग्रंथांचें सामर्थ्य अपार आहे. हिंदूंचे वेदग्रंथ आहेत व हजारो वर्षें त्यांना ह्या ग्रंथांचा आधार घ्यावा लागेल, परंतु त्यांच्या वेदांसंबंधीच्या कल्पना मात्र बदलून नव्या भक्कम पायावर त्यांची पुन्हा उभारणी करणें आवश्यक आहे. वेदवाङ्मय प्रचंड आहे, असें ते म्हणाले. त्यांतील नव्याण्णव टक्के वाङ्मय लोप पावलें आहे. हें वाङ्मय कांही कुलांच्या स्वाधीन होतें व तीं कुलें नष्ट होतांच तें वाङ्मयहि नष्ट झालें; परंतु अद्यापि जें शिल्लक आहे तें देखील या दिवाणखान्यांत मावणार नाही. सोप्या व अगदी जुन्या अशा भाषेंत हें वाङ्मय लिहिलें गेलें आहे; त्याचें व्याकरण इतकें अविकसित आहे की वेदांचा कांही भाग हा अर्थशून्य आहे असें म्हटलें जातें.

नंतर ज्ञानकांड व कर्मकांड या वेदांच्या दोन विभागांकडे ते वळले. ब्राह्मणग्रंथ व संहिता म्हणजेच कर्मकांड होय, असें ते म्हणाले,

ब्राह्मणग्रंथांत यज्ञयागादिकांचें वर्णन आहे. अनुष्टुभ्, त्रिष्टुभ् जगती आदि छंदांत रचिलेलीं स्तोत्रें म्हणजेच संहिता होय. सामान्यतः त्यांतून इंद्र, वरुण आदि देवतांची स्तुति केलेली आढळते. नंतर ह्या देवता कोण असा प्रश्न उपस्थित झाला; यासंबंधी कांही सिद्धान्त मांडण्यांत आले व अन्य सिद्धान्तांनी त्यांचें खंडन करण्यांत आलें. याप्रमाणे दीर्घ-काळ घडत गेलें.

त्यानंतर स्वामीजींनी निरनिराळ्या उपासनापद्धतींचें विवेचन करण्यास सुरवात केली. प्राचीन बाबिलोनियन लोकांची आत्म्यासंबंधी अशी कल्पना होती की, मनुष्य मेल्यावर त्याच्या शरीरांतून आणखी एक शरीर बाहेर पडतें, या शरीराला स्वतंत्र व्यक्तित्व नसतें आणि तें मूळ शरीराशीं असलेला संबंध कधीच तोडूं शकत नाही. मूळ शरीराप्रमाणे या दुसऱ्या शरीरालाहि भूक, तहान, भावना इत्यादींचा अनुभव येतो असें ते मानीत असत, तसेंच ते हेंहि मानीत असत की मूळ शरीराला इजा झाली तर या दुसऱ्या शरीरालाहि इजा पोहोचते; मूळ शरीर नाश पावतांच हें दुसरें शरीरहि नाश पावतें. म्हणून मृत शरीरांचें रक्षण करण्याची प्रवृत्ति वाढूं लागली व 'ममी' (मसाला भरून ठेवलेलें मृत देह) कबरी व थडगीं हीं अस्तित्वांत आलीं. इजिप्त व बॅबिलोनिया या देशांतील लोकांची आणि यहुद्यांची कल्पना ह्यापलीकडे कधीच गेली नाहीं; इंद्रियातीत अशा आत्मतत्त्वापर्यंत ते कधीच पोहोचले नाहीत.

प्रा. मॅक्समूलर यांचें असें मत होतें की, ऋग्वेदांत पितरोपासनेचा लेशमात्रहि उल्लेख आढळत नाही. 'ममी' आपल्याकडे शून्य दृष्टीने पाहत आहेत असें भयानक दृश्य तेथे दिसत नाहीं; ऋग्वेदांत देव हे मनुष्यांशीं मित्रत्वाने वागतांना आढळतात; उपास्य व उपासक ह्यांच्या-मधील संबंध सहजस्वरूपाचा आहे असें त्यांत आढळतें. त्यांत उदा-सीनता वा आनंदाचा अभाव नाही; हास्य व नेत्रांतील तेज यांनाहि कांही उणें नाही. वेदांचें परिशीलन करतांना आपल्याला देवांचें जणु हास्य ऐकूं येतें असें स्वामीजी म्हणाले. वेदकालीन ऋषींना आपले भाव पूर्णपणें व्यक्त करतां आले नसतील, पण ते सुसंस्कृत व भावनाशील होते; त्यांच्या तुलनेने आपण पशूप्रमाणेच आहोंत. आपल्या म्हणण्याच्या पुष्टयर्थ स्वामीजींनी नंतर कांही वेदमंत्र म्हटले : " जेथे पितरांचें वास्तव्य

आहे तेथे त्याला न्या, कारण तेथे दुःख, शोक आदि कांही नाही" इत्यादि. यावरून, प्रेताचें जितक्या लवकर दहन होईल तितकें बरें ही कल्पना उत्पन्न झाली. क्रमाक्रमाने त्यांना कळून आलें की एक सूक्ष्म देह असून, स्थूल देहाचा त्याग झाल्यानंतर तो आनंदमय अशा ठिकाणीं जातो, तेथे दुःखाचा लवलेशहि नसतो. सेमिटिक धर्मांमधे भयाची व दुःखाची भावना होती; ईश्वराचें दर्शन झालें म्हणजे मृत्यु येतो अशी त्यांची कल्पना होती. परंतु ऋग्वेदानुसार मनुष्याने ईश्वराचें दर्शन घेतल्यावरच त्याच्या खऱ्याखुऱ्या जीवनास सुरुवात होत असते.

नंतर असे प्रश्न विचारण्यांत येऊं लागले की 'हे देव म्हणजे कोण?' कांही वेळां इंद्र येऊन मनुष्याला साहाय्य करतो, कांही वेळां तो खूप सोमरस प्यालेला असतो. त्याला अनेकवार सर्वशक्तिमान्, सर्वव्यापी अशीं विशेषणें लावलेलीं आढळतात; वरुणाच्या बाबतींतहि असेंच दिसून येतें. याप्रमाणे या देवतांचे गुणविशेष वर्णन करणारे मंत्र अत्यंत सुंदर आहेत व त्यांची भाषाहि अत्यंत सौष्ठवपूर्ण आहे. नंतर व्याख्यात्यांनी सुप्रसिद्ध नासदीय सूक्त म्हणून दाखविलें; त्यांत प्रलयाचें वर्णन आलेलें असून, "अंधाराने अंधार झाकलेला होता" ही कल्पनाहि त्यांतच आढळते. त्यांनी विचारलें की अशी उदात्त व काव्यमय कल्पना चित्रित करणाऱ्या लोकांना जर आपण अप्रगत व असुसंस्कृत म्हटलें तर आपल्या स्वतःलाच आपण काय म्हणावें? स्वामीजी म्हणाले की ऋषि व त्यांच्या इंद्र, वरुण आदि देवता यांच्यावर टीका करण्याचा वा त्यांच्यासंबंधी मत व्यक्त करण्याचा माझा अधिकार नाही. ह्या सर्व गोष्टी एकापाठोपाठ एक प्रकट होणाऱ्या दृश्यांप्रमाणे आहेत, आणि या सर्वांच्या पार्श्वभागीं, "एकं सद्विप्रा बहुधा वदन्ति"—"सद्वस्तु एकच आहे; ऋषि तिला विभिन्न नांवांनी संबोधीत असतात" हें तत्त्व आहे. हें सर्वच अत्यंत गूढ, अपूर्व व अतिशय सुंदर असें आहे. ह्या कल्पनेच्या फार जवळ जाणें आजहि शक्य वाटत नाही—ती इतकी सूक्ष्म आहे की तिला स्पर्श करतांच ती मृगजळाप्रमाणे विरून जाईल, अदृश्य होऊन जाईल असें वाटतें.

ते पुढे म्हणाले की एक गोष्ट मला स्पष्ट दिसत आहे, ती ही

की आर्यदेखील ग्रीकांप्रमाणे बाह्य प्रकृतीकडे आकर्षित झाले असावेत. आपल्या समस्या सोडविण्यासाठी प्रथम त्यांनी बाह्य प्रकृतीचें साहाय्य घेण्याचा प्रयत्न केला असावा; सुंदर व रमणीय अशा बाह्य जगताने त्यांना हळूहळू मोहित करून स्वत:कडे आकर्षित केलें असलें पाहिजे. पण भारतांत उदात्तता नसलेल्या गोष्टींना कांहीच महत्त्व दिलें जात नव्हतें, मृत्यूनंतर काय होतें या गूढ गोष्टीचा शोध घ्यावा असें ग्रीक लोकांना कधीहि वाटलें नाही. पण भारतांत प्रारंभापासूनच वारंवार "मी कोण आहें? मरणोत्तर माझें काय होणार?" असे प्रश्न उपस्थित केलेले आढळतात. ग्रीकांना वाटत होतें की मनुष्य मेल्यानंतर स्वर्गांत जातो. 'स्वर्गांत जाणें' याचा अर्थ काय? याचा अर्थ 'सर्व गोष्टींच्या बाहेर कोठेतरी जाणें' हा होय. ग्रीकांच्या मतें आंत कांहीच नाही; सर्वकांहीं बाहेरच आहे. त्यांचा सर्व शोध बाहेरच्या दिशेनेच चालत असे. एवढेंच नव्हे, तर स्वत:लाहि ते बाह्य असें कांहीतरी समजत असत. 'जेव्हा आपण ह्या जगासारख्या परंतु दु:खविरहित अशा ठिकाणीं जाऊं तेव्हा सर्वकांही मनासारखें होऊन आपलें पूर्ण समाधान होईल' असें त्यांना वाटे; आणि याच ठिकाणीं त्यांच्या धर्मविषयक सर्व कल्पना विराम पावत. पण हिंदूंच्या मनाचें या कल्पनेने समाधान झालें नाही. विश्लेषणांतून ते या निष्कर्षाप्रत पोहोचले की ह्या प्रकारचे सर्व स्वर्ग हे जड विश्वांतच अंतर्भूत आहेत. "जें कांही संयोगामुळे उत्पन्न होतें, तें सर्व विनाशशील होय" असें हिंदु म्हणतात. बाह्य प्रकृतीला त्यांनी विचारलें, "तुला आत्मा म्हणजे काय हें ठाऊक आहे काय?" तिने उत्तर दिलें, "नाही." "ईश्वर म्हणून कांही आहे काय?" तिच्याकडून उत्तर आलें, "मला माहीत नाही." त्यानंतर त्यांनी तिच्याकडे पाठ फिरविली. त्यांना कळून आलें की बाह्य प्रकृति ही कितीहि विशाल व भव्य असली तरी ती स्थल व काल यांनी मर्यादित आहे. नंतर तेथे एक निराळीच वाणी घुमूं लागली व उदात्त असे नवे विचार त्यांच्या मनांत अवतीर्ण झाले. ती वाणी सांगूं लागली—"हें तें नव्हे, हें तें नव्हे"—"नेति नेति." सर्व भिन्न भिन्न देवता एक होऊन गेल्या; सूर्य चंद्र व तारे, नव्हे, अवघें विश्व एक होऊन गेलें; आणि या नव्या विचाराच्या आधारावर धर्माचा आध्यात्मिक पाया घातला गेला.

"न तत्र सूर्यो भाति न चंद्रतारकं
नेमा विद्युतो भान्ति कुतोऽयमग्निः।
तमेव भान्तमनुभाति सर्वं
तस्य भासा सर्वमिदं विभाति॥"

--"तेथे सूर्य प्रकाशत नाहीं, चंद्रहि नाही, तारेहि नाहींत, विद्युत् नाही, मग ह्या अग्नीची काय मातब्बरी! तो प्रकाशमान आहे म्हणून प्रत्येक गोष्ट प्रकाशमान आहे. त्याच्यामुळेच सर्वकांही प्रकाशत असतें." येथे ती सामान्य व मर्यादित स्वरूपाची सगुण ईश्वराची कल्पना उरलेली दिसत नाही; तसेंच न्यायासनावर बसलेल्या ईश्वराची अतिसामान्य कल्पनाहि उरलेली नाही; बहिर्मुख असलेली शोधकता यानंतर अंतर्मुख झालेली दिसते. याप्रमाणे उपनिषदें हीं भारताचे धर्मग्रंथ बनलीं. तें विस्तृत असें वाङ्मय असून विविध मतें असलेले भारतांतील सर्व संप्रदाय या उपनिषदांच्या पायावरच आधारलेले आहेत.

नंतर स्वामीजी द्वैत, विशिष्टाद्वैत व अद्वैत मतांकडे वळले व त्यांनी त्यांचा समन्वय करून सांगितलें की ह्यांतील प्रत्येक मत एकेका पायरीप्रमाणे असून एका पायरीवरून दुसऱ्या वरच्या पायरीवर चढावयाचें असतें व शेवटीं अद्वैतांत पोहोचावयाचें असतें. अद्वैत हेंच सर्व मतांची स्वाभाविक परिणति असून अखेरचा टप्पा 'तत्त्वमसि' हा आहे. शंकराचार्य, रामानुजाचार्य व मध्वाचार्य या थोर भाष्यकारांच्या हातूनहि कसे प्रमाद घडले ह्याचा त्यांनी नंतर निर्देश केला. ह्या आचार्यांपैकी प्रत्येकाने उपनिषदांनाच एकमात्र प्रमाण मानलें, पण उपनिषदांनी एकाच गोष्टीचा व मार्गाचा उपदेश केला आहे असें समजण्याची त्यांनी चूक केली. संपूर्ण उपनिषदांचा आशय केवळ अद्वैतच शिकविण्याचा आहे, अन्य कांही नाहीच, असें गृहीत धरण्यांत शंकराचार्यांची चूक झाली आहे, आणि मग जेथे म्हणून द्वैतमूलक उतारा आला असेल तेथे आपल्या मताच्या पुष्टयर्थ त्यांनी अर्थाची ओढाताण केली आहे. पूर्णपणें अद्वैत-बोधक अशा वाक्यांच्या बाबतींत रामानुजाचार्य व मध्वाचार्य ह्यांनी अशीच ओढाताण केली आहे. उपनिषदांचा आशय एकच गोष्ट विशद करण्याचा होता हें अगदी खरें आहे, पण ही गोष्ट क्रमाक्रमाने व पायरीपायरीने कशी साध्य करावयाची हें त्यांनी दाखविलें आहे. आजच्या

भारतांत धर्माचें खरें स्वरूप लोप पावलें असून केवळ बाह्यावडंबर शिल्लक उरलें आहे, असें स्वामीजींनी खेदाने म्हटलें. लोक आता हिंदुहि नाहीत व वेदान्तीहि नाहीत; ते केवळ 'शिवूं नका'-वादी आहेत. स्वयंपाकघर हें त्यांचें मंदिर व स्वयंपाकाचीं भांडीं ह्या त्यांच्या देवता बनल्या आहेत. ही स्थिति पालटली पाहिजे. जितक्या लवकर ती जाईल तितकें आपल्या धर्माच्या दृष्टीने चांगलें. उपनिषदें आपल्या महिम्याने तळपोत व त्याचबरोबर सांप्रदायिक भेद व कलह नष्ट होवोत.

स्वामीजींची प्रकृति बरी नसल्याने भाषणाचा ओघ येथे आल्यावर त्यांना दमल्यासारखें झालें; तेव्हा त्यांनी अर्धा तास थोडी विश्रांति घेतली, तेवढा वेळ सर्व श्रोते व्याख्यानाचा उरलेला भाग श्रवण करण्यासाठी शांतपणें थांबले होते. ते बाहेर आल्यावर पुन्हा अर्धातास बोलले; त्यांनी हें विशद केलें की अनेकांत एकत्व पाहणें हें खरें ज्ञान असून, ज्या वेळीं सर्व विविधतेंत एकत्व शोधून काढण्यांत येतें त्या वेळीं प्रत्येक शास्त्राने परमोच्च बिंदु गाठलेला असतो. अध्यात्मशास्त्राप्रमाणेच भौतिक शास्त्रांच्या बाबतींतहि हें खरें आहे.

# भारतीय आध्यात्मिक विचारांचा इंग्लंडवरील प्रभाव

कलकत्ता येथील स्टार थिएटरमधे ११ मार्च १८९८ रोजीं, भगिनी निवेदिता (कु. एम्. ई. नोबल) यांचें "भारतीय आध्यात्मिक विचारांचा इंग्लंडवरील प्रभाव" या विषयावर व्याख्यान झालें, त्या वेळीं स्वामी विवेकानंद हे अध्यक्ष होते. कु. नोबल यांचा परिचय करून देण्यासाठी स्वामीजी उठले, त्या वेळीं ते म्हणाले:—

सभ्य स्त्रीपुरुषहो,

मी आशियाच्या पूर्वभागांत प्रवास करीत असतांना, एका गोष्टीने माझें लक्ष वेधलें; ती म्हणजे, पूर्वआशियांतील देशांमधून आढळणारा भारतीय आध्यात्मिक विचारांचा प्रभाव ही होय. चिनी व जपानी मंदिरांच्या भिंतींवर लिहिलेले कांही सुविख्यात संस्कृत श्लोक पाहून मला किती आश्चर्य वाटलें असेल याची तुम्ही कल्पना करूं शकतां. ते जुन्या बंगाली अक्षरांत लिहिलेले आहेत हें ऐकून तुम्हांला अधिकच आनंद होईल असें वाटतें. बंगालमधील आपल्या पूर्वजांच्या धर्मप्रचारा-संबंधीच्या सामर्थ्याचें व उत्साहाचें स्मारक म्हणून हे श्लोक आजहि विद्यमान आहेत.

या आशियांतील देशांची गोष्ट अमळ बाजूस ठेवली तरी भारतांतील आध्यात्मिक विचारांचा प्रभाव हा एवढा व्यापक व स्पष्ट आहे की आजहि पाश्चात्य देशांतील चालीरीतींच्या मुळाशीं मला त्याचीं चिन्हें दिसून आलीं. हें आता एक ऐतिहासिक सत्य म्हणून सिद्ध झालें आहे की भारतीयांचे आध्यात्मिक विचार प्राचीन काळीं, पूर्व व पश्चिम अशा दोन्ही दिशांनी पसरलेले होते. भारतीय आध्यात्मिक विचारांचें, जग हें किती ऋणी आहे, आणि प्राचीन व अर्वाचीन काळीं मानव-जातीचें जीवन घडविण्यांत भारतांतील आध्यात्मिक शक्तींनी केवढा हातभार लावला आहे हें आज सर्वांनाच माहीत झालें आहे. ह्या पूर्वीच्या गोष्टी झाल्या. मला आणखी एक अत्यंत उल्लेखनीय गोष्ट आढळते; ती म्हणजे मानवतेचा व सभ्यतेचा विकास आणि सामाजिक प्रगति घडवून आणण्यासाठी जी फार मोठी शक्ति सध्या कार्य करीत आहे ती त्या विलक्षण मानववंशाने--म्हणजे अँग्लो सॅक्सन वंशाने

दिलेली आहे. याच्याहि पुढे जाऊन मी तुम्हांला असें सांगेन की ही ॲंग्लो सॅक्सनांची शक्ति अस्तित्वांत नसती, तर आज आपण आपल्या भारतांतील आध्यात्मिक विचारांच्या प्रभावाची जी चर्चा करण्यासाठी जमलों आहोंत, तिचें कारणच उरलें नसतें. पाश्चात्त्य देशांतून पूर्वेकडे ––आपल्या देशाकडे वळून पाहिल्यास येथेहि त्याच ॲंग्लो सॅक्सन शक्ति आपल्या सर्व दोषांसह कार्यशील असलेल्या दिसतात, पण त्यांनी आपले वैशिटघपूर्ण गुणधर्म व चांगल्या बाजू कायम ठेवलेल्या आहेत, आणि मला विश्वास वाटतो की अखेरीस त्यांनी चांगलें यशहि संपादन केलें आहे. 'विस्तार व प्रगति' ही ब्रिटिश कल्पना आपल्याला प्रगतीच्या मार्गाने जाण्यास भाग पाडीत आहे. आणि आपण लक्षांत ठेवलें पाहिजे की पाश्चात्त्य सभ्यता ही ग्रीकांपासून आली आहे आणि ग्रीक सभ्यतेंतील मुख्य कल्पना 'अभिव्यक्ति' ही आहे. भारतांत, आपण 'चिंतन' करतों, पण दुर्दैवाने कित्येकदा तें इतकें गाढ असतें की तें अभिव्यक्त करण्यासाठी आपल्या ठायीं शक्तिच उरत नाही. यामुळे हळूहळू असें होऊं लागलें की, आपलें अभिव्यक्तीचें सामर्थ्य जगापुढे कोठेच प्रकट होईना आणि मग याचा परिणाम काय झाला? परिणाम हा झाला की आपलें म्हणून जें कांही असेल तें लपविण्याचा आपण प्रयत्न करूं लागलों. प्रथम व्यक्तींमधे या गोष्टीला सुरवात झाली व अखेर ती एक राष्ट्रीय सवय होऊन बसली; या अभिव्यक्तीच्या शक्तीचा आपल्यामधे एवढा अभाव आहे की आपलें राष्ट्र आज मृत मानलें जात आहे. अभिव्यक्तीशिवाय आपण जिवंत कसे राहूं शकूं? पाश्चात्त्य सभ्यतेचा आधार म्हणजे विस्तार व अभिव्यक्ति हा होय. ॲंग्लो सॅक्सन जातीच्या भारतांतील ज्या कार्याकडे मीं आताच तुमचें लक्ष वेधलें त्याच्या प्रभावामुळे आपल्या राष्ट्रांत पुन: एकदा स्वत:ला अभिव्यक्त करण्याची शक्ति जागृत होत आहे, आणि ॲंग्लो सॅक्सन जातीचें हें कार्य आपल्या देशांतील गुप्त संपदा, याच सामर्थ्यशाली जातीने उपलब्ध करून दिलेल्या दळणवळणाच्या साधनांच्या साहाय्याने पुन्हा एकदा जगापुढे मांडण्याची आपल्याला प्रेरणा देत आहे. ॲंग्लो सॅक्सन जातीने भारताच्या भावी प्रगतीचा मार्ग मोकळा करून दिला आहे, आणि आज आपल्या पूर्वजांचे विचार जगांत कितीतरी दूरवर पसरत आहेत हें पाहून खरोखर आश्चर्य वाटतें. आपल्या

पूर्वजांनी जेव्हा सत्य व मुक्ति यांचा संदेश दिला तेव्हा त्यांच्यापाशी प्रचाराचीं कितीतरी साधनें होतीं. विश्वबंधुत्वाच्या महान् तत्त्वाचा गौतम बुद्धांनी कसा प्रचार केला? त्या वेळींहि या आपल्या प्रिय देशांत खरें सुख प्राप्त करून घेण्याच्या अनेक सोयी होत्या, आणि आपण सहजपणें आपले विचार जगाच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत पोहोचवूं शकत होतों. आणि आज आपल्या विचारांचा प्रभाव अँग्लो सॅक्सन जातीपर्यंतहि पोहोचला आहे. आज हा एकप्रकारचा विनिमय चालू आहे, आणि आपल्याला दिसत आहे की आपला संदेश केवळ ऐकलाच जात आहे असें नसून त्याला प्रतिसादहि मिळत आहे. इंग्लंडने थोर बुद्धीच्या कांही व्यक्ति आपल्या कार्यांत साहाय्य करण्यासाठी आपल्याला दिल्याहि आहेत. आज येथे या व्यासपीठावर उपस्थित असलेल्या माझ्या स्नेही कुमारी मुलर यांच्याविषयी तुम्हीं सर्वांनी ऐकलें असेल, आणि कदाचित् त्यांच्याशीं तुमचा परिचयहि असेल. ह्या उच्च कुळांत जन्मलेल्या सुशिक्षित महिला असून भारतावरील प्रेमामुळे यांनी आपलें जीवन भारताच्या कार्यास अर्पण केलें आहे. त्यांनी भारताला आपलें घर व भारतीयांना आपला परिवार मानलें आहे. श्रीमती अॅनी बेझंट या थोर, सुविख्यात, इंग्रज महिलेचें नांव तुम्हीं सर्वांनी ऐकलेंच असेल. त्यांनीदेखील आपलें सर्व जीवन भारताच्या कल्याणासाठी व भारताच्या पुनरुत्थानाच्या कार्यासाठी वाहिलें आहे. आज या व्यास-पीठावर आपणांस दिसत असलेल्या दोन अमेरिकन महिलांनीहि आपल्या हृदयांत हेंच उद्दिष्ट बाळगलें आहे; आणि मी आपणांस निश्चितपणें सांगतों की, या गरीब देशाचें थोडेंसेंहि हित करण्यासाठी आपलें जीवन समर्पण करण्याची त्यांची मनीषा आहे. या प्रसंगीं आपल्या एका देश-बांधवाची आठवण मी तुम्हांला करून देऊं इच्छितों. त्यांनी इंग्लंड व अमेरिका या देशांना भेट दिलेली असून, त्यांच्यावर माझा मोठा विश्वास आहे; तसेंच त्यांच्याविषयी मला नितान्त आदर व प्रेम आहे; ते थोर आध्यात्मिक वृत्तीचे असून ते शांतपणें व सतत देशहितार्थ झटणारे असे थोर कार्यकर्ते आहेत. ते आज येथे आलेहि असते, पण अन्यत्र असलेल्या कामामुळे आज ते येथे उपस्थित नाहीत. आपल्या लक्षांत आलेंच असेल की मी श्री. मोहिनीमोहन चॅटर्जी यांच्याविषयी बोलत आहें. आणि

आता इंग्लंडने कु. मार्गारेट नोबल यांच्या रूपाने आपल्या देशाला दुसरी भेट पाठविली आहे; त्यांच्यापासून आपली मोठी अपेक्षा आहे. म्हणून अधिक कांही न सांगतां कु. नोबल यांचा एवढाच परिचय करून देऊन मी त्यांना व्याख्यान देण्याची विनंति करतों.

भगिनी निवेदिता यांनी आपलें सुश्राव्य भाषण संपविल्यावर स्वामीजी उठले व म्हणाले :—

मला फारच थोडें सांगावयाचें आहे. आम्ही भारतीय कांही करूं शकतों अशी कल्पना आपल्यासमोर मांडली गेली आहे. बंगाली लोक या कल्पनेला हसतील; पण मी तसें करणार नाहीं. तुमच्या ठिकाणीं क्रियाशीलता निर्माण करणें हें माझें जीवितकार्य आहे. तुम्ही अद्वैती, विशिष्टाद्वैती की द्वैती आहांत याला विशेष महत्त्व नाही. पण आपण वारंवार जी गोष्ट विसरून जातों तिच्याकडे तुमचें लक्ष मला वेधावयाचें आहे; ती म्हणजे, "हे मानवा, तुझी स्वत:वर श्रद्धा असूं दे." ईश्वरावर श्रद्धा निर्माण करण्याचा हाच मार्ग आहे. तुम्ही अद्वैती असां वा द्वैती, तुमची योगशास्त्रावर श्रद्धा असो वा शंकराचार्यांवर असो, तुम्हीं व्यासांचे अनुयायी असां वा विश्वामित्रांचे असां, त्याला विशेष महत्त्व नाही. पण वस्तुस्थिति अशी आहे की, स्वत:वर श्रद्धा ठेवण्याच्या या मुद्यांवर भारतीय विचार हे जगांतील अन्य सर्व देशांच्या विचारांपेक्षा अगदी वेगळे आहेत. क्षणभर विचार करून पाहा की इतर देशांतील प्रत्येक धर्मांत आत्म्याचें सामर्थ्य अमान्य करण्यांत आलें आहे, आत्मा हा अगदी बलहीन, जड व निष्क्रिय असा त्यांनी मानलेला आहे, पण भारतांत आपण आत्म्याला अनंत व नित्यपूर्ण मानतों. उपनिषदांची ही शिकवण आपण नेहमी ध्यानांत ठेवली पाहिजे.

तुमच्या जीवनामधील महान् कार्य लक्षांत असूं द्या. आपण भारतीय, विशेषत: बंगाली लोक परकीय कल्पनांनी फार मोठ्या प्रमाणांत प्रभावित झालों आहोंत व त्यामुळे आपला धर्म अत्यंत क्षीण होत आहे. आज आपण एवढे मागासलेले कां आहोंत ? आपल्यापैकी नव्याण्णव टक्के लोकांचें जीवन परकीय कल्पना व परकीय गोष्टी यांनीच पूर्णपणें कां घडलेलें आहे ? इतर राष्ट्रांहून आपल्याला श्रेष्ठ व्हावयाचें

असेल तर आपल्याला हें सर्व टाकलेंच पाहिजे. आपल्याला प्रगत व्हावयाचें असेल तर आपल्याला पाश्चात्त्य लोकांकडून पुष्कळ गोष्टी शिकाव्या लागतील हेंहि आपण लक्षांत ठेवलें पाहिजे. पाश्चात्त्यांकडून आपण त्यांच्या कला व विज्ञान शिकलें पाहिजे, पाश्चात्त्यांकडून आपल्याला भौतिक शास्त्रें शिकलीं पाहिजेत, आणि धर्म व आध्यात्मिक ज्ञान आत्मसात् करण्यासाठी पाश्चात्त्यांना आपल्याकडे यावें लागेल. आपण हिंदु लोक जगाला ज्ञान देणारे आहोंत असा आपण विश्वास बाळगला पाहिजे. येथे आपण राजकीय हक्क व तत्सम गोष्टी मिळविण्या साठी धडपडत आहोंत. ठीक आहे, पण हक्क, अधिकार व अन्य गोष्टीं मैत्रींतूनच प्राप्त होत असतात व मैत्री ही तुल्यबल असलेल्यांतच होऊं शकते. दोघांपैकी एकजण याचक असेल तर तेथे मैत्री कशी निर्माण होणार ? राजकीय हक्क वगैरे गोष्टी बोलायला ठीक आहेत, पण मी म्हणतों की परस्पर सहकार्याशिवाय आपण सबल होणें शक्य नाही. म्हणून तुम्हीं इंग्लंडअमेरिकेंत याचक म्हणून नव्हे तर धर्माचें शिक्षण देणारे गुरु म्हणून गेलें पाहिजे असें मी तुम्हांला आवर्जून सांगतों. आदानप्रदानाचा नियम आपल्या सर्व शक्तीनिशीं आपण अंमलांत आणला पाहिजे. आपलें ऐहिक जीवन सुखी करण्याचे उपाय व मार्ग आपल्याला त्यांच्यापासून शिकावे लागले, तर उलट आपण त्यांना सुखी असे चिरजीवन प्राप्त करण्याचा मार्ग कां सांगूं नये ? सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे मानवजातीच्या हितार्थ तुम्ही प्रयत्न करीत राहा. संकुचित सीमेंत स्वतःला बद्ध करून घेऊन 'आम्ही पुराणमताभिमानी आहोंत' असा जो अभिमान तुम्ही बाळगतां तो टाकून द्या, मृत्यु हा प्रत्येकास येणारच आहे, पण हें ऐतिहासिक सत्य लक्षांत ठेवा की जगांतील सर्व देशांना भारताच्या पायांशीं शांतपणें बसून, भारतीय वाङ्मयांत ग्रथित केलेले शाश्वत सिद्धान्त शिकावे लागतील. भारत नष्ट होणार नाही, चीन नष्ट होणार नाही, जपानहि नष्ट होणार नाही. म्हणून आपण हें सदैव ध्यानीं घेतलें पाहिजे की आपला मूलाधार आध्यात्मिकता हा आहे, आणि ही गोष्ट सदैव लक्षांत ठेवण्यासाठी मी ज्या मार्गाविषयी बोलत आहें तो मार्ग दाखवून देणारा एखादा पथप्रदर्शक आपल्याला लाभला पाहिजे. आपल्यापैकी एखाद्याचा जर यावर विश्वास नसेल, आपला

धर्म हा शुद्ध आध्यात्मिक स्वरूपाचा आहे यावर जर एखाद्या हिंदु मुलाचा विश्वास नसेल तर मी त्याला हिंदु म्हणणार नाहीं. काश्मीरांतील एका खेडयांत जेव्हा मी होतों तेव्हाची एक आठवण येते; एका वृद्ध मुसलमान बाईशीं बोलतांना, मीं तिला मृदु शब्दांत विचारलें, "तुमचा धर्म कोणता ?" तिने आपल्या भाषेंत अभिमानाने उत्तर दिलें, "ईश्वराला धन्यवाद ! त्याच्या कृपेने मी मुसलमान आहें." नंतर एका हिंदूला मी विचारलें, "तुमचा धर्म कोणता ?" तो एवढेंच म्हणाला, "मी हिंदु आहें." मला कठोपनिषदांतील तो महान् शब्द आठवतो-- 'श्रद्धा'. श्रद्धेचें उदाहरण नचिकेत्याच्या जीवनांत आढळतें. या श्रद्धेच्या तत्त्वाचा प्रचार करणें हेंच माझ्या जीवनाचें उद्दिष्ट आहे. मी पुनश्च आपणांस सांगतों की, श्रद्धा हें मानवी जीवनाचें व सर्व धर्मांचें एक मुख्य अंग आहे. प्रथम स्वतःवर श्रद्धा ठेवा. हें समजून घ्या की एक जण क्षुद्र बुडबुडयाप्रमाणे असला व दुसरा पर्वतप्राय लाटेसारखा असला तरीहि दोहोंच्या पार्श्वभागीं तो एकच अपार सागर विद्यमान आहे. म्हणून प्रत्येकास आशेला भरपूर वाव आहे. प्रत्येकाला मुक्तीचें द्वार खुलें आहे. प्रत्येकजण उशीरा वा लवकर मायेच्या बंधनांतून मुक्त होणारच आहे. म्हणून प्रथम स्वतःवर श्रद्धा असली पाहिजे अपार आशेमुळे अपार आकांक्षा निर्माण होते. आपल्यांत ही श्रद्धा निर्माण होईल तर आपलें राष्ट्रीय जीवन, व्यास व अर्जुन ह्यांच्या काळाप्रमाणे संपन्न होईल, कारण याच काळांत मानवतेचे सर्व उदात्त सिद्धान्त आपल्या देशांत शिकविले जात होते. आज आपण आध्यात्मिक अंतर्दृष्टि व आध्यात्मिक विचार ह्यांच्या बाबतींत फारच मागे पडलों आहोंत. भारतामधे खूप आध्यात्मिकता होती व या आध्यात्मिक महत्तेमुळेच त्या वेळच्या जगांतील सर्व देशांमधे भारताला श्रेष्ठ स्थान प्राप्त झालें होतें आणि जर परंपरागत समजुती व आशा ह्यांच्यावर विश्वास ठेवावयाचा असेल, तर पुन्हा तेच दिवस येणार आहेत असें मी ठासून सांगतों. आणि हें तुमच्यावरच अवलंबून आहे. बंगालमधील तरुणांनो, पैसे बाळगणाऱ्या श्रीमंत व मोठ्या लोकांकडे पाहूं नका. या जगांतील सर्व महान् व प्रचंड कार्यें गरिबांनीच केलेलीं आहेत. बंगालमधील गरीब लोकांनो, या, तुम्ही सर्वकांही करूं शकतां व तुम्ही हें केलेंच पाहिजे. तुम्ही गरीब असलां

तरी तुमचा कित्ता पुष्कळजण गिरवितील. स्थिर बुद्धीचे व्हा व सर्वांत महत्त्वाचें म्हणजे पवित्र व्हा व स्वतःशीं पूर्णपणें प्रामाणिक राहा. आपल्या भवितव्यावर श्रद्धा ठेवा. बंगालमधील तरुणांनो, भारताचा उद्धार तुम्हांलाच घडवून आणावयाचा आहे. यावर तुमचा विश्वास असो वा नसो, पण मीं जें सांगितलें तें लक्षांत असूं द्या. हें कार्य आज वा उद्याच होऊन जाईल असें समजूं नका. माझ्या शरीरावर व आत्म्यावर जसा माझा विश्वास आहे, तसाच ह्या गोष्टीवर माझा दृढ विश्वास आहे. म्हणून बंगालमधील तरुणांनो, माझें हृदय तुमच्याकडे ओढ घेत आहे. हें कार्य तुमच्यावरच अवलंबून आहे; तुमच्याजवळ पैसा नसल्यामुळे, तुम्ही गरीब असल्यामुळेच तुम्ही हें कार्य करूं शकाल. तुमच्यापाशी कांही नसल्यानेच तुम्ही निष्कपट राहाल. तुम्ही निष्कपट असल्यामुळे तुम्ही त्यागास सिद्ध व्हाल. हेंच मला तुम्हांला सांगावयाचें होतें. पुन्हा एकदा मी तुम्हांला तेंच सांगतों. हेंच तुमचें जीवितकार्य आहे, हेंच माझें जीवितकार्य आहे. तुम्ही कोणतें दर्शन प्रमाण मानतां याच्याशीं मला कर्तव्य नाही; मला येथे केवळ हेंच दाखवावयाचें आहे की मानवजातीच्या पूर्णत्वावरील अनंत श्रद्धा हेंच सर्व भारतीयांना परस्परांशीं प्रेमाने बांधणारें असें सूत्र आहे, आणि माझीहि अशीच श्रद्धा आहे. ही श्रद्धा आपल्या देशांत सर्वत्र पसरो.

---

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ३०८५९ वि: ......
क्रमांक ७५४५ नों. दि. ......

# संन्यास : आदर्श व साधना

दुसऱ्या खेपेस पाश्चात्य देशांस जाण्यासाठी स्वामीजी निघाले त्या वेळीं बेलूर मठांतील संन्याशांनी त्यांना निरोप देण्याचा एक समारंभ केला. त्याला उत्तर म्हणून स्वामीजींनी एक लहानसें भाषण केलें. मठांतील नोंदवहींत दि. १९ जून १८९९ रोजीं लिहिलेला त्यांच्या या भाषणाचा सारांश पुढीलप्रमाणे आहे:—

एखादें मोठें व्याख्यान द्यावें अशी ही वेळ नाही. पण तुम्हीं कोणत्या गोष्टी प्रत्यक्ष आचरणांत आणाव्या याविषयी मी तुमच्याशीं थोडें बोलणार आहें. प्रथम आपण आदर्श समजून घेतला पाहिजे व नंतर तो कृतींत आणण्याचे मार्ग पाहिले पाहिजेत. तुमच्यापैकी जे संन्यासी आहेत त्यांनी लोकांचें कल्याण करण्याचा प्रयत्न केला पाहिजे, कारण 'संन्यास' याचा अर्थच तसा आहे. संन्यासावर वा त्यागावर मोठें प्रवचन देण्यास वेळ नाही, पण अगदी थोडक्यांत मी त्याचें स्वरूप 'मृत्यूवर प्रेम' अशा शब्दांत सांगेन. संसारी लोक जीवनावर प्रेम करतात; संन्याशाचें प्रेम मृत्यूवर असलें पाहिजे. याचा अर्थ आपण आत्महत्या करावी असा आहे काय ? नाही, तसा मुळीच नाही; कारण आत्महत्या करणारे लोक मृत्यूवर प्रेम करीत नाहीत; आपल्याला असें वारंवार दिसून येतें की जर आत्महत्या करण्याच्या प्रयत्नात माणूस जर एकदा अयशस्वी झाला तर तो दुसऱ्यांदा तसा प्रयत्न करीत नाही. मग मृत्यूवर प्रेम करणें म्हणजे काय ? आपण मरणार हें निश्चितच आहे; मग आपण चांगल्या उद्दिष्टाकरिता मरूं या. खाणेंपिणें आदि आपलीं सर्व कामें आपण आत्मसमर्पणाच्या हेतूने केलीं पाहिजेत. तुम्ही अन्नाने शरीराचें पोषण करतां. हें शरीर जर लोककल्याणासाठी अर्पण केलें नाही तर त्याचें पोषण करून काय उपयोग ? ग्रंथांच्या अध्ययनाने तुम्ही मनाचा विकास साधतां. सर्व जगाच्या कल्याणासाठी जर तुम्हीं तें अर्पण केलें नाही तर त्याचा विकास साधून काय उपयोग ? कारण सर्व जग हें एक आहे; तुम्ही त्याचा एक क्षुद्र अंश आहांत, आणि म्हणून क्षुद्र अहंभावाचें पोषण न करतां आपल्या लक्षावधि बांधवांची सेवा करणें हेंच तुमच्या पक्षीं उचित आहे.

"सर्वत: पाणिपादं तत् सर्वतोऽक्षिशिरोमुखम् ।
सर्वत: श्रुतिमल्लोके सर्वमावृत्य तिष्ठति ।।"

--"सर्व हात, पाय त्याचेच आहेत, सर्व नेत्र, मस्तकें, मुखें, कान त्याचेच आहेत, सर्व रूपांनी तोच विराजत आहे." *

याप्रमाणे तुम्हीं इतरांसाठी झिजत झिजत मरण स्वीकारलें पाहिजे, अशा मरणांतच स्वर्ग आहे, अशा मरणांतच सर्वकांही चांगलें साठलें आहे, आणि तद्विरुद्ध जें कांही आहे तें सर्व आसुरी व पापमय आहे.

आता हे सर्व आदर्श व्यवहार्य करण्याचे उपाय समजून घेतले पाहिजेत. प्रथमत: ही गोष्ट आपण लक्षांत ठेवली पाहिजे की आपण कोणतेंहि असाध्य असें ध्येय आपल्यासमोर ठेवतां कामा नये. फारच उच्च असलेलें ध्येय देशाला दुर्बल करून त्याचें पतन घडवून आणतें. बौद्धांनी व जैनांनी सुधारणेची जी चळवळ केली तिच्यानंतर हेंच घडून आलें. याउलट अतिरिक्त प्रमाणांत व्यवहारी होणेंहि वाईटच होय. तुम्हांला थोडीहि कल्पनाशक्ति नसेल, तुमच्या समोर मार्गदर्शक म्हणून कोणताहि आदर्श नसेल तर तुम्हांला केवळ पशूच म्हणावें लागेल. म्हणून आपण आपलें ध्येय खाली ओढूं नये; तसेंच प्रत्यक्ष कर्महि दृष्टीआड होऊं देऊं नये. हीं दोन्हीं टोकें आपण टाळलीं पाहिजेत. आपल्या देशांतील प्राचीन कल्पना ही होती की गुहेंत बसून ध्यान करतां करतां प्राणत्याग करावयाचा. 'मी इतरांहून लवकर मुक्त होईन' ही भावना गैर आहे. लवकर वा उशीरा हें प्रत्येकास कळलें पाहिजे की, आपल्या बांधवांना मुक्ति प्राप्त व्हावी म्हणून प्रयत्न केल्याविना स्वत:ला मुक्ति प्राप्त होणें शक्य नाही. तुम्ही आपल्या जीवनांत उत्कट ध्येयवाद व उत्कट कर्मशीलता यांचा समन्वय साधा. तुमची एखाद्या क्षणीं गभीर ध्यानांत मग्न होण्याची सिद्धता पाहिजे, तशीच दुसऱ्या क्षणीं ह्या शेतांतून काम करण्याची तयारीहि पाहिजे. (मठाच्या परिसरांतील शेतांकडे बोट दाखवून स्वामीजींनी हें वाक्य उच्चारलें.) गहन असा शास्त्रार्थ विशद करण्याची जशी तुमची सिद्धता हवी, तशीच जरूर तर शेताचा माल बाजारांत नेऊन विकण्याची तयारीहि हवी. सर्व प्रकारचीं हलकीं कामें करण्याची--येथेच नव्हे, तर अन्यत्रहि--तुमची तयारी

---

* गीता. १३, १३.

असली पाहिजे.

नंतर लक्षांत घ्यावयाची गोष्ट ही की 'माणसें' तयार करणें हें या संस्थेचें उद्दिष्ट आहे. कोणा ऋषीने काय म्हटलें आहे एवढेंच शिकून चालावयाचें नाही. ते ऋषि गेले व त्यांचीं मतेंहि त्यांच्याबरोबर गेलीं. तुम्हीं स्वतः आता ऋषि बनलें पाहिजे. तुम्ही माणसें आहांत. महानांतील महान् विभूति, एवढेंच नव्हे तर अवतारदेखील जशीं माणसें होतीं तशींच तुम्हीहि माणसें आहांत. केवळ पुस्तकी ज्ञान काय करूं शकणार? केवळ ध्यानानेहि काय साधणार? मंत्रतंत्रादि देखील काय करणार? तुम्हीं आपल्या स्वतःच्या पायावर उभें राहिलें पाहिजे. या नव्या पद्धतीचा, 'माणूस' घडविणाऱ्या या पद्धतीचा तुम्ही अवलंब करा. खरा माणूस तो की जो मूर्तिमंत शक्ति असतो, आणि त्याबरोबरच ज्याच्या ठायीं स्त्रीहृदयाची कोमलताहि असते. आपल्या भोवताली असणाऱ्या लक्षावधि जीवांबद्दल तुम्हीं करुणा बाळगली पाहिजे व तरीहि तुम्हीं बलवान व सुदृढ चित्ताचे असलें पाहिजे, आणि तुम्हीं आज्ञाधारकताहि अंगीं बाणविली पाहिजे. हे सर्व गुण परस्परविरोधी वाटत असले तरीहि तें तुम्हीं अंगीं बाणविले पाहिजेत. तुमच्या वरिष्ठाने, नदींत उडी टाकून एखादी सुसर पकडण्याची तुम्हांला आज्ञा दिली, तर प्रथम ती गोष्ट पार पाडून मग त्याच्याशीं तुम्हीं युक्तिवाद करावा. आज्ञा चुकीची असली तरी प्रथम तिचें पालन करा व मगच विरोध प्रकट करा. आपल्या संप्रदायांमधे, विशेषतः बंगालमधील संप्रदायांमधे हा एक मोठा दोष आहे की एखाद्याचा थोडा मतभेद झाला की तो लगेच एक नवा संप्रदाय सुरू करतो, त्याला थोडाहि धीर धरवत नाही. म्हणून आपल्या संघावर तुमची दृढ श्रद्धा असली पाहिजे. येथे आज्ञाभंगास थारा नाही. अशा गोष्टी कठोरपणें समूळ नष्ट करा. आज्ञा मोडणारे सदस्य येथे नकोतच, त्यांना तुम्हीं काढून टाकावें. येथे संघविद्रोही कोणीहि असतां कामा नये. तुम्ही वायूप्रमाणे स्वाधीन आणि या रोपट्याप्रमाणे व कुत्र्याप्रमाणे आज्ञाधारक असलें पाहिजे.

# मी काय शिकलों

( १९०१ च्या मार्च महिन्यांत ढाका येथे दिलेलें भाषण )

ढाका येथे स्वामीजींनी इंग्रजींत दोन व्याख्यानें दिलीं. पहिलें, 'मी काय शिकलों' या विषयावर व दुसरें, 'आपण ज्यांत जन्माला आलों तो धर्म' या विषयावर झालें. एका शिष्याने बंगालीमधे लिहिलेल्या अहवालाचा अनुवाद पुढे दिला असून त्यांत पहिल्या व्याख्यानाचा सारांश आहे.

बंगालच्या पूर्वभागांत येऊन हा विभाग जवळून पाहण्याची संधि मला मिळाल्याबद्दल मला झालेला आनंद मी प्रथम व्यक्त करतों. मी जरी सुधारलेल्या पाश्चात्त्य देशांतून हिंडलों असलों, तरीहि या माझ्या बंगालमधील विशाल नद्या, सुपीक व विस्तीर्ण मैदानें व चित्रविचित्र गावें पाहण्याचें जें समाधान मला मिळत आहे तें यापूर्वी मला मिळालें नव्हतें. या माझ्या बंगालमधे जळींस्थळीं सर्व ठिकाणीं एवढें सौंदर्य भरलेलें आहे याची मला कल्पना नव्हती. पण मला हा लाभ झाला आहे की जगांतील विविध देश पाहिल्यानंतर आज माझ्या या मायभूमीचें सौंदर्य कितीतरीं अधिक प्रमाणांत माझ्या अनुभवास येत आहे.

अशाच प्रकारें, धर्माच्या शोधांत मीं पुष्कळ संप्रदायांचा अभ्यास केला. ज्यांनी परकीय देशांच्या आदर्शांचा स्वीकार केला होता अशा कित्येक संप्रदायांमधेहि मी भटकलों आणि दुसऱ्यांच्या दारांशीं विचारांची भिक्षाहि मागितली; कारण त्या वेळीं मला, माझ्या देशाच्या धर्मामधे एवढें सौंदर्य व भव्यता भरलेली आहे याची जाणीव नव्हती. आता या गोष्टीला पुष्कळ काळ लोटला आहे. मला अनेक वर्षांपूर्वी कळून आलें की जगांत हिंदुधर्म हाच पूर्ण समाधानकारक असा धर्म आहे. म्हणून, माझ्या देशबांधवांजवळ असा अतुलनीय धर्म असूनहि, आपल्या देशांत युरोपीय विचारसरणीचा प्रसार होत असल्यामुळे त्यांच्या ठिकाणीं धर्मा-विषयी व्यापक असें औदासीन्य दिसावें याचा मला अंतःकरणापासून खेद होत आहे. आता माझे देशबांधव अत्यंत प्रतिकूल भौतिक परि-स्थितींत आपलें जीवन जगत आहेत ही गोष्ट खरी आहे व याची मला चांगली जाणीवहि आहे. तरी पण त्यांचें हें आपल्या धर्माविषयीचें

औदासीन्य पाहून मला खेद होत आहे.

आज आपल्यांत असे कांही सुधारक आहेत की ज्यांना वाटतें की हिंदुजातीच्या पुनरुत्थानासाठी धर्मांत सुधारणा करावी, तो आमूलाग्र बदलून टाकावा. त्यांच्यांत कांहीजण विचारी आहेत यांत शंका नाही, पण पुष्कळसे केवळ अंधानुकरण करणारे व अत्यंत मूर्खपणें वागणारे असून, आपण काय करीत आहोंत याची त्यांना जाणीव नसते. सुधारकांचा हा वर्ग आपल्या धर्मांत परकीय कल्पना शिरविण्याच्या बाबतींत फार उत्साही आहे. 'मूर्तिपूजा' हा शब्द ते धरून बसले असून हिंदु धर्म मूर्तिपूजक असल्यामुळे तो खरा नाही असें ते म्हणत असतात. ही मूर्ति-पूजा म्हणजे काय आहे, ती चांगली आहे की वाईट आहे याचा विचार ते करीत नाहीत व केवळ परकीयांचें अनुसरण करून, हिंदु धर्म खोटा आहे असा ते आक्रोश करतात. आपल्यांत दुसरे असे कांही लोक आहेत की जे प्रत्येक हिंदु रूढीचें, चालीरीतीचें कांहीतरी 'शास्त्रीय' स्पष्टीकरण देत असतात. ते नेहमी विद्युत्, चुंबकत्व हवेचें स्पंदन इत्यादि गोष्टी बोलत असतात. कोण जाणें, एखाद्या दिवशीं ते ईश्वर म्हणजे विद्युत्-शक्तीच्या स्पंदनांचाच एक गोळा आहे असें म्हणावयास कमी करणार नाहीत ! असो, जगन्मातेचा त्यांना आशीर्वाद असो ! तीच विभिन्न स्वभावांच्या माणसांकडून आपलें कार्य करवून घेत आहे.

या सर्वांपेक्षा अगदी वेगळा असा प्राचीन विचारपरंपरेच्या लोकांचा एक वर्ग आहे. त्यांचें म्हणणें असें की, "हीं तुमचीं निरर्थक मतें व हे तुमचे युक्तिवाद आम्हांला माहीत नाहीत व ते जाणून घेण्याची आमची इच्छाहि नाही; आम्हांला ईश्वर हवा आहे, आम्हांला आत्मा हवा आहे, जें या विश्वाच्या पलीकडे आहे, जें सुखदु:खाच्या पलीकडे आहे, जिथे केवळ परमानंदच अनुभवास येतो त्या सर्वातीत राज्यांत आम्हांला जावयाचें आहे." ते म्हणतात, "पवित्र गंगा नदींत श्रद्धेने स्नान केलें असतां मुक्ति प्राप्त होते असा आमचा विश्वास आहे." ते म्हणतात, "शिव, राम, विष्णु इत्यादि कोणत्याहि रूपांत ईश्वराची एकनिष्ठतेने व भक्तीने उपासना केल्यास तुम्हांला मोक्ष मिळेल." अशा निष्ठावंत व प्राचीन विचारसरणीच्या लोकांपैकी मी आहें याचा मला गौरव वाटतो.

आपल्या देशांत आणखी एक संप्रदाय आहे. या संप्रदायाचे लोक म्हणतात की ईश्वर व संसार या दोहोंची एकाच वेळीं उपासना करा. आपल्याला अंत:करणापासून काय वाटतें तें व्यक्त करण्याचा प्रांजळपणा या लोकांच्या ठायीं नाही. थोर महात्म्यांनी काय शिकविलें आहे ?

"जहाँ काम तहँ राम नहीं, जहाँ राम नहिं काम ।
तुलसी कबहुँ होत नहीं, रविरजनी इक ठाम ।।"

—"जेथे राम आहे तेथे काम नसतो; व जेथे काम असतो तेथे राम नसतो. दिवस व रात्र हीं एकत्र असणें अशक्य आहे." प्राचीन ऋषींची वाणी घोषणा करीत आहे की, "तुम्हांला ईश्वरप्राप्तीची इच्छा असेल तर 'काम व कांचन' यांचा त्याग करावाच लागेल. हा संसार मिथ्या, शून्य व असार असाच आहे. त्याचा त्याग केल्याविना तुम्हीं अन्य कितीहि यत्न केलेत तरी तुम्ही ईश्वराला प्राप्त करूं शकणार नाही. तुम्ही हें करूं शकत नसाल तर आपली दुर्बलता मान्य करा, परंतु ध्येयाला खाली ओढूं नका. सडत असलेल्या प्रेताला सुवर्णपत्रांनी झाकूं नका !" त्यांच्या मतें, "तुम्हांला जर आध्यात्मिकता प्राप्त करावयाची असेल, ईश्वरलाभ करून घ्यावयाचा असेल तर प्रथम तुम्हांला हा 'आपल्या मनाशीं चाललेला लपंडाव' सोडून दिला पाहिजे, हा अप्रामाणिकपणा, ही आत्मप्रतारणा टाकली पाहिजे."

मी काय शिकलों ? या प्राचीन संप्रदायापासून मी काय शिकलों ? मी शिकलों तें असें :

"दुर्लभं त्रयमेवैतत् देवानुग्रहहेतुकम् ।
मनुष्यत्वं मुमुक्षुत्वं महापुरुषसंश्रयः ।।"

—"खरोखर मानवदेह, मोक्षाची इच्छा, व महापुरुषांचा सहवास ह्या तीन गोष्टीं दुर्लभ असून त्या केवळ ईश्वराच्या कृपेनेच प्राप्त होत असतात." पहिली आवश्यक गोष्ट 'मनुष्यत्व' ही होय, कारण मनुष्यदेहांतच मोक्षप्राप्ति होत असते. दुसरी आवश्यक गोष्ट 'मुमुक्षुत्व' ही आहे. संप्रदायभेदानुसार व व्यक्तिभेदानुसार साधनापद्धति वेगवेगळी असेल, विभिन्न व्यक्तींचा अधिकार विभिन्न प्रकारचा असेल, पण सर्वांच्या बाबतींत हें निश्चितपणें म्हणतां येईल की मुमुक्षुत्व असल्याविना ईश्वराची अनुभूति येणें अशक्य आहे. हें मुमुक्षुत्व म्हणजे काय ? मुमुक्षुत्व म्हणजे मुक्त

होण्याची तीव्र इच्छा, सुखदुःखादि द्वंद्वांच्या पलीकडे जाण्याची उत्कट इच्छा व जगाविषयी तीव्र वैराग्य. जेव्हा ईश्वराच्या दर्शनासाठी तीव्र व्याकुलता तुमच्या ठायीं निर्माण होईल तेव्हा तुम्ही समजा की ईश्वराच्या अनुभूतीस तुम्ही पात्र झालां आहांत.

आणखी एक आवश्यक गोष्ट म्हणजे महापुरुषांचा प्रत्यक्ष सहवास, व या पुरुषांनी ज्या पद्धतीने ध्येयाची प्राप्ति करून घेतली त्या पद्धतीप्रमाणे आपल्या जीवनाला वळण देणें ही होय. केवळ जगाविषयीचें वैराग्य व तीव्र अशी मुमुक्षा एवढेंच पुरेसें नाही. गुरूकडून दीक्षा घेणें आवश्यक आहे. असें कां? कारण त्यामुळे अखंड गुरुपरंपरेने चालत आलेल्या महान् शक्तीशीं आपला संपर्क स्थापन होतो. भक्ताने गुरूला शोधून त्याला आपला उपदेशक, तत्त्वज्ञ, मित्र व मार्गदर्शक म्हणून स्वीकारलें पाहिजे. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे आध्यात्मिक प्रगतीसाठीं गुरु हा अनिवार्यपणें आवश्यक आहे. मग मीं कुणाला माझा गुरु मानावें? "श्रोत्रियोऽवृजिनोऽकामहतो यो ब्रह्मवित्तमः"—"ज्याला वेदांचें रहस्य कळलें आहे, जो दोषरहित आहे, जो कामनाशून्य आहे व जो थोर ब्रह्मवेत्ता आहे तो गुरु होय." श्रोत्रिय म्हणजे ज्याने केवळ शास्त्रांचा अभ्यास केला आहे असा पंडित नव्हे; तर ज्याला शास्त्रांचें सूक्ष्म मर्म आकळलें आहे आणि ज्याने आपल्या जीवनांत शास्त्रांतील सत्यांचा अनुभव घेतला आहे तो श्रोत्रिय होय. "शास्त्रें नुसतीं वाचल्याने माणूस पोपटाप्रमाणे होतो, पंडित होत नाही. खरोखर त्यालाच पंडित म्हणतां येईल की ज्याने शास्त्रांतील एखादाच शब्द वाचूनहि खरें प्रेम प्राप्त करून घेतलें आहे." केवळ पुस्तकी विद्येंत पारंगत असलेले पंडित उपयोगाचे नाहीत. आजकाल प्रत्येकाला गुरु व्हावेसें वाटतें; एखाद्या भिकाऱ्यालाहि लाख रुपयांचें दान करण्याची इच्छा होते! त्यानंतर गुरु हा दोषरहित असला पाहिजे; तसेंच तो 'अकामहत' असावा, म्हणजे तो वासनांनी पीडलेला नसावा. लोकांच्या कल्याणाव्यतिरिक्त त्याचा अन्य कांही हेतु असतां कामा नये. अकारण अशा करुणेचा तो सागर असला पाहिजे व त्याने कीर्ति वा अन्य कोणताहि स्वार्थमूलक हेतु न बाळगतां धर्मोपदेश दिला पाहिजे. आणि त्याला ब्रह्माची साक्षात् अनुभूति असली पाहिजे, म्हणजेच तळहातावरील आवळ्याप्रमाणे त्याला

ब्रह्म स्पष्टपणें प्रतीत झालेलें असलें पाहिजे. गुरु हा असा असला पाहिजे असें श्रुति म्हणतात. अशा गुरूशीं आध्यात्मिक संबंध जोडला गेला म्हणजे ईश्वरसाक्षात्कार वा ईश्वरदर्शन सुलभ होतें.

गुरूकडून दीक्षा घेतल्यानंतर सत्यप्राप्तीची आकांक्षा बाळगणाऱ्या साधकाने 'अभ्यास' केला पाहिजे. गुरूपदिष्ट पद्धतीने इष्टदेवतेचें अखंड ध्यान करून गुरूने सांगितलेलें सत्य प्रत्यक्षपणें अनुभवण्याचा वारंवार निष्ठापूर्वक प्रयत्न करणें म्हणजे 'अभ्यास' होय. तुम्हांला ईश्वरप्राप्तीची तीव्र इच्छा असली आणि तुम्हांला चांगला गुरुहि लाभला तरी जोंपर्यंत तुम्ही अभ्यास, म्हणजे गुरूच्या उपदेशानुसार प्रत्यक्ष आचरण करीत नाही तोंपर्यंत तुम्हांला अनुभूति होणार नाही. या सर्व गोष्टी ज्या वेळीं तुमच्या ठिकाणीं दृढमूल होतील त्या वेळींच तुम्हांला ईश्वरलाभ होईल.

म्हणून मी म्हणतों की हे हिंदूंनो, हे आर्यांच्या वंशजांनो, तुम्ही आपल्या धर्माने सांगितलेलें महान् ध्येय कधीहि विसरूं नका, हिंदूंचें ध्येय आहे संसाराच्या पलीकडे जाणें; केवळ ह्या जगाचा त्याग करून चालणार नाही, तर स्वर्गाचाहि त्याग केला पाहिजे; केवळ वाइटाचा त्याग करून चालणार नाही, तर चांगल्याचाहि त्याग केला पाहिजे; आणि ह्या सर्वांच्या पलीकडे जाऊन, ह्या सापेक्ष विश्वाच्या पलीकडे जाऊन शेवटीं त्या सत्-चित्-आनंदस्वरूप ब्रह्माचा साक्षात्कार करून घेतला पाहिजे.

# आपण ज्यांत जन्माला आलों तो धर्म—

(३१ मार्च १९०१ रोजीं ढाका येथे दिलेलें व्याख्यान)

३१ मार्च १९०१ रोजीं ढाका येथे उघडया मैदानांत एक सभा झाली; तींत स्वामीजींनी दोन तासपर्यंत वरील विषयावर भाषण केलें. सभेस विशाल असा श्रोतृसमुदाय होता. एका शिष्याने बंगालींत लिहिलेल्या अहवालाचा अनुवाद पुढे दिला आहे.

अतिप्राचीन काळीं आपल्या देशाने आध्यात्मिक क्षेत्रांत मोठीच आघाडी मारलेली होती. आज आपण तो प्राचीन इतिहास आपल्या मनश्चक्षूंसमोर आणूं या. पण या अतिप्राचीन महत्तेचें चिंतन करण्यांत एक मोठा धोका आहे, तो असा की आपण नवीन कांही करण्याचे प्रयत्न सोडून देतों. आणि वाडवडिलांच्या भूतकालीन महत्तेवर समाधान मानूं लागतों व त्यांतच आपल्याला गौरव वाटतो. यापासून आपण सावध असलें पाहिजे. प्राचीन काळीं कितीतरी ऋषींनी व महर्षींनी सत्याचा साक्षात्कार करून घेतला होता ही गोष्ट निर्विवाद आहे. पण आपल्या प्राचीन महत्तेचें हें स्मरण खऱ्या अर्थाने हितकारक ठरावयाचें असेल तर आपणहि त्यांच्याप्रमाणे ऋषि झालें पाहिजे. एवढेंच नव्हे तर, माझा असा दृढ विश्वास आहे की, इतिहासांत वर्णिलेल्या ऋषींपेक्षाहि आपण श्रेष्ठ ऋषि होऊं शकूं. प्राचीन काळीं आपली आश्चर्यकारक उन्नति झाली होती व तिचा विचार करतांना मोठा गौरव वाटतो. आजची दुरवस्था पाहूनहि मला निराशा वाटत नाही व भविष्यकाळांत काय होणार आहे याचें मनाशीं चित्र रंगवितांना मला खूप आशा वाटूं लागते. असें कां? कारण, मला माहीत आहे कीं, बीजांत पूर्णपणें परिवर्तन व्हावें लागतें, बीज हें बीज या स्वरूपांत नष्ट व्हावें लागतें, आणि मगच त्यांतून वृक्ष निर्माण होत असतो. याच न्यायाने आपल्या आजच्या अवनत अवस्थेंत आपल्या धर्माच्या भावी उत्कर्षाचीं बीजें निहित आहेत; अजून तीं अंकुरित झालेलीं नसतील, परंतु कदाचित् यापूर्वी कधीहि झाला नसेल एवढा प्रचंड वृक्ष त्यांतून निर्माण होईल; आपला धर्म पूर्वीपेक्षाहि अधिक गौरवान्वित होईल.

आता आपल्या धर्मांत सर्वांना मान्य होण्यासारख्या समान भूमिका कोणत्या आहेत तें पाहूं. सकृद्दर्शनीं आपल्या संप्रदायांत विविध भेद आढळतात हें नाकारतां येणार नाही. कांही अद्वैती, कांही विशिष्टाद्वैती, तर दुसरे कांही द्वैती आहेत. कांहींची अवतारकल्पनेवर श्रद्धा आहे, कांही मूर्तिपूजा मानतात, तर इतर कांहीजण निराकार ईश्वर मानीत असतात. तसेंच चालीरीतींच्या दृष्टीनेहि कितीतरी भेद आहेत हें आपण जाणतों. जाट जातींत कोणी मुसलमानाशीं वा ख्रिस्त्यांशीं विवाहसंबंध ठेवल्यास त्याला जातिबाह्य करण्यांत येत नाही. कोणत्याहि हिंदु देवालयांत ते नि:संकोचपणें प्रवेश करूं शकतात. पंजाबांतील पुष्कळ खेड्यांतून डुकराचें मास न खाणाऱ्याला हिंदु समजण्यांत येत नाही. नेपाळमधे ब्राह्मण चारहि वर्णांमधील स्त्रीशीं विवाह करूं शकतो, तर बंगालमधे ब्राह्मण हा आपल्याच वर्णांतील निराळ्या उपजातींतील स्त्रीशीं लग्न करूं शकत नाही. याप्रमाणे चालीरीतींचे अनेक भेद आहेत. पण हे सर्व भेद असूनहि सर्व हिंदूंत एकत्वाचा एक मुद्दा आढळतो, व तो हा की कोणीहि हिंदु गोमांस भक्षण करीत नाही. याचप्रमाणे आपल्या धर्माच्या विविध संप्रदायांतहि एकत्वाची समान भूमिका असल्याचें आढळतें.

धर्मग्रंथांचा विचार करीत असतांना एक गोष्ट प्रामुख्याने ध्यानांत येते ती ही की ज्या धर्मांना एक वा अनेक आधारभूत शास्त्रग्रंथ आहेत त्यांची प्रगति द्रुत गतीने झाली व त्यांच्यावर कितीहि अत्याचार झालेले असले तरीहि ते आजवर टिकून राहिले आहेत. ग्रीकधर्म आपल्या सर्व सुंदर वैशिष्ट्यांसह नष्ट झाला, कारण त्याला आधारभूत असा ग्रंथ नव्हता; पण यहुद्यांचा धर्म बायबलच्या जुन्या संहितेच्या (Old Testament च्या) आधारावर अजून तसाच सुदृढपणें टिकून आहे. वेदांच्या आधारावर उभारलेला हिंदुधर्म तसाच टिकून आहे. वेद हे सर्वांत प्राचीन असे ग्रंथ आहेत. कर्मकांड व ज्ञानकांड असे वेदांचे दोन भाग आहेत. सुदैवाने म्हणा किंवा दुर्दैवाने म्हणा, हें कर्मकांड भारतामधे प्रचारांत राहिलें नाही. दक्षिणेंत कधीकधी पशुबलि देऊन यज्ञकर्म करणारे कांही ब्राह्मण आहेत; तसेंच लग्न, श्राद्ध आदि प्रसंगीं म्हटल्या जाणाऱ्या मंत्रांतून वेदांतील क्रियाकांडाचा थोडाबहुत उपयोग केलेला आढळतो. पण वेदांतील कर्मकांडाला पूर्वी जें स्थान होतें तें

त्याला पुन: प्राप्त होण्याची आता शक्यता नाही. कुमारिल भट्टांनी या कर्मकांडाला तें स्थान प्राप्त करून देण्याचा प्रयत्न केला, पण तो यशस्वी झाला नाही.

वेदांच्या ज्ञानकांडांत उपनिषदांचा समावेश असून त्याला 'वेदान्त' असें नांव आहे. 'श्रुतिग्रंथांचें शिर' असेंहि त्यास म्हटलें आहे. जेथे जेथे आचार्य श्रुतींतील अवतरणें देतात तेथे तेथे तीं उपनिषदांमधूनच घेतलेलीं असतात. आज हाच वेदान्त हिंदूंचा धर्म आहे. लोकांवर आपल्या संप्रदायाच्या विचारांचा प्रभाव पडावा असें ज्याला वाटतें त्याला हें दाखवून द्यावें लागतें की त्याच्या विचारांना उपनिषदांचा आधार आहे. द्वैती संप्रदाय असो वा अद्वैती संप्रदाय असो, सर्वांनाच असें करणें भाग पडतें. आपल्या सिद्धान्तांतील सत्य सिद्ध करण्यासाठी वैष्णवांनाहि 'गोपालतापिनी उपनिषदा'चा आधार घ्यावा लागतो. एखाद्या नव्या संप्रदायाला श्रुतींत आपल्या विचारांना आधार मिळाला नाही तर त्याची मजल नवें उपनिषद् निर्माण करून तें जुनें म्हणून खपविण्याचा प्रयत्न करण्यापर्यंत जाते. अशा गोष्टी पूर्वी अनेक वेळां घडलेल्या आहेत.

वेद हे एखाद्या विशिष्ट काळीं विशिष्ट व्यक्तींनी रचलेले ग्रंथ आहेत असें हिंदु मानीत नाहीत. त्यांची अशी श्रद्धा आहे की, वेद म्हणजे ईश्वराच्या अनंत ज्ञानाचा निधि असून तो कांही वेळां व्यक्त होतो, तर कांही वेळां तो अव्यक्त असतो. भाष्यकार सायणाचार्य यांनी आपल्या ग्रंथांत एका ठिकाणीं म्हटलें आहे, "यो वेदेभ्योऽखिलं जगत् निर्ममे" —"वेदांतील ज्ञानानुसार ज्याने अवघें विश्व निर्माण केलें." वेदांचा निर्माता कोणालाहि माहीत नसून ती एखादी व्यक्ति असेल अशी कल्पना करणेंहि अशक्य आहे. ऋषि हे या शाश्वत नियमांचे म्हणजेच मंत्रांचे केवळ द्रष्टे होते; त्यांनी केवळ या मंत्रांचा शोध लावला; अनादिकालापासून अस्तित्वांत असलेल्या या वेदरूपी अनंत ज्ञानाचा त्यांनी केवळ साक्षात्कार करून घेतला.

आणि हे ऋषि कोण होते? वात्स्यायनांनी म्हटलें आहे, "योग्य साधनांनी ज्यांनी धर्माची प्रत्यक्ष अनुभूति प्राप्त करून घेतली ते जन्माने जरी म्लेच्छ असले तरीहि ते ऋषिच होत." याच न्यायाने प्राचीन

काळीं, निषिद्ध संयोगापासून जन्मलेले वसिष्ठ, कोळ्याच्या मुलीपासून जन्मलेले व्यास, दासीपासून जन्मलेले नारद आणि असे दुसरे अनेक लोक ऋषिपदाला पोहोचले होते. खरें म्हणजे ज्यांना सत्याची अनुभूति झाली आहे त्यांच्या बाबतींत कोणताहि भेदभाव करणें उचित नाही असाच यांतून निष्कर्ष निघतो. आता उल्लेखिलेले हे सर्वच लोक जर ऋषि होऊं शकले तर आजच्या कुलीन ब्राह्मणांनो, तुम्ही कितीतरी अधिक थोर ऋषि होऊं शकाल ! हें ऋषित्व प्राप्त करून घेण्याचा प्रयत्न करा व हें ध्येय साध्य झाल्याविना थांबूं नका ! आणि मग सर्व जग तुमच्या पायांशीं नतमस्तक होईल ! ऋषि व्हा ! सामर्थ्याचें हेंच रहस्य आहे.

हे वेद म्हणजेच आपले प्रमाणभूत ग्रंथ आहेत व प्रत्येकाला त्यांतील ज्ञान मिळविण्याचा अधिकार आहे.

"यथेमां वाचं कल्याणीमावादानि जनेभ्यः। ब्रह्मराजन्याभ्यां शूद्राय चार्याय च स्वाय चारणाय ॥" असें शुक्ल यजुर्वेदांत (अ. २६-२) म्हटलें आहे. आपल्या वेदांपैकी एखाद्यांत, 'सर्वांना वेदाध्ययनाचा अधिकार नाही' असें वचन तुम्ही दाखवूं शकाल काय ? पुराणांनी मात्र म्हटलें आहे की विशिष्ट जातींना वेदांच्या विशिष्ट शाखांवर अधिकार आहे, तसेंच कांही जातींना वेदाध्ययनाचा अधिकार नाही, वेदांचा कांही अंश सत्ययुगाकरिता आहे, तर कांही अंश कलियुगाकरिता आहे, इत्यादि इत्यादि. पण हें लक्षांत घ्या की वेद असें सांगत नाहीत; तुमचीं पुराणेंच केवळ असें सांगत आहेत. पण सेवक धन्यावर सत्ता गाजवूं शकेल काय ? जोंवर वेदांशीं सुसंगत आहेत तोंवरच स्मृति, पुराणें व तंत्रें यांना मान्यता देणें बरोबर आहे व जेथे म्हणून त्यांचा वेदांशीं विरोध येईल तेथे तीं अप्रमाण म्हणून त्याज्य मानलीं पाहिजेत. पण आज आपण पुराणांना वेदांहून अधिक उच्च अधिकाराचें स्थान दिलें आहे ! वेदांचा अभ्यास बंगालमधून लुप्तप्रायच झालेला आहे. ज्या दिवशीं प्रत्येक घरीं शालग्रामादि कुलदेवतांबरोबर वेदांचीहि पूजा सुरू होईल आणि सर्व आबालवृद्ध व स्त्रिया वेदांची पूजा करूं लागतील तो दिवस लवकर उजडावा अशी माझी उत्कट इच्छा आहे.

पाश्चात्त्य विद्वानांनी वेदांसंबंधी मांडलेल्या सिद्धान्तांवर माझा

विश्वास नाही. आज ते वेदांचा काळ निश्चित करतात व उद्याच आजचें मत बदलून तो काळ हजारबाराशें वर्षांनी कमीजास्त करतात. असो. पुराणांबद्दल मी म्हणालोंच की जोंपर्यंत त्यांचीं मतें वेदांशीं सुसंगत आहेत तोंपर्यंत तीं ग्राह्य आहेत, अन्यथा तीं ग्राह्य नाहीत. पुराणांमधे आपल्याला अशा अनेक गोष्टी आढळतात की ज्या वेदांशीं सुसंगत नाहीत. उदाहरणार्थ, पुराणांतून आढळतें की कोणी दहा हजार वर्षें जगला, तर दुसरा कोणी वीस हजार वर्षें जगला; पण वेदांनी म्हटलें आहे, "शतायुर्वै पुरुषः"—"मनुष्य खरोखर शंभर वर्षें जगतो." या दोहोंपैकी आपण कोणती गोष्ट मानणार? निश्चितच वेदांचें म्हणणें मानणार. पुराणांतील असल्या विधानांवरून पुराणग्रंथांचें महत्त्व कमी लेखण्याचा माझा हेतु नाही. त्यांमधे योग, भक्ति, ज्ञान व कर्म या विषयांवर अनेक सुंदर व उद्बोधक उपदेश दिलेले आहेत. आपण ते अवश्य ग्रहण करावेत. आता आपण तंत्रांचा विचार करूं. 'तंत्र' या शब्दाचा खरा अर्थ 'शास्त्र' असा आहे; उदाहरणार्थ कपिलतंत्र. पण सामान्यतः तंत्र हा शब्द मर्यादित अर्थानें योजला जातो. बौद्धधर्म स्वीकारलेल्या राजांनी अहिंसातत्त्वाचा जो धडाक्यानें प्रचार केला त्यामुळे वैदिक यज्ञयागादि कर्में भूतकाळांत जमा झाल्यासारखीं झालीं व राजाच्या भीतीनें यज्ञांत पशुहिंसा करण्यास कोणीहि धजेना. पण नंतर बौद्धांमधेच, हिंदुधर्मांतून बौद्धधर्मांत गेलेल्या कांही लोकांनीं या कर्मकांडांतील चांगला भाग उचलला व त्याचें गुप्तपणें आचरण सुरू केलें. त्यांतून तंत्रांचा उदय झाला. तंत्रांपैकी वामाचारासारखा कांही घृणास्पद भाग सोडला तर लोकांना वाटतात तेवढीं हीं तंत्रें वाईट नाहीत. त्यांत पुष्कळच उच्च व उदात्त अशीं वेदान्ततत्त्वें आहेत. वस्तुतः वेदांचा ब्राह्मणभाग थोड्या फरकानें तंत्रांत समाविष्ट झाला आहे. आपलें आजचे सर्व पूजाविधि व सर्व धार्मिक अनुष्ठानें हीं तंत्रांत सांगितलेल्या पद्धतीनेच आचरलीं जातात.

आता आपल्या धर्माचीं मूलतत्त्वें कोणतीं आहेत याचें थोडक्यांत विवेचन करूं. आपल्या संप्रदायांमधे भेद व विवाद असले तरी त्यांच्यांत कितीतरी बाबतींत मतैक्य असल्याचें आढळून येतें. प्रथम म्हणजे त्यांच्यापैकी बहुतेक संप्रदाय ईश्वर, आत्मा व जग या तीन तत्त्वांचें

अस्तित्व मानतात. ईश्वर हा नित्यच विश्वाची उत्पत्ति, विश्वाचें पालन व विश्वाचा लय करीत असतो. सांख्यांव्यतिरिक्त सर्वांचा यावर विश्वास आहे. त्यानंतर, आत्म्याचा सिद्धान्त व पुनर्जन्माचा सिद्धान्त यांच्या बाबतींत सर्व संप्रदायांचें एकमत आहे. आपापल्या कर्मानुसार असंख्य जीवात्मे शरीरें धारण करतात व जन्ममरणाच्या चक्रांत फिरत राहतात; यालाच 'संसरणवाद' किंवा 'पुनर्जन्माचा सिद्धान्त' असें म्हणतात. नंतर, हें जगत् अनादि व अनंत असें आहे हें तत्त्व होय. जरी कांहीजण ईश्वर, जीवात्मा व जग या तीन गोष्टी एकाच तत्त्वाचीं तीन रूपें आहेत असें मानतात, कांहीजण त्यांना तीन स्वतंत्र तत्त्वें मानतात, आणि आणखी कांहीजणांचें त्यांच्याविषयीं निराळेंच मत असतें, तरी या तिन्हींवर विश्वास ठेवण्यांत सर्वांचेंच एकमत आहे.

येथे तुम्हीं हें ध्यानीं ठेवावें की अनादिकालापासून हिंदु हे आत्म्याला मनाहून भिन्न समजत आले आहेत. पण पाश्चात्त्य लोक मनाच्या पलीकडे कधीहि जाऊं शकले नाहीत. पाश्चात्त्यांना जग हें सुखमय वाटतें व म्हणून येथे अधिकाधिक उपभोग घेणें हेंच उचित होय असें त्यांचें मत आहे; पण पौर्वात्यांची जन्मतःच अशी दृढ समजूत असते की हा संसार नित्य परिवर्तनशील व दुःखमय आहे, म्हणून तो पूर्णपणें मिथ्या असून आत्म्याला टाकून देऊन या संसारांतील क्षणभंगुर सुखांच्या व इतर गोष्टींच्या मागे लागणें उचित होणार नाही. यामुळेच पाश्चात्त्य लोक संघटित रीतीने कर्म करण्यांत कुशल असून, पौर्वात्य लोक अंतर्जगतांतील रहस्यांचें संशोधन करण्याच्या बाबतींत धाडसी आहेत.

असो. हिंदुधर्मांतील आणखी एकदोन तत्त्वांकडे आता आपण वळूं. हिंदुधर्मांत अवतारवाद आहे. वेदांमधे केवळ मत्स्यावताराचा उल्लेख आहे. यावर सर्वांचा विश्वास आहे किंवा नाही हा महत्त्वाचा मुद्दा नाही. या अवतारवादाचें खरें रहस्य म्हणजे मानवपूजा हें होय --मनुष्यांत ईश्वर पाहणें हें खरें ईश्वरदर्शन आहे. हिंदु लोक प्रकृतींतून प्रकृतीच्या ईश्वराकडे जात नाहीत, ते मानवांतून मानवाच्या ईश्वराकडे जातात.

यानंतर आपण मूर्तिपूजेचा विचार करूं. प्रत्येक मंगल प्रसंगीं

पूजा करावयाच्या, शास्त्रविहित अशा पांच देवता सोडल्या, तर इतर सर्व देवता म्हणजे केवळ विभिन्न पदांचीं नांवें आहेत. आणि या पांच देवताहि एकाच ईश्वराचीं निरनिराळीं नांवें आहेत. मूर्तींची बाह्योपचारांनी पूजा करणें याला आपल्या सर्व शास्त्रांनी पूजेचा निकृष्टांतील निकृष्ट प्रकार म्हटलें आहे. पण याचा अर्थ अशी पूजा करणें चूक आहे असा होत नाही. आज प्रचारांत असलेल्या मूर्तिपूजेंत पुष्कळशा अनिष्ट गोष्टी शिरलेल्या आढळत असल्या तरीहि मी तिची निंदा वा निषेध करूं इच्छीत नाहीं. मी त्या धर्मनिष्ठ व मूर्तिपूजक ब्राह्मणाच्या (भगवान श्रीरामकृष्णांच्या) पायधुळीने पावन झालों नसतों तर मी कोठे जाऊन पडलों असतों, देव जाणें !

मूर्तिपूजेविरुद्ध प्रचार करणाऱ्या वा मूर्तिपूजेचा धिक्कार करणाऱ्या सुधारकांना मी म्हणेन, "बंधूंनो; तुम्ही निराकार ईश्वराची पूजा करण्यास पात्र असाल व म्हणून तुम्हांला बाह्य उपचारांची गरज वाटत नसेल तर ठीक आहे, पण जे तसें करूं शकत नाहीत त्यांचा धिक्कार कशासाठी करतां ? अतिप्राचीन काळापासून अस्तित्वांत असलेली एक सुंदर इमारत दुर्लक्ष झाल्यामुळे म्हणा, किंवा उपयोगांत न आणल्यामुळे म्हणा, मोडकळीला आलेल्या अवस्थेंत पडली असेल; तिच्या आंत सर्वत्र धुळीचीं पुटें बसलेलीं असतील, व तिचे कांही भाग कोसळून खाली पडत असतील. या इमारतीचें तुम्ही काय कराल ? तुम्ही तिची आवश्यक ती दुरुस्ती वा सफाई करावयास लागून तिचें पुनरुज्जीवन कराल, की ती सर्वच्या सर्व पाडून टाकून तिच्या जागीं कुचकामाच्या आधुनिक पद्धतीने दुसरी नवीन इमारत बांधाल, आणि तीहि अशी की जिच्या टिकाऊपणाची कांहीच शाश्वती नाहीं ? आपल्याला तींत सुधारणा करावयाची आहे सुधारणा म्हणजे आवश्यक ती सफाई व दुरुस्ती करून इमारत राहण्यास योग्य व परिपूर्ण बनवणें होय, ती पूर्णपणें धुळीला मिळविणें नव्हे. इमारत दुरुस्त व स्वच्छ होऊन राहण्यासाठी योग्य झाली की सुधारणेचें कार्य संपलें. जुन्या गोष्टींच्या पुनरुज्जीवनाचें कार्य जर संपलें तर मग सुधारकांसाठी करावयाचें काय उरलें ? शक्य असल्यास पुनरुज्जीवनाचें हें कार्य करा, नाहीतर बाजूला व्हा !" आपल्या देशांतील सुधारकवर्गाला हें नको आहे, तर उलट त्यांना एक नवा संप्रदाय निर्माण करावयाचा

आहे. तें कसेंहि असो, त्यांनी चांगलें कार्य केलें आहे; त्यांच्यावर ईश्वर कृपा करो ! पण हिंदूंनो, तुम्ही आपल्या धर्मापासून वेगळे कां होऊं इच्छितां ! आपला महान् व अमोल असा ठेवा असलेलें 'हिंदु' हें नांव स्वीकारण्यास तुम्हांला लाज कां वाटते ? हे देवांच्या संतानांनो, माझ्या देशबांधवांनो, आपल्या राष्ट्राचें हें जहाज युगानुयुगें सभ्यतेचा सर्वत्र प्रसार करण्याचें कार्य करीत आलें आहें व त्याने आपल्या अमूल्य रत्न-भांडाराने अखिल जगाला समृद्ध केलें आहे. गौरवाने भरलेल्या कित्येक शतकांपासून आपल्या या राष्ट्ररूपी जहाजाने लक्षावधि जीवांना सर्व दुःखांतून पार करून जीवनसागराच्या पैलतीरीं पोहोचविलें आहे. पण आज त्यांत एखादें छिद्र पडून तें आपल्याच दोषांमुळे वा अन्य एखाद्या कारणामुळे नादुरुस्त झालें आहे. अशा वेळीं त्यांतून प्रवास करणाऱ्या तुम्हां लोकांचें कर्तव्य काय आहे ? तुम्ही त्याला शिव्याशाप देत बसाल काय व आपसांत भांडत राहाल काय ? तुम्ही सर्वजण एक होऊन व आपल्या सर्व प्रयत्नांची शर्थ करून हीं छिद्रें बुजविणार नाही काय ? आपण सर्वचजण आपल्या हृदयांतील रक्त या कार्यासाठी आनंदाने अर्पण करूं या; आणि जर या प्रयत्नांत आपण अयशस्वी झालों, तर आपण सर्वजण एकत्रच बुडूं व नष्ट होऊं या; असें झालें तरी आपल्या ओठांवर कृतज्ञतेचे शब्द असोत, निंदेचे शब्द नसोत.

ब्राह्मणांना मला असें सांगावयाचें आहे की, "वंश व जाति यांविषयींचा तुमचा अभिमान व्यर्थ आहे. तो टाकून द्या. शास्त्रानुसार असलेलें ब्राह्मणत्व आज तुमच्या ठायीं नाही, कारण तुम्ही दीर्घ काळ म्लेच्छसत्तेखाली राहिलां आहांत. तुम्ही आपल्या पूर्वजांच्या शब्दांवर श्रद्धा ठेवणारे असाल तर ह्याच क्षणीं जा, व 'तुष' पेटवून तयार केलेल्या अग्नींत प्रवेश करून प्रायश्चित्त घ्या. प्राचीन काळीं कुमारिल भट्टांनी असेंच केलें होतें. बौद्धांना हुसकून लावण्यासाठी प्रथम त्यांनी त्यांचें शिष्यत्व पत्करलें व नंतर वादांत त्यांना जिंकल्यावर त्यांच्यापैकी अनेकांच्या मृत्यूस ते कारणीभूत झाले, आणि लगेच पापप्रक्षालनासाठी त्यांनी तुषानलांत प्रवेश केला. त्यांच्याप्रमाणे तुम्हीहि आपल्या पापांचें प्रायश्चित म्हणून तुषानलांत प्रवेश करा. तसें करण्याचें धैर्य तुमच्या ठिकाणीं नसेल तर आपलें दौर्बल्य कबूल करा व सर्वांसाठी ज्ञानाचे

दरवाजे खुले करा, त्यांच्या मदतीसाठी हात पुढे करा, आणि दलित अशा सर्वसामान्य लोकांना पुन्हा एकदा त्यांचे न्याय्य व रास्त अधिकार द्या."

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३८६९५ ....... दि ..........
क्रमांक .................... दि ..........

# आमचें अन्य प्रकाशन

| | रु.न.पै. |
|---|---|
| १. श्रीरामकृष्ण-चरित्र— | |
| न. रा. परांजपे कृत—प्र. भा. . . | ४.२५ |
| २. „ „ —द्वि. भा. . . . | ४.३७ |
| ३. श्रीरामकृष्ण-वचनामृत—श्री. ‘म’ कृत . . . | ५.५० |
| ४. स्वामी विवेकानंद यांचें चरित्र— | |
| सुधारलेली दुसरी आवृत्ति . . . | ७.२५ |
| ५. स्वामी विवेकानंदांच्या सहवासांत— | |
| श्री. शरच्चंद्र चक्रवर्ती ( संकलक ) . . | ४.५० |
| ६. साधु नागमहाशय-चरित्र . . . . | २.०० |
| ७. हिमालयाच्या कुशींत—स्वामी अखंडानंद . . | २.५० |
| ८. स्वामी विवेकानंदांच्या आठवणी . . . | १.२५ |
| ९. श्रीरामकृष्ण-वाक्सुधा— | |
| स्वामी ब्रह्मानंद द्वारा संकलित . . | १.०० |

## स्वामी विवेकानंदकृत योगावरील पुस्तकें

| | |
|---|---|
| १०. ज्ञानयोग . . . . . . . | ४.०० |
| ११. राजयोग (पतंजलींच्या योगसूत्र विवरणांसह) . . | ३.०० |
| १२. कर्मयोग . . . . . . . | १.६२ |
| १३. भक्तियोग . . . . . . . | १.२५ |

## स्वामी विवेकानंदकृत विविध विषयांवरील लोकप्रिय पुस्तकें

| | |
|---|---|
| १४. स्वामी विवेकानंदांचीं पत्रें . . . . | ४.७५ |
| १५. दैवी वाणी (Inspired Talks) . . . | २.७५ |
| १६. भारतीय नारी . . . . . | २.०० |
| १७. वेदान्ताचें स्वरूप आणि प्रभाव . . . . | १.७५ |

| | | रु.न.पै. |
|---|---|---|
| १८. | महापुरुषांच्या जीवनकथा | १.६२ |
| १९. | स्वामी विवेकानंदांशीं संवाद आणि संभाषणें | १.६० |
| २०. | वेदान्त आणि जीवन | १.२५ |
| २१. | पूर्व आणि पश्चिम | १.२५ |
| २२. | सार्वजनीन धर्म : स्वरूप व साधना : | १.०० |
| २३. | माझे गुरुदेव | १.०० |
| २४. | शिकागो व्याख्यानें | ०.९० |
| २५. | पुनर्जन्म आणि आत्म्याचें अमरत्व | ०.६० |
| २६. | हिंदुधर्माचें नव-जागरण | ०.५६ |
| २७. | शिक्षण | ०.५६ |
| २८. | पवहारी बाबा | ०.५० |
| २९. | बुद्धदेवांचा जगाला संदेश आणि इतर व्याख्यानें | २.२५ |

## पॉकेटसाइज पुस्तकें

| | | |
|---|---|---|
| ३०. | माझें जीवन आणि कार्य——स्वामी विवेकानंद | ०.६५ |
| ३१. | माझ्या मोहिमेची योजना——स्वामी विवेकानंद | ०.५० |
| ३२. | विवेकानंद-वाणी | ०.९० |
| ३३. | स्वामी विवेकानंद म्हणतात—— | ०.५० |
| ३४. | रामकृष्ण-संघ——ध्येय व इतिहास——स्वामी तेजसानंद | ०.७५ |

याशिवाय आमच्या आश्रमाने हिंदी भाषेंतूनहि समग्र रामकृष्ण-विवेकानंद साहित्य प्रकाशित केलें आहे. त्यासाठी विस्तृत सूचीपत्र मागवावें.

श्री रामकृष्ण आश्रम, धंतोली, नागपूर – १.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३८६९५ वि:
क्रमांक १४५४ नों दि ३०

REFBK-0013139